

00095297

NOT TO BE ISSUED
OUT OF THE LIBRARY.



Digitized with financial assistance from the
Government of Maharashtra
on 02 July, 2018

This bound volume contains the following pamphlets.

1. मराठ्यांच्या इतिहासाची साधने ले. दे. स. सरदेसाई व व. वि. भोगटे.
2. The Shivaji Period in Maratha History 1644-1707 by G. S. Sardesai.
3. Health Bulletin No. 23 = The Nutritive value of Indian Foods and the Planning of satisfactory Diets (Revised and Enlarged) 1958 Published by Govt. of India, Manager of Publications, Delhi. 1939.
4. Annihilation of Caste, by Dr. B. R. Ambedkar
5. मानवशास्त्र संस्थानातील ऐतिहासिक साधने : त्रुटी विमोचन.

MM. T. 13
(95297)

2 | R दे

रा - रा - संपादक यांस

अभिप्रायार्थ सप्रेम भेट.

2 | R दे — रा. रा. संपादक यांस
अभिप्रायार्थ सप्रेम भेट

गोखले राजकारण-अर्थशास्त्र-संशोधन-मंदिर

प्रकाशन २ रें

B.3872

महाराष्ट्रांतील मोटार वाहतूक

95297

लेखक

धनंजय रामचंद्र गाडगीळ,
एम्. ए., एम्. लिट्. (केंब्रिज)

लक्ष्मण विनायक गोगटे,
बी. एस्. (एन्. कॅरोलिना)

१९३६

किंमत आठ आणे.

Eco
MAP.
388.31 095497
Gad/Mah
95297



विनायक पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, भांबुर्डा ९३६।३ पुणें ४.
रामचंद्र गाडगीळ, एम्. ए., एम्. लिट्. (कँटब.), गोखले
पॉलिटिक्स ॲन्ड इकॉनॉमिक्स, पुणें ४.

गोखले राजकारण-अर्थशास्त्र-संशोधन-मंदिर

प्रकाशन २ रें

महाराष्ट्रांतील मोटरवाहतूक

Motor transport in M.

लेखक

धनंजय रामचंद्र गाडगीळ,
एम्. ए., एम्. लिट्. (केंब्रिज)

लक्ष्मण विनायक गोगटे,
बी. एस्सी. (एन्. कॅरोलिना)

13

१९३६

Swift

किंमत आठ आणे.

उपोद्घात.

या संस्थेनें १९३५ च्या मार्च महिन्यांत "मुंबई इलाख्याच्या सहा जिल्ह्यांतील मोटर-बस वाहतुकीची पाहणी" या नांवाचा एक अहवाल इंग्रजींत प्रसिद्ध केला. आज त्याचें संक्षिप्त रूपांतर वाचकांच्या हातीं देण्याचा योग येत आहे. इंग्रजी अहवाल, विशेषतः मोटरधंद्यांतील कांहीं मोटर-मालक, ड्रायव्हर, व इतर सामान्य जनता यांना समजणें अशक्य असल्यानें, त्यांना समजेल अशा रूपांत तो देणें इष्ट आहे. या हेतूनेंच मूळ अहवालाचें हें मराठी रूपांतर आज प्रकाशित करीत आहों.

प्रस्तुत संशोधनाचें काम हातीं घेतलें त्यावेळीं ज्या ज्या व्यक्तींनीं आम्हांस मदत केली त्या सर्वांचे स्वतंत्ररीत्या आभार मानणें अशक्य आहे. सर्व सहा जिल्ह्यांतील अनेक मोटर-मालक, ड्रायव्हर व त्यांचे मदतनीस तसेंच मोटरधंद्यांतील इतर लोक यांनीं आपला वेळ खर्च करून आम्हांस उपयुक्त माहिती दिली याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत. सहा जिल्ह्यांतील पोलिस-अधिकाऱ्यांनीं आपापलीं दप्तरें आम्हांस पाहूं दिलीं, व शक्य ती माहिती पुरविली; "सार्वजनिक कार्यखातें" व जिल्हा लोकल बोर्डांचे व म्युनिसिपालिट्यांचे अधिकारी यांनींही आम्हांस बरीच मदत केली. म्युनिसिपालिट्यांपैकीं पुणें, बार्शी व शिरूर या तीन म्युनिसिपालिट्यांनीं दिलेली जकातीसंबंधींची माहिती आम्हांस विशेष उपयोगी पडली. पुण्याची डेक्कन मोटार सर्व्हिस, व मुंबईच्या १ प्रेसिडेन्सि मोटर्स, २ फोर्ड मोटार कं. (इन्डिया) लि. ३ जनरल मोटर्स (इन्डिया) लि. या व इतर कंपन्यांकडून उपयुक्त अशी पुष्कळशी माहिती मिळाली. इंडियन रोडस अँड ट्रान्सपोर्ट डेव्हलपमेंट असोसिएशन व डब्ल्यू. आय. ए. ए. या दोन संस्थांच्या कार्यवाहांनींही आम्हांस वेळोवेळीं फार मदत केली. त्याचप्रमाणें निरनिराळ्या देशांतील वाहतुकीच्या संस्था व संघ व सरकारी खातीं यांचेकडूनही वेळोवेळीं मागावी तशी माहिती मिळत गेली. या सर्व मदतीबद्दल त्या सर्वांचेच आभार मानणें जरूर आहे.

व्यक्तिशः आभार मानावयाचे तर परांजपे मोटरसंघाचे जनक कै. बाबासाहेब परांजपे, अलीबागचे रा. नाईक, गोरेगांवचे रा. जोगळेकर, रत्नागिरीचे रा. राजवाडे, कोल्हापूरचे रा. माहागांवकर व रा. शंकपाळ, सोलापूरचे रा. भागवत व रा. सकल नगर-पुणें मोटरसंघाचे अध्यक्ष व नगरचे वकील रा. धनेश्वर व इन्दापूरचे रा. जोशी यांचे आभार मानणें जरूर आहे.

या सर्वांच्या मदतीशिवाय संशोधनाचें कार्य नडीस जाणें शक्य नव्हतें हें उघड आहे.

ध. रा. गाडगीळ

ल. वि. गोगटे.

अनुक्रमणिका

प्रकरण १ लें		पृष्ठ
प्रस्तावना		
प्रकरण २ रें		... १
धंद्यांतील [illegible]टक व त्यांची घटना ...		
प्रकरण ३ रें		... ३
मोटरबसांच्या [illegible]विक्री व त्यास लागणारें भांडवल		
प्रकरण ४ थें		... १०
मोटरबसांच्या [illegible] वाहतूक		
प्रकरण ५ वें		... १४
उत्पन्न आणि [illegible]चे खर्च		
प्रकरण ६ वें		... २०
वाहतुकीच्या [illegible] साधनावरील कर व रस्त्यांवर होणारा खर्च ...		
प्रकरण ७ वें		
संघ-स्थापना [illegible] व सरकारी नियंत्रण ...		
प्रकरण ८ वें		... ४८
मोटरधंद्याचें एकसूत्रीकरण व नियंत्रण ...		
प्रकरण ९ वें		... ५५
सारांश व सूचना		
		... ६३

महाराष्ट्रांतील मोटरवाहतुकीचा धंदा.

प्रकरण १ लें.

प्रस्तावना

गेल्या दहा बारा वर्षांत जगांतील बहुतेक सर्व राष्ट्रांचें लक्ष वहातुकीच्या प्रश्नाकडे वेधलें आहे. इंग्लंड काय किंवा पॅलेस्टाइन काय; अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें काय किंवा न्यूझीलंड काय, सर्वच राष्ट्रांतून या प्रश्नासंबंधीं बराच विचार चाललेला आहे. तेव्हां हिंदुस्तानांतही या प्रश्नाकडे सरकारचें व जननेचें लक्ष वेधावें यांत आश्चर्य नाहीं. रस्त्यावरील वहातुकीचें प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्यानें आम्हीं रस्त्यावरील वाहतुकीसंबंधींच्या प्रश्नाचा सविस्तर विचार व अभ्यास करण्याचें ठरविलें. १९२७ सालीं हिंदुस्तानसरकारनें रस्त्याच्या प्रश्नासंबंधीं विचार करण्याकरितां एक कमिटी नेमिली. या कमिटीकडे रस्ते सुधारणा, रस्त्यांवर होणारा खर्च व वाहतुकींच्या साधनावरील कर या प्रश्नासंबंधीं विचार करण्याचें काम सोंपविलें होतें; रस्त्यावरील वाहतुकीसंबंधीं माहिती गोळा करणें किंवा त्याबाबत शिफारशी करणें हें काम या कमिटीकडे सोंपविलें नव्हतें. त्यावेळीं सरकारचें लक्ष रस्ते सुधारण्याकडेच विशेष होतें असें म्हणणें गैर होणार नाहीं. परंतु पुढें थोड्याच दिवसांत सरकारचें लक्ष दुसऱ्याही प्रश्नाकडे वेधलें. हिंदुस्तानांतील बहुतेक सर्व आगगाड्या सरकारी असल्यानें व रस्त्यांवरील मोटर व इतर वाहतुकींच्या साधनांशीं त्यांना पैसा मिळविण्याच्या बाबतींत टक्कर द्यावी लागत असल्यानें, या प्रश्नाकडे सरकारचें लक्ष वेधलें. तेव्हां या नवीन प्रश्नाचा विचार करण्याकरितां १९३२ च्या जुलै महिन्यांत सरकारनें मि. मिचेल व मि. कर्कनेस या दोहोंची एक कमिटी नेमली. या अधिकाऱ्यांनीं थोड्याच वेळांत सबंध हिंदुस्थानाचा दौरा काढून सर्व हिंदुस्थानबहुल एक व निरनिराळ्या प्रांतांबहुल प्रत्येकीं एक असे अहवाल एकत्रित स्वरूपांत प्रसिद्ध केले. त्यांना हें काम करण्यास जो वेळ मिळाला त्या मानानें त्यांचा रिपोर्ट खरोखरीच प्रशंसनीय आहे. या रिपोर्टांत बऱ्याच प्रश्नांचा सांगोपांग ऊहापोह केलेला आहे.

सध्यां चालू असलेली मोटर व आगगाड्या यांमधील चढाओढ मोटरवहातुकीविषयींचे नियम व नियंत्रण, मोटर वहातुकीवरील कर, आगगाड्यांचे नवीन उपक्रम व रस्तेवाढीसंबंधीं योजना वगैरेविषयीं त्यांत विचार केलेला आहे. मेसर्स मिचेल आणि कर्कनेस यांचा रिपोर्ट १९३३ च्या आरंभींच प्रसिद्ध झाला, व त्या वर्षाच्या एप्रिल महिन्यांत या रिपोर्टाचा विचार करण्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें प्रांतिक सरकार व इतर संस्था यांच्या प्रतिनिधींची एक सभा बोलाविली. या सभेंत कांहीं गोष्टी करण्याचें ठरलें, पण त्यांपैकीं बहुतेक सर्वच बाबींची अंमलबजावणी करण्याचें लांबणीवर पडत असल्याचें आढळलें. याला मुख्य कारण एकच व तें म्हणजे आगगाड्या या जरी मध्यवर्ती सरकारच्या ताब्यांत असल्या तरी रस्त्यांवरील वाहतुकींची सर्व जबाबदारी व त्यावरील [illegible] प्रांतिक सरकारांकडे असल्यानें [illegible] दोघांचें प्रत्येक बाबतींत एकमत होईपर्यंत कोणतीही गोष्ट निकालांत निघणें शक्य नाहीं.

आम्ही हातीं घेतलेल्या संशोधनाचें काय ऑगस्ट १९३२ मध्यें म्हणजे मिचेल-कर्कनेस कमिटीचें काम सुरूं होणार हें प्रसिद्ध होण्यापूर्वीच सुरूं केलें होतें. अशा प्रकारची माहिती सरकारतर्फे गोळा होणार हें कळल्यानंतर हें संशोधन चालूं ठेवावें किंवा नाहीं याविषयीं आम्हांस थोडा विचार पडला, परंतु सरकारतर्फे होणाऱ्या चौकशीचें स्वरूप पहातां सरकार ज्या प्रकारची माहिती मिळविणार त्या प्रकाराहून आपण मिळविणार आहोंत ही माहिती वेगळी असणार हें आढळून आल्यानुळें संशोधनाचें कार्य तसेंच चालूं ठेवण्याचें नक्की केलें. तसेंच मिचेल-कर्कनेस-रिपोर्टांत ज्या गोष्टींचा प्रामुख्यानें विचार केला जाणार त्या गोष्टींवर आमच्या संशोधनांत आपण फारसा भर द्यावयाचा नाहीं असें ठरविलें. उदाहरणार्थ, रेल्वे व मोटरवाहतूक यांजमधील चढाओढीसंबंधीं सरकारकडून बरीच काळजीपूर्वक माहिती जमविली जाईल हें आढळून आल्यावरून त्या एका बाबीसंबंधांत फारशी माहिती मिळविण्याचा आम्हीं खटाटोप केलाच नाहीं. आम्ही केलेल्या संशोधनांत धंद्यांत पडलेल्या लोकांची सद्यःस्थिति व या धंद्याचें आर्थिक परीक्षण या गोष्टींवरच विशेष भर देण्यांत आला आहे.

आम्हीं एकत्रित केलेल्या माहितीवरून एक गोष्ट निदर्शनास येतें, ती ही कीं, मोटरवाहतुकीसंबंधींचें आर्थिक परीक्षण करण्यास योग्य असे आंकडे किंवा तुलनात्मक माहिती एकत्र केलेली हिंदुस्थानांत कोठेंही मिळत नाही. इतर देशांतील मोटर-मालकांच्या संघासारखे सघ आपल्या देशांत नाहींत किंवा इंग्लंडमधील वाहतूक खातें (Ministry of Transport) यासारखी सरकारी खातीही नाहींत. परिस्थिति अशी असल्यानें [redacted] संबंधी माहिती मिळवितांना फार त्रास [redacted]तो, व जी माहिती आपण मिळवितो तिचा खरेपणा पडताळण्यास दुसरें कांहीं साधन नसतें. अशाप्रकारची थोडीफार उपयुक्त माहिती एकत्रित व्हावी या हेतूनेंच आम्हीं हें काम हातीं घेतलें.

संशोधनासाठीं म्हणून आम्ही खालील सहा जिल्ह्यांची निवड केली. पुणें, अहमदनगर, सातारा, सोलापूर, कुलाबा व रत्नागिरी, पुणें हें मध्यवर्ती केंद्र समजून जितका मोठा प्रदेश आम्हांस घेतां येणें शक्य होतें, तितका आम्हीं घेतला. माहिती गोळा करण्याचें सर्व कार्य रा. ल. वि. गोगटे यांनीं केलें. ते या सर्व जिल्ह्यांतून स्वतः फिरले आणि ही माहिती मिळविण्यास त्यांसें जवळ जवळ एक वर्ष लागलें. आमच्या रिपोर्टांत दिलेली बहुतेक सर्व माहिती निरनिराळ्या लोकांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन मिळविलेली आहे. कांहीं माहिती बाहेरून आणलेली म्हणजे मद्रास इलाख्यांतील लोकलबोर्ड व परदेशांतील मोटर मालक-संघ व इतर संस्था यांजकडून मागविलेली आहे. मोटर लॉऱ्या अगर बस यांच्या मालकांकडून माहिती मिळाली, त्यापेक्षा होतां होईल तों जास्त भर दिला आहे. संपूर्ण माहिती मिळविण्यासाठीं आम्ही प्रथम एक प्रश्नमालिका तयार करून ती कांहीं मोटरमालकांकडे पाठविली, परंतु बहुतेकांकडून या प्रश्नावल्या भरून न आल्यानें, किंवा ज्या भरून आल्या, त्यांत प्रश्नांचीं उत्तरें व्यवस्थित व मुद्देसूद न दिल्यानें, प्रत्यक्ष भेटी घेऊनच माहिती मिळविली. माहिती मिळवीत असतां बरेच वेळां दहा बारा मोटर-मालक एकत्र जमवून त्यांच्याशीं विचारविनिमय करण्याचा प्रसंग आला; म्हणजे जरी प्रत्यक्ष प्रश्नावल्या ५५ च भरल्या असल्या, तरी माहिती मात्र या संख्येपेक्षां बऱ्याच जास्त लोकांकडून मिळविली आहे. ही माहिती मिळविण्यासाठीं रा. गोगटे यांनीं सहा जिल्ह्यांतील एकंदर ५४ गांवांस भेट दिली व त्यांपैकीं ५० ठिकाणीं प्रश्नावल्या भरल्या. अर्थात सर्वच ठिकाणांना सारखें महत्त्व दिलेलें नाहीं; तसेंच सर्व जिल्ह्यांतून सारख्या

प्रश्नावल्या भरलेल्या नाहीत. काहीं ठिकाणांस जास्त महत्त्व देणें अवश्य वाटल्यावरून तेथें इतर ठिकाणांपेक्षां जास्त प्रश्नावल्या भरल्या. उदाहरणार्थ खास पुणें शहरांतच एकंदर २० प्रश्नावल्या भरल्या. इतर शहरांच्या किंवा ठिकाणांच्या महत्त्वाच्या मानानें तेथें जास्त कमी प्रश्नावल्या भरल्या. बहुतेक मोटरमालकांस माहिती पुरविण्यास फारसा वेळ नसे किंवा ही माहिती कशासाठीं गोळा होत आहे, याविषयीं त्यांस पूर्ण कल्पनाही नव्हती. असें असूनही बहुतेकांनीं आम्हांस हवी असलेली माहिती मोठ्या खुषीनें दिली याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों. मोटरमालकांप्रमाणेंच ड्रायव्हर, एजंट व मोटरविक्रेते, किंवा त्यांचे दलाल यांचेकडूनही माहिती मिळविण्याचा शक्य तेवढा आम्हीं प्रयत्न केला. त्यांचेकडूनहि पुष्कळशी उपयुक्त माहिती मिळाली. तसेंच सर्व जिल्ह्यांचे पोलिस अधिकारी, डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड, म्युनिसिपालिट्या, पब्लिक वर्क्स खातें वगैरेजवळूनही आम्हांस हवी असलेली माहिती मिळाली याबद्दल त्यांचेही आभार मानणें जरूर आहे. परदेशांतील सरकारी खातीं व इतर संस्था यांनींही अतिशय उपयुक्त माहिती वेळेवर पुरविल्यानें आमचा बराच मोठा कार्यभाग झाला. फक्त एकाच बाजूची आम्हांस मुळींच माहिती मिळाली नाहीं, व ती आगगाड्यांसंबंधीं. इतर लोकांनीं आमच्याशीं जें सहकार्य केलें तसेंच आगगाड्यांच्या अधिकाऱ्यांनींही केलें असतें तर आमचें काम आणखी सुकर व सर्वांगपरिपूर्ण झालें असतें. पण रेल्वेअधिकाऱ्यांनीं ही माहिती देण्याबद्दल अगदींच नकार दिल्यामुळें आम्हास रेल्वे व मोटरवहातुकींतील चढाओढीसंबंधांत तपशीलवार विवचन करणें शक्य झालें नाहीं.

प्रकरण २ रें.

धंद्यांतील घटक व त्यांची घटना

(१) उपलब्ध सरकारी आंकडे

मोटरनोंदणीचें काम सरकारनें मुंबईच्या पोलिसअधिकाऱ्यांकडे सोंपविलें आहे जेवढ्या मोटरींची विक्री होते, त्या सर्वांची या ऑफिसांत नोंद होते. तसेंच दर वर्षी निरनिराळ्या जिल्ह्यांतील तपासलेल्या भाड्याच्या मोटरींची नोंदही यांजकडे मिळते. मुंबई इलाख्याच्या पोलिसरिपोर्टांत एकंदर मोटरींचे दोन वर्ग पाडलेले आढळून येतात. (१) दोन टन किंवा त्यावरील वजनाच्या मोटरी, व (२) दोन टनांच्या खालील वजनाच्या मोटरी. पहिल्या वर्गांतील मोटरी "वजनी गाड्या" म्हणून दाखविलेल्या असून दुसऱ्या वर्गांतील मोटरींस नुसतें "Cars" म्हणूनच संबोधिलें आहे. इतर प्रांतांतून अशाप्रकारचें वर्गीकरण केलेलें नाहीं. "टॅक्सी" व "बस" किंवा "लॉरी" असे दोन वर्ग इतर प्रांतांतून केलेले आढळतात. आमच्या समजुतीनें हें दुसरें वर्गीकरणच जास्त सोईस्कर आहे. इतर देशांतूनही या दुसऱ्या प्रकाराप्रमाणें वर्गीकरण केलेलें आढळतें. कारण दोन टनाच्यावर मुंबईबाहेर फार थोड्या गाड्या आढळतात. आणि मुंबई सरकारच्या वर्गीकरणाप्रमाणें साजगी

टीप:—या व पुढील प्रकरणांत दिलेली माहिती १९१२-१३ या वर्षाबाबतची आहे.

गाड्या, भाड्याच्या टॅक्सी व भाड्याच्या लॉऱ्या व बसेस या सर्वीचा एकाच म्हणजे "Cars" या वर्गात समावेश होतो यामुळें सध्यांच्या वर्गीकरणावरून भाड्याच्या मोटरबसांची मागील १०-१२ वर्षांत कसकशी वाढ होत गेली हें सांगतां येत नाहीं.

मोटरबस भाड्यानें चालवावयाची असल्यास मालकास "ए" परवाना घ्यावा लागतो. हा परवाना दरवर्षी नवीन करून घ्यावा लागतो. परवाना घेतल्यानंतर वर्षाचें आंतच मोटर विकण्याची वेळ आल्यास एका मालकाकडून दुसऱ्या मालकाकडे मोटर जातांना दुसऱ्या मालकास फिरून नव्यानें "ए" परवाना मिळाल्याशिवाय मोटरबस भाड्यानें चालवितां येत नाहीं. नोंदबुकांत अशा एका मालकाकडून दुसऱ्या मालकाकडे गेलेल्या गाड्या नव्या गाड्यांचे वर्गांतच घातलेल्या असल्यानें दरवर्षी फक्त नव्याच गाड्या किती नोंदविल्या गेल्या हें सांगतां येत नाहीं. तसेंच मुंबईस मोटरींची खरेदी केल्यानंतर तेथेंच त्या-वर्षी ती नोंदविली गेल्यास ती ज्या जिल्ह्यांत जाते, तेथें तिची फिरून नोंद होत नसल्यानें, मुंबई शहरां-तील मोटरबसांची संख्या वास्तविक संख्येपेक्षां जास्त पडून जिल्ह्यांतून मात्र मोटरी वस्तुतः जास्त, पण नोंदबुकांत त्यांची संख्या कमी असलेली आढळून येते. पोलिस नोंदणीची हल्लींची पद्धति सुधारल्याशिवाय मोटरबाबतचे व्यवस्थे-शीर आंकडे उपलब्ध होणें शक्य नाहीं.

(२) प्रत्येक मोटरमालकाजवळ असणाऱ्या मोटरींची संख्या

वर उल्लेख केल्याप्रमाणें प्रांतिक सरकार-च्या नोंदणींत घोटाळा उडविणारे जसे प्रकार

देशावरील चार जिल्ह्यांत १९३२-३३ सालीं असणाऱ्या बसमालकांची व त्यांच्या मालकीच्या बसांची संख्या

(मालकीच्या) बसांची संख्या	पुणें		सातारा		अहमदनगर		सोलापूर	
	बसमालकांची संख्या	बसांची संख्या	बसमालकांची संख्या	बसांची संख्या	बसमालकांची संख्या	बसांची संख्या	बसमालकांची संख्या	बसांची संख्या
एक बस.	१६३	१६३	१८७	१८७	१५७	१५७	११८	११८
दोन बसा.	३३	६६	३४	६८	१९	३८	२२	४४
तीन बसा.	२२	६६	१२	३६	४	१२	४	१२
चार बसा.	१८	७२	३	१२	३	१२	१	४
पांच बसा.	४	२०	३	१५	...	...	२	१०
सहा बसा.	३	१८	१	६	३	१८	...	...
सहापेक्षां जास्त बसा.	५	६८	४	६९	...	...	३	२३
एकंदर.	२४८	४७३	२४४	३९३	१८६	२३७	१५०	२१६

आहेत, तसेंच प्रत्येक जिल्ह्याच्या नोंदवुकांतूनही आढळून येतात. उदाहरणार्थ कांहीं जिल्ह्यांत भाड्याच्या बसा व टॅक्सी यांचे वेगळालें वर्गीकरण केलेलें आढळतें, तर कांहींत तसें तें आढळत नाहीं. पुणें जिल्ह्यांत भाड्याच्या बसा व टॅक्सी या वेगवेगळ्या नोंदलेल्या आहेत. नगर व सोलापूर जिल्ह्यांत टॅक्सी फारशा नाहींतच कोंकणांतील दोन जिल्ह्यांत एक टन पेक्षां लहान अशाच मोटरींचा धंपर जास्त असल्यानें येथें भाड्याच्या टॅक्सींची संख्या चर्गीच आहे.सातारा जिल्ह्यांतही कोंकणांतील रहदारीसाठीं म्हणून कांहीं मोटरमालकांनीं टॅक्सी ठेविलेल्या आहेत.

वर दिलेल्या तक्त्यावरून देशावरील चार जिल्ह्यांतील प्रत्येक मोटर मालकाजवळ प्रत्येकीं किती मोटरी आहेत हें दिसून येईल. हा तक्ता आम्ही प्रत्येक जिल्ह्यांतील पोलिसांच्या नोंदवुकवरून तयार केलेला आहे. ज्या इसमांनीं मोटरी हप्त्यावर आणलेल्या असतात त्यांची देखील मोटरमालकांतच गणना केलेली आहे. कारण आपल्या हिशेबांत मोटरविक्रेता म्हणजे दलाल किंवा कंपनी यांची गणना मालक म्हणून करणें बरोबर नाहीं. तक्ता वाचतांना दुसरी ही गोष्ट ध्यानांत धरावयास पाहिजे कीं, प्रत्येक जिल्ह्याची माहिती निरनिराळी गोळा केली असल्यामुळें कांहीं मालकांचा उल्लेख दुबार होण्याचा संभव आहे. असें झालें असलें तरी आम्हांस या तक्त्यावरून ज्या गोष्टी प्रामुख्यानें दाखवावयाच्या आहेत त्यांस फारसा बाध येत नाहीं. तक्त्यावरून असें आढळून येईल कीं, एकंदर १३०९ बसांपैकीं ६२१ बसांस प्रत्येकीं एकेक मालक आहे, म्हणजे एका मालकाजवळ एकच बस आहे, व जास्तींत जास्त ८२१ मोटरमालकांपैकीं ६२१ एक मोटरवालेच आहेत. राहिलेल्या इतर मालकांपैकीं ज्यांच्याजवळ दोन किंवा तीन मोटरी आहेत अशांचीच संख्या जास्त आहे. अशा तऱ्हेनें हिशेब करीत गेल्यास असें आढळून येतें कीं, ज्यांच्याजवळ दोन ते सहापर्यंत बसेस आहेत अशा मालकांची संख्या १८८ असून त्यांच्याजवळ असणाऱ्या मोटरींची संख्या ५२३ भरते. हें सर्व वजा केलें तर सहाहून ज्यांच्याजवळ जास्त मोटरी आहेत असे फक्त बाराच मालक राहतात. या बारा मालकांच्या मालकीच्या मोटरींची संख्या १६५ भरते. मिचेल कर्कनेस रिपोर्टावरून असेंच आढळून येतें कीं,सबंध हिंदुस्थानांतही एकच मोटर बाळगणाऱ्या मालकांची संख्या जास्त आहे. हिंदुस्थानांतील स्थितीशी साम्य असणाऱ्या इतर देशांतूनही अशाच प्रकारची परिस्थिति आढळून येते.

(३) बसांची स्थलवार विभागणी

वरीलप्रमाणेंच निरनिराळ्या जिल्ह्यांतील मोठमोठ्या ठिकाणीं किती बसा आहेत हें समजण्यासाठीं आम्हीं खाली दिलेला तक्ता तयार केला. जिल्ह्याच्या मोटर नोंदणी बुकांत मोटरीबरोबरच मालकांचे पत्ते दिलेले असल्यानें हा तक्ता आम्हांस तयार करतां आला. ज्या ठिकाणीं मोटरींची संख्या २० हून कमी भरली अशीं ठिकाणें या तक्त्यांत दाखविलीं नाहींत.

(४) सहा जिल्ह्यांतील १० अगर विसापेक्षां जास्त मोटरीं असणारीं ठिकाणें

ठिकाण	मोटारींची संख्या
पुणें शहर	२५३
सोलापूर	१३७
कोल्हापूर	११४
अहमदनगर	१११
सातारा	७८
संगमनेर	५८
कऱ्हाड	५३
अलीबाग	४६

महाड	३७
रत्नागिरी	३५
तळेगांव (दाभाडें)	३२
चिपळूण	३२
वाई	३०
घोडनदी	२६
पनवेल	२१
पंढरपूर	२०

फक्त पुणें शहरांतच काय त्या २०० हून अधिक मोटरबसा नोंदविल्या गेल्या आहेत. जेथें १०० पेक्षां जास्त परंतु २०० पेक्षां कमी मोटरी आहेत अशीं तीन ठिकाणें असून चार ठिकाणीं ४० हून अधिक पण १०० हून कमी मोटरबसा आहेत. ज्या ठिकाणीं १० पेक्षां जास्त परंतु २० हून कमी मोटरी आहेत अशा स्थळांची संख्या १८ असून तेथील एकंदर मोटरींची संख्या २५० आहे. ज्या ठिकाणीं ५ हून अधिक पण १० हून कमी मोटरी आहेत, अशीं २८ स्थळें असून तेथील मोटरींची संख्या ८५ आहे, व पांचांहून कमी मोटरी असणारीं १७५ स्थळें असून तेथील एकंदर मोटरींची संख्या १५८ आहे. ज्यांच्या मोटरी एखाद्या ब्रिटिश जिल्ह्यांत नोंदविल्या गेल्या आहेत, पण ज्यांचें राहण्याचें ठिकाण एखाद्या हिंदी संस्थानांत आहे अशा मोटरमालकांच्या मोटरी वरील सर्व हिशेबांत जमेस धरल्या गेल्या आहेत. परंतु संस्थानांतल्या संस्थानांतच फक्त चालणाऱ्या व बाहेर नोंदल्या न गेलेल्या अशाही कांहीं मोटरी असण्याचा संभव आहे. आम्हांस संस्थानांतील मोटरनोंदणीचे आंकडे न मिळाल्यानें तेथील मोटरींची तपशीलवार माहिती येथें देतां आली नाहीं. व त्या सर्व वरील हिशेबांत जमेसही धरितां आल्या नाहींत.

(५) प्रश्नावल्या व त्यांजवरून काढलेली माहिती.

आमच्या संशोधकानें प्रवासांत असतांना एकंदर १५५ प्रश्नावल्या भरल्या. या १५५ मोटरमालकांजवळ एकंदर ३६३ मोटरी होत्या. सर्व जिल्ह्यांस या बाबतींत एकसारखेंच महत्त्व दिलेलें नसलें तरी प्रत्येक ठिकाणच्या परिस्थितीचा विचार करून व त्या त्या ठिकाणास योग्य तें महत्त्व देऊन किती प्रश्नावल्या भरावयाच्या हें ठरविण्याचा प्रयत्न केला होता. तसेंच सर्व प्रकारच्या मोटरमालकांकडून प्रश्नावल्या भरून घेण्याचा प्रयत्न केला असला, तरी ज्यांचा धंदा चांगला चालला असून मोठ्या प्रमाणावर अगर विशेष व्यवस्थित दिसला अशांकडून प्रश्नावल्या जास्त भरून घेणें श्रेयस्कर वाटलें. कारण धंद्याविषयीं सर्वांगपरिपूर्ण माहिती जमविणें यावी हा उद्देश असल्यानें जेथें तशी माहिती मिळण्याचा संभव जास्त, अशा स्थळांकडे लक्ष वेधलें जाणें साहजिक होतें. असें असून देखील सर्व बाजूची सर्व प्रकारचीं माहिती मिळावी म्हणून प्रश्नावल्यांची वांटणी जितकी चोंकेर करतां येणें शक्य होतें तितकी केली.

(६) मालक-गाडीवान

ज्या मोटरमालकांजवळ फक्त एकच मोटर असते अशांपैकीं बरेंसचे मालक स्वतःच मोटर चालवितात. आमच्या १५५ च्या यादींतील ८४ एक-मोटर-मालकांपैकीं ३४ स्वतःच मोटर चालवीत असलेले आढळून आले. ज्यांच्याजवळ एकपेक्षां अधिक मोटरी आहेत अशा मालकांपैकीं देखील ७ मालक एक मोटर स्वतः चालवीत असून राहिलेल्या मोटरी चालविण्यासाठीं त्यांनीं गाडीवान ठेविलेले होते. प्रश्नावल्यांतील प्रमाण सगळीकडे लागूं आहे असें धरल्यास या भागांत एकंदर मोटर-मालकांपैकीं जवळजवळ ३०० मोटरमालक स्वतः मोटर चालवितात असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

(७) मार्गाची लांबी व रोजी प्रवासाचें अंतर

मोटरी ज्या ज्या वाटांवरून प्रवास करतात त्या त्या वाटांची लांबी किती या विषयींची जी माहिती आम्हांस मिळाली ती खालीं दिलेल्या तक्त्यांत दाखविली आहे. एकंदर प्रश्नावल्यांतील बसापैकीं ३२६ बसा ज्या मार्गावरून जातात, त्या विषयींची ही माहिती आहे.

बसा ज्या वाटांवरून जातात त्या वाटांच्या लांबीवरून केलेली बसांची विभागणी

मैल ५-१०	मैल ११-२०	मैल २१-३०	मैल ३१-४०	मैल ४१-५०	मैल ५१-६०	मैल ६१-७०	मैल ७१-८०
४	२६	६७	४७	५६	३४	३४	२२

मैल ८१-९०	मैल ९१-१००	मैल १०१-१२०	मैल १२१-१४०	मैल १४१ वरील			
१९	४	४	४	५		एकूण.	३२६

या तक्त्यावरून लहानमोठ्या वाटांचे प्रकार किती विविध आहेत हें दिसून येईल. केवळ एकाद्या शहरांतले शहरांत फिरणाऱ्या मोटरींचा समावेश अर्थात आमच्या माहितींत केलेला नाहीं.

तक्त्यांत दाखविलेली सर्वांत मोठी वाट १६१ मैलांची आहे. ९० किंवा त्यांहून जास्त मैलांच्या वाटांवरील रहदारी करणाऱ्या मोटरींची संख्या फारच कमी आहे. तक्त्यावरून असें दिसून येतें कीं २१ ते ३० व ४१ ते ५० मैलांवरील वाटांवर मोटरींच्या रहदारीचें प्रमाण जास्त असतें. या तक्त्यावरून अमक्या एका मैलांचे दरम्यानच्या वाटांवरच मोटरींची रहदारी जास्त होते असें सांगतां येणार नाहीं. एकंदरीनें कमींत कमी १० मैल व जास्तींत जास्त १०० मैल अशा वाटांवरच मोटरी जास्त प्रमाणांत रहदारी करतांना आढळून येतात.

वरीलप्रमाणेंच प्रत्येक मोटरींचा रोजचा प्रवास किती मैलांचा होतो ह्याचें प्रमाण ठरविण्याचाही आम्हीं प्रयत्न केला. यासंबंधींचीं संपूर्ण माहिती मिळण्यास जरा त्रास पडला. कारण बहुतेक मोटरमालक प्रत्येक मोटरीचा रोज प्रवास किती होतो याचे आंकडे ठेवीत नाहींत. परंतु प्रश्नावल्या भरीत असतांना सूचक प्रश्न विचारून यासंबंधानें जेवढी माहिती एकत्रित करतां आली तेवढी केली. त्यावरून खालीं दिलेला तक्ता तयार केला आहे.

रोजच्या प्रवासाच्या मैलांवरून केलेली बसांची विभागणी

मैल २१-३०	मैल ३१-४०	मैल ४१-५०	मैल ५१-६०	मैल ६१-७०	मैल ७१-८०
३	१७	३५	२३	१४	८८
मैल ८१-९०	मैल ९१-१००	मैल १०१-१२०	मैल १२१-१४०	मैल १४१ चे वर	
४५	५०	२४	३४	२९	एकूण ३६२

प्रश्नावल्यांतील ३६३ मोटरींपैकीं ३६२ मोटरींसंबंधींची माहिती येथें सांपडते. मोटरी दुरुस्त करण्यांत किंवा पास करून घेण्यांत जी दिवसमोड होते त्यांचा या तक्त्यांत विचार केलेला नाहीं. या तक्त्यावरून ७१ ते १०० मैल ज्यांचा रोजचा प्रवास होतो अशा मोटरींच्या संख्येचें प्रमाण जास्त असलेलें आढळून येतें. अशा मोटरींचें प्रमाण जवळजवळ शेंकडा ५० पडतें. जवळ जवळ शेंकडा १० मोटरी ४१ ते ५० मैल प्रवास करतात; शेंकडा २५ शंभर मैलांहून अधिक प्रवास करतात. ज्यांचा प्रवास ४० मैलांहून कमी होतो अशा मोटरींचे व १६० मैलांहून जास्त प्रवास होणाऱ्या मोटरींचें प्रमाण फारच कमी आहे.

मोटरी लांबच्या किंवा नजीकच्या वाटांवर कां चालविल्या जातात ? त्यांचा रोजचा प्रवास कमीजास्त होण्याचीं कारणें काय ? कमी किंवा जास्त प्रवास करण्यांत नफ्यातोट्याचें प्रमाण जास्त अगर कमी पडते किंवा काय ? अशा प्रकारचे प्रश्न आम्हीं प्रश्नावल्यांत घातले होते. परंतु त्यांची समाधानकारक उत्तरें मिळालीं नाहींत. मोटारमालकांकडून जीं उत्तरें मिळालीं त्यांतील कांहीं येथें देत आहोंत [१] वाट घराजवळची म्हणून तीच पसंत करतो. [२] रात्रीं मुक्कामास घरीं येतां येतें. [३] वाटेवर फारशी इतर मोटारींची चढाओढ नाहीं (४) बरींच वर्षें याच वाटेवरून जात असल्यानें आतां बदलींत नाहीं. (५) आमच्या संघाच्या मोटरी याच वाटेवरून जावयाच्या असें ठरलें असल्यानें हीच वाट पसंत करणें भाग पडतें. इ. इ. लहान मोठ्या वाटांत जास्त किफायतशीर कोणती होण्याचा संभव असा प्रश्न विचारतां बहुतेकांनीं कमी लांबीच्या वाटांवर जास्त खेपा करणें किफायतशीर होईल असें सांगितलें. परंतु सध्यां बहुतेक सर्वच वाटांवरून चढाओढ बरीच असल्यानें मोटर-मालकांस वाटेसंबंधी स्वतःच्या आवडी जरा बाजूसच ठेवाव्या लागतात. कारण जवळजवळच्या वाटांवरून मोटरींची गर्दी पण जास्त असते. अशा स्थितींत इच्छा असूनही पुष्कळशा मोटरमालकांस घरापासून दूरवरच्या एकाद्या जास्त लांबीच्या वाटेवर मोटर चालविणें भाग पडतें. बहुतेक ठिकाणीं—मधूनमधून का होईना पण जरूरी भासते—म्हणून संघ स्थापन होत असल्यानें अशा संघांतील एक मोटर-वाल्या मालकासहि लांबचे प्रवास करणें शक्य होतें. यांवरून हें उघड दिसतें कीं, वाटेची पसंति मोटरमालकाचे स्वतःचे सोईवर व त्या त्या वाटांवर त्यावेळीं चालत

असलेल्या चढाओढीचे प्रमाणावर अवलंबून असते.

(८) फेर नोंद

एका जिल्ह्यांत मोटरींची नोंद करून ती इतर जिल्ह्यांत भाड्यासाठीं चालवावयाची झाल्यास मोटरमालकास त्या दुसऱ्या जिल्ह्यांतील पोलिस अधिकाऱ्यांकडून "फेर नोंद" करवून घ्यावी लागते. अशा "फेर-नोंदी" स १ रु. फी पडते. एका जिल्ह्यांत मोटरींची तपासणी होऊन ती पास झाली असल्यास दुसऱ्या जिल्ह्यांत "फेर नोंदी" करितां ती पास करून घ्यावीच लागते असें नाहीं. परंतु सर्वच जिल्ह्यांतील व संस्थानांतील अधिकारी एक प्रकारचीच शिस्त बाळगीत नसल्यानें "फेर नोंद" करून घेतांना दुसऱ्या जिल्ह्यांत मोटर पुन्हां पासही पण करून घ्यावी लागते. संस्थानांतील मोटरीस अशी "फेर नोंद" करून घेते वेळीं पास व्हावेंच लागतें.

देशावरील चार जिल्ह्यांत साधारणपणें १॥ टनी मोटर जास्त प्रमाणांत उपयोगांत आणली जाते. १९३२–३३ सालीं कोंकणांतील दोन जिल्ह्यांतून १ टन किंवा त्याहून कमी वजनाच्या मोटरींच वापरण्याचा प्रघात होता. कारण त्यावेळीं बहुतेक रस्त्यावरून १॥ टनी मोटरी चालविण्यास तेथें परवाना मिळत नसे.

(९) किरकोळ माहिती

सालीं दिलेल्या तक्त्यांत १९२३ पासून १९३३ पर्यंत पोलिसतपासनिसांनीं दरवर्षीं प्रत्येक जिल्ह्यांत तपासलेल्या भाड्याच्या मोटरींचे आंकडे दिले आहेत. या आंकड्यांत दुबेरजी झाली असण्याचा संभव असल्यामुळें प्रत्येक जिल्ह्यांत दरवर्षी इतक्या भाड्याच्या मोटरी होत्या असें सांगतां येत नाहीं; तरी एकंदर भाड्याच्या मोटरींच्या वाढीबाबतची स्थूल कल्पना या तक्त्यावरून करितां येईल. सुरुवातीच्या वर्षांतील मंदवाढ, मध्यंतरीचे झपाट्यानें झालेली वाढ व १९३० नंतरची मंदी या सर्व गोष्टी येथें स्पष्टपणें दिसून येतात.

१९२३ ते ३३ पर्यंत दरवर्षी तपासणी करून भाड्यानें फिरण्यासाठीं परवाना मिळलेल्या बसांची सहा जिल्ह्यांतील संख्या दाखविणारा तक्ता

जिल्हा	१९२३	१९२४	१९२५	१९२६	१९२७	१९२८	१९२९	१९३०	१९३१	१९३२	१९३३
पुणें.	२४९	२९२	३१२	३४८	४२२	५८८	६८३	७३५	७१६	६२४	६३२
सातारा.	९५	२४१	२८७	२२०	४२६	५३८	६७१	५९९	५७३	४८३	४५९
अहमदनगर.	...	...	...	...	...	२१४	१९९	३२१	२७८	२७१	२९५
सोलापूर.	...	...	...	...	...	...	२४४	२६२	२५५	२३२	२१२
कुलाबा.	७६	१०४	१२५	१४१	१६५	१८९	२१५	२२४	२२५	२१५	२२३
रत्नागिरी.	...	...	...	१८०	२२५	१४४	१६५	२३६	१९०	२३०	२८९

प्रकरण ३ रें

मोटारबसांची विक्री व त्यांस लागणारें भांडवल

येथें मोटर बसांची विक्री कशी होते, मोटर-खरेदीस लागणारें भांडवल कोठून येतें, वगैरे गोष्टींचा उहापोह करावयाचा आहे. मोटर विकत घेतांना एक तर त्या नव्या असतात किंवा वापरलेल्या असतात; व त्या नगद् पैसे देऊन अगर हप्तेबंदीनें घेतल्या जातात. नव्या हप्तेबंदीनें घेतल्या जाणाऱ्या मोटरी, मोटर कंपन्यांच्या एजंटांकडून घेतल्या जातात. जुन्या किंवा वापरलेल्या मोटरी त्यांच्या पूर्वीच्या मालकांकडून किंवा जुन्या मोटरी विकणाऱ्या व्यापाऱ्यांकडून घेतलेल्या असतात. मोटरींच्या धंद्यांत पडणाऱ्या लोकांची आर्थिक परिस्थिति फारशी समाधानकारक नसल्यानें, म्हणजे त्यांच्याजवळ भांडवलाचा अभाव असल्यानें त्यास बहुतेक मोटरी हप्तेबंदीनें किंवा कर्जाऊ रकमा काढून खरेदी कराव्या लागतात.

(१) रोखीनें व हप्तेबंदीनें खरेदी होणाऱ्या मोटरींचें प्रमाण

मोटर नोंदबुकांत मोटरीसंबंधानें माहिती भरतांना सर्व हप्ते भरलेले नसल्यास विक्रेता व खरीददार या दोहोंच्याही नांवाचा उल्लेख केलेला असतो.

१९३२-३३ सालांत देशावरील चार जिल्ह्यांत हप्त्यांनीं विकत घेतलेल्या मोटरबसांची संख्या खालीं दिल्याप्रमाणें होती:-

पुणें २०३, अहमदनगर ४७, सातारा १०७, सोलापूर ४७. हे आंकडे पोलिस कचेऱ्यांतील नोंदबुकांतून घेतले आहेत.

गेल्या कांहीं वर्षांत हप्तेबंदीनें होणाऱ्या नव्या मोटरींच्या विक्रीच्या प्रमाणांत थोडी बहुत घट झाली असावी असें दिसतें. ही विक्री १९३१ सालापासून पुढें कमी होऊं लागली असेंही दिसतें; कारण आह्मांस नव्या व जुन्या गाड्यांच्या खरेदीविक्रीचे दोन मोठ्या कंपन्याकडून जे आकडे मिळाले त्यावरून या गोष्टी सिद्ध होतात. हे मिळालेले आंकडे १९३०-३१ चे आहेत.

	१९३०	१९३१
रोखीनें विकलेल्या गाड्या (नव्या व जुन्या)	३६	४३
हप्तेबंदीनें „ „ („ „ „)	१४४	८८
एकंदर विक्री	१८०	१३१

या कोष्टकावरून गाड्यांची विक्री कमी झालेली तर आढळून येतेच, पण त्याबरोबरच हप्तेबंदीनें होणारें विक्रीचें प्रमाणही कमी दिसून येतें. सध्यांच्या हलाखीच्या परिस्थितींत हप्तेबंदीनें गाड्यांविक्री मोठे व्यापारीहि फारसे करण्यास धजत नाहींत. असें खुद्द एक दोघां व्यापाऱ्यांनींच आम्हांस सांगितलें. त्यांच्याच सांगण्यावरून आह्मांस हेंही पण कळतें कीं, सध्यां मोठ्या व्यापाऱ्यांचा पूर्वीपेक्षां अशा विक्रीचें प्रमाण दिवसेंदिवस कमी करण्याचा प्रयत्न आहे.

जे व्यापारी जुन्या गाड्या विकत घेऊन त्या दुरुस्त करून विकतात, त्यांच्या बाबतींत मात्र असें सांगतां येईल कीं, हप्तेबंदीनें विक्री करण्याचे त्यांचे नियम इतके कडक असतात कीं, त्यांना गिऱ्हाईकानें हप्ते पुरते न भरले, तरी नुकसान येण्याचा फारसा संभव नसतो.

(२) हप्तेबंदीची पद्धत

हप्त्यानें विकल्या जाणाऱ्या गाड्या साधारणपणें खालील अटींवर विकल्या जातात. एकंदर ठरलेल्या किंमतीचा तिसरा हिस्सा सुरवातीस भरावा लागतो व त्या बरोबर विम्याचा हप्ता व सरेदीसमाची फी यांचीही रक्कम भरावयाची असते. ही ठेव शेवटला हप्ता भरतेवेळीं कापून दिली जाते. बाकी राहिलेली $\frac{2}{3}$ रक्कम व त्यावरील

शें. १० प्रमाणें व्याज वर्षभरांत ११ मासिक हप्त्यांनीं भरावयाची असते. जुन्या गाड्यांच्या खरेदी-विक्री-खतांतील नियम पुष्कळच सोईचे असतात. पण त्यांतही पैसे किंवा हप्ते घेण्याची तऱ्हा अशाच प्रकारची असते. रकमेवरील व्याज मोठे व्यापारी बहुतेक शें. १० प्रमाणें आकारतात. परंतु लहान व्यापारी गिऱ्हाइकाची पत ओळखून व प्रसंगानुसार शें १२ ते १८ पर्यंतही व्याज आकारतात. एका मोठ्या मोटरीच्या व्यापाऱ्याकडून आम्हांस असें सांगण्यांत आलें कीं, गाडीची किंमत १८०० रुपयांहून जास्त असल्याशिवाय त्या गाडीचा विमा काढण्यास गिऱ्हाइकास सांगण्यात येत नाहीं. वापरलेल्या गाड्यांची विक्री करणारे व्यापारी विम्या वगैरेच्या फारशा अटी कधींच घालीत नाहींत.

हा खरेदीविक्रीचा व्यवहार पैशाचे दृष्टीनें कसा होतो, हें एक उदाहरण देऊन स्पष्ट करितां येईल. नवी गाडी खरेदी करणारास गाडीची एकतृतीयांश किंमत व त्याबरोबर पहिल्या वर्षाचा विम्याचा हप्ता व इतर किरकोळ खर्च मिळून रु. १४०० पर्यंत भरणा करावा लागतो. (येथें सर्वत्र गाडीची किंमत ३००० रु. धरलेली आहे.) या शिवाय गाडीवरील सांगाडा बसविण्यास ३००–४०० रु. खर्च येतो. नव्या गाडीवर सांगाडा बसविलेला मिळत नाहीं. त्याची किंमत वेगळी पडते. मोटरचे कांहीं सुटे भागही विकत घ्यावे लागतात. बाकी राहिलेली दोन तृतीयांश रक्कम ११ हप्त्यांनी फेडावयाची म्हणजे साधारण दरमहा हप्ता रु. २०० चा बसतो. हेंच जर वापरलेली गाडी विकत घेण्याची असली (आपण तिची किंमत रु. १८०० धरूं) तर पहिली भरण्याची रक्कम फक्त ६०० रु. असेल. वापरलेल्या गाडीवर सांगाडा आयनाच बांधलेला मिळतो. म्हणजे धंद्याची सध्यांची परिस्थिति पाहतां लोक साधारणपणें वापरलेल्या मोटरी कसे विकत घेण्याचा संभव आहे हें दिसून येईल. वापरलेल्या मोटरींत किंमतीच्या मानानें जास्त कमी रकमांचे हप्ते भरण्याची बरीच सोय असल्यानें एखाद्या ड्रायव्हरास देखील १५०–२०० रु. भांडवलावर मोटर घेऊन मोटर-मालक म्हणून धंद्यास सुरवात करतां येते. कारण जुन्या मोटरी विकणारे कांहीं व्यापारी हप्त्यानें मोटर विकतांना पहिल्यानें भरणा करण्याची रक्कम देखील इतर हप्त्यांच्या रकमे इतकीच म्हणजे १५० रु. पर्यंत घेतात. असे व्यापारी व्याजाचा दर मात्र. बराच लाविंतात. कांहीं व्यापारी हप्त्यांची संख्याही जास्त ठेवितात. अशा रीतीनें थोड्या भांडवलावरही या धंद्यांत शिरकाव करून घेणें किती सोपें झालें आहे हें दिसून येईल.

हप्ते-चंदीच्या पद्धतींत सर्व हप्ते भरून होईतोपर्यंत मोटर विकत घेणाराचे ताब्यांत पूर्णपणें येत नाहीं. या पद्धतींत विम्याचे अटीशिवाय इतरही पुष्कळशा अटी विकत घेणाऱ्यांवर लादल्या जातात. या अटी बहुतेक सर्वत्र सारख्याच असतात. व वापरलेल्या मोटरी विकणाऱ्यांच्या विक्री खतांतही साधारणपणें अशाच अटींचा समावेश होत असल्यानें त्यांतील प्रमुख येथें दिल्या आहेत.

(१) गाडीवर काढलेल्या विम्याबद्दल ज्या रकमा विकत घेणाऱ्यांस (येथें विकत घेणारा असा शब्द घातला असला तरी करारनाम्यांत Hired म्हणजे भाड्यानें मोटर घेणारा असा शब्द घातला असतो) विमा कंपनीकडून मिळण्यासारख्या असतील त्या रकमा विकत देणाराच्या नांवावर जमा व्हाव्यात (२) विकत घेणारा इसम गाडी गहाण ठेवून कोणत्याहि प्रकारच्या रकमा कोणाकडून घेणार नाहीं व गाडी अमुक एक ठराविक ठिकाणाहून बाहेर नेणार नाहीं(३) विकत घेणारा इसम गाडीची मोडतोड करणार नाहीं, ती नेहमीं सुस्थितींत ठेवील, जेव्हां जेव्हां विकत देणाऱ्या इसमांचा माणूस गाडी पहाण्यास येईल

तेव्हां त्यास गाडी दाखविली जाईल. गाडींत विक्रेत्याच्या परवानगीशिवाय दुरुस्ती किंवा बदल करणार नाहीं व गाडीची मोडतोड झाल्यास विक्रेता सांगेल त्याप्रमाणें स्वखर्चानें तिची दुरुस्ती करून देईल (४) विक्री-खतांतील अटीप्रमाणें वागण्यास विकत घेणारा इसम चुकला किंवा त्यानें वेळेवर हप्त्याच्या रकमा भरल्या नाहींत तर विक्रेत्यास गाडी ओढून नेण्याचा अधिकार राहील (५) सर्व हप्ते भरून होण्याच्यापूर्वी केव्हांहि एकदम गाडीच्या किंमतीची सर्व रक्कम भरण्याचा अधिकार विकत घेणारास राहील. विकत घेणारानें अशी एकदम रक्कम भरल्यास विक्रेता त्यास कांहीं सूट देईल.

नवीन गाड्या हप्त्यानें विकणारास अशा प्रकारचे करार करून गाड्या विकणें दिवसेंदिवस जड भासूं लागलें असावें व म्हणून नव्या गाड्यांची हप्तेबंदीनें होणारी विक्रीही कमी होऊं लागली असावी. वापरलेल्या गाड्या हप्तेबंदीनें विकणारे व्यापारी करार जरी या नमुन्याप्रमाणें करीत असले तरी गाडीवर आपला ताबा मात्र ते जास्त ठेवतात त्यामुळें त्यास पैसे बुडण्याची भीति रहात नाहीं. त्यांच्या करारांतच एक कलम असें असतें कीं, गाडी विकत घेणारानें (भाड्यानें घेणारानें) रोज गाडी चालवावी व दिवसाचे अखेरीस भाड्याची जी वसुली होईल तिची रक्कम पेट्रोल, ऑईल, व इतर आवश्यक खर्च वजा करून सावकाराचे दुकानावर किंवा पेढीवर आणून भरावेत. म्हणजे हप्त्यांची रक्कम महिन्याचे कांहीं न भरतां रोजच्या रोज भरत जावी. गाडी भाड्यानें घेणाऱ्या इसमाचा चरितार्थ चालावा म्हणून विक्रेता महिन्याचे काठीं त्यांस कांहीं रक्कम देतो. म्हणजे थोडक्यांत, हप्त्याची सर्व रक्कम भरून होईतोंपर्यंत गाडी खरेदी करणाऱ्या इसमांच्या हातीं गाडी तर पडतच नाहीं; परंतु तो अप्रत्यक्ष रीतीनें विक्रेत्याचा नोकर होऊन राहतो. नव्या गाड्यांची हप्त्यानें होणारी विक्री जर दिवसेंदिवस कमी होत असलेली दिसली तरी जुन्या गाड्यांची हप्तेबंदीची विक्री अशा तऱ्हेनें वाढत्या प्रमाणांतच आहे.

हप्तेबंदीनें विक्री करण्याची पद्धत चांगली किंवा वाईट याविषयीं विचार करण्याचें हें स्थान नाहीं. नव्या गाड्यांची हप्त्यांवर होणारी विक्री जरी कमी होत असली व अशा प्रकारानें विक्री करण्यांत आपलें नुकसान होतें असें मोटर कारखानदारांच्या दलालांचें म्हणणें असलें तरी वापरलेल्या गाड्यांचें हप्त्यानें होणाऱ्या विक्रीचें प्रमाण मात्र वाढत आहे हें खरें व वापरलेल्या गाड्या हप्त्यानें विकावयाच्या झाल्यास त्यासंबंधींच्या अटी फारशा त्रासदायक नसल्यानें, विशेषतः सुरवातीसच मोठी रक्कम धंद्यांत गुंतवावी लागत नसल्यानें, साधारण लोकांसही या धंद्यांत शिरण्यास वाव मिळतो. १५०-२०० रुपये एकादा ड्रायव्हर देखील धंद्यांत घालू शकतो. पुढें हप्ते रोजच्या मिळकतीवरच भरावयाचें असल्यानें त्यास ते प्रथम जड वाटत नाहीं. पुढें हप्ते भरणें कठीण झाल्यास हातची गाडीही जाते व पुन्हां ड्रायव्हरचा धंदा करावा लागतो. हा दूरवर विचार त्यांच्या मनांत शिरतच नाहीं. आमच्या मतें अशा प्रकारच्या लोकांचाच धंद्यात बऱ्याच मोठ्या प्रमाणावर शिरकाव झाल्यामुळें व गाड्या जुन्या कां होईना पण स्वस्त मिळत असल्यामुळेंच धंद्यांत जास्त लोकांचा भरणा होऊन चढाओढ उत्पन्न होण्यास कारण झालें आहे.

(३) गिऱ्हाइकांचें भांडवल

गाड्या रोखीनें खरेदी केल्या जातात किंवा हप्त्यावर घेतल्या जातात याबद्दल माहिती मिळण्यास फारसा त्रास पडला नाहीं. अशा प्रकारची माहिती देण्यास मोटरमालक नाखुष दिसले नाहींत. परंतु रोख खरेदीसाठीं किंवा हप्त्यानें मोटर घेतांना लागणारें सुरवातीचें भांडवल कोठून आलें या प्रश्नास मात्र

सरळ उत्तर मिळण्यास फार त्रास पडला, म्हणून यासंबंधांत येथें दिलेली माहिती पुष्कळ अंशीं फिरतीवर गोळा केलेल्या सर्व साधारण माहितीवरून काढलेली अनुमानवजा अशी आहे. एवढें मात्र म्हणतां येईल कीं, ही पहिल्या प्रथम लागणारी रक्कम बहुतेक कर्जाऊ काढलेली असते. विकत घेतली जाणारी गाडीच या रकमेसाठीं एक प्रकारचें तारण म्हणून लिहून दिलेली असते. याशिवाय आणखी तारण म्हणून घर, जमीन, घरांतील दागिने वगैरेही गहाण ठेवावे लागतात. या धंद्यांत कर्जाऊ रकमा गुंतविणारे सावकार इतर सावकारापेक्षां भिन्न प्रकारचे नसतात. गिऱ्हाइकाप्रमाणें व्याजाचे दर शें. ९ पासून २४ पर्यंतही असतात. हे सावकार मोटारींच्या धंद्यांत पैसे पेरतात; त्याचप्रमाणें इतर धंद्यांतही त्यांचे पैसे गुंतविलेले असतात. यांपैकीं कांहीं सावकार जुन्या मोटरी विकणाऱ्या कांहीं व्यापाऱ्यांप्रमाणेंच पैसे वसुली करण्याचा प्रघात ठेवतात. म्हणजे ते गाडी विकत घेणाऱ्यांकडून रोजच्या मिळकतीचे पैसे पेढीवर जमा करून घेतात. कांहीं ठराविक वेळानंतर या जमलेल्या रकमेचा हिशेब करतात व पुढचे हप्त्याचे किंवा रोज मिळकतींपैकीं पैसे भरण्याचें मान ठराविण्यांत येतें.अशा रीतीनें हळूहळू आजचा रकमा व्याजीं लावणारा सावकार उद्यां एक दोन मोटरींचा मालक होतो व हळूहळू तो मोटर विक्रेताही पण होतो.जुन्या गाड्या हप्त्यावर घेण्यांत विकत घेणाराला मोटरमालक बनण्याची फारशी संधीच मिळत नाहीं, कारण गाडी वरील हप्ते भरून होतात न होतात तोंच ती गाडी विकून टाकण्याची पाळी येते व पुन्हां नवी गाडी घ्यावयाची झाल्यास कर्जाऊ रकमेचे हप्ते वगैरे सुरू होतात.

धंद्याची सद्यःस्थिति अशा प्रकारची असल्यानें जिल्ह्यांतील बँका कर्जाऊ रकमा या धंद्यांत गुंतवूं शकत नाहींत किंवा मोटर-मालकांच्या देखील सहकारी पेढ्या अगर इतर संस्था निघालेल्या नाहींत.

(४) दलाल (एजंटस्)

मोटर कंपन्या विक्रीच्या सोईसाठीं म्हणून प्रत्येक इलाख्यांत एक अगर दोन दोन मोठ्या पेढ्यास दलाल म्हणून नेमतात.खास कंपन्या कांहीं विशेष कारण असल्याशिवाय मोटरी स्वतः विकत नाहींत. प्रत्येक इलाख्यांत त्या त्या इलाख्यांतील दलालाकडून विक्री होने एजंटांस वर्षांत अमुक एक संख्येपर्यंच गाड्यांची विक्री करू असें कबूल करावें लागतें व ठराविक गाड्यांची विक्री करावी लागते. जिल्ह्याजिल्ह्यांतून एजंट आपले पोट दलाल नेमतो. त्यांच्याशीं तो अशाच प्रकारचे करार करतो. कंपनी बहुतेक एजंटांस रोखीवरच माल विकते,जांगड माल एजंटाकडे बहुतेक राहात नाहीं. एजंटास मात्र रोखीनें किंवा हप्तेबंदीनें माल विकण्याची मुभा असते.

मालाचा खप व्हावा म्हणून मोटरकंपन्या स्वखर्चानें जाहिराती देतात, परंतु यांत भर घालावयाची झाल्यास एजंटास ती स्वतःचे खर्चानें करावी लागते. तसेंच प्रचारक किंवा माल विकणारे लोकही एजंटांचेच असतात.

आपल्या गाड्या लोकांचे जास्त पसंतीस उतराव्या व गाडी घेतल्यावर मोटरीचे सामनासाठीं किंवा दुरुस्तीसाठीं गिऱ्हाइकास त्रास पडूं नये म्हणून कंपन्या आपल्या एजंटास, व एजंट सबएजंटास जिल्ह्याचे ठिकाणीं व इतर मोठ्या गांवीं मोटरींच्या सुट्या भागांचें दुकान, व दुरुस्तीसाठीं वर्कशॉप काढण्यास भाग पाडतात. असें झाल्यानें मोटर-मालकांची व ड्रायव्हरांची मात्र चांगली सोय होत आहे. नाहींतर गाडीचा एकादा भाग मोडल्यास व तो जवळपास मिळत नसल्यास गाडी बराचवेळ पर्यंत कित्येक वेळीं बरेच दिवसपर्यंत रिकामी सोडून द्यावी लागत असे. कांहीं कांहीं भाग तर पुणें मुंबईसारख्या ठिकाणींच फक्त मिळत असल्यानें ते आणविण्यांत वेळेचा व पैशाचा फार अपव्यय होत असे.

प्रकरण ४ थें

मोटरबसांची वाहतूक

(१) वाहतुकीचें प्रमाण

मुंबई इलाख्यांतील निरनिराळ्या रस्त्यांवरील रहदारीचें मान कसें आहे, किंवा प्रत्येक रस्त्यावरून मोटरी, गाड्या वगैरे किती जातात, याविषयीं माहिती कोठेंच गोळा केलेली नाहीं. अशा प्रकारची माहिती एकत्रित करण्याचे प्रयत्नही कधीं कोणी केलेले नाहींत. दिवसेंदिवस मोटर वाहतुकीचें प्रमाण वाढत असल्यानें प्रत्येक रस्त्यावरील वाहतुकीचें प्रमाण पाहून त्यांत योग्य अशा दुरुस्त्या त्या त्या रस्त्यावर करणें जरूर असते. नाहींतर रस्ते खराब होऊन वाहतुकीच्या दृष्टीनें चेकाम होतात. हें वाहतुकीचें प्रमाण कसें वाढत आहे, या व अशा इतर गोष्टींचा अभ्यास करून सुधारणा अमलांत आणण्यासाठीं १९२२ सालापासून इंग्लंडांत प्रत्येक रस्त्यावरील वाहतुकीचे आंकडे गोळा करण्यांत येत असतात या कामीं मध्यवर्ती सरकारचें रस्ताखातें, व इतर रस्ता-अधिकारी यांनीं सहकार्य करून वाहतुकीचें प्रमाण ठरविण्यास योग्य असे रहदारीचे आंकडे गोळा केले जातात व त्या आंकडयावरून निरनिराळ्या रस्त्यांवर दुरुस्त्या कशा करावयाच्या, नवीन रस्त्यांचें बांधकाम कोठकोठें करावयाचें, पहिल्या दर्जाचे व दुसऱ्या दर्जाचे रस्ते असा भेद कसा पाडावयाचा, जास्तकमी वाहतुकीच्या मानानें कोणकोणत्या रस्त्यांचे पृष्ठभाग कशा प्रकारचे तयार करावयाचे वगैरे गोष्टी ठरविताता.

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांतही निरनिराळ्या वाटांवरून मोटरवाहनांची वाहतुक बऱ्याच मोठ्या प्रमाणांत वाढत आहे असें आढळून आल्यामुळें, बहुतेक सर्व संस्थानांतून रस्त्यावरील वाहतुकीचें मान ठरविण्यासाठीं मध्यवर्ती सरकारच्या रस्तेखात्याचे मुख्य अधिकारी यांनीं त्या त्या संस्थानांतील रस्तेअधिकाऱ्यांशीं सहकार्य करून प्रत्येक रस्त्यावरील वाहनांची वर्षांतील कांहीं ठराविक दिवशीं मोजणी करून त्यावरून एकंदर वाहतुकीचें प्रमाण बसविलें आहे. इंग्लंड व अमेरिका या दोन देशांत रस्त्यावरील वाहतुकीचेसंबंधीं आंकडे जमविले जातात हें सांगण्याचा हेतू इतकाच कीं, आपल्या इकडेही मागील कांहीं वर्षांत मोटर बसांची वाहतुक बऱ्याच मोठ्या प्रमाणांत वाढत असल्यानें इकडील रस्त्यासंबंधीही वाहतुकीचें मोजमाप करून त्याप्रमाणें रस्ते दुरुस्ती किंवा नव्या रस्त्यांच्या बांधणीच्या कामाची योजना ठरविणें इष्ट आहे. निरनिराळ्या रस्त्यावरील वाहतुकीचे आंकडे गोळा केल्यास त्यावरून रस्त्यांची सुधारणा, व त्यावर होणारा खर्च यासंबंधीच्या योजना करणें सुकर होतें. आपल्याकडे अशाप्रकारचें काम अजून मुळींच झालेलें नाहीं. आमच्या मतें निदान दर तीन वर्षांनीं तरी प्रत्येक रस्त्यांवरील वाहतुकीचें प्रमाण किती आहे हें ठरविण्यासाठीं वाहतुकीचें आंकडे गोळा होणें इष्ट आहे.

वाहतुकीचे अशाप्रकारचे आंकडे गोळा करण्याची सरकारला आवश्यकताच भासत नसावी असें दिसतें. वास्तविक असे आंकडे गोळा करणें सरकारास सहज शक्य आहे. मुंबई इलाख्यांत तरी प्रत्येक रस्त्यावर १०-२० मैलांच्या अंतरावर दरुस्त्या असतात. या ठिकाणीं सर्वच बैलगाड्या मोटरी व इतर वाहतुकीचीं साधनें थांबतात. तसेंच सर्व रस्त्यांवरून ठिकठिकाणीं पोलिस चौक्या असतात. सध्या देखील यापैकीं कांहीं पोलिस चौक्यावर मोटा-

रींचे नंबर, मोटर कोठून आली व कोठें जाते, तींत उतारूंची संख्या किती असते वगैरे गोष्टींचें टिपण केलें जातें. पण या टिपणांचा पुढें अधिकाऱ्यांकडून फारसा उपयोग केला जात नाहीं हीं जाणीव असल्यानें म्हणा किंवा आंकडे पुढें कोणी तपासून ते बरोबर आहेत किंवा नाहीं हें पहात नसल्यानें ते बहुतेक बरोबर नसतात. पुष्कळ पोलिसचौक्या-वरून बरेच वेळां आंकडे टिपलेच जात नाहींत. निरनिराळ्या रस्त्यावरील वाहतुकी-चें कांहींतरी प्रमाण ठरवितां यावें म्हणून आम्ही कांहीं जिल्ह्यांतील पोलीस-चौक्यांवरील अशा लिहून ठेविलेल्या माहितीचा उपयोग करून पहाण्याचें ठर-विलें. परंतु एकंदर आंकडे तपासून पाहि-ल्यानंतर ते अगदींच निकामी असल्याचें आढळून आलें. या आंकड्यावरून कोण-त्याही विशिष्ट रस्त्यांवर वर्षांतील कोण-त्याही महिन्यांत वाहतुक किती असते हें ठरवितांच येईना. या बाबतींत अधि-काऱ्यांनीं जास्त लक्ष घालून पोलिस चौक्यांवरील टिपणें व्यवस्थित रीतीनें केलीं जातात किंवा नाहीं हें पहाणें जरूर आहे.

वाहतुकीसंबंधीं आंकडेवार माहिती मिळणें अशा तऱ्हेनें अशक्य झाल्यानें आम्हांस प्रश्नावल्यांवरूनच या संबंधी जेवढी माहिती मिळूं शकली त्या माहितीचा उप-योग करून घ्यावा लागला.

प्रश्नावल्यावरून १९३२-३३ सालीं निरनिराळ्या रस्त्यांवरून भाड्याच्या मोटरी किती असत एवढीच ठोकळ माहिती आम्हांस मिळूं शकली. ती प्रकरणाच्या शेवटीं तक्त्यांत दिली आहे. त्यावरून अर्थात् सर्व प्रकारच्या रहदारीचे—खासगी मोटरी, बैलगाड्या इ. प्रमाण ठरविणें अशक्य आहे, हें उघड आहे.

आपल्या इकडील बहुतेक सर्वच भाड्याच्या मोटरी उतारूंची ने आण करितात. निव्वळ मालांची ने आण कर-णाऱ्या मोटरींची संख्या फारच कमी आहे. तसेंच उतारूंची ने-आण करणाऱ्या मोटरी १-१॥ टनाहून अधिक वजना-च्या नसतात. इतर देशांतील परिस्थिति याहून वेगळी आहे. तिकडे मोठ्या वज-नाच्या मोटरी जास्त प्रमाणांत आढळतात. आपल्या इकडील मोटरींतून साधारणपणें १६ ते १८ उतारू नेतात. परदेशांत उतारू वाहणाऱ्या बऱ्याच मोटरी साधारणपणें ३० हून जास्त उतारू नेतील इतक्या मोठ्या असतात. आपल्या इकडे मोठ्या मोटरी नसण्यास अनेक कारणें आहेत. जड मोटरी आमच्या इकडील रस्त्यावरून नेणें फारसें शक्य नाहीं, कारण त्यामुळें रस्ते फारच लवकर नादुरुस्त होतील; आप-ल्या इकडील शहरांतून व सेड्यांतून रस्ते अरुंद असल्यानें मोटरी वाटेवरून फिरू शकण्यास अडचण पडेल. तसेंच गांवाबाहेरील व घाटांतील रस्तेही अरुंद असल्यानें अव-जड मोटरी सुरक्षित रीतीनें प्रवास करूं शकणार नाहींत. मोठ्या मोटरी नसण्याचें एक आर्थिक कारणही आहे. इतर देशां-तून वाहतुकीचा धंदा करणाऱ्या मोठ-मोठ्या कंपन्या आहेत. तिकडे स्वतःची एक मोटर चालविणारे असे मोटर मालक फारसे आढळत नाहींत. या मोठ्या कंप-न्या मोठमोठ्या मोटरी ठेवू शकतात, किंवा त्यांच्याकडे असणाऱ्या उतारूंच्या मोठ्या वहातुकीच्या प्रमाणासाठीं त्यांना मोठ्या मोटरी ठेवणेंच जरूर असते. आम-च्याइकडे बहुधा मोटर मालक एकच मोटर बाळगितो, किंवा जास्तीत जास्त म्हणजे त्याच्या दोनतीन मोटरी असतात; मोठ्या प्रमाणांत भांड-वल व नियमित आणि बऱ्याच मोठ्या प्रमाणांत मिळणारे उतारूंचे गिऱ्हाईक याशिवाय मोठ्या मोटरी चालविणें शक्य नाहीं.

सध्यां अस्तित्वांत असलेल्या मोटरीं-तून उतारूंसाठीं सुखसोई कशा प्रकारच्या असतात, हें ज्यांनीं मोटर बसांतून प्रवास

केला आहे त्यांना वेगळे विशद करून सांगण्याची आवश्यकता नाहीं.बसा सुटण्याच्या किंवा कोणत्याही मुक्कामास पोहोंचण्याच्या वेळा ठरलेल्या नसल्यानें उतारूंचा खोळंबा होतो व प्रसंगीं बरेचसे हाल होतात. भाड्याचे दर ठरलेले नसल्यानें त्याबद्दलही त्रास होतो. गाडींत उतारू भरल्यानंतर सामान किती भरावयाचें याबद्दल कांहींच ठराविक पद्धत नसल्यानें बसण्याची गैरसोय होते. मोटार हाकणाऱ्यांचें यांत्रिक ज्ञान बेताचेंच व मोटरी सदासर्वदा अर्धवट दुरुस्त स्थितींत असल्यानें वाटेंत वरचेवर मोटरी नादुरुस्त होतात व त्यामुळेंही उतारूंचे हाल होतात. सध्यांच्या मोटरीच्या चढाओढीच्या काळांत पैशाच्या दृष्टीनें मोटरमालकांस धंदा कितपत किफायतशीर होतो याबद्दल तर शंकाच आहे.परंतु लोकांचा विश्वास संपादन करून आपल्याकडे कायमचें गिऱ्हाईक यावें या दृष्टीनें मोटरमालक फसून प्रयत्नही पण करीत नाहींत असें दिसतें.जे कांहीं थोडे मोटर मालक आपल्या मोटरी नेहमीं सुस्थितींत ठेवण्याचा प्रयत्न करून वेळापत्रकाप्रमाणें चालवितात त्यांना झाला तर फायदाच होतो असें आढळून आल्यानंतर इतर मोटर मालकांनींही पण तसें वागण्याचा प्रयत्न कां करूं नये याबद्दल आश्चर्य वाटतें. ज्यांच्या मोटरी वेळेवर पोहोंचतात अशाकडे गिऱ्हाईक ठराविक भाड्यापेक्षां थोडे जास्त पैसे देऊनही जाण्यास तयार असतें असा कांहीं मोटरमालकांचा अनुभव आहे. तसेंच टपालखात्याच्या नियमाप्रमाणें त्यांच्या मोटरी वेळेवर सुटाव्या लागत असल्यानें त्या मोटरींनांही उतारूंची वाण भासत नाहीं, यावरून इतर मोटर मालकांसही अशा प्रकारचा कार्यक्रम आंखण्यास हरकत नाहीं असें म्हणावें लागतें. तसेंच मोटरवरील माणसांनीं रस्त्यावरील चहाच्या दुकानांतून किंवा इतर ठिकाणीं उतारूंचा उगीच वेळ मोडण्यांत शेवटीं त्यांचेंच नुकसान होण्याचा संभव जास्त. एका मुक्कामावरून दुसऱ्या मुक्कामास पोहचण्यास कितीतरी वेळ लागतो; कांहीं मोठ्या व जास्त रहदारीच्या रस्त्यांवर विशेष वेळ मोडत नसला तरी लहान व आडवळणाच्या रस्त्यावरून फारच वेळ मोडतो. या सर्व त्रासाव्यतिरिक्त लांबच्या सफरींत उतारूंस आणखी एक त्रास होतो, तो म्हणजे मोटरी बदलण्याचा. कांहीं मार्गांवर एका शहरापासून थेट दुसऱ्या शहरापर्यंत एकच मोटर जात नाहीं. अशा वेळीं कांहीं अंतर तोडून गेल्यावर मोटर बदलावी लागते, व मोटर बदलण्यांत बराच त्रास होऊन वेळही पण मोडतो.

(२) अपघात

मोटरींनें प्रवास करावयाचा झाल्यास वेळेचा तर अपव्यय होतोच, परंतु अपघातांची भितीही बरीच असते.रस्त्यावरील मोटरवाहतुकींचें प्रमाण वाढल्यानें अपघातांची संख्याही पण वाढत असली पाहिजे. परंतु आपल्याकडे अजूनपर्यंत अपघातासंबंधीं मिळावयास पाहिजे इतकी संपूर्ण माहिती मिळत नाहीं. मुंबई शहर पोलिस रिपोर्टींत त्या शहरापुरतेंच अपघातांचे आंकडे दिलेले आढळतात. इलाख्याच्या पोलिस अहवालांतही अपघातासंबंधीं एक आंकडा घातलेला आढळतो. १९३२-३३ सालीं एकंदर १२३ माणसें मोटर अपघातांनीं दगावलीं असें या रिपोर्टांत म्हटलें आहे परंतु यांवरून प्रत्येक जिल्ह्यांत भाड्याच्या मोटरींनीं किती अपघात झाले हें समजत नाहीं, व वर दिलेला आंकडाही तंतोतंत बरोबर आहे असें अहवालाच्या भाषेवरून वाटत नाहीं. इंग्लंडमधील (१९२९-३१ च्या) वाहतुक कमिशननें वाहतुकसाऱ्यानें मोटरींच्या अपघातासंबंधीं संपूर्ण आंकडेशीर माहिती जमवून ती प्रसिद्ध करावी असें सांगितलें आहे. निकडे कोणत्याही मोटरीस अपघात झाल्यास मोटरवरील माणसास स्वतःच त्यासंबंधीची माहिती

पोलिस कचेरींत हजर करावी लागते व प्रत्येक अपघाताचद्दल सार्वजनिक चौकशी करविण्याचा वहातुक खात्यास अधिकार आहे. तसेंच पोलिस कचेऱ्यांतून लहानमोठ्या व भाड्याच्या किंवा खाजगी गाड्यांस व गाड्यांनीं होणाऱ्या अपघातांची पूर्ण नोंद ठेवलेली असते; आपल्या इकडे अशी व्यवस्था होण्याची फार जरूरी आहे. निदान प्रत्येक जिल्ह्यांतून भाड्याच्या मोटरनीं किती व कशा प्रकारचे अपघात होतात व ते होण्याचीं कारणें काय याचीं पूर्ण टिपणें असणें महत्त्वाचें आहे. प्रत्येक अपघातासंबंधानें मोटरीवरील माणसानें पोलीस चौकीवर किंवा कचेरींत नोंद केलीच पाहिजे असा मोटर मालकावर निर्बंध टेवून,मोटरींच्या अपघातासंबंधीं सार्वजनिक चौकशी करविण्याची तरतूद झाली पाहिजे.

अपघात किती होतात,व ते होण्याचीं कारणें काय वगैरे समजावून घेण्यासाठी आम्ही माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला; परंतु तशा प्रकारची माहिती आम्हांस कोठें मिळाली नाही.मोटर मालकांकडून भरून घेतलेल्या प्रश्नावलींत आम्ही याविषयीं एकदोन प्रश्न घातले होते. त्यांच्याकडुन जरी फारशीं समाधानकारक उत्तरें मिळालीं नसलीं तरी अपघात कां होतात याविषयीं त्यांनीं जीं कारणें दिलीं आहेत तीं विचारप्रवर्तक आहेत. त्यांनीं दिलेल्या कारणांत (१) वाईट रस्ते (२) रस्त्यावर सर्वत्र आढळणाऱ्या गैरदुरुस्त मोटारी (३) ड्रायव्हरांचें यांत्रिक अज्ञान (४) मोटारींत वाजवीपेक्षां जास्त उतारू किंवा सामान भरणें, वगैरे कारणांचा उल्लेख केलेला आढळतो. कांहीं रस्त्यावरून साचसाळगे इतके असतात कीं,मोटर हळू जरी चालविली,तरी तिच्या क्रमानी तुटण्याचा संभव असतो, त्याचप्रमाणें रस्त्यांवरील नागमोडी वळणें व अरुंद रस्ते यामुळेंहे अपघात होतात. हीं सगळीं कारणें खरींच आहेत; परंतु त्यांतूनही मोटरमालकांच्या दृष्टीनें अर्धमोडक्या मोटरी व ड्रायव्हरांचें यांत्रिक अज्ञान,त्यांची गाडी भरधांव सोडण्याची संवय व एकंदर बेफिकीरी व बेजबाबदारपणा हे दोष अपघात होण्यास जास्त कारणीभूत होतात असें दिसतें. मोटर हांकण्याचा परवाना मिळण्यापूर्वी त्या माणसास मोटर दुरुस्त करतां येतें काय व हांकणें चांगलें येतें काय याची परीक्षा घेतली जाते. परंतु ही परीक्षा वरवरच घेतली जात असावी असा संशय घेण्यास कारणें आहेत.

एकंदर अपघातांपैकीं बऱ्याच अपघातांचें कारण वाजवीपेक्षां जास्त वेग असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. गाडी जास्त वेगानें सोडण्यास ड्रायव्हरास मजा तर वाटतेच; पण जास्त वेग ठेवण्यास आणखीही एक कारण आहे. तें म्हणजे उतारू मिळविण्याची इच्छा. रस्त्यावरील उतारूं आपणास मिळावे अशी प्रत्येकाची इच्छा असते; म्हणून पुढल्या तळावर आपली गाडी इतरांच्या पूर्वी जावी व आपणास तेथील उतारूं मिळावे असें प्रत्येक मोटारवाल्यास वाटतें; आणि पुढें गेलेल्या मोटरी मागें टाकून त्यांचेपुढें जाण्याचा तो सारखा प्रयत्न करितो व पुढें गेला तरी सदैव इतर गाड्यांच्या पुढें राहावें यासाठीं गाडीचा जास्त वेगही पण तसाच ठेवतो. यांत एक गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती अशी कीं, रस्त्यांवरील उतारूंच्या भाड्यापैकीं बराचसा भाग हाकणारास खिशांत घालतां येण्याचा संभव असल्यानें त्यानें मोटरीचा वेग जास्त ठेवून इतरांच्या पुढें राहण्याचा हट्ट धरणें अगदीं स्वाभाविक असतें.

अपघात टाळतां कसे येतील यासंबंधीं मोटरमालकांकडूनच आम्हीं सूचनाही पण मागविल्या होत्या. त्यांनीं कांहीं सूचना केल्या; त्यांतील जास्त महत्त्वाच्या अशा येथें देत आहों:- (१) हाकण्याचा परावाना होण्यापूर्वीची ड्राय-

व्हरची परीक्षा सध्यां घेतली जाते त्यापेक्षां जास्त कडक असावयास पाहिजे. (२) बसांच्या परीक्षेच्या वेळीं त्या सरोखरीच रस्त्यावरून चालण्याच्या योग्य आहेत किंवा नाहीं हें कसून पाहिल्यानंतर पास व्हावयास पाहिजेत. (३) याहीपेक्षां जास्त महत्वाची सूचना म्हणजे मोटरींचा वेग किती असावा हें ठरविण्याबाबतची आहे. मोटरीचा वेग किती असावा हें नुसते नियम करून ठरविण्यांत अर्थ नाहीं; तर हा नियम पाळला जात नाहीं; असें ज्या ज्या वेळीं दिसून येईल, त्या त्या वेळीं नियम मोडणारावर खटले भरले जाणें अवश्य आहे. तसेंच नियमाचे कक्षेंत वेग रहावा म्हणून मोटरींवर कोणत्या तरी प्रकारचें वेगनियंत्रक यंत्र असण्याची फार आवश्यकता आहे. अशा प्रकारचें यांत्रीक साधन मिळणें दुर्लभ आहे असा सध्यां समज असल्यानें वेगनियमनाबाबत कायदा होऊं शकत नाहीं असें सांगण्यांत येतें. परंतु वेगनियंत्रण यंत्रांचा उपयोग मध्यप्रांतांत केलेला आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. ही यांत्रिक योजना फारशी उपयुक्त नाहीं, कारण हांकणारास बऱ्याच वेळेस हीं यंत्रें नादुरुस्त करतां येतात व पुन्हां गाड्या बेकाम वेगानें सोडता येतात असें म्हणतात. असें असल्यास निदान वेग नियंत्रणाचा कायदा तरी पास करून घेणें अत्यावश्यक आहे. कारण कायदा पास करून घेतल्यानें जास्त वेगामुळें ज्या ज्या ठिकाणीं अपघात घडून आले असतील, त्या त्या ठिकाणीं तरी अपघाताचें विशेष कारण शोधीत बसावें लागणार नाहीं. गुन्हेगारास शिक्षा करितां येतील, व अशा प्रकारचा कायदा अस्तित्वांत आहे अशी उतारूंची खात्री पटल्यास, त्यांसही कायदेभंग केल्हां होतो याविषयीं अधिकाऱ्यांस सूचना देतां येईल, व ड्रायव्हर अगर मोटर मालकासही कायद्याची आठवण करून देतां येईल. नवीन गाडी घेतल्यानंतर थोड्याच दिवसांत गाडीवरील वेगमापक यंत्र नादुरुस्त झालेलें बहुतेक निदर्शनास येतें. हीं वेगमापक यंत्रें तरी नेहमीं सुव्यवस्थित असावींत अशा प्रकारचा नियम केल्यास सुशिक्षित उतारूंस ज्या ज्या वेळीं गाडीचा वेग जास्त असेल असें आढळून येईल त्या त्या वेळीं तक्रार करतां येईल. अपघात कमी करण्याचा दुसरी एक प्रमुख मार्ग, गाडीचा विमा उतरविण्यास मोटार मालकास भाग पाडणें हा होय. या बाबतींत सध्यांच्या चढाओढीच्या परिस्थितींत मोटर मालकाकडून सहानुभूती मिळविणें शक्य नाहीं हें खरें असलें, तरी विम्यासंबंधीं कडक नियमांची जरूरी आहे यांत मात्र कांहीं शंका नाहीं. मोटरीवरील विमा सक्तीचा करावा किंवा न करावा या विषयीचे अधिकार जिल्ह्याचे पोलीसअधिकाऱ्याचे हातांत सध्यां आहेत. या टापूंत रत्नागिरी व कुलाबा या दोनच जिल्ह्यांत अशा प्रकारच्या विम्याच्या सक्तीचे नियम तेथील पोलीस अधिकाऱ्यांनीं केलेले आहेत व तेही पण "Third party risk" (त्रयस्थाचा धोका) पुरतेच आहेत. सध्यांचे परिस्थितींत मोटरमालकांची खालावलेली आर्थिक परिस्थिती, ड्रायव्हरांचें यांत्रिक अज्ञान, मोडक्यातोडक्या मोटरचमा, वाईट रस्ते, मोटर चालविणाऱ्यांची बेजबाबदार वृत्ति, वगैरे गोष्टी लक्षांत घेतल्यास मोटरींनें प्रवास करणारे उतारू आपला जीव कसा धोक्यांत घालतात हें समजून येईल. दर्तमानपत्रें वाचणाऱ्यांस या परिस्थितीमुळें रोज निरनिराळ्या ठिकाणीं मोटरींचे किती अपघात होतात यांची जाणीव आहे. अशा स्थितींत उतारूंस अपघातांत घडणाऱ्या दुर्घटनाबद्दल कांहीं तरी भरपाई व्हावी म्हणून विम्याची किती जरूरी आहे हें जास्त स्पष्ट करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. आमच्या मतें सर्वच मोटरींवर विमा काढला पाहिजे असा सक्तीचा नियम होणें जरूर आहे. अशा प्रकारानें सक्तीनें विमा काढणें भाग पाडल्यास

अपघातांचें प्रमाण एकदम कमी होईल, बसेस जास्त काळजीपूर्वक वापरल्या जातील, व कालांतरानें त्या पासून मोटरमालकांचाही फायदा झाल्याशिवाय रहाणार नाहीं. सध्यांची परिस्थिति मोटरमालकांचे दृष्टीनें हलाखीची असल्यानें, व त्यास आधींच निरनिराळ्या प्रकारच्या करांचा बोजा सहन करावा लागत असल्यानें, त्यांस विमा सक्तीचा करणें योग्य नाहीं असें सांगण्यांत येतें. पण या म्हणण्यांत फारसें तथ्य नाहीं.सरकारी नियमाप्रमाणें मोटरींत इतकेच उतारू बसवावयाचे असा नियम असतो. तो सध्याच्या बिकट आर्थिक परिस्थितीकडे लक्ष देऊन मोडण्यास परवानगी द्यावी, असें कोणीही सुचविणार नाहीं. आमच्या मतें उतारूंचें जीव धोक्यांत नसावे यासाठीं जे इतर पोलिसचे नियम अवश्य आहेत, तितकाच किंबहुना त्याहून अधीक महत्वाचा विम्याचा प्रश्न आहे. हा धंदा आर्थिकदृष्ट्या चांगला चालत नसल्याचें खरें कारण या धंद्यांतील लोकांस त्यांतील नफ्यातोट्याचें खरें ज्ञान नसल्यानें ते आपसांत अतिशय अनर्थकारक अशी चढाओढ करतात व त्याचा परिणाम उतारूंस भोगावा लागतो. धंद्यांत फायदा नाहीं म्हणून कर कमी व्हावयास पाहिजेत हें म्हणणें सयुक्तिक आहे. परंतु त्यासाठीं उतारूंची गैरसोय करून त्यांचे जीव धोक्यांत घालणें केव्हांही रास्त होणार नाहीं.

३ मोटर तळ

प्रत्येक शहरांतून किंवा खेड्यांतून मोटरी उभ्या करण्यासाठीं कांहीं जागा ठरविलेल्या असतात, या जागीं मोटरी उभ्या राहतात व येथेंच उतारूंची चढउतार करण्यांत येते. शहरांतून निरनिराळ्या रस्त्यांवरून मोटरी थोडा वेळ देखील थांबवून ठेवणें शक्य नसतें, कारण त्यामुळें इतर वाहतुकीस अडथळा होतो. अशा प्रकारें रस्त्यावरून मोटारी थांबविल्या जाऊं नयेत याविषयीं पोलिसांकडून नियम करण्यांत आलेले असतात. पुष्कळशा गांवांच्या हद्दींतून बसा जाऊं न देण्याविषयींचे नियम असतात कारण रस्ते फार लहान असल्यामुळें मोठ्या मोटारी गेल्यास रस्ता अडविला जाऊन इतर वाहतुकीची व जनतेची गैरसोय होते अशा गांवांतून गांवाच्या सीमेवर बसा थांबविण्यासाठीं जागा योजून दिलेली असते.

मोटरमालकास त्यांच्या गाडीखान्यांतूनच उतारू मोटरींत बसविण्यास व उतरविण्यास कोणत्याही प्रकारचा निर्बंध नसतो, म्हणून कित्येक मोटरमालक अशा गाडीखान्यांचाच उपयोग मोटरतळासारखा करितात. गांवांत अगर गांवाबाहेर मोटरी थांबविण्यास जरी म्युनिसिपालिटीकडून जागा दिलेली असली तरी त्यासाठीं मोटरमालकाकडून भाडें वसूल करण्यांत येत नाहीं. या दृष्टीनें तरी फक्त दोनच गांवांतून अशा प्रकारचें मोटरस्टँडबद्दलचें भाडें मालकाकडून वसूल करण्यांत येत असल्याचें आमच्या निदर्शनास आलें. बहुतेक सर्व ठिकाणीं मोटरी उभ्या करण्यास जमीन तोडून दिलेली असली तरी ती स्टँडला पुरेशी असतेच असें नाहीं. मोठ्या शहरांतून तरी अशा तळांसाठीं बरीच जमीन असणें अत्यावश्यक आहे. पुण्यासारख्या शहरांत देखील मोटरतळासाठीं म्युनिसिपालिटीनें मोठाल्या जागा दिलेल्या नसाव्यात हें नवल आहे.

तसेंच बहुतेक सर्व मोटर तळांवर उतारूंच्या सोईसाठीं म्हणून कांहींच व्यवस्था केलेली आढळून येत नाहीं. प्रत्येक तळावर उतारूंस बसण्याची (विश्रांतीसाठीं निवाऱ्याची) जागा, पाण्याचे नळ व संडास, मुताऱ्या

वगैरेंची अत्यंत जरूर असून ही व्यवस्था केलेली नसते. मोटर-मालकांच्या स्वतःच्या तळावरही अशी व्यवस्था नसते. उतारूंच्या विश्रांतीसाठीं म्हणून महाड मोटर युनियननें मात्र मंडप घातलेला असून तेथें पाण्याचीही सोय केलेली आहे. पहांटेच्या मोटरींनें निघणाऱ्या प्रवाश्यास या मंडपांत रात्रीं झोपतां येतें. शिरूर, घोडनदीसही पावसाळ्यांत अगर उन्हाळ्यांत मोटरीस छायेखालीं उभें राहतां यावें म्हणून पत्र्याच्या झोंडझ्या घातल्या आहेत. सातान्यास संडासांची व नळाची सोय केलेली आहे. इतर ठिकाणीं मात्र अशा प्रकारच्या सोई केलेल्या आमच्या पहाण्यांत आल्या नाहींत.प्रत्येक म्युनिसिपालिटीनें उतारूंसाठीं अशा प्रकारच्या सोई कराव्या अशी आमची त्यांस शिफारस आहे. तळ स्वच्छ ठेवण्यासाठीं व त्याची डागडुजी करण्यासाठीं येणारा खर्च निभावा म्हणून मोटर मालकांकडून अल्प प्रमाणांत फी घेण्यासही हरकत नाहीं.

४ एजंट

आपल्या इकडील मोटरीच्या धंद्यांतील लोकांची आर्थिक परिस्थिति फारशी समाधानकारक नसल्यानें व बहुतेक मोटर मालकांजवळ फक्त १-२ च मोटरी असल्यानें त्यांना ठिकठिकाणीं कचेऱ्या उघडून तिकिटें विकण्यासाठीं किंवा इतर काम करण्यासाठीं कारकूनवर्ग बाळगणें अशक्य असतें. बरेचसे मोटर मालक एक संघ करून धंदा चालवीत असले तर त्यांस समाईक कचेरी ठेवून त्या कचेरींतूनच तिकिटविक्री करतां येणें शक्य असतें.इतरांस,विशेषतः एकच किंवा दोन मोटरी बाळगणारांस हें शक्य असत नाहीं. अशा लोकांस तिकिट विक्री, व उतारू मिळविणें अशीं दोन्हीं कामें एजंटकडून करवून घ्यावीं लागतात. हा एजंटाचा धंदा बऱ्याच वर्षांपासून अस्तित्वांत असला तरी त्यास नियमितपणा, व नियंत्रण मागील दोन तीन वर्षांपासूनच आलेलें आहे. आतां कोणत्याही इसमास एजंटाचा धंदा करणें असल्यास त्यास पोलिस खात्याकडून तसा धंदा करण्याचा परवाना काढावा लागतो व परवाना काढण्यासाठीं लिहिलेल्या अर्जावर कांहीं (तीन तरी) मोटर मालकांच्या सह्या द्याव्या लागतात. ज्या मालकांच्या या अर्जावर सह्या असतात त्यांच्यासाठींच तो इसम काम करतो असें नाहीं. पहिल्या वर्षांत उपकाराला स्मरून तो तसें काम करणें शक्य आहे, पण दुसऱ्या वर्षी परवाना बदलून घेते वेळीं कोणत्याही मालकांच्या सह्यांची जरूर नसल्यानें तो फक्त धंदेवाईक एजंट म्हणूनच काम करूं लागतो, व कोणत्याही मालकाच्या स्वाधीन राहण्याची त्यास जरूर राहात नाहीं. उतारू मिळविण्याचें व भाडेंवसुलीचें अशीं दोन्ही कामें एजंट करीत असल्यानें मोटरीचे धंद्यांत या एजंटवर्गास बरेंच महत्व प्राप्त झालें आहे. कारण मोटर मालकाचा किंवा ड्रायव्हरचा उतारूंशीं कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष संबंध येत नसल्यानें त्यांना एजंटावर अवलंबून राहणेंच भाग पडतें, व पुष्कळ वेळा एजंटांचे तंत्रानें वागावें लागतें.या एजंटास रुपयांत एक आणा कमिशन देण्याची साधारण वहिवाट पडलेली आहे. जेथें मोटर मालकांत फारशी एकी नाहीं व चढाओढीचे प्रमाण वाढतें आहे अशा ठिकाणीं एजंटांचें महत्व व कांहीं वेळेस त्यांच्या दलालीचें प्रमाणही फारच वाढलेलें असतें. कारण उतारू मिळणें अगर न मिळणें सर्वस्वीं त्यांच्यावरच अवलंबून असतें. अशा वेळीं जे मोटर मालक एजंटाचे विरुद्ध जाण्याचें धाडस करतात त्यांना एजंटाकडून बराच त्रास भोगावा लागतो. आपला फायदा होत राहावा व मोटर मालकांची एकी होऊ नये यासाठीं एजंटांचे प्रयत्न चालणें साहजिक आहे. कारण मालकांची एकी झाल्यास त्यांना पगारी एजंट ठेवून त्यांच्या-

कडून काम करून घेतां येतें. मोठमोठे सहकारी तत्वावर चालणाऱ्या मोटरींचे संघ पगारी एजंटच नेमतात,व अशी पाळी येऊन आपलें स्वातंत्र्य गमावूं नये म्हणून एजंट होतां होईं तो संघ स्थापन होऊं देत नाहींत, अशी त्यांच्याविरुद्ध तक्रार आहे.मागील कांहीं वर्षांत ठिकठिकाणच्या एजंटांची संख्या बरीच वाढत आहे. जुने एजंट धंदा आपल्या हातीं ठेवण्यास पुष्कळ प्रयत्न करतात, व धंद्यांत पडणाऱ्या नव्या एजंटास बराच त्रास देतात. तरी एजंटांची संख्या कमी होत नसून दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.निरनिराळ्या ठिकाणी एजंट किती आहेत ह्याची कल्पना येण्यासाठीं म्हणून पुणें जिल्ह्यांत ज्या ठिकाणीं पांच अगर पांचांहून जास्त एजंट आहेत अशा ठिकाणांचें कोष्टक खालीं दिलें आहे.

पुणें जिल्ह्यांतील कांहीं ठिकाणच्या एजंटांचे आंकडे.

१९३२-३३.

ठिकाण	बसांच्या एजंटांचा आंकडा.
पुणें	१३९
खेड	१५
सासवड	१४
बारामती	१३
इंदापूर	१२
घोडनदी	११
जुन्नर	११
तळेगांव (दाभाडे)	१०
आळंदी	६
निरा	६
वालहे	६
शिरूर	५
नारायणगांव	५

एजंटाचा धंदा करणाऱ्या इसमास पहिल्या अर्जाबरोबर रु. २ व दर वर्षी फेरनोंद म्हणून आठ आणे फी पोलिस कचेरींत भरावी लागते. जिल्ह्यांतील निरनिराळ्या ठिकाणीं एजंट किती असावेत याविषयीं पोलिस अधिकाऱ्यांचा ठराविक असा नियम नाहीं. एजंटांची दररोज किंवा दरमहा प्राप्ति किती असते याविषयींचे आंकडे आम्हांस मिळाले नाहींत, पण कांहीं ठिकाणीं दिवसभर काम करून एजंट ३।४ रुपयेही मिळवूं शकतो असें सांगण्यांत आलें. ज्या ठिकाणीं एजंटांचे संघ आहेत तेथें एजंट आळीपाळीनें काम करून दिवसभरांत मिळालेल्या पैशाची सारखी वाटणी करून घेतात.

५ मालाची वाहतुक

या भागांत मोटरीनें होणारी मालाची वाहतुक फारशी नाहीं व फक्त मालाची ने आण करणाऱ्या मोटरींची संख्याही फार कमी आहे. फक्त मालाची ने आण करणाऱ्या मोटरींची संख्या जरी नक्की देतां येणें शक्य नसलें तरी आम्ही मिळविलेल्या माहितीवरून येवढें सांगतां येतें कीं, १९३२-३३ सालीं कोणत्याही जिल्ह्यांत अशा मोटरींची संख्या १० हून अधिक नव्हती. मालाची वाहतुक मोटरीनें न होण्याचीं पुष्कळशीं कारणें आहेत.त्यांपैकीं कांहीं प्रमुख कारणांचा उल्लेख येथें करणें रास्त होईल.

(१) कांहीं जिल्ह्यांतील रस्ते चांगले नसल्यानें त्या जिल्ह्यांतून मोटरींतून मालाची ने आण करूं देत नाहींत. रत्नागिरी, कुलाबा व सातारा या तीन जिल्ह्यांनें अशा प्रकारचें नियंत्रण मोटरींवर पोलिस अधिकाऱ्यांकडून घालण्यांत आलेलें आहे. या तीन जिल्ह्यांतून सर्वच रस्त्यांवरून मोटरींतून मालाची ने आण करूं देत नाहींत असें मात्र नाहीं. कांहीं बाबीं

साठीं जिल्ह्यांतील एकदोन मुख्य रस्त्यांवरून मोटर मालकांनीं परवानगी मागितल्यास मालाची ने-आण करूं देतात. उदाहरणार्थ, रत्नागिरी कोल्हापूर व कऱ्हाड चिपळूण या मार्गांवर पावसाळ्यांतील चार महिने वगळून इतर ८ महिन्यांत अशा वाहतुकीस परवानगी मिळते. त्याचप्रमाणें धरमतर खोपोली ह्या वाटाही मालाच्या वाहतुकीस मोकळ्या ठेविलेल्या आहेत. परंतु असें कांहीं रस्ते वगळल्यास इतर रस्त्यांवरून मात्र मालाची ने आण मोटरींनें करण्यास परवानगी नसते.

मालाची वाहतुक मोटरींनें कितपत होते हें पाहण्यासाठीं आम्ही सहा जिल्ह्यांतील सर्व मोठ्या म्युनिसिपालिटयांकडून तशा प्रकारची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न करीत असतांना आम्हांस असें आढळून आलें कीं फक्त तीनच म्युनिसिपालिटयांकडे अशी माहिती जमविलेली आहे. त्या तीन म्युनिसिपालिट्या म्हणजे पुणें, शिरूर व बार्शी. या तीनपैकीं शिरूर व बार्शी म्यु. पालिट्यांकडून मिळालेली माहिती संपूर्ण व व्यवस्थेशीर अशी दिसून आली. त्यांतील बार्शीची माहिती १९३२-३३ सालची व शिरूरची १९३२ सालची अशी आहे. पुणें म्यु. पालिटीकडूनही बरीच उपयुक्त माहिती मिळाली, परंतु ती सर्व प्रकारच्या मालासंबंधी व संपूर्ण अशी नव्हती. तशांतही सर्वच नाक्यांवरील सर्व महिन्यांची माहिती न मिळाल्यानें आम्ही वर्षांतील (१९३२) मोठाल्या नाक्यांचे फक्त तीन महिने घेतले व त्यांचे आकडे व्यवस्थितरीतीनें (कोष्टकरूपांत) मांडले. यांत निरनिराळ्या तऱ्हेचा जो माल मोटरींनें पुणें शहरांत आला तो महिन्यागणिक दाखविला व त्याबरोबरच एकंदर मालाची (इतर वाहतुकीच्या साधनांतून) त्या त्या महिन्यांत किती आवक झाली तेंही दाखविलें. येथें हें सांगून ठेवणें अवश्य आहे कीं म्युनीसिपल दप्तरामधून जी माहिती दिलेली असते ती सर्वच व्यवस्थित किंवा अगदीं बिनचूक अशी नसल्यानें आम्ही घेतलेल्या आंकड्यांतही कांहीं अंशी चूक असण्याचा संभव आहे. परंतु एकंदर वाहतुकीच्या प्रश्नाचा विचार करण्यास येथें दिलेली माहिती ठोकळ मानानें विश्वसनीय धरण्यास हरकत नाहीं.

पुणें नाक्यांच्या माहितींत स्टेशनावरील नाक्यांचा समावेश केलेला नसल्यानें जे आंकडे दिले आहेत ते सर्व रस्त्यावरील वाहतुकीचे आहेत, म्हणजे एकंदर मालाच्या आवक आकडयांतून मोटरींनें आलेल्या मालाचीं वजावाट केल्यास राहिलेला माल बैल गाड्यांनी आला असें साधारणपणें धरून चालण्यास हरकत नाहीं. यावरून पुण्यापुरतें तरी मोटरी व बैलगाड्या या दोन रस्त्यावरील वाहतुकीच्या साधनांनीं प्रत्येकीं मालाची वाहतुक किती होते हें समजण्यासारखें आहे. सर्व प्रकारच्या मालाच्या एकंदर आयातीचे आकडे आम्हांस मिळाले नाहींत. फक्त फळें व भाज्या यांचे एकत्रित आकडे व कांहीं महिन्यांतून धान्य किराण्याचे आंकडे मिळाले. या आकडयांवरून असें आढळून येतें कीं निरनिराळ्या मोटरींनें येणाऱ्या मालाचें प्रमाण एकंदर आयातीच्या ५ पासून १४ (शेंकडा) असें पडतें. पुरेशी माहिती न मिळाल्यानें हें प्रमाण ऋतुमानावर अवलंबून राहतें, किंवा तें तसें असण्यास आणखी दुसरी कारणें आहेत हें सांगता येत नाहीं. मोटरींनें आजकाल बराच माल येऊ लागला आहे हें मात्र यावरून सिद्ध होतें. त्यांतही फळें व भाजीपाला तर मोटरींनें पुष्कळच मोठ्या प्रमाणांत येतात. एकंदर आयातीपैकीं या दोन जिनसांचें प्रमाण कोणत्याही महिन्यांत शेंकडा १० पेक्षां कमी नसून कांहीं महिन्यांत तें शेंकडा १६ पर्यंत जातें. धान्याचें प्रमाण फळभाज्यांहूनही जास्त दिसून येतें. १९३२ च्या ऑगस्ट महिन्यांत एकंदर आयातीपैकीं मोटरींनें आलेल्या धान्य व डाळींचें प्रमाण शें. ३५ इतकें पडलेलें

आढळून येतें. नाक्यावरील आयातीच्या मालांत किराणा या सदरासालीं वाळलेलीं फळें, साखर, गूळ, लोणी, तूप, आणि इतर किराण्याच्या जिनसा यांचा समावेश केलेला आढळतो. अशा प्रकारचा माल (किराणा) रस्त्यावरील वाहतुकीनें किती येतो याचा एकंदर आकडा आम्हास मिळाला नाहीं; परंतु या मालाचे बाबतींतही मोटरमार्गे बराच माल येत असावा असें वाटतें. वर्षांतील ज्या महिन्यांत मोटरीनें मालाची सर्वांत जास्त आयात झाली त्यावरून सरासरी १००० मण माल फक्त मोटारीनें आला म्हणजे १॥ टनी २५ ट्रक्स भरून हा माल आला असें म्हणतां येईल.अशा प्रकारच्या नुसत्या मालानें भरलेल्या मोटरीच येत नसल्यानें हा माल निरनिराळ्या उतारूंच्या मोटरींतून विभागला गेला; कारण नेहमीं जो माल येतो तो एका मोटरींत ४ पोतीं धान्याचीं तर दुसरींत कांहीं भाजीचे अथवा फळांचे करंडे, तर तिसरींत कांहीं किराणा माल अशा रीतीनें हा माल येत असतो. हें झालें पुण्यासंबंधीं. बार्शीत मोटरीनें येणाऱ्या मालाचे वजनवारी आंकडे पाहिले तर ते एकंदर येणाऱ्या मालाच्या मानानें फारच लहान असल्याचे आढळून येईल. येथें लागणारा माल बहुशः रेलवेनें येतो. बरेंचसें कापड मात्र सोलापूरमार्गे मोटरीनें आलेलें आढळतें. परंतु याचे आंकडे कापडाच्या एकंदर आयातीशीं ताडून पाहिल्यास ते फारच लहान आहेत असें आढळून येतें.

शिरुर हा गांव कोणत्याही रेल्वे-स्टेशनापासून बराच दूर असल्यानें येथें येणारा सर्वच माल रस्त्यानें येतो म्हणून रस्त्यावरील वाहतुकीच्या दृष्टीनें या गांवचे आंकडे विशेष महत्वाचे आहेत. येथें येणाऱ्या मालांपैकीं सर्वांत महत्वाचें स्थान "किराणा" मालास देतां येईल. साधारणपणें असें आढळून येतें कीं येथें येणाऱ्या एकंदर किराणा मालांपैकीं शेंकडा २५ मोटरींनें येतो. हा गांव एकाद्या खेड्यापेक्षां फार मोठा नसल्यानें येथें येणाऱ्या फळभाजीचें प्रमाण फारसें मोठें नाहीं. मोटरींनें येणाऱ्या धान्याचें प्रमाण मात्र फारच लहान म्हणजे शेंकडा १·५ असें पडतें. पुण्याच्या आणि शिरूरच्या या प्रमाणांत एवढें मोठें अंतर पडण्याचें कारण असें कीं, पुण्यांत धान्य मोटरींनें फक्त जवळच्या ठिकाणाहूनच येतें. लांबवरचा सर्व माल आगगाडीनें येतो. शिरूरांत सर्वच माल रस्त्यानें येतो. या मालांतील बराचसा भाग मोठ्या व्यापाऱ्यांचा असतो, व हे व्यापारी त्यांचा माल मोटरींनीं मागवीत नसावे असें यांवरून दिसतें.

वर दिलेली रस्त्यावरील मालाच्या वाहतुकीची माहिती जरी थोडी असली तरी त्यावरून मोटरींनें होणाऱ्या मालाच्या वाहतुकीची कल्पना येणें शक्य आहे. बहुतेक उतारूंच्या मोटर बसांमधून थोडथोडा माल नेण्यांत येतो असें आमच्या संशोधनांत आम्हांस आढळून आलें. अशा गटांत भाज्या, अंडीं, कोंबड्या वगैरेचे करंडे किंवा खेड्यांतून गहूं व बटाट्यांचीं पोतीं, तसेंच पुणें व मुंबईसारख्या शहरांतून कांचेचा माल, स्टेशनरी, खेळणीं वगैरे माल नेला जातो. मुख्यत्वेंकरून जादा किंमतीचा माल, किंवा लवकर नासणारा माल यांचीच मोटरींनें जास्त प्रमाणांत वाहतुक होते. बसांचा वेग जास्त असल्यानें त्यांना बैलगाडीशीं चढाओढ करतां येते व फळसारख्या लवकर नासणाऱ्या जिनसांची वाहतुक मोटरींनें बरीच होते. मोटरबसांमुळेंच महाबळेश्वरसारख्या ठिकाणाहून स्ट्रॉबेरीसारखीं फळें मुंबईपर्यंत नेणें शक्य झालें आहे. एका रात्रींत बैलगाडी जितकें अंतर तोडूं शकतें नितक्याच अंतरावर माल पोहोंचावयाचा असल्यास मात्र तो मोटारींनें अगर बैलगाडींनें नेणें यांत फारसा फरक पडत

नाहीं; अशा ठिकाणीं माल नेण्यास खर्च किती येईल यावरूनच वाहनाची निवड होते. साधारणपणें लहान प्रमाणावर माल वाहून नेण्यास पडणारा मोटरींचा खर्च बैलगाडीस पडणाऱ्या खर्चाचें बरोबरीनेंच असतो. किंवहुना उतारूंच्या मोटरींतून माल न्यावयाचा झाल्यास, या मोटरींचा विशेष भर उतारूंच्या भाड्यावर असल्यानें थोड्या फार मालास अशा मोटरींतून दर स्वस्त पडण्याचा देखील संभव असतो. व मालाची वाहतुक देखील जलद होते म्हणून मोटरींच्या वाटेवरील गांवांतून जाणाऱ्या येणाऱ्या मालाच्या बाबतींत मोटरी व बैलगाड्या यांच्यांत बरीच चढाओढ होऊं लागली आहे.

एका ठराविक अंतराच्या कक्षेंत मोटरबस व आगगाड्या यांजमध्येंही चढाओढ होणें शक्य आहे व अशी चढाओढ होते. रेल्वेचें बाबतींत जसजसें अंतर जास्त तसतसा प्रत्येक मैलावरील खर्च कमी होत जातो तसा मोटरीचे बाबतींत एका विविक्षित मर्यादेनंतर तो कमी होऊं शकत नाहीं. यामुळेंच एका विविक्षित मर्यादेच्या बाहेर मोटरीस रेल्वेशीं चढाओढ करतां येत नाहीं. पुण्याच्या पूर्वेकडून व दक्षिणेकडून पुण्यांत फळें व भाजीपाला यांचीहि बरीच वाहतुक होते, यापैकीं बहुतेक सर्व वाहतुक उतारूंच्या बसांमधूनच होते.

तसेंच खेड व जुन्नर या तालुक्यांतील चऱ्याचशा मालाची वाहतुकही पण मोटरींनें होते. पण या वाहतुकीचा आगगाड्यांवर चढाओढीसारखा परिणाम होत नसून ही वाहतुक त्यांस पोषक अशीच होते, कारण मोटारींनीं माल पुणें किंवा तळेगांव स्टेशनपर्यंत येऊन पुढें तो आगगाड्यांवर चढविला जातो. तळेगांव-जुन्नर या मार्गावर जी. आय. पी.नें बस सर्व्हिस सुरु केली असून या बसांतून पार्सलें व माल नेण्याची सोय असल्यानें जुन्नर, खेड, मंचर वगैरे ठिकाणांहून थेट मुंबईस माल पोहोंचण्याची व्यवस्था झाली आहे. पुणें-तळेगांवकडे जाणारा बराचसा माल मोटरींनें जात असला तरी बैलगाड्यांनीं मालाची ने-आण अजून बरीच होते. वर्षांतून ९ महिने तरी दररोज १ मोटर-भर म्हणजे २०-२५ पोतीं खेडहून पुण्यास येतात असें आम्हांस सांगण्यांत आलें. ही पोतीं मुख्यतः बटाट्यांचीं असतात. वर वर्णन केलेल्या वाहतुकीप्रमाणेंच कोल्हापूर-रत्नागिरी, संगमेश्वर, व कऱ्हाड चिपळूण या वाटांवरूनहीं पावसाळ्याचे दिवस सोडून इतर दिवसांत मालाची वाहतुक होत असते. कोंकणांतील ठिकाणें खाड्यांच्या तोंडाशीं वसलेलीं असल्यानें घाटावरील माल मोटारींनें खाड्यांपर्यंत येऊन तेथून मचव्यानें इतर ठिकाणीं जातो, व खाड्यांतून कोंकणांतील तांदुळासारखे जिन्नस मचव्यानें येऊन या वाहतुकीच्या साधनांनीं घाटावर नेले जातात.

परंतु या वरील रस्त्यावरून होणारी मालाची वाहतुक जिल्हा पोलिस अधिकाऱ्यांनीं केलेल्या नियमावर बरीचशी अवलंबून आहे. कारण कांहीं वाटांवरून मालाच्या मोटरी नेण्याची परवानगीच नसते तर कांहीं घाटांतून रात्रीचे वेळीं मोटरी जाऊं देत नाहींत. निरनिराळ्या मोसमांत होणारी धान्याची वाहतुक विशेषेंकरून बैलगाड्यांनींच होते व या बाबतींत बैलगाड्या व मोटारी यांमध्यें विशेष चढाओढ सध्या तरी नाहींच असें म्हणावें लागेल. लवकर नासणारा माल मात्र मोटर बसांनींच दिवसेंदिवस जास्त वाहून जाऊ लागला आहे. तसेंच १५-२० मैल अंतरापेक्षां जास्त अंतरावरील वहातुक देखील मोटारींनेंच करणें जास्त सोइस्कर वाटतें, व उतारूंच्या मोटरींतून २-४ डाग नेण्याची सोय होऊं शकत असल्यानें तशा रीतीनेंही पण मालाची

वहातुक होऊं लागली आहे. लष्कर नासणाऱ्या मालाच्या बाबतींत मोटर ट्रक १००-१५० मैलांपर्यंत आगगाडीशीही चढाओढ करूं शकते, परंतु अद्यापपर्यंत अशा प्रकारची फारशी चढाओढ चाललेली आढळली नाहीं.

६ वाहतुकीच्या इतर साधनाशीं चढाओढ

मोटरवाहतुकीमुळें आगगाड्यांच्या वाहतुकीवर किती परिणाम झाला किंवा आगगाडयांचें किती नुकसान होत आहे या बाबत अभ्यास करणें आम्हांस अशक्य होतें; कारण आगगाड्यांसंबंधींची कोणत्याही प्रकारची माहिती पुरविण्यांचें अधिकाऱ्यांनीं नाकारल्यामुळें आम्हांस या प्रश्नाचा विचारच करता आला नाहीं. मिचेल कर्कनेस रिपोर्टांत ह्या प्रश्नाचा सायंत उहापोह केलेला आढळतो. त्यांच्या मुंबई इलाख्याच्या रिपोर्टांत जी. आय. पी. रेल्वेचें मोटर वाहतुकीमुळें किती नुकसान झालें याविषयीं माहिती दिलेली आहे. ही माहिती मोजणी करून मिळविलेली आहे असें अधिकारी म्हणतात. पण ही मोजणी कशा प्रकारें केली हें मात्र समजत नाहीं. अधिकाऱ्यांनीं उतारूंची मोजणी करून वाहतुकीचे आंकडे एकत्र केले असल्यास जननेच्या माहितीसाठी ते प्रसिद्ध कां करूं नयेत, किंवा कां केले नाहींत याबद्दल तर जास्तच नवल वाटतें. अशा प्रकारची अत्यंत उपयुक्त माहिती प्रसिद्ध करण्यांत आगगाड्यांचें कोणतें नुकसान होणार होतें हें कळत नाहीं.

मिचेल कर्कनेस रिपोर्टावरून असें दिसतें कीं, ज्या ठिकाणीं आगगाडी व मोटरीची वाट समांतर असतें, किंवा दोन ठिकाणच्या अंतरांत मोटारीची वाट आगगाडीपेक्षां जास्त जवळची असते तेथें मोटारीच्या वाहतुकीमुळें आगगाड्यांस उपसर्ग पोहोंचतो. इतर देशांतून खाजगी मालकीच्या मोटारींची संख्या वाढल्यानें आगगाड्यांचें उत्पन्न कमी झालें असें सांगतां येतें, कारण त्या देशांतून खाजगी मोटारींची संख्या फार वाढलेली आहे. हिंदुस्थानांत मात्र तशी परिस्थिति नाहीं. बसनें प्रवास करणारे उतारु आगगाड्यांतून प्रवास करतांना तिसऱ्या वर्गानेंच प्रवास करणारे असतात. तेव्हां मोटर वाहतुकीचा आगगाड्यावर कांहीं परिणाम झाल्यास तो तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या उत्पन्नावरच काय तो होणार. जी. आय. पी. रेल्वेनें दाखविलेले चढाओढीमुळें झालेलें नुकसान फारसें नाहीं असें दिसून येतें. मद्रास आणि सदर्न मराठा रेल्वेचें मात्र थोडें जास्त नुकसान झालें असण्याचा संभव आहे, कारण त्यांच्या आगगाडीच्या वाटा व्यापारी पेठा व इतर गांवें यांपासून दूर असल्यानें व मोटरीच्या वाटा गांवांतून किंवा गांवाजवळून जात असल्यानें उतारू मोटरींनेंच प्रवास करणें पसंत करितात. यांतही भाड्याचा प्रश्न नसून उतारूंच्या सुखसोईचा प्रश्न येतो. पुण्याहून सातान्यास जाववयाचें झाल्यास आगगाडीपेक्षां मोटरनें तास दीड तास वेळ कमी लागून शिवाय सातारारोड ते शहरापर्यंतचा मोटरीचा प्रवास वांचतो. अशा जागीं उतारू मोटरींनींच प्रवास करणार हें उघड आहे.

थोड्या अंतराच्या प्रवासांत मात्र आगगाडया व मोटरी यांची चढाओढ होऊन त्यामुळें आगगाड्यांचें नुकसान होण्याचा संभव आहे. परंतु आपल्या इकडे मोटारीच्या प्रवासांत उतारूंच्या सुखसोईकडे लक्ष पुरविलें जात नसल्यानें व मोटरीचा प्रवास प्रसंगीं अपायकारक होण्याचा संभव असल्यानें उतारूंचा ओढा अजून आगगाड्यांकडेच जास्त असलेला आढळून येतो. मोटारींच्या वहातुकींत सुधारणा होऊन अपघात होण्याचें प्रमाण कमी झालें व

सुखसोई जास्त वाढल्या तर पुढें मागें मोटरवाहतुकीची झळ आगगाड्यांच्या वाहतुकीस जास्त प्रमाणांत भासेल असें मात्र म्हणता येईल.

मालाच्या वहातुकींत मात्र मोटरीमुळें आगगाड्यांचें थोडें फार नुकसान झालेलें दिसून येतें, पण तेंही अद्याप फारसें नाहीं. मोटरवाहतुकीच्या आगमनानें उतारूंचा बराचसा फायदा झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. मोटर वाहतुकीमुळें आपलें फार नुकसान होतें असें आगगाड्यांचे अधिकारी म्हणूं लागले, व उतारूंच्या संख्येंत फारशी घट होऊं नये म्हणून त्यांनीं उतारूंच्या सुखसोईकडे जास्त लक्ष पुरविण्यास सुरवात केली. मोटरींचीं वहातूक नव्हती तेव्हां तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे फार हाल होत असत, ते आतां कांहीं अंशानें कमी झाले आहेत यांत शंका नाहीं. ज्या ठिकाणीं मोटर वहातुकीची बाधा फार त्या ठिकाणीं आगगाड्यांच्या दरांत फेरबदल झालेला दिसून येतो. तसेंच जरूर तेथें जास्त गाड्या सोडण्यांत येतात. शोलापूर–सोलापूर किंवा पंढरपूर–सोलापूर या वाटांवरून उतारूंची मिळकत कमी होते असें आढळून आल्याबरोबर आगगाड्यांनीं तिसऱ्या वर्गाचे सवलतीचे दर केले, तसेंच पुणें–लोणावळा यांचे दरम्यान जास्त गाड्यांची सोय केली. राहुरी-पुणें-मुंबई यांचें दरम्यानची फळांची बरीचशी वाहतूक मोटरीनें होणें शक्य आहेसें आढळून आल्यावर त्या वाटेवरील वहातुकीचे दर तेवढ्यापुरते कमी करण्यांत आले. या सर्व गोष्टी मोटारींच्या वाहतुकीचा दृश्य परिणाम म्हणता येतील. जुन्नर सेंड मंचर या बाजूची मालाची वाहतूक थेट मुंबईपर्यंत रस्त्यावरील वाहनांनीं न होतां रेल्वेस मिळावी म्हणून जी. आय. पी. रेल्वेनें एका बस सर्व्हिससी सहकार्य करून तळेगांव–जुन्नर वाटेवर रेल्वेच्या मोटरींची व्यवस्था केली. त्यामुळें जुन्नर–तळेगांव वाटेवरील धान्य व इतर माल तसेंच पार्सलेंही मुंबईस आगगाडीनें पाठविण्याची व्यवस्था झाली. या वाटेवर ४ ठिकाणीं आगगाडीची स्टेशनेंच उघडलीं असून तेथें थेट मुंबईपर्यंतचीं तिकिटें व पार्सलपावत्या मिळण्याची सोय झाली आहे. उतारूंच्या तिकिटाच्या दरांतही पण सवलती देण्यांत आलेल्या आहेत.

मोटारीमुळें बैलगाड्यांच्या वाहतुकीवर कितपत परिणाम झाला हें सांगता येणें फार कठीण, कारण बैलगाड्यांच्या वाहतुकीचे आंकडे कोठेंच मिळणें शक्य नसल्यानें त्या प्रश्नाचा अभ्यासच करता आला नाहीं. येवढें मात्र म्हणतां येईल कीं मुंबईसारख्या शहरांतून पूर्वी शेतावरील कामें आटपल्यानंतर शेतकऱ्यांच्या बैलगाड्या भाड्यासाठीं म्हणून येत असत. त्या आतां बसांच्या वहातुकीमुळें येईनाशा झाल्या आहेत; व यामुळें शेतकऱ्यांच्या कमाईंत घट आली. अशा प्रकारचें जें नुकसान झालें असेल किंवा वाहतुकीवर परिणाम झाला असेल त्याचें प्रमाण आंकडयांच्या अभावीं काढतां येत नाहीं. नुसतीं कल्पना करूनच थांबावें लागतें.

७ टपालाच्या मोटरी
(Postal Mails)

वहातुकीसंबंधीं लिहितांना आतां फक्त टपालाच्या मोटरींविषयींच दोन शब्द सांगावयाचें राहिले. दिवसेंदिवस टपालाच्या मोटरींची संख्या वाढत आहे. या भागांत एकंदर १७०० मैल लांब रस्त्यावरून टपालाच्या मोटारी फिरतात. दरवर्षी मोटारींनें नेल्या जाणाऱ्या टपाल रस्त्यांचें लिलांव केले जातात. टपाल नेणाऱ्या मोटार-मालकांस त्यांच्या मोटारी नेहमीं सुस्थितींत ठेवाव्याच लागतात. एकादें वेळीं एका मोटरीपेक्षां जास्त मोटरी टपाल नेण्यास लागल्यास मालकांस त्या पुरवाव्या लागतात. टपालाच्या मोटारींच्या सुटण्याच्या व

मुक्कामास परत येण्याच्या वेळा ठराविक असाव्या लागतात, म्हणजे या मोटारी वेळापत्रकाप्रमाणें चालतात. ड्रायव्हर टपालखात्यास असमाधानकारक वाटला तर त्यास नोकरीतून बडतर्फ करावें लागतें. टपालाच्या मोटरींतून टपाल भरून जास्त जागा राहिली तर त्या मानानेंच उतारू भरता येतात. तसेंच मोटर वाटेंत नादुरुस्त झाल्यास ती लवकर दुरुस्त करतां यावी म्हणून मोटारीबरोबर कांहीं सुटे भाग नेहमीं ठेवावे लागतात. टपालाच्या मोटारींवर अधिकाऱ्यांचा अशा प्रकारानें ताबा राहात असल्यानें या मोटारींतून उतारू प्रवास करण्यास जास्त उत्सुक असतात. एक तर या मोटारी वेळेवर सुटतात व त्या नेहमींच सुस्थितींत ठेवाव्या लागत असल्यानें त्यांना अपघात होण्याची भिती कमी असते. टपालच्या मोटारींस मासिक वेतन ठरवून दिलेलें असतें. पूर्वी या वेतनाचें प्रमाण सध्यांपेक्षां बरेंच जास्त होतें, परंतु सर्वच वाटांवरून मोटरींची संख्या वाढल्यामुळें व लिलावाच्या वेळीं मोटारमालकांची आपसांत बरीच चढाओढ होत असल्यानें वेतनाचें प्रमाण दिवसेंदिवस कमी होत असलेलें आढळतें. या भागांत एकंदर ६४ टपाल मोटरींच्या सर्व्हिसेस आहेत. सर्व्हिसच्या वाटा २ मैलापासून ९२ मैल लांबीच्या आहेत व टपालाच्या मोटरींना वेतन रुपानें टपाल खात्याचें दरमहा रु. ६६८० खर्च होतात.

सहा जिल्ह्यांतील मोटारींचे (५९) रस्ते; त्यावरील मोटारींचें भाडें व त्यावरून रोज चालणाऱ्या मोटरींचा आंकडा वगैरे दाखविणारा तक्ता

(१९३२-३३)

रस्ता.	मैल	रोज चालणाऱ्या बसांचा आंकडा.	भाडें.	मैल भाडें. पै.
			रु. आ. पै.	
पुणें-धामतर.	७२	४	२-८-०	६·६
पुणें पौड.	२१	३	०-८-०	४·५
पुणें-मुंबई.	१२०	७	२-८-०	४·०
पुणें-भिगवण-इंदापूर.	८४	५	१ १२·०	४·०
पुणें-इंदापूर-पंढरपूर.	१४१	२	२-८ ·०	३·४
पुणें-बारामती-भिगवण.	७०	३	१-८-०	४·१
पुणें-तळेगांव (दाभाडें.)	२०	७	०-७-.	४·२
पुणें-चिंचवड.	९	४	८-४-०	५·३
पुणें-जुन्नर.	५८	२०	१-२-०	३·७
पुणें-सातारा.	६९	६०	१-२-०	३·१
पुणें-अहमदनगर.	७२	२५	१-९-०	४·१
पुणें-सासवड.	२८	४०	८-६-८	३·९
इंदापूर निंबगांव-बारामती.	३१	४	१-८-८	६·३
बारामती-भिगवण.	१८	४	०-: -०	५·३
अहमदनगर-शेवगांव.	४२	१२	०-१२ ०	३·४
अहमदनगर-नेवासें.	३७	१५	०-११ ०	३·६
अहमदनगर-चांडे.	९०	२	३-३-०	६·८
अहमदनगर-संगमनेर.	३२	२२	८·१२-०	३·४
संगमनेर-नाशिक.	४२	१३	०·१३·०	३·७

रस्ता.	मैल.	रोज चालणाऱ्या बसांचा आंकडा	भाडें.	मैल भाडें. पै.
संगमनेर-पुणें.	८३	७	२-०-०	४·६
संगमनेर-कोपरगांव.	४२	१३	१-८-०	४·६
राहुरी-बेलापूर.	१३	४	०-४-८	३·७
बेलापूर-नेवासें.	२२	३	०·१२-०	६·५
सातारा-सातारा रोड.	९	३	०-६-०	८·०
सातारा-कऱ्हाड.	३०	३५	०-८-८	३·२
सातारा महाबळेश्वर.	४२	१५	१-२-०	५·१
कऱ्हाड चिपळूण.	६०	५	२-८-०	६·४
कऱ्हाड पुणें.	१०१	४	२-०-०	३·८
कोरेगांव-म्हसवड.	५०	७	१-८-०	३·८
म्हसवड-दहिवडी.	१५	३	०-६-०	४·८
म्हसवड पंढरपूर.	३०	४	०-८-०	३·२
लोणंद सातारा.	२२	४	८-८-०	४·४
लोणंद-शिरवळ.	१५	१०	०-६-०	४·८
सोलापूर-अक्कलकोट.	२४	१२	०-१२-८	६·०
सोलापूर-तुळजापूर.	२६	१७	०·१२-०	५·५
सोलापूर-बार्शी.	४२	२२	१-१-०	४·९
सोलापूर-पंढरपूर.	४०	२७	१ ०-०	४·८
बार्शी-कुर्डुवाडी.	२१	४	०-६-०	३·४
कुर्डुवाडी-पंढरपूर.	३३	७	०-१८ ०	३·६
जेऊर-करमाळें.	११	५	०-६-०	६·५
करमाळें अहमदनगर.	६०	३	२-८-०	८·०
अलिबाग रेवस.	५५	१६	० १२-०	९·६
अलिबाग-धरमतर.	१३	१०	०-१२-०	११·०
अलिबाग-रेवदंडा.	११	७	०-८-०	८·७
पनवेल-पेण.	५०	१२	१-४-०	४·८
पनवेल-खोपोली.	२१	१८	०·१० ०	५·७
पनवेल-मुंबई.	५५	११	१-२-०	३·९
पनवेल-पुणें.	७०	७	२-०-०	५·५
गोरेगांव-धरमतर.	४२	५	१-८-८	६·९
महाड-मुंबई.	१५०	४	३-०-०	३·८
महाड-धरमतर.	५६	२९	२-०-०	६·९
रत्नागिरी-चिपळूण.	६०	१४	८-८-०	१·४
रत्नागिरी-कोल्हापूर.	८२	२१	२-०-०	४·७
रत्नागिरी-राजापूर.	४८	१५	१-८-०	६·०
वेंगुर्ला सावंतवाडी.	१७	९	०-१२-०	८·५
मालवण-कुंडल	२५	११	०-१२-०	५·८
सांगली निपाणी.	५७	१०	१-२-०	३·८
मिरज-पिर्टे.	३५	१०	० १२-०	४·१
कोल्हापूर-बेळगांव.	७०	१५	१-०-०	२·७

प्रकरण ५ वें

उत्पन्न आणि खर्च

मोटर वाहतुकीच्या प्रश्नासंबंधानें संशोधन करीत असतांना माहिती मिळविण्याच्या दृष्टीनें बराच महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मोटर-मालकांना होणारें उत्पन्न व त्यांचा मोटरवर होणारा खर्च हा होता. कारण उत्पन्न व खर्च या संबंधांत पुरेशी माहिती मिळाल्याशिवाय, या धंद्यांतील लोकांची आर्थिक परिस्थिति कशी आहे व ती सुधारण्यासाठीं कोणती उपाययोजना व्हावयास पाहिजे या संबंधांत कांहींच सांगता येणें शक्य नाहीं. सध्यांचे परिस्थितींत निरनिराळ्या वाटांवर मोटरींची आपसांतील चढाओढ अतोनात असते असें सांगण्यांत येतें. तरी या चढाओढीचें प्रमाण काय ! तिजपासून मोटर मालकांचें नुकसान किती होतें व नुकसान होत असल्यास त्यास आळा घालण्यास काय उपाययोजना केली असतां मोटर-मालकांचें नुकसान न होता त्यांना धंदा कितपत किफायतशीर होईल, अशा विविध प्रकारच्या प्रश्नांस हात घालावयाचा, म्हणजे उत्पन्न व खर्चाच्या बाबींसंबंधीं मिळेल तितकी माहिती जमविण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. याकरितां आम्हांस या संबंधांत जितकी माहिती मिळविणें शक्य होतें तितकी मिळविली. अशी माहिती मिळविण्यास बराच त्रास पडला, व जी माहिती मिळाली ती पुरेशी किंवा अगदीं बिनचूक अशी मिळाली नाहीं. हें प्रथमतःच नमूद करून ठेवणें अवश्य आहे. ही माहिती मिळविण्याचा आम्हीं दोन प्रकारांनीं प्रयत्न केला. एक म्हणजे मोटर-मालकांस त्यांच्या मोटरपासून कोणकोणत्या प्रकाराचा खर्च होतो, व उत्पन्न कसें कसें मिळतें असें सरळ विचारून त्यांचेकडून मिळेल ती माहिती जमा करणें, व दुसरा प्रकार म्हणजे प्रश्नावल्यांतील निरनिराळ्या सदरांखालीं उत्पन्न खर्चाच्या बाबींविषयीं प्रश्न घालून त्यावरून माहिती जमविणें. अशा प्रकारची प्रश्नावल्यांवरून मिळालेली माहिती बरीचशी परंतु संगतवार नसलेली अशी होती. मोटरमालकांपैकीं बरेचसे मालक हिशेबांचा रोजखर्डा किंवा वह्या नियमित रीतीनें व सुसंगतवार लिहून ठेवीत नसल्यानें त्यावरून मिळविलेली माहिती पण अर्धीकच्ची मिळाली. मोटरमालकांनीं या धंद्यांत हजारों रुपयांचें भांडवल घालून धंदा चालवावा, परंतु धंद्यांत घातलेल्या पैशाचें काय होत आहे, धंद्यांत नफा अगर नुकसान होतें किंवा काय, नुकसान होत असल्यास कोणकोणत्या प्रकारानें होतें, या बाबी समजण्यासाठीं नियमित हिशेब ठेवूं नयेत ही खरोखर मोठी खेदाची गोष्ट आहे. धंद्यासंबंधीं माहिती मिळवितांना फारच थोडे मोटरमालक पद्धतशीर हिशेब ठेवतात असें आम्हांस आढळून आलें. बऱ्याचशा मालकांचा हिशेब ठेवण्याची रीत म्हणजे एकच, रोजची कुपन बुकांतील फाडलेलीं तिकिटें मोजलीं म्हणजे त्यांवरून उत्पन्नाचा आंकडा तयार करावयाचा व पेट्रोल, वंगणाचें तेल, रोलनाकी वगैरेवर रोजचा होणारा खर्च या उत्पन्नाचे आंकड्यांतून वजा करून राहील ती शिलक म्हणून धरावयाची. परंतु अशा प्रकारच्या हिशेबांत वेळोवेळीं टायरट्यूबवर होणारा खर्च किंवा धंद्यांत गुंतविलेल्या भांडवलावरील व्याज किंवा अशाच प्रकारचा इतर खर्च याचबद्दल कांहींच जमेस धरलेलें नसल्यानें त्यावरून एकंदर उत्पन्नाच्या मानाचें कांहींच स्पष्टीकरण होत नाहीं. तसेंच मोटरींचा रोजचा प्रवास किती होतो, दररोज मोटरींच्या खेपा किती, व

उतारूंची संख्या, किंवा नेल्या आणलेल्या मालाचें प्रमाण, वर्षांतून गाडी कोणत्याही कारणामुळें कितीं दिवस स्वस्थ पडून राहिली इ. इ. गोष्टींविषयीं मोटरमालकांजवळ कांहींच माहिती नसते. या सर्व प्रकारांमुळें जी माहिती मिळणें शक्य आहे, तेवढ्यावरून धंद्यासंबंधींच्या आर्थिक परिस्थितिचद्दल खरी कल्पना येऊं शकत नाहीं. जमाखर्चाची माहिती मिळविण्यास आम्हांस जरी बराच त्रास पडला, तरी येथें हें नमूद करून ठेवणें अवश्य आहे कीं, बहुतेक सर्व मोटर मालकांनीं त्यांच्या जवळ ज्या प्रकारची माहिती होती ती आम्हांस देण्यांत बरेंच सहकार्य दाखविलें.

एकंदर १५५ मोटरमालकांकडे माहितीसंबंधांत आम्हीं विचारणा केली; त्यांपैकीं जवळ जवळ निम्या लोकांकडून फारशी उपयुक्त अशी माहिती मिळाली नाहीं. ज्यांच्याकडून माहिती मिळाली, त्यांच्यापैकीं फक्त ६० जणांनींच त्यांनीं ठेविलेल्या हिशेबांतून अशी माहिती पुरविली, - नींत देखील खर्चाच्या बाजूचीच माहिती जास्त प्रमाणांत मिळाली. एकंदर १५५ मालकांपैकीं ज्यांची माहिती साधारणपणें पूर्ण म्हणून म्हणतां येईल असें मोटर मालक फक्त ३५ च सांपडले. या लोकांनीं सबंध वर्षाचे नाहीं तरी महिन्याचे किंवा आठवड्याचे (मधून मधून) तरी चोख हिशेब ठेवलेले आढळून आले. या शेवटल्या वर्गांतील लोकांच्या हिशेबाच्या टिपणांवरूनच आम्हीं या प्रकरणांत उल्लेखिलेल्या गोष्टींचा आढावा काढलेला आहे. एकंदर प्रकरणावरून धंद्यांतील सर्वच मोटर-मालकांनीं उत्पन्नखर्चासंबंधीं संपूर्ण टिपणें ठेवणें किती आवश्यक आहे हें चांगलें समजून येईल.

(i) **उत्पन्नाच्या बाजू**:-वर सांगितल्याप्रमाणें खर्चाच्या बाजूसंबंधीं बरीच माहिती आम्हांस मिळाली; परंतु उत्पन्नाच्या बाजूसंबंधी मात्र संपूर्ण अशी माहिती मिळाली नाहीं; जर्वे पाहिजे असतां उत्पन्नासंबंधीं माहिती मिळण्यास त्रास पडूं नये, कारण निदान या बाजूचा तरी पूर्ण हिशेब मालकांनीं ठेवला असेल अशी अपेक्षा असते. पण हें आम्हांस कोठेंही आढळून आलें नाहीं, व आम्हीं दिलेले उत्पन्नाचे आंकडे कांहीं आटवडे अगर महिन्यापुरतेच मिळविलेले आहेत. आणि अशा आकडयांच्या अभावीं उत्पन्नाचे आंकडे तयार करणें सोपें नाहीं. निरनिराळ्या रस्त्यावरील भाड्याचें प्रमाण माहीत असल्यास व मोटरी रोज किती खेपा करतात, एकंदर प्रवास किती मैलांचा होतो, प्रत्येक खेपेस गाडी पूर्ण भरून किंवा अपुरी जात असल्यास रोजच्या जाणाऱ्या येणाऱ्या उतारूंचें प्रमाण काय, एकाच रस्त्यावर एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत जाणारे उतारू किती, मध्येंच उतरणारे किती, मधील थांबण्याच्या निरनिराळ्या ठिकाणांवरून घेतलेले उतारू किती, अशा मधल्या उतारूंचें प्रवासाचें (मैलाचें व संख्येचें) प्रमाण काय; वगैरे गोष्टींविषयीं माहिती मिळाल्यास उत्पन्नाचे आंकडे तयार करण्यास फारसें कठीण जाणार नाहीं. तसेंच सबंध वर्षांत मोटर किती दिवस चालते, जास्त भाडीं मिळण्याचे दिवस किती, पावसाळ्यांत खेड्यांतील लोक उद्योगांत गुंतल्यामुळें व रस्ते वाईट असल्यामुळें गाड्या कितपत चालतात, लग्नकार्याच्या किंवा जत्रा-उरुसांच्या दिवसांत रहदारी जास्त असल्यास भाडीं कमी किंवा जास्त होतात काय, व मोटरीच्या खेपा जास्त होतात काय; अशा प्रकारची माहितीही उत्पन्नाचे आंकडे बसविण्यास आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारची माहिती मिळविणें जवळजवळ अशक्य झालें. व या अडचणीमुळें आम्हांस उत्पन्नखर्चाबाबत इत्थंभूत व संपूर्ण माहिती एकत्र करतां आली नाहीं. ऋतुमानाप्रमाणें रहदारीनेही प्रमाण कमजास्त होणें शक्य आहे. तसेंच शेत लागवड किंवा पिकें काढण्याच्या वेळींही उतारूंचें प्रमाण कमी होत असलें पाहिजे व खेड्यांतील मजूरवर्ग तेथील काम संपल्यावर

शहरांकडे धांव घेतेवेळीं रहदारींच्या संख्येंत भर पडावयास पाहिजे. म्हणजे, कांहीं ऋतूंत मोटरी भरगच्च जात असल्या पाहिजेत, तर कांहीं वेळीं अर्धवट व रिकाम्याही जात असल्या पाहिजेत. परंतु या बाबतची सांगोपांग माहिती बहुतेक कोणांकडूनच मिळाली नाहीं.

मोटर-मालकांच्या उत्पन्नाचे व खर्चाचे तक्के आम्हीं यासोबत जोडले आहेत. त्यांवरून उत्पन्नाचे आंकडयांत निरनिराळ्या मालकांचे बाबतींत किती फरक पडतो हें दिसून येईल. प्रत्येक मालकाचे उत्पन्न-खर्चाचे आंकडे वेगवेगळे दाखविले आहेत. त्यांत प्रत्येक मैलासु ३ आण्यांपासून ६॥ आण्यांपर्यंत उत्पन्न दाखविलें आहे. यावरून जास्तींत जास्त व कमींत कमी उत्पन्नांत किती अंतर पडतें हें समजेल. उत्पन्नाचे बाबतींत उतारूंचें उत्पन्न व मालाचें उत्पन्न असे दोन निराळे भाग पाडणें शक्य झालें नाहीं. कारण उत्पन्नाचे हिशेबांत तशी कोठेंच फोड केलेली आम्हांस आढळून आली नाहीं. जसें उत्पन्नाचें आकडयांत महदंतर आढळून येतें, तसेंच उतारूंपासून घेतल्या जाणाऱ्या भाड्याचे रकमेंतही आढळतें. कमींतकमी भाडें मैलीं तीन पै किंवा त्याहूनही थोडें कमी घेतलेलें आढळलें, तर जास्तींत जास्त मैलीं १० पै किंवा त्याहून थोडें जास्त घेतलेलें आढळलें. उत्पन्नाचे जे आंकडे मिळण्यासारखे होते, त्यांत प्रत्येक मोटरींत प्रत्येक खेपेस किती उतारू नेले गेले, याविषयीं संपूर्ण माहिती न मिळाल्यानें मोटरी प्रत्येक खेपेस भरून गेल्या, व जेवढे दिवस दाखविले, तेवढ्या दिवसांत रोज त्यांचा ठराविक प्रवास झाला, असेंच आम्हीं धरून चाललों. अशा रीतीनें हिशेब केल्यास प्रत्येक उतारूच्या मागें मैलीं २ पासून ५ पै पर्यंत मिळकत मोटर मालकास होत असल्याचें आम्हांस आढळून आलें. वर्षांतून मोटर घरींच किती दिवस पडून राहते किंवा मोडतोडीस अगर दुरुस्तीस प्रत्येक मोटरीचे किती दिवस गुमावतात, याविषयीं पुरेशी माहिती न मिळाल्यानें उत्पन्नाचे आंकडे तयार करतांना या गोष्टीचा त्यांत विचार करतां आला नाहीं. तसेंच कांहीं रस्त्यांवरून कांहीं वेळीं मोटरींत ठराविक संख्येपेक्षां जास्त उतारू भरून नेलेले असल्यास, तेही या हिशेबांत आम्हांस दाखवितां आले नाहींत. प्रत्येक मोटरींत रोज थोडे फार फुकट असेही कांहीं उतारू नेण्यांत येतात. पुष्कळ वेळां हे मालक, ड्रायव्हर किंवा इतरांचे स्नेही व नातेवाईक असतात. पण बहुतेक वेळां "फुकट" कोणाच्या तरी शिकारशीनें बसविले गेले असतात. ही शिफारस कोणाची वगैरे गोष्टी नेहमीं प्रवास करणाऱ्यांस जास्त स्पष्टपणें सांगण्याची जरूरी नाहीं. हें फुकट उतारू नेण्याचें बंड कोटपर्यंत वाढलें आहे याचा तपास करतांना आम्हांस असें आढळून आलें कीं, दर रोज प्रत्येक मोटरीमागें निदान २ फुकट उतारूंचें प्रमाण पडतें. म्हणजे यामुळें मोटर-मालकाच्या उत्पन्नांत शेंकडा ८ ते १० तूट पडते. अर्थात् हे फुकट उतारू नेल्यामुळें जास्त उतारू कोंबण्याची सुभा मिळणें वगैरे बाबत मोटर मालकाचा फायदा होण्याचा संभव असतो, हेंही खरें!

(ii) **भाडीं**—उतारूंकडून जीं भाडी घेतलीं जातात, त्यांचें कांहीं ठराविक प्रमाण आहे किंवा काय यासंबंधानें शोध करतांना आम्हांस असें आढळून आलें कीं, भाडें कोणत्याच नियमानुसार ठरविलें जात नाहीं. वेळ, प्रसंग, मोटरवाल्याची स्वतःची गरज, आपसांतील चढाओढ, वगैरे बऱ्याच गोष्टींवर भाडें ठरविणें अवलंबून असतें. निरनिराळ्या वाटांवरून निरनिराळ्या प्रमाणांत भाडें आकारलेलें आढळून येतें. आमच्या संशोधकानें ज्या ज्या वाटांवर प्रवास केला, व ज्या वाटांविषयीं माहिती मिळविली, ती सर्व एकत्र केल्यावर आम्हांस साली दिल्यामाणें भाड्यासंबंधीं त्यांचें वर्गीकरण करतां आलें. हे सर्व आंकडे १९३२-३३ चे आहेत. आजचे भाडी

याहूनही उतरली आहेत. निरनिराळ्या वाटांवरून दर मैलास जीं भाडीं आकारलीं जातात, त्यावरून हें वर्गीकरण केलेलें आहे. या वाटांवरून प्रत्येक मैलास प्रत्येक उतारूंकडून किती भाडें आकारलें जातें हें दाखविलें आहे. मैलास तीन पैपेक्षां कमी अशी १ वाट; ३ ते ४ पै, १८ वाटा; ४ ते ५ पै १६ वाटा; ५ ते ६ पै, ७ वाटा; ६ ते ७ पै, ११ वाटा; ८ ते ९ पै, ४ वाटा; आणि ९ हून जास्त पै च्या २ वाटा अशा एकंदर ५९ वाटांवरील हें वर्गीकरण आहे.

यांत मेळीं ३ ते ५ पै चें प्रमाण सर्वांत जास्त दिसून येतें व त्याचे खालोखाल मळी ६-७ पैचें प्रमाण पडतें. ७ पैच्या वरच्या प्रमाणांत येणाऱ्या वाटांची व बसांची संख्या फारशी नाहीं.

या ठिकाणीं ही गोष्टही पण लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, जेथें जेथें ४-५ पै पेक्षां मैलास जास्त भाडें आकारलें जातें, त्या त्या वाटा २० मैलांच्या आंतील टापूंतील आणि त्यांतील ५ पैकीं चार वाटा कोंकणांतील आहेत; व अशा वाटा आगगाडीच्या वाटेपासून बऱ्याच दूरच्या आहेत. जेथें जेथें रस्ते आगगाडीच्या मार्गाच्या जवळ किंवा त्यास समांतर असे असतात, तेथें भाड्याचा दर दरमाणशी प्रत्येक मैलास ६ पै पेक्षां अधिक असत नाहीं असें आढळून आलें. पन्नास मैलांचे अंतरास आगगाडीचे भाड्याचे दर मैलास ४ पै प्रमाणें असल्यानें थोड्या अंतरावरील ठिकाणचें भाडें मैलास जास्तीत जास्तीं ६ पै पर्यंत सममालकांस घेता येणें शक्य होतें. याचें कारण आगगाडीनें प्रवास करतांना हमाली वगैरे इतर करावया लागणाऱ्या खर्चाची मोटारनें प्रवास केला असतां बचत होते, हें होय. परंतु जसजसा प्रवास जास्त लांबीचा होतो तसतसें या इतर खर्चाचें महत्त्व भाड्याचे मानानें कमी होतें. तेव्हां आगगाडी नसलेल्या मोठ्या मार्गावर लांबच्या प्रवासाच्या भाड्याचा दर मैलास चार पै पेक्षां कोठेंच जास्त नसतो.

कमी अंतरावरील वाटांवर भाड्यांचा दर नेहमीं जास्त असतो असेंही पण म्हणता येत नाहीं. कारण कांहीं वाटांवर अंतर कमी असून भाड्याचे दरही पण कमी आहेत. एवढें मात्र खरें कीं वाटेवर मध्येंच घेतलेले उतारू किंवा २-४ मैल जाणारे उतारू यांचेकडून घेतल्या जाणाऱ्या भाड्याचा दर सर्वसाधारण दरांच्या मानानें जास्त असतो. अशा उतारूंकडून मैलास बहुतेक ६ ते ९ पै भाडें घेतलें जातें. पुष्कळ वेळां ऋतुमानाप्रमाणें, तर इतर वेळा जत्रा वगैरे म्हणून किंवा रस्ते फारच नादुरुस्त असल्यास, भाड्याचें प्रमाण वाढण्याचा संभव असतो.

साधारणतः असें म्हणता येईल कीं, मोटर-मालकांत आपसांत संघटण चांगलें असल्यास व आपसांत चढाओढ नसल्यास भाड्याचे दर जास्त असूं शकतील. कोंकणांत निरनिराळ्या गांवांतून मोटर-मालकांचे संघ असल्यानें व कोणत्याही वाटांवरून फारशी चढाओढ नसल्यानें भाड्यांचे दर बरे आहेत. ज्या वाटावरून मोटरींची आपसांतील चढाओढ जास्त, व मोटर-मालकांचें संघटण नाहीं अशा वाटांवरून भाड्याचे दर कमी असण्याचा संभव जास्त. यावरून असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं ज्या ठिकाणीं भाड्याचा दर मैलास ४ पै हून कमी असतो तेथें चढाओढ बरीच असली पाहिजे; व ज्या वाटांवर दर ३ पै अगर त्याहून कमी असतो, त्या वाटांवरून चढाओढ अगदींच कळसास पोहोंचली आहे.

मालाच्या वाहतुकीसंबंधीं फारशी माहिती मिळण्यासारखी नसल्यानें व मालाची वाहतुक उतारूंइतकी मोठ्या प्रमाणावर होत नसल्यानें मालाच्या भाड्याच्या दरासंबंधीं फारसें लिहितां येत नाहीं. या संबंधांत जे लोक फक्त मालाचीच वाहतुक करतात, त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीवरून असें सांगता येईल कीं, त्यांचा मालाच्या वाहतुकीवरील भाड्याचा दर दर मैली दर मणास एक ते दीड पै असतो. उतारूंच्या मोटरींतून जाणाऱ्या मालाच्या

भाड्याच्या दरासंबंधी कांहींच कल्पना देता येणें शक्य नाहीं.

(iii) खर्चाच्या बाबी (१) पेट्रोल व वंगणाचें तेल

खर्चाच्या बाबींसंबंधीची माहिती या प्रकरणाचे शेवटीं जीं २१ खर्चाचीं टिपणें दिलीं आहेत त्यावरूनच बसविलेली आहे. या बाबींचें वर्गीकरण केलेलें असून त्यापैकीं सध्यां ज्यांस " चालू खर्च " किंवा " रोज खर्च " म्हणता येईल अशा बाबींचा येथें विचार करावयाचा आहे. यांत पेट्रोल व वंगणाचें तेल यांचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो. या गोष्टींचा विचार करतांना मोटरीचा रोजचा प्रवास किती होतो, पेट्रोल किती लागतें. व पेट्रोलची किंमत काय वगैरे गोष्टींचा विचार करणें जरूर असतें. दीड टनची मोटरबस साधारणपणें १ गॅलन पेट्रोलवर १६ ते १८ मैल जाते. ज्या मानानें रस्ता वाईट किंवा मोटरबस नादुरुस्त त्या मानानें पेट्रोलच्या खर्चाचें प्रमाण थोडें फार जास्त होण्याचा संभव असतो. पेट्रोलच्या किंमतींत फरक पडण्याचें कारण एकच व तें म्हणजे ज्या मानानें ठिकाण मुंबईहून लांबवरचें त्या मानानें पेट्रोलची किंमत जास्त. १९३२-३३ या सालांत या भागांत पेट्रोलचा कमींत कमी भाव गॅलनला रु. १-०-६ व जास्तींत जास्त गॅ. ला १-१२-० असलेला आढळून आला.

पेट्रोलच्या किंमतींत ज्या कारणानें फरक पडतो, त्याच कारणामुळें वंगणाच्या तेलाच्या किंमतींतही फरक पडतो. वंगणाचे प्रकार पुष्कळ असल्यानें व चांगल्या व वाईट वंगणाच्या बाजारांत बऱ्याच जाती असल्यानें, त्यांच्या किंमतींतही बराच फरक पडतो. तसेंच साधारण मोटरमालकास नेहमींच पैशाची टंचाई भासत असल्यामुळें त्याचा स्वस्त दराचें वंगण वापरण्याकडे जास्त ओढा असतो. या स्वस्त वंगणामुळें मोटरच्या इंजिनावर व इतर भागांवर वाईट परिणाम कितपत होतो, व त्यामुळें मोटर लवकर बिघडून त्यामुळें तिच्या दुरुस्तीचा खर्च किती वाढतो हें काढणें तशा प्रकारची माहिती नसल्यानें कठीण असलें तरी मोटरीवर अशा वाईट वंगणाचा परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं हें मात्र खरें.

(२) दस्तुऱ्या व तरी

दस्तुऱ्या व तरींवर होणारा खर्च " चालू खर्चांत " धरण्यास हरकत नाहीं. कारण मोटरीच्या रोज होणाऱ्या प्रवासावरच हा खर्च अवलंबून असतो. आमच्या संशोधनाच्या वेळीं (१९३२-३३) या भागांत प्रांतिक सरकारच्या दस्तुऱ्या नव्हत्या, म्हणून त्या हिशेबांत धरलेल्या नाहींत. त्यावेळीं फक्त जिल्हा लोकल बोर्डांच्याच काय त्या दस्तुऱ्या होत्या. तेव्हां त्यांचा समावेश येथें करण्यांत आलेला आहे. परंतु या भागांत एकंदर दस्तुऱ्या किती आहेत; त्यांचें रस्त्यांच्या लांबीच्या मानानें प्रमाण काय पडतें, वगैरे गोष्टींची माहिती व्हावी म्हणून आम्हीं इलाखा सरकारच्या दस्तुऱ्या किती व लोकल बोर्डांच्या दस्तुऱ्या किती याविषयीं माहिती मिळविली. त्यावरून असें आढळून आलें कीं, या भागांतील रस्त्यांची एकदर लांबी ३६०० ते ४००० मैल धरली, तर दस्तुऱ्यांचें प्रमाण प्रत्येक २० मैलास एक असें पडतें. एकंदर दस्तुऱ्यांची संख्या १९१ असून त्यापैकीं ११५ इलाखा सरकारच्या व ७६ जिल्हा लोकल बोर्डांच्या आहेत. तऱ्या देखील आम्ही रोज खर्चाचे हिशेबांतच धरलेल्या आहेत.

फक्त कांहीं वाटांवर जेथें मोठ्या नद्यांवरून पूल नाहींत, अशा ठिकाणींच तऱ्या आढळतात. दस्तुऱ्यांप्रमाणेंच तऱ्यांचे दरवर्षी सरकारांतून लिलांव होतात. तऱ्या लिलांवानें घेणाऱ्या इसमास उतारू, वाहनें अगर जनावरें यांजबद्दल भाडें किती घ्यावयाचें याच्या रकमाचे दर ठरवून दिलेले असतात. पण तरीवाला भाडें नियमाप्रमाणेंच घेतो किंवा नाहीं, हें कोणी

पहात नसल्यानें, ठरलेल्या दराप्रमाणेंच भाडीं घेतलीं जातात असें नाहीं. तरी व दस्तुऱ्या यांत फरक आहे. दस्तुऱ्यांवरून होणारी पैशाची वसुली कर म्हणून घेतली जाते. तरीवर घेतलें जाणारें भाडें कर नसून एकीकडून दुसरीकडे नेण्याबद्दल मजुरी म्हणून आकारण्यांत येत. तरीवरील व्यवस्थेसंबंधांत आमचेकडे एक दोन तक्रारी करण्यांत आल्या. त्यांपैकीं एक म्हणजे ठराविक भाड्यासंबंधींची. याबद्दल वर उल्लेख आलाच आहे. दुसरी तक्रार म्हणजे वाट पहावी लागून वेळ फुकट जाण्यासंबंधींची. तरीचे लिलांव पावसाळ्याच्या सुमारास होतात. त्यामुळें पावऱ्यास सुरवात होऊन नदीस एक दोन पूर येईपर्यंत नदी उतरून जाण्याची सोय होत नाहीं. नदीवर नाव व नावाडी असला, तरी एका तीरावर माणसें अगर वाहनें बोलावीत असूनही त्याचे मनांत आल्याशिवाय तो त्यांस पैलतीरास नेऊन पोहोंचवीत नाहीं. साधारण नाव भरेल इतकीं माणसें, जनावरें अगर वाहनें एकत्र होईपर्यंत तो वाट पहात बसतो. अशा वाट पाहण्यानें उतारूंची बरीच कुचंबणा होते.

(३) टायर-ट्यूबवर होणारा खर्च

पेट्रोल व वंगणाचे तेलासारखे खर्च रोजचे असल्यानें त्याबद्दल माहिती मिळविणें कठीण नव्हतें. टायर ट्यूबचें तसें नसतें. वर्षांतून दोन, तीन अगर चार वेळा या बदलाव्या लागत असल्यानें, त्यांस महिन्यास खर्च किती लागतो, असें विचारल्यास बहुतेक मोटर मालकास नक्की आंकडा सांगता येत नाहीं. यासाठीं सर्वेक्षण वर्षास एकंदर किती खर्च येतो, त्याविषयीं माहिती मिळवून ती बऱ्याच लोकांच्या माहितीशीं ताडून पाहून आम्हीं आंकडे घातले आहेत. मोटर बसांच्या टायर ट्यूबच्या किंमती साधारणपणें सारख्याच असतात. आम्हीं जमविलेल्या माहितीवरून असें आढळून आलें कीं, मागची टायर-जोडी साधारणपणें १०,००० मैल टिकते व पुढची जोडी १५००० मैल टिकते.

(४) दुरुस्ती खर्च

त्याचे नक्की आंकडे मिळावयाचे झाल्यास मोटर-मालकांचे बऱ्याच वर्षांचे हिशेब पाहावयास पाहिजेत; तसे हिशेब एक तर फारसे मोटर-मालक ठेवीत नाहींत. जे ठेवतात त्यांचे जवळील हिशेब सुव्यवस्थित नसतात. अशा अडचणींमुळें आम्हांस यासंबंधांत हवी तशी माहिती मिळाली नाहीं. दुसरें असें कीं, पुष्कळसे लोक वर्षभर नेहमींच आपल्या गाड्या चांगल्या स्थितींत बाळगीत नाहींत. वर्षांतून एकदां अगर दोनदां म्हणजे मोटरींची तपासणी होते त्यावेळीं मोटरींची ते दुरुस्ती करतात. मोटर दुरुस्तीचे बाबतींत बऱ्याचशा मालकांचे किंवा ड्रायव्हरांचें धोरणच असें असतें कीं, मोटर कांहीं कारणानें चालेनाशी होईपर्यंत किंवा वाटेवर मोडून पडेपर्यंत तिच्याकडे दुरुस्ती करण्याच्या नजरेनें पहावयाचेंच नाहीं. या धरसोडीचें वृत्तीमुळेंच बऱ्याच मोटरी फार लवकर खराब होतात. वर्षांतून एक किंवा दोन वेळींच, म्हणजे तपासणीचे वेळींच काय तो मोटरदुरुस्तीवर मोठा खर्च होतो. या खर्चासंबंधींचे जे आंकडे आम्हांस मिळाले त्यांवरून या सदराखालीं दिलेली माहिती घेतलेली आहे. मोटरमालकांनीं वर्षाचे किंवा सहामाही खर्चाचे जे आंकडे सांगितले त्यावरून दरमहा खर्चाचे आंकडे बसविले आले. वस्तुस्थिति-निदर्शक म्हणून हे आंकडे कितपत उपयुक्त ठरतील हें मात्र सांगतां येत नाहीं.

(५) एजंटांची दलाली

वाहतूक ज्यावर अवलंबून असते असे उतारू किंवा माल हे बहुतेक सर्वच ठिकाणीं एजंटांचे वतीनें मिळविले जातात. यासंबंधांत "वाहतुकी" वरील प्रकरणांत जास्त माहिती दिलेली आहे. एजंटांना दलाली म्हणून त्यांनी मिळवून दिले-

ल्या भाड्यापैकीं रुपयांत १ आणा कापून द्यावयाचा असतो.

(६) पगार

आतांपर्यंत आलेल्या बाबींचा स्थूल-मानानें " चालू खर्च " या सदरांत समावेश केला; कारण मोटरींच्या रोजच्या प्रवासाच्या मानानें या खर्चांत फेरबदल झालेला दिसून येतो. आतां दुसऱ्या म्हणजे कायम खर्चाचा विचार करूं. या सदरांतील मुख्य बाबी म्हणजे पगार, गाडीखाना, चाकपट्टी, परवान्याची व मोटर दाखल करण्याची फी, व मोटरी पास करून घेण्यास लागणारा खर्च इत्यादि. पगाराच्या बाबींत ड्रायव्हर व क्लीनरांचे पगारच बहुतेक ठिकाणी मोजतात. ज्यांची स्वतःची कचेरी वगैरे आहेत, असे फारच थोडे मोटर मालक असतात. ज्या ठिकाणीं एकादा कारकून ठेवून कचेरी उघडलेली असते तेथें एजंटाचें उच्चाटण झालेलें असतें. इतर बहुतेक सर्व स्वतः गाडी हाकून एकादा क्लीनर हाताखालीं ठेवतात, किंवा ड्रायव्हर व क्लीनर ठेवतात. कचेरी असेल तेथें कारकूनच एजंटाचें काम करितो. त्याला एजंटाचा परवाना मिळवून दिला म्हणजे झालें. आम्हीं एकंदर १५५ प्रश्नावल्या भरल्या त्यांपैकीं ७६ प्रश्नावल्यांत कचेरी खर्च निराळा दाखविलेला आढळला नाहीं.

ड्रायव्हर व क्लीनरच्या पगारांत कोणत्याही प्रकारची प्रमाणबद्धता नाहीं. दिवसेंदिवस हें पगाराचें प्रमाण कमीकमीच होत चाललेलें दृष्टीस पडतें. आमच्या प्रश्नावल्यावरून ड्रायव्हरास दिला जाणारा सर्वांत जास्त पगार ६० रु. महिना व कमींत कमी २५ रु. महिना असलेला दिसून आला. क्लीनरच्या पगारांत जास्तींत जास्त रु. २० व कमींत कमी रु. ८ असें प्रमाण आढळून आलें. क्लीनर, ड्रायव्हरच्या मदतीसाठीं व मोटर स्वच्छ ठेवण्यासाठीं म्हणून ठेविलेला असतो. परंतु या दोन कामाव्यतिरिक्त वाटेंत भाडेंवसुली करणें, उतारू वर घेणें व खालीं उतरविणें, गाडी वाटेंत कोठें उभी करावयाची याबद्दल ड्रायव्हरास इशारा करणें, वगैरे कामेंही त्यास करावीं लागतात. ड्रायव्हर क्लीनरचें वर्तन मासिक असतें. क्वचित् प्रसंगी बाहेर गांवीं मुक्काम (रात्रीचा) करावा लागल्यास त्यांस भत्ता देतात. परंतु जेथें नेहमींच असा मुक्काम करावा लागतो, तेथें भत्ता वगैरे मिळणार नाहीं, अशीच बहुतेक ठिकाणीं बोली करून घेतलेली असते.

ज्या ड्रायव्हरांची नोकरी बरेच दिवस झालेली असेल किंवा ज्यांच्यावर त्यांच्या मालकांची विशेष मर्जी असते, अशा ड्रायव्हरासमालक वर्षाकाठीं ड्रायव्हरास लागणारा पोषाख व परवान्यास लागणारे पैसे वगैरेही देतात. मात्र ही पद्धत सर्वत्र रूढ नाहीं.

(७) भाडें

भाड्याची बाब फक्त मोटर ठेवण्यासाठीं लागणाऱ्या गाडीखान्यापुरतीच असते. कचेरीभाडें बहुतेकांस लागत नाहीं कारण बरेच लोक कचेरी ठेवीतच नाहींत. कांहीं गांवांतून (विशेषतः पुण्यासारख्या ठिकाणीं) कांहीं मोटरबसवाले एकत्र होऊन एक कचेरी थाटतात. पण अशा कचेऱ्यांतून बऱ्याच बसमालकांचा समावेश होत असल्यानें, त्यांपैकीं कोणासच भाड्याच्या रूपानें फारसा पैसा द्यावा लागत नाहीं. मोठ्या शहरांतून गाडीखान्याचे भाडें बरेंच भरावें लागतें. कित्येक वेळां एका मोटरीमागें महिन्याचे १० रुपयेपर्यंत भाडें गाडीखान्यासाठीं खर्च करावें लागतें. लहान गांवांतून गाडीखान्याचा खर्च फारसा येत नाहीं. कित्येक ठिकाणीं मोटर सहज मागील परसांत किंवा आंगणांत ठेवतां येते.

(८) कर

खालीं दिलेल्या कोष्टकांत जेथें जेथें चाकपट्टी द्यावी लागते, तेथें ती रक्कम वेगळी दाखविली आहे. चाकपट्टीबद्दलची सविस्तर माहिती इतरत्र दिली आहे. तसेंच परवान्याची फी किंवा नोंदणी फी यासं-

बंधानेंही त्याच प्रकरणांत उल्लेख सापडेल. मोटर पास करून घेणें किंवा नोंदण्याचे वेळीं सरकारी फीखेरीज कांहीं खर्च येतात, ते कशा प्रकारचे असतात याची फोड करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. त्यांचें प्रमाणही पण ठराविक असतें. तसेंच मोटर पास करून घेण्यासाठीं डी. एस. पी. ची कचेरी ज्या गांवीं असेल तेथें मोटर न्यावी लागते. अशा वेळीं होणारा खर्चही हिशेबांत धरावा लागतो. मोटर नेण्याआणण्यांत वेळेचा अपव्यय व उत्पन्नांतील घट तर सोसावीच लागते, परंतु त्याबरोबर जाण्यायेण्याचा निदान ३-४ मंडळींचा खर्च, पेट्रोलचा खर्च व खाण्याचा खर्च इतकें सर्व सहन करावें लागतें. फेर नोंदणी मिळविण्याची फी जरी फक्त मोटरीमागें एक रुपायाच असली तरी या वेळेस अशा प्रकारचा इतर खर्च मात्र फार होतो.

(९) किरकोळ खर्चाच्या बाबी

वर सांगितलेल्या प्रकाराव्यतिरिक्त जे इतर कांहीं खर्च आढळले, ते किरकोळ बाबीखालीं घातले आहेत. कचेरीचा कांहीं खर्च, कारकुनाचे पगार, स्टेशनरी, टिकिटाची कूपनबुकें इ. खर्च यांतच आढळतील. किरकोळ खर्चाच्या सदरांतील सर्वांत मोठी बाब "दक्षिणा" म्हणून असते. दर वर्षी या बाबींत प्रत्येक मोटरमालकाचे बरेचसे पैसे खर्च होतात असें आम्हांस आढळून आलें. दर मोटरीमागें महिन्यास निदान १०-१५ रुपये तरी यांत खर्ची टाकावे लागतात. जेथें संघ आहेत, तेथें या बाबींत प्रत्येक मालकास खर्च कमी येतो.

सोबत घातलेलीं कोष्टकें जरा बारकाईनें पाहिल्यास असें आढळून येईल कीं, मोटरीवर होणाऱ्या दर मैली खर्चांत मोटरी-मोटरींत महदंतर असलेलें आढळतें. असें असण्यास खरें पाहिलें असता कांहीं कारण नाहीं. साधारणपणें सर्व मोटरी सारख्याच असतात. त्या सारख्याच मार्गांवरून प्रवास करितात; सर्वच मोटरींची एकंदर परिस्थिति सारख्याच प्रकारची असते; असें असतांना एकाच मार्गावर चालणाऱ्या दोन अगर जास्त मोटरींच्या दर मैली खर्चांत फरक पडतो तो कां पडावा ? महाराष्ट्रांतील कोंकण जिल्हे सोडल्यास इतर जिल्ह्यांतून १½ टन बसा वापरतात. कोंकणांत ½ टन बसा जास्त वापरतात. असें असून मोटरींचा दर मैली खर्च २॥ पासून ४॥ आण्यांपर्यंत कां यावा हें समजणें जरा कठीण जातें. विचाराअंतीं खालीं दिलेल्या ३-४ गोष्टी यास कारणीभूत असाव्यात असें आढळलें. (१) प्रत्येक मोटर बस कितपत चांगल्या स्थितींत आहे, (२) रस्ते कितपत चांगले आहेत (३) रस्त्यावरून दस्तुऱ्या व तऱ्यांचें प्रमाण, किंवा चाकपट्टीचें प्रमाण, (४) मोटर मालकाच्या एक किंवा एकाहून जास्त गाड्या व (५) दररोज प्रत्येक गाडीचा किती मैल प्रवास होतो यांचें प्रमाण इ. आम्ही मिळविलेली माहिती फार अपुरी असल्यानें यांपैकीं कोणत्या कारणांस जास्त महत्त्व द्यावें हें नक्की सांगतां येणार नाहीं.

(iv) मोटरींची झीज, व्याज व विम्याच्या बाबी

येथपर्यंत मोटर मालक ज्या खर्चांस नित्य अगर नैमित्तिक मोजतात, अशा प्रकारच्या बाबींसंबंधीं विचार केला. परंतु या व्यतिरिक्त मोटरींची होणारी झीज, धंद्यांत घातलेल्या भांडवलावरील व्याज, व विम्याचे हप्ते यावर होणाऱ्या खर्चासंबंधींहि थोडाफार विचार करणें आवश्य आहे. या बाबींसंबंधांत मोटरमालकांपैकीं बहुजन समाज मुळींच हिशेब ठेवित नाहीं. याला कारणें काय असतील तीं असोत परंतु या बाबी इतर खर्चांच्या बाबींइतक्याच महत्त्वाच्या आहेत, हें सांगणें जरूर आहे. आणि हे खर्च इतर खर्चांत धरल्याशिवाय मोटरधंद्यांत फायदा किंवा नुकसान किती होतें हें सांगणेंही पण अशक्य आहे.

दर दिवशीं, महिन्यांत किंवा वर्षांत

मोटरीची झीज किती होते, हें सांगणें शक्य नाहीं. कारण मोटर एकंदर किती वर्षें चालते किंवा तिची दिवसेंदिवस किती झीज होते, यासंबंधींची माहितीच मुळीं कोणी ठेवीत नाहीं. यासंबंधांत आम्हांस फक्त एकाच सुसंघटित मोटर कंपनीकडून माहिती मिळाली. या कंपनीच्या चन्याच ८.सा असून, त्यांनीं मोटर साधारण किती दिवस चालते वगैरे संबंधीं तक्ते तयार केलेले आहेत. त्यांच्या अनुभवावरून असें आढळून येतें कीं, प्रत्येक मोटर वर्षांतून ३२७ दिवस प्रवास करिते व तिचा एकंदर प्रवास २५३०० मैल होतो. म्हणजे सरासरी रोजचा प्रवास ७८ मैल होतो व मोटरींचें आयुष्य साधारणपणें ४॥ वर्षें असतें. या कंपनीचें स्वतःचें दुरुस्ती खातें असून सर्व मोटरी नेहमीं सुस्थितींत राहात असल्यानें, त्यांच्याकडून मिळालेले हे आंकडे फार महत्त्वाचे आहेत. या भागांतील सर्वच मोटर-मालक स्वतःच्या मोटरींची इतकी काळजी घेत असतीलसें संभवत नाहीं. इतर मालकांच्या मोटरी वर्षांतून किती दिवस चालतात, वर्षांतून त्यांच्या एकंदर किती खेपा व किती मैलांचा प्रवास होतो हें सांगतां येत नाहीं. कारण निरनिराळ्या सर्व्हिससेस निरनि. राळ्या लहान मोठ्या वाटांवरून चालतात व त्या त्या वाटांवरील उतारूंच्या गरजांप्रमाणें मोटरींच्या खेपा होतात. जे मालक स्वतःच मोटर चालवितात, त्यांच्या प्रवासांच्या दिवसांचें प्रमाण इतरांहून अधिक असतें, असें आमच्या संशोधकांस दिसून आलें. एका मोटर मालकानें तर १८ महिने सतत जवळ जवळ दररोज मोटर चालविली असें आढळून आलें.या सर्व काळांत एका अपघातामुळें मोटर दुरुस्तींत त्याचे तीनच दिवस काय ते फुकट गेले. एका मोटरीच्या धंदेवाईक कंपनीनें ठेवलेल्या माहितीवरून असें आढळून आलें कीं, जे मोटरमालक स्वतःच मोटर चालवितात, त्यांच्या वर्षांतील कामाच्या दिवसांची सरासरी ३५० पर्यंत पडते. जेथें पगारी ड्रायव्हरांकडून मोटरी चालविण्यांत येतात तेथें हें सरासरीचें प्रमाण वर्षांत ३२० दिवसांपर्यंत खालीं उतरलेलें आढळतें; आणि कांहीं ठिकाणीं तर मोटरींचें वर्षांत एकंदर फक्त२९० दिवसपर्यंत काम पडल्याचें आढळून येतें. इतर देशांत देखील मोटरींचें आयुष्य किती असतें; त्यांची झीज कोणत्या प्रमाणांत होते; वगैरे बाबींसंबंधांत एक मत झालेलें नाहीं. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत मोटरबसचें आयुष्य साधारणपणें ४ वर्षें धरण्यांत येतें; म्हणजे शेंकडा २५ प्रमाणें झिजीचें दरवर्षीचें प्रमाण धरलेलें असतें. वर सांगितलेले आपल्या इकडील अनुभवही साधारणपणें हेंच दर्शवितात. हें प्रमाण धरल्यास प्रत्येक मोटरी मागें दरमहा रु. ६० झीज म्हणून सोडून द्यावयास पाहिजेत. (येथें मोटरींची किंमत रु. ३००० धरलेली आहे.)धंद्यांत गुंतविलेल्या भांडवलावरील व्याजाचा दर शें. ९ धरल्यास या रकमेंत दरमहा रु. १५ ची व्याजाची म्हणून भर घालावयास पाहिजे.

या भागांत विम्याची सक्ती अशी १-२ जिल्ह्यांतूनच आहे, व जेथें विमा काढावा लागतो तेथें तो फक्त त्रयस्थाच्या धोक्याबद्दलचा म्हणून असतो. जें सरकार दस्तुरीच्या रूपानें कित्येक मोटरवाल्यांकडून दर महिन्यास १०० रु. वसूल करूं शकतें, त्यास विमा सक्तीचा करून मोटर-मालकांस दर वर्षास जवळ जवळ रु. १०० पर्यंत खर्चांत घालण्यास फारशी अडचण पडावी असें वाटत नाहीं. मोटरीवर होणाऱ्या सर्व खर्चांची मांडणी करावयाची झाल्यास, त्यांत विम्याच्या रकमेस स्थान देणें आवश्यक आहे. हिशेबास पूर्णता यावी म्हणून आम्हीं विम्याच्या रकमेचा एकंदर रकमांत समावेश करतों. केवळ त्रयस्थांच्या विम्याबद्दल रु. १०० सालिनाच सरासरी खर्च येईल. पण वास्तविक मोटरीचा व हाकणाऱ्याचाही विमा जमेस धरला पाहिजे. अशा विम्याच्या रकमेचा समावेश केल्यास मोटर मालकास प्रत्येक मोटरीमागें वर्षास२५० रु. पासून ३०० रु. पर्यंत म्हणजे दरमहा

२० ते २५ रु. खर्च येईल. म्हणज मोटरीची झीज, धंद्यांत गुंतविलेल्या भांडवलावरील व्याजाची रक्कम व विमा या हिशेबांत न दाखविलेल्या अशा तीन रकमांचे दरमहा रु. १०० एकंदर हिशेबांत चालावे लागतील, व हे मिळविल्यानंतर खर्चाची जी एकंदर रक्कम येईल ती उत्पन्नाचे रकमेंतून वजा करून जी शिल्लक राहील ती ऐन नफा म्हणून समजतां येईल.

(v) धंद्यांतील नफा

या सोबत २१ मोटर मालकांकडून मिळालेल्या माहितीवरून तयार केलेले हिशेबाचे तक्के जोडलेले आहेत. त्यांतील खर्च उत्पन्नाचे बाबींसंबंधानें आतांपर्यंत विचार केला. मोटरधंद्याकडे पाहतां या धंद्यांत सध्यां फायदा होतो कीं नाहीं व होत असल्यास किती होतो, असा प्रश्न पुष्कळांस साहाजिकच पडतो; याच दृष्टीनें आम्हींहि पण यासंबंधीं विचार करण्याचें ठरवून हा अभ्यास केला. सोबत दिलेल्या २१ तक्त्यांवरून फायदा होतो किंवा नुकसान होतें हें ठरविणें शक्य होणार नाहीं; व तसें करण्याचा कोणी प्रयत्नही पण करूं नये. कारण या २१ तक्त्यांवरून इतर शेंकडो मोटरमालकांच्या धंद्यांतील सध्यांच्या स्थितीची माहिती होणार नाहीं. शिवाय हे तक्के वाचनांना आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवावयास पाहिजे. तक्त्यांत दिलेले खर्च-उत्पन्नाचे आंकडे संबंध बारा महिन्याचे नसून, माहिती मिळविण्यास गेलें असतांना, त्यापूर्वीच्या आठवड्याच्या, महिन्याच्या किंवा तीन अगर सहा महिन्याच्या हिशेबाचे ते आंकडे आहेत. बरेचसे मोटर-मालक कोणत्याच प्रकारच्या हिशेबाच्या वह्या ठेवीत नसल्यानें त्यांच्याजवळ असतील त्या नोंदवहीवरून किंवा प्रसंगीं तिकिटांच्या पुस्तकांवरून देखील आमच्या संशोधकास हे आंकडे काढावे लागले. शिवाय ज्या कांहीं थोड्या दिवसांचे हे आंकडे मिळाले, त्या दिवसांत मोटरी बंद पडलेल्या नसून, वाहतुक चांगली असून पैसे मिळविण्याचे ते दिवस होते. आठवड्याचे किंवा महिन्याचे हिशेबांत वर्षांतून मोटर स्वस्थ पडून राहिलेल्या दिवसांसंबंधीं माहिती नसते. तसेंच मोटर-दुरुस्तीस वर्षांतील कांहीं दिवस जातात त्यासंबंधानेंही यांत उल्लेख नसतो. म्हणून इशारा द्यावयाचा तो इतकाच कीं, या तक्त्यांवरून कांहीं मोटरमालकांस हा धंदा बराच किफायतशीर होतोसा दिसला, तरी सबंध वर्षांत तशीच त्याची परिस्थिति असेल असें समजणें चुकीचें होईल. हिशेबांत कांहीं बाबींचा विचार केलेला नाहीं. त्यावर होणारा खर्च तक्त्यांतील खर्चांत मिळवावयास पाहिजे. विमा, रकमेवरील व्याज, व झीज यांत होणाऱ्या खर्चाची रक्कम तक्त्यांतील रकमेंत मिळवून हिशेब वाचले असतां, असें आढळून येईल कीं, २१ पैकीं फक्त ११ मोटर मालकांस धंद्यांत थोडा तरी कायदा पडला. इतरांस होत नाहीं. या ११ तही कांहींजणास तो बराच किफायतशीर झालेला आढळून येतो. ज्यांना ज्यांना धंदा असा किफायतशीर झालेला आढळतो, त्यांची परिस्थिति या धंद्यांतील सामान्य मोटरमालकांपेक्षां बरीच निराळी आहे. यापैकीं एका मोटरमालकाची सह्याद्रि मोंगलाईच्या कांहीं वाटांवरून असून, त्या वाटांवर त्यास चढाओढ मुळीं करावीच लागत नसल्यानें, भाडीं बरींच जास्त आकारतां येतात, व त्यामुळें त्यांस फायदा होतो. दुसऱ्या एका मालकाच्या ६ मोटरीपैकीं १ च मोटरच्या हिशेबाचा तक्का दिलेला आहे. ही मोटर फार लांबचा प्रवास करून तिला दररोज थेटपर्यंतचे येताजातांचे प्रवासी मिळाल्यानें फायदा झाला. कांहीं मोटरींचे हिशेब भर रहदारीच्याच दिवसांतील मिळाल्यानें, ते बऱ्याच नफ्याचे दिसले तरी त्या मोटरीस बारमहा असाच नफा होतो असें धरून चालतां येत नाहीं. इतकें मात्र खरें कीं, जे लोक आपले हिशेब नीट ठेवतात, पैसे मिळवितांना कशा अडचणी येतात, पण तोच पैसा खर्च मात्र किती तऱ्हांनीं होतो,

मोटरी वारंवार कां मोडतात, वगैरे वगैरे गोष्टींवर बारकाईनें नजर ठेवून उत्पन्न-खर्चाचा मेळ बसविण्याचा प्रयत्न करितात, त्यांसच या धंद्यांत थोडा फार नफा होतो. इतरांस नफा तर होत नाहींच; परंतु कांहीं दिवसानंतर नुकसान आलेलें मात्र आढळून येतें. ज्या वाटांवरून मोटरींची ।।पसांतील चढाओढ कमी, ज्या लोकांचें धंद्यांत लक्ष जास्त, जे लोक आपले हिशेब चोख ठेवतात, अशा लोकांसच जास्त फायदा होण्याचा संभव असतो.

(vi) मोटर मालकांची त्या मोटर धंद्यांतील आयुर्मर्यादा.

मोटरीच्या धंद्यांत नुकसान होतें किंवा फायदा होतो हें ताडून पहाण्यास आम्हीं दुसरी एक उपाययोजना केली. आमच्या प्रश्नावलींत प्रत्येक मोटर-मालकानें धंद्यांत किती वर्षें घालविलीं याविषयीं एक प्रश्न घातला होता. एकंदर १५५ पैकीं १४१ लोकांनीं या प्रश्नास उत्तर दिलें. त्यांच्या उत्तरांवरून खालील कोष्टक तयार केलें आहे.

धंद्यांत किती वर्षें घालविलीं हें दाखविणारा तक्ता

धंद्यांत किती वर्षें घालविलीं	१ वर्ष	२ वर्षें	३ वर्षें	४	५	६	७	८ किंवा जास्त	एकंदर
मोटर मालक	१२	३५	२९	१९	१२	७	८	१९	१४१

या तक्त्यावरून धंद्यांतील नफातोट्या-संबंधीं फारसा बोध होईल किंवा नाहीं, याविषयीं जरी कांहीं निश्चित सांगतां आलें नाहीं तरी, एक गोष्ट सिद्ध होते ती ही कीं, मोटर-मालकांच्या एकंदर संख्येपैकीं शें. ५३ लोक धंद्यांत ४ वर्षांहून अधिक राहिलेले नाहींत. धंद्यांत ८ किंवा त्याहून जास्त वर्षें ज्यांस झालीं आहेत, अशांचें प्रमाण तर शें.१३ च पडतें. एकंदरींत असेंच आढळून येण्याचा संभव जास्त कीं, या धंद्यांत नवशिक्यांचें प्रमाण बरेंच अधिक असून ज्यांनीं बरींच वर्षें यांत घालविलीं आहेत अशांची संख्या फारच कमी. मोटर-मालकांचे तोंडूनच मिळालेल्या माहितीवरून खालील ४-५ गोष्टी सांगतां येण्यासारख्या आहेत. त्यांवरून धंद्याच्या परिस्थितिसंबंधीं कल्पना येईल. १९२२ ते १९२५-२६ पर्यंतच्या काळांत मोटर धंद्याची चांगली भरभराट होती. ज्यांनीं धंद्यांत ८ वर्षांवर दिवस घालविले; त्यांच्याजवळ १९३२-३३ सालीं जितक्या मोटरी होत्या त्यापेक्षां १९२५-२६ च्या शेवटीं जास्त होत्या. १९२६-२८ च्या काळांत धंदा खालावत चालल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. १९२८ सालापासून तर खरोखर धंद्यास उतरती कळा लागली, असें सर्व जण एकमतानें सांगतात. १९२५ सालीं ज्यांच्याजवळ १० ते २५ पर्यंत मोटरी होत्या त्यांच्याजवळ आज ५-१० मोटरीही नाहींत, यावरून सद्यःपरिस्थितीची कल्पना येईल. अर्थात् ही माहिती स्थूल मानानें सांगितली. अलीकडील दिवसांतहि भरभराट झाल्याचीं कांहीं उदाहरणें आहेत, पण तीं अत्यल्प अशींच आहेत.

प्रत्येक मोटरीवर एका महिन्यांत किती

अनुक्रम	चालू खर्च				दलालाचें कमिशन
	पेट्रोल	ल्युब्रिकंटस्	टायर्स व ट्यूब्स	इतर चालू खर्च	
	रु. आ.	रु. आ.	रु. आ.	रु आ.	रु. आ.
१	१७८–२	१२–०	१००–०	४४–४	२६–०
२	२८५–०	१७–८	१५०–०	३१–१३	४९–१४
३	३३७–८	३२–०	१७५–०	४९–७	८१–०
४	१३८–१२	८–०	९५–१२	३६–१	३४–०
५	४१६–४	५२–८	२८३–४	९८–०	१०–०
६	२२०–२	२०–०	४६–१०	६०–०	१३–०
७	२१३–१२	१८–०	७०–०	४१–१५	६३–०
८	७८–६	७–८	५०–०	३०–०	२७–१०
९	१५५–१४	९–०	७५–०	३१–११	.....
१०	३६५–१०	२२–८	३००–०	७५–८	६८–८
११	५८७–१३	४०–८	१८७–८	६६–९	१२९–३
१२	९६१–१४	९०–०	७५०–०	१११–१५	१६७–०
१३	३४६–१४	३३–१२	२००–०	२३–१	१३–५
१४	२१३–१२	२०–०	१५०–०	४०–०	६९–०
१५	३०३७–८	३००–०	१६६६–४	२५०–०	१०५–०
१६	३६०–१५	२४–८	२००–०	६६–१०	९९–०
१७	५५६–१४	४२–०	३००–०	११२–८	१४६–१०
१८	१७२–८	१३–८	८३–५	२८–१३	.....
१९	१३१६–४	१०३–०	३६८–८	११२–८	१२९–४
२०	३५६–४	२१–०	३००–०	६५–१०	१०३–७
२१	१३१६–६	१२५–०	४७४–०	२०८–४	२८४–१२

खर्च होतो हें दाखविणारा तक्ता.

पगार		कर व किरकोळ				
हांकणारा	मदतनिस	तबेला टोल		चाकपट्टी	परवाना	किरकोळ
रु. आ.	रु. आ.	रु. आ.	रु. आ.	रु. आ.	रु. आ.	रु. आ.
.....	१२–०	१२–०	३०–०	३–०	६–०	१५–०
.....	१०–०	१०–०	९०–०	३–०	६–०	२२–०
४५–०	१३–०	९–०	४५–०	७–८	६–०	३३–४
४५–०	१०–०	.. ...	३०–०	२४–८	८–५	१८–०
१००–०	१६–०	.....	९०–०	४६–०	८–६	३०–०
८०–०	२४–०	१३–०	१२०–०	५–८	१२–८	६०–०
.....	११–०	.....	३७–८	.....	५–०	२०–०
.....	८–०	.....	३७–८	.....	५–०	१५–०
४५–०	१०–०	.....	३७–८	.....	५–०	१२–०
८०–०	२०–०	१५–०	६७–८	४–०	१३–०	१५–०
१२०–०	३०–०	.....	९०–०	६–०	१८–०	६०–०
१५०–०	३६–०	१८–०	.....	६–०	३३–०	२२–८
४२–८	११–०	२–८	५२–८	२–८	११–०	१५–०
७५–०	२०–०	१०–०	४५–०	१५–०	२२–०	१२–०
४००–०	१००–०	३०–०	३००–०	४१–११	१७०–१०	१३१–९
८०–०	२२–०	१७–०	६०–०	८–५	१७–८	२७–०
१२०–०	३०–०	१७–१	१३५–०	६–०	२६–४	४५–०
३०–०	१०–०	.....	३०–०	२–०	६–१०	१०–०
१७५–०	५०–०	१५–०	२७०–०	२२–८	२५–०	५०–०
४०–०	१८–०	१०–०	६०–०	४–३	१०–५	२५–०
१७५–०	५०–०	.....	३३०–०	५२–१	२५–०	५१–१०

प्रत्येक मोटरीचा रोजचा सरासरी प्रवास, मासिक उत्पन्न, दर मैलास पडणारें उत्पन्न व खर्च दाखविणारा तक्ता

अनुक्रम नंबर	बसांची संख्या	रस्त्याचें अंतर	प्रत्येक बसचा रोजचा सरासरी प्रवास	एकंदर मिळकत	एकंदर खर्च	प्रत्येक बसचे मैली सरासरी उत्पन्न	मैली सरासरी खर्च	मैली पेट्रोलचा खर्च
				रु. आ.	रु. आ.	आ. पै	आ. पै	आ. पै
*१	१	२२	७०	३९०–५	४३८–६	३–०	५–०	१–४
*२	१	६९	१४०	८०५–९	६७५–३	३–१	२–६	१–१
३	१	७२	१५०	१३०५–७	८३३–११	४–७	३–०	१–२
४	१	३१	६५	५५०–०	४४८–६	४–६	३–९	१ १
५	३	१० १४ १०	४०	१२५२–८	११५०–६	५–७	४–३	१–१०
६	२	२५	५०	९१३–९	१०४४–१२	४–१०	२–९	१–२
७	१	४६	९२	१००७–४	४८०–३	५–१०	२–९	१–२
*८	१	१७	३५	४४२–०	२५९–०	६–९	४–०	१–२
*९	१	३२	६५	४४२–०	३८१–१	३–७	३–०	१–३
१०	२	४२ ४२	९०	११०१–१	१०४६–२	३–३	२–६	१–१
११	३	२४	९६	२०८५–०	१३३५–९	३–१०	३ ०	१ १
१२	३	६९	१४०	२६७१–१५	२३४६–५	३–४	४–०	१–२
१३	२	१६१	१६१	१४११–०	९९४–०	४–८	४–०	१–१
१४	२	२२ २२	४५	११०९–१२	६९१–१२	६–७	४–०	१–३
१५	१०	७२ ४२ २० १७	९४	९८८९–३	६५३२–१०	५ ७	४–३	१–८
१६	२	४२ ४०	८५	१५८२–०	९८२–१४	४–११	३–०	१–१
१७	३	४२	८५	२३४५–१४	१५३७–५	५–०	३–३	१–१
१८	१	२६	५५	५५५–७	३८६–१२	३–१०	३–९	१–८
१९	५	१२ ५० २०	५५	२८६७–२	२६३७–०	५–७	५–२	२–६
२०	२	२४	७२	१६५५–१	१०१३–१३	५–१०	३–९	१–३
२१	५	५७ ३० ३६	१२७	४५६३–०	३०९२–८	३–१०	२–७	१–१

* मालक गाडीवान.

प्रकरण ६ वें

वाहतुकीच्या साधनावरील कर व रस्त्यावर होणारा खर्च

गेल्या दहा पंधरा वर्षांत मोटर वाहतुकीस योग्य अशा रस्त्यांची वाढ या सहा जिल्ह्यांत फारशी झालेली नाहीं हें उघड आहे. १९२३ सालीं सरकारनें प्रसिद्ध केलेल्या मोटर रस्त्यांच्या नकाशाची आजच्या परिस्थितीशीं तुलना केली असतां हें स्पष्ट दिसून येईल; एवढेंच नव्हे तर या रस्त्यांची डागडुजी पूर्वीइतकीही आज ठेवली जाते किंवा नाही याची शंका आहे. कारण मोटर वाहतूक झपाट्यानें वाढल्यामुळें रस्त्यांची खराबी फार होत राहते; पण त्या मानानें रस्तेदुरुस्तीवर खर्च वाढलेला दिसत नाहीं.

प्रांतिक सरकार, म्युनिसिपालट्या, जिल्हा बोर्ड व तालुका बोर्ड, यांजकडे निरनिराळ्या रस्त्यांचा कारभार या रस्त्यांचे महत्त्वानुसार वांटलेला असतो. तालुका बोर्डाकडे सोंपविलेले रस्ते बहुतेक मोटर वाहतुकीस योग्य असे नसतात, व तालुका बोर्डाचें उत्पन्न बरेचसें जिल्हा बोर्डाकडूनच येतें, तेव्हां याबाबत तालुका बोर्डाच्या सांपत्तिक स्थितीचा विचार निराळा करावयाची जरूरी नाहीं.

१९३०–३१ ते १९३२–३३ या तीन वर्षांत रस्ते-दुरुस्ती, सुधारणा व रस्त्यांबाबत नवीन कामें करणें, या कामावर प्रांतिक सरकार, म्युनिसिपालट्या व लोकल बोर्डे यांनीं सरासरीनें दरवर्षी ११४३,१४३३ आणि ८५७ हजार रुपये, एकूण २४३३ ह. रु. खर्च केला. मोटरी व सर्व प्रकारची वाहतूक यांजवर लादलेल्या निरनिराळ्या कराच्या रूपानें म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डे यांस याच कालावधींत १४९ व २३७ हजार रुपये, एकूण ३८६ हजार रुपये वार्षिक प्राप्ति झाली. प्रांतिक सरकारच्या करांच्या उत्पन्नाचे आंकडे जिल्हावार मिळत नसल्यामुळें, या सहा जिल्ह्यांतून प्रांतिक सरकारास मोटर वाहतूक करांतून काय मिळालें असावें, याचा नक्की आंकडा देणें शक्य नाहीं, पण नोंदणी फी, परवाना फी वगैरे बाबींवरील सहा जिल्ह्यांतील उत्पन्न अंदाजी २ लाख रुपये असावें. एकंदर रस्त्यांवरील खर्च २३·४ लक्ष रुपये व मोटर करांचें उत्पन्न ५·८ लक्ष रुपये असा हा हिशेब झाला. १९३१–३२ सालीं प्रांतिक रस्त्यांवर दस्तुऱ्या नसल्यामुळें त्यांचें उत्पन्न वरील आंकडयांत जमेस धरलेलें नाही तें या सहा जिल्ह्यांत सरासरीनें ७ ते ८ लक्ष रुपये असावें. तें धरूनही मोटर व वहातुकीवरील करांचें उत्पन्नांतून रस्त्यांवरील खर्च भागत नाहीं हें उघड आहे.

रस्तेदुरुस्ती व रस्ते सुधारणा यांचा खर्च विशेषतः गेल्या दहा बारा वर्षांत फार वाढला आहे व तो सर्व मोटर वाहतूक वाढल्यामुळें, करांचें उत्पन्नही वाढलें आहे. पण खर्च व उत्पन्न वाढ ही सर्व प्रकारच्या सरकारी संस्थाची सारख्याच प्रमाणांत झाली नाहीं. प्रांतिक सरकारास १९२३-२४ सालीं रस्तेदुरुस्तीचा खर्च ९ लक्ष रुपयांहून थोडा कमी पडला, तर १९३०-३१ सालीं तो ११ लक्षांहून कांहींसा जास्त होता. अलीकडील कांहीं वर्षांत पैशाच्या टंचाईमुळें तो पुन्हां ९ लक्ष रुपये, किंबहुना त्याचे खालींही आला आहे. म्हणजे प्रांतिक सरकारच्या खर्चांत म्हणण्यासारखी वाढ झालेली नाहीं. मोटर वाहतूक वाढल्यामुळें मध्यंतरी म्हणजे १९२६–२७ सालपावेतों प्रांतिक सरकार रस्त्याचा पृष्ठभाग अगर पूल रपेट इ. सुधारणा यांकडे बराच पैसा खर्च करीत असे; पण पुढें या खर्चाचें

प्रमाण क्रमिकमी होऊन, अलीकडे तर तो अगदीं नाहींसाच झाल्यासारखा आहे. या प्रमाणें मोटरवाहतुकीचे वाढीमुळें प्रांतिक सरकारचा प्रत्यक्ष खर्च फारसा वाढला नाहीं. नोंदणीची फी व परवाना फी यांचें उत्पन्न मात्र वाढलें व अलीकडे दस्तुऱ्यांचें पुनरुज्जीवन झाल्यापासून तर ती एक प्रांतिक सरकारची मोठीच उत्पन्नाची बाब होऊन बसली. या सहा जिल्ह्यांतील म्युनिसिपालिट्यांच्या खर्चाचे आंकडे पाहिले असतां, असें आढळून येतें कीं १९२२–२३ ते १९२४–२५ या तीन वर्षांत त्या सरासरीनें ३१७ हजार रुपये खर्च करीत असत. अलीकडील वर्षांत त्यांचा खर्च सरासरीनें ४३३ ह. रुपये असतो, म्हणजे खर्चाची वाढ एकतृतीयांशानें झालेली आहे; जवळजवळ सर्व म्युनिसिपालिट्या वहानें व जनावरें यांजवर कर लादतात व तसेंच दस्तुरीही घेतात. या दोन्ही बाबींपासूनचें म्युनिसिपालिट्यांचें उत्पन्न अलीकडे वाढलें आहे. १९२२-२३ ते १९२४-२५ हें उत्पन्न सरासरीनें १२३ हजार रुपये होतें, तर १९३०-३१ ते १९३२-३३ या वर्षांत तें २३७ ह. रु. होतें यावरून असें दिसून येईल कीं, सरासरीनें सहा जिल्ह्यांतील सर्व म्युनिसिपालिट्यांचा एकंदर विचार केला, तर त्यांचा खर्च व उत्पन्न हीं साधारण सारख्याच रकमेनें वाढलीं आहेत.

जिल्हा लोकलबोर्डांची परिस्थिति याहून अगदीं निराळी आहे. बोर्ड रस्त्यावरील दस्तुऱ्या हा वहातुकीचे साधनांवर कर लादण्याचा त्यांस एकच मार्ग आहे. या दस्तुऱ्यांचें उत्पन्न १९२१-२२ ते १९२३-२४ सालांत सरासरीनें ९६ हजार रुपये होतें तें अलीकडील वर्षांत १४९ ह. रु. एवढेंच वाढलें आहे. याचे उलट याच कालवधींत त्यांचा रस्त्यावरील खर्च ४४७ ह. रु. पासून ८५७ ह. रु. पर्यंत वाढला आहे. म्हणजे खर्चाच्या वाढीच्या मानानें उत्पन्न एक अष्टमांश वाढलें एवढेंच. १९२५-२९ साल पावेतों याबाबत एक समाधानाची गोष्ट होती ती अशी कीं, बोर्डांना प्रांतिक सरकारकडून रस्ता खर्चाबद्दल मिळत असणारी मदत बरीच मोठी होती. पण गेल्या पांचसहा वर्षांत या मदतींतही मोठा काट घातला गेल्यामुळें बोर्डांची आर्थिक परिस्थिति सर्वच दृष्टीनें अडचणींची झाली आहे.

मोटर वाहतुकीची वाढ झाल्यामुळें रस्ते दुरुस्तीवरील खर्च वाढला, पण कराचें उत्पन्न मात्र त्या प्रमाणांत वाढलें नाहीं. याचा अर्थ मोटरी व मोटर वाहतूक यांजवर हिंदुस्थानांत कर कमी बसविला आहे असा मात्र नाहीं. प्रांतिक व स्थानिक कर याशिवाय मोटरीवर मध्यवर्ती हिंदुस्थान सरकारच्या करांचेंही ओझें आहे. हे मध्यवर्ती कर म्हणजे मोटरी, व मोटरीस लागणारें टायर वगैरे सामान यांचे आयातीवरील कर व पेट्रोलवरील कर. या कराचा बोजा निरनिराळ्या प्रांतांवर अगर जिल्ह्यांवर किती पडतो हें सांगणें कठीण आहे. पण मिचेल व कर्कनेस यांचे रिपोर्टांत असा अंदाज केला गेला आहे कीं, एकंदर प्रांतिक व स्थानिक कराच्या उत्पन्नाच्या दुप्पटीनें या मध्यवर्ती करांचें उत्पन्न आहे. आणि या मध्यवर्ती करांच्या उत्पन्नाचा जवळ जवळ कोणताच भाग रस्तादुरुस्ती अगर सुधारणा यांचे उपयोगीं पडत नाहीं. नाहीं म्हणावयास पेट्रोल कराच्या उत्पन्नाच्या एक पंचमांश रस्तानिधि (Road Fund) म्हणून मध्यवर्ती सरकारनें वेगळा काढला आहे, व त्यांतून निरनिराळ्या प्रांतिक सरकारास कांहीं रस्ता सुधारणाच्या मोठ्या कामाकरितां मदत करण्यांत येते बाकीचा पेट्रोलच्या कराचा भाग व आयात जकाती वगैरेंचें सर्व उत्पन्न मध्यवर्ती सरकारच्या साधारण उत्पन्नांत जमेस धरण्यांत येतें. मध्यवर्ती सरकारचे असे कोणतेच रस्ते नसल्यानें या उत्पन्नाचा उपयोग रस्त्यांकडे होत नाहीं.

अशा रीतीनें मोटरी व वाहतूक यांजवर कर तर भरपूर, पण रस्तेदुरुस्ती व बांधणीस पैसा मात्र नाहीं, अशा प्रकारची चमत्कारिक परिस्थिति हिंदुस्थानांत झाली आहे. मुंबई सरकारनें नवीन लादलेल्या प्रांतिक करांतही सर्वसाधारण खर्चाकडे मोटर कराचा बराचसा भाग लावणें हा दोष आहे; इतर बऱ्याच दृष्टीनें प्रांतिक कर लादल्यामुळें कर-पद्धतींत सुधारणा घडून आली आहे. दस्तुऱ्या काढून टाकणें, निरनिराळ्या प्रकारच्या मोटरीवरील कराच्या बोजाची विषमता कमी करणें व एकंदर पद्धति सुसूत्र व सुटसुटीत करणें, या गोष्टी प्रांतिक करानें घडवून आणल्या आहेत. ''

आतां नोंदणी व परवानाबद्दलचे लहान लहान कर व एक प्रांतिक कर, एवढाच बोजा मोटरीवर आहे. (म्युनिसिपालिटीच्या हद्दींत राहणाऱ्या मोटरीवर शिवाय चाकपट्टी आहे.) परंतु प्रांतिक कर बसविण्याच्या वेळेस त्यांचें सर्व उत्पन्न रस्त्यांकडे खर्च न करितां, त्यांपैकीं बराचसा भाग सर्वसाधारण उत्पन्नांत जमेस धरण्याचें सरकारनें ठरविलें आहे. मध्यवर्ति सरकार व प्रांतिक सरकार या दोहोंचेहि सर्वसाधारण खर्चाकडे मोटर व वाहतुकीवरील करांचा मोठा भाग गेल्यामुळें, रस्त्यावर खर्च करण्यास पुरेसा पैसा राहूं नये यांत नवल नाहीं.

जयकर रस्ता कमिटीनें हिंदुस्थानांतील रस्त्यांच्या मांडणींतही चार ढोबळ दोष आहेत, असें दर्शविलें होतें. हे दोष म्हणजे (१) आगगाडीच्या मार्गास पोषक असे रस्ते बांधणें व रस्त्यांवरील वाहतूक केवळ बैलगाडथाची म्हणून केवळ स्थानिक गरजांकडे लक्ष देणें यामुळें रस्ते मांडणींत आलेला विस्कळीतपणा, (२) पूल व उतार यांची वाण, (३) रस्त्याच्या पृष्ठभागाची वाढती दुर्दशा व (४) मुख्य रस्त्यांचा खेडेगांवांशी नीटसा संबंध न असणें हे होत. या सर्व दोषांपैकीं जर कशाचें निराकरण अलीकडे थोडेसें होत असलें, तर तें दुसऱ्याचें. प्रांतिक सरकार, जिल्हाबोर्ड व रस्ता निधी (Road Fund) याकडून विशेष खर्च झाला आहे, तो नवीन पूल वगैरे बांधणें व जुने सुधारणें यांवरच.

बाकी सर्व प्रकारचे दोष आहेत तसेच कायम आहेत किंबहुना रस्त्याच्या पृष्ठभागाची दुर्दशा आणखी वाढतच आहे. मिचेल व कर्कनेस यांनीं आपल्या रिपोर्टांत आणखी एका महत्त्वाच्या दोषावर जोर दिला आहे. तो दोष हा कीं आपल्या रस्त्यांचे मांडणींत प्रमाणबद्धता नाहीं; याचा अर्थ असा कीं, कांहीं थोडे रस्ते बरेच चांगले बांधलेले आहेत, त्यांजवर पूल भक्कम आहेत, व त्यांची निगाही चांगली राखली जाते, पण त्यांचे आजूबाजूचे लहान सहान रस्ते अत्यंत खराब असतात. थोडे मुख्य रस्ते चांगले व बहुसंख्य पोट रस्ते यांची बांधणी व दुरुस्ती यांजमधील महदंतर हाच मोठा दोष. कारण पोटरस्ते वाईट असले तर मुख्य रस्ते कितीही चांगले असून त्यांचा पुरा उपयोग होणें शक्य नाहीं. या दृष्टीनें पाहतां हल्लींची उत्पन्न व खर्च यांची विभागणी ही विशेषच वाईट आहे असें दिसून येईल. हिंदुस्थानसरकारकडे उत्पन्नाचा सर्वांत मोठा वांटा जातो; पण त्यांजवर रस्तादुरुस्तीची कांहींच जबाबदारी नाहीं. रस्तानिधी (Road Fund) मधून जो रस्त्यांवर खर्च केला जातो, तो फक्त अगदीं मुख्य रस्त्यांवरील कामाकरितांच. या सहा जिल्ह्यांत या निधीमधील पैशांतून प्रथमचीं दोनें कामें हातीं घेतलीं तीं मुंबई-पुणें व महाड-पोलादपूर रस्त्यावरील होतीं. लहान-लहान रस्ते बांधणें अगर सुधारणें यास या निधींतून मदत मिळत नाहीं; म्हणजे रस्तानिधीच्या विनियोगानें मुख्य रस्ते जास्त चांगले होऊन एका अर्थी प्रमाणबद्धतेच्या अभावाचा दोष जास्तच वाढतो हें उघड आहे. प्रांतिक सरकारां-

कड वर दर्शविल्याप्रमाणें असलेल्या रस्त्यांची लांबी फार कमी आहे, व ही वाढती नाहीं. तसेंच प्रांतिक रस्ते सुरवातीपासूनच चांगले बांधले असल्यामुळें त्यांची दुरुस्ती अगर सुधारणा यांजवरील खर्च मोटरवाहतूक वाढली तरी फारसा वाढवावा लागला नाहीं. याचें उलट परिस्थिति बोर्डांच्या रस्त्यांची आहे. मोटरवाहतूक जिकडे तिकडे वाढत आहे. तेव्हां बोर्डांच्या जास्तींत जास्त लांबीच्या रस्त्यावरून मोटरी फिरूं लागल्या आहेत. बोर्डांचे रस्ते आधींच कमी दर्जाचे तेव्हां त्यांवर मोटरीची वाहतूक वाढल्यास, ते तेव्हांच खराब होतात. बोर्डाजवळ पैसा नसल्यामुळें रस्त्यांचा पृष्ठभाग नीटसा कधींच दुरुस्त करतां येत नाहीं, जुजबी दुरुस्तींत खर्च झालेल्या पैशाचा क्षणिकच उपयोग होतो. अशा रीतीनें वाढता खर्च, पैशाची टंचाई व रस्त्याची नादुरुस्ती हा बोर्डांचा नेहमींचा कारभार होऊन बसला आहे. या विवेचनावरून हें स्पष्ट दिसून येईल कीं, आज मुख्यत्वेंकरून बोर्डांस रस्त्यांवर खर्च करण्यास जास्त पैसा देण्याची जरूरी अतोनात आहे. मिचेल व कर्कनेस यांनीं असा अंदाज केला आहे कीं, पुणें जिल्ह्यांतील हजारांहून जास्त लोकवस्ती असलेल्या २१० खेड्यांपैकीं १०० खेडीं मोटरवाहतुकीस योग्य असलेल्या रस्त्यापासून दूर आहेत.

या सर्वांचा मोटररस्त्यांशीं संबंध जोडणें हें काम साहाजिक बोर्डाकडे येणार, पण बोर्डांस चालूं दुरुस्त्याच करणें जर कठीण पडलें तर हीं सुधारणेचीं व विस्ताराचीं कामें त्यांजकडून कशीं होणार ? या इलाख्यांत प्रांतिक कर लादला गेल्यामुळें बोर्डाचें या बाबींतील उत्पन्न वाढण्याचा आतां एकच उपाय आहे व तो म्हणजे प्रांतिक सरकारनें बोर्डांस रस्तेखातीं देत असलेली रक्कम वाढविणें हीच होय. मोटरीवरील कर वाढविणें अशक्य आहे, व मध्यवर्ति सरकार आज आपलेकडील ओढींत असलेल्या कराची रक्कम त्याजकडून सुटेल असाही संभव दिसत नाहीं, पण निदान प्रांतिक सरकारनें तरी सर्वसाधारण खर्चाकडे मोटर-कराचा ओढलेला मोठा भाग कमी करून, हळूहळू हा बहुतेक सर्व रस्तेदुरुस्ती व सुधारणा यांजकरितां जिल्हाबोर्डाकडे दिल्याशिवाय आपल्या रस्त्याच्या मांडणींतील प्रमुख दोष अल्पांशानेंही कमी होणें शक्य नाहीं.

वाचकांच्या माहितीसाठीं सोबत सहा जिल्ह्यांतील एकंदर लोहमार्गांची लांबी तसेंच पक्क्या व कच्च्या रस्त्यांची लांबी दाखविणारीं कोष्टकें या प्रकरणाचे शेवटीं जोडलीं आहेत. त्यावरून लोकल बोर्डांचे रस्ते व प्रांतिक सरकारचे ताब्यांतील रस्ते वगैरे विषयीं माहिती मिळेल.

लोहमार्गांचा विस्तार

मोठे रस्ते	मैल	मध्यम रस्ते	मैल	अरुंद रस्ते	मैल
नेरळ–पुणें ...	६५	पुणें–मिरज ...	१६०	दौंड–बारामती ...	२८
पुणें–सोलापूर ...	१६४	मिरज–सांगली ...	६	कुर्डुवाडी–बार्शी ...	२१
दौंड–कोपरगांव ...	१२०	मिरज–कोल्हापूर ...	३०	कुर्डुवाडी–पंढरपूर ...	३३
एकंदर ...	३४९	एकंदर ...	१९६	एकंदर ...	८२

प्रांतिक व लोकल बोर्डांच्या रस्त्यांचा विस्तार.

जिल्हा	प्रांतिक				लोकल बोर्ड			
	सडीचे पक्के, पूल असलेले रस्ते	सडीचे पक्के परंतु सर्वत्र पूल नसलेले रस्ते	इतर रस्ते	एकूण	सडीचे रस्ते	विनसडीचे रस्ते	इतर रस्ते	एकंदर
	मै. फ. फू.	मै. फ. फू.	मै. फ. फू.	मै. फ. फू.	मै. फ. फू.	मै. फ. फू.	मै. फ. फू.	मै. फ. फू.
पुणें ...	१३८–३——०	१५७–४——०	...	२९५–७——०	१२२–१–५८०	१३७६–०–५५५	...	१४१८–२–४७५
सातारा ...	२२६–३——०	२६५–२——०	...	४९२–०——०	२५५–०——०	१७४–६–३३०	...	४२९–६–३३०
अहमदनगर ...	५२–७–१९३	३९१–६—९९१	०–४–२६३	५४५–१–५५५	४२१–७–१५२	२३०–१–३३०	...	६५२–०–४८२
सोलापूर ...	११६–४——०	२४७–५——०	...	३६४–१——०	१६४–३——०	१४४–०——०	...	३०८–३——०
कुलाबा ...	१०१–६–३१४	१४६–४–४७६	...	२४८–३–१३०	७२–७–३५०	९४–१–५८०	३६७–१–११५	५३४–२–३८५
रत्नागिरी ...	६०–०——०	३१९–१–५३२	...	३७९–१–५३२	...	१२३–५–३६०*	२८७–७–३२०	१२०२–५—२०
निरा राइट बँक कॅनाल ...	३६–५–२२८	३४–०–३३०	...	७०–५–५५८	...	...	...	...
पुणें इरिगेशन डिव्हिजन ...	८४–०——०	६४–६–३२०	७५–४–३४५	२२४–३——५	...	...	...	...
एकूण ...	८१७–०—७५	१६२६–६–४३७	१७६–०–६०८	२६१९–७–४६०	१०३६–३–४२२	२९३५–०–१७५	६५५–०–४३५	४६२५–४–३७२

*यांतच सडीच्या पक्क्या रस्त्यांची लांबी धरली आहे. पक्क्या रस्त्यांची वेगळी लांबी मिळण्यासारखी नाही.

प्रकरण ७ वें

संघ स्थापना व सरकारी नियंत्रण

i) मोटर-मालकांचे संघः—

मोटर-मालकांचे संघ स्थापण्यासाठीं या भागांतील बऱ्याचशा ठिकाणीं पुष्कळ प्रयत्न झाले. ह्या प्रयत्नांचे प्रकार दोन. पहिल्या प्रकारच्या प्रयत्नांत मोटर-मालकांच्या सर्वसाधारण हितसंरक्षणाच्या दृष्टीनें एकी व्हावी एवढाच हेतू होता. दुसरा प्रकार विशिष्ट मोटर-मालकांची धंदेवाईकरीत्या एकी करून संघ स्थापन करण्याचा होता.

यापैकीं पहिल्या प्रकारचा प्रयत्न फारसा यशस्वी झालेला दिसून येत नाहीं. अशा प्रकारचे प्रयत्नच आधीं फार थोडे झाले. १९३० मध्यें पुणें मोटर-मालक संघ स्थापन झाला व तो स्थापन करण्याचा उद्देशच असा कीं, त्यांतून पुढें सबंध महाराष्ट्राकरितां म्हणून महाराष्ट्र मोटर-मालक संघ निपजावा. या संघाची सुरवात चांगली झालेली दिसते; कारण पहिल्या कांहीं बैठकींस महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व जिल्ह्यांतून प्रतिनिधी आले होते; पण पुढें कांहीं महिन्यांनीं त्यांत कोणीं फारसें लक्ष घालीना. यामुळें थोड्या दिवसांतच ही संस्था नामशेष झाली. अशा प्रकारच्या संस्था अस्तित्वांत न येण्याचें कारण या धंद्यांत वजनदार लोक फारसे नाहींत हें होय. लहान लोकांचा फार मोठा भरणा धंद्यांत असल्यामुळें एकादी मोठी संस्था निघून ते चालूवूं शकत नाहींत असें दिसतें. परंतु अशा मध्यवर्ती संस्था नसल्यानें नवीन करवाढीच्या वेळीं किंवा दुसऱ्या एकाद्या संकटसमयीं मोटर-मालकांचे व मोटरीच्या धंद्याचे हितसंरक्षणास कोणीच अधिकृत रीत्या पुढें होऊं शकत नाहीं..

सध्यां ज्या संघ संस्था अस्तित्वांत आहेत, त्या सर्व दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे एका वाटेपुरत्या अगर गांवापुरत्या व धंद्यांत नुकसान येऊं नये म्हणून चढाओढ टाळण्याच्या उद्देशानें स्थापन झालेल्या आहेत. त्यांचेही दोन प्रकार अस्तित्वांत आहेत. कांहीं चढाओढ थांबविण्याच्या उद्देशानें, तर कांहीं लहान लहान मोटरमालकांचे गट बनविण्याच्या उद्देशानें स्थापन झालेल्या आहेत. हे दोन्हीही प्रकार साधारणपणें एकाच विवक्षित मार्गावर चालणाऱ्या मोटरमालकांचे बनलेले असतात. चढाओढ बंद पाडण्याच्या उद्देशानें स्थापन झालेले संघ बहुतेक एकाच मार्गावर मोटरी चालविणाऱ्या मालकांचे असतात. असे मालक एकत्र होऊन सर्व मोटरी एकत्र आणतात व मग आळीपाळीनें व वाहतुकीच्या गरजेप्रमाणें नंबरवारीनें मोटरी सोडतात. त्यांचे संघाचें एक ऑफिस व या ऑफिसचे पटावर सर्व मोटरी नंबराप्रमाणें मांडलेल्या असतात. प्रत्येक मोटरविर होणारा खर्च मोटरमालक स्वतःच करतो. मोटर हांकणारे नियमाप्रमाणें वागतील अशी व्यवस्था ठेविली जाते. सरकारी नियम होताहोईतों मोडावयाचे नाहींत याबद्दल संघाच्या ऑफिसकडून दक्षता बाळगण्यांत येते. प्रत्येक वाटेवरील भाडीं ठरवून त्याप्रमाणें तीं वसूल होतील याबद्दल दक्षता दाखविली जाते. गाड्या ठराविक वेळीं सोडण्याची व पोंहोचण्याची व्यवस्था केलेली असते. मोटरींत ठराविक संख्येपेक्षां जास्त उतारू सहसा भरूं देत नाहींत. गाडीवान मोटर हांकण्याचें आपलें काम व्यवस्थित करतात कीं नाहीं, तें भाडीं जास्त घेतात कीं काय,

जास्त उतारूं तर बसवीत नाहीं, वगैरे गोष्टींवर लक्ष राहण्यासाठी म्हणून संघाचे तपासनीस असतात. याबाबतचा कचेरीचा खर्च सर्व मालकांनीं वांटून घ्यावयाचा असतो. तसेंच तिकीटविक्री ऑफिसांतून होत असल्यानें एकंदर रक्कम संघकचेरींत जमा होते व ठराविक दिवसांनंतर ती मोटर मालकांस त्यांच्या मोटरींच्या संख्येप्रमाणें वांटून दिली जाते. बाहेरच्या लोकांस पैसे (दक्षणेच्या रूपानें) वगैरे देणें झाल्यास ते संघाच्या मार्फत दिले जातात. अशा रीतीनें पैशाची बचत होते.

अशा रीतीनें संघ स्थापन झाल्यानें "दक्षिणे"च्या रूपानें पैसा कमी वांटला जातो म्हणून कांहीं लोकांचा या संघाविरुद्ध हीं कटाक्ष असतो असें म्हणतात व ते हा संघ मोडण्याचा शक्यतो प्रयत्न करतात. संघांतील लोक, सरकारी नियमांचें उल्लंघन करीत असले तर अशा लोकांस संघास त्रास देणें सोपें जातें, व यासाठीं संघांतील कोणत्याही इसमाकडून नियम मोडले जाणार नाहींत, याबद्दल संघाच्या अधिकाऱ्यांस विशेष काळजी घ्यावी लागते. संघांतील माणसांवर खटले भरण्यांत आल्यास संघाच्या निधीमधून काम चालविण्यासाठीं थोडी फार मदत मिळते, किंवा प्रत्येक सदस्याचा पहिला खटला कांहीं खर्च न लागतां संघातर्फेच चालविला जातो.

१९३२-३३ सालीं अशा प्रकारचे दोन संघ, एक पुण्यास व दुसरा अहमदनगरास, अस्तित्वांत होते. या दोन्ही संघांत मिळून एकंदर ३० मोटरी होत्या, व पुणें-नगर वाटेवरील सर्व उतारूंची वाहतूक या संघांचे मार्फतच होत होती. पाहणी करण्याच्या वेळीं या संघास स्थापन होऊन दोन वर्षांच्या वर दिवस झाले होते. अशा प्रकारचे आणखी कांहीं संघ सोलापूर-अक्कलकोट, अहमदनगर-संगमनेर, अहमदनगर-नेवासें, सातारा-कोरेगांव-म्हसवड, वगैरे मार्गांवरही अस्तित्वांत असलेले आढळून आले.

अशा प्रकारच्या संघाचें आयुष्य मात्र फार नसतें, व त्यांची संख्याही एकसमयावच्छेदेंकरून सर्वत्र वाढत नाहीं. ते इतक्या लवकर कां मोडतात याची थोडीफार कारणमीमांसा येथें करतां येणें शक्य आहे. संघ मोडण्याचीं कांहीं कारणें अशीं:—(१) एकत्र केलेल्या रकमेची वांटणी करतांना होणारीं भांडणें, किंवा पटावर नंबर लावतेवेळीं नंबराविषयीं होणारी तक्रार, (२) संघांतील मोटरी ज्या मार्गावरून जातात त्याच मार्गावर एकाद्या परक्या इसमास आपली मोटर घालण्यास कांहींच हरकत नसते. अशावेळीं चढाओढ करण्याचा प्रसंग येतो; अशा वेळीं भांडणें होण्याचा संभव. संघाच्या कचेरीचा खर्च सर्वांनीं सारखा वांटून घ्यावयाचा असतो, तसेंच ऑफिसांतून नेमून दिल्याप्रमाणें क्रमाक्रमानें सर्व गाड्या सोडावयाच्या असतात. अशावेळीं अमक्यास अमकी वेळ देण्यांत आली, तमक्यास अमुक एक वेळ हवी असतांना ती मिळाली नाहीं म्हणून भांडणें होतात. गाड्या दुरुस्तीकरतां घरीं पडल्या असतां देखील त्या संघाच्या पटावर आहेत म्हणून पैसे वाटणीच्या वेळीं आपला हिस्सा मागणें वगैरे बरींच भांडणास कारणें होतात. संघापासून सरोसरच आपले फायदे किती होतात याची कोणासच फारशी जाणीव झालेली नसते. अशी जाणीव झाल्याशिवाय कोणचेही संघ फार दिवस टिकणें शक्य नाहीं. तसेंच वर सांगितल्याप्रमाणें संघाबाहेरील कांहीं व्यक्ती किंवा शक्ती संघ मोडण्याच्या प्रयत्नांत असतात. संघापासून त्यांचा व्यक्तिशः कांहीं फायदा नसल्यानें संघ कसे व केव्हां मोडतात याकडे त्यांचे डोळे लागून राहिलेले असतात व ते मोडावे म्हणून त्यांचे प्रयत्नही पण चाललेले असतात. संघस्थापनेपासून एजंटाचेंही नुकसान होतें, कारण प्रत्येक मोटर मालकाकडून, व्यक्तिशः कमिशन त्यांस मिळत

नाहीं व संघाचे पगारी नोकर म्हणून राहण्याची पाळी येते.

मोटर-संघ स्थापन करतांना त्यावेळीं जेवढे मोटर-मालक असतील त्यांस संघांत घेण्यांत येते; पण पुढें इतर कांहीं लोक मोटरी विकत घेऊन मोटर-मालक बनतात व संघाच्या गाड्या ज्या वाटावरून चालतात त्याच वाटावरून ते आपल्याही गाड्या चालवितात. अशा रीतीनें त्यास संघांतील लोकांस चढाओढ करण्यास भाग पाडतां येते व संघांतील लोकांची एकीमुळें चढाओढ करण्याची शक्ति जास्त असली तरी एक दोन बाहेरील मालकांच्या चढाओढीमुळें संघांतील मालकास आपले दर कमी करून वेळेस नुकसान सोसण्याची पाळी येते व संघांत थोडीबहुत फाटाफूट घडवून आणण्यास हें चढाओढीचें कारण पुरेसें होतें. पुढें ही चढाओढ बरेच दिवस चालत राहिल्यास वाटेवरील नवीन मोटरीस एक तर संघांत सामील करून घेण्याशिवाय गत्यंतर नसतें किंवा चढाओढ थांबविण्यासाठीं म्हणून स्थापिलेल्या संघाची आवश्यकता राहात नाहीं. नवीन लोकास संघांत घेतले तरी पूर्वीसारखी परिस्थिति राहात नाहीं व अशा रीतीनें संघ मोडकळीस येतो. आजकाल थोड्या भांडवलावर या धंद्यांत शिरकाव करून घेणें किती सोपें झालें आहे, याचदृल मागें सविस्तर सांगितलेंच आहे, असें थोड्या भांडवलावर तयार झालेले मोटर-मालक बेजबाबदारपणें वागतात व त्यांच्यांत संघशक्तीच्या बीजाचा अभाव असल्यानें तेच संघ मोडण्यास बऱ्याच अंशीं कारणीभूत होतात.

दुसऱ्या प्रकारचे संघ ज्या मालकांच्या अगदीं थोड्या मोटरी असतात अशांचे झालेले असतात. ज्यांच्याजवळ एकच मोटर आहे अशा इसमास गिऱ्हाईक मिळविण्याच्या दृष्टीनें फार त्रास पडतो. कायम कचेरी किंवा वस्तीचें ठिकाण नसल्यानें इतर गैरसोयही फार होते. अशा वेळीं हे एकेक मोटरवाले एकत्र जमून एकादें ऑफिस उघडतात व त्यास "अमूक सर्व्हिस" असें नांव देतात. अशा प्रकारच्या सर्व्हिसा आपल्याकडे पुष्कळ आहेत. या सर्व्हिसांच्या सर्व मोटरी बहुतेक ठराविक मार्गच आक्रमितात. आपल्या मोटरी क्रमाक्रमानें सोडतात. यांचे समाईक दलाल असतात. अशांपैकीं कांहीं संघ संघशक्तीचे दृष्टीनें बरेच पुढें गेलेले आमच्या निदर्शनास आले. त्यांच्यांत मोटरीस लागणारा सर्व खर्च तर सर्व्हिसच्या ऑफिसांतून करण्यांत येतोच व मोटरीस लागणाऱ्या मालाची खरेदीही पण सर्व्हिसच्या ऑफिसाकडूनच होतें. अशा प्रकारें मोठ्या प्रमाणावर माल घेतल्यानें तो स्वस्त मिळतो. सर्व्हिसमधून रोजची उत्पन्नाची आवक एकत्रच जमा होते. महिन्याच्या शेवटीं यांतून ऑफिसखर्च वजा जातां प्रत्येक मोटर-मालकास त्याच्या हिश्शाप्रमाणें पैसे वाटून देण्यांत येतात. पण अशा रीतीनें निरनिराळ्या मालकांनीं सर्व उत्पन्न-खर्च एकत्र करण्यांत बऱ्याच अडचणी आहेत व म्हणून इतके संघटित संघ अगदीं अपवादात्मक समजावयाचे. हे सर्व संघ मुख्यतः उतारू जास्त मिळावे या हेतूनेंच अस्तित्वांत आलेले असतात. परंतु हे संघ टिकाऊ नसतात. सर्व्हिसमधील मोटर-मालकांची आपसांत वरचेवर थोडक्या कारणानें भांडणें होतात व संघ किंवा सर्व्हिस मोडण्यास उशीर लागत नाहीं. परंतु जोंपर्यंत असे संघ अस्तित्वांत असतात तोंपर्यंत त्यांचा उपयोग होतोच. तेवढीच मोटरी—मोटरींतील चढाओढ कमी होते व अप्रत्यक्ष रीतीनें कां होईना पण उतारूंचीही थोडी सोय होते. आमचे संशोधक माहिती जमविण्यासाठीं निरनिराळ्या जिल्ह्यांतून फिरत असतांना त्यांस सर्व जिल्ह्यांतून अशा प्रकारचें संघ असलेले आढळून आले. त्यांना जे आंकडे मिळाले त्यावरून सहा जिल्हे व कांहीं संस्थानें

मिळून एकंदर संघांची संख्या ५१, त्यांत असलेल्या मोटर-मालकांची संख्या ४०७ व एकंदर संघांतील मोटरींची संख्या ७४० होती असें दिसतें. ही माहिती संपूर्ण असणें शक्य नाहीं. कारण कांहीं ठिकाणच्या संस्था त्यांच्या नजरेंत आल्या नसतील, किंवा कांहीं मिळालेली माहिती अगदीं बरोबर अशी नसेल. आम्ही ज्या एकंदर १५५ पृच्छावल्या भरून घेतल्या. त्यावरून असें आढळून आलें कीं, १५५ मोटर-मालकांपैकीं ५७ मोटर-मालक कोणत्या ना कोणत्या तरी संघाचे सभासद होते.

जास्त सुशिक्षित व समजुतदार मोटर-मालक आपल्या संघांतून किंवा "सर्व्हिस" मधून उतारूंच्या सुखसोयी वाढविण्याचा प्रयत्न करितात. गाड्या ठराविक वेळेवर सोडणें, ठराविक भाडीं घेणें, ड्रायव्हर-क्लीनरांचें वर्तन उतारूंचे बाबतींत सभ्यतेचें राहील याविषयीं खबरदारी बाळगणें, तसेंच हे लोक कामावर असतांना निर्शेत येणार नाहींत, याबद्दल काळजी घेणें वगैरे गोष्टीकडे अशा संघांचें बरेंच लक्ष असतें. विशेषतः गाड्यांतून ठराविक संख्येपेक्षां जास्त उतारू न घेणें व गाड्या घेळापत्रकाबरहुकूम सोडणें या दोन गोष्टी केल्यास उतारूंचा सर्व्हिसवर विश्वास बसून चढाओढीचे दिवसांत इतर मोटरींचे दर कमी होत असतांना या मोटरींचे दर ठराविक पद्धतीनें घेतले गेले तरी उतारू वर्ग या सर्व्हिसेच्या मोटरींनीं प्रवास करण्यास तयार असतो असें आम्हांस सांगण्यांत आलें.

अशा चांगल्या सर्व्हिसा मात्र फारच थोड्या. एकंदरींत मोटर-मालकांत जुटीनें चागण्याची फारशी इच्छा दिसत नाहीं तसेंच आगगाड्याप्रमाणें वेळेच्या व गाड्याच्या बाबतींत निश्चितता रास्तावी हेंही मोटर-मालकांस साधारणपणें पटत नाहीं. संघ स्थापन होतात पण ते वरचेवर मोडतात, याचेंही कारण हेंच कीं, जूट व आंतरिक कार्यक्रम यापासून कोणते फायदे होतात त्याची पुष्कळांना कल्पनाच नसते.

येथपर्यंत ज्या गोष्टी सांगितल्या त्या सर्वसाधारणपणें महाराष्ट्रांतील चार जिल्ह्यांस लागू पडणाऱ्या अशा आहेत. कोंकणांतील परिस्थिति थोडी वेगळी आहे. त्यासंबंधानें आतां थोडा विचार करूं.

१९३३ सालीं रत्नागिरींत संघाची कल्पना बरीच रुळल्यासारखी दिसत होती. तेथें सर्वांध जिल्ह्याची अशी एक मध्यवर्ती संस्था असून तिचे १४३ सभासद होते. जिल्ह्यांतील बहुतेक वजनदार मोटर-मालक या संस्थेचे सभासद होते. ही संस्था इतर संघाचे किंवा सर्व्हिसांचे तत्त्वावर स्थापन झाली नसून तिचा विशेष भर "विम्या"वर होता. तेथील जिल्हा पोलिस अधिकाऱ्यांनें आपल्या अधिकारांत प्रत्येक मोटर-मालकास उतारू व त्रयस्थाचा विमा यासाठीं रु. ३००० पर्यंतचा विमा काढणें भाग पाडले होते. हा भार कांहीं अंशानें कमी करण्याच्या उद्देशानें या संस्थेचा जन्म झाला होता. जे लोक संस्थेचे सभासद होतील त्यांच्या विम्याच्या रकमेपुरती संस्था जबाबदारी उचलण्यास तयार झाली व जिल्हा अधिकाऱ्यानें तें मान्य केलें. इकडे जिल्हा पोलिस अधिकाऱ्याशीं अशा प्रकारचा करार करून संस्थेनें मोटर-मालकाकडून मेंबर होतांच गाडींतील प्रत्येक सीटबद्दल २० रु. ठेव व वार्षिक वर्गणी रुपये १२ असे पैसे वसूल करण्याचें ठरविलें,व त्याबरोबर हेंहि सांगितलें कीं, पैसे जास्तकमी जमविणें भाग पडल्यास संस्थेला तसें जमविण्याचा अधिकार राहील. सगळ्याच मोटरींस एकदम अपघात होत नसल्यानें संस्थेनें जे पैसे गोळा केले त्यावर चांगलें काम चालूं झालें. एकदोन वर्षे ह्या गोष्टी सुरळीत चालत होत्या. अपघात होऊंच नयेत म्हणून गाड्या जास्त वेगानें चालवू नयेत,ड्रायव्हर्स जास्त काळजीपूर्वक वर्तन ठेवितील अशी व्यवस्था करावी,

गाडयांत जास्त माणसें बसवूं नयेत, गाडया नेहमीं सुस्थितींत ठेवाव्यात वगैरे गोष्टी संस्थेला सुचवाव्या लागल्या व सर्व मोटरी याप्रमाणें नियम पाळतात किंवा नाही हें पाहण्यासाठीं म्हणून संस्थेस तपासनीस नेमावे लागले. अशा रीतीनें अप्रत्यक्ष रीतीनें संस्थेची पाहणी सर्वच मोटरींवर होऊं लागली, आणि प्रत्यक्ष ताबा नसला तरी अप्रत्यक्ष रीतीनें अशाच प्रकारच्या बऱ्याचशा सुधारणा घडवून आणण्याचा संस्थेच्या चालकांचा विचार होता. परंतु पुढें पूर्वीचे जिल्हा पोलिस अधिकारी बदलून गेल्यावर नवीन आलेल्या जिल्हा पोलिस अधिकारी स ही विम्याची पद्धत पसंत पडली नाहीं व त्यानें सर्व मोटर-मालकांकडून पृथक् पृथक् विम्याच्या रकमा मागितल्यानें संस्थेचें आयुष्य संपल्यासारखें झालें. आणि आतां ही संस्था जरी नांवानें जिवंत असली तरी तिच्याकडून कार्य पूर्वीप्रमाणें होत नसून रत्नागिरी जिल्ह्यांतील परिस्थिति हळूहळू इतर जिल्ह्यांप्रमाणेंच होऊं लागली आहे.

कुलाबा जिल्ह्यांतही रत्नागिरीप्रमाणेंच चांगली परिस्थिति होती. येथें सबंध जिल्ह्याची अशी मध्यवर्ती संस्था नसली तरी मोठ्या गांवांतून संघ होते, व हें संघ चांगले चालत असून त्यांच्या सभासदांत एकजुटीनें काम करण्याची शक्ति दिसून येत होती. कुलाब्याच्या जिल्हा पोलिस अधिकाऱ्यांनेंही या संघांस विम्याचे बाबतींत सवलती दिल्यानें संघ जास्त बळकट झाले व मोटरमालकांचें, तसेंच मोटरींच्या वाहतुकीच्या व्यवहारांत बरीच सुधारणा दिसू लागली. रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यांच्या संघ स्थापनेस अशा रीतीनें मदत केल्यानें सर्वत्र संघ स्थापन होऊन त्यांस चांगली स्थिरता व बळकटपणा येऊं लागला होता. परंतु विम्याच्या बाबतींतील त्यांनीं दिलेली अभिवचनें व सूट हीं नाहींशीं झाल्याबरोबर संघांतून बेचनाव होण्यास सुरवात झाली. याचवेळीं संघांच्या बाहेरील मोटरवाल्यांनीं चढाओढ करण्यास सुरवात केली, तसेंच निरनिराळ्या संघांत आपसांत चढाओढ होऊं लागली. कुलाबा जिल्ह्यांतील संघास दुसऱ्या कारणापासून जास्त उपद्रव झाला असें आम्हांस सांगण्यांत आलें. एका संघाच्या मोटरी ज्या रस्त्यावरून जातात तो रस्ता ज्या ठिकाणीं जाऊन मिळतो तेथवर दुसऱ्या एकाद्या संघाच्या मोटरी येत असतात. अशा ठिकाणीं एका संघाचा दुसऱ्या संघाशीं चढाओढीचा प्रसंग येतो. उदाहरणार्थ, महाड-धरमतर वाटेवरील संघाचे महाँड-चिपळूण संघाशीं वाकडें आल्यास त्यांना महाड-धरमतर वाटेवर वरीलपैकीं एकाद्या संघाशीं चढाओढ करण्याचा प्रसंग येणार. अशा रीतीनें संघाच्या आपसांतील भांडणामुळें संघशक्तीचा जोर नाहींसा होऊं लागला. अलिबागेसारख्या ठिकाणचा एकादाच संघ काय तो टिकून राहिला व याचें कारणही इतकेंच कीं,तेथील संघाचा बाहेरच्या इतर संघांशीं फारसा संबंध आला नाहीं.

(ii) सरकारी कायदे किंवा नियम.

येथपर्यंत मोटर-धंद्याची सध्यांची परिस्थिति कशी आहे या विषयींचें परीक्षण केलें. थोड्या मोटरी बाळगणारे मोटर-मालक, त्यांची पैशाच्या दृष्टीनें दैना, आपसांतील कलह व चढाओढीमुळें होणारें नुकसान वगैरे गोष्टींचा आपण अभ्यास केला. आतां या धंद्यासंबंधीं सरकार काय करीत आहे, व त्यांचे जे सध्यांचे नियम आहेत ते कशा प्रकारचे आहेत, त्यांचा धंद्याचे दृष्टीनें कितपत उपयोग होण्यासारखा आहे वगैरे गोष्टींचा विचार करावयास पाहिजे.

सध्यांचे नियम अगदींच सामान्य प्रतीचे असे आहेत. धंद्याच्या नियंत्रणाच्या बाबतींत हवे तसे नियम नाहींत, व विमा किंवा प्रत्येक वाटेवरून मोटरी किती न्याव्यात वगैरे संबंधीही नियम नाहींत.

मोटर-वाहनाचा असा हिंदुस्थान सरकारचा एकच कायदा आहे व तो

म्हणजे १९१४ सालचा. या कायद्याप्रमाणें प्रांतिक सरकारांना या बाबतींत जरूर ते नियम किंवा कायदे करण्याचे अधिकार दिलेले आहेत.

या अधिकाराप्रमाणें प्रत्येक प्रांतिक सरकारनें मोटरीसंबंधानें नियम तयार केलेले आहेत. हे नियम मुख्यत्वेंकरून मोटरींची नोंदणी, त्यांची बांधणी व सरंजाम, परवाने देणें, व गाड्यांचा वेग किती असावा, वगैरेसंबंधानें असतात. परंतु यांतील बहुतेक नियम अगदींच साधारण स्वरूपाचे आहेत. मुंबई इलाख्यांत भाड्याचे मोटरीसंबंधींचे कांहीं विवक्षित नियम केलेले आहेत. या नियमाप्रमाणें प्रत्येक जिल्ह्यांतील पोलिस-अधिकारी हा याबाबत सर्वश्रेष्ठ अधिकारी समजला आहे व सर्व भाड्याच्या मोटरी नियमाप्रमाणें तंदुरुस्त आहेत किंवा नाहींत हें तपासण्याचें काम या अधिकाऱ्याकडे सोंपविलें आहे. या नियमांतील कांहीं नियम खालीं देत आहोंत. नियमाप्रमाणें प्रत्येक उतारूबरोबर २० पौंड वजन फुकट नेतां येतें. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला भाडें ठरविण्याचा अधिकार दिलेला आहे, परवान्याशिवाय कोणत्याही मोटरीवर जाहिराती लावतां येत नाहींत, एजंटांचीं कामें करणाऱ्या इसमांस तसा परवाना मिळवावा लागतो, या नियमान्वयेंच जिल्हा पोलिस अधिकाऱ्यास कोणत्याही मोटरीवर त्याला तसें वाटल्यास विमा उतरण्याची सक्ती करण्याचा अधिकार आहे. या नियमांत जिल्हा पोलिस अधिकाऱ्यानें काय करावें हें सांगितलें आहे. पण मोटरींतील सामान कशा प्रकारचें असावें, त्यांतील बसण्याची सोय कशी असावी, पडदे कसे असावे वगैरे गोष्टी जिल्हा पोलिस अधिकाऱ्यानें ठरवावयाच्या असतात. पण या थोडक्या अधिकाराच्या क्षेत्रांत देखील जिल्हा पोलिस अधिकाऱ्याकडून मोटर-मालकास बराचसा त्रास होतो असें आम्हांस समजलें आहे. कारण एका वर्षी एक प्रकारच्या गाड्या गाडींत घालावयास जिल्हा पोलिस अधिकारी सांगतो, तर दुसऱ्या वर्षी त्याचे मनांत आल्यास तो त्या प्रकारच्या गाड्या पुन्हां बदलावयास लावतो. बहुतेक जिल्ह्यांत नंबर प्लेट करतां रंगविलेला काळा टिनचा पत्रा चालतो, तर एका जिल्ह्याच्या जिल्हा पोलिस अधिकाऱ्यानें तो नंबराचा पत्रा घालाच पण त्याबरोबर ॲल्युमिनियमची नंबराची एक प्लेटही पण घाला असा नियम केला व मोटर-मालकास प्रत्येक प्लेटीमागें ६ रु. खर्च करून तसें करणें भाग पडलें. एका जिल्ह्यांत १½ टन बैठकी (Chassis) वरील सांगाड्यांत (Body) प्रत्येक उतारूस १५ इंच जागा सोडून १८ इसमच बसवितां येतात तर दुसऱ्या जिल्ह्यांत तशाच बैठकीवर मोठा सांगाडा बांधून आणल्यास २२ नेण्याची परवानगी मिळते. मोटर मालकांची अशा नियमांचे विरुद्ध तक्रार असणारच. त्यांचें म्हणणें असें कीं सर्व जिल्ह्यांसाठीं किंवा संबंध इलाख्याकरितां मोटरींचे बाबतींत नियम सारखे कां नसावेत, हें त्यांचे म्हणणें खरोखरच विचार करण्यासारखे आहे. मोटरी निरनिराळ्या जिल्ह्यांतून प्रवास करीत असल्यानें त्यांना प्रत्येक जिल्ह्यांतील निरनिराळ्या नियमाप्रमाणें वागणें कठीण जाणारच. जिल्ह्याजिल्ह्यांतच अशा प्रकारें नियमांत फरक पडतो असें नाही तर एकाच जिल्ह्यांत वर्षावर्षांत फरक पडतो. एक जिल्हा पोलिस अधिकारी बदलून त्याचे जागीं दुसरा आल्यास तो पहिले नियम बदलून नवीन नियम त्या जागीं घालतो.

मोटर-मालकांची दुसरी एक तक्रार मोटरींच्या तपासणीसंबंधींची असते. मोटरी तपासण्याचे वेळीं सर्व जिल्ह्यांतील सर्व मोटरी जिल्ह्याचे मुख्य ठिकाणीं न्याव्या लागतात. यामुळें बाहेरगांवच्या लोकांची फार गैरसोय होते. मोटर परगांवीं न्याव-

याची म्हणजे तिजवरोवर ३-४ इसम जावे लागतात. परगांवचा राहण्याचा खर्च, पेट्रोल, ऑईलचा खर्च व मोटरींत कांहीं दोष राहिलेले आढळून आल्यास ते परक्या गांवीं भरून काढावयाचे म्हणजे दुप्पट किंमत भरावी लागते. याकरितां जिल्ह्यांचे ठिकाणींच फक्त परीक्षणाचें काम न करतां जिल्हा अधिकारी व त्याचे मदतनीस यांनींच इतर जिल्ह्यांचे ३-४ ठिकाणीं फिरून जवळपासच्या मोटरी तेथेंच पहाव्या असें मोटर-मालकांचें म्हणणें आहे. यांत आम्हांस गैर-वाजवी असें कांहींच दिसत नाहीं. कांहीं जिल्ह्यांतून तर वर्षांतून दोन वेळां तपासणी होते. यामुळें मोटर-मालकांस परक्या ठिकाणीं मोटरी नेऊन प्रत्येक वेळीं ४-५ दिवस तेथें राहण्यास किती तरी त्रास व खर्च होतो. मोटरीच्या एंजिनचें तपासणी करणारा इसम मुंबईहून वर्षांतून फक्त एकच वेळ येतो. तसेंच एकाच जिल्ह्यांत पास झालेली गाडी दुसऱ्या जिल्ह्यांत पास करून घ्यावयाची झाल्यास फेर नोंद मिळविण्या-साठीं गाडी त्या जिल्ह्यांतील मुख्य शहरीं नेऊन तेथील जिल्हा पोलिस अधिकाऱ्यास दाखवावी लागते. एका जिल्ह्यांत झालेल्या गाडीस दुसऱ्या जिल्ह्यांत तपासणीशिवाय परवाना मिळण्यास हरकत दिसत नाहीं.

डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटास मोटरींवरील भाडें ठरविण्याचे अधिकार दिलेले आहेत. व त्याप्रमाणें बहुतेक जिल्ह्यांतून तशीं भाडीं ठरविलेलीही पण आहेत. पण जास्तींत जास्त भाडें किती घ्यावें हेंच ठरविण्यांत आलें असून अमक्या एका रकमेच्या खालीं भाडें उतरतां कामा नये असें मात्र ठरवून दिलेले नाहीं.

पोलिस-अधिकाऱ्यांना आधींच कामें फार असल्यानें त्यांस मोटरी-वरील नियंत्रणाचें काम खरें म्हटलें असतां देऊं नये, दिलें तर त्याच्या खात्यांत या कामासाठीं म्हणून निराळे अधिकारी ठेवावे म्हणजे कामाची आबाळ होणार नाहीं. सध्यां या कामांत फार दुर्लक्ष होण्याचा संभव असतो व पोलिस अधिकाऱ्यास हें काम झेंपत नाहीं असें मुंबई इलाख्यां-च्या १९२८ सालच्या पोलिस रिपोर्टांत खुद्द इन्स्पेक्टर-जनलरनेंच म्हटलें आहे. सर्वांचीच सोय व्हावी व कोणत्याहि एका खात्यावर मोटर-नियंत्रणाचा भार पडूं नये आणि नियंत्रणाचें काम चांगलें व्हावें म्हणून मोटर-नियंत्रणाचें एक वेगळेंच खातें उघडावें अशी आमची अगत्याची सूचना आहे.

प्रकरण ८ वें

मोटरधंद्याचें एकसूत्रीकरण व नियंत्रण

(१) नियमनाचे हेतू व पद्धतीः–

मोटर-धंद्यास सुव्यवस्थितपणा यावा व तो सुसंघटित मार्गानें चालावा, म्हणून मोटरमालकांनीं आजपर्यंत केलेले प्रयत्न बहुतांशीं कसे फुकट गेले हें मागें सांगितलें. तसेंच सध्यांची सरकारी मोटर धंद्याबाबतची नियमनपद्धति हें घडवून आणण्यास कशी असमर्थ आहे हेंही पाहिलें. मोटर-धंद्यास नियमन पाहिजे, ही गोष्ट सर्वांस पटते व इतर सर्व देशांतून या वाढत्या धंद्यास नियमन घातलेलेंही आहे. मोटर-धंद्याचें नियमन व्हावयास पाहिजे अशी ओरड प्रथमतः आगगाड्यांनीं केली; कारण बहुतेक सर्व देशांतून मोटर-वाहतुकीची सरकारी किंवा खाजगी आगगाड्यासच चढाओढ भासूं लागली, व त्यांनींच या वाढत्या धंद्यास नियमन हवें असें सुचविलें.हिंदुस्थानांतही आगगाडयास मोटरवाहतूक बाधते;या दृष्टीनेंच या धंद्यास नियमन घालण्याची कल्पना निघाली. मिचेल-कर्कनेस कमिटीनें केलेली पहाणी व त्यानंतर भरलेल्या सभेंत सरकारी सभासदांनीं मांडलेल्या सूचना या धोरणास अनुसरूनच होत्या. परंतु फक्त मोटर–वाहतुकीपुरतेंच नियमन करण्यांत आगगाड्यांचा तेवढा फायदा होणार, असें त्या सभेंतील प्रांतिक प्रतिनिधींस वाटल्यावरून त्यांनीं नियमनाच्या योजनेस नापसंती दर्शवून ती स्वीकारण्याचें नाकबूल केलें. परंतु मोटर-वाहतुकीच्या दृष्टीनें हे नियमन व नियंत्रण असणें जरूर असून, बाहेरून असें नियमन झाल्याशिवाय वाहतुकीचा धंदा सुव्यवस्थित रीतीनें चालणार नाहीं हें उघड आहे. या धंद्यांत पडलेले व पडणारे लोक अशिक्षित व असमर्थ असे असल्यानें, नुसत्या धंद्यांतील चढाओढीनें सर्व दोष केव्हां तरी नाहींसे होतील अशी आशा बाळगणें व्यर्थ आहे. सध्यां "य धंद्यांत अगदीं अनावश्यक अशी चढाओढ चालू आहे." असें नुसतें म्हणूनही भागत नाहीं. या गोष्टी सुलभ रीतीनें सिद्ध करतां येणार नाहींत. परंतु धंद्याची सध्यांची नफा मिळविण्याची अपात्रता, सध्यां अस्तित्वांत असलेले भाड्याचे दर, प्रत्येक मोटरमालकाजवळ असणारी मोटरींची संख्या, किंवा धंद्यांत शिरणारे व त्यांतून झटपट बाहेर पडणारे लोक यांची संख्या, यासंबंधानें आम्हीं केलेलें संशोधन "सध्यांची धंद्याची परिस्थिति अव्यवस्थित असून ती सुधारण्यास धंद्याबाहेरील लोकांनींच (सरकारनें) नियंत्रण घालून सुधारेल" या उक्तीस पुष्टि देते.

धंद्याचें नियंत्रण बाहेरून व्हावें, या प्रश्नाचा निरनिराळ्या चार दृष्टींनीं विचार करितां येईल. (१) मोटर बसा वापरणारे उतारू, (२) सरकार (३) मोटर-मालक व (४) मोटरींची चढाओढ भासणारे इतर वाहतुकीचे प्रकार. मोटर बसा वापरणाऱ्या व इतर लोकांच्या संरक्षणासाठीं वाहतुकीसंबंधींचे पोलिसत्याचे नियम आहेतच. यासंबंधांत मोटरच्या वेगावर नियंत्रण असावें असें आम्हीं सुचविलेंच आहे. आपल्याकडील आडवाटा मोटरीसारख्या फार वेगाच्या वाहनांसाठीं तयार केलेल्या नसल्यानें त्यावरून जाणाऱ्या वाहनांसाठीं वेगासंबंधींचे विशेष नियम असणें जरूर आहे. हे रस्ते हळूहळू चालणाऱ्या वाहनांसाठीं म्हणूनच बांधिलेले आहेत; त्यांच्यांत सुधारणा करावयाची असली तरी ती मोटरीसारख्या वेगाच्या वाहनांच्या जरूरीपुरती होणें शक्य नसल्यानें, वेगावरच नियंत्रण घालणें जास्त सुलभ होईल. न्यूझीलंडच्या रस्ते-खात्यास असाच अनुभव आला असें त्यांनीं काढिलेल्या निष्कर्षावरून दिसतें.

(१) न्यूझीलंडमधील खेडेगांवचे रस्ते जास्त वेगाच्या वाहनास उपयोगी नाहींत; कारण अशा वाहनास लागणारा रस्त्याचा पृष्ठभाग, व त्यांची एकंदर बांधणी या रस्त्यावर नाहीं. (२) मोटरींचा उपयोग करणारांस अशा परिस्थितींत धोका कमी व्हावा, म्हणून मोटरींच्या वेगावर नियंत्रण घालून त्याबद्दलचे नियम पाळले जातील अशी खबरदारी घ्यावयास पाहिजे; तसेंच उतारूंच्या रस्त्यांचा उपयोग करणाऱ्या जनतेच्या सुरक्षिततेसाठीं अपघात कसे होतात, याविषयींचीं कारणें व त्यांचें प्रमाण याबद्दल माहिती एकत्र करून निदान मोठ्या अपघातांची सार्वजनिकरीत्या (Public enquiry) चौकशी व्हावयास पाहिजे; व मुख्यत्वेंकरून (Maintenance) डागडूजी करून आम्हीं सुचविल्याप्रमाणें विल्याबद्दल सक्ति व्हावयास पाहिजे.

सरकारच्या दृष्टीनें महत्त्वाचा प्रश्न म्हणजे रस्ते सुस्थितींत ठेवण्याचा. मोटरींचे प्रकार किंवा वजन या विषयींचे नियम अस्तित्वांत आहेत, तरी प्रांतिक व इतर सरकारांच्या सध्यांच्या खालावलेल्या आर्थिक परिस्थितीकडे लक्ष देऊन, निदान ज्या वाटांवरील पृष्ठभाग हलक्या प्रतीचे आहेत अशा वाटांवरून ठराविक वाहनांसच वाहतुकीची परवानगी द्यावी. हलक्या प्रतीच्या रस्त्यावरून वाजवीपेक्षां जास्त व वजनदार माड्याच्या मोटरी जाऊं देणें रस्ताअधिकाऱ्यांच्या दृष्टीनें अपायकारक असते हें उघडच आहे. अशा वाटांवरून त्या वाटांस सोसवेल इतकीच वाहतूक होऊं देणें श्रेयस्कर, म्हणून रस्ते बांधणी व चालू स्थितींत ठेवण्याची आपली मगदुरी पाहून,त्याप्रमाणेंच रस्त्यावरून वाहतूक किती होऊं द्यावयाची हें ठरविणें चांगलें.

मोटरधंद्याच्या दृष्टीनें पाहिलें, तरी धंदा सदैव सुस्थितींत राहून त्यास बळकटी यावी यासाठीं देशांतील अशा प्रकारच्या नियमांची जरूरी आहे. नुसत्या आपसांतील चढाओढीनें धंद्याचें स्वरूप बदलून तो सुव्यवस्थित रीतीनें चालेल असा भरंवसा धरणें चुकीचें आहे, हें आतां सर्वत्र सिद्ध झालें आहे. "अनियंत्रित चढाओढीमुळें हा प्रश्न सुटणें शक्य नाहीं"असें अमेरिकेंतील अंतःप्रांतीय व्यापारी संमिति (Inter State Commerce Commission) नें आपलें मत व्यक्त केलें आहे, आंतरराष्ट्रीय व्यापारी मंडळाच्या (International Chamber of Commerce) तज्ज्ञांच्या कमिटींतही या एका बाबीसंबंधानें सर्वांचें एकमत पडलें. याबद्दल त्या कमिटीनें जीं कारणें दिलीं आहेत तीं अशीः–"अनियंत्रित चढाओढींत आगगाड्या व मोटरी या दोहोंसही वाहतुकीचे मार्ग व भाड्याचे दर यासंबंधांत स्वतंत्रता द्यावी लागते; याचें पर्यवसान वाहतुकीच्या साधनाची कार्यक्षमता कमी होते, त्यापासून सर्वांचें नुकसान तर होतेंच व राष्ट्राच्या हितासाठीं म्हणून जीं वाहतुकीचीं साधनें ठेवलेलीं असतात त्यांची कार्यक्षमता चांगली रहावी म्हणून राष्ट्राच्या तिजोरींतून त्यांस मदत करण्याची पाळी येते" धंदा सुस्थितींत राहावा, सुव्यवस्थेंत असावा, म्हणून नियम करावे लागले, तरी ज्यामुळें धंद्यांत इतरांचें पाऊल पडणें अशक्य होऊन ज्यांच्या हातीं धंदा असेल त्यांस जनतेकडून वाजवीपेक्षां जास्त पैसा काढणें शक्य होईल असें मात्र होऊं नये.

वाहतुकीच्या इतर साधनांच्या दृष्टीनें (unfair) अयोग्य चढाओढ होणार नाहीं अशा प्रकारचे निर्बंध घातले पाहिजेत. रस्ता-संमेलन व इतर भागांतून आगगाड्यांचें हित म्हणजे जणू राष्ट्राचें हित असें दर्शविण्यांत आलें. आगगाड्यांचे सरकारी सभासद, सरकारचे फडणीस व इतरांनीं आगगाड्यांच्या उत्पन्नांत कमतरता भासणें म्हणजे देशाच्या उत्पन्नांत नुकसान होण्याइतकें वाईट, असें भासवि-

ण्याचा प्रयत्न केला, या म्हणण्यावर विश्वास बसत नाहीं. सर्व प्रकारच्या वाहतुकीच्या साधनांचें संघटन घडवून आणणें राष्ट्राच्या हिताचेंच होईल, परंतु हें संघटन घडवून आणतांना सरकारी किंवा खाजगी आगगाड्यासाठीं इतर साधनापेक्षा निराळी योजना करण्याचें कारण नाहीं. आगगाड्या सरकारच्या असल्या तर त्याजपासून होणारा फायदा कोणाही एका अगर जास्त व्यक्तींचा न होतां सरकारच्या किंवा राष्ट्राच्या तिजोरींत तो जमा होतो. असें असलें तरी आगगाड्यांचे हिशेब किंवा त्यांपासून होणाऱ्या उत्पन्नाच्या बाबी वेगळ्या ठेवल्या पाहिजेत असें नाहीं. ज्या ज्या ठिकाणीं आगगाड्या सरकारच्या मालकीच्या आहेत, त्या त्या ठिकाणीं मोटरवाहतुकीवरील निर्बंध जास्त कडक असतात असें दिसून येतें. वरवर पाहतां अशी परिस्थिति जरी योग्य आहे असें भासलें, तरी अर्थशास्त्रदृष्ट्या ती बरोबर नाहीं.

वाहतुकीच्या नियंत्रणासाठीं जें नवीन धोरण स्वीकारावयाचें, त्याचें स्वरूप तरी कसें असावें असा येथें प्रश्न उद्भवतो. सध्यांच्या चढाओढीच्या काळांत योग्य व वाढत्या धंद्यास उपयुक्त अशा प्रकारचें धोरण स्वीकारावयाचें असल्यास नवीन नियम करतांना ते धंद्यास फारसे बंधनकारक न होतील असे पाहिजेत. आगगाड्या जरी राष्ट्रीय असल्या, तरी तेवढ्या एका कारणासाठीं मोटरवाहतुकीवर कडक निर्बंध घालणें योग्य होणार नाहीं. आगगाड्यांच्या व्यवहारांत राष्ट्राचा बराच पैसा ओतलेला असल्यानें मोटरवाहतुकीवर असे निर्बंध घातले पाहिजेत कीं जेणेंकरून मोटरवहातुकीपासून आगगाड्यांच्या उत्पन्नांत एकदम कमतरता भासणार नाहीं हें म्हणणें योग्य आहे, व म्हणून फरक घडवून आणावयाचे झाल्यास ते हळूंहळूं घडवून आणावे. आमचें म्हणणें इतकेंच कीं, जेथें नवीन योजना करण्यासाठीं जुन्याचा समूळ नाश किंवा जुन्यांत परिस्थित्यनुरूप फरक घडवून आणावयाचे असतील, तेथें, हळूंहळूं कां होईना पण योग्य ते बदल व्हावयास पाहिजेत.

नियंत्रणाची नवी योजना लवचिक व प्रगमनशील अशी असावी. त्यांत कोणत्याही प्रकारच्या वाहतुकीच्या साधनास पूर्ण मज्जाव असतां कामा नये; व त्यामुळें कोणत्याही एका व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या हातीं धंदा सर्वस्वीं जाईल असें होऊं नये. कोणत्याही वाटेवरील वाहतूक फक्त आगगाड्या किंवा एकादी कंपनी याजकडे ठेवण्यांत शेवटीं जनतेचें नुकसानच जास्त होईल. मिचेल-कर्कनेस रिपोर्टांत एकाच कंपनीस अगर व्यक्तीस कांहीं वाटांवरून वाहतुकीचे कुल-अधिकार दिल्याचें दाखविलें आहे. जेथें वाहतुकीच्या रस्त्यावरील डागडुजी वगैरेची जबाबदारी वाहतूक करणाऱ्यांवरच असते अशा ठिकाणीं वाहतुकीसंबंधीचे कुल-अधिकार देण्यांत येतात.आपल्याकडे अशी परिस्थिति कोठेंच नाहीं. ज्या मार्गावरून नवीन वाहतूक सुरू करावयाची असेल किंवा ज्या मार्गावर वाहतूक किफायतशीर होत नसेल, अशा ठिकाणीं वाहतुकीचे पूर्ण अधिकार कोणा व्यक्तीस किंवा कंपनीस देणें इष्ट होईल. आपल्या टापूत सर्व रस्ते सरकारी खात्याच्या ताब्यांत असून सर्व रस्त्यांवरून मोटरधंदा करणारी लोकांची संख्या ही पण बरीच असल्यानें एका व्यक्तीस किंवा कंपनीस वाहतुकीचे सर्वाधिकार देण्याचें कांहींच कारण नाहीं. सर्वाधिकारांचा लोक कसा वाईट उपयोग करून घेतात हें सांगण्याची जरूरी नाहीं. त्यापासून सरकारी नोकरवर्गास लांच खाण्याच्या संधी लागतात, कंपनीवर नियंत्रण ठेवणें जड जातें, व कंपनी उतारूस भाड्याच्या व इतर बाबतींत बराच त्रास देऊं शकते; असे बरेच दुरुपयोग होण्याचा संभव असतो. मोटरवाहतूक वाढीस लागण्यापूर्वी निरनिराळ्या आगगाड्यांपासून

जनतेस अशा प्रकारचा त्रास होत होता हें सर्वश्रुत आहे व लहानलहान वाटावरून वाहतुकीबद्दलचे सर्वाधिकार दिल्यास ते जास्तच जाचक होण्याचा संभव आहे.

मिचेल-कर्कनेस अहवालांत मोटर-वाहतुकीसाठीं (zoning) कांहीं ठराविक अंतराच्या वाटा नेमून देण्याविषयीं सूचना केलेली आहे; हें अंतर ५० मैलांचें असावें असें ते सुचवितात. आपल्या ह्या टापूत तरी ही सूचना अव्यवहार्यच ठरेल. या टापूंत आगगाडीपासून दूरचे असे बरेच रस्ते आहेत. ज्या ठिकाणीं आगगाडीचे रस्ते आहेत. तेथें ते असे वेडेवाकडे घातले आहेत, कीं त्यापासून प्रवासांत सोईपेक्षां गैरसोयच अधिक होते. एम. एस. एम. रेल्वेच्या वाटेवरील बरींच स्टेशनें गांवापासून दूर अंतरावर असल्यानें आगगाडीतून उतरल्यानंतर पुन्हां मोटरीनें किंवा तांग्यानें प्रवास करण्याची पाळी येते. शिवाय कांहीं ठिकाणीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्यास मोटरीपेक्षां आगगाडीनें अंतर जास्त कापावें लागून, भाडेंहि पण जास्त द्यावें लागतें. उदाहरणार्थः—पुण्याहून सातारास जावयाचें झाल्यास आगगाडीनें ७८ मैल प्रवास करून १० मैल पुन्हा मोटरीनें प्रवास करावा लागतो; या प्रवासास निदान ६ तास तरी लागतात. मोटरीनें ६९ मैलाच्या प्रवासास वेळ जास्तींत जास्त ४ तास व भाडेंहि कमी. अहमदनगर-पुणें या दोन ठिकाणांतही असेंच होतें. आगगाडीनें ९९ मैल व वेळ ७ तास; मोटरीनें ७२ मैल जाण्यास लागणारा वेळ ४ तास व भाडेंहि कमी. अशा परिस्थितींत मोटरींची वाहतुक फक्त ठराविक अंतराच्या टप्प्यांत व्हावी असा नियम करणें गैरवाजवी होईल. अशा ठिकाणीं मोटरींस फेऱ्या करण्यास कक्षा करून देण्यांत काय शहाणपणा होणार ? पुन्हां रेल्वेनें प्रवास करावयाचा झाल्यास दिवसांतून एक दोनच कायम्या गाड्या असावयाच्या व त्या देखील वेळीं अवेळीं. मोटरी दिवसांतून कित्येक वेळां जातात. या कारणांकरतां वाटेचे मक्ते देणें, किंवा मोटरींनीं किती मैलाच्या कक्षेंत फिरावें हें ठरविणें हे दोन्हीही नियम फायदेशीर तर होणार नाहींतच; पण त्रासदायक मात्र होतील. म्हणून आमच्या मतें अशा प्रकारचे नियम न करतां फक्त निरनिराळ्या वाटांवरून वाहतुकीच्या गरजेप्रमाणें, व रस्त्यांच्या परिस्थितीप्रमाणें मोटरींची संख्या ठरवून त्या संख्येप्रमाणेंच मोटरीस परवाने देण्यांत यावे.

आतां वाहतुकीसंबंधीं इतर देशांतून कशा प्रकारचे नियंत्रणाचे नियम केलेले आहेत त्याबद्दल थोडा विचार करूः—

परकीय देशांतील नियंत्रण पद्धति

ग्रेटब्रिटन

ग्रेटब्रिटनमध्यें वहातुकीसंबंधीचे दोन कायदे आहेत. एक १९३० चा कायदा (Road Traffic Act) व दुसरा १९३३ सालचा कायदा (Rail and Road Transportation Act). पहिल्या कायद्यान्वयें वहातुकीच्या साधनांचें वर्गीकरण करून भाड्याकरितां चालणाऱ्या वाहनांना देण्यांत येणाऱ्या परवान्यासंबंधीं नियम बांधून दिलेले आहेत. अशा प्रकारचा परवाना मिळाल्याशिवाय कोणत्याही वाहनास भाड्याकरितां रस्त्यावरून फिरतां येत नाहीं. अशीं भाड्याचीं वाहनें सुदृढ स्थितींत आहेत किंवा नाहींत, हें पाहून त्यास परवाना देण्यांत येतो. व असा परवाना देतांना तें वाहन ज्या वाटेवरून फिरणार असेल, त्या वाटेवर नवीन वाहनांची कितपत गरज आहे, याचा विचार केला जातो. वाहनांचे परवाने मिळावण्याचें आधीं तीं वाहनें कोणत्या प्रकारचीं आहेत, त्यांचीं वेळापत्रकें व भाड्याचे दर वगैरे गोष्टींचा अर्जांत खुलासा करावा लागतो. वाहनांचे जास्तींतजास्त व कमींतकमी भाडें ठरविण्याचा, तसेंच गाडीवानांनीं किती तास काम करावयाचें व

उतारूंच्या सुरक्षिततेसाठीं कोणकोणते नियम पाळावयाचे यासंबंधीं सूचना करण्याचा अधिकार कमिशनरांस दिला आहे. या कायद्यान्वयें तिऱ्हाइताच्या सुरक्षततेच्या विम्याचा नियम Third party risk भाड्याच्या मोटरीसच फक्त लावलेला नसून, तो खासगी मोटरीसही लागू केला आहे. दुसऱ्या कायद्यान्वयें मालाच्या भाड्याच्या मोटरींचें नियंत्रण ठेवण्यामाठीं नियम केलेले आहेत.

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें

येथें निरनिराळ्या संस्थानांतूनें असणाऱ्या कायद्यांत थोडा फार फरक सांपडतो,पण नियंत्रणाचे मुख्य मुख्य नियम बहुतेक सारखेच असल्यानें त्यांनील ठळकठळक खालीं दिले आहेत बहुतेक सर्व संस्थानांतून भाड्यांच्या मोटरीस परवाने मिळवावे लागतात. हे परवाने ज्या मानानें लोकांस जास्त वाहनाची गरज असेल, त्या मानानें देण्यांत येतात; बहुतेक संस्थानांतून तिऱ्हाइताच्या सुरक्षततेचा विमा काढावा लागतो. मोटरींचे वेग ठराविकच राहावेत म्हणून एंजिनावर (Speed Governor) वेग नियंत्रक बसवावा लागतो. भाडीं सरकारी नियमाप्रमाणें जास्तींत जास्त किंवा कमींत कमी ठरविल्याप्रमाणें घ्यावीं लागतात. एकाद्या रस्त्यावर मोटरी चालविण्याचा परवाना मिळविल्यानंतर, ठरावाप्रमाणें,वेळापत्रकाप्रमाणें गाड्या चालवाव्या लागतात. यांत कांहीं फेरबदल करावयाचा असल्यास किंवा सर्व्हिस बंद करणें साल्यास, परवानगीशिवाय तसें करतां येत नाहीं. भाड्यांच्या मोटरीवरील कामकऱ्यांचे कामाचे तास व वेतनासंबंधीं सरकारी नियमाप्रमाणें तरतूद करावी लागते. अपघातासंबंधीं सर्व प्रकारची माहिती मोटरमालकानें कमिशनरांस पुरवावी लागते. कमिशन जेथें जेथें मोटरींत आपसांत चढाओढ चालत असेल, तेथें तपास करतें, वगैरे वगैरे.

बेल्जियम (१९३१ चा कायदा)

मोटरी भाड्यानें चालविण्याच्या पूर्वी परवाना मिळवावा लागतो. हा परवाना देतांना मोटरी कोणत्या रस्त्यावर चालणार व त्या रस्त्यावर जास्त मोटरींची जरूरी आहे किंवा नाहीं, याचा विचार करून मग परवाना दिला जातो. बेल्जियममध्यें आगगाड्यांना जास्त महत्त्व दिलें आहे. लोहमार्गाच्या समांतर जाणाऱ्या नवीन रस्त्यावरून अथवा वाटावरून मोटरींची वाहतूक होऊं देत नाहींत. जेथें मोटरीच्या वाहतूकीमुळें रेल्वेजचें नुकसान होतें असें दिसेल तेथें रेल्वेजना नुकसानभरपाईबद्दल मागणी करण्याचा अधिकार ठेविलेला आहे.

जर्मनी (१९३१ चा कायदा)

निरनिराळ्या वाटांवरील परिस्थितीस लागतील तेवढ्याच मोटरीस परवाने मिळतात. मोटरी चालविण्याचे पूर्वी परवाने घ्यावे लागतात. विम्याची सक्ती आहे. गाड्यांचीं वेळापत्रकें व निरनिराळ्या ठिकाणचीं भाडीं ठरविलीं जातात. भाड्यांच्या बाबतींत सर्व देशभर भाड्यांचे दर व प्रमाण सारखे राहतील याबद्दल खबरदारी घेतली जाते. आगगाड्यांना हे मोटरींचे नियम लागू नसतात. त्यांना स्वतःच्या मोटर सर्व्हिसेस ठेवण्याचा अधिकार दिलेला आहे.

ऑस्ट्रिया (१९३१ चा कायदा)

उतारू व मालाच्या मोटरी या दोहोंसही परवाने लागतात. परवाने २५ वर्षांच्या मुदतीपर्यंतचे मिळूं शकतात. परवाने देण्याच्या आधीं देशांतील इतर धंदेवाईक संस्थांचा सल्ला घेतात. पोस्ट व रेल्वे यांना इतरांच्या आधीं परवाने देण्यांत येतात. भाडीं व वेळापत्रकें ठराविक असावीं लागतात. यांत कमी जास्त प्रमाण करण्याचे अधिकार ठेवलेले नाहींत.

हंगेरी (१९३० सालचा कायदा)

उतारूंच्या व मालाच्या मोटरीवर नियंत्रण आहे. परवाने मिळवावे लागतात,

व हे १० वर्षांपर्यंतच्या मुदतीचे मिळूं शकतात. सर्व्हिसांची जनतेस अवश्यकता भासत असेल तरच परवाने दिले जातात, तसेंच परवाने मिळविलेले लोक इतर परवानेवाल्यांशीं उगीच चढाओढ करणार नाहींत याविषयीं खबरदारी घेतली जाते. परवान्याच्या बाबतींत रेल्वे व पोस्टखातें यांचा अगोदर विचार केला जातो. वेळापत्रकें व उतारूंचीं भाडीं ठराविक असावीं लागतात.

युरोपमधील इटाली, किंवा स्वित्झरलंड सारख्या देशांतून रेल्वे कंपन्यांनीं अगोदर पासूनच स्वतःच्या मोटर सर्व्हिसेस चालूं केल्या होत्या, व ज्या ठिकाणीं रेल्वेजपेक्षां मोटरी स्वस्त पडणें शक्य होतें अशा ठिकाणचे रेल्वेचे फाटे बंद केले होते.

कॅनडा

ही माहिती १९३२ सालच्या रॉयल कमिशन ऑन रेल्वेज व ट्रान्सपोर्टेशनच्या रिपोर्टांतून घेतली आहे. (पान ९७)

"परवाने घ्यावे लागतात. वेळापत्रकें व भाड्याचे दर ठराविक ठेवावे लागतात. परवाने दरवर्षी बदलून घ्यावे लागतात. उतारूंना होणाऱ्या अपघातासाठीं वगैरे विमा काढावा लागतो." विम्याच्यासंबंधीं रस्त्याच्या खात्याच्या दिवाणांनीं खालीलप्रमाणें उद्गार काढले आहेत. "याबद्दल सक्ती झाल्यापासून अपघात कमी होतात व मोटरीहि पण जास्त सुदृढ स्थितींत असलेल्या आढळून येतात. मोटर मालक व ड्रायव्हर्स जास्त काळजीपूर्वक वागतात व गाड्या भरमसाट वेगानें सोडल्या जात नाहींत."

मालाच्या मोटरीसंबंधांत नियम केलेले आढळून येत नाहींत.

न्यूझीलंड (१९३१)

येथेंही परवाने देण्याची प्रथा आहे. परवाना देण्यापूर्वी जनतेच्या दृष्टीनें सर्व्हिसची जरूरी आहे कां, व ज्या भागांत सर्व्हिस चालणार असेल तेथील वाहतुकीची साधनें किती आहेत, यासंबंधीं विचार केला जातो. तसेंच परवाना देणारा अधिकारी अर्जदाराची आर्थिक परिस्थिति कशी काय ते हे यासंबंधींही विचार करतो; कारण सर्व्हिस निघाल्यावर ती लगेच बंद पडतां कामा नये; त्यापासून उतारूंस त्रास होण्याचा संभव असतो. अर्जदारास आपलीं वेळापत्रकें व भाड्याच्या दराचीं कोष्टकें सादर करावीं लागतात. मालाच्या वाहतुकीसंबंधाचे नियम जारी नाहींत.

साऊथ आफ्रिका (१९३०)

ट्रॅन्स्पोर्टेशन बोर्डानें कोणकोणत्या रस्त्यावर किती मोटरी चालविण्यास परवानगी द्यावयाची हें ठरवावयाचें असतें, व त्या प्रमाणें निरनिराळ्या वाटावरील निरनिराळ्या वाहनांना परवाने दिले जातात. एका प्रकारच्या वाहनाची दुसऱ्या प्रकारच्या वाहनाशीं उगीच चढाओढ होणार नाहीं याबद्दल काळजी घेण्यांत येते. भाडीं व वेळापत्रकें ठराविक असावीं लागतात.

परवान्याच्या पद्धतीचे प्रकार

येथपर्यंत आलेल्या माहितीवरून वाहतुकीसंबंधांत इतर देशांतून कशा प्रकारचे नियम केलेले आहेत हें समजून येईल. प्रथमतः कोणत्याही प्रकारच्या भाड्याच्या वाहनास "चलन" परवाना मिळवावा लागतो. असा परवाना देतांना तें वाहन कोणत्या वाटेवर चालणार याबद्दल शोध करून त्या वाटेवर तशा प्रकारच्या वाहनाची किती अवश्यकता आहे याची तपासणी करून मग परवाना दिला जातो. परवाने कांहीं वर्षांच्या मुदतीचे दिले जातात, व कोणत्याही एका वाटेवर जरूरीपेक्षां जास्त वाहनें चालविण्यास परवानगी देण्यांत येत नाहीं. परवानगी देतांना मोटर अगर सर्व्हिसच्या मालकाची आर्थिक परिस्थिति कशी आहे याचीही पण तपासणी करण्यांत येते. भाडीं आवाक्याबाहेरचीं नाहींत हें पाहण्यांत येतें. मोटरी वेळापत्रकाप्रमाणें चालतात किंवा नाहीं यांकडे लक्ष असतें.

उतारूंस अपघाताचे प्रसंगीं जखम झाल्यास किंवा त्यांचें इतर नुकसान झाल्यास या नुकसानाची भरपाई व्हावी म्हणून मोटरमालकांनीं विमा काढलाच पाहिजे असे नियम आहेत. तसेंच मोटरीवर काम करणाऱ्या लोकांच्या सोयीही पाहण्यांत येतात. त्यांच्या कामाचे तास व वेतनाचें प्रमाण नियमाप्रमाणें आहे किंवा नाहीं हें पाहण्यांत येतें. एकंदरींत देशांतील जनतेच्या दृष्टीनें उतारूंस कमींतकमी त्रास व जास्तींतजास्त सुखसोयी जेणेंकरून मिळतील असें धोरण ठेवण्यांत आलेलें दिसतें. मोटर-मालकांच्या किंवा त्या धंद्यांतील लोकांच्या दृष्टीनेंही चढाओढ कमी झाल्यानें त्यांस धंद्यांत नुकसान येणार नाहीं असें केलें आहे.

प्रत्येक वाटेवर उतारूंच्या जरूरीप्रमाणेंच मोटारी ठेवण्यानें आज सर्वत्र जी अव्यवहार्य चढाओढ दिसून येते, ती थांबेल. आजच्या परिस्थितींत कोणीहि ५००–७०० रु. गोळा करावे, मोटर खरेदी करावी व कोणत्याही वाटेवर ती चालवावी असें झालें आहे. या योगानेंच चढाओढ वाढत राहते, व धंद्यांतील सर्वांचीच परिस्थिति शोचनीय होत जाते. प्रत्येक वाटेवरील मोटरींच्या संख्येचेंच नियंत्रण केल्यानें चढाओढ आपोआप थांबेल. तसेंच प्रत्येक वाटेवरील मोटरींवर जास्त लक्ष ठेवतां येईल. सुरवातीला कोणत्या मोटरींचे परवाने काढून घ्यावयाचे,व कोणत्या मोटरींचे चालूं ठेवावयाचे हें ठरवितांना थोडेंफार कठीण होईल; पण त्यास इलाज नाहीं. मोटरींची संख्या कमी केल्यानें मालकांत आपसांत सहकार्य जास्त वाढून धंद्याचे दृष्टीनें सुधारणा घडवून आणतां येतील, आणि हाच सध्यांच्या परिस्थितील मोठा दोष असल्यानें, तो आपोआप नष्ट होईल. मोटरसंख्येच्या नियंत्रणानें रस्ता अधिकाऱ्यासही पुष्कळसें सोईचें होईल. प्रत्येक वाटेवरील मोटरींची संख्या ठरवितांना रस्ता अधिकाऱ्यांस त्या वाटेची स्थिति, दुरुस्ती अगर नादुरुस्ती पहावी लागेल. वाटेवरील मोटरींची संख्या ठरवीत असतांना साजगी मोटरींची संख्या ठरविता येणार नाहीं. परंतु आपल्याकडे मोटरींची संख्या फारशी नसल्यानें त्यांच्या योगानें रस्ते खराब होण्याचा संभवच मुळीं कमी. वाईट रस्त्यावरून मोटरींच्या वहातुकीचें प्रमाण अशा रीतीनें ठरविलें गेल्यास लोकल बोर्डासारख्या संस्थांच्या तक्रारीही कमी होतील व त्यांना रस्तादुरुस्तीवर होणाऱ्या खर्चाचें मान ठरविण्यास मदत होईल. प्रत्येक वाटेवरील मोटर संख्येचें नियंत्रण झाल्यास कांहीं वाटावरून वर्षांतील कांहीं ऋतूंत मोटरी कमी पडण्याचा संभव आहे, परंतु अशा कांहीं ऋतूंत त्या वाटावरून जास्त मोटरी सोडण्याचे परवाने देतां येतील;तसेंच जत्रा वगैरेच्या वेळींहि जास्त मोटरी सोडतां येतील. वर्षांतून कांहीं दिवस एकाद्या वाटेवरून जास्त मोटरींची जरूर भासते म्हणून सर्वच वाटांवर सर्व वेळीं मोटरींची अनियंत्रित संख्या रहावी हें म्हणणें सुयुक्तिक वाटत नाहीं.

आमच्या मतें मोटरींचे परवाने देण्यापूर्वी खालील गोष्टींचा विचार करून परवाने देण्यांत यावे. (१) मोटर कोणत्याही प्रकारें नादुरुस्त नसावी. (२) प्रत्येक मोटर कोणत्या वाटेवर चालणार, तसेंच मोटरींचें वेळापत्रक व भाड्याचा तक्ता हीं ठरविलेलीं असावींत. (३) रस्ता अगर वाट कशा स्थितींत आहे हें ठरवून त्याप्रमाणें त्या वाटेवरून मोटरींनीं किती खेपा करणें श्रेयस्कर होईल हें ठरविलें पाहिजे.अशा प्रकारानें मोटरींच्या खेपा कमी केल्यास उतारूंस त्रास देणें संभवनीय असलें, तरी मोटरींचीं वेळापत्रकें ठरविल्यानें जो फायदा होणार आहे त्या मानानें हें नुकसान फारसें भासणार नाहीं. वेळापत्रकांच्यामुळें मोटरी बाजवीपेक्षां जास्त वेगानें सोडल्या जातात किंवा काय हें ठरविणेंही शक्य होईल. (४) मोटरींची आपसांतील चढाओढ कमी कर-

ण्यासाठीं भाड्याचे तक्के तयार करून त्याप्रमाणें मालकास भाडें घेण्यास भाग पाडणें अत्यंत जरूर आहे. हीं भाडीं ठरवितांना त्यांत कमींत कमी व जास्तींत-जास्त किती भाडें घ्यावें ह्या दोन्ही गोष्टींचा उल्लेख असणें जरूर आहे. मालाच्या मोटरींचे किंवा उतारूंच्या मोटरींतून जाणाऱ्या मालाचे नेण्या-आणण्याचे दर (भाडीं) ठरविणें कठीण आहे, व ती तशी ठरविण्याची अजून वेळही पण आलेली नाहीं. उतारूंच्या मोटरींतून माल नेण्यास परवानगी असते, परंतु मालाच्या मोटरींत मात्र उतारूंची ने-आण करतां येत नाहीं, अशी मालाच्या मोटरवाल्यांची तक्रार असते, व ती पुष्कळ अंशीं मुद्यांस धरून आहे.

मोटरधंद्यांतील नोकरवर्गासाठीं म्हणून कांहीं नियम करणें जरूर आहे. कारण नोकरवर्गाच्या कामावर उतारूंचें तसेंच मोटरमालकांचें नुकसान किंवा फायदा हीं अवलंबून असतात. मुंबई मोटर कायद्याच्याअन्वयें अशा प्रकारचे नियम करण्यास जिल्हा पोलिस अधिकाऱ्यांस अधिकार दिलेले आहेत. पण या अधिकाऱ्यांवरच फक्त सर्व भिस्त न ठेवतां यासंबंधांत रस्त्यांसंबंधींच्या कायद्यांतच कांहीं तरी तरतूद करावयास पाहिजे. इंग्लंडमधील कायद्याप्रमाणें मोटरड्रायव्हरास एकसारखें एकाच वेळीं ५॥ तासापेक्षां जास्त किंवा २४ तासांत ११ तासांपेक्षां जास्त काम करण्याची परवानगी नाहीं व याच कायद्यान्वयें ड्रायव्हरास २४ तासांत १० तास तरी सतत विश्रांति मिळाली पाहिजे असें कलम घातलें आहे. आपल्या इकडेही अशा तऱ्हेचा कायदा फायदेशीरच होईल व त्यापासून मोटर-मालकांचा कोणत्याही प्रकारें तोटा होण्याचा संभव नाहीं.

नोकरवर्गाचे पगार ठरविण्यासाठीं कायदा करण्याची अद्याप कांहीं जरूरी भासत नाहीं. परंतु या धंद्यांत असलेल्या लोकांसाठीं विम्याची तरतूद करणें मात्र अवश्य आहे. आपल्याकडे कामकऱ्यांसाठीं नुकसानभरपाईचा कायदा नसल्यानें त्यांच्या सुरक्षिततेसाठीं म्हणून विम्याच्या योजनेची जरूरी आहे.

या सर्व गोष्टीप्रमाणेंच मोटरमालकांस रोजच्या प्रवासाबद्दल कांहीं ठोकळ गोष्टींचें टिपण ठेवण्यास लावून तें ठराविक मुदतीनंतर पोलीस किंवा इतर कोणत्यातरी अधिकाऱ्यांकडे दाखल करण्यासंबंधीं कांहीं योजना करणें जरूर आहे. अशा प्रकारची माहिती गोळा करण्यापासून एकतर मोटर-वाहतुकीवरील नियंत्रण करण्यास सोपें जाईल व धंदा व वहातुकीसंबंधीं बरीचशी उपयुक्त माहिती सहजगत्या एकत्रित होत राहील.

प्रकरण ९ वें

सारांश व सूचना

उपलब्ध माहिती व आंकडे

१ सध्यां या धंद्यासंबंधाचे सरकार-मार्फत जे आंकडे व महत्त्वाची माहिती उपलब्ध आहे त्यांत कांहीं फेरफार करून ते प्रकाशित केले तर जास्त उपयुक्त होतील. हे फेरफार खालीलप्रमाणें व्हावेतः—

(अ) "जास्त वजनदार मोटरी" या सदराखालीं येणारी माहिती इतर प्रांतांतून व इलाख्यांतून जशी देतात तशीच मुंबईसरकारनेंही द्यावी.

(आ) "मोटर-मालकांचे परवाने" या सदराखालीं दिल्या जाणाऱ्या माहितींत जास्त स्पष्टीकरण करून त्यांत "नव्या मोटरीचा परवाना" व जुनी मोटर परंतु एका मालकानें दुसऱ्यास विकल्यामुळें दिला जाणारा 'नवीन परवाना' असें स्पष्ट दोन भाग दाखवावे.

(इ) मोटर एका मालकाकडून दुसऱ्याकडे गेल्यास तसें स्पष्ट दाखवावें. तसेंच अगदीं नवीन मोटरी वेगळ्या दाखवाव्या; हे दोन्ही प्रकार एकत्र दाखवूं नयेत.

२ अपघात, त्यांची संख्या व ते होण्याचीं तपशीलवार कारणें यांचा पोलिस रिपोर्टींतून समावेश होत नाहीं. किंवा पोलिसांकडून ही माहिती गोळा केलीही जात नाहीं. ही माहिती गोळा होऊन या रिपोर्टींतून अवश्य यावयास पाहिजे.

३ वाहतुकीची पाहणी व वाहतुकीचें मोजमाप या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. अशा पाहणीची व मापनाची माहिती उपलब्ध असल्याशिवाय वाहतुकीची वाढ कशी होते व त्या मानानें रस्ते-दुरुस्ती किंवा नवीन रस्त्यांचें बांधकाम कसें व्हावयास पाहिजे, रस्त्यावरील वाहतुकींपैकी मोटरवाहतूक व इतर वाहतूक यावर लादण्यांत येणाऱ्या करांचें प्रमाण कसें ठरवावें, रस्त्यावरील वाहतुकीसंबंधींचे नियम व नियंत्रण कसें करावें, तसेंच निरनिराळ्या वाटांवरील वाहतुकीचें प्रमाण काय असावें या व इतर गोष्टी ठरविणें अशक्य आहे. तेव्हां अशा प्रकारची माहिती गोळा करून प्रसिद्ध करणें अत्यंत इष्ट आहे.

४ अशा प्रकारची माहिती एकत्रित करतां यावी म्हणून निरनिराळ्या वाटांवरून अस्तित्वांत असणाऱ्या दस्तुऱ्यांच्या मक्तेदाराकडील दप्तराचा उपयोग करून घेतां येईल अशी व्यवस्था व्हावयास पाहिजे.

रस्त्यांचें बांधकाम व त्यावर होणाऱ्या खर्चाची व्यवस्था

१ मध्यवर्ती सरकारचे, इलाखा सरकारचे व प्रत्येक इलाख्यांतील निरनिराळ्या जिल्हा लोकलबोर्डाचे असे रस्त्यांचे सध्यांचे प्रकार असून यांपैकीं निरनिराळ्या रस्त्यावरून होणाऱ्या दुरुस्तीच्या बांधकामाच्या खर्चांत प्रमाणबद्धता मुळींच नसते. जिल्हा लोकलबोर्डाच्या रस्त्यावर खर्च करण्यासाठीं नेहमींच पैशाची तूट पडते.

२ यामुळें मागील १० वर्षांत जिल्हा लोकलबोर्डाच्या रस्त्यांची स्थिति बरीच खालावलेली आढळून येते. रस्त्यांच्या दुरुस्त्या, नवीन रस्ते बांधकाम वगैरेवरील खर्च एकीकडे फार मोठ्या प्रमाणांत वाढला असून, जनावरें व वाहतुकीच्या साधनावरील करांचें उत्पन्न मात्र त्या प्रमाणांत वाढत नाहीं व प्रांतिक सरकारकडून मिळणाऱ्या मदतीच्या रकमेंत तर गेल्या कांहीं वर्षांत घट झालेलीच आढळून येते.

३ इलाखा सरकारचे ताब्यांतील रस्त्यांची वाढ खुंटलेली आढळते; त्यावर थोडीफार सुधारणा करण्यासाठीं खर्च

केलेला आढळून येतो. हा खर्च इलाखा सरकारचे तिजोरींतून व "रस्तानिधी" मधून होतो, परंतु चालू दुरुस्त्यावर होणाऱ्या खर्चाचें प्रमाण मात्र जितकें अवश्य आहे तितक्या प्रमाणांत ठेवलेलें आढळून येत नाहीं.

४ जिल्हा लोकलबोर्डाचे ताब्यांतील रस्त्यांच्या वाढींचें मोजमाप करतां येत नाहीं. परंतु त्यांत फारशी भर पडलेली नसावी. या रस्त्यांवरील दुरुस्ती व चालू खर्चाचें प्रमाण अवश्यकतेपेक्षां कमी आहे. व या रस्त्यांची परिस्थिति अगोदरच खालच्या दर्जाची असल्यानें हें खर्चाचें प्रमाण जास्त कमी असल्याचें भासतें. या रस्त्यांवरून मोटरवाहतुक तर दिवसें-दिवस वाढत असल्यानें व रस्ते वाईट असल्यानें त्यावरून होणाऱ्या रहदारीचें प्रमाण ठरविणें अवश्य आहे.

५ रस्त्यावरून बऱ्याच ठिकाणीं अद्यापपर्यंत पूल अगर दांड नसल्यानें बराच त्रास होतो, व त्यामुळें वाहतुकीचें मान वाढण्यासारखें असलें तरी वाढत नाहीं.

६ रस्त्यावरील वाहतुकीसंबंधींची माहिती अपूर्णच मिळण्यासारखी असल्यानें त्यावरून (रस्त्यावरील) एकंदर खर्चापैकीं मोटरवहातुकीवर कराचे रूपानें किती खर्च उभारावा हें ठरविणें अशक्य आहे.

७ अशा प्रकारची माहिती लवकर गोळा होणें अत्यंत आवश्यक असून या माहितीवरूनच कराचें प्रमाण ठरवितां येईल.

८ सध्यांचे परिस्थितींत मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकार व जिल्हा लोकलबोर्ड किंवा इतर संस्था यांच्या करांचें प्रमाण पाहिलें तर मोटरवाहतुकीवरील करांचे रूपानें होणारें उत्पन्न जितकें यावयास पाहिजे तितकें येतें असें म्हणावयास हरकत नाहीं.

९ सध्यांच्या मोटरीवरील वसूल होणाऱ्या करापैकीं बराच मोठा भाग हिंदुस्थान सरकारच्या तिजोरींत जमा होतो; व इतर मोटरीवरील कराच्या मानानें जड वजनाच्या मोटरीवरील कर प्रमाणबद्धतेच्या दृष्टीनें कमी बसतात, हे या करपद्धतींतील मोठे दोष आहेत.

१० चाकपट्टी व दस्तुऱ्यांच्या रूपानें कर वसुली न करता ती एकच प्रकारच्या प्रांतिक करानें वसूल होणें अत्यंत इष्ट आहे.

११ रस्ते स्वस्तांत बनवतां यावेत व नीट राखतां यावेत यासाठीं शास्त्रीय संशोधन होणें जरूर आहे.

१ या दृष्टीनें एकच मोटर बाळगून ती स्वतःच चालविणाऱ्या मोटर-मालकांचें प्रमाण एकंदर संख्येच्या मानानें जवळ जवळ निम्मे तरी भरेल. एकंदर मोटर-मालकांपैकीं स्वतः मोटर चालविणाऱ्या मालकांचा नक्की आंकडा ठरवितां येणें शक्य नसलें तरी त्यांची संख्या बरीच मोठी आहे यांत शंका नाहीं.

२ मोटरीच्या रोजच्या प्रवासाच्या मानांत (अंतराच्या दृष्टीनें) बराच फरक दिसून येतो. याचें मुख्य कारण म्हणजे लहानमोठे रस्ते व त्यावरील उताऱ्यांच्या वाहतुकीचें कमीजास्त प्रमाण. मोटरी रोज किती प्रवास करतात याचें प्रमाण ठरविणें कठिण आहे. संघशक्ति असल्यास एकेक मोटर बाळगणाऱ्या मालकास देखील बरेच लांबवरचे प्रवास करणें शक्य असतें.

विक्री व भांडवल

१. १९३१ सालापासून हल्ल्यानें विकल्या जाणाऱ्या नवीन मोटरींचें प्रमाण बरेंच कमी होत चाललें आहे असें आढळून येतें; परंतु वापरलेल्या गाड्यांच्या हमेबंदीनें विक्रीच्या प्रमाणांत मात्र भर पडत असलेली दिसून येते.

२ वापरलेल्या मोटरी विकण्याच्या अटी कांहीं व्यापाऱ्याकडून फार सवलतीच्या करण्यांत येत असल्यामुळें, ड्रायव्हर-वर्गापैकीं बरेच जणांस मोटरमालक बनून मोटर धंद्यांत पडणें सुलभ झालें आहे.

३ मोटरी विकत घेतांना लागणारें भांडवल बहुतकरून उधारीनें किंवा कर्जाऊ काढलेलें असतें.

४ मोटरविकेते व या धंद्यांतील सावकार हे बरेच वेळ एकच असतात.

वाहतूक

(१) वाहतुकीच्या संबंधींचे आंकडे किंवा माहिती मिळूं शकत नाहीं. रेल्वे अधिकाऱ्यांनीं किंवा सरकारनें अशा प्रकारची माहिती एकत्रित केली असल्यास ती प्रकाशित व्हावयास पाहिजे.

२ मोटरींच्या सरंजामांत बऱ्याच अंशीं कमतरता दिसून येते. यंत्रसामुग्री चांगली किंवा दुरुस्त नसल्यानें नेहमी मोडतोड होते, तसेंच ड्रायव्हरांस यांत्रिक ज्ञान पुरेसें नसल्यानेंही मोडतोड होते व खोळंबा होतो.

३ मोटरी सुटण्याची व ठराविक मुक्कामास पोहोंचण्याचीं वेळापत्रकें मुळींच नसतात.

४ अपघात कां व कसे होतात याचीं कारणें निश्चित करणें महत्त्वाचें आहे.

५ मोटर-मालकानें अगर चालविणाऱ्यानें अपघात होतांच त्याबद्दल अधिकाऱ्यांकडे ताबडतोब वर्दी दिलीच पाहिजे असा नियम असणें जरूर आहे.

६ निदान मोठ्या अपघातासंबंधीं तरी सरकारी चौकशी झाली पाहिजे. तसेंच ड्रायव्हरांनीं दिवसांतून किती तास काम करावें याविषयीं नियम होणेंही आवश्यक आहे.

७ मोटरी जास्तींत जास्त किती वेगानें चालवाव्यात याविषयीं कडक निर्बंध असणें आवश्यक असून, त्या जास्त वेगानें चालविता येऊंच नयेत म्हणून त्यांवर वेगनियंत्रकासारखी एकादी यांत्रिक योजना करणें जरूर आहे.

८ मोटरमालकांनीं हीं यंत्रें सुस्थितींत बाळगिलीं पाहिजेत असा नियमच असावा.

९ भाड्याच्या मोटरीसंबंधांत उतारू, नोकरवर्ग व अन्यस्थ यांच्या सुरक्षिततेसाठीं म्हणून विम्याच्य योजनेची साकि झाली पाहिजे.

मोटरतळ

१ बहुतेक मोटर-मालकाजवळलि मोटरींच्या संख्येचें प्रमाण लहान असून त्यांस स्वतःचे मोटर तळ ठेवणें अशक्य असल्यानें म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्ड यांनीं मोटरतळांची व्यवस्था करणें जरूर आहे. तसेंच मोटरतळांवर उतारूंसाठीं म्हणून सर्व आवश्यक अशा सोयीही करणें जरूर आहे.

मालाची वाहतूक

१ कांहीं जिल्ह्यांतून मोटरीनें मालाची वाहतूक करण्यास परवानगी दिलेली नसते, तर कांहीं ठिकाणीं अमूक एक वजनापेक्षां मोटरी कांहीं रस्त्यावरून चालविण्याचीच परवानगी नाहीं किंवा घाटांतील रस्त्यावरून रात्रींचे वेळीं व वर्षांतील कांहीं महिने मोटरींची वाहतूक बंद ठेवल्यामुळें मोटरीनें मालाची वाहतूक व्हावी तेवढ्या मोठ्या प्रमाणांत होत नाहीं.

२ फक्त मालाची वाहतूक करणाऱ्या अशा मोटरी फारच थोड्या आहेत. मालाची वाहतूक उतारूंच्या मोटर बसांमधूनच जास्त प्रमाणांत होते. उतारूंच्या मोटरींतून एका बाजूनें माल व दुसऱ्या बाजूनें उतारू अशी वाहतूक होते, किंवा उतारू मोटरींत घेऊन राहिलेल्या जागेंतही माल भरला जातो.

३ मालाच्या वाहतुकींत लवकर नासणाऱ्या मालाची १५-२० मैलाच्या कक्षेंत मोटरीनें बरीच वाहतूक होते. ज्या ठिकाणीं रेल्वेचे दर किंमती मालावर जास्त ठेविलेले असतात तेथें लांबवरच्या पल्ल्यापर्यंतही मोटरीनें अशा मालाची वाहतूक होते.

वाहतुकीच्या इतर साधनांशीं होणारी मोटरींची चढाओढ

१ आगगाड्यांशीं होणारी चढाओढ बहुतेक उतारूंचीच असते. आगगाडीच्या रुंद वाटांवर जवळच्या अंतरावरील

ठिकाणांतच ही चढाओढ जास्त दृग्गोचर होते. मध्यम व अरुंद वाटा व लोहमार्गांची गरसोयीची आंखणी जेथें आहे तेथें मोटरींची चढाओढ बऱ्याच लांबच्या अंतरावरील ठिकाणांतूनही दिसून येते. जेथें सडका व आगगाड्या समांतर असतात तेथें ही चढाओढ जास्त असते.

२ उतारू किंवा माल यासंबंधानें होणाऱ्या चढाओढीमुळें आगगाड्यांचें अद्यापपर्यंत फारसें नुकसान झालेलें आढळून येत नाहीं.

३ शेतकीपिकाच्या वहातुकीचे बाबतींत मोटरींना अजून फारशी वाहतूक मिळतेसें दिसत नाहीं. बैलगाड्यांशी मात्र लवकर नासणाऱ्या मालाचे बाबतींत मोटरींची चढाओढ आहे.

४ या भागांतील शेतकऱ्यांस शहरांतून (विशेषतः मुंबई शहर) मोटरींच्या वाढत्या वाहतुकीच्या प्रमाणामुळें मात्र बरेंच नुकसान पोहोंचलें आहे.

तरी धंद्यांतील घटक

१ तरींवरील नाविक पुष्कळ वेळां मोटरी पलीकडे नेण्यास वेळेवर हजर नसतात व कांहीं वेळां ठराविक भाड्यापेक्षां कितीतरी जास्त भाडें घेतल्याशिवाय पलीकडे नेत नाहींत, अशी मोटारवाल्यांची तक्रार आहे.

उत्पन्न व खर्चाचें प्रमाण

१ उतारू नेण्याचे दर ठराविक असे कोठेंच आढळून येत नाहींत. रेल्वेशीं होणाऱ्या चढाओढीमुळें जवळच्या अंतरास मैलास ६ पै व लांबच्या अंतरास मैली ४ पै इतकेंच जास्तींत जास्त भाडें आकारणें शक्य आहे. ज्या वाटांवरून भाडीं कमी त्या वाटांवर चढाओढ जास्त असें अनुमान काढण्यास कांहीं हरकत नाहीं. ज्या ठिकाणीं मैली ४ पै पेक्षां भाडें कमी आकारण्यांत येतें तेथें विशेष चढाओढ असणें संभवनीय आहे व जेथें मैलीं ३ अगर त्याहूनही कमी भाडें आकारण्यांत येतें तेथें चढाओढ फारच मोठ्या प्रमाणांत चाललेली असली पाहिजे.

२ विनभाड्याचे उतारू व इतर विशिष्ट वरखर्च यामुळें होणाऱ्या नुकसानानें मोटरमालकांच्या मिळकतींत बरीच तूट पडते.

३ गाड्यांची झीज, विम्याचे हप्ते (भरलेले अगर न भरलेले,) व धंद्यांत घातलेल्या भांडवलावरील व्याज या त्रयीचा आपल्या खर्चांत बरेच मालक समावेश करीत नाहींत. असा समावेश खर्चांत व्हावयास पाहिजे.

४ गाडीवर होणाऱ्या खर्चांचें प्रमाण सर्वच बाबतींत व सर्व वाटावर सारखेंच नसतें. आम्हीं ज्या ज्या हिशेबांची तपासणी केली त्या हिशेबांतून सरासरी ३॥ आणे किंवा गाडीची होणारी खराबी, विम्याचे हप्ते, रकमेवरील व्याज या त्रयीचा समावेश करून ४॥ आणे खर्च येतो असें दिसून आलें. यावरून मैली प्रत्येक उतारू-मार्गे ४ पासून ६ पै पर्यंत भाडें आकारणें धंद्याच्या आर्थिक परिस्थितीस अनुसरून होईल असें आढळून येतें.

५ जुन्या गाड्यांचा वाढता खप व धंद्यांत असलेल्या लोकांचें फारच थोड्या वर्षांचें अस्तित्व यावरून मोटरमालक धंद्यांत फार दिवस टिकत नाहींत हें दिसून येतें.

६ ज्या मार्गावरून चढाओढ फारशी नाहीं किंवा इतर कांहीं कारणांमुळें मोटरींची संख्या कमी आहे अशा मार्गावरच धंद्यांत फायदा होणें शक्य असतें.

संघ

१ सध्यांचे परिस्थितींत या धंद्यांत कोणासही शिरकाव करून घेणें सोपें आहे व म्हणून धंद्यांतील लोकांस एकत्र जमून संघ व संघटित संस्था स्थापन करणें कठिण जातें. एकाच वाटेवर चालणाऱ्या मोटरींच्या मालकांचे संघ देखील कांहीं विविक्षित कारणांनींच उत्पन्न होऊन चांगल्या परिस्थितींतच जगूं शकतात.

सरकारी नियम

१ मोटरींचा आवश्यक सरंजाम व मोटरीची दुरुस्ती याबद्दलच्या सरकारी नियमांत वारंवार फरक न होईल अशी काळजी घेणें जरूरी आहे.

२ बसांची सर्व प्रकारची तपासणी जिल्ह्यांतील मुख्य ठिकाणींच फक्त न करितां जेथें जेथें मोटरींची संख्या जास्त असेल अशा सर्व ठिकाणीं व्हावी.

३ एका जिल्ह्यांतील मोटरीस दुसऱ्या जिल्ह्यांत भाड्याकरितां फिरावयाचें झाल्यास त्या जिल्ह्यांतील पोलिस अधिकाऱ्यांकडून फेरनोंद लागते. ती मिळविण्यासाठीं त्या जिल्ह्यांतील पोलिस अधिकाऱ्याचे ऑफिसांत मोटर नेऊन पास करून घ्यावी लागते. एका जिल्ह्यांत तपासणी होऊन मोटर पास झाली असल्यास दुसऱ्या जिल्ह्यांत ती पास करून घेण्यास मोटर नेऊन दाखविण्याची जरूर पडूं नये. एका जिल्हा पोलिस अधिकाऱ्यानें पास केलेली मोटर दुसऱ्यानें न पाहतांच पास करावी.

४ मोटर बसांवरील नियंत्रण सध्यां पोलिस अधिकाऱ्यांकडे सोंपविलें आहे. त्यामुळें त्यांच्यावरील कामाचा बोजा वाढला आहे. तसेंच मोटरी तपासण्यास लागणारें यांत्रिक ज्ञान त्यांस असावें तसें नसण्याचा संभव असतो म्हणून मोटर तपासणीच्या व हांकण्याच्या वगैरे परीक्षा घेण्याचे कामासाठीं तज्ज्ञांचें व सर्व मोटर वाहतूक नियंत्रणासाठीं एक वेगळेंच सरकारी खातें असावें.

सरकारी नियंत्रण

१ या भागांत कोणत्याही वाटेवर एकाच व्यक्तीस किंवा एकाच कंपनीस मोटरी चालविण्यास कुलमक्ता देण्याचें कांहींच कारण नाहीं

२ आगगाड्या व मोटरी यांमधील चढाओढ कमी होऊन दोहोंसही उतारू मिळावे या हेतूनें मोटरी फक्त कांहीं मैलांच्या व्यासांतच चालवाव्या अशा प्रकारचा नियम घालण्याची जरूर नाहीं व नियम घातला तरी त्यापासून कोणत्याही प्रकारचा फायदा होणें शक्य नाहीं.

३ मोटरधंद्याच्या नियंत्रणाचा सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणजे निरनिराळ्या रस्त्यांवरील माल व उतारू यांची मोटर-वाहतूक त्या त्या रस्त्यावर परवाना मिळालेल्या मोटरींसच करूं द्यावी हा होय. निरनिराळ्या रस्त्यांबद्दल मोटरींस देण्याचे परवाने ठरवितांना जवळच्या आगगाड्यांच्या मार्गांचाही विचार व्हावा.

४ असें नियंत्रण अंमलांत आल्यास आगगाड्यांचीं देखील फाजील भाडीं कमी करणें किंवा अशा प्रकारचे चढाओढीचे इतर प्रकार सोडून देणें अवश्य आहे.

५ प्रत्येक वाटेवर किती मोटरी चालवाव्या हें ठरविल्यावर, जास्तींत जास्त व कमींतकमी भाडें किती घ्यावयाचें, मोटरीवरील काम करणाऱ्या नोकरवर्गानें किती तास काम करावयाचें, मोटरींचीं वेळापत्रकें इत्यादि विषयींचेही नियम ठरवून टाकले पाहिजेत.

Gokhale Institute of Politics and Economics
POONA 4.

Publication No. 1 :—The Salaries of Public Officials in India—By D. R. Gadgil, M.A., M. Litt. (Cantab.), 1931. Price Re. 1.

"The study is a very clear, able and valuable one. It should be gone through by all those who have the interest of the country at heart."

—*Indian Journal of Economics.*

Publication No. 2 :—Imperial Preference for India. (The Ottawa Agreement Examined)—By D. R. Gadgil, M.A., M. Litt. (Cantab.), 1932. (out of Print)

"A worthy successor to publication No. 1 of the Gokhale Institute of Politics and Economics".

—*The Hindu. Educational and Literary Supplement.*

Publication No. 3 :—A Survey of the Marketing of Fruit in Poona. —By D. R. Gadgil, M.A., M. Litt. (Cantab.) and V. R. Gadgil, B. Ag. (Bom.), M. Sc. (Calif.), 1933. Price Rs. 2-8.

"It is a model for other workers to follow, and the authors are to be congratulated on this painstaking, meritorious and lucid exposition of an important subject."

—*Sankhaya : The Indian Journal of Statistics.*

Publication No. 4 :—A Survey of Motor-Bus Transportation in Six Districts of the Bombay Presidency. By D. R. Gadgil, M.A., M. Litt. (Cantab.) and L. V. Gogate, B. S. (N. Carolina), 1935. Price Rs. 2-8.

"What is true in these districts in which the detailed survey has been made is probably true also to a greater or less extent throughout India and all those interested in this important subject will be well advised to obtain a copy of this Paper and study it."

—*Indian Roads.*

Publication No. 5 :—Urban Handicrafts of the Bombay Deccan. (*In Press*).

The Ottawa Agreement and India By D. R. Gadgil, M.A., M.Litt. (Cantab.) (Reprinted from the Servant of India.), 1936. Price As. 8.

University of Nagpur.

Shridhar Ganesh Paranjpe Memorial Lectures, 1936.

THE SHIVAJI PERIOD IN MARATHA HISTORY 1644-1707

(A STUDY IN FIVE LECTURES)

G. S. SARDESAI, B. A.

AUTHOR OF MARATHI RIYASAT, MAIN CURRENTS OF MARATHA HISTORY, ETC. EDITOR: SELECTIONS FROM THE PESHWAS' DAFTAR & POONA RESIDENCY RECORDS.



NAGPUR
1936.
Price Six Annas.

University of Nagpur.

Shridhar Ganesh Paranjpe Memorial Lectures, 1936.

THE SHIVAJI PERIOD IN MARATHA HISTORY 1644-1707

(A STUDY IN FIVE LECTURES)

G. S. SARDESAI, B.A.

AUTHOR OF MARATHI RIYASAT, MAIN CURRENTS OF MARATHA HISTORY, ETC. EDITOR: SELECTIONS FROM THE PESHWAS' DAFTAR & POONA RESIDENCY RECORDS.



NAGPUR
1936.
Price Six Annas.

PRINTED BY M. L. PRAYAGI,
AT THE
SUBODH SINDHU PRESS, KHANDWA.
AND
PUBLISHED BY U. MISRA, M.A., LL.B., REGISTRAR,
NAGPUR UNIVERSITY, NAGPUR.

राव बहादूर श्रीधर गणेश परांजपे स्मारक-निधि
व्याख्यान माला

नागपुर युनिव्हर्सिटी

अव्वल मराठशाहीचें अंतःस्वरूप

(१६४४–१७०७)

गो० स० सरदेसाई, बी. ए.
(रियासतकार आणि संपादक पेशवे दप्तर व रेसिडेन्सि पत्रव्यवहार पुणें)

यांनीं फेब्रुवारी स० १९३६ त दिलेलीं

पांच व्याख्यानें. pht.2

विजयादशमी स. १९३६

किंमत ६ आणे.

Surjakar

GOD
MAR
954.02
Sar/Ava

प्रस्तावना.

कै० राव बहादुर श्रीधर गणेश परांजपे स्मारक–निधींतून नागपुर युनिव्हर्सिटी मार्फत गेल्या फेब्रुवारी महिन्यांत व्याख्यानमाला करविण्यांत आली, तीं व्याख्यानें कायम स्वरूपांत वाचकांपुढें ठेवण्यास मला संतोष वाटतो. व्याख्यानांचा उद्देश, विषयाची निवड वगैरे संबंधानें जरूर तो उल्लेख पुढें आरंभीं करण्यांत आला आहे. शिवाजी, संभाजी, राजाराम व ताराबाई या चार राजव्यक्तींच्या कारकीर्दी गोष्टी सारख्या स्वरूपांत मांडण्याचा मीं प्रयत्न केला असून शालेय विद्यार्थ्यांस व सामान्य वाचकांस हें एकंदर विवरण हृदयंगम वाटेल अशी माझी समजूत आहे ती किती सार्थ किंवा विफल आहे तें वाचकांनीं ठरवावें. या प्रशंसनीय उद्योगाबद्दल मी त्या निधिस्थापकांचे व नागपूर युनिव्हर्सिटीचे मनःपूर्वक आभार मानून व्याख्यानांचा हा उपक्रम असाच चिरंतन चालू राहवा अशी मनीषा व्यक्त करितों.

मु० पो० कामशेत, जिल्हा पुणें,
विजयादशमी.
ता. २९–१०–१९३६

गो० स० सरदेसाई.

॥ श्री ॥

अव्वल मराठशाहीचें अंतःस्वरूप

व्याख्यान पहिलें

शिवाजीच्या उद्योगाची तयारी

रावबहादूर श्रीधर गणेश परांजपे यांच्या स्मारकनिधींतून होणाऱ्या या व्याख्यान-मालेची सुरुवात करण्यास मला बोलाविल्याबद्दल मी नागपुर युनिव्हर्सिटीच्या चालकांचा फार फार आभारी आहें. हें कार्य करण्यास माझ्याहून जास्त लायकीचे इतिहासज्ञ पुष्कळ आहेत हें जाणून प्रथम आपल्या निमंत्रणाचा स्वीकार करण्याचा माझा विचार नव्हता. शिवाय, दुसरीं अनेक निकडीचीं कामें हातीं असल्यामुळें या नवीन कामगिरींत मन घालण्यास मला फुरसतही नव्हती. परंतु ज्या विषयाच्या अध्ययनांत माझा जन्म गेला, त्याचाच परिपोष करण्याची एखादी संधि चालून आली असतां तिचा अव्हेर करणें मला अनुचित वाटलें, आणि मी जरी महाराष्ट्रांतील एखाद्या कोंपऱ्यांत वावरणारा असलों तरी मध्यप्रांतीय मंडळीचा मजवर लोभ आहे, त्यांनीं प्रेमानें एखादी कामगिरी सांगितली तर ती यथाशक्ति पार पाडणें माझें कर्तव्य होय अशा भावनेनें मी हें कार्य पत्करिलें, आणि तें पार पाडण्यांत आपल्या अपेक्षा मजकडून पूर्ण झाल्या नाहींत तर त्याबद्दल आपण मला क्षमा करावी असें मी आरंभींच आपल्याशीं मागणें मागून ठेवितों.

व्याख्यानाचा विषय ठरविण्यांत ही मला बरेच प्रयास पडले. मराठ्यांचा इतिहास अद्यापि बनावाच्या स्थितींत आहे. अनेक संशोधक ठिकठिकाणीं आपापल्या परी उद्योग करीत असून नवीन नवीन साधनें बाहेर आणीत आहेत. शिवाजीनें स. १६४४ त सिंहगडचें प्रबल ठाणें हस्तगत करून मराठी राज्याची मुहूर्त मेढ घातली, ती इमारत पुढें तीस वर्षांत पूर्ण होऊन स. १६७४ च्या राज्याभिषेक समारंभानें जाहीर रीत्या अनावृत्त झाली. नंतर संभाजीच्या कारकिर्दींत खुद्द औरंगजेब बादशहा महाराष्ट्रांत येऊन बसला. पाव शतक पावेतों त्याच्या प्रचंड आघातांनीं त्या इमारतीस कांहीं एक भंग न होतां उलट त्या प्रयत्नांत बादशहाचाच अंत झाला. इ. स. १७०७ त औरंगजेब बादशहा अहमदनगर येथें विराम पावला ही गोष्ट मराठ्यांच्या इतिहासांतील एक महत्त्वाचा सांधा दाखविते. तदुत्तर त्या राज्यास निराळें वळण लागून जे प्रकार सुरू झाले, त्यांचा उल्लेख पेशवाई या शब्दानेंच चांगला करितां येतो. स. १८१८ त मराठ्यांचें राज्य संपलें. म्हणजे स. १७०७ पासून १८१८ पावेतोंचा पेशवाईचा काल हा मराठ्यांच्या इतिहासाचा उत्तरभाग म्हणतां येईल. या उत्तर भागावर नवीन प्रकाश पाडणारें सुमारें आठ हजार छापील पृष्ठांचें साहित्य पेशवे दप्तरांतून नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. त्या पूर्वीच्या कालास 'शिवकाल' असें नांव सोयीसाठी दिलेलें आहे. हा शिवकाल स. १६४४ पासून स. १७०७ पावेतों ६३ वर्षांचा भरतो. अर्थात् चार दोन व्याख्यानांत एका विशिष्ट भागाचें विवरण करणें झाल्यास दुसऱ्या पेशवाईच्या कालापेक्षां पहिला शिवकालीन भागच जास्त सुटसुटित व बराचसा अज्ञात आहे. शिवाय कित्येक महत्त्वाचीं ऐतिहासिक प्रमेयें या पहिल्या भागांतच व्यक्त होत असल्यामुळें मीं तोच विषय व्याख्यानांसाठीं घेण्याचें ठरविलें. वास्तविक हा भाग सुद्धां चार व्याख्यानांत पूर्णपणें विवेचन होण्यासारखा नाहीं, हें मी जाणून आहें.

आणखी एक विशिष्ट अडचण माझ्या समोर आहे ती मी आपल्या नजरेस आणूं इच्छितों. इतर बिकट शास्त्रीय विषयांप्रमाणेंच मराठ्यांच्या इतिहासांतही संशोधनाचे व गुंतागुंतीचे पुष्कळ प्रश्न आहेत. माझी ख्याति रियासतकार म्हणून झाली असून मी आपल्या पुस्तकांत आज पावेतों एकदंर मराठ्यांच्या

इतिहासाचेंच प्रतिपादन करीत आलों आहें. तेव्हां युनिव्हर्सिटीच्या मार्फत मला या कामासाठीं बोलावण्यांत कांहीं तरी तात्विक प्रश्नांचा ऊहापोह म्यां करावा अशी आपली साहजिक अपेक्षा असणार. परंतु हीं व्याख्यानें केवळ विशिष्ट अभ्यासकांच्या संशोधन-पूर्तीसाठीं नसून सामान्य श्रोत्यांसही त्यांपासून कांहीं लभ्यांश व्हावा अशी समजूत असल्यास ती देखील गैर नाहीं. पण मला मात्र यामुळें मोठा पेच पडला आहे. सामान्य जनांस मनोरंजक होईल असें विवरण मीं करावें तर त्यांत संशोधनीय प्रश्नांचा विचार मला करितां येणार नाहीं. उलट पक्षीं तशा प्रश्नांचेंच विवेचन मी अंगीकारावें तर त्यापासून सामान्य श्रोतृवर्गास विशेष बोध होणार नाहीं. ही माझी अडचण मीं युनिव्हर्सिटीच्या अधिकाऱ्यांस कळविली, आणि दोघांचेंही थोडें बहुत समाधान होईल अशी मध्यम पद्धत मी व्याख्यानांत स्वीकारीन असें लिहिलें. त्यांना हा विचार पसंत पडल्यानें तोच मार्ग मी पसंत करणार आहें. मात्र अशा दुहेरी व्यवस्थेनें उभयांची मी वंचना केली असें आपणास वाटल्यास त्याजबद्दल आपण मजला दोष देऊं नये.

मीं आपणास मराठी राज्याचें शिवकालीन स्वरूप कशा प्रकारचें होतें हें सांगण्याचें ठरविलें असून, त्यासाठीं खुद्द शिवाजी संबंधानें दोन, आणि संभाजी व राजाराम यांस प्रत्येकीं एक अशा एकंदर चार व्याख्यानांत विषय संपवावा अशी माझी पहिली कल्पना होती. या योजनेंत संपूर्ण तपशील मला दाखल करितां येणार नाहींत हें उघड आहे. तथापि आजपर्यंतच्या संशोधनानें जे कित्येक सिद्धांत कायम झाले आहेत आणि ज्यांच्या योगानें इतिहासाध्ययनाचें सार्थक होणारें असतें, तेवढेच मी स्पष्ट करून सांगणार आहें. अर्थात् घडलेल्या गोष्टी जमेस धरून त्यांवरून जीं अनुमानें काढलेलीं आपणास दिसतील, त्यांजबद्दल मीच व्यक्तिशः जबाबदार राहीन. इतिहास तरी असा अनुमानांनींच बनत जातो आणि एकानें काढिलेलीं अनुमानें तंतोतंत दुसऱ्यांस पटतील असा नेम नाहीं. मनुष्य कितीही निष्पक्षपाती असला तरी मानवी विकार त्याच्या मनांत थोडा बहुत सदैव वावरत असतो. या कारणास्तव निर्भेळ सत्य असें इतिहासांत आढळूं शकत नाहीं. म्हणूनच इतिहास म्हणजे सुयुक्तिक तर्क असेंच मानण्यांत येतें. शिवाजी महाराजांबद्दल जो आदर व आत्मभाव आम्हां महाराष्ट्रीयांस वाटतो तो

महाराष्ट्रेतरांस किंवा त्यांच्या शत्रुवर्गात मोडणाऱ्या इस्लामीयांस वाटणें शक्य नाहीं. यामुळें इतिहासांत जें वैचित्र्य उत्पन्न होतें तेंच शास्त्रीय दृष्टया चमत्कृतिजन्य व बोधप्रद मानिलें जातें. शिवाय तत्त्वतः हा विषय सूक्ष्म आहे व सद्यःफलदायी नाहीं. यास्तव प्राप्त प्रसंगास अनुलक्षून पाठीमागील अनुभवाचा आपणास विशिष्ट उपयोग करून घ्यावा लागतो. अर्थात् इतिहास हा कायम ठशाचा असा कधींच बनूं शकत नाहीं. त्याचें स्वरूप व विवरण सारखें बदलावें लागतें. जशी मागणी तसा पुरवठा करावा लागतो ही गोष्ट पुष्कळांच्या लक्षांतून सुटते. एक विद्वान ग्रंथकार लिहितोः—

"History requires to be reshaped from time to time not merely because new aspects come into view, nor simply because new facts come to be discovered, but because the participant in the progress of an age is led to stand points from which the past can be regarded and judged in a novel manner."

इतिहासाच्या अशा बदलत्या स्वरूपाचीं उदाहरणें आजही आपल्या दृष्टीपुढें घडत आहेत. हिंदु मुसलमानांची दुही, किंवा अस्पृश्यतेचा प्रश्न आज निकरावर येऊन नव्याजुन्यांमध्यें तीव्र झगडा उत्पन्न झालेला दिसतो, याचें कारण बदलत्या परिस्थितीस तोंड देण्याची राष्ट्रास जरूर पडते हें होय. अशा दृष्टीनेंच शिवकालीन इतिहासापासून आजच्या प्रसंगास आपणास काय बोध घेतां येईल हें मी ठिकठिकाणीं विशद करून सांगणार आहें. या प्रयत्नांत आपल्या पूर्ण सहानुभूतीची याचना करून मी विषयास सुरुवात करितों.

थोर विभूति हेच राष्ट्राची बहुमोल संपत्ति होय. अशा प्रकारची एक विभूति तीनशें वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत उदय पावली, तिचा स्वयं प्रकाश अद्यापि समस्त हिंदी राष्ट्रास स्फूर्ति देत आहे. अशी विभूति केव्हां व कशी निर्माण होते याचें निदान मानवांस होऊं शकत नाहीं, ह्मणूनच ईश्वरी प्रेरणा असें तिचें कारण मानण्यांत येतें. शिवाजी महाराज निर्माण होण्यास कोणती परिस्थिति कारण झाली, त्यांच्या वाडवडिलांचा त्या कार्यांत किती भाग होता, इत्यादि प्रश्न परीक्षांसाठीं विचारण्यांत येतात आणि त्यांचीं उत्तरेंही विद्यार्थ्यांस द्यावीं लागतात,

परंतु असा कार्यकारण भाव निश्चित करण्यात इतकी इतिहासशास्त्राची प्रगति आज तरी झालेली नाहीं. तथापि प्रत्येक घडामोडीचें मूळ शोधित जाणें हें मानवी बुद्धीचें एक महत्त्वाचें कर्तव्य असून, त्या शोधापासून आपल्या ज्ञान-संपत्तींत नवीन भर पडत असते. शिवाजी महाराजांचा जन्म स० १६२७ त झाला असें मी मानतों. माझे कित्येक व्यवसाय बंधु तो जन्म स० १६३० त झाला असें मानतात. जन्म केव्हांही झाला तरी त्यामुळें कांहीं अल्प तपशिलांपलीकडे मुख्य ऐतिहासिक चरित्रांत तफावत पडत नाहीं. म्हणून या दृष्टीनें ह्या जन्म-तिथीचा अनिश्चितपणा निष्प्रभावी आहे. जिजाबाई पासून शहाजीला सहा पुत्र झाले, त्यांपैकीं संभाजी व शिवाजी हे दोघेच वर्धमान दशेस पावले असें शिवभारतकार सांगतो. 'तस्य तस्यामजायन्त पुत्राः षट् शुभलक्षणाः। तषां मध्ये शंभुशिवौ द्वावेवान्वय-वर्धनौ' ॥ सुपुत्र-निर्मितीस कोणतीं कारणें होतात हें जरी आपणांस निश्चित सांगतां येत नसलें, तरी मातापितरांच्या स्वभावांचा व परिस्थितीचा पुष्कळसा परिणाम शिवाजीच्या उत्कर्षास कारण झाला हें मात्र निःसंशय दिसून येतें. जिजाबाईचा जन्म यादवांच्या क्षत्रिय कुलांत झाला, तसा शहाजी देखील मेवाडच्या शिसोदिया राजपूत पूर्वजांचाच वंशज होय. त्यांचें भोसले आडनांव कसे उद्भवलें याचा थांग लागत नाहीं. मात्र हे भोसले राजपूत क्षत्रियांपासूनच उगम पावले ही गोष्ट आतां अनेक विद्वान संशोधकांनी विश्वसनीय पुराव्याच्या आधारावर मान्य केली आहे. गज्नवी महमुदापासून या देशावर मुसलमानांचें आक्रमण सुरू होऊन हिंदु धर्माचा उच्छेद होऊं लागला. मोठमोठीं प्रसिद्ध मंदिरें व देवस्थलें उद्ध्वस्त झालीं. महंमद घोरी व अलाउद्दीन खिलजी यांनीं हिंदु राज्यांचा पाडाव करून मुसलमानी सत्ता या देशावर स्थापिली. देवगिरि येथें यादव नांवाचे राजे प्रजारंजन करून नांदत होते, त्यांचें राज्य अलाउद्दीननें जिंकून त्या घराण्यास व त्यांच्या आप्तेष्टांस देशोधडीस लाविलें. त्यानंतर महाराष्ट्रावर बहामनी राज्य स्थापन होऊन हिंदूंचा क्षय होऊं लागला, तो थांबविण्यासाठीं विजयनगर येथें एक नवीन हिंदु साम्राज्य निर्माण झालें, पण त्याचाही दोन अडीचशें वर्षांत संहार होऊन हिंदु धर्मास कोठेंही थारा राहिला नाहीं. हे प्रकार साधुसंतांच्या उज्वल वाणींतून व्यक्त झालेले आज आपणास दिसतात.

प्राचीन हिंदूंचा असा निःपात होऊन पूर्वीचीं क्षत्रिय घराणीं मुसलमानी राज्यांत कष्टानें सेवकधर्मांत काल कंठूं लागलीं. अशा स्थितींत देवगिरि येथील यादवांचा वंशज लखूजी जाधव यास एक कन्या झाली तिचें नांव जिजाबाई; आणि त्याच लखूजीच्या पदरीं मालोजी भोसले नांवाचा गृहस्थ होता त्यास पुत्र झाला, त्याचें नांव शहाजी. पुढें जिजाबाई व शहाजी यांचा विवाह होऊन त्यांस मुलगा झाला तोच शककर्ता शिवाजी होय. वास्तविक मातापितरांच्या अंतःकरणांत परचक्राचें शल्य सलत असतांच शिवाजीचा उदय झालेला आहे.

महाराष्ट्रावर बहामनी राज्याची सत्ता दोन शतकें चाललयावर उत्तरेंत दिल्ली येथें मोगल बादशाही स्थापन झाली. हे बादशाह पुढें प्रबल झाले आणि नर्मदा ओलांडून दक्षिण देश जिंकण्याचा प्रयत्न करूं लागले. शिवाजीचा जन्म झाला त्या सुमारास शहाजहान बादशाह दक्षिणेंत स्वारी करून चालून आला. त्या वेळीं शिवाजीचा बाप शहाजी यानें त्याच्याशीं कांहीं काळ मोठ्या निकराचा सामना करून जो पराक्रम गाजविला तो बाल शिवाजीला मार्गदर्शी झाला. त्या वेळीं दक्षिणेंत जिकडे तिकडे रणसंग्राम माजून जीवित असुरक्षित बनलें, त्यांतून निभाव करण्याची शक्कल प्रत्येकास योजावी लागली. अशा स्थितींत स्वसंरक्षणाचे उपाय शोधीत राहणें आणि परचक्राचें निवारण करणें हेंच लहानपणीं शिवाजीचें कर्तव्य बनलें.

अखेरीस शहाजहान बादशहानें दक्षिण देश जिंकून शहाजीला तेथून बाहेर काढून दिलें आणि आपला पुत्र औरंगजेब याची आपल्या तर्फेनें महाराष्ट्राच्या कारभारावर नेमणूक केली, हाही योगायोग पुढील इतिहास बनविण्यास कारण झाला आहे. हाच शहाजहान पुत्र औरंगजेब पुढें शिवाजीचा मुख्य प्रतिस्पर्धी बनला. मराठ्यांनीं त्याचें राज्य उत्तरोत्तर कसें जिंकलें, हा आपल्या इतिहासाचा मुख्य विषय आहे. शिवाजी व औरंगजेब या दोन प्रसिद्ध व्यक्तींचा अद्भुत सामना घडला त्यांतच मराठी राज्याची निर्मिति झाली. औरंगजेब शिवाजीहून दहा वर्षांनीं वडील आणि शिवाजीच्या पश्चात् तो आणखी सत्तावीस वर्षे जगला. असें दीर्घायुष्य शिवाजीस लाभलें नाहीं, म्हणून मराठी राज्य पुष्कळसें दुर्बल राहिलें. शिवाजीला आणखी आयुष्य असतें तर कदाचित् निराळाच परिणाम घडून आलेला इतिहासांत दाखल असता असें वाटूं लागतें.

औरंगजेबाचा जन्म गुजरातेंत दोहद येथें झाला. लहान असतां बापाबरोबर त्याच्या समग्र हिंदुस्थानास दोन फेऱ्या झाल्या. बादशहा होण्यापूर्वी पंधरा वर्षें त्यानें महाराष्ट्राचा कारभार केला; आणि त्याच्या आयुष्याचीं अखरेचीं पंचवीस वर्षेंही महाराष्ट्रांतच युद्धप्रसंग चालविण्यांत गेलीं. यावरून शिवाजी व औरंगजेब यांचा सामना किती अपूर्व व दीर्घद्वेषी होता हें लक्षांत येईल.

शिवाजीचें बालपण सह्याद्रीच्या आसमंतात् असलेल्या मावळ प्रदेशांत गेलें. बापानें द्वितीय पत्नी करून बाल शिवाजी व त्याची मातुश्री यांस पुण्याच्या जागिरींत ठेविलें आणि आपण विजापुरच्या सेवेंत कर्नाटक प्रांत जिंकण्याच्या कामावर गेला. अर्थात् जिजाबाईस त्यानें टाकल्यासारखेंच केलें. मलठणचा कुळकर्णी दादाजी कोंडदेव शहाजीचा विश्वासु सेवक होता, त्याजला त्यानें पुण्याच्या जागिरीवर नेमून मुलाच्या संगोपनाची कामगिरी सांगितली. सारांश शिवाजीच्या जन्मापासूनच विपत्ती हात धुऊन त्याच्या पाठीस लागल्या होत्या; आणि हा शिवाजी पुढें पराक्रमी निघेल तरच आपला निभाव आहे अशी जिजाबाईची खात्री होऊन तशा भावनेनें तिनें त्याची जोपासना केली. शिवाजीचीं पहिलीं दोन तीन वर्षें शिवनेरीवर, त्या पुढील एक दोन गोदावरी पलीकडे बैजापुरच्या बाजूस व त्यापुढें कांहीं काळ पुणें येथें गेला. पुण्याच्या दक्षिणेस सिंहगडानजीक शिवापुर व राजगडाचे पायथ्याशीं शिवापट्टण हीं दोन स्थलें त्याच्याच नांवानें स्थापण्यांत आलीं, त्या ठिकाणींही त्याचें वास्तव्य थोडें फार झालें असलें पाहिजे.

मावळचा डोंगराळ प्रदेश ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिला असेल त्यांना तेथील बिकट व निर्धन परिस्थितीची चांगली कल्पना होईल. या प्रांतांत त्या वेळीं अत्यंत अंदाधुंदी माजलेली होती. निरनिराळ्या खोऱ्यांत वेगवेगळ्या मराठे देशमुखांचा अंमल होता. हा प्रदेश विजापुर व अहंमदनगर या दोन राज्यांच्या सरहद्दीवर असून त्याजवर कोणाचीच सुव्यवस्थित सत्ता चालत नव्हती. या अवघड प्रदेशांत फौजांचा संचार होत नसून वसुलाची प्राप्तिही विशेष नसल्यामुळें त्याजवर सुरळीत अंमल बसविण्याची जरूर त्या वेळीं कोणास वाटली नाहीं. जाळ पोळ, खून, मारामाऱ्या, चोऱ्या, दरवडे हे केवळ नित्याचेच प्रकार बनले होते. लहाना-

पासून थोरापर्यंत प्रत्येकास आपल्या जिवाची फार धास्ती वाटत असे, की बाहेर गेलेला मनुष्य जिवंत घरीं परत येतो कीं नाहीं याची खात्री नसे. अशा या मावळच्या प्रदेशांतील रानटी व अस्वस्थ परिस्थितींत शिवाजीचें बालपण गेलें.

दादाजी पंतानें त्यास लिहिणें वाचणें हिशेब व जागिरीचा कारभार या विषयांचें शिक्षण दिलें. जिजाबाईनें त्यास पूर्वजांनीं केलेल्या पराक्रमांच्या व रामायण महाभारतांतील देवादिकांच्या कथा सांगून त्यास धर्माचा, नीतीचा व शौर्याचा बोध केला. स्वतः शिवाजीनें समवयस्क संवगडी जमवून ज्या बाललीलांत कालक्रमणा केली, त्याच पुढील आयुष्यांतील संकटांचें निवारण करण्यास त्यांस विशेष उपयोगी पडल्या. रानावनांत रात्रीं बेरात्रीं भटकणें, वारा, पाऊस, थंडी, भूक, तहान वगैरे सहन करण्याची सवय करणें, विकट वाटा व किल्ले स्वतः फिरून पाहणें, सर्व ठिकाणची चौकस बातमी आणवून तिचा ऐनवेळीं उपयोग करणें, वाटेल तसें सोंग घेणें, पशुपक्ष्यांचें आवाज काढणें, निरनिराळ्या भाषा थोड्या बहुत बोलणें व समजणें, प्रसंग पडेल तशी बतावणी करून व हुलकावण्या दाखवून संकटांतून निभावून जाणें, सर्व प्रकारच्या लोकांत मिसळून त्यांचे स्वभाव व मनांतलें इंगित पारखून घेणें आणि आपल्या कर्तृत्वाची छाप इतरांवर बसविणें असे हे शिवाजीच्या वर्तनांतले विशिष्ट प्रकार लहानपणापासूनच त्यानें कमावलेले दिसतात. या गुणांबरोबर मातृभक्ति, धर्मनिष्ठा, धाडस इत्यादि उच्च गुणांचें साहचर्य आरंभापासून अंगीं बाणल्यानें त्याला पुढें अनुपम थोरपणा प्राप्त झाला.

लोकांचे तंटे व भांडणें तोडून त्यांस कार्यप्रवण करणें, त्यांना लष्करी विद्या शिकवून स्वसंरक्षणास समर्थ बनविणें, शेतीस उत्तेजन देऊन वसूल वाढविणें, इत्यादि प्रादेशिक कारभाराचा अनुभव शिवाजीनें दादाजी कोंडदेवाकडून मिळविला. मातेचा सहवास व तिचा पवित्र आशीर्वाद हे तर त्याच्या एकंदर जीवनाचे मुख्य आधार बनले. तसेंच पित्याच्या विपरीत वर्तनाचाही त्यास कांहीं थोडा उपयोग झाला नाहीं. हा प्रकार जरा जास्त स्पष्ट करून सांगणें जरूर आहे. पित्याचा सहवास लहाणपणीं शिवाजीला बिलकूल घडला नाहीं असें झटलें तरी चालेल. बायका मुलांचें लटांबर कोठें तरी अज्ञात जागेंत सुरक्षित ठेऊन आपण शहाजहान बादशहाशीं निर्वेध सामना करावा हीच शहाजीला

मोठी विवंचना होती. औरंगजेब व शिवाजी यांचा जो पुढें कायमचा सामना जडला, त्याची छोटीशी आवृत्ति उभयतांच्या वडिलांनींच प्रथम आचरून दाखविली होती. शहाजीला नरम करण्याचा मुख्य इलाज म्हणजे त्याच्या बायका-मुलांस हस्तगत करणें, ही गोष्ट सिद्धीस नेण्याचा प्रयत्न शहाजहाननें अनेक वार केला. जिजाबाईला तर मोगलांनीं पकडून घेतल्याचें कित्येक लेखक सांगतात. मग तिच्याबरोबर शिवाजी पकडला गेला होता कीं नाहीं तें समजत नाहीं. चौलच्या पोर्तुगीजांकडे किंवा दंडाराजपुरीच्या सिद्यांकडे आपलीं मुलें माणसें आश्रयार्थ ठेवण्याचा शहाजीचा विचार चालला होता, असे कागद उपलब्ध झाले आहेत. स. १६३६ त शहाजहानशीं समेट करून शहाजी विजापुरचे नोकरींत कर्नाटक प्रांत जिंकण्याचे उद्योगावर गेला, आणि जिजाबाई शिवाजीस घेऊन पुण्याचे जागिरींत राहिली. यानंतर अखेर पावेतों त्यांची बहुतेक ताटातूटच होती. पुढें शिवाजीचा पराक्रम झळकूं लागल्यावर कधीं काळीं दहापांच वर्षांनीं त्यांच्या विरळा गांठी पडत.

शहाजी मुसलमानांचे नोकरींत वाढला. अर्थात् आपल्या पराक्रमाचें फळ मुसलमान शहांस अर्पण करावयाचें हेंच त्यांचें मुख्य ध्येय कायम राहिलें. स्वदेश व स्वधर्म यांची जाणीव त्याचे ठिकाणीं उत्पन्न झाली नाहीं. विजापुरच्या सुलतानांस त्याची कर्तबगारी पूर्ण माहीत होती, आणि तिचा त्यांनीं भरपूर उपयोग करून घेतला. विजापुर व गोवळकोंडा या दोन राज्यांस मोगल बादशहांकडून उत्तरेच्या बाजूनें शह मिळाला त्याचा वचपा भरून काढण्यासाठीं त्या दोन ठिकाणच्या सुलतानांनीं थेट कन्याकुमारी पावेतोंचा हिंदु सत्ताधीशांचा प्रदेश जिंकून आपलें ऐश्वर्य वाढविण्याचा संकल्प ठरविला, आणि त्याकामीं त्यांनीं अतोनात खर्च व कष्ट केले. हें काम सिद्धीस नेण्यास विजापुरच्या आदिलशहानें शहाजीची योजना केली. शहाजी व अफझलखान यांनीं पश्चिमेच्या बाजूनें इक्केरी, बेदनूर, शिरें, बंगलूर, इत्यादि प्रदेश जिंकून अपरंपार संपत्ति विजापुरास आणिली. हल्लीं ज्या गोल घुमटासारख्या प्रचंड इमारती विजापुरांत दिसतात, त्या या हिंदु मंदिरांच्या लुटीनें बनलेल्या आहेत. हा कर्नाटकीय प्रदेश पूर्वी विजयनगरच्या हिंदु पातशाहींत मोडत होता. तालिकोटच्या लढाईत विजयनगरचा

पाडाव झाला तरी तेथील रायांचे वंशज वेंकटपति, श्रीरंगराय इत्यादि पुरुष मुसलमानांच्या आक्रमणापासून आपला बचाव करण्याची शिकस्त करीत होते. शहाजी जेव्हां त्यांजवर चालून गेला, तेव्हां त्यांनीं त्याजकडे बोलणें करून आपला बचाव करावा अशी विनंति केली. 'तुम्ही हिंदु आहांत, हिंदुधर्माचें व हिंदूंच्या मंदिरांचें रक्षण करणें तुमचें कर्तव्य आहे, असें असतां तुम्हीच आमचा नाश करावा हें अनुचित होय.' अशीं या सत्ताधीशांचीं बोलणीं ऐकून शहाजीस मोठा विचार पडला. त्यास आपल्या कृत्याचा पस्तावा वाटूं लागला. खुद्द जिजाबाई, बाल शिवाजी व त्याचा विश्वासु कारभारी दादाजी कोंडदेव यांनीं देखील आपापल्या परी त्याची थोडी बहुत कान-उघाडणी केली. या प्रसंगानें बापलेकांचा विरोध अगदीं स्पष्टपणें दिसूं लागला. तेव्हां या विषयाचा पूर्ण विचार करण्याकरितां शहाजीनें त्या सर्वांस आपल्या जवळ बंगलोर येथें बोलवून नेलें. वर्ष दोन वर्षें म्हणजे सुमारें स. १६४०–४२ या सालीं त्यांचा एकत्र मुक्काम होऊन खलाशेवार बोलणीं झालीं. पण त्यांचा मेळ बसला नाहीं. मुसलमानांची सेवा शहाजीस सोडवेना, त्यांची ताबेदारी शिवाजीस मानवेना. शिवाजीस संपूर्ण स्वातंत्र्य हवें होतें. परंतु आपली पिढीजाद जागीर व कैक वर्षें बसलेला जम सोडून देऊन स्वराज्यरूपी मृगजलाच्या पाठीस लागण्याचें धाडस शहाजीनें स्वीकारिलें नाहीं. उभयतांनीं आपले मार्ग भिन्नपणें आंखून घेतले. दादाजी कोंडदेव, सोनोपंत डबीर, नारो त्रिमल हणमंते, जिजाबाई इत्यादिकांनीं पुष्कळ खल करून ठरविलें कीं शहाजीनें बंगलोरास राहून विजापुरची सेवा करावी, आणि शिवाजीनें मावळांत राहून स्वातंत्र्याचा उद्योग करावा. एकमेकांनीं शक्य तितकी एकमेकांची साथ करावी; मात्र बाहेर देखावा करणें तो असा असावा, कीं उभयतांचें बिलकूल बनत नाहीं. शहाजीनें विजापुरास कळवावें, मुलगा माझ्या आज्ञेंत नाहीं. शिवाजीला जाब विचारल्यास त्यानें सांगावें 'हा मावळप्रांत दंगेखोर आहे. कधींच कोणाची सत्ता जुमानीत नाहीं; सबब त्याच्या बंदोबस्तासाठीं किल्ले व ठाणीं बसवून आम्ही सुव्यवस्था निर्माण करितों, यांत आम्ही सुद्धां शहाचेंच कार्य करीत आहों. शहांचे विरुद्ध असें कोणतेंही कृत्य आम्हीं करीत नाहीं.' अशी ही उभय पक्षांची तडजोड ठरून पुढें जो उद्योग सिंहगड व बंगलोर या दोन भिन्न स्थळीं सुरू झाला, त्यांतूनच

शिवाजीनें स्वराज्याची उभारणी केली आणि त्यांतच शहाजीला जिवावरची कैद भोगावी लागली. या कार्याचा प्रत्यक्ष उपक्रम सन १६४३-४४ चा आहे.

राजकारण नेहमींच बहुरंगी असतें. त्यास ठरीव पद्धत लावतां येणार नाहीं. परिस्थिति उत्पन्न होईल तशी बतावणी करून राष्ट्रोद्योग साधावा लागतो. आज आपल्या सभोंवार हाच प्रकार चालला असून शहाजी शिवाजीनाहीं त्याच धोरणानें आपला वर्तनक्रम ठेवावा लागला. शिवाजीनें सिंहगडावर बंदोबस्त करून आपला जम बसविला. त्याचा वडील बंधु संभाजी बापाजवळ राहून बंगलोर येथें तसाच उद्योग पण निराळ्या पद्धतीनें सिद्धीस नेत होता. उभयतांचे उद्योग स्वराज्यपरिपोषी होते. पण ते फार दिवस गुप्त राहूं शकले नाहींत. मुस्तफाखान व अफझलखान वगैरे विजापुरचे सरदार शहाजीचे समव्यवसायी होते, त्यांस हे प्रकार तेव्हांच उमगले. मुस्ताफाखान विजापुरचा मुख्य सेनापति असून त्याचे हाताखालीं शहाजीची नेमणूक होती. ते दोघे जिंजी किल्ला सर करण्यांत गुंतले असतां उभयतांचा बेबनाव झाला. खानाला शहाजीचा ताठरपणा पाहून संताप प्राप्त झाला. त्यानें शहाजीस कैद करून विजापुरास पाठविलें इकडे त्याच सुमारास दादाजी कोंडदेव मृत्यु पावला आणि शिवाजीची बंडखोरी शहाच्या नजरेंत विशेष भरली. अशा स्थितींत बापाला सडकून शिक्षा केली कीं मुलगा ताळ्यावर येईल अशा सूचना शहाकडे आल्या. पण या प्रकरणास दुसरी बाजू होती. शहाजीचे दोनही मुलगे पराक्रमी असून मुलखांत त्यांचें वजन भारी होतें. म्हणून शहाजीस अपाय केल्यास सर्वच हिंदु एक जूट करून आपल्यावर उठतील, मग आपला निभाव लागणार नाहीं अशी भीति शहाला पडली, ती अगदींच वावगी नव्हती.* म्हणून सिंहगड व बंगलूर हीं दोन ठाणीं परत घेण्याच्या अटीवर शहानें शहाजीची मुक्तता करून त्यास पुनः पहिल्या कामगिरीवर रुजू केलें. शहानें शहाजीस कडक शिक्षा केली नाहीं यावरून त्याचें व तत्पुत्र शिवाजी यांचें सामर्थ्य केवढें वाढलें होतें यात्री कल्पना करितां येते.

---

*जनकः शंभुशिवयोर्न मोक्तव्यो मया यदा
समृध्दायै श्रियेऽमुष्यै बत देयोंऽजलिस्तदा । शिवभारत १९-२०.

या प्रकरणात असा एक प्रसंग घडून आला कीं त्यावरून शिवाजीच्या चरित्राचें व एकंदर राष्ट्रजीवनाचें रहस्य कळून येतें. 'सिंहगड किल्ला परत दिल्याशिवाय आमची मुक्तता होत नाहीं, सबब किल्ला सोडून शहाचे हवालीं करावा,' असें वडिलांचें आज्ञापत्र शिवाजीस आलें. तेणें करून असा नामर्दपणा पदरीं घेणें शिवाजीच्या जिवावर आलें. त्याला वाटलें, सिंहगड परत देणें म्हणजे इतक्या वर्षांचा स्वराज्याचा उद्योग फुकट घालविल्यासारखें होऊन शिवाय नामुष्की पदरांत येते. 'आम्ही जिवंत असतां वडिलांचे जिवास अपाय करण्याची शहाची छाती नाहीं.' शिवाजीचा हा दुराग्रह पाहून जिजाबाईस अत्यंत दुःख झालें. आपल्या सौभाग्यावर घाला येईल अशी भीति तिला पडली. उभयतांचा पुष्कळ वाद झाला, पण तडजोड निघेना, तेव्हां सोनेपंत डबिरांस विचारून ते सांगतील तसें करावें असें ठरलें. पंतांस विचारितां त्यांनीं या प्रसंगीं शिवाजीस ज्या राजकारणाच्या कित्येक गोष्टी सांगितल्या त्या सर्व अभ्यासूंनी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. त्यांचें सार शिवभारतकारानें एका संस्कृत पद्यांत दिलेलें आढळतें तें असें :—सुविक्रांतस्य नृपतेः सर्वमेव महीतलं ॥ पराक्रमी पुरुषाला सर्व जग मोकळें आहे. सोनोपंत शिवाजीला म्हणाला, 'वडिलांचे इच्छेस्तव सिंहगड सोडून देणें तुम्हास अवश्य आहे. तुमचे अंगीं पराक्रम असेल तर एक सोडून पन्नास किल्ले तुम्हांस घेतां येतील; आणि पराक्रम नसेल तर एक किल्ला असून तरी त्याचा काय उपयोग!' हें भाषण ऐकून वडिलांचे सुटकेसाठीं शिवाजीनें किल्ला सोडून दिला, तो पुढें वीस वर्षांनीं तानाजी मालुसऱ्यानें जिंकून परत घेतला, तो प्रकार महशूर आहे. या पुढील विषय उद्यांचे व्याख्यानांत येईल.

॥ श्री ॥

व्याख्यान दुसरें

शिवाजीचें कार्य

सन १६४४—१६८०

इ. स. १६४४ हें वर्ष मी शिवाजीच्या राज्यारंभाचें निदर्शक मानतों. कारण याच सालीं त्यानें सिंहगड हस्तगत करून आपल्या राज्याची सुरुवात केली आणि हळू हळू पेशवे, डबीर, सर–नोबत, चिटणीस वगैरे अधिकारी नेमिले आणि स्वतः छत्रपतिपद स्वीकारिलें. या राज्याची मुख्य खूण त्याच्या मुद्रेंत समाविष्ट आहे, ती मुद्रा आपण सर्वांनीं लक्षांत ठेविली पाहिजे. प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता । शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥ अर्थ–शाहजी पुत्र शिवाजी ही मुद्रा लोक कल्याणासाठीं धारण करीत आहे. ही प्रतिपदेच्या चंद्रकोरीसारखी वाढत जाणारी व सर्व जगाला वंद्य होणारी आहे.

या मुद्रेवरून शिवाजीचीं धोरणें स्पष्ट होतात. तो सांगतो कीं आज माझें राज्य प्रतिपच्चंद्रकोरीसारखें बारीक दिसलें तरी तें उत्तरोत्तर वृद्धि पावून लोक कल्याणार्थ अवतरणारें आहे. सन १६४९ त शहाजीची मुक्तता झाल्यावर शिवाजीनें आपल्या या चिमुकल्या राज्याची यथासांग व्यवस्था ठरवून तो स्वतंत्रपणें वागूं लागला. इ. स. १६५३-५४ पावेतों ही पहिली रचना पूर्ण झाली. हाच त्याच्या राज्याचा आरंभ होय. येथून पुढें दहा दहा वर्षांचे दोन खंड जमेस धरल्यास वीस वर्षांनीं त्याच्या राज्याभिषेकाचा काल प्राप्त होतो. मागें सांगितलें आहे कीं, सन १६४४ त सिंहगड हस्तगत करून त्यानें पायाचा आरंभ केला. त्याची पूर्तता दहा वर्षांत होऊन पहिली इमारत बनली. या पुढील दहावे वर्षी म्हणजे स. १६६४ त शिवाजीचे वडील मृत्यु पावले आणि त्याच्या

उद्योगास आत्मनियंत्रण राहिलें नाहीं. तदुत्तर त्याचा राज्योपक्रम मोठ्या आवेशानें व अत्यंत झपाट्यानें चाललेला दिसतो. अर्थात् अभ्यासाच्या व परीक्षणाच्या सोयीसाठीं सन १६४४ पासून १६७४ पर्यंतच्या दशकांचे काल आपल्या फार उपयोगाचे आहेत. मला वाटतें त्यानें आपल्या उद्योगाच्या एकाहून एक कला या दशकांत वाढवीत नेल्या; आणि त्यांचा पूर्ण चंद्र सन १६७४ त बनला. त्या पुढील कालांतला शिवाजीचा उद्योग निराळ्या स्वरूपाचा आहे. या कला कशा वृद्धिंगत होत गेल्या, एका प्रकरणांतून दुसरें कसें उद्भवत गेलें, त्यांत ज्या अडचणी किंवा संकटें आलीं त्यांचा उपयोग शिवाजीनें आपल्या कार्याकडे कसा करून घेतला, हें समजून घेण्यांत एक प्रकारची ऐतिहासिक चमत्कृति नजरेस येते. तूर्त आपण या प्रत्येक दशकांत मोठमोठीं प्रकरणें कोणतीं घडलीं आणि त्यांचें ऐतिहासिक स्वरूप काय हें पाहूं.

सन १६५४–१६६४:– १ जावळीकर मोऱ्यांचा पाडाव व प्रतापगड रायगड किल्ल्यांची बांधणी; २ अफझलखानाचा वध, पन्हाळ्याच्या वेढ्यांतून शिवाजीची सुटका; ३ दक्षिण कोंकण कावीज, राजापुरकर सात इंग्रजांस कैद; ४ औरंगजेबाचें राज्यारोहण,-शायिस्ताखानाचें पुण्यास तीन वर्षें वास्तव्य,-त्याजवर शिवाजीचा छापा; ५ वडिलांचा मृत्यु व जिजाबाईची सहगमनापासून निवृत्ति.

सन १६६४–१६७४:–सन १६६४ हें तीव्र वेगाच्या विजयांचे वर्ष होय. १ सुरतेची लूट; २ कुडाळ देश कावीज, ३ बाजी घोरपडे व खवासखान यांचा पाडाव, ४ सिंधु दुर्गाची उभारणी; ५ बसनूरची स्वारी, गोकर्ण महाबळेश्वर व फोंडा हस्तगत; ६ जयसिंहाची स्वारी व आगऱ्यास बादशाहची भेट, कैदेंतून सुटका; ७ मोगलांकडे गेलेले किल्ले परत कावीज, ८ सिंहगड व तानाजी मालुसरे; ९ सुरतेची फिरून लूट, दिंडोरी व चांदवडचे घनघोर संग्राम; १० बहलोलखानाचा पाडाव व प्रतापरावाचा मृत्यु. यांपैकीं आगऱ्यांतून सुटका हाच शिवाजीचा शेवटचा अद्भुत प्रसंग होय. त्यानंतर त्याचा बादशहाशीं झगडा उघड सामन्याचा झाला. अद्भुत कृत्यें संपलीं. सन १६७४ ता० ६ जून रायगडावर राज्याभिषेक समारंभ.

वर केवळ कांहीं ठळक प्रसंगांचा तेवढाच नाम निर्देश केला आहे.

एकूण एक लहान मोठे प्रसंग सांगूं लागल्यास पार येणार नाहीं. शिवाजीचे नानाविध गुण या प्रसंगांनीं लोकांत प्रगट होऊन हा हिंदु धर्माचा पुरस्कर्ता ईश्वरी संकेतानेंच उदयास आला आहे अशी भावना झाली. एकामागून एक त्याचे अद्भुत पराक्रम व विजय झळकूं लागले, तेव्हां त्याच्या शत्रूंस आपल्या बचावाची निराशा वाटूं लागली. अफझलखानाच्या वधानें दक्षिणेंत त्याची ख्याति झाली तर आगऱ्याहून सुटून आल्यावर त्याची समग्र हिंदुस्थानांत प्रसिद्धि होऊन बाह्य जनतेला त्याजाविषयीं आदर व प्रेमभाव वाटूं लागला. छत्रसाल, कविभूषण, राजपूत राजे इत्यादि औत्तरीय मंडळी शिवाजीच्या आश्रयाची इच्छा करूं लागली. या सर्व त्याच्या पराक्रमकला म्हटल्या पाहिजेत. एका प्रकरणांतून दुसरें, दुसऱ्यांतून तिसरें अशीं त्याचीं पराक्रम कृत्यें प्रगट होऊन त्याची अजबशक्ति व धाडस निदर्शनास आल्यानें हा पुरुष लोकोत्तर आहे अशी लोकांची खात्री झाली. अशा या पराक्रमकलांची सांखळी कशी बनत गेली तें समजल्यानें ऐतिहासिक विवेचन मनास पटूं लागतें, आणि कार्य कारणभावाची स्पष्टता होऊन अडचणींच्या प्रसंगांतून बुद्धिमान पुरुष युक्तीनें मार्ग काढून आपला हेतु कसा साध्य करतो याचा उत्कृष्ट अनुभव आपणास पाहवयास मिळतो. मी आपल्या मतें या कला (Phases) तूर्त आपल्या विवेचनापुरत्या खालील स्वरूपांत निश्चित केल्या आहेतः—

१ मावळांतील बच्चा सन १६२७—१६४४;
२ स्वराज्याचा पुरस्कर्ता सन १६४४—१६९९;
३ सार्वभौमाचा उच्छेदक सन १६९९—१६६६;
४ महाराष्ट्राचा सेनानायक सन १६६६—१६७४;
५ सिंहासनाधीश्वर छत्रपति सन १६७४.

मला वाटतें वरील विभागणीच्या अनुरोधानें शिवाजीचें चरित्र यथायोग्य समजून घेतां येईल. शेवटच्या सहा वर्षांचा पुढील काळ अगदीं निराळ्या स्वरूपाचा व अनेक बाबतींत उद्वेगजनक आहे. थोर पुरुषांचे अंत देखील पुष्कळदां थोर दुःखांत झालेले दिसतात, तसाच प्रकार शिवाजीचा झाला. त्याचा वडील मुलगा संभाजी दुर्वृत्त निघाला. धाकटा लहान दहा वर्षांचा असून त्याची प्रकृति

क्षीण होत जाऊन शिवाजीस देहाचा भरंवसा वाटेना. अशा स्थितींत पुढें राज्य कोण संभाळणार याची त्यास मोठी विवंचना लागली. त्यासाठीं त्यानें समर्थांचा आश्रय केला. आपले सर्व अधिकारी व मदतगार यांस एकत्र जमवून भावी राज्य-व्यवस्थेची कांहीं तरी योजना जाहीर करण्याचा शिरस्ता त्या कालीं नव्हताच. अशा स्थितींत रायगडावर शके १६०२ च्या हनुमज्जयंतीच्या दिवशीं म्हणजे ता. ३ एप्रिल सन १६८० रोजीं या थोर पुरुषाचें देहावसान झालें.

शिवाजीची योग्यता व गुणानुवाद यांसंबंधानें आजपावेतों इतका ऊहापोह झाला आहे, आणि भिन्न व्यक्तींकडून व भिन्न दृष्टींनी त्याची इतकी चिकित्सा होऊन गेली आहे, कीं मी तरी येथें जास्त कांहीं सांगू शकेन असें नाहीं. त्याच्या चरित्रापासून घ्यावयाचा मुख्य बोध पराक्रम हा होय हें मी प्रथमच सांगितलें आहे. हा पराक्रम राष्ट्रांत गर्जत होता, तोंपर्यंत मराठी राज्य टिकलें. दुसरा बाजीराव किंवा दौलतराव सिंदे यांच्या सारखे पराक्रमहीन पुरुष राज्याचे धुरीण बनले, तेव्हां तें राज्यही संपलें. राज्य हें उपभोगासाठीं नसून करील त्याचें आहे. परमेश्वरानें आपणांस मनुष्यपण दिलें याचाच अर्थ पराक्रमशक्ति दिली असा होतो. या पराक्रमानेंच आज मनुष्यप्राणी प्रस्तुतच्या कोटीस येऊन पोंचला असून अद्यापि त्यास पुढें पुष्कळ मजल गांठावयाची आहे. जें एकानें करून दाखविलें तें दुसऱ्यास अशक्य नाहीं; जी गोष्ट एकदां साध्य झाली ती पुनरपि साध्य होईल. शिवाजीनें अत्यंत कठिण परिस्थितींत आपल्या राष्ट्रास स्वातंत्र्य मिळवून दिलें, तसेंच स्वातंत्र्य हल्लीं ही मिळविणें आपणास शक्य आहे, त्या साठीं शिवाजीच्या ठिकाणीं दैवी अंश होता असें मानण्याची कांहीं गरज नाहीं. प्रत्येक मनुष्य-प्राण्यांत दैवी अंश आहेच. शिवाजी तुमच्या आमच्या सारखाच साधा मनुष्य होता, शरीरानें सुद्धां धिप्पाड किंवा भव्य नव्हता. फार तर पांच फूट चार इंच उंचीचा असेल. शिवाजीचीं मंदिरें बांधून त्याची देवासारखी पूजा केल्यानें मला वाटतें आपण त्याला मानवी कोटींतून दूर लोटतों आणि त्याच्या चरित्रापासून घ्यावयाच्या ऐहिक मानवी बोधास आपण मुकतों. शिवाजी मनुष्य-कोटींतला होता म्हणूनच त्याची आम्हांस एवढी आस्था वाटते. मनुष्य काय करूं शकणार नाहीं हें आपणास त्याच्या चरित्रावरून शिकतां येतें. यादवांचें राज्य

गेलें, विजयनगरचें राज्य गेलें. हिंदूंस कोणी त्राता राहिला नाहीं. परचक्राखालीं जनता दडपून गेली. धर्म, संस्कृति, व्यापार, उद्योग व संपत्तीची पैदास अशा सर्व बाबतींत लयास पोंचल्या. दक्षिणेंत कांहीं मुसलमानी राज्यें देशांत थोडी बहुत सुव्यवस्था ठेवीत होतीं, त्यांचा ग्रास मोगल बादशहा करूं लागले. त्यामुळें आपलें राष्ट्रीय जीवन अगदीं बंद पडलें. अशा संकटावस्थेत विषण्ण व निराश जनतेस शिवाजीनें वन्य स्थितींतून पुढें आणून नवीन पराक्रमाची दिशा दाखविली. सुरुवातीला तो रॉबिन्सन क्रूसोप्रमाणें एकटा व असहाय होता. पण त्यानें प्राप्त परिस्थितींतून आपले सहायक निर्माण केले, ते सर्व जातींचे व सर्व व्यवसायांचे होते. ब्राम्हण, प्रभु, मराठे, शूद्र, अंत्यज, मुसलमान असे भेद त्याच्या अनुयायांत असूनही त्यांचा त्यानें एक जीव बनविला. त्याचा हा प्रयोग विशेष पायाशुद्ध होता. अल्पायुष्य हा त्याचा दोष नव्हे. जास्त आयुष्य त्यास लाभलें असतें तर त्यानें मराठ्यांचें राज्य जास्त स्थायिक व चिरंजीवी केलें असतें. स्वतः विशेष विद्वान नसतांही जुन्यांतलें काय घ्यायचें आणि नव्याशीं त्याचा मेळ कसा घालावयाचा हें कठिण कार्य त्यानें करून दाखविलें. त्याची फौज, त्याचीं लढाऊ जहाजें, त्याचे जलदुर्ग व भूदुर्ग असे सर्व प्रकार त्यानें स्वतःच्या अकलेनें नवीन बनविलेले आहेत. तो लूट करी, पण ती पेंढाऱ्यांसारखी केवळ जाळपोळीची नव्हे. त्या लुटीला उत्कृष्ट शिस्त त्यानें लाविली. सर्व ठिकाणची भरपूर माहिती हेरांच्या मार्फत मिळविण्याची त्याची पद्धत हल्लींच्या शास्त्रीय युगांतल्या देशीय माणसास लाजवील इतकी व्यवस्थित होती. त्यानें अफजलखानास युक्तीनें लांबविलें आणि सुरत लुटून बादशहास दहशत घातली, तर वणी दिंडोरी किंवा साल्हेर उंब्राणी सारखे अलीकडच्या शिकलेल्या सेनानायकांसही अशक्य वाटणारे प्रचंड मैदानी सामने त्यानें स्वतःच्या कल्पकतेनें यशस्वी केले. युद्ध कलेचे उत्कृष्ट नमुने त्याच्या उद्योगांत व्यक्त होतात. त्यानें कोणास वतनें किंवा जागिरी तोडून दिल्या नाहींत, सर्व नोकरांस वेळच्या वेळीं भरपूर रोख पगार मिळण्याची व्यवस्था करून दिली. आपल्या लोकांचें हृद्गत ओळखून त्यांस झेपेल अशीच लष्करी व दिवाणी राज्य-व्यवस्था त्यानें प्रचारांत आणिली. पिढीजाद नोकऱ्या न चालवितां प्रत्येकाची लायकी पाहण्याचा दंडक घातला. नेपोलियन सारख्या कल्पक व सुशिक्षित युरोपियन गृहस्थास जें

राज्य-यंत्र यशस्वी करून दाखवितां आलें नाहीं तें त्याच्या अगोदर दीडशें वर्षें शिवाजीनें या प्राच्य भूमींत सिद्ध करून दाखविलें. सर्व जातींस व सर्व धर्मांस समान हक्क देऊन समस्त हिंदी राष्ट्राचा—नुसत्या महाराष्ट्राचा नव्हे—एक जीव करून दाखविणें, जें आज देखील अशक्य वाटत आहे, तो प्रयोग त्यानेंच प्रत्यक्ष सिद्धीस नेला. तो प्रयोग पुढें अनेक कारणांनीं बंद पडला त्याची जबाबदारी शिवाजीवर येत नाहीं. फ्रेंच राज्यक्रांतीच्या प्रयोगांतील उदात्त तत्त्वें किंवा अलीकडच्या तज्ञांनीं ठरविलेलीं राजनीतीचीं प्रमेयें शिवाजीच्या राष्ट्रीय उद्योगांत अवतरलेलीं पाहून त्याजबद्दल आपणास धन्यता वाटते आणि हा एकच पुरुष म्हणजे राष्ट्राची चिरंतन पैदास होय असें म्हणतां येतें. अशा या पुरुषाबद्दल हिंदी राष्ट्रास सदैव धन्यता वाटणें युक्त आहे. शिवाजी संबंधाचा हा अभिप्राय आज आम्ही सजातीय प्रेमानें अंध होऊन नवीन बनवीत आहों असें नसून, रामचंद्र नीलकंठ अमात्य, कृष्णाजी अनंत सभासद, समर्थ रामदास इत्यादि समकालीन व सुजाण व्यक्तींनीं देखील असेच अभिप्राय व्यक्त केलेले आढळतात, तेच आपण प्रमाण मानले पाहिजेत. विषय लांबत चालल्यामुळें मला ते अभिप्राय आज आपणास वाचून दाखविण्याची सवड नाहीं. अभ्यासकांच्या ते माहितीचेच आहेत.

॥ श्री ॥

व्याख्यान तिसरें

संभाजीची अवनति, मराठशाहीवरील आपत्ति.

सन १६८०–१६८९

राज्य–संस्थापक कितीही शहाणा किंवा विचारी असला तरी त्याचीं मुलें त्याच्याच सारखीं हुशार निपजावीं अशी युक्ति मानवी व्यवहारांत अद्यापि निघालेली नाहीं. एका वंशांत एका मागून एक पराक्रमी पुरुष निघतील तरच त्या राज्याची सुस्थिति नांदूं शकेल. नाहीं तर एकानें पैदा करावें आणि दुसऱ्यानें घालवावें असाच प्रकार वारंवार घडतो. शिवाजी कितीही राज्यकुशल असला, तरी त्याची व्यवस्था सर्वथा स्वेच्छानुवर्ती होती, तींत बाह्य लोकमताला बिलकूल अवकाश नव्हता. तथापि एक शहाणा पुरुष जें अल्पावकाशांत करूं शकेल त्याची सर लोकशाही कारभाराला कधीं येणार नाहीं. लोकशाहीचा कारभार देखील किती अनर्थावह होतो हें आपण हल्लीं पाहतच आहों. सांगण्याचा मुद्दा असा कीं शिवाजीच्या पश्चात् मराठी राज्याची तत्काळ अवनति झाली. आपल्या पाठीमागें राज्य सुरळीत चालण्याची कांहीं एक तोड शिवाजीला काढितां आली नाहीं. संभाजी दुर्वृत्त आहे हें तो पूर्ण जाणत होता. पुत्रास नाना तऱ्हेनें बोध करून ताळ्यावर आणण्याचे प्रयत्न त्यानें थोडे केले नाहींत; त्यांमुळें संभाजी बापावर रुसून मोगलांस जाऊन मिळाला तो एक वर्ष बाहेर होता. शिवाजीनें युक्तीनें त्यास परत आपल्याजवळ आणिलें आणि पन्हाळ्यावर एक महिना पावेतों त्यास नाना-प्रकार बोध केला. पण अशा बोधानें माणसाची सुधारणा झाली असती तर या जगाचे व्यवहार निराळेच बनले असते. संभाजीला बापाच्या शिकवणीनें उपतिष्ठा कशी ती मुळींच झाली नाहीं. शिवाजीला अत्यंत वैताग प्राप्त झाला.

पण करतो काय, काळजीनेंच झुरून त्याची आयुर्मर्यादा भरत आली. अशा विमनस्क स्थितींत त्यानें सज्जनगडावर जाऊन श्री समर्थांचा आश्रय केला. पण त्यांच्या चचेंत भावी राज्यव्यवस्थेचा उपाय कांहीं निघाला नाहीं. चांगला दीड महिना त्या उभयतांचा सहवास व विचार विनिमय झाल्याचा दाखला आढळतो. समर्थांची रजा घेऊन शिवाजी रायगडावर गेला आणि बरोबर दोन महिन्यांनी तेथेंच निधन पावला. पुढें राज्याची व्यवस्था काय करावयाची याची कांहीं जाहीर योजना चार चौघांच्या सल्ल्यानें व समर्थांच्या सांनिध्यांत ठरली असती तर भावी अनर्थ पुष्कळसे टळले असते असें वाटल्याशिवाय राहत नाहीं. शिवाजीच्या हाताखालीं निरनिराळीं माणसें तयार झालीं होतीं, आणि त्यांच्या पुढें एखादा ठरीव कार्यक्रम विद्यमान असता तर संभाजीच्या पश्चात् जें राष्ट्रकार्य महाराष्ट्र धुरीणांनीं केलें, तेंच शिवाजीच्या पश्चात् ही केलें असतें. परंतु शिवाजी कितीही शहाणा किंवा विचारी असला तरी तो पुत्रमोहापासून अलिप्त नव्हता. संभाजी राज्याची वाट लावणार आणि राजाराम अल्पवयी हें त्याला माहीत होतें. पण कांहींच व्यवस्था न ठरतां त्यास मरण आलें. लोकसत्ताक राज्य पद्धतीचा त्या वेळीं उगमही नव्हता आणि त्या दिशेनें शिवाजीनें विचार केला नाहीं यांत आश्चर्य नाहीं. याचा परिणाम मात्र असा झाला कीं, शिवाजी मरण पावतांच रायगडावरील मंडळींनीं राजारामास सिंहासनावर स्थापून कारभार चालू केला. पण ही व्यवस्था जाहीर होण्यापूर्वीच संभाजीनें पन्हाळ्यांतून बाहेर पडून हंबीरराव सेनापतीस घेऊन रायगडावर चाल केली आणि विरोधकांस अटकेंत ठेऊन आपण राज्यपद चालवूं लागला. तो स्वभावाचा क्रूर व अविचारी होता. वर्ष सहा महिन्यांत त्याजवर एकदां विष प्रयोग झाला, त्या योगानें त्याचा क्रोध अनावर होऊन त्या सपाट्यांत त्यानें आपल्या सावत्र मातुश्रीस, तिचे आप्त शिर्क्यांस, आणि बाळाजी आवजी, अनाजी दत्तो वगैरे कित्येक लायक माणसांस ठार मारिलें. दरबारचें सर्वच वातावरण आपल्यावर उठलेलें आहे असें त्याच्या मनानें घेतलें आणि कविकलश नांवाचा एक कनोजा ब्राम्हण मंत्र तंत्र जाणणारा प्रयागचा क्षेत्रोपाध्या त्याच्या सलगींतला होता, त्याला जवळ करून त्याच्याच सल्ल्यानें तो राज्यकारभार चालवूं लागला. यांत तंत्रविद्येवर त्याचा विश्वास भरपूर असावा असें दिसतें.

अलीकडे कित्येक त्रुटित संस्कृत काव्यें उपलब्ध होत आहेत, त्यांतील कांहीं खुद्द संभाजीच्या नांवावर व कांहीं इतरांनीं त्याच्या चरित्रावर लिहिलेलीं आहेत. त्यांवरून असें निःसंशय दिसतें कीं, संभाजीला संस्कृत भाषेचा परिचय चांगला होता. पुष्कळसे नीति ग्रंथ व पुराणें वगैरे त्यानें वाचलेले होते. अर्थात् त्याला संस्कृत चांगलें समजत असून थोडें बहुत लिहितां येत असावें. त्याचा दोस्त व सल्लागार कविकलश हा तर चांगलाच संस्कृतज्ञ होता. प्रो. वेलणकर यांनीं बुधभूषण काव्य म्हणून कांहीं वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलेलें वाचकांस माहीत आहेच. त्या शिवाय अलीकडे भांडारकर इन्स्टिट्यूटचे क्यूरेटर रा. गोडे यांनीं हरि कवि ऊर्फ भानुभट्ट यानें रचिलेल्या काव्य ग्रंथांतील कित्येक उपलब्ध भाग प्रसिद्ध केले आहेत, त्यांत शंभुराज चरित व हैहयेंद्रचरित हे मुख्य असून त्यांवर शंभुविलासिका नांवाची टीका व सुभाषित रत्नहारावलि नांवाचा आणखी एक संग्रह यांचा उल्लेख आहे. शंभुराज चरित हें बारा सर्गांचें महाकाव्य शंभुराजाच्या वर्णनाचें कवीनें लिहिलें असावें. तें सर्व काव्य उपलब्ध नाहीं, आणि जे काय भाग सांपडले आहेत त्यांत संभाजीच्या शृंगारविषयक लीलांचेंच वर्णन आहे. या काव्यांचा कर्ता भानुकवि हा सुरतचा राहणारा आपला गुरु कृष्ण पंडित याचा आरंभीं गौरवानें उल्लेख करितो; आणि हा कृष्ण पंडित म्हणजे कविकलशच होय असा साधार तर्क केलेला आहे. हैहयेंद्र चरित हें सुद्धां भानुकवीनें रचिलेलें संभाजीचा गौरव करणारें काव्य आहे. यांशिवाय शिवभारत लिहिणारा जो परमानन्द कवि त्याचा नातू गोविंद कवींद्र यानें रचिलेले कांहीं त्रुटित भाग उपलब्ध झाले असून त्यांत संभाजीनें आपल्या आपत्तींचे निरसनार्थ काली ऊर्फ भवानी देवीचें आराधन केलें आहे. त्यांतला पहिला व शेवटचा श्लोक येथें उद्धृत करितोः—

श्री गोविन्द कवीन्द्र उवाच

अथ प्रोद्दामवीरश्रीः शंभुराजो महामतिः
सभामगाद् विनोदेन कस्मिंश्चिदपि वासरे ॥

× × × ×

इत्थं शंभुनृपः प्रगल्भविभवः शक्रश्रियं भर्त्सयन्
शंभ्वाराधनसाधनोपि गिरिजासर्वस्वभूतः पुनः ।
पुत्रेहां हृदि संवहन्निजसभास्तारान्निगद्योच्चकैः
तूष्णीमास सतृष्ण एव सततं कालीसमाराधने ॥
इति कविन्द्र प्रकाशिते अनुपुराणे सूर्यवंशे अध्यायः ॥

सारांश संस्कृत भाषेंत देखील संभाजीच्या चरित्राचें साहित्य सांपडणें कसें शक्य आहे हें यावरून लक्षांत येईल. मग बादशाही अखबारा फारसी वगैरे भाषांत असतील त्या अवश्य साध्य केल्या पाहिजेत हें तर सांगायला नकोच.

इकडे संभाजी रायगडावर आपलें बस्तान बसवूं लागला त्याच सुमारास औरंगजेबाचें राजपुतांशीं निकराचें युद्ध चालू होतें. त्या युद्धांत बादशहाचा अत्यंत आवडता व शूर पुत्र अकबर हाच मोगल फौजेचा मुख्य सेनापति होता. या अकबराची आई लहानपणींच वारल्यामुळें त्याची सर्व निगा स्वतः बादशहानें ठेविली होती. राजपुतांचें हें युद्ध अत्यंत अन्यायाचें असून पूर्वी अकबर बादशहानें राजपूत राजांशीं स्नेह जोडून त्यांस आपल्या राज्याचे खांब बनविलें होतें. परंतु इस्लामी धर्म वाढविण्याच्या उद्देशानें औरंगजेबानें हीं राजपूत राज्यें खालसा करण्याचा अलीकडे निर्घृण प्रयत्न चालू केला, तो खुद्द मुसलमानांस सुद्धां आवडला नाहीं. शहाजादा अकबर राजपुतान्यांत लढत असतां त्याच्या व राजपुतांच्या भेटी वारंवार होऊन खुलासेवार बोलणीं झालीं, तेव्हां आपल्या बापाचें अन्यायी वर्तन अकबरास पटलें आणि राजपुतांस जिंकण्याचा नाद सोडून एकदम युद्ध बंद करावें असा अभिप्राय त्यानें बापास स्पष्ट लिहून कळविला. औरंगजेबास मुलाचा हा फाजीलपणा बिलकूल पसंत पडला नाहीं. त्यानें पुत्राची मानखंडना करून त्यास परत बोलविलें. ही बातमी राजपुतांस कळतांच त्यांचा चतुर पुढारी दुर्गादास यानें अकबराची गांठ घेऊन त्यास असें कळविलें, कीं " तुम्ही जर औरंगजेबास कैद करून स्वतः बादशाही पद घेण्यास कबूल असाल तर आम्ही सर्व राजपूत राजे आपापल्या फौजा घेऊन तुम्हांस सामील होतों." अकबरास ही गोष्ट पसंत पडली. त्यानें बादशाही पद स्वीकारल्याचा जाहीरनामा लाविला आणि राजपुतांच्या

फौजा घेऊन औरंगजेबावर चाल केली. औरंगजेबाचा मुक्काम अजमिरास होता. त्याला हा प्रकार कळला तेव्हां तो अत्यंत चिन्ताक्रान्त झाला. या अडचणींत कपटविद्येच्या बळावर त्यानें राजपुतांस पुत्रापासून अलग केलें आणि अकबरास पकडणार इतक्यांत दुर्गादासानें त्याचा बचाव केला आणि ते दोघे पळत पळत नर्मदापार होऊन दक्षिणेंत संभाजीच्या आश्रयास आले. त्यांना शिवाजीची कीर्ति ठाऊक होती. त्याचा पुत्र संभाजी नुकताच गादीवर आला होता, तोही बापासारखाच पराक्रमी असेल अशा भावनेनें अकबर व दुर्गादास स. १६८१ त त्याजकडे आले. संभाजीनें त्या वेळीं रायगडावर आपली व्यवस्था चालविली होती. पाली येथें शहाजादा आपल्याकडे आल्याचें कळतांच त्याच्या राहण्याची सोय संभाजीनें करून दिली आणि आपल्या तर्फेनें नेताजी पालकर व हिरोजी फर्जंद यांस त्याजवळ ठेवून दिलें.

ता. १ जून स. १६८१ पासून फेब्रुवारी स. १६८७ पावेतों जवळ जवळ सहा वर्षें या अकबराचा मुक्काम संभाजी जवळ बहुतेक कोंकणाच्या दुर्गम प्रदेशांत झाला. वर्ष सहा महिन्यांच्या अवधींतच अकबरास कळून चुकलें कीं संभाजीच्या अंगीं कर्तृत्व नाहीं आणि आपण इकडे येऊन उगाच फसलों. पहिलीं दोन वर्षें जम बसविण्यांत गेलीं. संभाजीनें पश्चिम किनाऱ्यावरील सत्ताधीश इंग्रज, सीदी, पोर्तुगीझ व वाडीकर सावंत इत्यादिकांस प्रथम नरम केलें, त्यांत त्याचीं एक दोन वर्षें गेलीं. औरंगजेबास जेव्हां अकबर दक्षिणेंत आल्याची खबर कळली, तेव्हां त्यास वाटलें संभाजी व अकबर दोघे आपल्यावर चालून आले तर आपला निभाव लागणार नाहीं. म्हणून राजपुतांशीं चाललेलें युद्ध कसेंबसें मिटवून त्यानें लगेच सर्व फौजा व भारी सरंजाम बरोबर घेऊन स. १६८२ त महाराष्ट्रावर स्वारी केली. अकबराची त्यास एवढी दहशत बसली कीं स्वतःच त्याचा बंदोबस्त करण्याचें काम त्यानें अंगावर घेतलें. अशा रीतीनें प्रथम बऱ्हाणपुर, तेथून औरंगाबाद व पुढें अहमदनगर अशा ठिकाणीं येऊन त्यानें संभाजी व अकबर यांचा उच्छेद चालविला. अशा या युद्धांत पुष्कळ ठिकाणीं मोगलांच्या फौजांचा संभाजीनें चांगला समाचार घेतला, तथापि बादशहाच्या मानानें त्याचें सामर्थ्य भारीच उणें असून, त्याच्या क्रूर वर्तनामुळें लोक बहुतेक नाराज झालेले, राज्यांत अव्यवस्था

व युद्धें चालू राहिल्यामुळें वसूल बंद पडलेला अशा अडचणींनीं गांजून गेल्यामुळें संभाजीच्या हातून अकबर व दुर्गादास यांच्या अपेक्षेप्रमाणें त्यांचा पाठपुरावा बिलकूल होईना, म्हणून ते उत्तरोत्तर अगदीं नाराज झाले; आणि आपण या भलत्याच अडचणींच्या जागीं येऊन पडलों याचा त्यांस भारी पस्तावा झाला. बादशहाच्या फौजा त्यांस पकडण्यासाठीं सर्वत्र संचार करीत होत्या. म्हणून कोंकणाच्या दुर्गम प्रदेशांतच त्यांस वनवासानें दिवस कंठावे लागले. अकबर व दुर्गादास यांनीं संभाजी व कलुशा यांस पुष्कळ गळ घातली, कीं आहे नाहीं तेवढी फौज जमा करून एकदां आपण खुद्द बादशाहचे छावणीवर छापा घालून त्यास चकित करूं, वेळीं पकडूनही घेऊं. सर्व उत्तर हिंदुस्थान व राजपुताना बादशहावर उलटला होता. त्याचे सरदार सुद्धां पुष्कळसे अकबरास अनुकूल होते. एकदां कांहीं तरी सर्व लोकांचे मनांत ठसण्याजोगा बादशहावर विजय मिळविला कीं सर्व पारडें लगेच फिरेल, आणि आपणास परत उत्तरेंत निघून जाण्याचा मार्ग मोकळा होईल/ असें—अकबरानें—परोपरीनें संभाजीस—सुचविलें, आणि जवळचा पैसा देऊन पुष्कळशी तयारी देखील केली. पण असें अलौकिक कृत्य करून दाखविण्याचें शिवाजीचें कसब संभाजीला नव्हतें, आणि संभाजी जेव्हां बादशहाशीं लढण्याचें सोडून पोर्तुगीझांशीं झगडूं लागला, तेव्हां अकबर व दुर्गादास यांजवर मोठा कठिण प्रसंग गुदरला. आपणास केव्हां बादशहा पकडून घेईल नेम नाहीं अशा विवंचनेंत त्यांस केवळ लपून छपूनच दिवस कंठावे लागले. त्या भिकारड्या कोंकणांत तो अगदीं वैतागून गेला. दिल्लीच्या ऐश्वर्यांत व कल्पनातीत ऐष आरामांत बापाचा अत्यंत आवडता म्हणून वाढलेला हा पंचविसीचा तरुण शहाजादा पाली येथील गवताच्या लहानशा झोपडीस कंटाळून गेला. त्या झोपडीस धड भिंती सुद्धां नाहींत. शेणानें सारविलेले कूड झांकण्यासाठीं वर शुभ्र कापड मढवून कृत्रिम शोभा आणिलेली होती. त्याची बायको मुलें मागें राजपुतान्यांत दुर्गादासाचे हवालीं होतीं. हा इकडे एकटाच संकटांत सांपडला. येथें संगत कोणाची तर टीचभर लंगोटी नेसणाऱ्या कोंकणी बाल्यांची; नाहीं भाषा, कीं पोषाख, कीं धर्म; मग गाणें बजावणें किंवा ख्याली खुशाली यांचें तर नांवच नको. उत्तर हिंदुस्थानांत वागलेला कलुशा हाच काय तो त्याचा एक दोस्त.

कलुशा आपले कडून शिकस्त करीत होता, पण त्याचें व शहाजाद्याचें रहस्य जमलेलें पाहून संभाजीचे मनांत दहशत उत्पन्न झाली कीं न जाणो, हे मलाच कैद करतील किंवा भलताच कांहीं तरी उपद्व्याप सुरू करतील. सारांश अशा विवंचनेंत वर्षेच्या वर्षें जाऊन शहाजादा बिचारा दुःखसागरांत निमग्न झाला. जीव कसा बचावतो याचीच त्यास अहर्निश चिंता. बादशहाचीं माणसें येऊन त्यास भेटत, बहिणीचीं पत्रें येत कीं तुम्हीं परत या, बाप तुम्हांस सर्व अपराध क्षमा करतील. पण अकबर आपल्या बापास पूर्ण ओळखीत होता. तो असल्या भुलथापांस बिलकूल वश झाला नाहीं. गोव्यास पोर्तुगीझांकडे जाऊन तेथून जहाजें घेऊन इराणास निघून जाण्याची तयारी त्यानें केली. ही बातमी औरंगजेबास लागतांच त्यानें आपले वकील गोव्यास बसविले. त्यांनीं पोर्तुगीझांस दहशत घातली. तेणें करून अकबराचा उपाय हरला. एकदां संभाजीसह त्यांनीं सुरत भडोच पावेतों स्वारी करून उत्तरेच्या मार्गानें गुजरातेंतून राजपुतान्यांत जाण्याचा प्रयत्न केला. पण तिकडेही बादशहाच्या फौजा आडव्या आल्यानें त्यांचे हेतु सिद्धीस गेले नाहींत. अकबराचा संचार मुख्यतः रायगड पासून राजापुर, वेंगुर्ला, व गोवा एवढ्या टापूंत झाला. याच टापूवर औरंगजेबानें आपला वडील पुत्र शहाआलम यास भल्या मोठ्या फौजेनिशीं रवाना केलें. त्या वेळीं संभाजी गोव्यावर चालून गेला होता. गोव्याचा बाहेरचा सर्व प्रदेश हस्तगत करून तो मुख्य राजधानीवर घाला घालणार हें पाहून पोर्तुगीझांच्या तोंडचें पाणी पळालें. संभाजीच्या पुढें निभाव लागण्याचे त्यांचे सर्व उपाय हरले, तेव्हां शेवटचा उपाय म्हणजे परमेश्वराची करुणा भाकणें तोच त्यांनीं अवलंबिला. झेवियर साधूचें थडगें उघडून त्यांनीं पोर्तुगीझ मुगुट व सर्व राज्य चिन्हें त्याजपुढें ठेवून सद्गदित अंतःकरणानें प्रार्थना केली, कीं आतां आमची लाज राखणें केवळ आपल्या हातीं आहे. कैक दिवस सर्व पोर्तुगीझ लोक गव्हर्नर व आर्च-बिशप सुद्धां अहोरात्र मंदिरांत जमून प्रार्थना करीत होते. इतक्यांत चमत्कार झाला तो असा, कीं उद्यां संभाजी गोव्यांत उतरणार तोंच मागून शहाआलम प्रचंड फौजेनिशीं आपणांवर चालून आल्याची बातमी संभाजीस कळली, तेव्हां गोव्याचा नाद सोडून तो तसाच परत शहाआलमवर चालून गेला, आणि गोवें राजधानी त्याचे तावडींतून निभावली. हा चमत्कार

झेवियर साधूनें दैवी सामर्थ्यानें घडवून आणिला असेंच भाविक पोर्तुगीझ अद्यापि मानितात. या वेळीं पोर्तुगीझ व संभाजी यांचा समेट अकबराच्या मध्यस्थीनें घडून आला. अखेरीस आपला आतां बिलकूल निभाव लागत नाहीं अशी खात्री होऊन स. १६८७ त शहाजादा अकबर वेंगुर्ल्याच्या बंदरांतून एका जहाजांतून निघून मस्कत येथें व तेथून पुढें इराणास इस्पहान येथें जाऊन राहिला. याप्रमाणें अकबरास परदेशीं पोंचवून दुर्गादास परत राजपुतान्यांत गेला आणि तिकडे त्यानें फिरून औरंगजेबाशीं युद्ध चालविलें. तो भाग मोठा बोधप्रद असूनही येथें सांगण्यास अवकाश नाहीं 'ए माता पूत एसा जिन, जेसा दुर्गादास' ही म्हण राजपुतान्यांत सर्वतोमुखीं आहे.

अकबर इराणांत गेल्यानें बादशहाची चिंता आणखी दुणावली. त्यास वाटलें हा आतां इराणची फौज घेऊन अफगाणिस्तानांतून दिल्लीवर चालून येईल. पण तसा प्रसंग उद्भवला नाहीं हें औरंगजेबाचें नशीब समजलें पाहिजे. कारण अकबर मोठा कर्तृत्ववान होता; आणि त्यास साह्य मिळतें तर त्यानें दिल्लीचें तख्त काबीज करून मोगल बादशाहास अकबर बादशहाच्या वेळचें स्पृहणीय वळण फिरून लाविलें असतें. हिंदुस्थानांतून गेल्यावर तो तिकडे सतरा वर्षें हयात होता आणि बापाच्या मृत्युपूर्वी तीन वर्षें म्हणजे स. १७०४ सालीं तो इराणांतच मरण पावला. तो इराणांत असतां बापानें त्यास प्रेमळ पत्रें लिहिली व परत आणण्यास माणसें पाठविलीं. त्यांजबरोबर त्यानें बापास लिहिलेलें पत्र उपलब्ध आहे, तें वाचलें असतां औरंगजेबाच्या कर्तृत्वावर कांहीं निराळाच प्रकाश पडतो. तें पत्र असें:—

'बाबा, तुमचेंच उदाहरण मी नेहमीं डोळ्यांपुढें ठेविलें आहे. इतकें चांगलें उदाहरण दुसऱ्या कोणाचें सांपडणार! ज्या राजपुतांनीं अकबर, जहांगीर व शहाजहान यांस मनापासून साह्य केलें त्यांचा आश्रय मीं केला, ह्यांत वाईट तें काय केलें? जशवंतसिंह तुमच्या भुलथापांस भुलला नसता तर तुम्हीं आज हिंदुस्थानचे बादशहा झालां नसतां. हे राजपूत लोक आपल्या राज्याचे खांब होते. पूर्वी फौजेंत राजपुतांची भरती हवी असली म्हणजे एकाचे ठिकाणीं शंभर उमेदवार पुढें येत. हल्लीं तुम्हीं तीन तीन वर्षें डांगोरा पिटूनही दहा पांच देखील माणसें जमा होत नाहींत. आज तुमच्या जवळ इतके अमलदार आहेत, पण एकाची तरी

तुमच्यावर खरी भक्ति आहे काय ? फौजेंतील सर्व लोक दरिद्री बनले आहेत. कोणापाशीं हत्यार नाहीं. एक कवि किंवा ग्रंथकार तुमच्या अंमदानींत निपजला नाहीं. व्यापारी व धनिक म्हणून आहेत त्यांची दिवसा ढवळ्या लूट होते, त्यांचे खून पडतात. तुमच्यानें ते बंद करवत नाहींत. रयत तर सर्व धुळीस मिळाली. विजापुर व गोवळकोंडा या राज्यांचा प्रदेश जो तुम्हांसच अत्यंत संपन्न व स्वर्गतुल्य वाटत होता, तो आतां ओसाड, कंगाल व दरिद्री बनला आहे. विजापुर, औरंगाबाद वगैरे शहरें केवढीं धनाढ्य, विस्तृत व शोभिवंत होतीं, पण हल्लीं तेथें धुळीशिवाय जास्त काय आहे, तुम्हीच सांगा. या सर्व परिणामांचें कारण काय तर तुमचा परधर्मद्वेष. तुम्हीं हिंदूंवर जिझिया बसविला, त्यामुळें लोक तुमच्यावर उठले, आणि जाळपोळ व लूट करूं लागले, तेणें करून देश धुळीस मिळाला.

'तुमच्या राज्यांत एक तरी प्रकार असा आहे काय कीं ज्याची आज तारीफ करितां येईल ? थोर व पुरातन घराणीं सर्व नामशेष झालीं. सर्वत्र लुच्चांचा बाजार भरला आहे. राज्यकारभार सगळा हलकट लोकांच्या हातीं गेला आहे. हातांत जपमाळ, काखेंत कुराण आणि डोक्यास मोठेंसें मुंडाकें असलें म्हणजे त्याजवर तुमचा पूर्ण भरवंसा! अशी मंडळी तुमच्या राज्याचे आधारस्तंभ!

'अशा आपल्या राज्याचा नाश होत असलेला मला पाहवेना म्हणून मोठ्या कष्टानें देशत्याग करण्याचें ठरवून मी इकडे आलों. आतां मी शांतचित्त आहें. परमेश्वर तुम्हांस दीर्घायुष्य देवो. मीच परत येऊन राज्य करावें म्हणतां, तर तुम्ही राज्य सोडून मक्केस जा, म्हणजे मग मी येऊन दाखवितों कसें राज्य करायचें तें. तुमचे अंगीं काय करामत आहे ती हाल्लीं सर्वत्र उघड दिसते आहे. आतां वृद्धापकाळीं एक परमेश्वर साधन तेवढेंच तुम्हांस योग्य आहे. जास्त लिहून तुम्हांस त्रास होईल म्हणून पत्र पुरें करितो" * औरंगजेबाच्या एकंदर कारभारावर व राजनीतीवर याहून जास्त टीका ती काय करणार ?

संभाजीच्या अपयशाचा वांटा पुष्कळसा कवि कलशाला देण्यांत येतो. आपल्याकडे सामान्यतः असा जाहिराणा होत असतो कीं राजा स्वतः फार चांगला,

* मनूची स्टोरिया ड मोगॉर भाग ४ पृष्ट १७१–१७७.

पण जवळचे खरावे लोक त्यास बिघडवितात. ही समजूत साफ चुकीची आहे. राजा-जवळ वाईट लोक कांहीं आपण होऊन गोळा होत नाहींत. त्यांस राजाच जवळ आणितो. अकबर किंवा शिवाजी यांनाच तेवढे चांगले लोक ओळखतां यावे असा कांहीं त्यांस परमेश्वराकडून वर मिळालेला नव्हता. खरें पाहतां भलेपणा किंवा दुष्टपणा कोणाही मनुष्याच्या कपाळावर लिहून ठेवलेला नसतो. बहुधा प्रत्येक इसमाच्या अंगीं कांहीं गुण व कांहीं दोष असतातच. गुणांचा उपयोग करून दोषांस अवधि न मिळेल अशी तजवीज करणें चतुर चालकाचें काम असतें. यासाठीं धन्यानें नेहमीं सावध व डोळे उघडे ठेवून वागलें पाहिजे. कवि कलश मूळचा क्षेत्रोपाध्या, कर्मठ ब्राह्मण, आपल्या धार्मिक कामांत तो हुशार होता. संभाजीनें त्याजवरच एकंदर राज्यकारभाराचें ओझें टाकिलें, त्यास तो काय करणार ? त्यानें ते ओझें कांहीं मागून घेतलें नाहीं. जवळच्या माणसांबद्दल अत्यंत अविश्वास संभाजीला वाटूं लागला, म्हणून त्यानें हा परका व गैर माहीत इसम मुद्दाम जवळ आणिला. वास्तविक पूर्वीचीं अष्ट प्रधानांचीं पदें ज्यांचीं त्यांजकडे चालूच होतीं. पण संभाजीनें कामें मात्र त्यांजकडून घेतलीं नाहींत. सेनापतीचें काम तेवढें कलुशानें केलेलें दिसत नाहीं. पण कवि कलश हा बादशहाचा गुप्त हेर होता, तो संभाजीस बुडविण्याकरितां मुद्दाम त्याजवळ येऊन राहिला असा जो सामान्य समज आहे, त्यास इतिहासांत बिलकूल आधार मिळत नाहीं. ही केवळ नाटकी कल्पना मुद्दाम घुसडलेली किंवा कळलाव्या बादशहानें मतलबास्तव पसरविलेली होय. संभाजीबरोबरच कलुशानेंही आपल्या पापाचें प्रायश्चित अखेरीस पुरेपूर भोगिलें. त्याच्या विश्वासघातकी स्वभावाचा पुरावा बिलकूल उपलब्ध नाहीं. मात्र संभाजीचा कारभार अपेशी ठरत चालला आणि कलुशाचे मध्यस्थीशिवाय त्याजकडे कोणाची दादसुद्धां लागेनाशी झाली, तेव्हां मुख्य आगलाव्या हाच होय अशी महाराष्ट्रांत सामान्य समजूत होऊन, कवि कलश याचा अपभ्रंश कलुशा म्हणजे पापी दुष्ट अशा शब्द प्रचारांत आला.

हा कविकलश व्युत्पन्न व विद्वान होता हें त्याच्या नांवावरूनच दिसतें. हें नांव त्यास संभाजीनें दिलें असावें, कदाचित् तें त्याच्या घराण्यास आनुवंशिक-ही चालत असेल. संभाजीनें त्यास प्रधान नेमिलें तेव्हां छंदोगामात्य ही पदवी

दिली. हरि कवीच्या काव्यांत कृष्ण गुरूचा उल्लेख येतो तें या कलुशाचेंच नांव असावें. कदाचित् कृष्ण हेंच त्याचें व्यक्ति नाम असावें. धर्माभिधान, कर्मकाण्ड-परायण, दैवतैकनिष्ठाग्राहिताभिमान, सत्यसंघ, समस्त-राजकार्य-धुरंधर, विश्वास-निधि इत्यादि विशेषणें कागदांत त्याच्या नांवास लाविलेलीं आढळतात. सरकारी कागदांवर होणारी त्याची मुद्रा आहे ती अशीः—

विधिरर्थिमनीषाणामवधिर्नयवर्त्मनां ।
शेवधिः सर्व सिद्धीनां मुद्रा कलशहस्तगा ॥

याच्याशीं तुलना करितां येईल अशी खुद्द संभाजीची मुद्रा आहे ती अशीः—श्री शंभोः शिवजातस्य मुद्रा द्यौरिव राजते
यदंकसेविनो लेखा वर्तते कस्यनोपरि ॥

या दोन मुद्रांतील अहंकार त्यांच्या मनःस्थितीचा निदर्शक असून त्यावरून त्यांच्या कारभाराचें धोरण लक्षांत येतें.

युद्धाचे विशिष्ट कावे जरी संभाजीला अवगत नसले, तरी तो जात्या शूर व जिवावर उदार होऊन संग्रामांत उडी घेणारा असल्यामुळें पहिल्या तीन चार वर्षांत त्यानें बादशहाला बिलकूल दाद न देतां उलट त्यास अतिशय त्रासवून सोडिलें. शहाआलम जेव्हां कोंकणच्या स्वारींतून दुर्दशा पावून परत आला, तेव्हां तर बादशाहाची अगदींच निराशा झाली आणि तूर्त संभाजीवरचें लक्ष काढून त्यानें पुढील तीन वर्षांत दक्षिणेस स्वारी करून विजापुर व गोवळकोंडा हीं राज्यें काबीज केलीं, आणि त्या प्रदेशांवर आपला अंमल बसविला. अर्थात् त्या राज्यांतले सरदार, फौजा व प्रचंड संपत्ति बादशहास प्राप्त झाल्यामुळें त्याचें सामर्थ्य वाढून त्या सर्वांचा मारा त्यास एकट्या संभाजीवर करितां आला.

बादशहा विजापुराकडे चालून गेल्यावर मागें महाराष्ट्र मोकळें होतें, त्या संधीचा उपयोग करून अकबर व दुर्गादास यांच्या सूचनेप्रमाणें संभाजी एखादें अचाट कृत्य करून दाखविता, तर बादशहाचा जोर पुष्कळ नरम पडला असता. अकबराचा पाठपुरावा त्याजकडून बिलकूल न होतां चालून आलेली सोन्या-सारखी संधि फुकट गेली यामुळेंच त्याचा अंत पुढें भीषण झाला. मृत्युपूर्वीच्या

एक दोन वर्षांतल्या त्याच्या हालचाली काय होत्या याची उमज पडत नाहीं. सामान्य समज आहे कीं विषयलंपट होऊन एकान्तांत राहत असतां तो पकडला गेला, पण यालाही कांहीं विशिष्ट पुरावा उपलब्ध नाहीं. संगमेश्वरास तो व कलुशा कांहीं तांत्रिक प्रयोग करीत असतां तो एकदम अचानक पकडला गेला, त्या वेळीं त्याजवळ फौजफांटा किंवा प्रमुख सेनानायक कोणी नव्हते. शत्रु येऊन घाला घालतील याची वर्दी मिळतांच नुसता घोड्यावर बसून पळाला असता, तरी निदान रायगड गांठण्यास त्याला कांहीं हरकत नव्हती. त्यावरून तो थोडा बहुत बेहोष असावा असा तर्क होतो. कांहीं असलें तरी औरंगजेबाचा सरदार शेख निजाम ऊर्फ मुकर्रबखान यानें कोल्हापुरावरून संगमेश्वरास येऊन तेथें त्यास ता. १ फेब्रुवारी स. १६८९ रोजीं पकडून कोरेगांव येथें बादशहा पुढें रुजू केलें.

संभाजीस पकडल्याची बातमी बादशहास पोंचतांच त्यास केवढी धन्यता वाटली हें शब्दांनीं सांगण्याची गरज नाहीं. त्यानें लगेच मोठा विजयोत्सव सुरू केला. कलबुर्गा येथील साधूच्या दरग्यास त्यानें दहा हजारांची खैरात पाठविली. पुढें संभाजी दाखल होणार त्यापूर्वी बादशहानें हुकूम फर्माविला कीं चार मैल अंतरावरून संभाजी व कलुशा यांची धिंड काढीत आपल्या समोर आणावें. त्या प्रमाणें त्यांस अंगावर चित्र विचित्र पोषाख व डोक्यांस विदुषकी टोप्या घातल्या. त्या टोप्यांस घुंगूर लावलेले होते. नंतर त्यांस उंटावर उलटें बसवून वाद्यें वाजवीत व छावणींतून मिरवीत बादशहासमोर आणिलें. त्या समयीं बादशहा दरबार भरवून सिंहासनावर विराजमान झाला होता. संभाजी समोर येतांच प्रथम त्यानें सिंहासनावरून उतरून गुडघे टेंकून अल्लाची प्रार्थना केली आणि बंदिवानांजवळ जाऊन त्यांचें क्षणमात्र निरीक्षण करून त्यांस मुक्कामावर घेऊन जाण्याचा हुकूम दिला. बादशहाच्या विस्तीर्ण छावणींत संभाजीच्या आगमनानें एवढी गडबड उडाली कीं कित्येक रात्रीं कोणास झोंप सुद्धां आली नाहीं.

संभाजीचा वध कसा झाला यासंबंधानेंही काल्पनिक नाटकी प्रकार पुष्कळ प्रचलित आहेत. त्याला मारूनच टाकावा असा बादशहाचा पहिला विचार नव्हता. जन्मान्ध करून ग्वाल्हेरसारख्या किल्यांत डांबून ठेवणें हींच त्या वेळची प्रचलित पद्धत होती. संभाजीकडून प्रथम आपले मतलब सर्व साधून घेणें हें पहिलें

काम होतें. सर्व किल्यांच्या सोडचिठ्या संभाजीकडून लिहून घेणें, त्याच्या संपत्तीचे गुप्त ठेवे कोठें आहेत ते काढून घेणें, आणि मोगल अमलदारांपैकीं कोण कोण इसम संभाजीशीं गुप्त व्यवहार ठेवीत होते त्यांचीं नांवें समजणें, या मुख्य बाबतींचें बोलणें करण्यासाठीं औरंगजेबानें आपला विश्वासु व निकटवर्ती सरदार रुहुल्लाखान यास संभाजीचे भेटीस पाठविलें, आणि 'या सर्व गोष्टी बऱ्या बोलानें कळवून मुसलमानी धर्म स्वीकारून बादशहाची सेवा कराल तर तुम्हांस जीवदान देऊं' असें कळविलें. पण अपमान सहन करून जीव जगविण्याचा संभाजीचा बाणाच नव्हता. आदले दिवसाच्या अपमानकारक वर्तनानें तो नखशिखान्त जळत होता. थोर असंतात ते कबजांत आलेल्या शत्रूचा असा अपमान कधीं करीत नाहींत; उलट त्याला त्याचे योग्यतेनुरूप गौरवानें वागवावें असा राजनीति-शास्त्राचा परंपरागत दंडक आहे. आज औरंगजेबाची निंदा जर लेखकांकडून होत असेल तर त्यास असले गलिच्छ प्रकारच कारण होत. रुहुल्लाखानाची शिष्टाई संभाजीनें झिडकारून उत्तर दिलें, 'बादशहास कळवा, मृत्यु किंवा हाल अपेष्टा यांस भिऊन हा शिवाजीचा पुत्र प्राणांची याचना बिलकूल करणार नाहीं. तुमचा तो दुष्ट धर्म स्वीकारून कायमची अधोगति पदरीं घेणें मला इष्ट वाटत नाहीं. तथापि बादशहा आपली कन्या देऊन मला जावई करीत असेल तर मी त्याच्या सूचनेचा विचार करीन. असें करण्यांतच बादशहाचें खरें कल्याण आहे.' संभाजीचें भाषण इतकें कठोर व हृदयभेदी होतें कीं तें जसेंच्या तसें बादशहास कळविण्याची छाती रुहुल्लाखानास झाली नाहीं. त्यानें फक्त मुद्द्याचा आशय कळवून वेळ मारून नेली.

संभाजीचें उत्तर ऐकून बादशहानें त्याच रात्रीं त्याचे व कलुशाचे डोळे काढविले आणि जिव्हाछेदन केलें. अशा प्रकारें पंधरा दिवस पावेतों अत्यंत हाल करून फाल्गुन व. ३० ता. ११ मार्च स. १६८९ रोजीं त्या उभयतांचे एक एक अवयव तलवारीनें तोडून मांस कुत्र्यांस देण्यांत आलें; आणि शेवटीं शिरच्छेद करून उभयतांचीं शिरें मसाला भरून दुरुस्त केल्यावर कैक दिवस निरानिराळ्या गांवातून वाद्यें वाजवीत मिरविण्यांत आलीं, आणि शेवटीं फेकून दिलीं. तीं पुढें कांहीं मराठ्यांनीं गुप्तपणें आणून तुळापुर येथें भीमा इंद्रायणीच्या संगमावर

अग्निसात् केलीं. बादशहाची छावणी भीमा नदीच्या कांठानें कोरेगांवपासून तुळापुर पर्यंत दहा मैल पसरलेली असून दरम्यान वडू बुद्रूक या गांवी त्यांचा शिरच्छेद झाला आणि तुळापुर येथें त्यांचें दहन झालें. बादशहानें त्यांचा धार्मिक अंत्यविधि करविला नाहीं हें त्यास कायमचें लांछन होय.

संभाजीच्या योग्यते संबंधानें वर ठिकठिकाणीं उल्लेख आहेत त्यांहून जास्त कांहीं सांगणें राहत नाहीं. मात्र त्याचा वृत्तान्त पुरेपूर समजण्यास लागणारें साहित्य पुष्कळच अपुरें आहे आणि नवीन नवीन संस्कृत व फारसी साहित्य उपलब्ध होत आहे. त्यांत अनेक संशोधक उद्योग करीत आहेत. वर कित्येक संस्कृत ग्रंथांचीं नांवें दिलीं आहेत. असें कांहीं अप्रकाशित साहित्य बाहेर येईल तेव्हांच संभाजीच्या या दहा वर्षांच्या कालासंबंधी आपणास जास्त अधिकारानें बोलतां येईल.

॥ श्री ॥

व्याख्यान चौथें

संकटाचा परिहार, मराठ्यांचा अलौकिक पराक्रम.

स. १६८९–१७००

संभाजीचा वध हाच औरंगजेब बादशहाच्या यशाचा परमोच्च बिंदु होय. एवढ्यावरच तृप्त होऊन तो महाराष्ट्र सोडून परत दिल्लीस जाता तर त्याला जी पुढें निकृष्ट दशा सहन करावी लागली ती पुष्कळशी टळली असती. पण मराठी राष्ट्र व त्यांचा सर्व अवघड प्रदेश जिंकण्याचा दुराग्रह धरल्यानें त्यास अपयशाचा कष्टमय मृत्यु येऊन त्याचें सगळेंच राज्य उलथून पाडण्याचें सामर्थ्य मराठ्यांस आलें. लहानशा विसकळित राष्ट्रानें संघशक्तीच्या व स्वार्थत्यागाच्या जोरावर जो हा विजय मिळविला तो इतिहासांत अत्यंत अपूर्व होय. अशा या प्रचंड झगड्याचें स्वरूप आतां स्पष्ट करून सांगावयाचें आहे.

ता. १ फेब्रुवारी स. १६८९ रोजीं संभाजी पकडला गेला आणि बरोबर अठरा वर्षांनीं ता० २० फेब्रुवारी १७०७ रोजीं औरंगजेब बादशाह अहंमदनगरास मरण पावला. या दोन गोष्टी वरील प्रचंड झगड्याचे आदि अंत होत. या अठरा वर्षांतील दीर्घकालांत उभयपक्षांकडे कोण कोण कर्ते पुरुष पुढें आले, त्यानीं काय करामती केल्या, कोणते स्मरणीय संग्राम व युद्धाचे कावे घडून आले, तोडीस तोड व उत्तरास प्रत्युत्तर कसें मिळत गेलें, हें सर्व नीट लक्षांत येण्यासाठीं आपणास त्या दीर्घ झगड्याचे लहान लहान कालखंड पाडिले पाहिजेत आणि निरनिराळ्या दृष्टींनीं त्यांचें अवलोकन केलें पाहिजे.

संभाजीच्या वधानें मराठी राज्याची केवढी दैना उडाली याची आपणास आज कल्पना होणार नाहीं. राजधानी हातची गेली, सैन्य सर्व खपलें, वसूल व

पैसा बुडाला, नायक म्हणून कोणी उरला नाहीं. रायगड झुल्फिकारखानानें साफ धुऊन नेला. संभाजीची बायको येसूबाई, पुत्र शाहू व शें दोनशें परिवार बादशहाचे कैदी बनले. संभाजी पकडला गेला तेव्हां राजाराम रायगडावर अटकेंत होता, त्यास कांहीं मंडळींनीं बाहेर आणून गादीवर बसविलें, परंतु पुढें रायगडास बादशहाचा वेढा पडला तेव्हां प्रथमच कित्येक मंडळींनीं राजारामास बाहेर काढून प्रतापगडावर नेलें. पुढें प्रतापगडावर बादशहाच्या फौजा चालून आल्या तेव्हां तो पन्हाळगडावर गेला. तेथें त्याचा दोन महिने मुक्काम झाला. प्रल्हाद निराजी, रामचंद्र नीळकंठ, शंकराजी नारायण, संताजी घोरपडे व धनाजी जाधव ही मंडळी राजारामाबरोबर पन्हाळ्यावर होती. त्यांनीं एकमेकांस धीर देऊन व एकत्र विचार करून राज्य बचावण्याचा बेत ठरविला आणि तो लगेच अमलांत आणिला. शिवाजीनें जिंजी, वेलोर वगैरे ठिकाणें जिंकून कर्नाटकांत पुष्कळ प्रदेश हस्तगत केला होता, तो सर्व अद्याप पावेतों शिवाजीचा जावई हरजी महाडिक यानें आपल्या कबजांत ठेवून औरंगजेबाचे हातीं पडूं दिला नव्हता. एकोजीचा पुत्र शहाजी तंजावरास राज्य करीत असून त्याला राजारामाबद्दल आस्था व प्रेम वाटत होतें. सबब कारभारी मंडळींनीं असें ठरविलें, कीं तूर्त आपला बचाव करण्यासाठीं राजारामानें कांहीं काळ जिंजीस जाऊन राहवें. त्याला पकडण्यासाठीं मोगल शिकस्त करीत होते, तो मोगलांचे हातीं पडला कीं मराठ्यांचें राज्य संपलें. असा परिणाम होऊं नये म्हणून राजारामानें जिंजीस जाण्याचा बेत ठरला. या युक्तीनें महाराष्ट्रांतील युद्धाचा जोर कमी होऊन बादशहाच्या फौजा पांगल्या जाव्या; संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनीं सर्वत्र टेहळणी ठेवून व फिरते राहून मोगलांस उपद्रव देत राहवें; शंकराजी नारायण हा मावळचा व त्यांतील किल्ल्यांचा उत्कृष्ट माहीतगार होता, त्यानें त्या प्रांतांतल्या लोकांस उत्तेजन देऊन किल्ले सांभाळावे; आणि रामचंद्र पंतानें विशाळगडावर राहून सर्व कारभार पहावा; खुद्द प्रल्हाद निराजी राजारामाबरोबर कर्नाटकांत गेला, त्यानें जिंजी येथें राजारामापाशीं राहून मुख्य राज्याची व्यवस्था ठेवावी आणि रामचंद्रपंताशीं नित्य दळणवळण चालवून एकमेकांच्या मसल्यानें बादशहाशीं निकराचा सामना करून त्याचा पाडाव करावा. असा हा अत्यंत साहसाचा विलक्षण डाव या मंडळींनीं योजिला.

या कठिण प्रसंगांत महाराष्ट्राची आबरू वरील पंचायतनानें बचावली. संभाजीला मारल्याबरोबर मराठ्यांचें राज्य संपलेंच होतें. स्वतः बादशहा दोन तीन लाख फौजेनिशीं महाराष्ट्रांत ठासून बसला. समस्त हिंद-बादशाहीचें वैभव पैसा व साधनें त्यास अनुकूल होतीं. विजापुर, गोवळकोंडा व रायगड हीं तीन राज्यें व त्यांची अपरंपार संपत्ति ज्याच्या हातांत खेळत होती, त्याचें सामर्थ्य काय सांगावें ! बंगाल, आग्रा, पंजाब, माळवा इत्यादि सधन प्रांतांचा वसूल त्यास अविच्छिन्न पोंचत होता. एवढा संपत्तीचा कधीं न आटणारा झरा व अप्रतिम सामर्थ्य हातीं असलेल्या बादशहास अल्प संख्य मराठ्यांनीं सर्वथैव हताश करून सोडिलें, हा चमत्कार जगाच्या इतिहासांत देखील अनुपम ठरेल, मग हिंदुस्थानच्या इतिहासांत तर तो अपूर्वच म्हटला पाहिजे. अत्यंत हीन दशेस पोंचलेल्या चिमुकल्या राष्ट्रानें परम सामर्थ्यवानास जिंकण्याचें जें कौशल्य या वेळीं प्रगट केलें, त्यामुळेंच मराठ्यांचें नांव अद्यापपर्यंत इतिहासांत गाजत आहे. मराठा या नांवास जो आज देशांत एवढा मान आहे तो प्रथम वरील प्रचंड झगड्यांत कमावलेला आहे. त्यासंबंधानें कोणतीही बाजू घेतली तरी त्याचें स्वरूप जास्तच उठावदार दिसूं लागतें. महाराष्ट्रांतून जिंजीचें अंतर सहाशें मैल आहे. त्यांत बऱ्हाणपूर पासून पुण्यापर्यंतचे आणखी तीनशें मैल मिळवावे, म्हणजे एक हजार मैलांच्या विस्तीर्ण टापूंत ज्या मराठे सरदारांनीं व मुत्सद्यांनीं आपला शह बादशहावर बसविला, त्यांचें कौतुक करावें तितकें थोडेंच होईल. त्यांतला एक एक प्रसंग घेऊन त्याचें वर्णन करूं लागल्यास एक भारत रचतां येईल. दुसरा एक प्रकार यांत सहज लक्षांत येणारा आहे तो असा, कीं मराठ्यांकडील सर्व प्रमुख सरदार आपल्या जबाबदारीवर वर्तत होते. त्यांस मध्यवर्ती बंधन असें बहुतेक नव्हतेंच. जेथें जसा प्रसंग उद्भवेल किंवा जरूर पडेल तशी वागणूक प्रत्येकास ठेवावयाची होती. वरीष्ठांस सर्व प्रकार नीट समजावून हुकूम आणण्यास अवधिच नव्हता. जिंजीहून प्रल्हाद निराजीची किंवा विशाळगडाहून रामचंद्रपंताची हुकमत चालत होती खरी, परंतु हजारों मैलांच्या विस्तृत प्रदेशांत संचारलेल्या शत्रुपक्षीय व स्वपक्षीय फौजांचें नियंत्रण त्या वेळच्या परिस्थितींत कितीसें होणार हें दिसतेंच आहे. उलट पक्षीं बादशहाची सत्ता मात्र सर्वथा एकमुखी होती. हाल्लीं आपण आपल्या सभोंवार भांडणें तंटे व

कलह यांस ऊत आलेला पाहतों. व्यापार धंद्यांत किंवा इतर संस्थांत चार दोन आसामींनीं एकत्र व एकमुखी व्यवहार करण्याचें मनांत आणल्यास त्यांचे कसे विपर्यास घडतात हें लक्षांत आणिल्यास, दोन अडीचशें वर्षांपूर्वी खुद्द या महाराष्ट्रांतील अठरापगड मंडळींनीं एकत्र उद्देश एका जोमानें पार पाडिला, हा देखावा चिरंतन स्मरणांत बाळगण्याइतका उज्ज्वल व अभिमानास्पद आहे. राजकारण नेहमींच बहुरूपी असतें. प्रसंग पडेल तशी त्यास कलाटणी द्यावी लागते. वरील अठरा वर्षांच्या झगड्यांतही मराठ्यांना लांछनकारक प्रकार घडले नाहींत असें नाहीं. पुष्कळसे मराठे सरदार केवळ स्वार्थी व पोटभरू असून आज बादशहाकडे तर उद्यां जिंजीस राजारामाकडे येरझारा करीत होते. अशा विश्वासघातकी स्वभावामुळेंच संताजी घोरपड्यासारखा कल्पक व धाडसी सेनानायक खुनास बळी पडला, आणि प्रत्यक्ष रामचंद्रपंत अमात्य सुद्धां बहुनाइकीस कंटाळून राजकारणांतून अंग काढून संन्यासी बनला. अशा सर्व गोष्टी लक्षांत घेऊनही वरील राष्ट्रीय झगड्याचें अपूर्वत्व कायमच राहतें.

इतिहासांत मुख्यतः मनुष्य स्वभावाचें चित्र उत्कृष्ट पहावयास मिळतें; आणि उपलब्ध पुरावा सर्व गोळा करून त्या स्वभावाचें पृथक्करण दाखविणें आणि त्यावरून प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणाचा व वर्तनोद्देशाचा ठाव घेणें हेंच अभ्यासकांचें मुख्य काम होय. हा उद्देश पार पाडणें असेल तर भिन्न स्वभावाच्या व भिन्न कर्तबगारीच्या किती तरी भल्याबुऱ्या व्यक्ती अठरा वर्षांच्या या कालावधींत निदर्शनास येतात. त्यांचें संपूर्ण विवेचन करण्यास येथें अवकाश नाहीं. मराठ्यांच्या बाजूस खुद्द राजाराम छत्रपतित्वामुळें प्रमुख असला, तरी त्याचें कर्तृत्व बेताचेंच होतें. त्याला अफू गांजासारखीं कांहीं व्यसनें जडलेलीं असून बुद्धींत तीव्रता कशी ती बिलकूल नव्हती. त्याचें शरीर अशक्त व निःसत्त्व बनलेलें होतें. 'मंदबुद्धि' हें विशेषण त्यास लावलेलें आढळतें. मात्र तो उच्छृंखल किंवा हेकेखोर नव्हता. मनुष्याची योग्यता ओळखून त्यास उत्तेजन देण्याची इच्छा त्याचे ठिकाणीं असल्यामुळें संभाजीसारखा उपद्व्याप त्यानें कधीं केला नाहीं, म्हणूनच त्याचा काल निभावून गेला, आणि राष्ट्राचें भाग्य वाढलें. त्याचे अंगीं विशेष दुर्गुण नव्हते हाच त्याचा विशेष होय आणि यास्तव त्यास 'स्थिरबुद्धि' असें संबोधण्यास

हरकत नाहीं. प्रल्हाद निराजी म्हणून जो त्याचा कारभारी होता, त्याचें शहाणपण तत्कालीन कागदांत विशेष वर्णिलेलें आढळतें. बापावरोबर भागानगराकडे त्याचा काल गेला असल्यामुळें कर्नाटकाकडचा व्यवहार त्यानें पाहवा व महाराष्ट्रांतला रामचंद्रपंतानें पाहवा अशी वांटणी ठरलेली होती. पण जिंजीस गेल्यावर स. १६९४ त तो मरण पावला म्हणून त्याजवद्दल विषेश कांहीं सांगणें राहत नाहीं. एकंदरींत या वेळचा मुख्य धुरीण पुरुष रामचंद्र नीलकंठ अमात्यच होय. तो बैठा मुत्सद्दी होता, स्वतः रणांगणावर फारसा कधीं गेला नाहीं, पण निःस्वार्थबुद्धीनें वागून चहूंकडचीं धोरणें सांभाळून त्या संकट काळांत प्रत्येक इसमाकडून ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार राष्ट्राची कामगिरी करवून घेऊन त्याच्या सेवेची कदर पंतानें केली, आणि भिन्न प्रकृतींच्या नानाविध व्यक्तींस एका कार्यक्रमांत गोवून राज्याचा बचाव केला, एवढेंच नव्हे तर दिल्ली पावेतों मोगली प्रदेश हस्तगत करण्याची ईर्षा धरिली हें श्रेय खरोखरच बहुमोल आहे. *

हालींच्या भोरकर सचिवाचा पूर्वज शंकराजी नारायण हा रामचंद्रपंताचा निकट सहायक असून त्याचा स्वभाव धाडसी, बराचसा खटपटी व स्वार्थी होता. लोकांस जागिरी तोडून द्यावयाच्या नाहींत असा जो सक्त प्रचार शिवाजीनें घालून दिला, तो या संकट समयीं विघातक वाटूं लागला. सर्व राज्य मोगलांनीं ग्रासलेलें, व बहुतेक सरदारही त्याचे नोकरींत गेलेले असून त्यांस बादशहानें वाटेल तशीं वर्तनें देण्याचा सपाटा चालविला. अशा स्थितींत तशीच लालूच स्वराज्यांतूनही दाखविल्याशिवाय निभाव लागत नाहींसें पाहून शंकराजीनें प्रथम मावळ प्रातांतील लोकांस पूर्वीचीं त्यांचीं वतनें त्यांजकडे चालविण्याचें ठरविलें, तेव्हांच किल्यांचे व प्रांतांचें रक्षण करण्यास लोक तयार झाले. अशा रीतीनें शंकराजीच्या सल्यानें रामचंद्रपंतानें जागिरी देण्याची पद्धत स्वीकारली, तीच पुढें पेशवाईंत वृद्धिंगत होऊन थोडी बहुत राज्यनाशास कारण झाली.

पण बादशहाला दे माय धरणी ठाय करण्यास लावणारे मुख्य वीर संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे होत. यांचा स्वभावभेद विषेश लक्षांत ठेवण्याजोगा आहे. कारण त्यामुळेंच संताजीचा शेवट विपरीत झाला. दोघेही शिवाजीच्या

* (भा. इ. सं. त्रै. व. १६-१ पृ. १०.)

तालमींत तयार झालेले असले तरी संताजी कडक शिस्तीचा भोक्ता होता. धनाजीला तशी शिस्त मानवली नाहीं. संताजी कल्पक, धाडसी, शूर, कशाही प्रसंगांतून आपला बचाव करून शत्रूस हटकून गोत्यांत आणणारा असा होता. अंगावर आलेला डाव अचानकपणें शत्रूवर उलटून देण्याची त्याची हातोटी अप्रतिम होती. अशा कित्येक गुणांत तो शिवाजीचीच बरोबरी करणारा होता, तरी विचारी व खोल दृष्टि त्यास नसून हाताखालच्या लोकांचें प्रेम संपादन करण्याची कला त्यास साधली नाहीं. त्याचा स्वभाव तामसी व घेंमडखोर असून पुष्कळदां तो वरीष्ठांशीं व खुद्द छत्रपतीशीं उद्धटपणानें वागे. राजारामानें आरंभींच त्यास सेनापतिपद दिलें तें पांच सहा वर्षें उपभोगून त्यानें अनेक लढाया मारून मोगलांचीं त्रेधा उडवून दिली. पण पुढें त्याजवर राजारामाची इतराजी होऊन त्याचें सेनापति पद काढून तें त्यानें धनाजीस दिलें, त्यामुळें तो बिथरला.

धनाजी देखील शूर व हिकमती होता पण बराचसा ढिला व स्वार्थसाधु होता. आरंभीं चार दोन वर्षें त्या दोघांचें संगनमत होतें तों पर्यंत त्यांनीं मोगलांचा चांगलाच फन्ना उडवून दिला; परंतु उत्तरोत्तर संताजीचा दिमाख वाढून धनाजी निष्प्रभ दिसूं लागला तेव्हां उभयतां मध्यें वितुष्ट उत्पन्न झालें. त्यांच्या हाताखालीं लहान मोठे सैनिक असत त्यांस आळा घालतांना किंवा वतनें वगैरे देतांना संताजी व धनाजी आपापल्या अनुयायांचा पक्ष घेऊन त्यांच्या कागाळ्या छत्रपतींकडे नेत. हे तंटे तोडतांना कोणी तरी नाराज झाल्या शिवाय राहत नसे. हा विरोध वाढत जाऊन राजारामानें धनाजीचा पक्ष घेतला. संताजीची समजूत काढण्याचें नाजूक काम त्यास साधलें नाहीं.

राजाराम जिंजीस गेल्याचें वर्तमान बादशहास कळतांच त्यानें झुल्फिकारखानास त्याचे पाठलागास पाठविलें. राजारामाचे मागून येऊन स. १६९० च्या पावसाळ्यांत खानानें जिंजीस वेढा घातला. हा वेढा स. १६९८ च्या फेब्रुवारी पर्यंत जवळ जवळ आठ वर्षें चालू होता. एवढ्या दीर्घ अवधींत महाराष्ट्रांत व कर्नाटकांत मराठे मोगलांचे अनेक प्रचंड संग्राम घडून आले. जिंजीचा किल्ला तीन मोठे पर्वत मिळून बनलेला विस्तीर्ण व अवघड असल्यामुळें त्यास संपूर्णपणें वेढून अन्नपाणी अजीबात बंद करणें हें कोणास शक्य झालें नाहीं. खानाजवळ तोफा व

दारूगोळा पुरेसा नव्हता. शिवाय बाहेरचे पाळेगार व सत्ताधीश मराठ्यांस अनुकूल होते, त्यांनी बाहेरून मोगलांवर हल्ले करून त्यांस हैराण केलें. तंजावरकर शहाजी व त्रिचनापल्लीचा नायक यांनीं झुल्फिकारखानाचा फार उच्छेद केला. तिकडून संताजी व धनाजी खानाचे पाठीवर चालून आले, त्यांनीं झुल्फिकारखानाची इतकी हैराणगत केली कीं तोच उलटा मराठ्यांचे वेढ्यांत पडला. अन्नपाण्यामुळें त्याची एवढी उपासमार झाली कीं त्यानें राजारामाकडे याचना करून आपणांस सुरक्षित परत जाऊं द्या असें बोलणें लाविलें. या प्रसंगीं संताजीचा सल्ला असा पडला कीं खानास पकडून मोगल फौजेची दाणादाण उडवून द्यावी, म्हणजे एकदांच मोगलांचा संहार होईल. पण असें निकरावर येऊन बादशहास चिडविणें राजारामास पसंत पडलें नाहीं. झुल्फिकारखानास खूष ठेवून आपला निभाव करण्याचा राजारामाचा संकल्प होता. शेवटीं आठ वर्षांनीं जेव्हां जिंजीचा किल्ला बादशहाच्या धाकानें खानानें काबीज केला, तेव्हां प्रथम त्यानें राजारामास सुरक्षितपणें बाहेर निघून जाण्याची मुद्दाम सोय करून दिली. बादशहा उत्तरेंत निघून न जातां महाराष्ट्रांतच सारखा तळ देऊन बसला हा प्रकार त्याच्या सरदारांस अतिशय जाचक झाला. ते सर्व कंटाळून गेले. बादशहाची छावणी पहिलीं पांच वर्षें विजापूर नजीक गलगलें येथें होतीं. त्या पुढील चार वर्षें तो पंढरपुर जवळ ब्रम्हपुरी येथें भीमेच्या काठीं छावणी करून राहिला. पुढें जिंजीहून राजाराम महाराष्ट्रांत येऊन सातारा किल्यावर राहून पूर्ववत् राज्य करूं लागला, तें पाहून बादशहाला जास्तच संताप चढला. त्याला आपल्या सरदारांचा व सेनानायकांचा भारी अविश्वास उत्पन्न झाला. त्याची खात्री झाली कीं हे कुचराई करितात, मनापासून कामें उठवीत नाहींत म्हणूनच मराठे दिवसें दिवस बळावत चालले आहेत. तेव्हां शेवटीं त्यानें स्वतःच सर्व सेना बरोबर घेऊन किल्ले जिंकण्याचें काम हातीं घेतलें. स. १६९९ त ब्रह्मपुरीची छावणी सोडून हा ऐशीं वर्षांचा वृद्ध बादशहा प्रथम साताऱ्यावर चालून गेला. अशा रीतीनें एक एक किल्ला घेण्यास त्यास एक एक वर्ष लागलें. सातारा व परळी हे किल्ले त्यानें स. १७०० च्या उन्हाळ्यांत वेढा घालून काबीज केले, त्याचवेळीं राजारामास ताप येऊन तो सिंहगडावर मृत्यु पावला. तथापि त्याच्या मृत्यूनें मराठ्यांच्या उत्साहांत

बिलकूल फरक पडला नाहीं. त्याची राणी ताराबाई व रामचंद्रपंत यांनीं द्विगुणित उत्साहानें युद्ध चालवून बादशहास हतवीर्य केलें. सातारा बादशहानें घेतला, तेव्हां तिनें आपली राजधानी पन्हाळ्यावर केली. पुत्र अजम याचे नांवावरून साताऱ्यास अजमतारा नांव मिळालें. जवळचा परळी किल्ला त्यानें काबीज करून त्यास नवरसतारा हें नांव दिलें. पुढें पावसाळा आला तेव्हां बादशहानें आपली छावणी माण नदीच्या कांठीं ठेविली. त्या अवसरांत नदीस प्रचंड पूर येऊन छावणी वाहून गेली आणि बादशहाचें भयंकर नुकसान व प्राणहानि गडबडींत पाय मोडून तो जन्माचा लंगडा झाला. पावसाळा संपल्यावर बादशहा पन्हाळ्यावर चालून गेला. पन्हाळा व त्या नजीकचा पावनदुर्ग हे किल्ले घेण्यास त्यास आठ महिने लागले. त्यांचीं नांवें त्यानें नवीशहादुर्ग व बानीशहादुर्ग अशीं ठेविलीं. पुढें स. १७०१ च्या पावसाळ्याची छावणी त्यानें खटाव येथें केली. पाऊस थांबल्यावर तो विशाळगडावर चालून गेला. तेथेंही चार आठ महिने पन्हाळ्याचाच प्रकार होऊन शिकस्तीनें त्यानें आपलें निशाण किल्ल्यावर लावून पावसाळ्यामुळें परत येऊन भीमेच्या कांठीं बहादूरगडास मुक्काम केला. विशाळगडाचें नांव 'शक्करलाना' ठेविलें. त्या पुढील हिवाळ्यांत त्यानें सिंहगडावर मोहीम करून तो किल्ला हस्तगत करून स. १७०३ चा मुक्काम पुण्यास केला. त्यावेळीं बाळाजी विश्वनाथभट पुणें प्रांताचा सर सुभेदार होता. याच मुक्कामांत शाहूचीं लग्नें वगैरे झालीं तो प्रकार पुढें सांगावयाचा आहे. स. १७०३ च्या अखेरीस बादशहा मावळांत शिरला, आणि राजगड व तोरणा हे किल्ले घेऊन स. १७०४ च्या पावसाळ्याची छावणी खेड येथें केली. अशा रीतीनें एक एक किल्ला घेण्यांत त्याचें एक वर्ष खर्च होऊन शिवाय वारा पाऊस चिखल वगैरे यातनांमुळें त्याचे सैनिक अत्यंत कंटाळून गेले. बरें इतकें करून जिंकलेले किल्ले अल्प काळच मोगलांचे कबजांत राहिले. स. १७०४ त बादशहाची पाठ वळतांच शंकराजी नारायण, परशुराम त्रिंबक वगैरेंनीं सर्व किल्ले पुनः हस्तगत केले. स. १७०९ अखेर एकही किल्ला बादशहाचे ताब्यांत राहिला नाहीं. त्या सालीं बादशहा दक्षिण प्रांत सोडून रायचूरच्या बाजूस मुरापुर म्हणून बरेडांचें संस्थान होतें त्याजवर चालून गेला. तेथें त्यास सिंहगड सुद्धां हातचा गेल्याची बातमी कळून अत्यंत दुःख झालें व भयंकर दुखणें लागलें. थोडा बरा

होऊन त्या साल अखेरीस तो परत फिरला आणि मोठ्या कष्टानें जीव बचावून स. १७०६ त अहंमदनगरास पोंचला. या प्रवासांत मराठ्यांनीं त्याचेवर हल्ले करून व अचानक छापे घालून त्याची अंगदींच फजिती उडवून दिली. त्यांनीं मनांत आणिलें असतें तर खुद्द बादशहासच त्यांनीं पकडून घेतलें असतें. झुल्फिकारखान वगैरेंच्या मध्यस्थीमुळें अशी अप्रतिष्ठा त्यांनीं बादशहाची केली नाहीं. या वेळीं मराठे इतके प्रबल झाले कीं त्यांनीं नर्मदेपार माळव्या पावेतों स्वाऱ्या करून मोगलांचा मुलूख लुटून वैराण केला; आणि उत्तरेकडून जो खजिना व साहित्य बादशहाकडे येत असे त्याजवर वाटेल तसा ताव मारून तें बादशहास पोंचूं दिलें नाहीं. अशा विपन्नावस्थेंत तो एकूणनव्वद वर्षांचा वृद्ध औरंगजेब ता. २० फेब्रुवारी स. १७०७ रोजीं अहंमदनगर येथें अल्लाचे भेटीस गेला. एवढ्या थोर पुरुषाची अशी हीनावस्था झाल्याचें उदाहरण इतिहासांत बहुधा दुर्मीळ आहे. अर्थात् या प्रचंड झगड्यांत मराठ्यांचें खेरें वीर्यतेज व राष्ट्र प्रेम निदर्शनास येऊन त्यांचा जो इतिहास बनला आहे, तोच हल्लीं आपण संशोधनानें अभ्यासीत आहों.

बादशहाची ही हवाल सांगण्यासाठीं आपणास कालानुक्रम सोडून पुष्कळ पुढें जावें लागलें. आतां मागें येऊन पुनः ज्या महत्त्वाच्या गोष्टी ठिकठिकाणीं घडल्या त्यांचें अनुसंधान ठेवणें प्राप्त आहे. अठरा वर्षांच्या या दीर्घ झगड्यांत मराठ्यांच्या बाजूस जे प्रख्यात पुरुष पुढें आले त्यांची ओळख आपणास मागें झालीच आहे. राजाराम, ताराबाई, रामचंद्रपंत, शंकराजी नारायण, परशुराम त्रिंबक, संताजी घोरपडे व धनाजी जाधव ही मंडळी प्रमुख असून यांचे जोडीस आणखी दुय्यम माणसें पुष्कळच होतीं. आंगरे, घोरपडे, नागपुरचे भोसले, दाभाडे, चव्हाण इत्यादि अनेक घराणीं पुढील इतिहासांत प्रमुखपणें वावरतांना दिसतात, त्यांचा उगम प्रथम या मराठा-मोगल झगड्यांतील नानाविध संकट प्रसंगांतून झालेला आहे. प्रत्येकानें कांहीं ना कांहीं राजसेवा व राष्ट्रसेवा बजाविलेली आहे. हिंमत बहादर, अमीरुलउमराव, सरलष्कर, जफ्तनमुल्क, सर्जेराव, रुस्तुमराव वगैरे भपकेबाज किताब या वेळीं प्रोत्साहन म्हणून प्रचारांत आले. सन १६८९ च्या दसऱ्यास राजाराम जिंजीस जाणार त्यापूर्वी विठोजी चव्हाण व संताजी घोरपडे यांनीं कोरेगांव येथें बादशहाच्या छावणीवर भर पावसाळ्यांत रात्रीं एकाएकीं छापा घालून खुद्द

त्याच्या तंबूचे सोन्याचे कळस काढून आणिले, तो प्रसंग मोठा शर्थींचा म्हटला पाहिजे. या एकाच प्रसंगानें मराठ्यांचें धाडस व त्यांचा युक्तिबाज स्वभाव पूर्ण व्यक्त होतो. स० १६८९ च्या ऑगस्ट महिन्यांतील त्या रात्रीं प्रत्यक्ष बादशहाच मराठ्यांचे हातीं सांपडला असता. त्याच्या सुदैवानें तो त्या वेळीं स्वतःच्या तंबूंत नसून आपल्या मुलीच्या तंबूवर मुक्कामास होता, म्हणून मराठ्यांचा हा हल्ला निष्फळ झाला. तथापि त्यामुळें मोगलांस चांगलीच दहशत बसली. शिवाजीच्या युक्त्यांची आठवण व्हावी असाच हा वरील नमुना आहे.

मराठ्यांकडील योध्यांचीं नांवें आपल्या परिचयाचीं आहेत, तशीं मोगल पक्षांतील सरदाराचीं माहीत नसलीं तरी ते सुद्धां कमी योग्यतेचे होते असें नाहीं. ते सर्व एकापेक्षां एक शूर, कल्पक व बादशहाची सेवा एकनिष्ठपणानें करणारे होते. त्यांत झुल्फिकारखान नेहमींच राजारामाचे पाठीवर असल्यामुळें तो मराठ्यांस चांगलाच माहीत होता. बादशहाच्या दुराग्रहामुळें मराठे प्रबल होत चालले ही गोष्ट स्पष्ट दिसूं लागली आणि जो तो आपल्या स्वार्थाचा विचार करूं लागला. त्यांत झुल्फिकारखानानें ठरविलें कीं मागें पुढें संधि आल्यास आपण दाक्षिणची सुभेदारी पटकावून इकडे स्वतंत्र व्हावें. हा उद्देश सारखा त्याच्या मनांत वावरत असल्यामुळें शक्य तोंवर त्यानें मराठ्यांशीं नरमाईचें वर्तन ठेविलें. त्याचाच जोडीदार गाजीउद्दीन फिरूजजंग हा निजामुल्मुल्कचा बाप. त्याचे डोळे विकृत झाल्यामुळें तो संग्रामांत मागें पडला; आणि त्याच्या मुलानें पुढें झुल्फिकारखानाच्या हातांतला डाव आपण उचलून सिद्ध करून दाखविला, तेंच हें निजामाचें राज्य आज हैदराबादेस नांदत आहे. या दोन खानांशिवाय सर्जाखान, कासीमखान, खानाजादखान, दाऊदखान पन्नी, हिंमतखान, हमीदुद्दीनखान, अलीमर्दानखान वगैरे किती तरी वस्ताद माणसें वरील युद्धांत बादशहाचे बाजूस असून त्यांचा संबंध मराठ्यांशीं आला. यां शिवाय बादशहाचे पुत्र व नातू अजमशहा, कामबक्ष, मूइजुद्दीन, अजीमुश्शान, बेदरबख्त वगैरे आणि त्याचा मुख्य वजीर आसदखान झुल्फिकारखानाचा बाप हे सर्व एकापेक्षां एक शूर उद्योगी व राजकारणांत निष्णात असेच होते. या प्रत्येकाच्या लढाया व झटापटी मराठ्यांशीं झालेल्या नमूद आहेत, त्यांचीं वर्णनें वाचल्याम त्यांवरून आपल्या चिमुकल्या मराठी राष्ट्रानें एवढ्या प्रचंड

सामर्थ्याच्या बादशहाशीं अठरा वर्षें कसा सामना केला तें उत्कृष्ट दिसून येतें आणि खात्री पटत जाते कीं कितीही बलवान सत्ताधीश असला तरी तो अनीतीनें वागूं लागेल तर त्यास कधीं यश येत नाहीं, आणि दुर्बल परंतु निकराचा इसम त्याजवर अंतीं मात करूं शकतो.

वरील नांवनिशीवरून हें ही लक्षांत येईल कीं या सर्व झगड्याचें सविस्तर वर्णन करूं म्हटल्यास एक मोठें (भारत) निर्माण होईल, आणि मला तर तें एकाच व्याख्यानांत आटपावयाचें आहे. तेव्हां एक दोन विशिष्ट प्रसंग सांगण्यापलीकडे जास्त विवेचन करणें मला शक्य नाहीं. संताजी व धनाजी यांनीं केव्हां समोर सामना करून तर केव्हां गनिमी काव्यानें वरील मी मी म्हणणाऱ्या खानांस अगदीं हतवीर्य करून सोडिलें. सर्जाखान मोठ्या हिंमतीनें त्यांजवर चालून आला असतां त्याच्याशीं मराठे योध्यांनीं साताऱ्याजवळ तुंबळ संग्राम करून त्यास व त्याच्या बायका मुलांस पकडून घेतलें आणि भला मोठा दंड उकळून व त्याच्या मुसक्या बांधुन त्यास बादशहाकडे पाठवून दिलें. कासीमखान हा तर बादशहाचा अत्यंत भरंवशाचा पराक्रमी सरदार होता. संभाजीच्या वेळेपासून त्यानें मराठ्यांचा अतोनात उच्छेद केला. या कासीमखानास संताजीनें तुंगभद्रेच्या दक्षिणेस चित्रदुर्गजवळ अचानक गांठून दुडेरीच्या गर्दीत कोंडून (फूबिना) तडफडून मारिलें. दुडेरीच्या या संग्रामांतच बसवापट्टणजवळ हिंमतखान संताजीवर चालून आला, त्यास त्यानें भर लढाईत कंठस्नान घातलें. संताजीनें कासीमखानाचा उच्छेद चालविलेला ऐकून बादशहानें त्याचे बचावासाठीं आपल्या जवळचा प्रतिष्ठित सरदार खानाजादखान यास ताबडतोब कर्नाटकांत रवाना केलें. या खानासही दुडेरीच्या गर्दीत संताजीनें कोंडून इतकें हैराण केलें, कीं त्यानें पदर पसरून जीवदान मागितलें. तेव्हां पन्नास लाख दंड घेऊन संताजीनें त्यास आपला मजबूद पहारा बरोबर देऊन बादशहाचे संनिध पोंचविलें. कामबक्ष व आसदखान यांची बाचा-बाच होऊन तो शहाजादा कैद झाला तें प्रकरण तर विशेषच गंमतीदार आहे, पण विस्तारानें सांगण्यास अवकाश नाहीं. या सर्व प्रकरणांत एक गोष्ट मुख्यतः निदर्शनास येते ती अशी कीं संभाजी व कलुशा यांच्या सारखे हाल करून मराठ्यांकडचे किती तरी लोक बादशहानें निर्दयपणें ठार केले, अशा प्रकारचें एकही

ब्राह्मण मराठ्यांची बाजू सोडले नाहीं. उघड लढाईत मुसलमान मरण पावले ते सोडल्यास हस्तगत झालेल्यांची यत्किंचित् अप्रतिष्ठा मराठ्यांनीं केली नाहीं. दंड घेऊन आणि त्यांची सर्व प्रकारें योग्य निगा ठेवून त्यांस सोडून दिलें. हिंदु मुसलमानांचा हा स्वभावभेद आजच्या प्रमाणें त्या वेळीं ही घडत असलेला स्पष्ट दिसतो.

अशा रीतीनें सर्वत्र मराठ्यांची सरशी होत असतां आणि जिंजीपुढें आपलें शहाणपण बिलकूल चालत नाहीं अशी बादशहाची पूर्ण गाळण उडाली असतां, मराठ्यांचें मोठें स्वभाव वैगुण्य जी आपसांतील दुही तिचा प्रादुर्भाव होऊन, तीस संताजीसारखा बहुमोल मोहरा कसा बळी पडला, आणि एवढ्या पराक्रमी पुरुषास खुनाचें मातीमोल मरण कसें प्राप्त झालें हा हृदयद्रावक बनाव आतां सांगणें अवश्य आहे.

संताजीचा स्वभाव तापट व करारी होता हें मागें सांगितलेंच आहे. शिवाजीच्या पश्चात् अडचणींस न जुमानतां शत्रूस हटकून गोत्यांत आणणारा शूर योद्धा मराठ्यांच्या इतिहासांत संताजीसारखा कोणी झाला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. रामचंद्रपंताचा तर तो केवळ उजवा हात होता. संताजीनें रामचंद्रपंताचे हुकमतींत व धनाजीनें शंकराजी नारायणाचे ताबेदारींत राहवें असा ठराव होता. परंतु एकदां मोहीम सुरू झाल्यावर ज्यास जिकडे जरूर पडेल तिकडे जावें लागे; आणि चार पांच वर्षें पर्यंत संताजी व धनाजी यांनीं एकमेकांचा चांगलाच पाठपुरावा केला. जिंजी किल्ला एकदम मोगलांस प्राप्त झाला नाहीं व राजारामाचा बचाव झाला याचें मुख्य श्रेय संताजीस आहे. रामचंद्रपंताशीं त्याचा बेबनाव झाल्याचे प्रसंग पुष्कळ आहेत. एका पत्रांत संताजी पंतास लिहितो, 'आम्ही ऐसे सेवक नव्हों जे आपलें स्मरण न करितां आधीं आपला बहुमान घेऊं.' दुसऱ्या एका प्रसंगांत शंकराजी पंतानें संताजीच्या ताठरपणाचा उल्लेख करून कळविलें, 'सांगितलेली कामगिरी मुकाट्यानें करावी, मर्यादेनें राहवें, बेइमानी करूं नये, यजमानांजवळ मुद्दे घालूं नयेत,' अर्थात् अशा प्रकारचे चिडखोरीचे प्रसंग वारंवार आले असले पाहिजेत. हाताखालचे लोक भलभलत्याच अटी घालून अडवूं लागले, मोगलांचे पक्षास जाऊं लागले, म्हणजे त्यांस वतनें देऊन खुषी ठेवण्याचा प्रघात

सर्राहा चालू झाला तो संताजीस बिलकूल आवडला नाहीं. 'आमच्या राज्यांत नवी वृत्ति करून द्यावी असा दंडक नाहीं' हा शिवाजीचा नियम त्यानें आधारास घेतलेला आढळतो; म्हणजे शिवाजीची शिस्त सर्व अधिकारी भराभर मोडूं लागले, याचा त्यास मोठा राग आला. छत्रपति पासून सर्वच लोक मतलबी, स्वार्थी व अंगचोर आहेत अशी त्याची खात्री होऊन तो वैतागून गेला. वाटेल त्यास तो तोंड टाकून बोले, त्यामुळें याच्याशीं संबंध नको असें बहुतेकांस होऊन गेलें. शूर व पराक्रमी असतात ते विचारी व मृदु भाषणी असतातच असें नाहीं. एकदां जिंजीस जाऊन प्रत्यक्ष यजमानाला तो पाहिजे तसें अद्वा तद्वा बोलला. एका ठिकाणीं उल्लेख आढळतो कीं, 'तुमच्या हातून पराक्रम होत नाहीं तर आम्ही दुसरा एखादा लायक इसम पाहून त्यास छत्रपति करूं.' अशी भाषा कोणीच ऐकून घेणार नाहीं. प्रकरण विकोपास गेलें. संताजीचें सेनापतिपद राजारामानें काढून घेऊन तें धनाजीस दिलें. त्या वेळीं त्या दोघांचाही मुक्काम जिंजी जवळच होता. संताजी बऱ्या बोलानें आपलें पद थोडेंच सोडणार. प्रल्हाद निराजी मरण पावला, रामचंद्रपंत दूर महाराष्ट्रांत होता. ह्यांपैकीं कोणी समीप असता तर त्यानें कदाचित् प्रकरण सामोपचारानें मिटविलें असतें. सातशें मैलांवर चालणाऱ्या भानगडी रामचंद्रपंत तरी कशा मिटविणार ! संताजीनें धन्यावरचा राग धनाजीवर काढण्यास सुरुवात केली. संताजीस पकडून माझ्यासमोर आणा असा हुकूम राजारामानें धनाजीस केला. त्यावरून धनाजी संताजीवर चालून गेला असतां कांची जवळ आयेवारकुटी येथें त्यांचा संग्राम झाला, त्यांत धनाजी पराभव पावून पळत सुटला, त्यावरून राजारामासही भीति पडली कीं संताजी अनावर होऊन आपली देखील काय वाट लावील कोणास ठाऊक ! अशा भावनेनें राजारामानें रामचंद्रपंतादि आपल्या लोकांस हुकूम सोडले कीं संताजीस सांपडेल तेथें कैद करावें. वर सांगितलेल्या लढाईतून धनाजी पळूं लागतांच संताजी त्याचा पाठलाग करीत कर्नाटकांतून पळत पळत ते विजापुराकडे आले. त्या भानगडींत आणखी एक प्रकरण उद्भवलें तें असें.

फलटणच्या निंबाळकरांपैकीं एक गृहस्थ अमृतराव हा बादशहाचे नौकरींत होता. त्याची बहीण राधाबाई, नागोजी माने म्हसवडकर यास दिलेली असून ते दोघेही राष्ट्रीय भिडेमुळें बादशहाची नौकरी सोडून धनाजीच्या हाता-

खालीं वागूं लागले. * कांचीजवळ संताजी व धनाजी यांची लढाई झाली त्या प्रसंगांत संताजीनें अमृतरावास पकडून आणिलें, आणि पश्चात् हाच मुख्य हरामखोर म्हणून शिक्षेदाखल त्यास हत्तीवरून लोटून ठार मारिलें. हा प्रकार नागोजी माने व धनाजी यांस अत्यंत गैर वाटला आणि प्रकरण विशेष चिडीस गेलें. त्यांनीं अमृतरावाच्या वधाबद्दल संताजीचा सूड घेण्याचा निश्चय केला. त्यास पकडून आणण्याविषयीं राजारामाची आज्ञा होतीच. धनाजीचा पाठलाग करीत संताजी विजापुराकडे गेला, तेव्हां बादशहा ब्रह्मपुरीस होता, तेथें नागोजी मान्यानें जाऊन संताजीचा सर्व प्रकार बादशहास कळविला. बादशहाचे मनांत संताजी संबंधानें भयंकर क्रोध [illegible] असल्यामुळें त्यानें नागोजीस आश्वासन दिलें कीं, तुम्ही संताजीचें शीर कापून आणाल तर आम्ही तुम्हांस मोठें बक्षीस देऊं. अशी खटपट करून नागोजी परत धनाजीकडे आला; आणि त्यानें पैसे भरून संताजीच्या फौजेंत फितूर केला. धनाजी काय किंवा संताजी काय, त्यांचे हाताखालीं पुष्कळसे मराठे लोक एकमेकांचे सगे सोयरे व ओळखीचे होते. दहिवाडीचे आसपास संधि साधून धनाजीनें संताजीवर एकदम चाल केली. लढाई चालू असतां संताजीच्या हाताखालचे लोक फितूर होऊन त्यास सोडून चालते झाले. अर्थात् धनाजीस जय मिळून तो संताजीस पकडण्याची शिकस्त करूं लागला. संताजीस हा प्रकार कळतांच तो जीव बचावण्यासाठीं भटकत असतां शिंगणापुरचे डोंगरांत लपून राहिला. त्याजपाशीं आतां फौज कांहीं नव्हती. फक्त दहावीस जिव्हाळ्याचे लोक तेवढे होते. चार दोन महिने त्यानें लपून छपून काढिले. नागोजी माने व धनाजी त्याचे पाळतीवर होते. नागोजीची बायको राधाबाई देखील संताजीचा मुगावा काढीत होती. मात्र संताजीस याची कांहींच वार्ता नव्हती. निदान आपल्या प्राणांवर बेतेल अशी कल्पना त्यास नसावी. तो फिरत फिरत म्हसवडाकडे आला. राधाबाईनें त्याचे पाठीवर आपले मारेकरी पाठविले. पुढें असाच जंगलांत लपून दिवस काढीत असतां एके दिवशीं कारखाळ्याच्या रानांत ओढ्यावर एकटाच स्नानास गेला, त्या समयीं मारेकऱ्यांनीं पुढें येऊन संताजीचें शीर कापून नागोजीला दिलें.

---

* शि. च. सा. ४. ७२८, ७२९.

नागोजीनें लगेच धावत जाऊन तें बादशहाला नजर केलें. संताजीनें कैक वर्षें बादशहाची इतकी नासाडी केली होती कीं त्याचें शीर पाहून बादशहास परमावधीचा संतोष झाला. त्यानें नागोजीची वाहवा करून त्यास भरपूर बक्षीस दिलें. अशा प्रकारें या पराक्रमी पुरुषाचा अंत अत्यंत हृदयद्रावक झाला. संताजीचें प्रकरण राजारामानें विकोपास जाऊं दिलें, सौम्योपचारानें मिटविलें नाहीं, यांत राजारामाची नालायकी दिसून येते. पराक्रमी पुरुष हेच राष्ट्राचें सामर्थ्य होत. त्यांचें संगोपन ज्यास करितां येत नाहीं, तो धनीपणास अयोग्य मानला पाहिजे.

संताजीच्या मृत्यूनें मराठी राष्ट्राचा जोर ढिला पडला नाहीं, तो तसाच पुढें चालला हे मोठें भाग्य मानलें पाहिजे. मात्र या भालेराईत मराठ्यांच्या अंगची सर्व शिस्त नाहींशी होऊन जो तो मन मानेल तसें वर्तन करूं लागला. संताजीचा दरारा धनाजीचे ठिकाणीं अगदीं नव्हता. पुढें झुल्फिकारखानास बादशहानें निकड करून जिंजीच्या वेढ्याचें काम सक्तीनें चालविलें. तेव्हां राजारामानें खानाशीं सलूख करण्याकरितां आपला दासीपुत्र राजा कर्ण यास खानाचे भेटीस पाठविलें. दोन महिने वाटाघाट होऊन पुढील बेत ठरण्यांत आला. खानानें राजारामास गुप्तपणें निघून जाण्याची संधि देऊन नंतर किल्ला काबीज केला. राजारामाचा जनानखाना जिंजीवर असलेला खानाचे कबजांत आला, त्यास सुद्धां त्यानें राजारामाकडे विशाळगडीं पाठवून दिलें.

जिंजीहून आल्यावर राजारामानें कांहीं काळ विशाळगडावर मुक्काम केला. परंतु हा किल्ला दूर एका बाजूस अत्यंत अवघड जागीं असल्यामुळें बादशहाशीं झगडणाऱ्या सरदारांवर हुकमत चालविण्यास गैरसोयीचा होता, म्हणून रामचंद्रपंत व शंकराजी नारायण यांच्या सूचनेवरून राजारामानें सातारा किल्ल्यावर आपली राजधानी केली. रायगड मोगलांचे कबजांत होता. तो पुढें तीस वर्षांनीं शाहू छत्रपतीनें जिंकून परत घेतला. राजाराम प्रकृतीनें हैराणच होता. गोदावरी पावेतो एक स्वारी करून त्यानें शाहूस बादशहाचे छावणींतून सोडविण्याचा प्रयत्न केला तो साधला नाहीं. राजारामाचे सरदार मात्र मोगलांचा प्रदेश उध्वस्त करीत नर्मदे पावेतों गेले. इकडे त्याच समयांत औरंगजेब बादशहा साताऱ्यावर चालून गेला तेव्हां राजाराम गंगथडीकडून परत फिरला, तो सिंहगडावर आला आणि

तेथें थोडे दिवस ताप येऊन अल्पावकाशांत मरण पावला, त्या वेळीं त्यांचें वय ३० वर्षांचें होतें. त्यास दोन बायका ताराबाई व राजसबाई या असून ताराबाईला जिंजी येथें पुत्र झाला तो दुबळा व वेडसर होता. त्याचें नांव धाकटा शिवाजी. राजसबाईस एक मुलगा झाला त्याचे नांव संभाजी. यानेंच पुढे कोल्हापुरचें राज्य स्थापिलें. राजारामाच्या मृत्यूनें चाललेल्या युद्धांत कांहींच फरक पडला नाहीं. ताराबाई मोठी तडफदार बायको होती आणि रामचंद्रपंतानेंही पूर्ववत् कष्ट करण्यांत कमतरता दाखविली नाहीं. ताराबाईनें बादशहास कसें जेरीस आणिलें त्याजबद्दलचा लोकसमज खालील पद्यांत व्यक्त झालेला आढळतो. तत्कालीन कवनांतला हा त्रुटित उतारा आहे.

दिल्ली झाली दीनवाणी । दिल्लीशाचें गेलें पाणी ॥
ताराबाई रामराणी । भद्रकाली कोपली ॥
ताराबाईच्या बखतें । दिल्लीपतीचीं तखतें ॥
खुरीं लागलीं तेविं मतें । कुराणें.....खंडिलीं ॥
वजीरांस झोडिजेतें । मुगलांस तोडिजेतें ॥
मशीदींस फोडिजेतें । म्लेंच्छकुलें दंडिलीं ॥

मात्र कित्येक बाबतींत ताराबाई व रामचंद्रपंत यांचें पटलें नाहीं, त्यामुळें राजकारणास वैगुण्य आलें, तो प्रकार पुढील भागांत व्यक्त होईल.

श्री

व्याख्यान पांचवें

नवीन मनूची सुरुवात, बाळाजी विश्वनाथाचा उदय.

स. १७००—१७०७

आतां पुढें जो भाग सांगावयाचा आहे त्यांत शिवाजी महाराजांच्या वेळचीं राज्य–धोरणें मागें पडून नवीन व्यवस्था कशी निर्माण झाली हें दिसून येणार आहे. राजाराम सिंहगडावर मरण पावला, त्या वेळीं सातारा राजधानीस औरंगजेबाचा वेढा चालू होता. मावळांतील किल्ले काबीज करण्यास स्वतः बादशहा चालून आला तेव्हां त्याची अगदीं हैराणगत करून त्रेधा उडविण्यांत मराठे सरदारांनीं शिकस्त केली. संताजीचे मुलगे व बंधु येऊन ताराबाईस मिळाले; आणि मराठ्यांची जूट म्हणून कांहीं केल्या फुटेना. उत्तरोत्तर त्यांचा जोर वाढतच चालला हें पाहून बादशहास मोठी चिंता लागली. शाहू त्याचे कैदेंत होता. त्यानें पुढें काय करायचें हा मुख्य प्रश्न त्याचे मनांत घोळूं लागला. संभाजीस मारल्यानें मराठे जास्त प्रबळ मात्र झाले, तेव्हां शाहूच्या संबंधानें मराठ्यांस चीड उत्पन्न न होईल असाच कांहीं तरी मार्ग काढण्याचें बादशहानें आपल्या मनाशीं ठरविलें. शिवाजीनें स्वतंत्र राज्य स्थापिलें तो उद्योग विफल करून एका बाजूनें मराठ्यांची समजूत व दुसऱ्या बाजूनें आपला मतलब ह्या दोन गोष्टी साधतील अशी कल्पना विचार करकरून त्यानें योजिली. ही योजना म्हणजे शाहूस मुसलमानी दीक्षा द्यावी आणि त्यास आपला मांडलिक बनवून आपल्या तर्फेचा अधिकारी म्हणून दाक्षिणेंत स्थापावें, अशा स्वरूपाची होती. या युक्तीनें शाहू व ताराबाई यांचा झगडा परभारें लागून त्यांत मराठ्यांचा वाढता जोर नाश पावेल अशी ही भरपूर दूरदृष्टीची कपट–नीति निरनिराळ्या इसमांच्या सल्ल्यानें

बादशहानें मनांत आणिली. पेशव्यांच्या अंमदानींत मराठशाहीला निराळें वळण लागूं लागलें त्याचें बीज या वेळच्या परिस्थितींत रुजलें गेलें.

स. १७०२ व १७०३ या सालांत बादशहाची स्थिति अत्यंत खालावत जाऊन त्याचा मुक्काम सारखा पुणे प्रांतांत झाला, त्या वेळीं शाहूच्या भावी व्यवस्थेचे विचार त्याच्या मनांत जोरानें उसळूं लागले. राजाराम मृत्यु पावला, सातारा हस्तगत केला, तरी मराठ्यांचें बल वाढतच चाललें. राजारामापेक्षां त्याची बायको ताराबाई जास्तच आवेशानें बादशहाची नासाडी करूं लागली. एक एक किल्ला घेण्यास एक एक वर्ष लागूं लागलें. वीस वर्ष दक्षिणेंत खपूनही कांहीं फल-प्राप्ति झाली नाहीं. स. १६९९ त तो साताऱ्यावर चालून गेला, तेव्हां आपण तावडतोब मराठ्यांचे किल्ले हस्तगत करूं अशी जी उमेद त्यास वाटत होती ती पार लयास गेली. चार वर्ष लढून चार किल्ले घेतले, ते सुद्धां हाताखालच्या सैनिकांनीं पैसे वगैरे भरून केवळ बादशहाच्या समजुती करितां वर मोगली निशाणें फडकावून ताब्यांत आल्याचा देखावा केला. बादशहाची पाठ वळतांच ते परत मराठ्यांनीं घेतले. या चार वर्षांत मावळ प्रांताची, मराठे सरदारांची, त्यांच्या कारभाराची व आपल्या एकंदर परिस्थितीची बादशहास पूर्ण ओळख पटून मराठ्यांस जिंकण्याचा पूर्वीचा त्याचा आग्रह मावळून गेला. मराठे दिवसें दिवस अनावर झाले. सुरत, बऱ्हाणपुर, विजापुर, भागानगर वगैरे धनाढ्य शहरें लुटून व गुजरात खानदेश हे प्रांत भिकेस लावून नर्मदोत्तरच्या माळव्यांतही सिरोंज मंदसोर पर्यंत त्यांनीं प्रवेश केला. उलट बादशहाचें वार्धक्य वाढत चाललें, शक्ती क्षीण होऊं लागल्या, भविष्य काळचा अंधार दृष्टीपुढें स्पष्ट उभा राहिला.

या वेळीं बादशहाजवळ पुत्र कामबक्ष व त्याची कन्या झीनतुन्निसा ऊर्फ पातशहा बेगम एवढींच दोन ममतेची माणसें असून मराठ्यांचें हृद्गत पूर्णपणें ओळखणारा व आलेला प्रसंग सौम्य उपायांनीं पण सफाईनें निभावून नेणारा असा एकच सरदार झुल्फिकारखान त्याच्या विश्वासास पात्र होता. या तिघांच्या विचारानें बादशहानें शाहूसंबंधाचा वरील उपक्रम अंमलांत आणण्याची तजवीज केली. या उपक्रमांत पडद्या आड काम करणाऱ्या आणखी दोन व्यक्ती शाहूचा जम बसविण्यांत उद्युक्त होत्या, त्यांची प्रथम वाचकांस ओळख करून दिली पाहिजे.

95297

रायभानजी काका म्हणून एक गृहस्थ या वेळीं बादशहाच्या बाजूनें मराठ्यांच्या राजकारणांत विशेष खटपट करणारा होता. हा रायभानजी शहाजी राजांचा दासीपुत्र म्हणजे पर्यायानें शिवाजीचा बंधु. संभाजी, राजाराम वगैरे त्यास काका म्हणत त्याच नांवानें लोक त्यास पुढें ओळखूं लागले. जिंजीचा वेढा चालू असतां त्याची व झुल्फिकारखानाची ओळख होऊन उत्तरोत्तर उभयतांची सलगी जमली. झुल्फिकारखानानें तंजावरकर शहाजीस मोगलांचा ताबेदार बनविलें तेव्हांच रायभानजीस देखील त्यानें आपल्या फौजेंत दाखल केलें. जिंजींतून राजारामाची सुटका करण्यांत रायभानजीचें अंग होतें. पुढें खानाच्या तैनातींत राहून रायभानजी महाराष्ट्रांत आला. मराठ्यांकडील प्रमुख मंडळी शक्य तितकी आपणांस वश करून घेण्याचें बादशहाचें धोरण होतें. त्यास अनुसरून झुल्फिकारखानाच्या शिफारसीनें बादशहानें रायभानजीस आपल्या पदरीं सहा हजारी मनसब ठरवून दिली. बादशहाची सत्ता प्रबल आहे, त्याच्याशीं झगडण्यांत मराठ्यांचा निभाव लागावयाचा नाहीं, त्याची समजूत घालूनच शाहूनें आपला जम बसवून घ्यावा, अशा विचारांची जी मवाळ मंडळी त्या वेळीं राजकारणांत होती, तिजपैकीं हा एक रायभानजी होय. बादशहाचा त्याजवर लोभ होता, आणि शाहूच्या बाबतींत त्यानें या रायभानजीचा उपयोग करून घेतला.

दुसरी व्यक्ति बाळाजी विश्वनाथ भट ही होय. बादशहा पांच सात वर्षें पुणें प्रांतांत मुक्काम करून मावळांतील किल्ले जिंकीत असतां हा बाळाजी पुणें, दौलताबाद प्रांतांत मराठ्यांच्या तर्फेनें सरसुभेदारीच्या कामावर होता. स. १६९९ पासून १७०७ अखेर पर्यंत नऊ वर्षांच्या अवधींतले त्याच्या सरसुभेदारीचे कागद सांपडतात. अर्थात् सन १६९९ पूर्वीच्या दहा वीस वर्षांत तो मराठशाहींत निरनिराळ्या कामांत वावरत असला पाहिजे. वरील सरसुभेदारीच्या हुद्यावर असतां त्यास खुद्द छत्रपति, नीलकंठ मोरेश्वर पिंगळे पेशवा, रामचंद्र नीळकंठ अमात्य, शंकराजी नारायण सचिव, श्रीकराचार्य पंडितराव, धनाजी जाधव सेनापति इत्यादि प्रमुख अधिकाऱ्यांचे हुकुम सुटलेले आढळतात. म्हणजे हा बाळाजी मराठी राज्याची सेवा करून पुणें प्रांताच्या वसुलाची व न्याय निवाड्याची तजवीज पाहत होता याबद्दल संशय वाटत नाहीं. स. १७०२ च्या पावसाळ्यांत बादशहानें आपला मीरआतीश

म्हणजे तोफखाना कामदार तर्बियतखान याजकडून सिंहगडास वेढा घातला तेव्हां किल्ला हातचा जाऊं नये म्हणून धनाजी जाधव व बाळाजी विश्वनाथ यांनीं शिकस्त केलेली आढळते. त्याचें अंबाजीपंत पुरंदऱ्यास ता. २० आगस्ट स. १७०२ चें पत्र गेलें त्यांत खालील मजकूर आहे. "तुम्हांकडे कांहीं नाजूक काम आहे तरी कागद देखतांच भेटीस यावें. तसेंच कृष्ण मृत्तिकेची फार जरूर लागली आहे, तरी भगीरथ प्रयत्न करून अडीच मण मृतिका मेळऊन पाठविणें. जिवावरचा खेळ करणें आहे. आज मराठ्यांचें रक्षण झालें तरच तुमचे राहणें या मुलकांत होईल." * या पत्रानंतर कित्येक महिने तोफांचा मारा किल्ल्यावर होऊन ता० १० मार्च १७०३ रोजीं किल्लेदार ठार झाला, तेव्हां अंतस्थ खटपटीनें तर्बियतखानानें संरक्षकांस जबर लांच देऊन ता. ८ एप्रिल रोजीं बादशहाचें निशाण किल्ल्यावर लाविलें. सिंहगड हातीं आल्यानें बादशहास मोठी खुशी झाली. स्वतः डोंगर चढून तो किल्ला पाहण्यास वर गेला आणि पुणे प्रांताचा केवळ कलिजा असा हा किल्ला परमेश्वरानेंच आपणांस बक्षीस दिला अशा भावनेंत त्यानें 'बक्षिंदाबक्ष' म्हणजे बक्षिस देण्याची ज्यास सत्ता त्याचेंच हें बक्षीस असें अन्वर्थक नांव त्यानें सिंहगडास दिलें. बादशहाचें नामाभिधान युक्तच दिसतें. स. १६४४ त तें बक्षीस खुदानें शिवाजीस दिलें, तें जयसिंहानें स. १६६५ त परत मिळविल्यावर तानाजी मालुसऱ्यानें १६७० त प्राणांचा मोबदला देऊन पुनः शिवाजीस पैदा करून दिलें. त्यानंतर बत्तीस वर्षांनीं बादशहानें हें बक्षीस फिरून उपटलें तें अल्प काळच मोगलांकडे राहिलें. शंकराजी नारायणानें सिंहगड परत घेतला, तो पुढें सचिवापासून पेशव्यांनीं बक्षीस म्हणूनच घेतला. वास्तविक या एका दिव्य बक्षिसांतच मराठ्यांचा बहुतेक इतिहास भरलेला आहे.

सिंहगडच्या या बक्षिसांत बाळाजी विश्वनाथाचा हात कसा आहे हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. मोगल अधिकाऱ्यांशीं त्यानें ओळखी व संधानें बांधिलीं आणि धूर्तपणानें वागून प्रत्यक्ष पुण्यास बादशहाचा मुक्काम असतां प्रांतांत मराठ्यांचा अंमल टिकविला आणि कैदेंत असलेल्या शाहूचा परामर्ष घेतला. मोगल कारभाराची, त्यांच्या अधिकाऱ्यांची आणि बादशहा व मराठे यांच्या बलाबलाची खडानखडा

* पु. द. भाग १ ले. २०–२२

माहिती बाळाजीनें या सुभेदारीच्या काळांत पैदा केली तिच्याच जोरावर त्यानें पुढें पेशवाईचा जम बसविला.

पंचवीस वर्षें बादशहाची व त्याच्या समग्र परिवाराची वसती दक्षिणेंत झाली. एवढ्या दीर्घकालांत त्याचा एकंदर निर्वाह दक्षिणी लोकांवर असून एतत्प्रांतीय ब्राह्मण मराठे वगैरे नानाजातींचे व नानापेशांचे लोक त्याच्या नोकरींत राहून आपली गुजराण करीत. हाल्लीं ज्याप्रमाणें हिंदी लोकांच्या बुद्धिसामर्थ्याचा उपयोग इंग्रज आपल्या कारभारास करून घेतात, तसाच प्रकार त्या वेळीं बादशहानेंही केला. बाळाजी विश्वनाथाचे किती तरी परिचित बादशहाचें नौकरीत होते, आणि प्रसंगानुसार शाहूच्या अडचणी निवारण करण्यांत त्याला अशा व्यक्तींचा मोठा उपयोग झाला. उदाहरणार्थ सासवडचे पुरंदरे बादशहाच्या नोकरींत होते त्यांचा व बाळाजीचा इतका निकट स्नेह जुळला कीं पंनास वर्षें पर्यंत हीं दोन कुटुंबें एकत्र होत असा रिवाज चालला. बादशहाच्या पदरीं असलेल्या शेंकडों व्यक्तींचे उपकार पुढें शाहूनें स्मरून ते फेडल्याचे कागद आतां प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून शाहूच्या परिस्थितीची अटकळ बांधतां येते आणि कोंकणांतून आलेल्या लहानशा भिक्षुकास विश्वासपद देऊन त्यानें चांगली परीक्षा केलेल्या कर्तबगार गृहस्थासच दिलें या विषयीं संशय बाळगण्याचें कारण राहत नाहीं.

शाहू बादशहाचे कैदेंत होतो त्याच्या वयास वीस वर्षें होऊन गेलीं. सात वर्षांचा असतां मातुश्रीबरोबर रायगडावर बादशहाचे कबजांत गेला. तो सदैव दुःखी व आजाऱ्यासारखा दिसे. स. १७०० सालीं त्याला एक जिवावरचें दुखणें आलें, त्यांतून मोठ्या शिकस्तीनें तो वांचला. सुखाचा क्षण कसा तो त्याला मुळींच दिसला नाहीं. बरोबरच आहे, ज्याचीं अठरा वर्षें छावणीच्या आवारांत गेलीं, ज्याला बाह्य जगाचा मोकळा प्रकाश किंवा स्वतंत्र व्यवसाय दृष्टीस सुद्धां पडला नाहीं, त्यास इहलोकच्या जीवनांत आनंद तो कसा वाटावा ! शिवाय बादशहा काय उद्यां माझें डोचकें मारतो, कीं जन्मान्ध करून ग्वालेरच्या किल्यांत फेकून देतो, कीं सुंता करून या नरदेहाची व धर्माची विटंबना करतो ही धास्ती सदैव मनांत वावरत असल्यामुळें त्याला अन्न तरी गोड कसें लागावें ! एखाद्या कैद्याला फाशीची शिक्षा फर्माविल्यावर ती अमलांत येण्यापूर्वीचा काळ जितका

दुःसह होतो, तितकाच शाहूचा हा काळ कष्टमय गेला. या काळांत शौर्य, उत्साह इत्यादि जीवनोपयोगी गुणांचें संवर्धन होण्याऐवजीं, त्याच्या स्वभावांत मार्दव, कनवाळूपणा, पापभीरुता, भूतदया अशा प्रकारची साधु वृत्तिच बाणली गेली. राजपुरुषास धूर्त, कठोर व करारी वृत्ति पाहिजे, एक प्रकारचा ताठरपणा अंगीं पाहिजे, तो त्याच्यांत [illegible]ला नाहीं. या स्वभावाचा परिणाम मराठ्यांच्या भावी इतिहासावर झालेला स्पष्ट दिसून येतो.

स. १७०० सालीं राजाराम मरण पावला त्या सुमारास शाहूला जबरदस्त दुखणें लागून तो पुष्कळ महिने आजार भोगून शरीरानें व मनानें अगदीं अदू झाला. ता. २६-८-१७०० रोजीं त्यानें बादशहास भेटून प्रणाम केला, तेव्हां बादशहा बोलला, 'कां राजे, काय ही तुमची स्थिति, तुम्ही अगदींच निस्तेज दिसतां.' जवळ हाफीज अंबर म्हणून सेवक होता, तो बोलला, 'राजे डाळभातास बिलकूल स्पर्श करीत नाहींत, सदैव मिठाई खात असतात. कैदेंत असतां जेऊं नये, फराळ करावा असें यांचें शास्त्र सांगतें.' बादशहा बोलला, 'यांस नेऊन हमीदुद्दीनला भेटवा, ते काय तें सांगतील.' या प्रसंगीं राजारामाच्या मृत्यूची खंती शाहूनें बादशहास दाखविली नाहीं.

शाहूचे हाल कशा प्रकारचे झाले याची आज आपणांस कल्पनाही होणें शक्य नाहीं. आज जे लोक कैदेंत पडतात त्यांस निवाऱ्याची जागा व अन्न हें तरी नियमानें व भरपूर मिळतें. पण शाहूचीं अठरा वर्षें बादशहाच्या छावणींत म्हणजे संपूर्ण वनवासांत गेलीं. भीमा नदीस पूर आला, ब्रह्मपुरीची छावणी वाहून गेली. माण नदीस पूर आला खटावची छावणी वाहून गेली. कांहीं थोड्या मोठ्या लोकांस तंबू असत, बाकीच्यांनीं रानांत वारा ऊन पाऊस यांचा मनमुराद उपभोग ध्यावा. तीन लाखांच्या घोळक्यांत कोण कोणाची दाद घेणार ! त्यांतून शाहूस व त्याच्या परिवारास पोटा पुरता तनखा बांधून दिलेला होता, तो वेळेवर हातांत पडला तरच जोडें भरडें अन्न पोटास मिळणार. परंतु स्वतः बादशहा मावळांतील किल्ले जिंकण्यास निघाला, तेव्हां पावसांतून व चिखलांतून सर्वांचेच अतिशय हाल होऊं लागले. एकदां शाहूस उपास पडला तेव्हां जोत्याजी केसरकरानें काकडे पेटवून कसेबसे भाताचे चार घांस त्यास खाऊं घातले. अशा स्थितींत बादशहाची दैना उडून पुढें

उत्तरोत्तर मराठ्यांचा जोर वाढला, उत्तरेतून येणाऱ्या बादशहाच्या खाजिन्यावर तें ताव मारूं लागले, तेव्हां लोकांची केवढी दैना उडाली ती तर्कानेंच जाणली पाहिजे. शाहूनें किंवा येसूबाईनें आपला तनखा मागितला, म्हणजे अधिकारी त्यांस सांगत, 'तुमचेच जातभाई आमचा पैसा मधल्यामध्यें लांबवितात, त्यांच्याकडेच पोटास मागून घ्या.' अशी ही दुहेरी आपत्ति शाहूस होत होती. त्याचे जातभाई त्यास साह्य करण्यास तयार होते, पण बापाची किंवा आजोबाची तडफ त्याचे ठिकाणीं मुळींच नव्हती. शाहूच्या दैन्यावस्थेचें हृदयद्रावक वर्णन येसूबाईनें चिंचवडच्या देवांस लिहिलेलें ता. १९ एप्रिल स० १७०९ चें पत्र उपलब्ध आहे तें असें:—

राजश्री देव स्वामींचे सेवेसीं, श्रीमत् परमपूज्य तपोनिधि मुक्तिदायक सकलगुणालंकरण देवमान्य वरदमूर्ति परायण राजमान्य राजश्रीः—

आज्ञाधारक सेवेसीं मातुश्री येसूबाईसाहेब दोन्ही करकमल जोडून चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम तागाईत वैशाख शुद्ध सप्तमी गुरुवार जाणऊन मुकाम अमदानगरीं दुर्गात स्वामींच्या आशीर्वादें करून यथास्थित असों. स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. बहुत दिवस जाले. स्वामींनीं आशीर्वाद पत्र पाठवून बालकाचा परामर्श केला नाहीं, याकरितां चित्तास स्वस्थता होत नाहीं, ते देव जाणे. तरी स्वामीनीं येणारा मनुष्याबराबरी प्रतिक्षणीं आशीर्वाद पत्र पाठवीत गेलें पाहिजे. आमचें वर्तमान तरी स्वामीपासीं सत्यच लेखन केलें पाहिजे. चिरंजीव दाजी तों पृथ्वीपति समागमें गेले. आम्हांस सार्वभौमांची आज्ञा जाली कीं अमदानगरास जावें. आज्ञेप्रमाणें आम्हांस अमदानगरास घेऊन आले. येथें आलीयावरी आजी पांच मास जाले. परंतु खर्चाची बहुत तंगचाई जाली. काय निमित्त कीं सार्वभौम दूर गेले. आमचा तनखा जो दिल्हा तो तांब्रांनीं व हरिभक्तांनीं व कांहीं कोळेंकरून प्रतिकूलता जाली त्यामुळें द्रव्य येणें राहिलें. येथें अमदानगरीं साहूकाराचें पांच सहा सहस्र ब्रह्मस्व जालें. आतां कोण्ही देत नाहीं. मागल्याच पैक्यास तगादे लाविले आहेत. त्याच्यामुळें बहुतकष्टी होतों तो दुःखसागर स्वामींस काय म्हणून ल्याहावा ! मग जरूर जाणोन स्वामींच्या सेवेसीं रायाजी जाधव पाठविला असे. तरी महाराज कैलासवासी स्वामी गेल्या तागाईत

आपणावरी हा कसाला प्राप्त जाला, इंगळास वोळंबे लागले. बरें होणार भविष्य त्यास यत्न काय आहे ! आतां एक स्वामी वितरिक्त आणीक कोणाचा भरंवसा या समयांत नाहीं. एक स्वामीच क्लेश परिहार करितील. इतरांच्यानें कांहीं होणें नाहीं. तरी सारांश गोष्टी कीं ब्रह्मस्वापासून मुक्त केलीयानें बहुत कीर्ति स्वामींची आहे, आणि पाऊस पाणी जालीयावरी स्वामी ज्यापासून देवितील त्यास प्रविष्ट करून. परंतु हा समय आम्हांवरी कठिण पडला आहे. आपले कोणी येथें प्रतिपक्षी नाहीं, ऐसा प्रसंग प्राप्त झाला आहे. याचें निवारण करणार स्वामी आहेत. माझी उपेक्षा केली न पाहिजे. वरकड चिरंजीवांकडील समाचार व आमचें वर्तमान रायाजी मुखांतरीं चरणापाशीं विनंति करितां श्रुत होईल तें सत्यच मानणें. विशेष ल्याहावें तरी आपण अज्ञान मूढ असें, लिहितां येत नाहीं, अथवा ज्ञानही नाहीं. त्याहीवरी आपणाजवळी कोणी शहाणा कारकून नाहीं. अवाक्षराची क्षमा केली पाहिजे. कृपा आशीर्वाद निरंतर करीत गेलें पाहिजे. कृपा असों दीजे. जाणीजे. (मोर्तब) सेवेसीं मातुश्री सकवार आऊसाहेबीं साां दंडवत. लिहिलार्थ परिसीजे. कृपास्नेह असो दीजे हे विज्ञापना. सेवक बसवंतानें चरणावरी मस्तक ठेवून साा दंडवत विनंति उपरी लिहिलें परिसीजे. मी सेवक असें. आशीर्वाद पत्र पाठवीत जाणें. जाणीजे हे विनंती.' येसूबाई जवळ बसवंत खोजा म्हणून एक विश्वासु नोकर होता, त्यानेंच हें पत्र लिहिलेलें दिसतें. या मजकुरावरून बादशहाची हवाल कळून येते.

बाळाजी विश्वनाथाची जानपछान बादशहा व त्याचा जनानखाना यांजकडे कशी होती तें एका जुन्या बाडावरून लक्षांत येतें. ' तृतीय सम्मेलन वृत्त ' या पुस्तकांत कांहीं त्रुटित सांपडलेलीं पानें छापलीं आहेत तीं वाचलीं असतां, अनेक बाबतींची गलद झालेली वगळल्यास, शाहूचें बस्तान जमवून देण्यांत बाळाजीचा त्यास चांगलाच उपयोग झाल्याचें दिसून येतें. ताराबाईकडे वावरणारे रामचंद्रपंत अमात्य, परशुराम त्रिंबक प्रतिनिधि, धनाजी जाधव, पिंगळे पेशवे इत्यादिकांशीं बाळाजीचें निकट संधान असून उलट पक्षीं बादशहाच्या दरबाराशीं त्याचा वशिला भक्कम होता. म्हणजे रायगड मोगलांचे हातीं पडल्यापासून चहूंकडचीं राजकारणें नजरेंत बाळगून आणि स्वतः शांत व धूर्त वृत्तीनें वागून संधि येतांच

स्वराष्ट्राचा उत्कर्ष साधण्याची हाव धरणारा असा हा मुत्सद्दी पुरुष शाहूच्या ममतेंतला होता.

शाहूला सुद्धां दुहेरी वर्तन ठेवावें लागत होतें. अंतर्यामीचा ओढा मराठ्यांकडे, पण बाह्यतः प्रेम दाखवायचें बादशहावर. जरा कांहीं बादशहास संशय येण्याजोगें कारण घडतें कीं त्याचे बारा वाजले असते. संभाजीचा वध झाला, त्याचें धड बादशहानें कुत्र्यांकडून खावविलें आणि शीर जंगलांत फेकून दिलें, तें उचलून आणून दहन करणें हा सुद्धां राजद्रोहाचा गुन्हा गणला जात होता. अशा स्थितींत बाळाजी विश्वनाथासारखे महाराष्ट्रीय व पुष्कळसे लहान मोठे राजपूत सरदार शाहूचें अभीष्ट चिंतिणारे होते, यावरून शाहूच्या परिस्थितीबद्दल केवढी अनुकंपा लोकांस वाटत होती हें दिसून येतें. हिंदूंचा पाडाव करण्याचा दुराग्रह धरून बादशहा महाराष्ट्रांतच ठाणें देऊन बसला, बाहेर राज्याची दुर्दशा होत आहे याची क्षिति त्यास वाटली नाहीं. ही गोष्ट त्याच्या मुसलमानांसही अयोग्य वाटली. त्याचा पुत्र अकबर देशोधडीस लागला, वडील पुत्र शहाआलम कैद भोगीत होता, अकबराचा सहायक दुर्गादास मोगल बादशाही उलथून पाडण्याचा प्रयत्न राजपुतान्यांत नेटानें करीत होता, ह्या गोष्टी सर्व लोक उघड्या डोळ्यांनीं पाहत होते. सारांश, शिवाजीच्या दुर्दैवी नातवाबद्दल किती आदर लोकांत वसत होता हें ध्यानांत ठेविल्यास पुढें मराठी राज्याचा विस्तार इतका शीघ्र कसा झाला याची उपपत्ति लागते. औरंगजेबाच्या दुर्नीतीला लोक विटून गेले होते. एरवीं झुल्फिकारखानासारखा बादशहाचा विश्वासु सरदार सुखा-सुखी राजारामास जिंजींतून सुटून जाण्यास साह्य करताना. लोकांची उत्कट भावना हाच परमेश्वरी नेमानेम राजकारणांत सुद्धां पुष्कळदां निदर्शनास येतो.

आतां आपण शाहूवर जें विशिष्ट संकट ओढवलें त्याचा विचार करूं. पुण्यास मुक्काम असतां बादशहाची खालावलेली स्थिति पाहून त्याच्या मुलीनें त्यास सारखी टोचणी लाविली, कीं 'आतां आपल्या शरीराचा भरंवसा नाहीं, तर या शाहूची काय व्यवस्था लावायची असेल ती ठरवून द्या.' त्यावरून त्यानें मनांत योजलेला बेत म्हणजे शाहूस मुसलमानी दीक्षा देऊन व लग्न करून ताराबाईपासून आपलें राज्य मागून घेण्यास रवाना करावयाचें हा बेगमेम

कळविला; आणि लवकरच अमुक एक पवित्र दिवस आहे त्या दिवशीं मुसलमानी धर्म स्वीकारण्यास शाहूनें तयार राहवें असा हुकूम फर्माविला. बेगमेनें ती गोष्ट येसूबाई व शाहू यांस कळविली, तेव्हां त्यांनी भयंकर शोक सुरू केला. त्यांनीं आकांत करून अन्नपाणी वर्ज्य केलें आणि कसेंही करून आमच्या वरील एवढें संकट निवारा अशी त्या बेगमेची विनवणी चालविली. ज्या शिवाजीनें हिंदुधर्माकरितां एवढे कष्ट केले त्याच्या प्रत्यक्ष नातवावर धर्म सोडण्याचा प्रसंग यावा यापेक्षां मरण काय वाईट असें त्यांस झालें. प्राण देईन, पण धर्म बुडविणार नाहीं अशी वृत्ति शाहूनें धारण केलीं. हा प्रकार पाहून बेगमेनें जाऊन परोपरीनें बापाकडे मध्यस्थी केली. तेव्हां बादशहानें आपला निश्चय कळविला कीं, 'माझे तोंडांतून शब्द गेला तो खालीं पडतां नये, पण मी एक पर्याय सांगतों. शाहूचे बदली दुसरे कोणी दोन प्रमुख मराठे तरुण मुसलमान होत असतील तर मी त्याजवर सक्ति करणार नाहीं.' हा बादशहाचा निर्धार ऐकून दोन तरुण कोण आणावे याचा विचार येसूबाईनें चालविला. प्रतापराव गुजराचे दोन पुत्र खंडेराव व जगजीवन शाहूबरोबरच रायगडावर पकडलेले कैदेंत होते, त्यांची येसूबाईनें आर्जवें करून यावनी दीक्षेस त्यांस तयार केलें. ता. ९-५-१७०३ रोजीं मोहोरमच्या उत्सवांत ही दीक्षा देण्यांत येऊन त्यांस अब्दुर्रहीम व अब्दुर्रहमान अशीं नांवें देण्यांत आलीं. येणेंप्रमाणें शाहूवरील संकट टळलें. कदाचित् या प्रसंगांत बाळाजी विश्वनाथाची रदबदली शाहूच्या उपयोगी पडली असेल.

हा प्रकार स. १७०३ मालच्या मे महिन्यांतला आहे. सिंहगड कबजांत घेऊन बादशहा नुकता पुण्याम आला होता. पण एवढ्यानें शाहूचें प्रकरण संपलें नाहीं. त्याला आपला ताबेदार बनवून ताराबाईकर रवाना करावयाचें हा बेत बादशहाचा होता. त्यासाठीं शाहूचें लग्न करून देण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. एक तर त्याचें वय मोठें वीस वर्षांचें झालें. त्याचें लग्न करण्याची खटपट बेगमेनेंही चालविलीच होती. बादशहाचा तर यांत एक विशिष्ट हेतु असा होता, कीं लग्नाच्या बायका ओलीस ठेवून घेतल्या कीं तेवढ्या बंधनानें शाहू अगदींच स्वतंत्र होऊन निघून जाणार नाहीं. म्हणून शाहूला दोन नवऱ्या

शोधून काढण्याची आज्ञा बादशहानें बेगमेला केली. नवऱ्या चांगल्या घरंदाज परंतु आपल्या सेवेंत काम करीत असलेल्या सरदारांच्या असाव्या असा निर्बंध होता. या मुलींची योजना करून लग्नें यथासांग सिद्धीस नेण्यांत बेगमेनें बाळाजी विश्वनाथाचा उपयोग केला. रुस्तुमराव जाधव व कण्हेरखेडचे सिंदे यांच्या मुली पसंत करून स० १७०३ च्या मार्गशीर्ष मासांत शाहला दोन बायका करण्यांत आल्या. त्या बायका पाहण्याची इच्छा बादशहानें दर्शविली तेव्हां विरूबाई नांवाच्या एका तरुण दासीस घेऊन शाहू बादशहाचे पायां पडण्यास गेला अशी दंतकथा आहे. विरूबाई पुढें शाहू जवळच अखेर पर्यंत राहिली.

"आज पंधरा वर्षे ममतेनें संगोपन करून तुम्हांस लहानाचे मोठे केलें, आतां तुम्हीं सदैव आमच्या राज्याचें हिताचिंतन करून आपलें कल्याण करून घ्यावें.' अशा गोष्टी बादशहानें शाहूस वारंवार पढविल्या, आणि ता. २७-११-१७०३ रोजीं त्यास सोडून कामबक्षाचे हवालीं केलें आणि ताराबाईकडे गेलेले किल्ले परत घेण्याची आज्ञा केली. झुल्फिकारखानासही बादशहानें त्यांजबरोबर दिलें. या मसलतींत रायभानजी काका होताच. शाहूस दोनहीकडून मोठी पंचाईत उत्पन्न झाली. ताराबाईशीं जाऊन लढावें तर स्वराष्ट्रद्रोह पदरीं येतो. बरें बादशहाचा हुकूम न पाळावा तर असेंच कैदेंत किती दिवस काढायचे! आपल्या बापाची दशा बादशहानें काय केली, इत्यादि प्रकार त्याच्या दृष्टीपुढें उभे राहिले. आपण बादशहाच्या हातांतलें बाहुलें आहों हें शाहू पूर्ण जाणत होता, म्हणून स्वतः त्यानें कांहींच पुढाकार घेतला नाहीं. आपल्याच लोकांशीं लढणें त्याला नको होतें. शिवाय ताराबाईचा-ही त्याला विशेष भरंवसा येत नव्हता. तिनें आपल्या पुत्रास गादीवर स्थापून त्याच्या नांवानें राज्य चालविलें होतें. तेव्हां ही आपली चुलती कदाचित् आपणास पकडून अटकेंत ठेवील अशीही भीति त्यास असणें साहजिक होतें. या वेळीं एकंदर प्रकार कसे घडले त्याचीं वर्णनें कोठेंच उपलब्ध नाहींत. धनाजी जाधवाशीं कामबक्षानें शाहूच्या तर्फेनें बोलणें सुरू केलें यावरून अनुमान होतें, कीं या खटपटींत बाळाजी विश्वनाथाचा हाथ अंतस्थपणें असला पाहिजे. कामबक्ष व शाहू बादशहाची छावणी सोडून कांही अंतर गेले. तेथून कामबक्षानें धनाजीकडे

आपले वकील पाठवून बोलणें सुरू केलें, कीं 'तुम्ही सर्व मराठे सरदार बादशाहची ताबेदारी कबूल करून त्याचे आझेंत वागण्यास तयार असाल तर आम्ही शाहूस तुमचे हवालीं करून युद्ध थांबवितों.' बहुधा रायभानजी भोसले हाच या बाबतींत बोलण्यास धनाजीकडे गेला असावा. आणि धनाजीचा मुख्य सल्लागार बाळाजी विश्वनाथ होता. धनाजीलाही विचार पडला कीं ताराबाई, रामचंद्रपंत, प्रतिनिधि इत्यादींना विचारल्याशिवाय आपण तरी परभारें काय जबाब द्यावा ! त्यानें उलट असें सांगून पाठविलें कीं, "मी सर्व सरदारांस पत्रें पाठवून येथें बोलावितों; आणि त्यांनीं बादशहाची ताबेदारी कबूल केल्यास शाहूस आम्ही स्वराज्यांत घेऊन जाऊं. मात्र दक्षिणच्या सहा सुभ्यांची सरदेशमुखी केवळ खासगी वतन म्हणून शाहूचे निर्वाहास ठरवून द्यावें आणि देशाचे बंदोबस्ताचे खर्चासाठीं त्या सहा सुभ्यांची चौथाई लिहून द्यावी." या मागण्या बाळाजी विश्वनाथाचे डोक्यांतून निघालेल्या आहेत आणि पुढील पेशवाईच्या रूपान्तराचा उगम त्यांत आहे.

यानंतर कामबक्षानें शाहूच्या नांवानें निरनिराळ्या मराठे सरदारांस पत्रें लिहवून बोलणें करण्यास आपल्या छावणी जवळ बोलाविलें. चहूंकडून मराठे सरदार आपापल्या फौजा बरोबर घेऊन धावत येऊन जमा झाले. त्यांनीं अशी एकमुखी मागणी केली कीं, 'आम्ही बादशहाची ताबेदारी कबूल करण्यास तयार आहों. बादशहानीं आम्हांस भर दरबारांत बोलवून पोषाख वगैरे देऊन आमचा सन्मान करावा म्हणजे आम्ही स्वमुखानें सर्वांसमक्ष ताबेदारीच्या शपथा घेऊं.' बादशहानें प्रथम ही गोष्ट मान्य केली, पण उत्तरोतर पुष्कळच सरदार बादशहाच्या छावणी जवळ गोळा झाले, तेव्हां त्यास धास्ती पडली कीं न जाणों, हे लोक बेफाम होऊन एकदम आपल्या छावणीवर हल्ला करून भलतीच दंगल उडवून देतील. त्यांच्या मागण्याही उत्तरोत्तर जास्त तोऱ्याच्या दिसूं लागल्या. दरबारांत सशस्त्र जाण्याचे व मानपानाचे प्रश्न व तपशील इतके उत्पन्न झाले, कीं बादशहानें सर्वच बोलणें बंद करून शाहूस सोडण्याचा विचार तात्पुरता रहित केला; आणि स. १७०४ च्या आरंभीं पुण्याच्या दक्षिणेकडील मावळांत स्वारी करून तोरणा राजगड वगैरे किल्ले त्यानें काबीज केले. अशा रीतीनें शाहूच्या सुटकेचा प्रश्न तसाच भिजत पडला. स. १७०४ पावसाळा

पुण्याच्या उत्तरेस खेड येथें काढून त्या सालच्या अखेरीस त्यानें सुरापुरच्या बेरडांवर स्वारी केली. स्वारींत त्यानें शाहूस आपल्याबरोबर घेऊन येसूबाई व बापका यांस अहंमदनगरास रवाना केलें, तो उल्लेख येसूबाईच्या पत्रांत वर आलाच आहे. शाहूला त्यानें नगरास पाठविलें नाहीं, त्याचा जनानखाना मात्र ओलीस सारखा ठेवून घेतला, यावरून मराठ्यांची ~~स्वतः शाहूची देखील~~ त्यास केवढी दहशत बाळगत होती तें दिसून येतें.

स. १७०९ सालीं सुरापुरास मुक्काम असतां बादशहाला भयंकर दुखणें प्राप्त झालें आणि आतां आपण वांचत नाहीं अशी त्याची भावना झाली. अशा स्थितींत सिंहगड, तोरणा, राजगड वगैरे सर्व किल्ले मराठ्यांनीं परत घेतले अशी बातमी कळून तो जास्तच विव्हळ झाला. आतां आपली अखेर आली, शाहूची वाट कांहीं तरी लावलीच पाहिजे, मराठ्यांचें बल फार वाढलें आणि शाहूस न सोडावें तर आजच मराठे आपल्यावर कोसळून आपली दैना उडवून देतील असा प्रसंग येऊन ठेपला. बहुतेक प्रदेश मराठ्यांनीं काबीज केला होता. तेव्हां शाहूस सोडून त्यांच्यांत फूट उत्पन्न करणें एवढा एकच उपाय बादशहाला राहिला, तो त्यानें स्वीकारिला. शाहूस सहहजारी मनसब व पोषाख देऊन कामबक्षाचे हवालीं केलें, दक्षिणच्या सहा सुभ्यांची चौथाई त्यास लिहून दिली आणि बादशहाचे ताबीन राहून दक्षिणचें राज्य करण्याची आज्ञा दिली. हीं फर्मानें घेऊन शाहू व कामबक्ष पुनः पुण्याकडे आले. त्यांजवर दुरून नजर ठेवण्यासाठीं बादशहानें झुल्फिकारखानासही रवाना केलें. शाहूजवळ स्वतःची फौज अशी नव्हतीच. त्यानें येऊन मराठे सरदारांस भेटीस बोलाविलें, पण पूर्वी एकवार फसल्यामुळें या प्रसंगीं एकही मराठा सरदार त्याजकडे येऊन दाखल झाला नाहीं.

शाहू व झुल्फिकारखान यांनीं पुढें चाल करून सिंहगड हस्तगत केला, इतक्यांत बादशहाची स्वारी स. १७०६ च्या आरंभीं सुरापुराहून बहादूरगडास व तेथून अहंमदनगर येथें दाखल झाली. या प्रयाणांत ताराबाईच्या सरदारांनीं बादशहाची एवढी दैना उडविली कीं त्यांनीं मनांत आणिलें असतें तर खुद्द त्यास-देखील सहज पकडून आणिलें असतें. झुल्फिकारखानानें मराठ्यांकडे शिष्टाई करून बादशहाची अब्रू बचावून त्यास अहंमदनगर येथें सुखरूप आणून पोंचविलें. तेथें

बरोबर एक वर्षानें ता. २० फेब्रुवारी स. १७०७ रोजीं बादशहा निजधामास गेला.

नगर येथील या एकवर्षाच्या मुक्कामांत शाहू संबंधानें नवीन असें कांहीं घडलें नाहीं. बादशहा आसन्न मरण अवस्थामुळें सर्व हालचाली बंद झाल्या आणि त्याचे पुत्र भावी कालाची वाट पाहत आपापल्या मतलबांत निमग्न झाले. बादशहाचे पश्चात् अजमशहा व झुल्फिकारखान शाहूस घेऊन दिल्लीवर चालून गेले. रस्त्यांत नर्मदातीराहून त्यांनीं स. १७०७ च्या उन्हाळ्यांत शाहूस पूर्वीचे करार पुरे करून दक्षिणचें राज्य करण्यास परत पाठविलें. आपण या लटांबरांत दिल्लीस जाऊन हांशील नाहीं, तूर्त मिळेल तें पदरांत पाडून पुढील मार्ग सुधारावा असा विचार शाहूनें योजिला. रायभानजी काका व राजपूत स्नेही यांनीं त्यास तशीच भर दिली. स. १७०७ च्या मे महिन्यांत शाहू नर्मदेवरून निघाला तो हळूहळू आपला जम बसवीत दिपवाळीनंतर साताऱ्यापुढें आला. ताराबाईशीं त्याचे जे युद्ध-प्रसंग झाले ते महशूर असल्यामुळें त्यांची विवक्ति येथें करण्याचें प्रयोजन नाहीं.

शिवाजीनें तीस वर्षांपूर्वी राज्याभिषेक समारंभ करून मराठ्यांचें पूर्ण स्वातंत्र्य बादशहास जाहीर केलें, त्या ऐवजीं त्याच्या नातवानें आतां ताबेदारीची मांडलिकी स्वीकारिली हाच मराठ्यांच्या राजकारणांत घडून आलेला मुख्य फरक होय हें अभ्यासकांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. पंचवीस वर्षं प्रचंड झगडा करून शेवटीं आपण मिळविलें काय तर बादशहाच्या सनदांची ताबेदारी. ताराबाई व तिचे सल्लागार रामचंद्रपंत अमात्य, परशुरामपंत प्रतिनिधि व शंकराजी नारायण सचिव इत्यादिकांस हा आंतबट्ट्याचा सौदा बिलकूल पसंत पडला नाहीं. उलट पक्षीं शाहूला परिस्थितीपुढें मान वांकवून मिळेल तेवढें पदरांत पाडून घेण्याची वृत्ति धारण करावी लागली. ही सल्ला बाळाजी विश्वनाथाची होय, ताराबाई म्हणूं लागली, शिवाजीचें राज्य त्याच्या पुत्रानें गमावलें. आतां जें राज्य आम्हीं प्रचंड रक्त खर्च घालून नवीनच संपादन केलें आहे, त्याजवर शाहूचा कांहीं हक्क नाहीं. या घरगुती भांडणांत रामचंद्रपंताचा भाग किती असावा तें सांगवत नाहीं. पण शाहू आपला जम बसवीत साताऱ्यावर आला. बाळाजी विश्वनाथानें धनाजी जाधवास ताराबाईचे पक्षांतून फोडून शाहूचे बाजूस आणिलें. राज्यावर हक्क

कोगाचा या प्रश्नापेक्षां मराठी राज्याचा निभाव पुढें कसा करावयाचा या प्रश्नास जास्त महत्त्व आलें. स्वतः शाहू कलहप्रिय नसून समजूतदार होता. त्यानें रामचंद्रपंताची लायकी व कामगिरी ओळखून त्यास आपल्याकडे येण्याची विनंती केली. त्या वेळीं रामचंद्रपंतानें आपल्या मागण्या स्पष्टपणें शाहूस लिहून कळविल्या आणि शाहूनें त्या स्वहस्ताक्षरानें मान्य करून दिल्या, तो कागद अमात्य दप्तरांत आहे. त्या कागदांत बाळाजी विश्वनाथानें आपल्या हाताखालीं वागून राज्यकारभारास मदत करावी असा उल्लेख आहे. तथापि ताराबाईनें आपला दुराग्रह न सोडतां शाहूशीं युद्ध चालवून निकर आरंभिला. त्यांत रामचंद्रपंताची वृत्ति अगतिक झाली, तेणें करून त्याच्या हातांतला डाव बाळाजी विश्वनाथास प्राप्त झाला. यांतच पेशवाईतील रूपान्तराचें मुख्य बीज आहे.

पण या संशोधनास पार असा कधींच येत नाहीं. नवीन माहिती बाहेर येऊन कांहीं प्रश्नांचा निर्णय होतो, तों दुसरे आणखी ताजे प्रश्न उद्भवतात, असा हा इतिहासाचा प्रपंच सारखा वाढत जाणारा असून तोच कोणत्याही राष्ट्राला भावी उद्योगांत स्फूर्ति देणारा आहे. राष्ट्राचें जीवन पराक्रमावर अवलंबून असतें, हें आरंभींच मीं व्यक्त केलें आहे. शिवाजी महाराजांनीं पराक्रमाच्या जोरावर स्वराज्य स्थापन केलें. ताराबाई, रामचंद्रपंत इत्यादींनीं अशा पराक्रमानेंच त्या स्वराज्याचा अत्यंत संकटावस्थेंत बचाव केला. या पराक्रमाला संघशक्तीची किंवा शिस्तीची जोड असली कीं अडचणींचा निरास होऊन राष्ट्राचा भाग्योदय होतो. हा सिद्धांत प्रत्यक्ष कालीदासांनीं देखील हजारों वर्षांपूर्वी जाहीर केलेला आहे. ते म्हणतात,

"सम्यक् प्रयोगादपरिक्षतायां नीतौ त्रिवर्गस्तदुभूलेन संपत्" *

नीतीला म्हणजे न्यायी वर्तनाला पराक्रमाचें साह्य यथायोग्य मिळालें म्हणजे भाग्योदय होतो. मात्र ही नीति भ्रष्ट न झाली पाहिजे. ही आपली प्राचीन इतिहासाची शिकवण आपणांस लाभो अशी आशा व्यक्त करून मी हें भाषण संपवितों.

---

* कु. सं. १–२२.

सद्गृहस्थहो ! स्वीकृत विषयाची मर्यादा येथेंच संपते. शिवशाही व पेशवाई यांचा संधिकाल ऐतिहासिक दृष्ट्या किती अभ्यसनीय आहे, शिवशाहींतील उत्तमोत्तम तत्त्वें लयास जाऊन पेशवाईत नवीन मनु कां व कसा सुरू झाला, त्यांत चालकांचा दोष किती आणि परिस्थितीची जबाबदारी किती, प्रत्यक्ष शाहू, बाळाजी विश्वनाथ, रामचंद्रपंत, ताराबाई इत्यादि व्यक्तींच्या स्वभावाचा व वागणुकीचा भावी राजकारणावर काय परिणाम झाला अशा कित्येक प्रश्नांचा उहापोह अद्यापि व्हावयाचा आहे. या कार्यासाठीं उपलब्ध साहित्याची मांडणी मी आपल्या पुढें ठेविली आहे, त्यावरून प्रस्तुतचें इंग्लंड-हिंदुस्थानचें राजकारण व पूर्वीचें मोगल-मराठ्यांचें राजकारण यांत पुष्कळसें साम्य आपणास आढळून येईल. अद्यापि या विवेचनास लागणारें साहित्य फार अपुरें आहे. जें काय आज सांपडतें तें फक्त सर जदुनाथ सरकारांनीं औरंगजेब चरित्राच्या शेवटच्या भागांत गोवलेलें तेवढेंच बहुमोल आहे. त्या बादशहाच्या शेवटच्या पांचचार वर्षांतले पुष्कळसे कागद तत्कालीन उर्दू किंवा फारशी समजांत असूं शकतील, ते प्रसिद्ध झाल्यास आपणास मराठ्यांच्या इतिहासांतील या महत्त्वाच्या घडामोडींची नवीन मुद्देसूद रचना करितां येईल. बादशाही अखबारा उपलब्ध आहेत त्यांचा सूक्ष्म अभ्यास झाला पाहिजे.

सूचि

अकबर–औरंगजेबपुत्र २२, संभाजीचा आश्रय २३; हीनास्थिति २४; इराणास प्रयाण, मृत्यु २६; बादशहास पत्र कानउघाडणीचें २७.

अफझलखान–११; वध १४.

औरंगजेब–महाराष्ट्रावर स्वारी २३; विजापुर स्वारी २९; संभाजीचा वध ३०–३२; मृ. ३३; सत्ता व दुराग्रह ३५; किल्यांचा दुराग्रह व अखेर ३९-४१; पराक्रमी सरदार पदरीं ४२; संताजीच्या खुनाचा संतोष ४७; शाहूची तजवीज ५०, व ६१-६२

कविकलश–पूर्ववृत्त २०-२१; योग्यता २८; मुद्रा व किताब २९.

जिनाबाई–जन्म ५; विवाह; मोंगलांकडे कैद ९.

झुल्फिकारखान–३८; ५०.

ताराबाई–४८, राज्यावर हक्क ६२.

दादाजी कोंडदेव–७, ८, मृ. ११.

दुर्गादास–२२–२३.

धनाजी जाधव–३४, ३७; शिर्स्तीत दिलाई ३८; ४१.

परशुरामपंत प्रतिनिधि–४०, ४१.

प्रल्हाद निराजी–३४; मृ. ३७.

बाळाजी विश्वनाथ–४०, सरसुभेदारी ५१, सिंहगड लढविणें ५२; बादशहाकडे संधान ५६.

मराठशाही–काल विभाग २; धर्मोच्छेद ५; संकटांतील उत्कर्ष ३३-३५; अभिमानास्पद पराक्रम ३६-३७; राष्ट्रीय कामगिरी ४२-४३; ऐतिहासिक ऊहापोह ६३-६४.

येसूबाई–३४; दैन्यावस्था ९९.

राजाराम–जिंजीस प्रयाण ३४; कर्तृत्व स्वभाव ३६; मृ. ३९ व ४७-४८; बायका मुलें ४८.

रामचंद्रपंत अमात्य–३४, कर्तृत्व ३७; ४१; शाहूशीं बोलणें ६३.

रायभानजी काका–५१, ५९.

शंकराजी नारायण–३४, ३७; ४०; ४१.

शहाजी–विवाह ६; कर्तव्याची मर्यादा ९; श्रीरंगरायाशीं स्नेह १०; कैद ११.

शाहू–४९, पारिस्थिति ५३-५४; दुहेरी वर्तन ५७; मुसलमानी दीक्षेची जबरदस्ती ५८; लग्न ९९; सुटकेचे प्रयत्न ६०; सुटका ६२; बाळाजीचा पुरस्कार ६३.

शिवाजी–जन्म ९; औरंगजेबाशीं स्पर्धा ६; लहानपण, शिवापुर, शिवापट्टण ७; शिक्षण ८; बापाशीं मतभेद १०; सोनोपंत डाबिराचा उपदेश १२; उद्योगाचा आरंभ सिंहगड १३; दशक काल व पराक्रम कला १४; १५; खेदजनक अंत १६; योग्यतेचा अंदाज १७; संभाजी पुढें कुंठित १९.

संताजी घोरपडे–३४, शिस्त ३७, राजारामाशीं विरोध ३८-३९, बाहशहाच्या तक्तूंचे कळस आणले ४१; सर्जाखानाचा व कासीमखानाचा पाडाव ४३; धनाजीशी वैर, लढाई व खून ४४–४७.

संभाजी–स्वभाव व राज्यारोहण २०; संस्कृत काव्यांची स्फूर्ति २१; पोर्तुगीझांशीं युद्ध २९; संशीचा दुरुपयोग २९; कैदेचे हाल व भयानक मृत्यु ३०-३२.

सिंहगड–११–१२, १३; ४०; बाक्षिदांबक्ष ९२.

(3)

HC.1.23(II)
15000

Health Bulletin No. 23.

HEALTH BULLETIN



THE NUTRITIVE VALUE OF INDIAN FOODS AND THE PLANNING OF SATISFACTORY DIETS

Pht·3

(REVISED AND ENLARGED)

1938.

PUBLISHED BY THE MANAGER OF PUBLICATIONS, DELHI.
PRINTED BY THE MANAGER, GOVERNMENT OF INDIA PRESS, SIMLA.
1939

Price: Annas 2 or 3d.

641.1 0954
Hew/NW

List of Agents in India from whom Government of India Publications are available.

(a) Provincial Government Book Depots.

Assam :—Superintendent, Assam Secretariat Press, Shillong.
Bihar :—Superintendent, Government Printing, P. O. Gulzarbagh, Patna.
Bombay :—Superintendent, Government Printing and Stationery, Queen's Road, Bombay.
Central Provinces :—Superintendent, Government Printing. Central Provinces, Nagpur.
Madras :—Superintendent, Government Press, Mount Road, Madras.
North-West Frontier Province :—Manager, Government Printing and Stationery, Peshawar.
Orissa :—Press Officer, Secretariat, Cuttack.
Punjab :—Superintendent, Government Printing, Punjab, Lahore.
Sind :—Manager, Sind Government Book Depot and Record Office, Karachi (Sadar).
United Provinces :—Superintendent, Printing and Stationery, U. P., Allahabad.

(b) Private Booksellers.

Advani & Co., The Mall, Cawnpore.
Aero Stores, Karachi.*
Army Musketry Stores, Moga (Punjab)†
Banthiya & Co., Ltd., Station Road, Ajmer.
Bengal Flying Club, Dum Dum Cantt.*
Bhawnani & Sons, New Delhi.
Bombay Book Depot, Charni Road, Girgaon, Bombay.
Book Company, Calcutta.
Booklovers Resort, Taikad, Trivandrum, South India.
British Book Depot, Lucknow.
British Book Depot, Risalpur.
British Stationery Mart, Booksellers, Peshawar Cantt.
Buckingham & Co., Booksellers and Stationers, Greenwood Street, Sialkot City.
Burma Book Club, Ltd., Rangoon.
Cambridge Book Co., Booksellers, New Dak Bungalow Road, Patna.
Chandrakant Chiman lal Vora, Ahmedabad.
Chatterjee & Co., 3, Bacharam Chatterjee Lane, Calcutta.
Chiney & Sons, Booksellers, etc., Dhantoli, Nagpur, C. P.
Chukervertty, Chatterjee & Co., Ltd., 13, College Square, Calcutta.
Das Gupta & Co., 54/3, College Street, Calcutta.
Dastane Brothers, Home Service, 456, Raviwar Peth, Poona 2.
Delhi and U. P. Flying Club, Ltd., Delhi.*
Deshmukh Book Depot. Station Road, Sholapur.
English Book Depot, Ferozepore.
English Bookstall, Karachi.
English Book Depot, Taj Road, Agra.
English Book Store, Abbottabad, N.-W. F. P.
Faqir Chand Marwah, Peshawar Cantt.
Higginbothams, Madras.
Hindu Library, 137/F, Balaram De Street, Calcutta.
H. L. College of Commerce, Co-operative Stores, Ltd., Ahmedabad.
Hyderabad Book Depot, Chaderghat, Hyderabad (Deccan).
Ideal Book Depot, Rajpur Road, Dehra Dun, and Bombay Bazar, Meerut.
Imperial Book Depot and Press, near Jama Masjid, (Machhliwalan), Delhi.
Imperial Publishing Coy., Lahore.
Indian Army Book Depot, Dayalbagh, Agra.
Indian Army Book Depot, Daryaganj, Delhi.
Indian School Supply Depot, Central Avenue South, P. O. Dharamtala, Calcutta.
International Book Service, Poona 4.
Jaina & Bros., Mori Gate, Delhi and Connaught Place, New Delhi, Messrs. J. M.
Joshi, News Agent, Devgad Baria, *via* Piplod, Bombay, Mr. V. G.
Kamala Book Depot, 15, College Square, Calcutta.
Kansil & Co., 9, Commercial Buildings, The Mall, Lahore, Messrs. N. C.
Karnataka Sahitya Mandir, Dharwar (S. India).
Keale & Co., 65, Britto Road, Karachi Sadar.
Kitabistan, 17-A, City Road, Allahabad.
Krishnaswami & Co., Teppakulam P. O., Trichinopoly Fort, Messrs. S.
Lahiri & Co., Ltd., Calcutta, Messrs. S. K.
London Book Co. (India), Arbab Road, Peshawar, Murree, Nowshera, Rawalpindi.
Lyall Book Depot, Lyallpore.
Malhotra & Co., Post Box No. 94, Lahore, Messrs. U. P.
Mathur & Co., Messrs. B. S., Chatur-Vilas, Paota, Civil Lines, Jodhpur (Rajputana).
Minerva Book Shop, Anarkali Street, Lahore.
Modern Book Depot, Bazar Road, Sialkot Cantt.
Mohanlal Dosabhai Shah, Rajkot.
Mohan News Agency, Kotah (Rajputana).
Firstly the Hindus must consider whether it is sufficient to take the placid view of the anthropologist that there is nothing to be said about the beliefs, habits, morals and outlooks on life which obtain among the different peoples of the world except that they often differ; or whether it is not necessary to make an attempt to find out what kind of morality, beliefs, habits and outlook have worked best and have enabled those who possessed them to flourish, to go strong, to people

the earth and to have dominion over it. As is observed by Prof. Carver "Morality and religion as the organised expression of moral approval and disapproval must be regarded as factors in the struggle for existence as truly as are weapons for offence and defence, teeth and claws, horns and whoops, furs and feathers. The social group, community, tribe or nation which develops an unworkable scheme of morality or within which those social acts which weaken it and unfit it for survival, habitually create the sentiment of approval, while those which would strengthen and enable it to be expanded habitually create the sentiment of disapproval, will eventually be eliminated. It is habits of approval or disapproval (these are the results of religion and morality) that handicap it as really as the possession of two wings on one side with none on the other will handicap the colony of flies. It would be as futile in the one case as in the other to argue, that one system is just as good as another." Morality and Religion therefore are not mere matters of likes and dislikes. You may dislike exceedingly a scheme of morality, which if universally practised within a nation would make that nation the strongest nation on the face of the earth. Yet in spite of your dislike such a nation will become strong. You may like exceedingly a scheme of morality and an ideal of justice which if universally practised within a nation would make it unable to hold its own in the struggle with other nations. Yet in spite of your admiration this nation will eventually disappear. The Hindus must therefore examine their religion and their morality in terms of their survival value.

Secondly the Hindus must consider whether they should conserve the whole of their social heritage or select what is helpful and transmit to future generations only that much and no more. Prof. John Dewey, who was my teacher and to whom I owe so much has said " Every society gets encumbered with what is trivial, with dead wood from the past, and with what is positively perverse.....As a society becomes more enlightened, it realizes that it is responsible *not* to conserve and transmit the whole of its existing achievements, but only such as make for a better future society." Even Burke in spite of the vehemence with which he opposed the principle of change embodied in the French Revolution was forced to admit that "A state without the means of some change is without the means of its conservation. Without such means it might even risk the loss of that part of the constitution which it wished the most religiously to preserve." What Burke said of a state applies equally to a society.

Thirdly the Hindus must consider whether they must not cease to worship the past as supplying its ideals. The baneful effect of this worship of the past are best summed up by Prof. Dewey when he says "an individual can live only in the present. The present is not just something which comes after the past; much less something produced by it. It is what life is in leaving the past behind it. The study of past products will not help us to understand the present. A knowledge of the past and its heritage is of great significance when it enters into the present, but not otherwise. And the mistake of making the records and remains of the past the main material of education is that it tends to make the past a rival of the present and the present a more or less futile imitation of the past." The principle, which makes little of the present act of living and growing, naturally looks upon the present as empty and upon the future as remote. Such a principle is inimical to progress and is an hindrance to a strong and a steady current of life.

Fourthly the Hindus must consider whether the time has not come for them to recognize that there is nothing fixed, nothing eternal, nothing *sanatan;* that everything is changing; that change is the law of life for individuals as well as for society. In a changing society there must be a constant revaluation of old values and the Hindus must realize that if there must be standards to measure the acts of men there must also be a readiness to revise those standards.

XXVI

I have to confess that this address has become too lengthy. Whether this fault is compensated to any extent by breadth or depth is a matter for you to judge. All I claim is to have told you candidly my veiws. I have little to recommend them but some study and a deep concern in your destiny. If you will allow me to say, these views are the views of a man who has been no tool of power, no flatter of greatness. They come from one, almost the whole of whose public exertion has been one continuous struggle for liberty for the poor and for the oppressed and whose only reward has been a continuous shower of calumny and abuse from national journals and national leaders for no other reason except that I refuse to join with them in performing the miracle—I will not say trick—of liberating the oppressed with the gold of the tyrant and raising the poor with the cash of the rich. All this may not be enough to commend my views. I think they are not likely to alter yours. But whether they do or do not, the responsibility is entirely

yours. You must make your efforts to uproot Caste, if not in my way, then in your way. I am sorry I will not be with you. I have decided to change. This is not the place for giving reasons. But even when I am gone out of your fold, I will watch your movement with active sympathy and you will have my assistance for what it may be worth. Yours is a national cause. Caste is no doubt primarily the breath of the Hindus. But the Hindus have fouled the air all over and every body is infected, Sikh, Muslim and Christian. You therefore deserve the of support all those who are suffering from this infection, Sikh, Muslim or Christian. While your cause is thus a national cause, it is more difficult than the other national cause, namely Swaraj. In the fight for Swaraj, you fight with the whole nation on your side. In this, you have to fight against a whole nation and that too, your own. But it is more important than Swaraj. There is no use having Swaraj if you cannot defend it. More important than the question of defending Swaraj is the question of defending the Hindus under the Swaraj. In my opinion only when Hindu Society becomes a castless society that it can hope to have strength enough to defend itself. Without such internal strength, Swaraj for Hindus may turn out to be only a step towards slavery. Good bye and good wishes for your success.

Rajagraha,
Dadar, Bombay-14.

भावनगर संस्थानांतील

शेतकऱ्यांचें ऋणविमोचन

Debt redemption of Agricult

of Ita Bhavnagar State

WITH COMPLIMENTS
OF
SIR PRABHASHANKAR D. PATTANI,
K. C. I. E.,
PRESIDENT, STATE COUNCIL,
BHAVNAGAR

c/o Kamkrishna Printing Pr
Tribhovan Road, Bombay

for favour of review

भावनगर संस्थानांतील

शेतकऱ्यांचें ऋणविमोचन

Pht. 5

Sunitabai Tikekar

GOD MAR
332.71 095479
Bha/Bha

श्री. बी. जी. गंडभीर, यांनी पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस, सूर्य महाल, ठाकुरद्वार, मुंबई नं. ४. येथे छापिलें,

व

श्री. एन्. एम्. सुरती, यांनी भावनगर स्टेट साठीं भावनगर येथें प्रसिद्ध केलें.

प्रस्तावना

अलीकडे शेती व शेतकरी यांचेकडे वाढत्या प्रमाणांत लक्ष्य दिलें जात आहे. शेती कशी सुधारेल, शेतकऱ्याची स्थिति कशी सुधारेल, एकंदरींत खेडेगांवचें जीवन कसें सुधारेल, हे प्रश्न सरकार व जनतेचे पुढारी या दोघांनींहि सोडवण्याचा प्रयत्न चालवलेला आहे. शेतकऱ्याची स्थिति सुधारावयाची असल्यास प्रथम तो कर्जाच्या बंधनांतून मुक्त झाला पाहिजे. हल्लींचे गव्हर्नर-जनरल लॉर्ड लिनलिथगो शेतकऱ्यांसाठीं कांहींना कांहीं करायचें म्हणून धडपडत आहेत. महात्मा गांधीहि ग्रामोद्योगसंघाच्याद्वारें खेडुतांची स्थिति सुधारण्यासाठीं झटत आहेत. या दोघांच्या प्रयत्नांमुळें अनेकांना या कार्यासंबंधीं आस्था वाटूं लागली आहे आणि या प्रश्नाचा अभ्यास करून शक्य ती मदत आपण या कामीं करावी असे विचार त्यांच्या मनांत घोळूं लागले आहेत. या प्रश्नाचें सूक्ष्म अवलोकन ज्याला करावयाचें असेल त्याला मार्ग दाखवण्यासाठीं भावनगर संस्थानांतील शेतकऱ्यांचें ऋणविमोचन कसें झालें यासंबंधींचा जो रिपोर्ट संस्थाननें इंग्रजींत प्रसिद्ध केला त्याचें मराठींत रूपांतर करण्याचा या पुस्तकांत प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्र, वऱ्हाड व मध्यप्रांत या प्रांतांतील जिज्ञासु नागरिकांना हें पुस्तक वाचून कांहींतरी फायदा होईल अशी आशा आहे. भावनगर हें लहानसें संस्थान आहे, हिंदुस्थानचा एक कोंपरा आहे; पण त्या कोंपऱ्यांत ऋणविमोचनाचा प्रयोग यशस्वी रीतीनें करण्यांत आला आहे आणि सर्व हिंदुस्थानांतील जिज्ञासूंना अंधारांतील लांवण दिव्यासारखा त्याचा उपयोग झाल्याशिवाय रहाणार नाहीं. शेतकऱ्यांचें ऋणविमोचन हा प्रश्न प्रचंड व बिकट आहे; पण भावनगरमधील हा यशस्वी प्रयोग असें दाखवतो कीं हा प्रश्न माणसाच्या शक्तीच्या बाहेरचा नाहीं. जिज्ञासूंकडून या पुस्तकाचा योग्य परामर्श घेतला जाईल अशी आशा आहे.

नटवरलाल एम्. सुरती

१ आगष्ट १९३६

रेव्हेन्यू कमिशनर, भावनगर संस्थान.

नं. १९५
१९३४

हिज हायनेस महाराजा

श्री कृष्णकुमारसिंहजी रावळ, भावनगरचे महाराज यांचे हुजुरास.

सेक्रेटॅरिएट, भावनगर.

ता. २३ एप्रिल १९३४

सरकारांचे सेवेसीं,

भावनगर संस्थानच्या खेडुतांच्या ऋणविमोचनाचे परिणाम काय झाले याबद्दलचा रेव्हेन्यु खात्याचा रिपोर्ट यासोबत महाराजांचे चरणीं सादर केला आहे. त्यालाच मी स्पष्टीकरणार्थ थोडासा मजकूर जोडला आहे.

या योजनेला जें कांहीं यश आलें आहे तें मुख्यत्वेंकरून महाराजांना आपल्या प्रजेच्या हितासंबंधीं कळकळ वाटते तिजमुळेंच आलें.

महाराजांचा अत्यंत नम्र सेवक

पी. डी. पट्टणी

अध्यक्ष, भावनगर स्टेट कौन्सिल.

नं. २२

१९३४

नटवरलाल माणेकलाल सुरती, बी. ए. एलएल बी.,

रेव्हेन्यू कमिशनर, भावनगर संस्थान, यांचेकडून

सर प्रभाशंकर पट्टणी, के. सी. आय्. ई.,

अध्यक्ष, भावनगर स्टेट कौन्सिल, यांचे हुजुरास.

महाराज,

शेतकऱ्यांच्या ऋणविमोचनाची योजना प्रथम लिलिया महालांत लागू करण्यांत आली त्याला आतां चार वर्षे होऊन गेलीं. जो प्रयोग मुख्यत्वेंकरून आपण सुरू केला व आपल्याच देखरेखीखालीं जो चालू आहे तो यशस्वी रीतीनें पुरा होण्याच्या मार्गांत आहे आणि संस्थानचे सर्व भाग त्या योजनेखालीं आले आहेत हें कळविण्यास मला अत्यंत आनंद वाटतो.

आपल्या इच्छेस अनुसरून मी एक रिपोर्ट तयार केला आहे, त्या रिपोर्टांत भावनगर खेडुत कर्ज चौकशी कमिटीनें केलेली चौकशी व केलेले निर्णय यांचा सारांश, आणि त्या कमिटीच्या शिफारशींस अनुसरून ऋणविमोचनाची योजना कशी अमलांत आणली याची थोडक्यांत हकीकत दिलेली आहे. यासोबत तो रिपोर्ट मी आपल्याकडे पाठवीत आहे आणि आपण तो आपल्या मर्जीप्रमाणें महाराज सरकारांकडे सादर करावा अशी माझी विनंती आहे.

या योजनेचा ज्यावेळीं थोडा थोडा अंमल होऊं लागला त्यावेळीं ही योजना अमलांत आणण्याचें काम ज्यांचेकडें होतें त्यांना आपल्या हातचें काम कधींतरी पुरें होईल किंवा नाहीं अशा शंका मधून मधून येत असत. आपण तिसऱ्या राऊंड टेबल कान्फरन्सच्या कामासाठीं इंग्लंडमध्यें गेलां होतां त्या मुदतीत मी आपणास १९३२ च्यां आक्टोबरमध्यें एक पत्र लिहिलें त्यांत पुढील मनोगत मी व्यक्त केलें:—

> " महाराज, आपल्याला या विषयाची जी सारखी तळमळ लागून राहिली आहे ती मला शब्दांत व्यक्त करतां येत नाहीं. भावनगर संस्थानांतील शेतकऱ्यांना एकजात ऋणमुक्त करण्याचा हा साहसी कार्यक्रम जो आपण हातीं घेतला तो पूर्ण विचार करून आणि हा कार्यक्रम न्यायाचा आहे अशी खात्री करून घेतल्यानंतरच होय. आणि अशा तऱ्हेनें हातीं घेतलेल्या कार्यक्रमापासून आपण मागें फिराल अथवा रतिभर ढळाल अशांतले आपण नाहीं. पण माझें स्वतांचें मनोगत आपणांस सांगावेंसें वाटतें. हें काम अजस्र आहे, लिलिया महालांत ज्या खेडुतांशीं गांठ पडते त्यांच्यासारख्या खेडुतांच्या अंगीं कायद्यासंबंधी बेपर्वाई आहे, कांहीं सावकार अत्यंत तीव्र व बिनशर्त विरोध करीत आहेत, ज्यांनीं माहिती करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे आपलेच मित्र व सहकारी केवळ अज्ञानानें विध्वंसक टीका करीत आहेत—हे सर्व प्रकार पाहिले ह्मणजे अंतर्यामीं धागधूग वाटते, मनांत शंकाकुशंका उत्पन्न होतात. सोबत एक वर्तमानपत्रांतला उतारा मी पाठवीत आहें त्यांतलीं मतें व विचार वाचून अशा शंकामय अवस्थेंत मला धीर येतो, कारण आमचा कार्यक्रम योग्य व शहाणपणाचा आहे अशी त्या उताऱ्यांत अगदीं तिऱ्हाइतानें साक्ष दिली आहे. "

हा उतारा बंगाल नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्सचे प्रेसिडेंट आणि बँकिंग इन्क्वायरी कमीटीचे सभासद श्री. नलिनी रंजन सरकार यांनीं कलकत्ता युनिव्हर्सिटी इन्स्टिटयूटपुढें जें भाषण केलें त्यामधला आहे. आपल्याला कदाचित हें स्मरतहि असेल. अखिल हिंदुस्थानच्या ऋणबद्ध शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठीं तावडतोब योजना केली पाहिजे अशी त्यांत जोरदार शब्दांत सूचना केलेली आहे.

माझ्या पत्राला आपण जें आपल्या स्वभावानुरूप उत्तर लंडनहून पाठविलें त्यांतून पुढील महत्त्वाचे उतारे याठिकाणीं उद्धृत करण्याची मी परवानगी घेतोः—

"भावनगरमध्यें सुरू केलेल्या प्रयोगाला विरोध चालू असतांना आपणांस शंका वाटावी हें स्वाभाविक आहे. पण पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें माझी अशी खात्री झाली आहे कीं या मंदीच्या व आर्थिक दुरवस्थेच्या कालांतून तसेंच असंतोषाच्या लाटेंतून ब्रिटिश हिंदुस्थान व देशी राज्यें यांना शांतपणें व धडपणें पार पडावयाचें असेल तर भावनगरमध्यें जी योजना केली तशी योजना करूनच तारूं सुरक्षितपणें बंदरांत नेतां येईल. कायद्यासंबंधीं खेडुत बेपर्वाई दाखवतात याचें कारण त्यांचें अज्ञान. सावकार बिनशर्त विरोध करतात याचें कारण त्यांचा स्वार्थीपणा. आपलेच मित्र आपल्या कार्याबद्दल टीका करतात याचें कारण त्यांच्या मैत्रीचा सदोषपणा असेल. आपल्याकडे सर्वांचे डोळे लागून राहिले आहेत. आपल्या यशावर हिंदुस्थानचें भविष्य अवलंबून आहे. आपलें संस्थान लहान आहे. हिंदुस्थान विशाल आहे. त्याच्या एका कोंपऱ्यांतला हा प्रयोग कितीहि चिमकुला असला तरी या प्रयोगांत बीज आहे, या बीजाचा रोप झाला तर तो अनेकांचें लक्ष ओढून घेईल. सद्धेतूनें प्रेरित झालेले अनेक अंमलदार व राजे या प्रयोगाचा सत्कार करतील. अपेश आलें तरी सुद्धां मला वाईट वाटणार नाहीं कारण चांगलें कार्य करतांना येणारें हें अपेश आहे. पण अपेश येईल असें मला वाटतच नाहीं. इतरांचें अज्ञान, स्वार्थीपणा, मित्रत्वाचा अभाव–या सर्वांमुळें आपण आपली कमर जोरानें कसूं आणि यशप्राप्तीसाठीं ज्यास्त धैर्यानें झटूं. आपण रेव्हेन्यु कमिशनर आहांत आपणावर मी अवलंबून आहें. आपल्या हाताखालचे अंमलदार संस्थानचे एकनिष्ठ वहिवाटदार यांचेवर मी विसंबून राहिलों आहें. आपण जर माझ्या हृदयांत शिराल आणि एवढ्या कामाकरतां मला आपलें तनमन द्याल तर मी आपणांस खात्रीलायक आश्वासन देतों कीं विरोधक शक्तींचा पाडाव होईल व दलित दुःखित शेतकऱ्यांना उबारा देण्याकरतां यशाचा सूर्य उगवेल. शेतकऱ्यांना प्रकाश दिसला ह्मणजे तेच आपणां सर्वांना शक्तिमान् करतील. माझ्या मनांत पुनः पुनः जो विचार येत असतो तो हाच कीं शेतकरी ह्मणजे राज्य आणि राजा ह्मणजे शेतकऱ्यांचा पिता होय. गोल्ड्स्मिथ कवीच्या 'डिझर्टेड व्हिलेज' (निर्जन ग्राम) या काव्यांतील पुढें दिलेल्या ओळींची मी आपणास आठवण देतों. कवि ह्मणतोः —

पावोत वृद्धि अथवा क्षय ते राजे तसेच अधिराजे।
आतांहि यथापूर्व शब्दें येतील निर्मितांना जे॥
परि शूर वीर शेती निजदेशा गर्वहेतु, नित नाहीं।
झाल्यास नष्ट सकृदपि जागा भरणें न शक्य केल्हांहि॥

" Princes and Lords may flourish or may fade;
A word can make them as a word hath made;
But a bold peasantry, their country's pride;
When once destroyed, can never be supplied."

या पेक्षां अधिक मला लिहावयाचें नाहीं. मी हें पत्र फक्त आपणांस उत्तेजन देण्यासाठी लिहीत आहें, कारण तुम्ही खचलांत–माझे हात (ह्मणजे रेव्हेन्यु खातें) खचले–तर माझी काय अवस्था होईल ? एकटा मनुष्य सगळ्या शेतकऱ्यांना कसा पुरणार ? "

आज, ह्मणजे प्रयोग सुरु होऊन चार वर्षे झाल्यानंतर, हा अपूर्व प्रयोग यशस्वी रीतीनें पुरा झाला याचें बहुतेक सर्व श्रेय आपलेकडे आहे. आपला आत्मविश्वास कधींहि ढळला नाहीं तर सदा उज्ज्वल राहिला. ही योजना तपशीलवार अमलांत आणण्याचें प्रत्यक्ष काम ज्यांचेवर पडलें होतें त्यांना आपण उदार अंतःकरणानें उत्तेजन देत होतां आणि आपला पाठिंबा त्यांना अव्याहत मिळत होता ह्मणूनच ही योजना यशस्वी झाली. "

अखेरीस ऋणविमोचन कमिट्यांच्या सर्व नोकरांबद्दल—ह्मणजे अंमलदार व कारकून यांचे-बद्दल—गौरवाचे दोन शब्द मला लिहिले पाहिजेत. सावकारांच्या चोपड्या तपासून त्यांतले खरेखोटे हिशोब वेंचण्याचें काम किती कंटाळवाणें आणि श्रमाचें आहे हें आपल्यापेक्षां कोणीच ज्यास्त चांगल्या प्रकारें जाणत नाहीं. आमच्या सुदैवानें आमच्या कमिट्यांच्या नोकरवर्गांत या कामासंबंधीं विशेष लायकी धारण करणारे व जरूर त्या शिक्षणानें तरबेज झालेले इसम होते. त्यांनीं आपलें काम धिम्मेपणानें, आळस न करतां, प्रामाणिकपणें व उत्साहानें केलें आणि योजनेच्या यशाचा बराच भाग त्यांच्यामुळेंच लाभलेला आहे.

हुजुरांचा नम्र सेवक

नटवरलाल एम्. सुरती

रेव्हेन्यु कमिशनर, भावनगर संस्थान.

अनुक्रमणिका

———:०:———

प्रकरण		पृष्ठ
	सर प्रभाशंकर पट्टणी, के. सी. आय्. ई., भावनगर स्टेट कौन्सिलचे प्रेसिडेंट यांनीं लिहिलेला पुरस्कार	१
१	**खेडुत कर्ज चौकशी कमिटीची प्राथमिक पहाणीः—** खेडुत-कर्ज-चौकशी कमिटीची नेमणूक–अध्यक्षांचा प्राथमिक दौरा–व्यापक चौकशीसंबंधींचा ठराव–कमिटीनें माहिती कशी मिळवली–कर्जबाजारी शेंकडा पंचेचाळीस–पत नाहीं ह्मणून कर्ज नाहीं–जमीनमहसूल आणि कर्ज यांचें प्रमाण–कर्जबाजारीचीं खरीं व मानीव कारणें–सावकारांच्या इरसाल क्लृप्त्या–कांहीं वेंचक दाखले–रोकडीच्या फेडींत कापूस-खेडुतास लागणारी पैशाची गरज–अटक अथवा दंड–सावकारीचा दुरुपयोग–कडारा ह्मणजे काय–जलप ह्मणजे काय–कोर्टांचा सावकाराकडून दुरुपयोग–शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या–सावकारांना आश्वासन देऊन माहिती मिळविली–कर्ज फुगवण्याच्या युक्त्या–एकांच पद्धतीनें हिशोब ठेवण्याची सक्ती–एकदांचा ऋणको कायमचा ऋणको–सार्वत्रिक जबर व्याज–शेतीमधील नक्त फायदा–खेडुताचे करुणाजनक प्रयत्न.	५–१८
२	**(अ) कमिटीच्या शिफारशी** **(ब) ऋणविमोचनासाठीं केलेले उपायः—** तावडतोब उपाययोजना करण्याची अवश्यकता–कायद्याचा अपुरेपणा–अगोदर ऋणविमोचन–ऋणविमोचनाची योजना	१९–२१
३	**ऋणविमोचनाच्या योजनेचा प्रत्यक्ष अंमलः—** योजना प्रथम पांचतळावडा टप्यांत लागू केली–इतर महालांत योजना लागू केली–कमिटीच्या निकालाचीं पत्रकें–आंकड्यांतील विसंगति–कर्जाचा मोघम अजमास निरुपयोगी ठरतो–कर्जाचें महसुलाशीं प्रमाण–ऋणविमोचन एक अपूर्व प्रयोग–कर्जापायीं शेतीची खराबी–औदासीन्य अयोग्य आहे–ऋणविमोचन व ग्रामोद्धार–कर्जाची फेड न करणें–कृतीचा अभाव–सहकारी चळवळींतील विघ्न-सहकारी पतपेढ्यांचें यश–सलोख्यानें ऋणविमोचन–द्यावयाच्या रकमेची मर्यादा–ऋणविमोचनाला अनुकूल समय–खेडुताची पत वाढेल–सावकाराची उचलबांगडी नव्हे–सावकारांचे हितसंबंध सुरक्षित–ऋणविमोचनाचे परिणाम–संशयपूर्ण भविष्य–व्याजाचा बोजा कमी झाला–जमीनमहसुलाची वसुली–खेडुतांची कृतज्ञता–कर्जबाजारी रोग व लक्षण	२२–३४

प्रकरण		पृष्ठ.
४	**ग्रामपंचायत**	
	ग्रामपंचायतः पूरकयोजना—ग्रामपंचायतीचे उद्देश.	३५–३६

परिशिष्टें

परिशिष्ट		पृष्ठ.
१	भावनगर संस्थानांतील कर्जाचा बोजा व जमीनमहसुलाचा बोजा यांबद्दलचें तुलनात्मक पत्रक	३८–३९
२	खेडुतांच्या ऋणबद्धतेचें वर्गीकरण	४१–४४
३	खेडुत–संरक्षक कायदा	४५–५०
४	खेडुतऋणविमोचनाची योजना	५१–५३
५	ग्रामपंचायतीसंबंधीं नियम	५४–५८
६	सरकारी भाषणांतील उतारे वगैरे	
	(१) सर प्रभाशंकर पट्टणी यांच्या भाषणांतील उतारा	५९
	(२) दिवाणबहादूर त्रिभोवनदास त्रिवेदी यांच्या मिनिटमधील उतारा	५९
	(३) सर प्रभाशंकर पट्टणी यांच्या भाषणांतील उतारा	६०–६२
७	पत्रव्यवहार	
	(१) मि. विनायक नंदशंकर मेहता आय्. सी. एस्. संयुक्त प्रांत सरकारचे सेक्रेटरी यांचें पत्र	६३
	(२) सर प्रभाशंकरजींनीं मि. मेहता यांस पाठवलेलें उत्तर	६४
	(३) सर प्रभाशंकरजींचें मि. मेहता यांस दुसरें पत्र	६७
	(४) सर प्रभाशंकरजींनीं श्री. गोपाळ कृष्ण देवधर, त्रावणकोर सहकारी चौकशी कमिटीचे अध्यक्ष, यांस पाठविलेलें पत्र	६८
	(५) श्री. गोपाळ कृष्ण देवधर यांनीं भावनगरला भेट दिल्यानंतर सर प्रभाशंकर पट्टणींना पाठवलेलें पत्र	७३
	(६) सर प्रभाशंकर पट्टणी यांनीं त्रावणकोर को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांच्या रजिस्ट्रारचे पर्सनल असिस्टंट श्री. जी. आर. पिल्ले यांस पाठविलेलें पत्र	७४
	(७) बॉम्बे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्लीचे संपादक श्री. वैकुंठ लल्लुभाई मेहता यांच्या पत्रांतील उतारा	७६
८	**हिंदुस्थानांतील एका देशी राज्यांतील शेतकऱ्यांची कर्जबाजारी** (एशिआटिक रिव्ह्यूच्या १९३६ माहे जानेवारीच्या अंकांत प्रसिद्ध झालेला लेख.) लेखक लेफ्टनंट कर्नल ए. एच्. ई. मॉस्, सी. आय्. ई.	७७

परिशिष्ट		पृष्ठ
९	**वृत्तपत्रें व नियतकालिकें यांचे अभिप्राय**	
	(१) भावनगर–शेतकरी ऋणविमोचन एशियाटिक रिव्ह्यू–जानेवारी १९३४	८९
	(२) भावनगर– अलीकडील प्रगति एशियाटिक रिव्ह्यू–जुलै १९३३	९१
	(३) कर्जबाजारीस आळा टाइम्स ऑफ इंडिया–ता. २ फेब्रुआरी १९३२	९२
	(४) खेडेगावांत स्वराज्य युनायटेड इंडिया अँड इंडियन स्टेट्स्–ता. १३ फेब्रुआरी १९३२	९३
	(५) शेतकऱ्यांचें ऋणविमोचन : भावनगरची योजना टाईम्स ऑफ इंडिया–ता. १४ एप्रिल १९३२	९४
	(६) शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणाः भावनगर संस्थानांतील प्रयोग युनायटेड इंडिया व इंडियन स्टेट्स–ता. १४ मे १९३२	९५
	(७) शेतकऱ्यांचें ऋणविमोचन टाइम्स ऑफ इंडिया–ता. २३ जून १९३२	९८
	(८) सर चुनीलाल व्ही. मेहता यांच्या भाषणांतील उतारा.	९९
	(९) भावनगरमधील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा युनायटेड इंडिया अँड इंडियन स्टेट्स्–ता. १२ नोंवेंबर १९३२	९९
	(१०) भावनगर १९३०–३१ साली युनायटेड इंडिया अँड इंडियन स्टेट्स्–ता. २६ नोवेंबर १९३२	१०१
	(११) भावनगर टाइम्स ऑफ इंडिया (सांवत्सरिक) सन १९३३	१०२
१०	**भावनगर संस्थाननें केलेली विलक्षण कामगिरी** लेखकः—ना गो. चापेकर, सरन्यायाधीश संस्थान औंध	१०४

पुरस्कार



कांहीं वर्षांपूर्वी भावनगर संस्थाननें शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीची चौकशी करण्याकरतां एक खास कमिटी नेमली. त्या कमिटीनें केलेल्या तपासामुळें शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती किती गंभीर झालेली होती हें संस्थानच्या नजरेस आलें. शेतकऱ्यांमध्यें मोठ्या प्रमाणांत अशांतता पसरूं नये आणि त्यांनीं दंग्याधोप्यास प्रवृत्त होऊं नये अशी इच्छा असल्यास कर्जांत आकंठ बुडालेल्या आणि दिवाळखोरीच्या खाईंत पडण्याच्या बेतांत आलेल्या शेतकऱ्याला आर्थिक आरोग्य प्राप्त करून देण्यासाठीं कांहीं तरी योजना ताबडतोब केली पाहिजे अशी भावनगर सरकारची बालंबाल खात्री झाली.

संस्थाननें जे उपाय योजले त्यांमध्यें ऋणमुक्ततेची एक योजना होती. मात्र सावकार आणि ऋणको शेतकरी यांच्या संमतीनेंच ती अंमलांत आणावयाची होती. ही योजना प्रसिद्ध झाल्यानंतर सावकार तिच्यापासून होणाऱ्या फायद्यांचा स्वीकार करावयास एकदम पुढें येईनात. पण हळुहळु त्यांना त्या फायद्यांची महती पटूं लागली. कर्जांत आकंठ बुडलेल्या ऋणको शेतकऱ्यांकडून जितकें द्रव्य अनेक वर्षांत बुद्धां वसूल करतां येणार नाहीं तितकें द्रव्य एकदम आणि तेंहि रोकड मिळूं शकतें असें जेव्हां सावकारांना दिसलें तेव्हां हळुहळु ते या योजनेचा फायदा घ्यावयास एकामागून एक सरसावूं लागले.

या योजनेचा अंमल प्रथम लिलिया महालांत सन १९३० च्या एप्रिल महिन्यांत करण्यांत आला. नंतर क्रमशः इतर महालांत तिचा अंमल करण्यांत आला. आतां सबंध संस्थानांत तिची अंमलबजावणी झाली आहे.

सावकारांच्या चोपड्यांवरून पहातां ऋणविमोचन कमिटीला कर्जाची बाकी रु. ८६,३८,८७४ दिसून आली. त्या सर्व म्हणजे दिखाऊ देण्याची तडजोड दरबारनें शेतकऱ्यांच्या वतीनें सावकारांस रु. २०,५९,४७३ देऊन केली.

कर्जांत रुतलेला शेतकरी हिंदुस्थानसारख्या कृषिप्रधान देशांत जावें तेथें दृष्टीस पडतो. प्रांताप्रांतांतील परिस्थितींत कांहीं किरकोळ फेरफार असतील. पण एकंदरींत शेतकऱ्याला कर्ज काढावें लागण्याची कारणें सर्वसाधारणपणें एकच असल्यामुळें या प्रश्नाचीं मुख्य लक्षणें सर्व देशभर सारखींच आहेत. असें असल्यामुळें भावनगर संस्थानांत यशस्वी झालेल्या या प्रयोगाकडे सर्वांचे डोळे लागणें स्वाभाविक आहे व यासंबंधीं अनेक व्यक्तींनीं व संस्थांनीं माझ्याकडे चौकशीहि केली आहे. पण हल्लींच्या या धांदलीच्या युगांत कमिटीनें जमा केलेला विशाळ पुरावा किंवा कमिटीनें तयार केलेला विस्तृत रिपोर्ट वाचावयास लागणारी फुरसद फार थोड्या लोकांना मिळते म्हणून हें लहानसें पुस्तक मुद्दाम तयार केलेलें आहे. कमिटीनें केलेला पूर्वतपास, त्याच्या आधारानें केलेली ऋणविमोचनाची योजना, त्या योजनेचा अंमल आणि नंतर घडलेले व या थोड्या अवधींत दिसून आलेले परिणाम या सर्वांचा थोडक्यांत पण शक्य तितका पूर्ण अहवाल या पुस्तकांत देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

हें छोटें पुस्तक वाचल्यानंतर एकादा अभ्यास् ज्ञानार्थी अथवा व्यासंगी अधिकारी या गुंतागंतीच्या विषयांत खोल शिरण्याची इच्छा करील तर कमिटीनें जमा केलेला पुरावा आणि कमिटीचा रिपोर्ट हीं दोन्हीं पुस्तकें वाचावीं अशी त्याला शिफारस करण्यांत येत आहे.

भावनगर संस्थानच्या योजनेमुळें अनेक व्यक्तींनीं व संस्थांनीं प्रामाणिकपणानें शंका पण प्रदर्शित केल्या. याविषयीं कांहीं चिकित्सक मित्रांशीं माझा जो पत्रव्यवहार झाला तो, अधिकाऱ्यांचीं भाषणें व सरकारी कागदपत्र यांतील वेचक उतारे, आणि निरनिराळ्या बाजूंनीं वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेलीं कांहीं परीक्षणें व टीका—यांचा या पुस्तकांत मुद्दाम समावेश केला आहे. हें सर्व वाचलें असतां या योजनेसंबंधीं सर्व रास्त प्रश्नांना उत्तरें मिळतील आणि योग्य शंकांचें निरसन होईल. शेतकऱ्याची कर्जातून संपूर्ण मुक्तता हें एक नवल व साहस आहे असें झटलें तरी चालेल आणि ह्मणूनच पुष्कळांच्या मनांत निरनिराळया शंका उपस्थित होणें स्वाभाविक आहे.

एकदां कर्जमुक्त झाला तरी शेतकरी पुनः सावकाराच्या जाळयांत सांपडूं शकेल ह्याची दरबारला विस्मृति झालेली नाहीं. कर्जाच्या लालचीनें शेतकऱ्याला आपल्या पाशांत अडकवावयास सावकार टपलेला असणार. अशा पाशापासून शेतकऱ्याला बचावण्यासाठीं संस्थाननें ऋणविमोचनाच्या योजनेबरोबरच शेतकरीसंरक्षक कायदा पास केला. तो कायदा या पुस्तकांत परिशिष्ट तीन ह्मणून दिला आहे.

या दोहोंच्याबरोबर या दोहोंपेक्षांहि ज्यास्त महत्वाची अशी तिसरी योजना दरबारनें केली ती म्हणजे ग्रामपंचायतीची संस्थापना. शेतकऱ्यांच्या जीवनांतील सर्व अंगांचा या योजनेंत परामर्श तर घेतला आहेच, शिवाय खेड्यांतील सामाजिक व्यवस्थेचा पुनर्जन्म या योजनेंत आहे असें म्हणणें रास्त होईल. ही योजना परिशिष्ट पांच म्हणून दिलेली आहे.

या तीनहि योजनांची माहिती या पुस्तकांत दिलेली आहे. या ठिकाणीं त्यांचेबद्दल एक गोष्ट सांगावयाची म्हणजे या तीनहि योजना अन्योन्यावलंबी आहेत. संस्थानची शेंकडा पाउणशें प्रजा शेतकीवर अवलंबून आहे आणि त्या सर्वांची स्थिति सुधारावी व त्यांना थोड्या अधिक प्रमाणांत सुखशांतीचा लाभ व्हावा म्हणून या तीनहि योजनांचा अंमल एकदम करण्यांत आला.

दरबारनें जें ऋणविमोचन घडवून आणलें त्यामुळें आतां कोर्टांत खेडुतांविरुद्ध देण्याघेण्याचे दावे अगर दरखास्त अगर हुकुमनामा असले कांहींहि प्रकार नाहींत असें म्हणतां येईल. कोर्टाचें काम चिंताजनक व खर्चाचें असतें. सर्व देण्याचा निकाल कोर्टाबाहेरच करवून घेतल्यामुळें ही चिंता व हा खर्च टाळतां आला. शेतकऱ्याला या योजनेमुळें झालेला सर्वांत मोठा फायदा म्हणजे त्याच्यावरील व्याजाचा बोजा फारच कमी झाला आहे. शेतकऱ्यांच्या डोक्यावर आतां असलेला कर्जाचा सर्व बोजा जेवढा आहे तेवढा यापूर्वी त्यांच्यावर वार्षिक व्याजाचा बोजा होता यावरून वार्षिक व्याजाचा बोजा किती कमी झाला आहे हें समजेल. सावकार लोक सामान्यतः सवाईचें व्याज घेतात. संस्थानांत यापेक्षांहि ज्यास्त दरानें व्याज घेतल्याचीं उदाहरणें आहेत. या हिशोबानें रु. ८६, ३८, ८७४ या रकमेवरचें जें एक वर्षाचें व्याज तेवढ्या रकमेंत या सर्व कर्जाची तडजोड करून टाकलेली आहे. दरबारलाहि झालेला फायदा कांहीं क्षुल्लक नाहीं. एक तर ऋणविमोचनामुळें शेतकरीवर्ग मोकळा आणि प्रसन्न झाला; शिवाय जमीन महसुलाची वसुली अगदीं सहजासहजीं आणि वाढत्या प्रमाणांत होऊं लागली. मालाच्या किंमती उतरल्या असून सुद्धां साऱ्याचा चालू हप्ता शेतकऱ्यांनीं खुषीनें आणि पुरेपूर देऊन टाकला, इतकेंच नव्हे तर तहकूब केलेल्या साऱ्याखातीं सुद्धां कांहीं रकमा दिल्या. जर ही ऋणविमोचनाची योजना अमलांत आली नसती तर याच भागांत पीकपाणी पुरें न आल्यामुळें निदान शेंकडा पंचवीस टक्के सूट देणें दरबारला भाग पडलें असतें.

या जागीं एक गोष्ट स्पष्टपणें सांगितली पाहिजे ती ही कीं संस्थानचा प्राण असा जो शेतकरी वर्ग त्याचे हिताहितापेक्षां महाराज सरकारांना दुसरें कांहींहि अधिक प्रिय नाहीं. हल्लींच्या महाराजांना संपूर्ण अधिकार मिळाल्यानंतर त्यांनीं केलेली पहिली गोष्ट म्हणजे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या संबंधांत वारसा आणि खरेदीविक्री करण्याचा हक्क यांची जाहीर देणगी होय. संपूर्ण अधिकार मिळावयाच्या पूर्वी सुद्धां खेडुतांचें हिताहित पहाण्यांत महाराज कमी तत्पर नव्हते. त्यांच्या कर्जाचा बोजा कमी करण्याची कल्पना महाराजांनींच काढली आणि महाराज मुखत्यार नसतांना जमीन महसुलाची तेहतीस लक्ष रुपयांची बाकी तुंवून राहिली होती तेवढ्या रकमेची सूट देण्यांत आली. महसुलाची मागील बाकी प्रथम माफ करून सरकारांनी धडा घालून दिला आणि नंतर ऋणविमोचनाच्या योजनेप्रमाणें सावकारांनी आपल्या देण्याघेण्याचा निकाल करून शेतकऱ्यांना कर्जबाजारींतून मोकळें करावें अशी त्यांना विनंति केली. तडजोड करून जें सावकारांना द्यावयाचें तें देण्याची व्यवस्था करण्याची आर्थिक जबाबदारी संस्थाननेंच पत्करली. एकंदरींत सावकारांनीहि ऋणविमोचनाची योजना यशस्वी करण्यांत योग्य तो भाग घेतला. नामदार ए. जी. जी. मिस्टर लॅटिमरसाहेब यांनीं नुक्तींच ज्यावेळीं भेट दिली त्यावेळच्या आपल्या भाषणांत सरकारांनीं जे उद्गार काढले त्यांत अतिशयोक्तीचा गंधहि नव्हता. महाराज सरकार म्हणाले कीं मी स्वभावानें मितभाषणी आहें आणि मला जी शिकवण मिळाली आहे तीमुळें सुद्धां सद्धेतूंच्या उच्चारांपेक्षां कृतीचें मोल ज्यास्त मानणारा मी बनलों आहे. त्याच भाषणांत शेतकीच्या खऱ्या सुधारणेसबंधीं आपले विचार सरकारांनीं पुढील शब्दांत व्यक्त केलेः—"जर खेडेगांवांची खरी सुधारणा व्हावयास पाहिजे असेल तर (१) जमीन महसुलाच्या तुंबलेल्या देण्यांतून शेतकऱ्यांची मुक्तता, व (२) सावकारी देण्याच्या बोजांतून शेतकऱ्यांची सुटका, या दोन गोष्टींकडे प्रथमतः लक्ष्य दिलें पाहिजे." सावकारी कर्जाबाबद संस्थान सरकारनें काय केलें हें यापुढील भागांत विशद करून सांगितलें आहे.

भावनगर

१५ एप्रिल १९३४

पी. डी. पट्टणी

भावनगर स्टेट कौन्सिलचे अध्यक्ष.

भावनगर संस्थानांतील शेतकऱ्यांचें ऋणविमोचन

—:०:—

प्रकरण पहिलें.

—:०:—

खेडुतकर्जचौकशीकमिटीची प्राथमिक पहाणी.

१. सन १९२२ च्या जान्युआरी महिन्यांत लिलिया महालांतील कांहीं शेतकऱ्यांनीं आपल्या आर्थिक स्थितीसंबंधीं एक अर्ज केला होता, त्या अर्जानें भावनगर दरबारचें लक्ष्य शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीकडे जोरानें खेचलें. व्याज, कमिशन वगैरेच्या रूपानें सावकार जो वोजा शेतकऱ्यांवर लादतात त्यापायीं आपली किती कंगाल स्थिति झाली आहे यांचें त्या अर्जांत अर्जदारांनीं वर्णन केलें होतें. त्यावेळीं रेव्हेन्यु कमिशनर साहेबांनीं त्या प्रकरणीं प्राथमिक चौकशी केली पण तेवढ्या चौकशींत सुद्धां असें उघडकीस आलें कीं अर्जांत केलेल्या सर्व तक्रारी खऱ्या होत्या. कमिशनरसाहेबांनीं आपल्या रिपोर्टांत असें नमूद केलें कीं आर्थिक दृष्टीनें गांजलेल्या खेडुत लोकांना कांहीं अंशीं वांचवण्याकरतां उपाययोजना ताबडतोब झाली पाहिजे. तो रिपोर्ट विचारांत घेतां मंत्रिमंडळानें १९२२ च्या जून महिन्यांत दिवाण बहादूर त्रिभुवनदास कालिदास त्रिवेदी (कौन्सिलचे एक मंत्री) यांचे अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली. शेतकऱ्यांच्या कर्जाबाबद चौकशी करून योग्य उपाय सुचवणें हें त्या कमिटीचें कर्तव्य ठरवून दिलें होतें.

२. प्रथमतः अध्यक्षांनीं निरनिराळ्या महालांतील २२ गांवांत दौरा काढून निरीक्षण केलें. सावकार जबर व्याज आकारून आणि हिशोबाच्या व इतर बाबतींत लबाडीच्या अनंत युक्त्या योजून कुळांचा कशा फडशा उडवतात याबद्दल लिलिया महालांतील खेडुतांच्या अर्जांत दिलेली हकीकत सर्वस्वी सत्य आहे असें त्यांना दिसून आलें. इतकेंच नव्हे तर जो प्रकार लिलिया महालांत तोच प्रकार आणि थोडासा स्थानिक फेरफार करून सावकारांच्या त्याच क्लृप्त्या सर्व महालांत फैलावल्या होत्या असेंहि त्यांच्या नजरेस आलें.

३. अशा रीतीनें जी गंभीर परिस्थिति लक्षांत आली तिजमुळें सबंध संस्थानच्या शेतकऱ्यांच्या स्थितीची पहाणी करणें जरूर आहे, एरवीं त्या चौकशीचा पुरेसा उपयोग होणें शक्य नाही, योग्य निदान करणें शक्य नाही आणि परिणामकारक उपायांबद्दल निश्चिति करणें शक्य नाहीं असें स्पष्ट झालें. तेव्हां संस्थानच्या सर्व महालांतल्या वस्तुस्थितीचें सामान्य निरीक्षण केलें पाहिजे असें कौन्सिलनें ठरविलें.

कमिटीनें माहिती कशी मिळविली

४. प्रथमतः दरबारी खातेदारांपैकीं दरएकाच्या कर्जाचे आंकडे स्थानिक थाणदारांनीं नोंदविले. या आंकड्यांचा खरेखोटेपणा तपासून पहाण्याकरितां कमिटीचे सभासद सबंध संस्थानभर हिंडले,

त्यांनीं दर एक खेड्याला भेट दिली आणि तेथें जाऊन, अगदीं खेडुतांच्या घरांत जाऊन, खेडुतांशीं संभाषण केलें. कमिटीच्या कामांपैकीं हें सर्वांत महत्त्वाचें काम झालें असें म्हणावयास हरकत नाहीं, कारण खेडुतांशीं कमिटीच्या सभासदांचा निकट व प्रत्यक्ष संबंध ह्यामुळेंच आला आणि यामुळेंच त्यांना खेडुतांच्या खऱ्याखुऱ्या स्थितीची प्रत्यक्ष माहिती उपलब्ध झाली. थाणदारांनीं नोंदलेले कर्जाबद्दलचे आंकडे तपासणें, ते चुकीचे असल्यास दुरुस्त करणें, कर्जाच्या आंकड्यांत योग्य वाढ करणें अगर बदल करणें या गोष्टी करून, शिवाय कमिटीच्या सभासदांनीं खेडुतांच्या प्रत्यक्ष भेटी घेतल्या, त्यावेळीं त्यांना कसोशीनें प्रश्न विचारून कर्जाचा प्रकार, कर्ज काढण्याचा प्रसंग, कर्ज काढण्याचें कारण, व्याज, मंडामण व सावकाराला द्यावयाचे इतर खर्च यासंबंधीं त्यांनीं माहिती मिळविली. माहिती मिळवण्याचा हा उद्योग चालू असतांना, जबर व्याज अथवा दुसऱ्या जबर अटीमुळें ज्या कुळांच्या व्यवहारांत सावकारांकडून विशेष अन्याय अथवा जुलूम झालेला होता अशीं कांहीं टळक उदाहरणें निवडून त्या त्या सावकारांना कमिटीनें आपल्या छावणींत बोलावून त्यांच्या जबान्या घेतल्या आणि त्यांच्या चोपड्या तपासल्या. अशा प्रकारें अगदीं बारकाईनें ५५२ सावकारांची कमिटीनें चौकशी केली.

याशिवाय बहुतेक खेडयांत दोन किंवा त्याहून अधिक खेडुतांची निवड करून त्यांच्या खर्चाचे तक्ते तयार केले. तक्ते तयार करतांना सांपत्तिक स्थिति भिन्नभिन्न असलेल्या खेडुतांची निवड करण्यासंबंधें काळजी घेतली होती. खर्चाच्या तक्त्यांत, दरएकाचें कुल उत्पन्न, खेतीचा खर्च, सरकारी दस्त, घरखर्चासाठीं ठेवलेला उत्पन्नाचा भाग, आणि शिल्लक राहिलेला दाणागोटा विकून येणारा पैसा, इतक्या सर्व गोष्टींचा समावेश होत असे. अध्यक्षांनीं एक सांगोपांग प्रश्नपत्रिका तयार केली त्या पत्रिकेंतील तपशिलाच्यायें मोठ्या खेड्यांची पहाणी झाली. दरएक गावांतले पुढारी एके ठिकाणीं बोलावून त्यांना प्रश्न विचारून ही पहाणी करण्यांत आली.

कर्जाचे जे आंकडे नोंदले जातात त्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकणें अशक्य असतें. आंकडे विश्वसनीय नसल्यास कमिटीनें केलेल्या सूचनांची उपयुक्तता कमी होणार हें स्पष्ट असल्यामुळें कर्जाचे खरे आंकडे मिळवण्यासाठीं ज्यास्तींत ज्यास्त काळजी व श्रम घेण्याची खबरदारी ठेवलेली होती.

इतकी खबरदारी घेतली तरी सुद्धां सावकारांच्या चिथावणीमुळें कुळांनीं खरी स्थिती उघडकीस येऊं दिली नाही असे दाखले आढळून आले. कर्जबाजारी असून सुद्धां सावकाराच्या सांगण्यावरून अथवा अन्नाच्या भ्रामक कल्पनेनें मुग्धता बाळगणारे कांहीं खेडुत असले पाहिजेत अशी दाट शंका कमिटीला आली. उलटपक्षीं कांहीं कुळांनीं आपले कर्जाचे आंकडे फुगवून सांगितले असेंहि दृष्टोत्पत्तीला आलें. या कुळांचे सूत्रधार सुद्धां आपमतलबी सावकारच असले पाहिजेत.

खोटी भीति व खोटी आशा या दोहोंचेंहि खेडुतांच्या मनांतून उच्चाटण करण्याची कमिटीनें आपल्याकडून शिकस्त केली. तरी सुद्धां कांहीं खेडुत, मानाच्या भ्रामक कल्पनांमुळें ह्मणा अगर अन्य कारणामुळें ह्मणा, चारचौघांच्या देखत खरें सांगणार नाहींत ह्मणून अशा खेडुतांना एकएकट्याला बोलावून त्यानें दिलेली माहिती गुप्त ठेवण्यांत येईल असें आश्वासन देऊन माहिती गोळा करावी लागली. प्रथम थाणदारांनीं आंकडे नोंदवतांना ज्यास्तींत ज्यास्त काळजी घेतली होती आणि नंतर त्या आंकड्यांचा खरेखोटेपणा इतक्या कसोशीनें तपासण्यांत आला. येणेंकरून चूक होण्यास शक्य तितकी कमी जागा राहिली असली पाहिजे अशी कमिटीला बळकट आशा बाळगतां आली.

कर्जबाजारी शेंकडा पंचेचाळीस

५. इतकी तपशीलवार चौकशी करून कमिटीला असें आढळून आलें कीं तेवीस हजार (२३,०००) खातेदारांपैकीं शेंकडा पंचावन्न कर्जाच्या पाशांत नव्हते. उरलेले शेंकडा पंचेचाळीस ह्मणजे जवळ जवळ (१०,०००) दहाहजार कर्जबाजारी होते. त्यांच्या कर्जाची एकंदर बेरीज अजमासें रु. ५१,४१,००० असून ते रु. १२,७५,००० जमीन महसूल देत असत.

जे कर्जबाजारी नव्हते ते ह्मणजे शेंकडा पंचावन टक्के खातेदार सुस्थितींत होते असें मात्र कोणीहि समजूं नये. ते आपला खर्च मुष्किलीने पुरा पाडीत असत आणि कशीबशी तोंडमिळविणी करीत असत. त्यांच्याजवळ शिल्लक अगदींच तुटपुंजी असे. दोन पिकें लागोपाठ बुडालीं तर दिवस काढावयास जवळ कांहीं नसल्यामुळें कर्जाच्या खड्यांत उडी घेणें त्यांना भाग पडलें असते. ते कर्जबाजारी नव्हते पण जणुं काय कर्जाच्या शिवेवर रहात होते.

पत नाहीं म्हणून कर्ज नाहीं

६. कर्जाच्या पाशांत न सांपडलेल्या खेडुतांपैकीं कांहीं असे होते कीं सावकार त्यांना कर्ज देतच नसत. त्यांची स्थिति इतकी कंगालीची होती कीं सावकार त्यांना कर्ज देतील इतकी त्यांची पत नव्हती. 'पत असेल तेथें कर्ज होतें' ही म्हण आपल्या अनुभवास येते पण याच्या उलट सिद्धांत मात्र साधारणपणें प्रत्ययास येत नाहीं. पत कमी असतांना कर्ज काढावयाची एखाद्यावर पाळी आली तर त्याच्यावर सावकाराच्या व्याजाचा व इतर बोजा वाढत्या प्रमाणावर लादला जातो. पण अठरा विसवे दारिद्र्य आणि पतीचा पूर्ण अभाव असला म्हणजे मुळींच कर्ज संभवत नाहीं, म्हणजे 'पत नाहीं तर कर्ज नाहीं' हा उलट सिद्धांतहि पुष्कळशा उदाहरणांवरून सिद्ध होतो. हा जो अनुभव आला त्यामुळें पंचावन टक्के खेडुत कर्जरहित आहेत एवढ्यावरून सर्वसाधारण सांपत्तिक स्थिति साधारण बऱ्यापैकीं आहे असा निष्कर्ष काढण्याविरुद्ध धोक्याची सूचनाच कमिटीला मिळाली.

७. या पंचेचाळीस टक्क्यांपैकीं तिसरा हिस्सा खेडुतांच्या डोक्यावर दोन सालच्या महसुलाइतका कर्जाचा बोजा होता, इतरांच्या डोक्यावर दहावर्षांपासून पंधरावर्षांच्या महसुलाइतका बोजा होता. त्यांतल्या कांहींजणावर त्यापेक्षांहि अधिक बोजा होता.

कर्जबाजारीपणाची कारणें—खरीं व मानीव

८. कर्ज काढावयाची सुरुवात, पिकाची बूड, पीक चांगलें आलें असतां सुद्धां अगदी थोडा फायदा रहाणें, लग्न मृत्यु अथवा तसेच दुसरे प्रसंग येतात त्यावेळीं केलेला अवाच्या सवा खर्च, यांपैकीं कोणच्या तरी निमित्तानें झाली असली तरी कर्ज तुंबून रहाणें आणि शेतकऱ्यानें कर्जाच्या दलदलींतून बाहेर पडावयास असमर्थ होणें हे परिणाम मात्र सावकारांच्या लबाड्या, व्याजाचा भारी दर आणि जुलमी कारवाया यांचे पायींच उद्भवले असले पाहिजेत याबद्दल कमिटीला खात्री पटली.

विवाहासारख्या प्रसंगीं काढाव्या लागणाऱ्या कर्जाचें सुद्धां प्रमाणाबाहेर स्तोम माजवलें जाण्याचा संभव असतो. पुनर्विवाह अथवा गृहप्रवेशाच्या प्रसंगीं ऐपतीबाहेर भलताच खर्च करण्याची कुणबी खेडुतांत वहिवाट आहे हें खरें पण साधारणपणें असल्या सामाजिक मंगल प्रसंगीं जो खर्च केला जातो तो शेतकऱ्याचा दर्जा आणि कमिटीच्या चौकशीस सुरुवात झाली त्यावेळचे बाजारभाव

लक्ष्यांत घेतां फाजील असे असें म्हणतां येणार नाहीं. असल्या खर्चापायीं शेतकऱ्याला नवीन कर्ज काढावें लागतें आणि अगोदरच्या बोजापायीं तें कर्ज तो कदाचित् कधींच फेडूं शकणार नाहीं असें असतें या दृष्टीनें पहातां तो खर्च अवाच्या सवा असे, असें एका बाजूनें पहाणाराला म्हणतां येईल. पण दुसऱ्या दृष्टीनें पहातां असें म्हणतां येईल कीं संसारांत येणाऱ्या प्रासंगिक खर्चाचा साधारण बोजा सुद्धां उचलण्याइतकें शिलकीचें सामर्थ्य शेतकऱ्याच्या अंगीं नसतें म्हणूनच त्याला दरएक प्रसंगीं सावकाराकडे धांव मारावी लागते.

पुष्कळदां असें ठोकून देण्यांत येतें कीं जमीनमहसुलाचा भारी बोजा शेतकऱ्याला कर्जांत डांबतो. दस्कोई व तलाजा महालांत सारा कमी असून कुंडला व लिलिया महालांत सारा ज्यास्त आहे, पण कर्जबाजारीपणाचें प्रमाण याच्या उलट आहे हें पाहिलें ह्मणजे वरील विधान करणें किती धोक्याचें आहे हें समजेल. या चार महालांत साऱ्याची सरासरी पुढें दिल्याप्रमाणें आहेः—

महाल	दर विघ्यास
दस्कोई	रु. १—२—०
तलाजा	,, ०—१४—३
कुंडला	,, १—१०—०
लिलिया	,, २—१—४

कर्जाच्या बोजाचें प्रमाण साऱ्याच्या दर रुपयामागें कसें पडतें तें यापुढें दिलें आहेः—

महाल	रु.
दस्कोई	८.७
तलाजा	७.६
कुंडला	२.९
लिलिया	३.६

यावरून जमीन महसुलाचा आणि कर्जबाजारीचा कांहीं संबंध नाहीं हें दिसून येतें. तसा संबंध असता तर भारी साऱ्याच्या महालांत कर्जबाजारीपणा भारी असता पण वस्तुस्थिति तशी नाहीं. शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा भयंकर प्रमाणापर्यंत जो पोंचला त्याला कारण सावकारांच्या लोभी आणि पिळवणुकीच्या कारवायाच होत हाच खरा निष्कर्ष ठरतो. सावकारानें दिलेलें अव्वल कर्ज फार थोडें असून त्या कर्जाच्या दुप्पट, तिप्पट किंवा चौपट रक्कम देणाऱ्या शेतकऱ्यांच्या नांवावर मोठमोठ्या बाक्या सावकाराच्या चोपडींत आढळून आल्या यावरून तर वरील निष्कर्षाला आणखी बळकटी येते. लोभानें तीव्रतर केलेल्या सावकाराच्या कल्पक डोक्यांतून निघालेल्या पैसे काढण्याच्या युक्त्यांमुळेंच या प्रचंड बाक्या निर्माण झाल्या असें कमिटीनें पुष्कळसे व्यवहार तपासून निश्चित केलें.

सावकारांच्या इरसाल कल्प्त्या

९. मूळ मुद्दल कमीतकमी मुदतींत अनेक पटींनीं वाढवण्यासाठीं सावकार ज्या युक्त्या जुक्त्या व कल्प्त्या लढवतात त्यांचा विस्तारानें परामर्श घेणें या लहानशा पुस्तकांत शक्य नाहीं. व्याज, अडत आणि अमले दुसरे प्रकार हे तर हिशोबाच्या चोपडींत उघड उघड नोंदले जातात. पण याशिवाय नियमबाह्य आणि गूढ पद्धतीनें लिहिणें करून हातचलाखीनें ऋणकोच्या खात्यांतील बाकीची वाढ करण्यांत येत

असते. कर्जाऊ दिलेले पैसे लिहिण्यांत जी तत्परता सावकार दाखवतो त्याच्या अगदीं उलट, आलेले पैसे नोंदण्यांत तो चुकारपणा करतो व त्यामुळेंहि ऋणकोची बाकी फुगते. सावकारांच्या व्यवहाराच्या विविध पद्धती आणि हिशोब ठेवण्याच्या रीतीचे नमुने पुराव्याच्या भागांत दिले आहेत आणि त्याच भागांत त्यांच्यावर विस्तृत उहापोह व चर्चाहि केली आहे. सावकारांपैकीं पुष्कळांनीं दिलेल्या जबान्या सारांश रूपानें त्या भागांत देऊन त्याच्यावर सुगम असें भाष्यहि केलेलें आहे.

सावकार आपल्या निरक्षर, अज्ञानी व व ऋणबद्ध कुळाला कसा नाडतो याचे जे नमुने कमिटीला पहावयास मिळाले त्यांपैकीं थोडेसे, म्हणजे क्रमप्राप्त तेवढेच या ठिकाणीं देण्याचें योजलेलें आहे.

सवाई

प्रथमारंभीं सवाईचा उल्लेख केला पाहिजे कारण ती बहुतेक रूढ आहे. सवाई म्हणजे काय ? एकाद्या कुळानें बियाण्यासाठीं, खेडण्याच्या वेळीं अथवा शेतीच्या अन्य कारणासाठीं शंभर रुपये सावकाराजवळून काढले, मग ते ज्येष्ठांत किंवा आषाढांत ऊसोत अथवा भाद्रपद वा आश्विनांत असोत, तर ते ताबडतोब सवाईनें वाढतात, म्हणजे कर्जरोख्यांत अव्वल देणें म्हणून सवाशें रुपये नोंदले जातात. आणि हे सवाशें रुपये लगेच मार्गशीर्ष अथवा पौषांत परत द्यावयाचे असतात. म्हणजे शंभर रुपयांचें चार किंवा आठ महिन्यांचें व्याज पंचवीस रुपये होतें. व्याज दिसण्यांत शंभराचें पंचवीस पण मुदतीचा हिशोब करतां शेंकडा ३७॥ अगर ७५ टक्के व्याजाचा दर आढळून येतो. व्याजाचा असा जबर बोजा सर्व कुळांवर पडत नाहीं, वसुलीच्या अडचणींप्रमाणें सावकार व्याजाचे दर बदलतो, पत नसलेल्या अगदीं गरीब अशाच ऋणकोकडून भारी व्याज सावकार घेतो, असें कांहीं लोक म्हणतील; अतिशय गरजू असलेले शेतकरीच असलें जबर व्याज देतील असा कोणी समज करून घेईल. पण खरा प्रकार आढळून आला तो असा कीं पतदार कुळाकडून दरमहा दरशेंकडा आठ किंवा बारा आणे व्याज घेण्याची पद्धत अजीबात नष्ट झाली आणि ज्याच्याकडले पैसे वसूल करावयास सावकाराला कधींहि कार्टाची पायरी चढावी लागली नाहीं अशा ऐपतदार कुळाला सुद्धां सवाई पद्धतीशिवाय अन्य पद्धतीनें कर्ज देण्याचें सावकारांनीं बंद केलें.

रोकडीच्या फेडींत कापूस

११. पतदार कुळाला जेथें अशा जबर अटी कबूल कराव्या लागतात आणि त्यासुद्धां शेतीच्या कामासाठीं काढलेल्या कर्जाबद्दल, तेथें बहुसंख्य गरीब शेतकऱ्याला यांहिपेक्षां कडक अटी पत्करावया लागल्या तर तें स्वाभाविकच होय. अशा ऋणकोच्या डोक्यावर सवाईचा बोजा तर बसतोच, आणखी परतफेडीसंबंधीं त्याच्यावर दुसरा बोजा बसतो. रकमेऐवजीं असल्या ऋणकोकडून सावकार कापणीच्या वेळीं कापूस घेण्याचा करार करतो. उदाहरणार्थः—आषाढ अथवा भाद्रपद महिन्यांत शंभर रुपये कर्जाऊ दिले तर त्याचे रु. १२५ होतातच. या रुपयांच्या फेडीसाठीं कार्तिक किंवा मार्गशीर्ष महिन्यांत शेतकऱ्यानें दर दोन रुपयांस एकमण कापूस याप्रमाणें ६२$\frac{1}{2}$ मण कापूस द्यावा अशी सावकार अट घालतो. या अटीप्रमाणें द्यावयाचा कापूस ऋणको पूर्णपणें देऊं शकला नाहीं असें समजा; तर बाकी राहिलेल्या कापसाची त्यावेळच्या बाजारभावाप्रमाणें किंमत करून तेवढ्या रकमेचा सवाई हिशोब करून नवीन कर्जरोखा सावकार करून घेतो. असें समजा कीं एकादा ऋणको मुळींच कापूस देऊं शकला नाहीं आणि त्यावेळचा भाव मणास आठ रुपये होता तर मूळ कर्ज दिल्यानंतर चार अथवा आठ महिन्यांत ऋणकोवर ५०० रुपयांचा नवा कर्जरोखा करून देण्याची पाळी येते. चार अथवा

आठ महिन्यांत आपली रकम पांच पटीनें वाढलेली पहाण्याचें समाधान सावकाराला मिळूं शकतें.

पैशाची फेड कापसानें करावयाचे करार लिलिया, गधडा आणि वोटाद यांसारख्या कापूस पिकणाऱ्या महालांत जास्त प्रमाणांत दिसून आले व हें साहजिक आहे. गधडा महालांतल्या सावकारांचा कापसावर इतका डोळा असे कीं कापसानें फेड करावयाचें कबूल करणाऱ्या ऋणकोशिवाय इतरांना ते कर्ज देतच नसत. आणि कर्ज देण्याच्या वेळचा अथवा फेडीच्या वेळचा जो भाव असेल तो शेंकडा पन्नास किंवा शंभर टक्के कमी करून त्या भावाप्रमाणें आकारलेला कापूस कर्जफेडीदाखल द्यावा लागत असे. भविष्यकाळीं उत्पन्न होणारा कापूस विकण्याचे करार अथवा वायदे म्हणजे एक प्रकारची सट्टेबाजीच होय. कर्ज काढण्याची ज्या शेतकऱ्यांना अवश्यकता नाहीं अशा शेतकऱ्यांना सुद्धां बोटादच्या कापसाच्या व्यापाऱ्यांचे स्थानिक दलाल कापूस विकण्याचा वायदा करावयास प्रवृत्त करीत आणि त्याकरतां कांहीं आगाऊ रकमेची लालूच सुद्धां पुढें करीत असत. भविष्यकाळीं पुष्कळ फायदा मिळविण्याच्या खेडुतांच्या आकांक्षा फारच क्वचित् सफल होत असत. गधडा महालांत मिळालेल्या पुराव्यासंबंधीं लिहितांना कमिटीच्या सभासदांनीं असें म्हटलें आहे कीं कुशाग्र बुद्धीच्या आणि रोजच्या बाजारच्या हालचाली जाणणाऱ्या सावकारांपुढें अनपेक्षित फायदा मिळण्याच्या उद्देशानें वायदे करणाऱ्या खेडुताचा मुळींच निभाव लागत नाहीं; उलटपक्षीं अगोदर कापूस विकून बसल्यामुळें नंतर वाढलेल्या भावापासून होणाऱ्या फायद्यास मात्र खेडुत बहुशः मुकतो. या सट्टेबाजीच्या धंद्यांत असें होतें कीं जेवढा कापूस विकण्याचा वायदा शेतकरी करतो तेवढा कापूस तो वायद्याच्या वेळीं देऊं शकत नाहीं. असें झालें म्हणजे वायद्याच्या वेळचा बाजारभाव आणि करार करतेवेळीं ठरलेला भाव यांमध्यें जी तफावत पडते त्या दराप्रमाणें कमी पडलेल्या कापसाची किंमत करून तेवढ्या रकमेचा कर्जरोखा सावकाराला लिहून देण्याची पाळी शेतकऱ्यावर येते.

खेडुतास लागणारी पैशाची गरज

१२. पुढें होणाऱ्या फायद्याच्या आशेनें कापूस विकण्याचे वायदे होतात त्यापेक्षां ज्यास्त प्रसंगीं शेतकऱ्याला रोकडीची गरज लागल्यामुळें तसले वायदे त्याला करावे लागतात. शेत खेडण्यासाठीं, पीक कापण्यासाठीं, तयार पीक खळावर आणण्यासाठीं, कापूस काढण्यासाठीं, अगर अशाच अत्यंत जरुरीच्या शेतकीच्या कामासाठीं मजुरांना द्यावयाकरतां शेतकऱ्याला पैशाची निकडीची जरूर लागते. हे पैसे सावकार देतो त्यावेळीं कापसाच्या विक्रीचा वायदा तो शेतकऱ्याला करावयास लावतो आणि मणामागें एक रुपया किंवा दोन रुपये तो आगाऊ देतो. आपल्या गरजेच्या वेळीं या मार्गानें पैसे मिळतात असें समजून शेतकरीहि वायदा करावयास तयार होतो. पण पुढें परिणाम काय होतो? सावकारीचा धंदा हें सावकाराचें साधन बनतें आणि त्या साधनाच्या जोरावर शेतकऱ्याचें सर्व पीक कमींत कमी भावानें सावकाराच्या हातांत जातें. पुढें वायदा पटवण्याच्या वेळेला पीक कमी आल्यामुळें म्हणा अगर भरमसाट कापसाचा वायदा केल्यामुळें म्हणा, कबूल केलेला कापूस शेतकरी देऊं शकत नाहीं. आणि मग जेवढी कापसाची तूट असेल तेवढ्या कापसाची त्यावेळच्या बाजारभावाप्रमाणें किंमत आकारून तितक्या रकमेचा कर्जरोखा शेतकऱ्याकडून सावकार करून घेतो असें कमिटीनें आपल्या रिपोर्टांत नमूद केलें आहे.

अटक अथवा दंड

१३. कांहीं कुळांच्या व्यवहारांत सावकार कापसानें परतफेड करण्याच्या अटीचा स्पष्ट आणि

सरळ उल्लेख करीत नाहींत. रक्कम परत देण्यासाठीं मुदत ठरवण्यांत येते. त्या मुदतींत रक्कम परत दिली नाहीं तर मात्र त्यानंतर जी फेड करावयाची ती कापसानें केली पाहिजे अशी अट कांहीं कर्जरोख्यांत घातलेली असते. ही दंडाची शर्त आहे आणि याला 'अटक' अशी संज्ञा आहे. रकमेची फेड होण्यांत ठरीव मुदतीबाहेर एक दिवसाचा जरी उशीर झाला तरी सावकार गय न करतां अटक अमलांत आणण्यांत तत्परता दाखवितात आणि रक्कम न घेतां कापूसच पाहिजे ह्मणून आग्रह धरतात. रक्कम देतांनाच केलेली सवाई आणि हे अटकेचें कलम या दोहोंच्या जोडगोळीनें सावकार आपली रक्कम चार सहा महिन्यांत पांच पटीनें वाढवतो हें लक्ष्यांत घेतलें ह्मणजे कमिटीनें वापरलेली भाषा कडक आहे असें कोणीहि म्हणणार नाहीं. पाडलेल्या भावांत कापसानें फेड करण्याच्या शर्तीवर कर्ज देण्यामुळें उत्पन्न झालेली खडतर अवस्था बोटाद महालच्या पाटण्या टप्प्यामध्यें सर्वांत अधिक भीषण स्वरूपांत कमिटीला दिसून आली. या संबंध टप्प्याचा विचार करतां शेंकडा ४० पेक्षां कमी शेतकरी ऋणबद्ध आणि कर्जाची व्यक्तिशः सरासरी रु. २३२ असा प्रकार आढळून आला. परंतु ज्या खेड्यांत कर्जाची फेड कापसानेंच करावयाची पद्धत होती त्या खेड्यांत मात्र शेंकडा ८५ शेतकरी ऋणबद्ध आणि कर्जाची व्यक्तिशः सरासरी रु. ५२५ असा प्रकार दृष्टोत्पत्तीस आला.

सावकारीचा दुरुपयोग

१४. ज्या खेडयांत सावकारी आणि कापसाचा व्यापार एकच मनुष्य करतो त्या ठिकाणची दुर्दशा तर पुसावयासच नको. सावकारीच्या जोरावर तो कापूस आगाऊ विकत घेऊन बसतोच, शिवाय दुसऱ्या कोणच्याहि व्यापारी गिऱ्हाइकापेक्षां तो स्वस्त दरानें घेऊं शकतो. तो सांगेल ते दरदाम शेतकऱ्याला पत्करणें भाग पडतें. दोन पक्ष जेथें इतके असमान असतात तेथें सावकाराच्या मनांत असलेली न्यायबुद्धि आणि मर्यादा याशिवाय सावकारावर कसलाच अंकुश पडूं शकत नाहीं. अशा प्रकारें शेतकरी परावलंबी झाला म्हणजे खुल्या बाजारांत आपला कापूस विकून त्याला जो फायदा झाला असता त्याला तो शेतकरी मुकतो. शेतकऱ्याची आणि विशेषेंकरून कोळी व त्याच्याच सारख्या दुसऱ्या मागासलेल्या खेडुतांची दोन बाजूंनीं कुचंबणा होते. त्यांना कमीतकमी भावांत आपला माल विकावा लागतो आणि ज्यास्तींत ज्यास्त भावांत दुसऱ्याकडून माल विकत घ्यावा लागतो. खेडुताला गिऱ्हाइक होण्याचेच प्रसंग पुष्कळ आणि विकण्याचे प्रसंग वर्षांतून एक दोन हेंहि विसरतां कामा नये. विशेषेंकरून समुद्रकांठच्या भागांत असें दिसून आलें कीं गरीब खेडुत एक महिन्याला लागणारी सामुग्री आपल्याजवळ ठेवून बाकीचें सर्व पीक सावकाराच्या स्वाधीन करतात. त्याबद्दल सावकाराच्या चोपडयांत खेडुतांच्या नांवानें रकमा जमा होतात पण त्या आकारतांना बाजारभावापेक्षां २५ अगर ३० टक्के कमी दरानें खेडुताच्या मालाच्या किंमतीचा हिशोब सावकार करतात. पण ज्यावेळीं खेडुताची भूमिका बदलते आणि तो गिऱ्हाइक बनतो त्यावेळीं मात्र त्याला लागणारी दर एक वस्तु बाजारभावापेक्षां २५ अगर ३० टक्के जास्त दरानें सावकार त्याच्या नांवें लिहितो. तीन अगर सहा महिन्यांनीं अथवा क्वचित् एक वर्षानें जेव्हां हिशोब करण्याची वेळ येते त्यावेळीं देण्याघेण्याची वेरीज वजावाकी करून जें कांहीं सावकाराचें देणें रहातें त्यांत व्याजाच्या अथवा अन्य स्वरूपानें बरीचशी रक्कम मिळविण्यांत येते आणि त्या सर्व रकमेचें नवें खातें सुरू करण्यांत येतें. राहिलेल्या बाकीचा नवा कर्जरोखा करण्याची वेळ आली तर शेंकडा १२ ते १८ पर्यंत व्याज आकारावें असें जरी पहिला कर्जरोखा करतांना ठरलेलें असलें तरी व्याजाखातीं शेंकडा पन्नास अथवा अधिक टक्क्यांची मिळवणी करून

सबंध रक्कम नव्या कर्जरोख्यांत मुद्दल म्हणून दाखवण्यांत येते. जमाखर्चाच्या हातचलाखीमुळें व्याजाची खरी रक्कम शेतकऱ्याच्या नजरेस येत नाहीं. याशिवाय कमिटीला असें आढळून आलें कीं देण्याघेण्याचा व व्याजाचा हिशोब करतांना मधून मधून दिलेल्या रकमामुळें मुद्दल कमी झालें असलें तरी ती गोष्ट सावकार जमेस धरींत नाहीं. आणि रकमा वर्षाच्या अवधींत ऋणकोनें केव्हां उचलल्या हें न पहातां सबंध बारा महिन्यांत मिळून ऋणकोनें घेतलेल्या रकमेवर सबंध वर्षाचें व्याज सावकार आकारतो. कांहीं सावकार व्याजाची रक्कम मुदलाबरोबरच कुळाच्या नांवावर खर्ची टाकतात. परिणाम असा होतो कीं व्याजाच्या रकमेवरहि व्याज आकारलें जातें, निराळ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे व्याज दुप्पट आकारलें जातें. सारांश एकच इसम व्यापारी व सावकार असल्यामुळें तो शेतकऱ्याची जी दैना करतो तिला पार नसतो. खेडुतानें विक्रीचा व्यवहार तिऱ्हाइताशीं केला तरीसुद्धां विकलेल्या कापसावर आणि धान्यावर मणामागें एक आणा दलाली सावकाराला द्यावी लागते असेंहि कमिटीच्या नजरेस आलें. सावकारच खरेदीदार असला तर कापसाची अगर धान्याची किंमत तो रोख देत नाहीं तर शेतकऱ्याच्या परवानगीशिवाय पूर्वीच्या देण्याच्या खातीं रक्कम जमा करतो, आणि दुसऱ्या दिवशीं रोजचा गुजारा करावयास लागणाऱ्या जिनसांसाठीं जबर व्याज व पागडी देऊन सावकाराकडून नवें कर्ज काढण्याची शेतकऱ्यावर पाळी येते. जर सावकार मालाची किंमत रोख देईल तर अशी पाळी शेतकऱ्यावर खास येणार नाहीं,

कढारा म्हणजे काय ?

१५. सावकार-कुळांच्या व्यवहाराचा कढारा हा एक प्रकार आहे. श्रावण अथवा भाद्रपद महिन्यांत सावकाराकडून खेडुत धान्य नेतो, त्या धान्याच्या फेडीसाठीं खेडुतानें दीडपट अथवा पावणेदुप्पट धान्य कापणीनंतर दिवाळीच्या मोसमांत परत करावयाचें असतें. या वाढीशिवाय ज्वारीच्या ऐवजीं बाजरी आणि बाजरीच्या ऐवजी गहूं (ह्मणजे नेलेल्या धान्यापेक्षां वरचढ धान्य) परत देण्याचा शेतकऱ्यानें करार करावयाचा असतो. या व्यवहाराला ' कढारा ' अशी संज्ञा आहे. हा व्यवहार ज्यावेळीं मोल-सवाया पद्धतीनें करतात त्यावेळीं तर तो आणखी खडतर बनतो. मोलसवायाचा अर्थ असा कीं जर कबूल केलेलें धान्य ठरविल्यावेळीं दिलें नाहीं तर कढारा करारानें वर्षांतून तीन वेळां-म्हणजे दिवाळींत, गव्हाच्या कापणीच्या वेळीं आणि छासटिया अथवा पाटाच्या पाण्यानें पिकवलेली ज्वारी कापण्याच्या वेळीं—पुनरुज्जीवन करण्यांत येतें. या दरएक प्रसंगीं अगोदरच्या धान्यापेक्षां वरचढ धान्य देण्याचा करार करावा लागतो आणि शिवाय पूर्वीच्या सवापट,दीडपट अथवा कांहींवेळां दुप्पट धान्य देण्याचा करार करावा लागतो.

कांहीं सावकारांनीं या ह्मणजे कढारा करारानें थोडेसें रूपांतर केलेलें आढळलें. धान्य देतांनाच त्याची सवाई करावयाची व त्या सवाई धान्याची बाजारभावावर पंचवीस ते पाऊणशें टक्के चढवून किंमत करावयाची ह्मणजे धान्य व किंमती या दोहोंतहि वाढ झाल्यामुळें खेडुतावर दुप्पट बोजा पडत असतो.

या कढारा पद्धतीनें सावकार शेतकऱ्याचा कसा गळा दाबीत असतात याची कल्पना यावयास सावकार मूळ मुद्दल किती पटीनें वाढवूं शकतात हें पाहिलें पाहिजे. मुद्दल म्हणून दिलेल्या धान्याची पांच वर्षांत सावकार सातपट करूं शकतो आणि तीसुद्धां मूळ मुदलाच्या सवापट धान्य पहिल्या दोन वर्षांत आणि दीडपट धान्य पहिल्या चार वर्षांत ऋणकोनें दिलें असतांना. कमिटीला हें जेव्हां प्रथम दिसून आलें त्यावेळीं याचा उलगडाच होईना. पण नंतर असें दिसलें कीं वर्षभर हप्त्याहप्त्यांनीं ऋणकोनें जें कांहीं धान्य दिलें असेल तें वजा करून उरलेल्या धान्याची दिढी किंवा दुप्पट करावयाऐवजीं, दिलेलें धान्य हिशोबांत न घेतां

सबंध वर्षाच्या येण्याची दिढी किंवा दुप्पट सावकार करतो. आणि या लबाडीमुळेंच त्याचें मूळचें मुद्दल सातपटीनें वाढतें.

जलप म्हणजे काय ?

१६. वर कापसाच्या वायद्याचा उल्लेख आलाच आहे त्याचाच 'जलप' हा एक प्रकार आहे आणि त्याचा प्रसार समुद्रकांठच्या तलाजा महालांत फार आहे. या 'जलप' प्रकरणाचें सर्वांत निंद्य लक्षण असें आहे कीं पीक कापावयाच्या एक किंवा दोन महिने आधीं तें पीक (कापूस अथवा दाणा) सावकार खेडुताकडून विकत घेतो. यावद्दल मोबदला म्हणून नवें कर्ज सावकार देत नाहीं, तर मागील बाकीच्या खातीं तो त्याची किंमत जमा करतो. सावकार जर महिना दोन महिने वसुलीच्या कामीं धीर धरील तर शेतकऱ्याला आपल्या पिकाची जी किंमत मिळूं शकेल त्याच्यापेक्षां ४० ते शंभर टक्के कमी दरानें त्या पिकाची सावकार किंमत ठरवतो. पीक कापण्याची वेळ आणि जलप करारांची वेळ यांमध्यें फक्त पंधरा दिवसांची मुदत असल्याचे सुद्धां दाखले कामिटीला आढळले. शेतकीच्या निकडीच्या कार्यासाठीं लागणारा पैसा मिळविण्याकरतां एकादा शेतकरी आपलें पीक आगाऊ विकावयास निघणें साहजिक आहे. पणं मागलें देणें देण्यासाठीं शेतकऱ्यानें पिकाच्या विक्रीचा वायदा केलेला दिसला म्हणजे संशय उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं. एकतर सावकार रोज वसुलीचा तगादा लावीत असेल अथवा फिर्यादीची धमकी देत असेल, किंवा हातांत असलेल्या हुकूमनाम्याच्या जोरावर दरखास्त काढतों असें म्हणत असेल, किंवा शेतकऱ्याला सावकाराची घडीघडी गरज लागते म्हणून सावकाराजवळ कसेंहि करून आपली पत राखली पाहिजे असें शेतकऱ्याला वाटत असतें याचा फायदा घेऊन शेतकरी व सावकार यांच्या अन्योन्यसंबधाचा सावकार ज्यास्तींत ज्यास्त गैरलाभ मिळवीत असला पाहिजे. अशा कोणच्यातरी कारणानें केलेला 'जलप' करार हा करार या संज्ञेला पात्रच नाहीं. सावकाराच्या दबाणीमुळें शेतकरी आपलें पीक विकतो आणि, ऋणको व धनको असा जेथें संबंध असतो तेथें सावकार किती जोराची दबाण शेतकऱ्यावर करूं शकतो याची कल्पना सहजच करतां येईल.

कोर्टाचा सावकाराकडून दुरुपयोग

१७. सावकार एकादा हुकूमनामा मिळवतो आणि त्याच्या बजावणीची धमकी देतो. हुकूमनाम्याची रक्कम द्यावयाची तीव्र इच्छा शेतकऱ्याला असते म्हणून तो कुठून तरी अथवा कसे तरी पैसे पैदा करतो आणि सावकाराला देतो. सावकार ते पैसे हुकूमनाम्याच्या फेडींत जमा न करतां दुसरें जें कांहीं खात्यावर देणें असेल त्याच्या फेडींत जमेस धरतो. अशा तऱ्हेनें एका हुकूमनाम्याच्या जोरावर दुसरें देणें कोर्टाची पायरी न चढतां सावकार वसूल करूं शकतो. स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे हा अपहार आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या

१८. कर्जाचा बोजा प्रमाणाबाहेर वाढला आणि आपण शिकस्त केली तरी तो फिटणार नाही असें दिसलें म्हणजे पतदार व अब्रूदार असलेले शेतकरी सुद्धां बेदरकार बनतात आणि देण्याबद्दल बेफिकिरी दाखवूं लागतात. त्यांची पत नाहींशी होते आणि मग त्यांना लागणारा पैसा मिळूं शकत नाहीं. त्यांच्या जमिनी त्यांच्या हातांतून जातात, जमिनी सावकाराच्या मालकीच्या होऊन सावकाराचीं कुळें म्हणून

त्यांच्या ताब्यांत त्यांच्या जमिनी रहातात व त्यांत ते शेतीभाती करतात. असे दाखले थोडे आणि असले तरी दरबारच्या नजरेस येण्यास फार कठीण. बेकायदेशीरपणें एकाद्या खातेजमिनीचें गहाणखत अथवा पट्टा झाला असल्यास ती जमीन आपल्या ताब्यांत दरबार घेईल अशी भीति असते ह्मणून असले व्यवहार सावकार व शेतकरी यांच्यामध्यें गुप्तपणें होत असतात.

दरबारीं नोंदलेल्या कांहीं खातेदारांना पट्ट्यानें आपली खातेजमीन दुसऱ्याला देण्याचा मर्यादित हक्क थोड्या वर्षांपूर्वी दरबारनें दिला. हा हक्क देण्याचा उद्देश असा होता की खरोखर गरिबीमुळें शेती करावयास लागणाऱ्या साधनांची ज्याच्याजवळ वाण असेल अशा शेतकऱ्यानें आपली खातेजमीन थोड्या मुदतीकरतां पट्ट्यानें द्यावी आणि त्या मुदतींत आपली स्थिति सुधारून आपली जमीन स्वतां कसण्याची शक्ति संपादन करावी. पण प्रत्यक्ष वस्तुस्थिति अशी आढळून आली कीं या हक्काचा दुरुपयोग करून पूर्वीच्या देण्यापायीं पुष्कळ सावकारांनीं खातेदारांकडून जमिनीचे पट्टे आपल्या नांवें करून घेतले आणि अव्वल खातेदारांना जमिनींतून काढून अन्य गांवीं अगर अन्य प्रांतीं जावयास लावलें. असा प्रकार व्हावा ही दरबारची मुळींच इच्छा नव्हती. शेतकऱ्याच्या कल्याणासाठीं त्याला दिलेल्या हक्काचा असा विपर्यास होईल आणि त्या हक्काच्या पायीं खातेदाराला आपली जमीन सोडून उदरनिर्वाहाकरतां दूर देशीं जाण्याची पाळी येईल हें ध्यानींमनीं सुद्धां आलें नव्हतें. असे प्रकार जर पुष्कळ घडले तर कुळांकडून ज्यास्तींत ज्यास्त खंड वसूल करण्यापलीकडे ज्यांचें जमिनीकडे मुळींच लक्ष्य नाहीं अशा, ह्मणजे शेतकऱ्यांव्यतिरिक्त, वर्गाकडे जामिनीचा तावा जाईल हें निराळें सांगावयाची जरूर नाहीं. पण हें जरासें विषयांतर होतें.

सावकारांना आश्वासन देऊन माहिती मिळविली

१९. सावकारांच्या वह्या अशा तऱ्हेनें लिहिलेल्या असतात आणि लेखी करारांच्या जोडीला इतके तोंडी करार असतात कीं मूळ मुद्दल किती आणि व्याज पागडी दलाली वगैरेमुळें वाढ झाली ती किती हें शोधून काढणें जवळ जवळ अशक्यच असतें. यामुळें सावकारांना दरबारनें आश्वासन दिलें कीं कमिटीपुढें सावकार जें कांहीं सांगतील, कमिटी ज्या जबान्या लिहून घेईल, त्यांच्या आधारें जे आंकडे अगर पत्रकें कमिटी तयार करील, तीं सर्व गुप्त समजण्यांत येतील आणि त्यांपैकीं कांहींहि कोर्टांत पुरावा म्हणून सादर करण्यांत येणार नाहीं. हें आश्वासन दरबारनें आज्ञापत्रकाच्या स्वरूपांत दिल्यानंतर सावकारांनीं कमिटीला अवश्य असलेली माहिती दिली. असें आश्वासन दिलें नसतें आणि कोर्टांत चालू असलेल्या अथवा नंतर कराव्या लागणाऱ्या फिर्यादीअर्यादींच्या संबंधीं सावकारांचे सर्व कायदेशीर हक्क शाबूद ठेवले नसते तर सावकारांनीं माहिती दिली नसती. माहिती महत्त्वाची व जरूरीची, विषय नाजुक, आपल्या कुळांशीं असलेल्या व्यवहारांबद्दल शक्य तितकी गुप्तता ठेवण्याची सावकाराची स्वाभाविक इच्छा, या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या तर सावकारांनीं चोपड्या लिहिण्याबाबद आणि ऋणकोशीं व्यवहार करण्याच्या पद्धतींबाबद मोकळ्या मनानें आणि पुरेपूर माहिती दिली असें म्हटलें पाहिजे.

कर्ज फुगवण्याच्या युक्त्या

२०. कांहीं कुळांजवळून खऱ्या कर्जाच्या दुप्पट रकमेचीं, किंवा त्याच रकमेचीं दोन दोन कजखतें लिहून घेतलेलीं दिसून आलीं. वसुली वेळेवर व्हावी एवढ्याकरतां जादा हत्यार म्हणूनच जादा

रकमेचीं खतें अगर जादा खतें लिहून घेतलेलीं असत आणि जोडीला तोंडी करार केला जात असे कीं कुळानें जर वेळेवर पैसे दिले तर अव्वल रकमेची फेड होतांच सर्व व्यवहार पुरा करण्यांत येईल. पण या तोंडी कराराचा पुरावा ऋणकोपाशीं कांहींच नसे. अवास्तव रकमेची कोर्टांत सावकारानें मागणी केल्यास तोंडी कराराला लेखी खताविरुद्ध कोर्टांत कांहीं किंमत नसते. आणि सावकाराला आपल्या शब्दाची चाड कितपत असते याची कल्पनाच करणें बरें. खऱ्या रकमेच्या दुप्पट रकमेची सावकारानें मागणी करावी आणि त्याच्या मागणीप्रमाणें कोर्टानें हुकूमनामा करावा अशीं उदाहरणें कमिटीच्या पहाण्यांत बरींच आलीं.

थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे खोटे हिशोब ठेवणें आणि खोट्या व भ्रामक रकमा चोपडींत जमा उधार दाखवणें याचें सावकारांनीं एक शास्त्रच बनविलें होतें. व्याज अथवा पागडी म्हणून मांडलेल्या रकमा फार मोठ्या दिसतील असें वाटल्यास सावकार त्या नवीन दिलेल्या कर्जाच्या रकमा म्हणून दाखवीत असत, अथवा व्याज आणि पागडीच्या रकमा लिहिण्यांत गडबडगुंडा करीत असत. नवा कर्जरोखा नवीन कर्जासंबंधींच आहे असें दाखवण्यांत येत असे आणि हें खरें वाटावें म्हणून जुना कर्जरोखा संपण्याचा दिवस आणि नवा कर्जरोखा करण्याचा दिवस यांमध्यें कांहीं अवधि गेली आहे असें दाखविण्याची क्लृप्ति सावकार लढवीत असत. दोन खतें लिहून घेणें, खऱ्या रकमेच्या दुप्पट रकमेचें खत लिहून घेणें, बाकी राहिलेली रक्कम नवीन कर्ज म्हणून दाखवणें या सर्व क्लृप्त्या लढवल्याचे कांहीं दाखले, पुनरुक्तीचा दोष पत्करूनसुद्धां, कमिटीनें पुराव्याच्या भागांत दिले आहेत; हे दाखले दिले नसते तर लबाडीचे हे अनेक प्रकार किती फैलावले आहेत याची कल्पना देतां आली नसती. त्यांतहि आणखी खेदजनक गोष्ट अशी कीं सर्व सावकारांचे लबाडीचे मार्ग सारखे नसून दरएक सावकाराचे खास मार्ग असत आणि एक सावकार सुद्धां एकाच मार्गाला चिकटून रहात नसे तर ते वारंवार बदलीत असे. इतकेंच नव्हे तर निरनिराळ्या शेतकऱ्याबरोबर तोच सावकार निरनिराळ्या मार्गांचा अवलंब करीत असे. त्यामुळें नुसतीं खातीं तपासून मूळ मुदलाचा तपास लागणें शक्य नव्हतें. वाढविलेल्या रकमांचा त्यांत पत्ता लागत नसे आणि सावकारांनीं जें कांहीं तोंडी सांगितलें त्याशिवाय त्या रकमांचा पत्ता लावावयास दुसरें साधन नव्हतें. बरें, सावकार जें सांगत त्याला अन्य कांहींच पुरावा नव्हता. कमिटीला खासगी रीतीनें आणि उपरिनिर्दिष्ट आश्वासनामुळें सावकारांनीं जरी आपल्या धंद्याच्या खऱ्या खुब्या सांगितल्या तरी ते सावकार कोर्टांत तसें सांगून आपली बेअब्रू आणि आपल्या चोपड्यांची नापत करून घ्यावयास खास तयार झाले नसते. सावकार आणि खेडुत म्हणजे अव्वल धनको आणि ऋणको दोघेहि हयात असतांनासुद्धां खरा तपास लागणें इतकें अवघड, मग अव्वल ऋणको अथवा धनको अथवा दोघेहि मयत असतांना त्यांच्या वारसांच्यामध्यें मूळ मुद्दल किती होतें याबद्दल मतभेद झाल्यास त्याचा योग्य तपास व निकाल लावणें किती अवघड होत असेल याची कल्पना सहज करतां येते. कारण अव्वल कर्जखत लिहितांनाच मूळ मुदलाच्या दुप्पट रकम लिहिली असेल त्या व्यवहारांत मूळ ऋणको धनको हयात असल्यास ते आपल्या आठवणीच्या जोरावर कांहीं तरी मार्ग दाखवूं शकतात, ते मेल्यावर पहावयासच नको.

कांहीं सावकार एकच मुदतीच्या निरनिराळ्या खतावण्या ठेवीत असत. एकच माणसानें एकाच मुदतीमध्यें लिहून दिलेलीं खातीं सावकार निरनिराळ्या खतावणींत लिहून ठेवीत. असें करण्याचें कारण सावकारांनीं असें सांगितलें कीं वेळीं प्रसंगीं एक चोपडी कोर्टांत अडकली असल्यास व्यवहाराकरतां दुस-

रीचा उपयोग करतां यावा. पण एकाच कुळानें एकाच दिवशीं लिहून दिलेलीं दोन खातीं दोन निरनिराळ्या वह्यांत नोंदलेलीं दिसतांच शंका आल्याशिवाय राहीना आणि सावकारांनीं दिलेलें कारण खरें वाटेना. या पद्धतीमुळें लबाड सावकाराला लबाडी व्यवस्थितपणें करावयास फावत असे हें तर खरेंच, शिवाय साधारण प्रामाणिक सावकारापासून सुद्धां असल्या अव्यवस्थित लिहिण्यामुळें कुळाला सहजासहजीं धोका पोंचण्याचा संभव असे. कांहीं वर्षांनीं खुद्द सावकाराला सुद्धां अमुक एका ऋणकोनें अमुक एका दिवशीं द्यावयाचें खरें देणें किती हें सांगावयाचें झालें तर बारकाईनें निरनिराळ्या चोपड्या पहाण्याचे दीर्घ प्रयास केल्याशिवाय सांगणें मुष्किलीचें झाल्याशिवाय रहात नसे. याशिवाय, एका खात्यापोटीं दिलेली रकम मुदतीबाहेर गेलेल्या अथवा जाण्याच्या बेतांत असलेल्या दुसऱ्या खात्यापायीं जमा दाखवण्याची जुक्ति सावकार करूं शकत असे.

सावकाराकडे आंब्याच्या झाडासारखीं फळझाडें कबजेगहाण असतांना सुद्धां सावकार हिशोब ठेवण्याची मोठीशी काळजी घेत नसत. गहाणाच्या कायद्याप्रमाणें अशा झाडांची योग्य काळजी घेणें आणि वेळचेवेळीं बिनचूक हिशोब देणें हें सावकाराचें कर्तव्य असतें. सालोसाल फळांच्या विक्रीनें आलेल्या रकमा गहाणखतावर लिहिलेल्या नसत, किंवा व्यवस्थितपणें एका वहींत सुद्धां लिहिलेल्या नसत. कांहीं रकमांची नोंद एका वहींत तर दुसऱ्या कांहीं रकमांची नोंद दुसऱ्याच वहींत. कमिटीच्या असें नजरेस आलें कीं एकदां फळझाड सावकाराच्या हातांत कबजेगहाण म्हणून गेलें म्हणजे कोणच्या ना कोणच्या तरी युक्तीनें तें बेमुदत आपल्या हातांत ठेवावयाची सावकार व्यवस्था करी आणि होतां होईल तों तें झाड मूळ खेडुत मालकाला परत मिळूं देत नसे. खेडुतांनीं आपल्या दीर्घ परिश्रमानें वाढविलेलीं आंब्याचीं झाडें कायमचीं सावकारांच्या ताब्यांत गेलीं असें कितीतरी खेड्यांत आढळून आलें. खातेजमिनींतील झाडांच्या विक्रीला आणि गहाणाला मनाई करणारे नवे नियम किती योग्य वेळीं करण्यांत आले हें यावरून समजेल.

एकाच पद्धतीनें हिशोब ठेवण्याची सक्ती

२१. हिशोब लिहिण्यांतला अव्यवस्थितपणा आणि जाणून बुजून केलेल्या लबाड्या पाहून कमिटीचें मत असें झालें कीं एकच मुदतीबद्दल निरनिराळ्या चोपड्या लिहिणें आणि एकाच ऋणकोचीं खातीं निरनिराळ्या चोपड्यांत नोंदणें या गोष्टींना आळा घालण्यासाठी एकच पद्धतीनें हिशोब ठेवण्याची सावकारांना सक्ती केली पाहिजे. रोजमेळ न ठेवतां सर्व देण्याघेण्याचा हिशोब मोठ्या खतावणीतच जो सावकार लिहितो त्याला एका खेडुताचा हिशोब निरनिराळ्या खात्यांपोटीं लिहिण्याची बिलकुल अवश्यकता नाहीं, तो सर्व हिशोब एकाच खात्यांत दाखवतां येईल. कमिटीचें हें मत दरबारला पटलें नाहीं असें नव्हे. पण एकाच पद्धतीनें हिशोब लिहिण्याचा नियम केला तरी तो अमलांत आणण्याच्या मार्गांतल्या अडचणी दरबारच्या लक्षांत आल्यामुळें तसा नियम दरबारनें केला नाहीं. असा नियम करण्याची इष्टता दरबारला वाटली नाहीं असें मात्र नव्हे.

एकदांचा ऋणको कायमचा ऋणको

२२. एकदां अशा प्रकारें सावकाराच्या पाशांत खेडुत सांपडला कीं तो सावकाराच्या कर्जांत कायमचाच रहावयाचा. सावकारांनी दिलेल्या जबान्यांत नमूद केलेले व्यवहाराचे नमुने पहातां या विधानांत अतिशयोक्ति नाहीं, व रिपोर्टांत काढलेल्या चित्रांत फाजील दाट रंग भरलेले नाहींत हें स्पष्ट

होईल. सावकारांनीं आपल्या जवान्यांत जें सांगितलें त्याला अनुसरून त्यांच्या चोपडींत नोंदीहि सांपडल्या. पुराव्याच्या भागांत सावकारांच्या जबान्यांचा सारांश सटीप दिला आहे.

सार्वत्रिक जबर व्याज

२३. असले जबर व्याजाचे आणि हिशोवाच्या लटपटीचे दाखले तुरळक अथवा अपवादात्मक असतील असें कोणीहि समजूं नये. उलटपक्षीं साधारणपणें सगळेच व्यवहार अशा प्रकारचे होते असें म्हणणें योग्य होईल. व्याजबट्ट्याच्या धंद्यांत लोभीपणाचा इतका फैलाव झाला कीं त्यामुळें एकंदर वातावरणच जणुंकाय दूषित झालें आणि खेडुतसुद्धां त्या दोषी वातावरणानें दूषित झाला. खेडुत एकमेकांना पुष्कळदां कर्जाऊ रकमा देतात आणि अशा व्यवहारांत धनको खेडुत ऋणको खेडुतांशीं व्यवहार करतांना असल्याच जबर व अन्यायाच्या अटी लादतो.

खेडुताशीं सालसपणें आणि सचोटीनें व्यवहार करणारा एकाद दुसरा सावकार कमिटीच्या सभासदांस दिसून आला. पण असले दाखले म्हणजे अपवादात्मकच. त्यांच्यामुळें सभोंवतालचें दुष्ट चित्र अधिकच भेसूर दिसूं लागलें. सर्व सावकारांची एकच मोट बांधणें अयोग्य आहे असें क्षणभर म्हटलें तरी सुद्धां एवढें निःसंशयपणें सांगतां येतें कीं बहुसंख्य सावकारांचे व्यवहार वर वर्णन केलेल्या प्रकारचेच होते आणि त्यांच्यामध्यें कांहीं फरक शोधावयाचाच तर तो 'काळ्यापेक्षां पिठा बरा' अशा नमुन्याचाच असला तर असेल. कमिटीनें याबद्दल आपल्या रिपोर्टांत म्हटलें आहे तेंच या ठिकाणीं उद्धृत करणें चागलें: "एका टोंकाला आपल्या भांडवलावर नेमस्त फायदा मिळविण्यांत समाधान मानणारे अगदीं थोडे सावकार; दुसऱ्या टोंकाला अत्यंत लोभी, ज्यास्तींत ज्यास्त व्याज खाणारे, कुळाला पावलागणिक पिळणारे, खेडुताची जमीन हिरावून घेऊन सावकारासाठीं जमिनींत मोलमजुरी करण्याची पाळी शेतकऱ्यावर आणणारे शोषक सावकार; आणि यांचेमध्यें निरनिराळ्या प्रमाणांत संधि साधेल त्याप्रमाणें कुळाला नाडणारे बाकीचे सावकार असें हें चित्र आहे."

पैशाच्या असल्या प्रकारच्या व्यवहारांत खेडुतांची मोठी संख्या सांपडली म्हणजे कुठूनतरी मदत मिळाल्याशिवाय त्यांचा पाय ऋणपंकांतून बाहेर निघणें संभवनीय नसतें. खेडुतांना जो कांहीं अल्पस्वल्प फायदा रहातो त्याशिवाय मागील बाकी फेडण्याचें खेडुतांजवळ दुसरें कांहींहि साधन हल्लींच्या परिस्थितींत दिसत नाहीं. हा फायदा किती असतो? साधारण पिकाच्या वर्षी सरकारसारा आणि खेतीखर्च वजा जातां खेडुताच्या कुटुंबाचा वर्षभर कसा तरी गुजारा होईल इतकीच शिल्लक रहाते, आणि जेव्हां यापेक्षां ज्यास्त शिल्लक रहाते त्यावेळीं सुद्धां एक वर्षाच्या सरकारी साऱ्याच्या रकमेपेक्षां कांहीं ती शिल्लक ज्यास्त असूं शकत नाहीं. एकाद्या वर्षी पीक फारच चांगलें आलें आणि त्याचवर्षी धान्याचे भावहि सुधारले तर त्या वर्षापुरता ज्यास्त फायदा होऊं शकतो. पण गेल्या दहा वीस वर्षांचा इतिहास पहातां अशीं वर्षें फारच क्वचित्, अपवादात्मकच म्हणावयाचीं, आणि अशा एकाद्या सुबत्तेच्या वर्षाच्या उलट अवर्षणाचीं अथवा अतिवृष्टीचीं पुष्कळ वर्षें हिशोबीं धरावीं लागतात.

शेतीमधला नक्त फायदा

२४. सर्व गोष्टी लक्ष्यांत घेतां शेतकऱ्याचा फायदा एक वर्षाच्या सरकार दस्ताइतका असतो असा साधारण सिद्धांत मांडतां येतो. हा अंदाज रास्त आहे असें धरलें म्हणजे वार्षिक सरकारी

दस्ताच्या अनेकपट कर्ज ज्याच्या डोक्यावर आहे आणि पुनः पुनः कर्ज काढण्याची ज्याच्यावर पाळी हमखास ठेवलेली तो खेडुत वाहेरून मदत न मिळतां कर्जातून आपली मुक्तता करून घेऊं शकणार नाहीं हें सहज समजण्याजोगें आहे. असल्या खेडुताचे सर्व सायास आणि जो फायदा तो काहूं शकेल तो सर्व फायदा सावकाराकडे कायमचे गहाण पडलेले असावयाचे. कर्जातून मुक्त होण्याचा प्रयत्न एकाकी करणारा खेडुत आपल्याला पुराणांतल्या सायसिफसची आठवण देतो. या दुर्दैवी प्राण्याची अशी हकीकत सांगतात कीं त्यानें घेतलेलें ओझें डकलीत डकलीत तो टेंकडीच्या टेंकापर्यंत पोंचवी इतक्यांत तें सर्व ओझें पुनः वाढत्या जोरानें त्याच्या डोक्यावर आदळत असे. तशीच ऋणबद्ध खेडुताची अवस्था होते.

खेडुताचे करुणाजनक प्रयत्न

२५. आपलें सर्व कर्ज फेडून कर्जमुक्त होण्याचा भगीरथ प्रयत्न करणारे कांहीं खेडुत कमिटीला आढळून आले. त्यांनीं आपलें सर्वस्व सावकाराला दिलें. शेतीचे बैल, खटारा वगैरे शेतीला अवश्य असणाऱ्या वस्तु कायद्यानें जप्तीच्या आटोक्याबाहेर ठेवलल्या आहेत पण त्यासुद्धां या धीरवीर खेडुतांनीं देऊन टाकल्या. आपल्या पांच खेडुतकुळांजवळून एका वर्षांत लहान मोठे अठरा बैल, दोन रेडे व एक गाडी, आणि पुष्कळशी ज्वारी व वाजरी घेणारा एक सावकार कमिटीला आढळून आला. कर्जमुक्त होण्याचा ध्यास लागलेल्या कुळांनीं कर्जाचा गळ्यांतला धोंडा फेकून देण्यासाठीं असे भगीरथ प्रयत्न केले, स्वतांची जमीन देऊन टाकून ते स्वतां केवळ मजूर बनले तरी सुद्धां सावकारांच्या चोपड्यांत त्यांच्या नांवांवर बाक्या राहिल्याच. कवडीचुंबक सावकारांच्या निर्घृण हृदयाला सुद्धां कांहीं कांहीं वेळां द्रव आला आणि मोठें औदार्याचें सोंग आणून त्याप्रसंगीं बाकींपैकीं कांहीं रकमांची त्यांनी सूट दिली. इतका जुलूम करून कुळांना पिळण्याचा क्रम बरेच दिवस चालवणाऱ्या सावकारानें दाखविलेली दया स्वाभाविक मुळींच असूं शकत नाहीं; कुळाच्या अंगांत देण्याचें मुळींच सामर्थ्य राहिलें नाहीं असें पाहूनच त्यानें तो दयेचा फार्स केला असला पाहिजे हेंच ज्यास्त संभवनीय होय. कायद्यानें बैल आउतें वगैरेच्या जप्तीला बंदी केलेली आहे त्याचप्रमाणें खुषीनें सुद्धां बैल अथवा आउतें सावकाराला खेडूत देऊं शकणार नाहीं असा कायदा झाला पाहिजे, एरवीं जप्तीच्या आटोक्याबाहेर या वस्तु ठेवण्यांत जो उद्देश आहे तो सफल होणार नाहीं असें वाटतें. पण असला कायदा सुद्धां करायला सोपा पण अमलांत आणतांना मार्गांत अनंत व दुर्लंघ्य अडचणी उत्पन्न होतील असाच आहे.

प्रकरण दुसरें.

—:o:—

कमिटीचे निर्णय आणि शिफारशी

ऋणविमोचनासाठीं केलेले उपाय

२६. कमिटीनें असा निकाल दिला कीं कर्जांत आकंठ बुडालेल्या आणि दिवाळखोरीच्या सीमेवर असणाऱ्या खेडुताला वाहेरून मदत मिळून तो मुक्त झाला नाहीं तर खेडुत मरणप्राय स्थितीप्रत पोंचेल, निदान आमरण आर्थिक गुलामगिरीत खितपत पडेल. स्टेटकौन्सिलला कमिटीच्या अध्यक्षांनीं जी मिनीट सादर केली त्यांत वस्तुस्थितीचें अतिशय वाखाणण्यासारखें चित्र कमींतकमी शब्दांत काढलें आहे. त्यांत पुढील मजकूर आहेः— "

" प्रत्येक धंद्याला भांडवल लागतें, असें माझें मत असल्यामुळें शेतकऱ्याला थोडेंसें कर्ज असल्यास एकंदर आर्थिक स्थिती भयप्रद होते असें मी मानीत नाहीं. पण जेव्हां खेडुताचें कर्ज सारखें वाढतच जातें व सारखें वाढत गेल्यामुळें कधींहि न फिटण्याइतकें वाढतें, आणि सावकार–शेतकरी यांच्या व्यवहारांत व्याजाचे असह्य दर, पागडी म्हणा वटाव म्हणा अशा अनेक नांवाखालीं बसणारा बोजा यांचा सुळसुळाट दिसतो, तेव्हां ऋणबद्धतेचा रोग हाडीं जडला आहे आणि योग्य वेळींच त्याची नीट परीक्षा होऊन उपाययोजना झाली नाहीं तर तो रोग असाध्य होईल व अखेरीस खेडुताच्या आर्थिक नाशाला कारण होईल असाच निष्कर्ष काढणें प्राप्त होतें. "

या आर्थिक आपत्तींच्या भोंवऱ्यांत सांपडलेल्या खेडुताचें वर्तन कसें असतें यांचें वर्णन करतांना कमिटीनें म्हटलें आहे कीं सुदैवानें आपले खेडुत सुशील व गरीब आहेत. त्यांच्यांत थोडीशीसुद्धां लढाऊ वृत्ति असती तर त्यांची बंडखोरीकडे सहज प्रवृत्ति झाली असती. पण यापुढें योग्य उपाययोजना होण्यास जर विलंब लागेल तर बंडखोरीची वृत्ति उत्पन्न होणें अगदी संभवनीय आहे.

कमिटीच्या चौकशीमुळें दृष्टोत्पत्तीस आलेली शेतकऱ्याची भयजनक आर्थिक स्थिति ज्यावेळीं स्टेटकौन्सिलचे प्रेसिडेंट सर प्रभाशंकर पट्टणी यांना पूर्णपणें समजली त्यावेळीं ते एकदम खडबडून जागे झाले. त्यांची कल्पना शक्ति नैसर्गिक, त्यांची शेतकऱ्यांबद्दल सहानुभूति स्वाभाविक आणि त्यांचें व्यवहारज्ञान विशाळ असल्यामुळें त्यांची खात्री झाली कीं जर मोठ्या प्रमाणांत शेतकऱ्यांमध्यें अशांतता फैलावयास नको असेल तर कालावधि न जाऊं देतां ऋणबद्ध खेडुताला आर्थिक सुस्थिति प्राप्त करून देण्याकरितां तावडतोब योजना केली पाहिजे.

शेतकरीसंरक्षक कायदा

२७. योजलेल्या उपायांपैकीं एक उपाय शेतकरीसंरक्षक कायदा पास करणें हा होय. या कायद्यानें भूतकालच्या व्याजाच्या बोजांतून मुक्तता आणि भविष्यकालच्या आपत्तीपासून संरक्षण या दोनहि गोष्टी साधल्या आहेत. हा कायदा परिशिष्ट तीनमध्यें दिलेला आहे. असला विशेष स्वरूपाचा

कायदा करावयाचें प्रमुख कारण असें कीं, खेडुताच्या कर्जबाजारीपणाचा गैरफायदा सावकारानें घेतला आहे अशी स्पष्ट शंका आली तरी सुद्धां दिवाणी कोर्टें सामान्य कायद्यान्वयें आपन्न शेतकऱ्याला कोणत्याहि तऱ्हेची सवलत अथवा मदत देऊं शकत नसत. सावकाराला कोर्टाच्या कामाची पद्धत व नियम माहीत असे आणि तो खेडुताजवळून सहीशिक्यानिशीं व जरूर तितक्या साक्षीदारांच्या सह्यांनिशीं कर्जरोखे लिहून घेत असे. कायद्याच्या दृष्टीनें ते निर्दोष व संगीन असत. ते दस्तऐवज दाखल केल्यानंतर कोर्टांना हुकूमनामा करण्याखेरीज गत्यंतर नसे. सुसंस्कृत समाजाला आधारभूत असें लेखीकरारांचें पावित्र्य हें तुडवल्याशिवाय कोर्टें या कामीं कांहींच करूं शकत नसत. हुकूमनाम्याच्या बजावणीमुळें सुद्धां कमी हाल व दुर्दशा होत नसे. हुकूमनामा लहानशा रकमेचा असला तरी बजावणीचा योग्य व कायदेशीर त्याचप्रमाणें अयोग्य व अदृष्ट मिळून जो खर्च होई तो हुकूमनाम्याच्या रकमेइतका होई. यांचें कारण असें कीं हुकमांतली रकम लहान असो वा मोठी असो शेतकऱ्याचें उभें पीक सबंध जप्तींत ठेवावें लागे आणि कापणीची वेळ येऊन त्याची कापणी होऊन पीक खळावर जमा होईपर्यंत शेतकऱ्याच्या खर्चानें एक चौकीदार पहाऱ्याला बसवावा लागे. खेडुताच्या रक्षणाला कायद्याचें नेहेमीचें यंत्र अगदीं अपुरें पडे, इतकेंच नव्हे तर शेतकऱ्याला पिळावयाच्या व नाडावयाच्या कामींच त्याचा उपयोग होत असे.

कायद्याचा अपुरेपणा

२८. हा कायदा डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलीफ ॲक्टच्या वळणावरच घडवलेला आहे. या कायद्यान्वयें कोर्टांना कर्जाचा व्यवहार अव्वलपासून तपासावयाचा आणि मूळ कर्जाची रक्कम व ज्यास्तींत ज्यास्त दरसाल दर शेंकडा बारा टक्के व्याज एवढ्याचा हुकूमनामा करण्याचा अधिकार दिलेला आहे. या कायद्यांत दामदुपटीचा हितकर नियमहि समाविष्ट आहे. असा कायदा यापूर्वीच करावयास पाहिजे होता. पांढरपेशा वर्ग मागासलेल्यांना पिळतो असें ज्या समाजांत आढळतें तेथें दुसरा उपायच नसतो. कमिटीच्या अध्यक्षांचे मतें असा कायदा अवश्य होता आणि त्यांनीं असें दाखवलें कीं खेडुतांकरतांच नव्हे तर सर्व वर्गांच्या लोकांकरतां व्याजाचे दर मर्यादित करणारे कायदे इंग्लंडसारख्या पुढारलेल्या देशांत सुद्धां केलेले आहेत. पण फक्त असा कायदा करून काम भागणार नाहीं असें सर प्रभाशंकर पट्टणी यांचें मत पडलें. कमिटीच्या अध्यक्षांचे पुढें दिलेले उद्गार खरोखरच विचारार्ह आहेतः–

> "हा सर्व प्रश्न मोठा गुंतागुंतीचा आहे. ऋणको व धनको यांचा संबंध नेहेमींच नाजुक असतो आणि तोच या प्रश्नांत गोंवलेला आहे. सावकाराची मदत खेडुतांना वेळोवेळीं लागते. ग्रामव्यवस्थेंत सावकार अवश्य व अपरिहार्य असतो, त्याची जागा दरबार घेऊं शकत नाहीं. अशा विकट परिस्थितींत उत्तम मार्ग म्हणजे स्पष्ट आणि प्राप्त परिस्थितींत योग्य दिसणाऱ्या उपायांची योजना करून दोनहि पक्षांना अशा तऱ्हेनें पूर्व स्थितीवर आणून सोडावयाचें कीं त्यांचा एकमेकांवर विश्वास बसेल, ते एकमेकांची योग्य ती सेवा करतील आणि सावकार पिळण्याची इच्छा धरणार नाहीं व शेतकरी नाडला जाणार नाहीं. शिवाय कमिटीला चौकशींत दिसून आलेल्या वाममार्गाकडे दुर्लक्ष्य करून चालणार नाहीं, कारण जर त्या मार्गांना पुनः मोकळीक ठेवली तर खेडुतांची स्थिति पुनश्च बिघडेल, खेडुत वर्गाची नासधूस होईल आणि अखेरीस सावकारांनाहि अतोनात तोटा सोसावा लागेल."

व्यापारी वर्गाला निदान त्यांपैकीं जे कांहींसे दूरदृष्टि होते त्यांना ही विचारसरणी पटली आणि

खेडुतवर्गाची अनिर्बद्ध पिळणूक थांबवण्याकरितां कायद्यानें कांहींतरी नियमन केलें पाहिजे असें तेहि कबूल करूं लागले.

अगोदर ऋणविमोचन

२९. सर्वांचें असें मत पडलें कीं कायदा केला पाहिजे, पण कायद्यानें फक्त प्रतिबंध होईल. असलेल्या भीषण परिस्थितींत केवळ कायदा करून सुधारणा होणार नाहीं. डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलीफ ॲक्टनें खेडुताला जरूर ती मदत झालेली नाहीं, निदान अपेक्षित प्रमाणांत खास झालेली नाहीं. कितीहि चांगल्या हेतूनें आणि कितीहि काळजी घेऊन फायदा घडवला तरी केवळ कायद्यापासून होणारा फायदा मर्यादितच रहाणार. गोरगरीब खेडुतांची आर्थिक स्थिति सुधारून त्यांना अवश्य लागणारें भांडवल मिळवण्याचें सामर्थ्य त्यांना प्राप्त व्हावें हा उद्देश केवळ कायद्यानें साधणार नाहीं असें अध्यक्षांस वाटलें व त्यांनीं असा आग्रह धरला कीं कायदे करावयाच्या अगोदर खेडुतांच्या मागील कर्जाचा अखेरचा निकाल केला पाहिजे. ह्मणून शेतकरीसंरक्षक कायदा पास करतांनाच भावनगर दरबारनें ऋणविमोचनाची योजनाहि मंजूर केली. खेडुताच्या नांवें असलेल्या सर्व देण्याचा सपाट्यासरशीं निकाल लागावा आणि खेडुत उजळ माथ्यानें नवा व्यवहार करण्यास समर्थ व्हावा हा ऋणविमोचनाच्या योजनेचा अपेक्षित परिणाम होय.

ऋणविमोचनाची योजना

३०. ही ऋणविमोचनाची योजना परिशिष्ट चार मध्यें दिलेली आहे.

सावकार व खेडुत हे खुशीनें सहकार्य करावयास पुढें आले तरच ही योजना यशस्वी होण्याजोगी होती. योजनेचा पहिला नियम असा कीं ज्या महालांतले अगर टप्यांतले निम्मेपेक्षां अधिक सावकार व खेडुत या योजनेंत दिलेल्या अटींप्रमाणें आपल्या कर्जाची तडजोड करावयास आपली कबुली दर्शवितील त्या महालांत अगर टप्यांत ही योजना प्रथम अमलांत आणावी. योजनेमध्यें एकाच सावकाराचीं सर्व कुळें, तसेंच, एकाच कुळाचे सर्व सावकार यांचा एकसमयावच्छेदेंकरून परामर्श घेण्याची व्यवस्था होती. ऋणविमोचनासाठीं लागणारें द्रव्य दरबारनें कर्ज ह्मणून द्यावयाचें आणि नंतर अत्यंत सुलभ अशा हप्त्यांनीं तें खेडुतांकडून वसूल करावयाचें अशी योजना असल्यामुळें खेडुतांची ऐपत व शक्ति यांचा विचार करूनच दरबारनें किती रक्कम द्यावी हें ठरवणें अवश्य होतें. म्हणून त्या योजनेमध्यें तडजोडीनें द्यावयाच्या रकमेसंबंधीं दोन स्पष्ट निर्बंध घालावे लागले:—

(१) खातेदार ऋणको जो सरकारदस्त भरतो त्याच्या तिपटीपेक्षां ज्यास्त रकम एका खातेदाराच्या वतीनें द्यावयाची नाहीं.

(२) कोणच्याहि एका टप्यांत दर्शनी कर्जाचा जो एकंदर आंकडा असेल त्याच्या एक चतुर्थांशापेक्षां ज्यास्त रक्कम कोणच्याहि टप्याच्या वतीनें द्यावयाची नाहीं.

प्रकरण तिसरें

—:o:—

ऋणविमोचनाच्या योजनेचा प्रत्यक्ष अंमल

३१. लिलिया महालांतल्या पांचतळावडा टप्प्यांतील सावकार व खेडुत ऋणविमोचनाच्या योजनेचा फायदा घ्यावयास प्रथम पुढें आले. त्याचे अगोदर गधडा महालांतील सावकारांना खेडुतांशीं असलेल्या त्यांच्या देण्याघेण्याची तडजोड स्वीकारण्याविषयीं विनंति करण्यांत आली होती, परंतु तिचा त्यावेळीं कांहीं उपयोग झाला नाहीं. खेडुतांचा कर्जबाजारीपणा असाध्य रोगासारखा जडलेला असल्यामुळें स्वाभाविकपणें अनेक वर्षांत सावकार जेवढें खेडुतांजवळून वसूल करूं शकणार नाहीं एवढें द्रव्य या योजनेनें त्यांत एकदम मिळणार होतें यांचें महत्त्व त्यांच्या अदूरदृष्टीमुळें आणि दुराग्रहामुळें सावकारांच्या नजरेस आलें नाहीं. पांचतळावडा टप्यांतील सावकार जे कबूल झाले त्यांचें श्रेय शेठ परमानंद हकनी या नांवाच्या स्थानिक बनिया गृहस्थाला आहे. हा गृहस्थ शेतकरी असून शिवाय व्यापारी असल्यामुळें त्याचें सावकारांमध्यें तसेंच खेडुतांमध्यें बरेंच वजन आहे. त्यानें सावकारांचीं मनें वळवलीं आणि ऋणविमोचनाच्या योजनेपासून होणारे फायदे त्यांना पटवून दिले. आणि खेडुत तर आपल्या जुन्या व चिरडणाऱ्या कर्जाच्या बोजांतून सुटून आपलें आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्याच्या संधीचा फायदा घ्यावयास आतुर झालेले होते. इतकें झाल्याबरोबर एक न्यायखात्यांतला व एक वहिवाटदाराच्या दर्जाचा मुलकी खात्यांतला अशा दोन अधिकाऱ्यांची एक कमिटी नेमण्यांत आली. त्यांना हिशोबाच्या कामी तरबेज असणाऱ्या कारकुनांची मदत देण्यांत आली. या कमिटीनें १९३० च्या एप्रिल महिन्यांत पांचतळावडयांतील सावकारांचे हिशोब तपासावयास सुरवात केली. त्या टप्यांतलें काम पुरें होतें न होतें तींच लिलिया महालांतील उरलेल्या दोन टप्यांतले सावकारांहि या योजनेच्या अंमलाखालीं यावयास तयार झाले.

सावकारांचे हिशोब अत्यंत भानगडीचे आणि बनावट असल्यामुळें त्यांची तपासणी करण्याचें काम सायासाचें व शीण आणणारें होतें. त्यामुळें सुरवातीला फारच मंद प्रगति होत होती. हळुहळु कमिटीला कामाचा सराव झाला व माहितीहि झाली आणि कमिटी ज्यास्त झपाट्यानें व विश्वासानें पुढें पावलें टाकूं लागली. पांचतळावडा टप्यानें कमिटीचे पांच सहा महिने घेतले तर नंतरच्या टप्यांनीं तीन चारच महिने घेतले. लिलिया महालांत दर्शनी कर्जाचा आंकडा रु. ९,९८,३८४ इतका दिसून आला आणि या कर्जाच्या फेडीसाठीं भावनगर दरबारनें सावकारांना रु. २,६३,७७७ दिले. अशा रीतीनें सावकार खेडुत यांच्या देण्याघेण्याचा निकाल झाला.

या योजनेचा फायदा घेणाऱ्या लिलिया महालांतील सावकारांच्या हातांत पडणाऱ्या मोठमोठ्या रोकड रकमा पहातांच इतर महालांतील सावकारांना सुद्धां योजनेपासून होणारे हमखास फायदे दिसूं लागले. लिलिया महालांत कमिटीचें काम चालू असतांनाच उमराळा महालांतील सावकारांनीं योजनेचा अंमल करण्याविषयीं अर्ज केला. वाढत्या कामाला एक कमिटी पुरी पडणार नाहीं म्हणून तीन कमिट्या नेमण्यांत आल्या आणि न्याय व मुलकी खात्यांतील आणखी अंमलदार या कामाकडे लावले. उमराळा महालांतील काम संपतें न संपतें तोंच ज्या गधडा महालांतील सावकार प्रथम विचारलें असून

सुद्धां नाकबूल होते त्याच गधडा महालांतले सावकारहि कबूल झाले. उमराळा महालांतून मोकळ्या झालेल्या कमिट्यांना गधडा महालांत रवाना केलें आणि ९३२ च्या आक्टोबर अखेर उमराळा आणि गधडा हे दोनहि महाल पुरे करण्यांत आले.

नंतर दोन कमिट्या कुंडला महालांत गेल्या आणि एक कमिटी महुवा महालांत गेली. सुरवातीला या मोठ्या महालांपैकीं कांहीं कांहीं टप्यांतलें सावकार तेवढे या योजनेचा फायदा घ्यावयास तयार झाले. पण जेव्हां कामाची प्रगति होऊं लागली आणि जुन्या कर्जाच्या फेडीपायीं दरबारकडून सावकारांना मिळणाऱ्या मोठमोठ्या रोकड रकमा नजरेसमोर खेळूं लागल्या तेव्हां इतर टप्यांतील सावकारहि योजनेचा स्वीकार करावयास सरसावले. सावकारांनीं एकदां कबुली दाखवल्यानंतर जर कर्जाच्या निकालाला विलंब लागला तर सावकार व खेडुत या दोनहि वर्गांना अतिशय नुकसान पोंचेल आणि दर्शनी कर्जाचा आंकडा वाढून दरबारलाहि अधिक रकम देणें भाग पडेल हें लक्ष्यांत आल्यामुळें तीन कमिट्यांच्या जागीं १९३२ च्या आक्टोबर महिन्यांत सहा कमिट्यांची नेमणूक झाली, आणि काम आणखी झपाट्यानें होऊं लागलें. सन १९३३ च्या आक्टोबर महिन्यापर्यंत सात टप्यांचा कुंडला महाल, पांच टप्यांचा महुवा महाल, आणि तीन टप्यांचा बोटाद महाल इतक्या सर्व प्रदेशांतील काम पुरें झालें. तोंपर्यंत व्हिक्टर व तलाजा महालांतील सावकार कबूल झाले आणि अखेरीस दस्क्रोई व सिहोर महालांतले सावकारहि तयार झाले. व्हिक्टर महालांत पाठविलेल्या दोन कमिट्यांनीं आपल्या चारहि टप्यांचें काम साडेसहा महिन्यांत संपवलें. व्हिक्टर व तलाजा महालांतून मोकळ्या झालेल्या चारहि कमिट्या दस्क्रोई महालांत गेल्या आणि तेथल्या चारहि टप्यांचें काम पांच महिन्यांत आटोपलें. बोटाद महालांतून मोकळया झालेल्या दोन कमिट्यांकडे सिहोर महाल सोपवण्यांत आला आणि त्यांनीं त्यांतील तीनहि टप्यांचें काम सहा महिन्यांच्या आंत संपवलें.

येणेंप्रमाणें सन १९३० च्या एप्रिल महिन्यांत पांचतळावडा टप्यांत सुरू केलेलें काम सन १९३४ च्या मार्च महिन्यांत तडीस गेलें. म्हणजे या कामाला एकंदर तीन वर्षें व अकरा महिन्यांची मुदत लागली. संस्थानांतील मोठ्या भागांतलें—म्हणजे ३७ टप्यांपैकीं २० टप्यांतलें—काम शेवटल्या बारा चौदा महिन्यांत म्हणजे सहा कमिट्या काम करीत होत्या त्या कालांतच झालें हें या जागीं नमूद केलें पाहिजे.

कमिटीच्या निकालांचीं पत्रकें

३३. परिशिष्ट एक व दोन हीं सांगोपांग पत्रकें आहेत. त्यांत महाल, महसूल, क्षेत्रफळ, खातेदारांची संख्या, कर्जविरहित आणि कर्जबाजारी खेडुतांची संख्या व प्रमाण सावकारांच्या चोपड्यांत दाखविलेली कर्जाची रक्कम, कर्जाच्या तडजोडीसाठीं दिलेली रक्कम वगैरे माहिती दिलेली आहे. त्या पत्रकांकडे नजर टाकतां असें दिसेल कीं एकंदर खातेदारांची संख्या २७,८९८ असून त्यांपैकीं जवळ जवळ पंचावन टक्के म्हणजे १५, ४०५ खातेदार कर्जांत नव्हते व बाकीचे १२,४९३ म्हणजे पंचेचाळीस टक्के खातेदार कर्जबाजारी होते. कर्जविरहितवर्ग म्हणून जो दाखविलेला आहे त्यांत १५६० खातेदार असे आहेत कीं शेतीच्या जोडीला व्यापार अथवा कांहीं तरी अन्य धंदा ते करीत असल्यामुळें या ऋणविमोचनाच्या योजनेचा त्यांना फायदा देणें शक्य नव्हतें. हीं संख्या वजा केली तर कर्जविरहित खेडुतांची संख्या कमी होते आणि कर्जबाजारी खेडुतांचें प्रमाण वाढतें.

आंकड्यांतील विसंगति

३४. चोपड्यांत सावकारांनीं दाखवलेल्या एकंदर कर्जाची बेरीज रु. ८६,३८,८७४ होते खातेदारांची संख्या आणि दर्शनी कर्जाचा आंकडा या दोनही प्रकरणांत पहिल्या चौकशीपेक्षां नंतर दिसलेले आंकडे मोठे आहेत. या फरकाचें कारण ह्मणजे पहिली चौकशी आणि निरनिराळ्या महालांत निरनिराळ्या वेळीं झालेला ऋणविमोचनयोजनेचा अंमल यामध्यें गेलेला कालावधि. हा कालावधि सुद्धां सर्व ठिकाणी सारखा नसून कांहीं भागांत चार वर्षांचा तर दुसऱ्या कांहीं भागांत त्याहूनहि अधिक ह्मणजे चार व आठ वर्षांच्या दरम्यान कांहीं तरी मुदतीचा. एका विशिष्ट भागांत पहिली चौकशी झाल्यापासून योजनेचा त्या भागांत अंमल होण्यापर्यंत गेलेल्या कालांत कांहीं जुन्या खात्यांचे विभाग झाले असले पाहिजेत, किंवा पूर्वीचा खातेदार मेल्यानंतर खातें जरी नांवानें एकत्र असलें तरी वारसांच्या वाढीमुळें खातेदारांची संख्या वाढली असली पाहिजे. याकारणें पहिल्या चौकशी कमिटीनें दाखविलेल्या २२,४१३ खातेदारांच्या जागीं अखेरीस २७,८९८ खातेदार प्रत्यक्ष दिसून आले.

त्याचप्रमाणें पहिल्या चौकशीच्या वेळीं ज्या बाक्या होत्या त्यांचेवर जबर व्याजाचा बोजा पडावयाचा होता आणि शिवाय नवें खातें करतांना त्याच रकमा सवाईपासून दुपटीइतक्या वाढावयाच्या होत्या. स्वाभाविकपणें एवढ्या मुदतींत कर्जाचा आंकडा पुष्कळसा वाढला. या मुदतींत कांहीं रकमेची फेड झाली असलीच पाहिजे आणि त्या फेडीमुळें कर्ज कमी व्हावयास पाहिजे होतें. पण या मुदतींत जरी पिकें फारशीं बुडालीं नाहींत तरी विशेष अशी सुवत्ताहि नव्हती. शिवाय अलीकडल्या मुदतींत धान्य व कापूस यांच्या किंमती झपाट्यानें उतरल्यामुळें कर्जाच्या फेडींत देण्यास शेतकऱ्याच्या हातीं येणाऱ्या रकमा अगदींच रोडावत चालल्या होत्या. हीं कारणें लक्ष्यांत घेतलीं ह्मणजे पहिल्या चौकशी कमिटीनें मुक्रर केलेला रु. ५१,४१,४१८ चा कर्जाचा आंकडा असतां नंतरच्या कमिटीच्या रिपोर्टांत कर्जाचा आंकडा रु. ८६,३८,८७४ दिसावा याचें आश्चर्य वाटणार नाहीं. कालावधीशिवाय या फरकाला आणखीसुद्धां एक महत्त्वाचें कारण घडलें. पहिल्या चौकशीच्यावेळीं इभ्रतीखातर ह्मणा, सावकाराजवळची पत जाण्याच्या भीतीनें ह्मणा, सावकाराच्या शिकवणीनें ह्मणा–खेडुतांची प्रवृत्ति खरी वस्तुस्थिती उघडकीस येऊं न देण्याकडे होती. पण नंतर जेव्हां कर्जाची तडजोड व फेड करण्याची वेळ आली त्यावेळीं ही प्रवृत्ति नष्ट झाली. ती वेळ जेव्हां आली तेव्हां जें जें म्हणून येणें असेल तें तें उघडें करणें हेंच सावकाराच्या हितांचें झालें. कारण या योजनेची एक महत्त्वाची अट अशी होती कीं ज्या ज्या ठिकाणीं ही योजना अमलांत येईल त्या त्या ठिकाणीं तडजोडीच्या दिवसांपर्यंतच्या सर्व देण्याचा निकाल झाला असें समजावयाचें आणि नंतर त्यापैकी कोणत्याहि देण्यासंबंधीं कोर्टांत दाद मागण्याचा मार्ग बंद व्हावयाचा. ही अट घातली नसती तर योजनेचा मुख्य उद्देश–ह्मणजे संपूर्ण ऋणविमोचन–विफल झाला असता. ऋणको शेतकऱ्यांचे सर्व सावकार आणि सावकाराचे सर्व ऋणको यांचा अंतर्भाव झाल्याशिवाय ऋणविमोचन संपूर्ण होऊं शकलें नसतें.

कर्जाचा मोघम अजमास निरुपयोगी ठरतो

३५. प्राथमिक तपासणींत तयार केलेला कर्जाचा आंकडा आणि नंतर कर्जाच्या तडजोडीसाठीं तपशिलवार चौकशी करून तयार केलेला आंकडा यामध्यें एवढा ह्मणजे जवळ जवळ पन्नास टक्यांचा फरक पडला हें पाहिलें ह्मणजे, एकंदर शेतकऱ्यांच्या कर्जाबद्दल अंदाज करणें किती धोक्याचें आहे हें

समजेल. विशेषेंकरून अशा अंदाजावर कर्जफेडीच्या योजनेचा पाया उभारावयाचा असेल तर हा धोका आणखी वाढतो. खेडुतांच्या कर्जाबद्दलचे अचुक आकडे जमा करणें अत्यंत खटपटीचें काम असतें, पण जर विश्वसनीय माहिती पाहिजे असेल तर तेवढी खटपट करणें अवश्य आहे.

कर्जाचें महसुलाशीं प्रमाण.

३६. रु. ८६,३८,८७४ चें कर्ज २७,८९८ खातेदारांमध्यें विभागल्यास एका खातेदारामागें सरासरी रु. ३०९ चें कर्ज निघतें. सबंध संस्थानचा जमीनमहसूल रु. २६,५६,५५४ आहे, ह्मणजे कर्जाचें महसुलाशीं ३:१ हें प्रमाण पडतें. सर्व खातेदारांतून कर्जात नसलेले खातेदार वगळले ह्मणजे १२,४९३ रहातात आणि यांचेमध्यें कर्जाची विभागणी केली ह्मणजे दरएक खातेदारामागें रु ६९१–७–११ इतकी कर्जाची रक्कम येते. या खातेदारांकडून मिळावयाचा सारा रु. १३,७९,६९६ असून, त्या साऱ्याच्या दर रुपयास कर्जाचें प्रमाण रु. ६–४–२ इतकें पडतें. हे आंकडे सबंध संस्थानच्या सरासरीचे असून महालावारी या आंकड्यांत फरक पडेल. कमी महसुलाच्या महालांत ज्यास्त कर्जबाजारी आहे हा शोध पहिल्या कमिटीनें लावला आणि ऋणविमोचन कमिटीनें केलेल्या चौकशींत या शोधाला बळकटी मिळाली.

ऋणबद्धतेचा पसारा आणि भार किती आहे याची ज्यास्त चांगली कल्पना यावयास आणखी एक गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे. शेंकडा ४४.८ टक्के ऋणबद्ध खेडुतांपैकीं फक्त ७ टक्के खेडुतांच्या डोक्यावर दोनवर्षांच्या साऱ्याइतका कर्जाचा बोजा असून इतरांच्या डोक्यावर साऱ्याच्या तिप्पट, पांचपट अथवा दसपट बोजा आहे; हे इतर म्हणजे ३७.८ टक्के खेडुत होत. शेतकऱ्यांच्या कर्जाचा निकाल करण्यासाठीं दरबारला जें कर्ज म्हणून द्यावें लागलें त्याचें महसुलाशीं प्रमाण एक रुपयास दीड रुपया असें होतें. आणि ऋणबद्ध खेडुतांच्या जमिनीवर ती रक्कम विभागली तर दर बिघ्यामागें रु. २–२–१ असें प्रमाण पडतें.

ऋणविमोचन एक अपूर्व प्रयोग

३७. ' ही ऋणविमोचनाची योजना म्हणजे एक अपूर्व प्रयोग किंबहुना साहस असल्यामुळें भावनगर दरबारनें जरा भीतभीतच योजना अमलांत आणली. सर्व शेतकरी कर्जातून मोकळे करावयाचे आणि त्यासाठीं रु. २०,५९,४७३ एवढी भलीभक्कम रक्कम दरबारनें द्यावयाची–ही लहानसहान गोष्ट नव्हती.

शेतकरी कर्जात असणें ही गोष्ट हिंदुस्थानभर फैलावली आहे. ही एक रोगाची सांथच आहे आणि हिला आळा घालण्याकरतां तात्पुरते व कायमचे असे दोनहि प्रकारचे अनेक उपाय अनेक ठिकाणी सुचवण्यांत आले आहेत आणि कांहीं ठिकाणीं थोड्याशा प्रमाणांत अमलांतहि आणलेले आहेत. खेडुताचा कर्जाचा भार कमी व्हावा आणि त्याची सांपत्तिक स्थिति सुधारावी हेंच त्या सर्व उपायांचें उद्दिष्ट असतें. पण सर्व कर्ज एकदां धुवून काढणें हें मात्र असामान्य कार्य आहे. हें कार्य फार जोखमीचें आहे पण कार्य इतकें इष्ट आहे कीं तें जोखीम पत्करणें हेंच भावनगर दरबाला पसंत पडलें.

कर्जापायीं शेतीची खराबी

३८. आर्थिक जोपासना काळजीपूर्वक झाली नाहीं तर कोणचाहि धंदा नीट चालावयाचा नाहीं. शेती हा हिंदुस्थानांतील सर्वांत मोठा धंदा असल्यामुळें ग्रामोद्धार करावयाची ज्यांना इच्छा

असेल त्यांनीं शेतीच्या आर्थिक जोपासनेकडे प्रथम लक्ष्य पुरवलें पाहिजे. हिंदुस्थानांत व्याजाचे दर दहापासून तीनशें टक्केपर्यंत, क्वचित् त्याहूनहि अधिक, असतात असा बँकिंग इन्क्वायरी कमिटीनें निर्णय केला आहे; असा जबर व्याजाचा बोजा असलेलीं जुनीं देणीं विचारांत घेतल्याशिवाय शेतीची आर्थिक जोपासना होऊं शकणार नाहीं. हा सवामणाचा लंगर जोंपर्यंत त्याच्या गळ्यांत लटकत आहे तोंपर्यंत कोणत्याहि खेडुताला आपल्या शेतींत लक्ष्य पुरवावेंसें वाटणार नाहीं. खेडुत आहेत तितके दैववादी आणि सनातनी नसते तर आजपर्यंत त्यांनीं जे दिवस काढले ते सुद्धां त्यांना काढतां आले नसते. मात्र खेडुत आपले दिवस काढीत असतो तो विषण्णमनानें आणि उदासीनपणें काढीत असतो, त्याचें अंतःकरण त्याच्या कामांत असूं शकत नाहीं. कर्जाच्या बोजाचा खेडुतावर काय परिणाम होतो याबद्दल वर्तमानपत्रांत लिहिणाऱ्या एका लेखकानें म्हटलें आहे कीं, आपल्या शेतीमध्यें कमीपणा येण्याचें मुख्य कारण मानसिक आहे; कर्जाचा सवामणाचा लंगर ज्याच्या गळ्यांत आहे अशा शेतकऱ्याकडून आपण परिश्रम व उत्साह यांची फारशी आशा करणें व्यर्थ आहे. कर्जमुक्त झालेल्या खेडुतांना वाटत असलेला मनमोकळेपणा पाहिला म्हणजे हें म्हणणें खरें दिसतें. सर प्रभाशंकर•पट्टणींच्या एका मित्रानें ऋणविमोचनाच्या योजनेबद्दल कांहीं माहिती विचारली. उत्तरीं सर प्रभाशंकर साहेबांनीं असें लिहिलें कीं या योजनेचा एक मोठा अनुकूल परिणाम म्हणजे शेतकऱ्याच्या अंतःकरणांत झालेला फरक होय. ऋणबद्ध शेतकऱ्याला नेहमीं भीति वाटत असे कीं आपण मशागत करून पीक उभें करावें तोंच सावकार तें जप्त करणार; या भयामुळें तो कसातरी काम करीत असे. आतां शेतकरी त्या भयांतून मुक्त झाला असल्यामुळें आपलें काम तो मन लावून आणि परिश्रमपूर्वक करतो कारण आतां तो जें पीक आणील तें सुरक्षितपणें त्याच्याच हातांत राहील अशी त्याला खात्री वाटूं लागली आहे.

औदासीन्य अयोग्य आहे

३९. शेतकऱ्याच्या ऋणविमोचनाची अवश्यकता सिद्ध करीत बसण्याची अवश्यकताच नाहीं असें म्हणतां येईल. हा प्रश्न गंभीर आणि भयप्रद आहे हें जो तो कबूल करतो. असें असतां त्याच्या संबंधीं जी संन्यासी वृत्ति धारण करण्यांत येते तिचें अधिकच आश्चर्य वाटतें. शेतकी कमिशनच्या शब्दांत सांगावयाचें झणजे या प्रश्नाकडे दुर्लक्ष्य करून तो सोडवण्यासाठीं कांहीं न करणें हें वाईटांतलें वाईट धोरण आहे. अतिशय बारकाईनें तपास करून पूर्ण विचारांतीं बँकिंग इन्क्वायरी कमिटीनें असें मत दिलें आहे कीं सर्व देशाच्या आर्थिक उन्नतीसाठीं आणि लोकसंख्येच्या मोठ्या भागांत अशांततेच्या प्रसाराला आळा घालण्यासाठीं ऋणविमोचनाची ज्यास्तींत ज्यास्त अवश्यकता आहे. खेड्यांत रहाणाऱ्या आर्थिक दुर्दशेमुळेंच देशांतील राजकीय असंतोष उत्पन्न झालेला आहे. कमिटीचे अध्यक्ष दिवाणबहादुर त्रिभोवनदास म्हणतातः—

> " माझें असें मत आहे कीं शेतकऱ्यांच्या हाडींमासीं खिळलेली ऋणबद्धता आणि जमीनदार वर्गाकडून कुळांची होत असलेली पिळणूक यांमधूनच हल्लींच्या राजकीय चळवळीचा उगम झाला आहे. कोणीहि खेडेगांवांत जावें आणि गरीब लोकांची स्थिति कशी आहे तें न्याहाळून पहावें, म्हणजे त्याची खात्री होईल. आपलें वस्तान बसवावयास जहाल लोकांना ही भूमि स्वाभाविकपणेंच अनुकूल वाटते. शेतकरी वर्गाची स्थिति सुधारण्याचीं सर्व साधनें उपभोगांत आणून असंतोषाचें मूळच उखडून टाकणें हें ठिकठिकाणच्या सत्ताधाऱ्यांचें काम

आहे. आमचे सर्व प्रयत्न या एका हेतूप्रीत्यर्थ आहेत. आम्ही प्रचार करणारे नाहीं पण आपल्या बुद्धीप्रमाणें आपापल्या क्षेत्रांत कार्य करणारे आहोंत. "

खेड्यांतील शेतकऱ्यांचें आर्थिक पुनरुज्जीवन करण्याकडे जर वेळींच लक्ष्य दिलें नाहीं तर आजची गंभीर व भयप्रद स्थिति आणखी खराब होईल आणि कितीहि अप्रामाणिकपणें व हिंसावृत्तीनें चालविलेली राजकीय चळवळ घडवूं शकणार नाहीं अशी उलथापालथ या आर्थिक दुर्दशेमुळें देशभर घडून येईल. आर्थिक समाधान ज्या प्रदेशांत असतें तेथें राज्यकारभार सुरळीतपणें चालतो. आणि आर्थिक समाधान निर्माण व्हावयास पाहिजे असेल तर देशाचा प्राण जो शेतकरीवर्ग त्याची तुंबलेल्या कर्जाच्या बोजांतून मुक्तता प्रथमतः झाली पाहिजे.

ऋणविमोचन व ग्रामोद्धार

४०. टाइम्स ऑफ इंडियामध्यें एका गृहस्थाचें पत्र प्रसिद्ध झालें होतें त्यांत पुढील मजकूर होता:—

" शिक्षणाच्या जोडीचा ग्रामजीवनांतला अत्यंत विकट प्रश्न म्हणजे हिंदुस्थानच्या शेतीला करकचून आंवळणारे बंध तोडून टाकणें हा होय. हिंदी शेतकरी कर्जांत जन्माला येतो, कर्जांत रहातो व कर्जांतच मृत्यु पावतो. म्हणून ग्रामोद्धाराची कोणचीहि योजना अमलांत आणावयाची पूर्वतयारी ऋणविमोचनानें केली पाहिजे. खेड्यांच्या पुनर्घटनेला यापुढें आणखी विलंब झाला अथवा अर्धवट पुनर्घटना केली तर शहरांत बेकारी माजल्यामुळें अन्नासाठीं होणाऱ्या दंग्यांपेक्षां फारच भयंकर प्रकारची अंदाधुंदी आणि बेशिस्ती माजेल."

कर्जाची फेड न करणें

४१. कांहीं कांहीं भागांत परिस्थिति इतकी बिकट झाली आहे कीं, शेतकऱ्यांचा सर्वनाशापासून बचाव व्हावयास पाहिजे असेल तर सर्व कर्ज झुगारून देण्याची त्याला परवानगी दिली पाहिजे अशी सूचना कांहीं ठिकाणांहून येत आहे. बंगाल नॅशनल चेंबर ऑफ कामर्सचे प्रेसिडेंट व बँकिंग इन्क्वायरी कमिटीचे एक सभासद श्री. नलिनीरंजन सरकार यांनीं नुक्त्याच केलेल्या एका भाषणांत ही सूचना आढळून येते. पुस्तकी विद्वान् आणि जहाल राजकारणी यांचेशिवाय कोणीहि अशी सूचना करणार नाहीं असें कोणीहि समजूं नये. कारण हिंदुस्थानांतील अनेक प्रांतांतील कायदेकौन्सिलांत ही सूचना ग्रथित करणारे ठराव पास झाले आहेत. पण हा उपाय इतका त्याज्य आहे कीं त्याची चर्चाहि करण्याची अवश्यकता नाहीं ! हा उपाय जसा सावकाराला तसाच शेतकऱ्यालाहि अतिशय घातुक आहे. पण शेतकरी आपल्या शक्तीबाहेर कांहींहि देऊं शकणार नाहीं हें लक्ष्यांत बाळगलें पाहिजे व सावकारानेंहि हें लक्ष्यांत बाळगलें पाहिजे. शेतकरी कांहीं देऊं शकत नाहीं आणि सावकाराला कांहीं मिळूं शकत नाहीं ही कुचंबणेची स्थिति जोंपर्यंत चालू आहे तोंपर्यंत कोणाचेंहि हित तर होणार नाहींच, उलट झाला तर दोनहि पक्षांचा तोटाच होण्याचा संभव आहे. आणि भविष्यकाळीं मोठ्याप्रमाणांत होणारा त्रास चुकवावयाचा असेल तर ही स्थिति शक्य तितक्या लवकर बदलली पाहिजे. कर्जाच्या अमर्याद बोजाखालीं चिरडलेला शेतकरीवर्ग उसळला तर तो निराशेच्या बेदरकारीनें अराजकता निर्माण करील आणि तशी अराजकता निर्माण व्हावयास नको असेल तर हा बोजा उतरविण्याची कांहीं तरी योजना केली पाहिजे असें जें श्री. नलिनीरंजन सरकार आपल्या उपरिनिर्दिष्ट भाषणाचा समारोप करतांना म्हणाले तें अगदीं रास्त आहे.

कृतीचा अभाव

४२. कर्जाचा बोजा नाहींसा केला पाहिजें हें सर्वांना पटतें असें असून सुद्धां कृतीची वेळ आली ह्मणजे प्रश्न बाजूस सारण्यांत येतो. असें कां होतें ह्याचा थोडासा खुलासा श्री. गोपाळ कृष्ण देवधर यांना सर प्रभाशंकर पट्टणी यांनीं जें भावनगरमधील योजनेसंबंधीं पत्र लिहिलें त्यांतून येथें उद्धृत केलेल्या शब्दांवरून होऊं शकतो. सर प्रभाशंकर लिहितातः—

> "मी मानसपृथक्करणशास्त्रांतला तज्ञ नाहीं. पण आपला सर्वसाधारण अनुभव असा आहे कीं ज्यावेळीं आपणाला एकादी गोष्ट करण्याचें सामर्थ्य नसतें अगर इच्छा नसते त्यावेळीं आपण तसें कबूल करीत नाहीं. उलट ती गोष्ट महत्त्वाची नाहीं अथवा ती गोष्ट करावयाची वेळ अजून आली नाहीं असें कांहीं तरी आपण ह्मणत असतों. खेडुतांच्या ऋणविमोचनाच्या कामीं अकरण ज्यावेळीं आपण पहातों त्यावेळीं असलाच प्रकार असतो असें मला वारंवार वाटतें. अंतःप्रवृत्तीला ऋणविमोचन झालें पाहिजे असें वाटतें. पण करावयाच्या कार्याच्या विकटपणामुळें जागरुक मन बिचकून जातें आणि आपल्या कृतिशून्यतेच्या धोरणाच्या समर्थनार्थ कार्याचें महत्त्वच आपण कमी ठरवतों अथवा एकदां कर्जमुक्त झाला तरी शेतकरी पुनः कर्जात पडेल आणि पूर्वीच्याच अवस्थेची पुनरावृत्ति होईल असें दुर्दैवी चित्र आपण उभें करतों." (परिशिष्ट ७–४ पहा).

सहकारी चळवळींतील विघ्न

४३. या प्रश्नाच्या गड्ढ्याला हात न घालतां बाहेर बाहेर घोटाळत रहाण्याचा परिणाम असा होतो कीं सरळ मार्ग सुटतो, जुन्या कर्जाचा चालत आलेला बोजा नजरेआड होतो आणि सहज व स्वस्त दरानें कर्ज कसें मिळेल याबद्दलच्या योजनांत लोक गुंतून जातात. मागल्या कर्जाचा विचार बाजूस सारून स्वस्त दरानें कर्ज देण्यासाठीं सहकारी बँकांची योजना अमलांत आणण्याचे प्रयत्न केले असतां ते व्हावे तितके यशस्वी होऊं शकत नाहींत; कांहीं ठिकाणीं ते जवळ जवळ फुकट जातात असें ह्मणतां येईल. जरूर लागणारें भांडवल पुरवण्याचा नवा मार्ग पूर्वीच्या कर्जातून शेतकरी मुक्त झाले तरच यशस्वी होऊं शकेल.

सहकारी पतपेढ्यांचें यश

४४. जसा अनुभव मिळत आहे तशा सहकारी पतपेढ्यांपासून होणाऱ्या सुपरिणामाच्या मर्यादा दिसूं लागल्या आहेत. इतकेंच नव्हे तर आपल्या मर्यादित क्षेत्रांत सुद्धां सहकारी पतपेढ्या विनशर्त यश मिळवूं शकतात किंवा नाहीं याबद्दल शंका घेण्यांत येते. शेतकऱ्याला कमी व्याजानें भांडवल मिळण्याची व्यवस्था झाल्यामुळें शेतकरी सावकारावर पूर्वीपेक्षां कमी प्रमाणांत अवलंबून रहावा हा पतपेढ्यांचा उद्देश मुळींच सफल झालेला नाहीं. कांहीं कांहीं ठिकाणीं तर असा प्रकार आढळून येतो कीं पतपेढ्यांची काम करण्याची रीत फाजिल नियमबद्ध अतएव जड असल्यामुळें सावकाराच्या हातांत शेतकरी ज्यास्तच असहायतेनें सांपडतात. पेढ्यांनीं कर्ज देण्याच्या सवलती वाढविल्या म्हणून कर्ज काढण्याची वृत्तिहि शेतकऱ्यांत वाढली. त्याच्याचबरोबर सावकाराचें देणें देण्यासाठीं पतपेढीचें कर्ज घ्यावयाचें आणि पतपेढीचें देणें फेडण्यासाठीं सावकाराजवळून कर्ज काढावयाचें हा प्रकार शेतकरी

करूं लागले. अशा तऱ्हेनें निकालाची वेळ शेतकरी लांबवूं शकतो हें खरें पण त्याच कालांत त्याची आर्थिक स्थिति ज्यास्तज्यास्त बिघडते हेंहि तितकेंच खरें आहे. पतपेढ्यांची घटना, वाढ व दृष्टिकोन यांचेपायीं लांब मुदतीचें कर्ज पतपेढ्या देऊं शकत नाहींत. एकएका पतपेढीजवळ रिझर्व फंड फारच थोडा असतो. आणि पतपेढ्यांचें तरतें भांडवल म्हणजे लोकांनीं वर्ष दोन वर्षांच्या मुदतीनें ठेवलेल्या ठेवी हेंच असतें. हें भांडवल शेतकऱ्यांना लांब मुदतीचें कर्ज देण्याचे कामीं उपयोगी पडत नाहीं. कारण तसें केल्यास ठेवीदार आपले पैसे परत मागावयास येतील त्यावेळीं फजिती होईल व पेढीला भलतेंच नुकसान येईल. जुनें कर्ज फेडल्याशिवाय शेतकरी मोकळेपणानें पुढें पाऊल टाकूं शकत नाहीं आणि जुनें कर्ज फेडावयाचें म्हणजे लांबमुदतीचें कर्ज अथवा भांडवल पाहिजे. शिवाय शेतीसंबंधीं मोठ्या प्रमाणांत नव्या सुधारणा करावयाच्या त्यांसाठीं सुद्धां लांब मुदतीचें कर्ज अथवा भांडवल पाहिजे. सारांश, प्राप्त परिस्थितींत शेतकऱ्याला लांबमुदतीचें कर्ज देऊं शकेल अशा लँडमॉर्गेज बँकेची स्थापना झाली पाहिजे. अथवा भावनगर संस्थानांत जसें दरबारनें लांब मुदतीचें कर्ज दिलें तसें सरकारनें द्यावयास तयार झालें पाहिजे. जुनें कर्ज फेडणें आणि शेतीमध्यें बहुमोल सुधारणा करण्यासाठीं लागणारा पैसा पुरवणें हीं जर लँडमॉर्गेज बँकेचीं मुख्य कामें असतील तर नांव वजा करतां अशी बँक भावनगर संस्थानांत चालू आहे व आपलें काम बजावीत आहे असें म्हणतां येईल. सर्व कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या वतीनें भावनगर दरबारनें अजमासें एकवीस लक्ष रुपये देऊन त्यांना कर्जमुक्त केलें आणि जेव्हां जेव्हां कोणा खातेदाराला शेतीसुधारणेसाठीं रक्कम लागते त्यावेळीं अगदीं थोड्या व्याजानें तगाई देण्याचें कामहि दरबार करीत आहे.

४५. एकदां ऋणविमोचन झालें पाहिजे असें ठरलें म्हणजे तें घडवून आणण्याची सुरुवात कशी करावयाची हा प्रश्न उभा राहतो.

सलोख्यानें ऋणविमोचन

४६. प्रारंभीं, दोनहि पक्षांच्या संमतीनें ऋणविमोचन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सर प्रभाशंकर यांनीं आपल्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे कीं "हा प्रश्न कायमचा सुटावयास पाहिजे असेल तर ऋणको व धनको यांचा सलोखा व तडजोड झाली पाहिजे. सक्तीनें हा प्रयोग पूर्ण यशस्वी होणार नाहीं. इतकेंच नव्हे तर सक्तीमुळें दोनहि पक्षांचीं मनें कलुषित होतील आणि मनें कलुषित झालीं म्हणजे भविष्यकाळीं त्यांच्यामध्यें तेढ उत्पन्न होईल" (परिशिष्ट ७–४ पहा). भावनगर संस्थानांतील योजनेचा सावकारांनीं एकदम स्वीकार केला असें नाहीं. पण योग्य तऱ्हेनें प्रचार व सावकारांचीं मनें वळवण्याचा प्रयत्न केल्यानंतर, आणि विशेषेंकरून योजना प्रत्यक्ष अंमलांत आल्यानंतर सावकाराला मिळणाऱ्या मोठमोठ्या रकमा, जें कर्ज वसूल होण्याजोगें नव्हतें अशा कर्जापोटीं सुद्धां मिळालेल्या रकमा, जेव्हां प्रत्यक्ष नजरेसमोर खेळूं लागल्या तेव्हां हळुहळु विरोध विरूं लागला. योजनेचा अंमल वाढल्या प्रमाणांत होऊं लागला तसतशी अधिकाधिक सावकारांना ती वाढल्या प्रमाणांत पसंत पडूं लागली. शेवटीं शेवटीं विरोधक सावकार अगदींच थोडे शिल्लक राहिले.

द्यावयाच्या रकमेची मर्यादा

४७. सावकाराच्या चोपडयांत जेवढें देणें कुळाच्या नांवावर निघेल तेवढें सावकाराला देणें हें मुळींच शक्य नाहीं. बहुतेक खात्यांत मूळ मुद्दल थोडें आणि व्याज दलाली पागडी वगैरेमुळेंच

रकम फुगलेली असा प्रकार होता. शिवाय, कर्जाच्या तडजोडीसाठी जी रकम द्यावयाची तिचा आणि खातेदाराच्या जमिनीचा व पतीचा मेळ ठेवला पाहिजे. भावनगर संस्थानांतील योजनेप्रमाणें जेवढा सारा एक शेतकरी भरतो त्याच्या तिपटीपेक्षां अधिक रकम त्याच्या कर्जफेडींत द्यावयाची नाहीं असें नियमन केलेलें होतें.

ऋणविमोचनाला अनुकूल समय

४८. एकदां ऋणविमोचन करावयाचें ठरल्यावर, सध्यांची वेळ अतिशय अनुकूल आहे असें दिसून येतें. हल्लीं एकंदरींत मालाच्या किंमती पडलेल्या असल्यामुळें, विशेषेंकरून धान्य व कापूस यांच्या किंमतीं फारच पडल्यामुळें शेतकऱ्याचा फायदा संपुष्टांत आला आहे. शेतकऱ्याला फायदा झाला तर तो सावकाराचें देणें देणार. हल्लींच्या परिस्थितींत सावकाराला वसुली करतां येण्याचा संभव फारच थोडा असल्यामुळें तडजोडीच्या योजनेचा स्वीकार करावयास सावकार कबूल होण्याचा संभव अधिक, कारण तेणेंकरून सावकाराला तावडतोब रोख रकम मिळावयाची आहे. मालाच्या किंमती खूब वाढलेल्या असतांना काढलेलें कर्ज किंमती भलत्याच प्रमाणांत उतरल्यानंतर पुरेपुर वसूल करण्याचा आग्रह धरणें अन्यायाचें होईल याची आतां हळुहळु जाणीव होऊं लागली आहे. पूर्वी जेवढा माल देऊन शेतकऱ्याला अमुक रक्कम मिळत असे त्याच्या दुप्पट किंवा तिप्पट माल द्यावा तेव्हां ती रक्कम आतां मिळते. रुपयाचें परिमाणच जणुं एका रात्रींत अजिबात बदलून गेलें आहे. एका रतलाचें आजचें वजन चाळीस तोळे आहे त्याचे जागीं एकदम ऐशीं तोळे झालें तर जी अनवस्था निर्माण होईल तशीच हल्लीं झालेली आहे असें ह्मणतां येईल.

हल्लीं जमिनीची व जमिनींत उत्पन्न होणाऱ्या मालाची किंमत उतरली असल्यामुळें शेतकऱ्याची खरी आर्थिक शक्ति किती आहे आणि शेतकऱ्याच्या वतीनें किती रकम दिली असतां ती तो फेडूं शकेल याचा योग्य अंदाज करावयास हल्लींचा काल फार अनुकूल आहे. वाढलेल्या किंमतीच्या दिवसांत केलेली अजमावणी नंतर निरुपयोगी व दिशाभूल करणारी ठरते. कारण त्यावेळीं मालाच्या किंमतीबरोबर जमिनीचीहि किंमत वाढते, शेतकऱ्याचा फायदा वाढलेला दिसतो आणि त्यामुळें शेतकरी फेड किती रकमेची करूं शकेल या संबंधेंहि अजमास वाढण्याचा संभव असतो.

मजुरी वाढल्यामुळें शेतीचा खर्च वाढला आणि त्यामुळेंहि शेतकऱ्याचा फायदा कमी झाला आहे. धान्याचे भाव उतरले म्हणून मजुरीचे दर उतरले असतील असें अनुमान काढल्यास चुकीचें ठरेल. मजुरीचे दर आहेत तसेच राहिले आहेत असें ह्मटल्यास चालेल. कित्येक खेड्यांत उभड किंवा मजूर हे जमिनीच्या मालकांपेक्षां सुस्थितींत असल्याचें कामिटीला आढळून आलें. कांहीं कांहीं ठिकाणीं या मजुरांनीं आपल्या मजुरीतून शिल्लक पाडलेल्या रकमा मालकांना कर्जाऊ दिलेल्या आढळल्या. दरबारनें यावेळीं जरूर ती रक्कम पुढें केली नाहीं तरी सुद्धां हा काल असा आहे कीं बँकांजवळ मुबलक पैसा पडून राहिल्यामुळें आणि व्याजाचे दर उतरल्यामुळें सुसंघटित अशी लँड मॉर्गेज बँक जरूर तो पैसा यावेळीं उभा करूं शकेल.

खेडुताची पत वाढेल

४९. एकदां सर्व शेतकऱ्यांच्या कर्जफेडीची व्यवस्था झाली ह्मणजे भविष्यकालीं काय होईल हें सांगणें फार कठीण आहे. भावनगरमधला आमचा अनुभव इतका थोड्या कालाचा आहे कीं त्यावरून

कांहींहि अनुमान बांधणें योग्य होणार नाहीं. पण एक गोष्ट मात्र सांगतां येते कीं जुन्या कर्जातून शेतकरी मुक्त झाला म्हणजे स्वाभाविकपणें त्याची पत वाढेल आणि नंतर खरोखर जरूर लागणारा पैसा स्वस्त दराच्या व्याजानें त्याला काढतां येईल.

सावकाराची उचलबांगडी नव्हे

५०. सावकाराशिवायच सगळे व्यवहार करावे ही कल्पना मुळींच प्रस्तुत नाहीं. ता. १५ जान्युआरी १९३२ च्या कौन्सिल मिनिटमध्यें दिवाणबहादुर त्रिभोवनदास यांनीं म्हटलें आहे कीं:—

"ग्रामव्यवस्थेमध्यें सावकार अवश्य असतो. सावकार व शेतकरी यांचेमधील संबंध अजीबात नष्ट करण्याची आमची मुळींच इच्छा नाहीं. आजची परिस्थिति तेवढी नष्ट करावयाची आणि सावकार व खेडुत यांचे अव्वलचे सचोटीचे संबंध पुनः प्रस्थापित करावयाचे हा आमचा उद्देश आहे. उपयुक्त कामासाठीं बारा टक्के व्याज देऊन आमच्या खेडुतांनीं पैसे काढले तर त्याला माझी मुळींच हरकत नाहीं. तसल्या कर्जानें शेतकरी मरणार नाहीं. पण हल्लीं तसली परिस्थिति नाहीं. हल्लीं जो भारभूत कर्जाचा बोजा जमून राहिला आहे तो थोडेसें अवल भांडवल आणि त्यावर चढलेले व्याज दलाली पागडी वगैरे प्रकार यांची अनेक वर्षांची मिळवणी होऊन बनलेला आहे. त्या बोजाखालीं अखिल शेतकरी वर्ग दडपून गेलेला आहे आणि त्यांतून त्याला बाहेर काढणें एवढेंच आमचें ध्येय आहे. शेतकरीसंरक्षक कायदा व्याजाच्या दरांचें नियमन करील. पण आज दरबार भांडवल पुढें करून जें ऋणविमोचन करीत आहे त्याचें उद्दिष्ट मागील भारभूत कर्जाचा भार हलका करावा हेंच आहे. हा बोजा एकदां दूर झाला म्हणजे पूर्वीचे हितकर संबंध सावकारशेतकऱ्यांमध्यें पुनः निर्माण करणें शक्य होईल. योग्य व्याज व मुद्दल एवढें परत देण्याची शेतकऱ्याची शक्ति वाढेल आणि हल्लींच्या जबर अटी स्वाभाविकपणें बऱ्याच नरम होतील."

सावकाराला स्थानभ्रष्ट करावयाचा उद्देश या योजनेंत मुळींच समाविष्ट नाहीं हें अधिक स्पष्टपणें दिसावयास पाहिजे असेल तर अव्वल कमिटीच्या रिपोर्टांतला पुढील उतारा वाचावाः—

"सर्व सावकारांची जागा दरबार घेऊं शकत नाहीं आणि दरबारची तसें करण्याची इच्छा पण नाहीं. ग्रामव्यवस्थेमध्यें एका काळीं सावकारांनीं किती उपयुक्त व महत्त्वाचा भाग घेतलेला आहे त्याची कबुली ग्रामजीवनाची माहिती असणारा दर एक मनुष्य देईल. पण अलीकडे खेडुत व सावकार यांचेमध्यें वितुष्ट उत्पन्न झालें आहे व तें वितुष्ट वाढत आहे हेंहि कबूल करणें प्राप्त आहे. पूर्वी एकमेकांच्या गरजांची त्यांना जाणीव होती व परस्परांबद्दल सहानुभूति होती, त्यामुळें त्यांचे संबंध मित्रत्वाचे व उपयुक्ततेचे होते. पुनश्च हे जुने संबंध प्रस्थापित व्हावे अशी दरबारची इच्छा असल्यामुळेंच सर्व खेडुतांची एकाच वेळीं व पूर्णपणें कर्जातून मुक्तता करण्याचा हा प्रचंड प्रयोग करण्यांत येत आहे. खेडुत जुन्या कर्जातून मोकळे झाल्यानंतर सावकारांनीं त्यांच्याशीं आपले पूर्वीचे प्रेमाचे संबंध पुनः जोडावे, व्याजाचे दर नेमस्त ठेवावे आणि उभय पक्षांनीं पूर्वीच्या सहानुभूतीचा सांधा पुनश्च जोडावा अशी आशा करणें अस्थानीं होईल काय ?"

सावकारांचे हितसंबंध सुरक्षित

५१. ऋणविमोचनाची योजना एकंदरींत न्यायाची आणि सावकारांच्या योग्य हक्कांचें रक्षण करणारी होती याचा पुरावा सावकारांनींच दिला आहे. कारण योजना जसजशी अमलांत येत होती तसतसे अधिकाधिक सावकार त्या योजनेचा अंमल व्हावा अशी इच्छा प्रदर्शित करावयास पुढें येत होते. योजना जर एकतर्फी असती आणि सावकारांचें हितरक्षण करणारी नसती तर सावकारांनी असें केलें नसतें.

ऋणविमोचनाचे परिणाम

५२. अगोदरच्या कर्जातून खेडुतांची मुक्तता झाली याचे भविष्यकालीं काय परिणाम होतात इकडे भावनगर दरबारचें लक्ष्य आहे. तीन वर्षांपूर्वी मुक्त झालेल्या महालांत पुनश्च कर्ज काढण्याची प्रवृत्ति लक्ष्यांत येण्याजोग्या प्रमाणांत अजून दिसत नाहीं. आज मुक्त झालेले कांहीं खेडुत थोडया वर्षांनंतर पुनः कर्जबाजारी होतील असें कबूल करावयास कांहीं हरकत नाहीं. पण खेडुतांची मोठी संख्या मागील अनुभव विसरणार नाहीं आणि आपल्या पूर्वकालीन बेसुमार खर्चाच्या संवयीचें अवलंबन पुनश्च करणार नाहीं अशी आशा करावयास जागा आहे.

संशयपूर्ण भविष्य

५३. भविष्यकालीं काय होईल हें सांगणें कठीण आहे. पण भविष्यकाली कांहीं तरी आंनष्ट होईल यामुळें आज जें योग्य व अवश्य दिसतें तें करावयाचें टाळणें अगर पुढें ढकलणें हें उचित होणार नाहीं.

व्याजाचा बोजा कमी झाला

५४. या ऋणविमोचनापासून खेडुतांना खात्रीचा व ताबडतोब झालेला फायदा म्हणजे व्याजाचा बोजा मोठ्या प्रमाणांत कमी झाला हा होय. सावकारांचें दर्शनी कर्ज रु. ८६,३८,८७४ असल्यामुळें याच्यावरचें व्याज निदान एकवीस लक्ष झालें असतें. शेंकडा पंचवीस हा दर धरला तरी इतकें व्याज होतें. हा दर अगदीं सामान्यतः रूढ आहे, पण याहून ज्यास्त व्याज घेतल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. सेंट्रल बँकिंग इन्क्वायरी कमिटीनें असें नमूद केलें आहे की व्याजाचे दर शेंकडा दहापासून तीनशें पर्यंत आढळून येतात. क्वचित् याहूनहि अधिक दराचें व्याज घेतलें जातें.

जमीनमहसुलाची वसुली

५५. जेवढी रक्कम खेडुतांना प्रतिवर्षी व्याज म्हणून रोकडीच्या स्वरूपांत अथवा दाणागोट्याच्या स्वरूपांत द्यावी लागत होती तेवढ्या म्हणजे रु. २०,५९,४७३ च्या रकमेंत खेडुतांच्या सर्व कर्जाची तडजोड झाली. भावनगरच्या अनुभवावरून पहावयाचें असलें तर शेतकरी ऋणमुक्त झाल्यास सरकारला हमखास फायदा होतो. खेडुत सारा भरण्यांत तत्परता दाखवीत नसे त्यामुळें जमीनमहसुलाची बाकी तुंबून रहात असे. पण याचें कारण शेतकरी सावकाराच्या देण्यांत आकंठ बुडालेला असे हेंच होतें असें कमिटीनें आपलें नक्की मत दिलें आहे. तत्त्वतः सरकारी देणें हें प्रथमतः द्यावयाचें असतें पण सावकार दक्ष असल्यामुळें आपलें देणें तो प्रथम

वसूल करीत असे. आतां हें सगळें पालटलें आहे. हल्लीं मालाचे भाव उतरले असल्यामुळें सारा वसूल करावयास जड गेलें असतें; असें असूनहि शेतकरी ऋणमुक्त झाल्यामुळें जमीनमहसूल झटपट व वाढत्या प्रमाणांत वसूल होऊं लागला आहे. ज्या भागांत पीकपाणी अंशतः बुडालें आहे आणि जेथें कर्जांत बुडालेल्या शेतकरी साऱ्यांत निदान चार सहा आण्याची सूट मागता असता तेथें महसुलाची पुरेपूर वसुली तर झालीच शिवाय तुंबलेल्या बाकीपायीं देखील थोडासा वसूल झाला. केवळ स्वार्थाच्या दृष्टीनें पाहिलें तरी ऋणमुक्त शेतकरी सरकारला फायदेशीर ठरतो. हा फायदा दुय्यम असला तरी या फायद्यासाठीं सुद्धां ऋणविमोचनाचा प्रयत्न करणें योग्य होईल.

खेडुतांची कृतज्ञता

५६. कांहीं कांहीं ठिकाणीं तर असें आढळून आलें कीं दरबारनें शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठीं रक्कम देण्यापूर्वीच त्या रकमेच्या फेडीखातीं द्यावयाचे हप्ते शेतकऱ्यांनीं आगाऊ भरून टाकले. त्यांना कर्जमुक्त करण्याचा दरबारचा हा प्रयत्न शेतकऱ्यांना किती पसंत पडला हें कोणालाहि या एकाच गोष्टीवरून समजण्याजोगें आहे.

कर्जबाजारी—रोग व लक्षण

५७. कर्जाचा बोजा हें रोगाचें केवळ लक्षण आहे आणि लक्षणावरून केलेली उपाययोजना रोगाचें निर्मूलन करावयास समर्थ होते असें नाहीं. हें विधान कांहीं अंशीं खरें असलें तरी पूर्णपणें खरें नाहीं. भाषेचे अलंकार अथवा वस्तूंतील दिखाऊ साम्य याचेवर उभारलेली विचारसरणी योग्य ठरतेच असें नाहीं, कांहीं वेळीं तिचे पायीं दिशाभूल होऊं शकते; कारण ज्या वस्तूचें आपल्याला स्पष्ट व अचुक वर्णन पाहिजे तिचें विकृत स्वरूप आपल्या नजरेस पडण्याचा संभव असतो. खेडुताची आर्थिक हलाखीची स्थिति आणि शेतकींत होणारा अत्यल्प फायदा यांमुळेंच कर्ज काढण्याची शेतकऱ्यावर पाळी येते म्हणून हाच खरा रोग असून कर्जबाजारीपणा हें नुसतें लक्षण आहे हा सिद्धांत मान्य करतां येईल. पण मुळांत जरी हें लक्षण असलें तरी अव्वल कर्ज अगदीं थोडें असून आणि त्या कर्जाच्या कांहीं पटीनें फेड झालेली असूनहि मूळ कर्ज सारखें वाढत रहातें यामुळें तोच एक रोग होऊन राहिला आहे आणि त्या रोगावर औषधाची योजना झाली पाहिजे.

वस्तुस्थितीचें नीट आकलन होण्याकरितां या उत्प्रेक्षा-अलंकारांतून बाहेर पडून आपण व्यवहारांतील दाखला घेऊं. समजा, रेलवेवर एकादा अपघात झाला आणि नंतर दळणवळण पुनः सुरू करावयाचें आहे. अशा स्थितींत रुळांवरची अडगळ प्रथम काढून टाकावयास नको काय? केवळ अडगळ काढून रस्ता नीट होतो असें नव्हे त्याप्रमाणेंच केवळ ऋणविमोचनानें शेतकऱ्यास आर्थिक क्षेत्रांत एकदम संपन्नावस्था प्राप्त होईल असें नव्हे. परंतु जसें रुळावरील अडगळ दूर करणें तद्वत् एकदां शेतकरी कर्जमुक्त करणें ही एक प्राथमिक जरूरी आहे. मात्र एवढ्यावरच भागणार नाहीं याची भावनगर दरबारला प्रथमपासून खात्री होती. याबद्दल कमिटीनें पुढील उल्लेख केला आहे :—

> " कर्जबाजारीपणा हें रोगाचें एक लक्षण आहे त्याप्रमाणेंच तो एक स्वतंत्र रोगहि आहे. कर्जबाजारीपणाच्या रोगावर औषध म्हणजे जरूर लागणारा पैसा स्वस्त व्याजानें मिळण्याची सोय करणें हें होय. पण अन्य दृष्टीनें पहातां कर्जबाजारीपणाचा सखोल विचार केला पाहिजे आणि

दुसऱ्या तत्सम प्रश्नांवरोवरच त्यांच्या निर्मूलनाची व्यवस्था केली पाहिजे. त्या सर्व प्रश्नांच्या स्वरूपाची नुसती रूपरेखा द्यावयाची तर सुद्धां त्याला अवास्तव स्थळ लागेल. पण सर्वांत प्रश्न एका वाक्यांत मांडावयाचा म्हणजे जमीनीचा कस व शेतकऱ्याचे श्रम यांपासून शेतकऱ्याला ज्यास्तींत ज्यास्त उत्पन्न व्हावें आणि प्राप्त पिकाची ज्यास्तींत ज्यास्त किंमत शेतकऱ्याला मिळावी व त्याच्यापाशी ती रहावी अशी व्यवस्था झाली पाहिजे. ''

प्रकरण चवथें

—:o:—

ग्रामपंचायत: पूरक योजना

५८. ऋणविमोचनामुळें झालेली सुधारणा टिकाऊ करण्यासाठीं ग्रामस्थांनीं आपला कारभार आपणच चालवावा आणि रयतेच्या आर्थिक उन्नतीची जबाबदारी धारण करावी अशी व्यवस्था करण्यांत आली आहे. ग्रामव्यवस्थेची जनहितसंवर्धक कल्पना सर प्रभाशंकरजींच्या जागरुक मनांत प्रथमपासूनच आलेली होती आणि ता. १४ नोवेंबर १९२९ रोजीं त्यांनीं भावनगर लोकप्रतिनिधिसभेच्या बैठकींत ती बोलूनहि दाखवली. ते म्हणालेः—

" अशाप्रकारें सावकारांच्या व दरबारच्या कर्जातून शेतकरी मुक्त झाले तरी पुनः पूर्वस्थिति प्राप्त होईल अशी मला भीति वाटते. ती व्हावयास नको असेल तर शेतकऱ्यानें काटकसरीचा धडा शिकला पाहिजे आणि कर्ज काढल्याशिवाय जरूर तो खर्च शेतकरी भागवूं शकेल अशी व्यवस्था झाली पाहिजे. याकरितां ग्रामस्थ लोक शांतीनें राहून आपला कारभार चालवूं शकतील अशी व्यवस्था कायद्यानें करणें दरबारचें कर्तव्य आहे. ही व्यवस्था करण्यांत दरबार व्यापाऱ्यांचें सहकार्य मागत आहे. स्वावलंबन व परस्परसहकार्य यांचें बीजारोपण या मार्गानेंच होऊं शकेल. "

कमिटीनेंहि या प्रकरणीं आपला असा अभिप्राय दिला आहे कीं ऋणविमोचनाच्या जोडीला जरूर त्या जादा उपायांची योजना झालीच पाहिजे. आपल्या रिपोर्टाच्या शेवटच्या प्रकरणांत कमिटीनें पुढील मजकूर लिहिला आहेः—

" शेतकऱ्याच्या ऋणविमोचनाचा प्रश्न अलग करून नीटपणें सोडवतां येण्याजोगा नाहीं, त्याच्याच जोडीला खेडेगांवच्या सबंध आर्थिक जीवनाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे अशी जाणीव कमिटीला प्रथमपासून झाली. कर्जबाजारीपणा हें फक्त रोगाचें एक बाह्य लक्षण आहे आणि तें दूर करून मुख्य उद्देश साध्य होणार नाहीं. ग्रामजीवनाची पुनःप्रतिष्ठा हें उद्देश्य आहे आणि हें उद्देश्य साध्य करण्याकरितां ग्रामजीवनाच्या सर्व अंगांचा परामर्श घेणाऱ्या पंचायतीची योजना केलेली आहे. "

ग्रामपंचायतीचे उद्देश

५९. पंचायतीच्या स्थापनेपासून काय निष्पन्न व्हावयास पाहिजे आहे याची नीट कल्पना येण्यासाठीं पंचायतीच्या स्थापनेसंबंधीं कमिटीच्या रिपोर्टांत असलेला पुढील मजकूर वाचावाः—

" जुन्या पंचसंस्था नष्ट झाल्या आणि त्यांचे बरोबर खेडेगांवांतील सामवायिक जीवनहि नष्ट झालें आहे. व्यक्तिगत स्वच्छता राखण्यांत येते, पण सार्वजनिक स्वच्छता राखण्याकडे मुळींच लक्ष्य दिसत नाहीं. संघशक्तीची जाणीव नष्ट झाल्यामुळें गांवाबाहेरच्या दरोडेखोर व लुटारू लोकांपुढें गांवकरी हतबल होतात इतकेंच नव्हे तर दरएक भागांत असणाऱ्या गांवगुंडांवर सुद्धां गांवकरी लोक काबू राखूं शकत नाहींत. हे गांवगुंड गांवांतले दैत्य बनून राहातात. कामधंदा करून पोट भरणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतांत जनावरांना गुप्तपणें चरावयास

पाठवणें, गुरें पळवणें, आग लावण्याची धमकी देणें, मोशल वसूल करणें इत्यादि अपक्रिया करून गांवकऱ्यांस हे दैत्य सळो की पळो करून सोडतात, आणि आपली धमकी खरी वाटावी म्हणून मधून मधून आगी लावतात.

ग्रामपंचायातीच्या स्थापनेमुळें असल्या प्रकारांना आळा घालण्याचें सामर्थ्य ग्रामस्थांना येईल अशी आशा आहे. ग्रामपंचायतीची स्थापना ह्मणजे खेड्यांत स्थानिक स्वराज्याची स्थापना होय. बाहेरचें नियंत्रण कमीत कमी करून खेड्यांतील कारभार चालवण्याचा ज्यास्तींत ज्यास्त अधिकार ग्रामस्थांना देणें हाच पंचायतीच्या स्थापनेचा अर्थ होय. गांवांतील अधिकारी–तलाटी, मुखी, पाटील, चौकीदार–नेमण्याचा अधिकार पंचायतीकडे दिल्यामुळें हे खरोखरच गांवाचे सेवक होतील, मालक बनणार नाहींत आणि त्यामुळें एकनिष्ठेनें व तत्परतेनें सेवा बजावतील. अधिकारसंपन्न झाल्यामुळें ग्रामपंचायती गांवगुंडांना आपल्या कावूंत ठेवूं शकतील. विशेष प्रसंगीं एकादा माणूस फारच घातुक व बेगुमान झाला असेल आणि त्याच्या दराऱ्यामुळें त्याच्या-विरुद्ध पुरावा द्यावयास कोणी पुढें येत नसल्यापायीं साधारण कायद्यान्वयें त्याचेविरुद्ध योग्य उपाय करतां येत नसेल तर त्याला गांवांतून घालवून लावण्याचाहि अधिकार पंचायतीकडे राहील.

ज्या खेडेगांवांत भूमि योग्य रीतीनें तयार झाली असेल आणि जेथें गांवकऱ्यांकडून मागणी आली असेल त्या गांवांत जमीनमहसूल कशा प्रकारें आणि कोणच्या नियमानुसार वसूल करावा हें ठरवण्याचाहि अधिकार पंचायतीस देण्यांत येईल. सारा देण्यांत शेतकरी जाणून बुजून चुकारतटूपणा करूं लागला तर त्याची जमीन जप्त करून ती विकण्याचा अधिकार पंचायतीला देण्यांत येईल. दरबारचें देणें दिल्यावर जी बाकी राहील तिच्या आधारें कायमनिधि बनविण्याचा आणि पंचायतीच्या निकालाप्रमाणें त्या निधीचा विनियोग सर्व गांवकऱ्यांच्या हिताप्रीत्यर्थ करण्याचाहि अधिकार पंचायतींना मिळेल. हा निधि भरपूर वाढला तर यांतून खेडुतांना लागणारें भांडवल सुद्धां देतां येईल.

ग्रामपंचायतींना खेड्यांत म्युनिसिपालिटीचे अधिकार मिळतील. गांवांतील स्वच्छता, रस्ते-दुरुस्ती, सार्वजनिक विहिरी चावडी वगैरे सुस्थितींत राखणें—या सर्व गोष्टी पंचायतीकडेच रहातील. गांवचा कोंडवाडा पंचायतीच्या ताब्यांत राहील. लहान रकमांचे दिवाणी दावे व गुरें दुसऱ्याच्या हद्दींत जाण्यासंबंधीचे खटले चालवण्याचा अधिकारहि ग्रामपंचायती मिळवूं शकतील.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे पंचायतीपासून शिक्षणप्रसार व सोईंची वाढ या दोहोंची उत्पत्ति होते. स्वयंनिर्णय व स्वराज्य या दोहोंचाहि पंचायतींत अंतर्भाव होतो. पंचायतीचा अर्थ नीट समजून त्याप्रमाणें पंचायतीचा योग्य अंमल झाला तर खेड्यांची आर्थिक व इतर बाजूंनी पुष्कळच सुधारणा होईल आणि सामवायिक जीवन, शांति, सुख व समृद्धि यांची खेडुतांना प्राप्ति होईल."

पंचायतीसंबंधीचे नियम परिशिष्ट **पांच**मध्यें सांपडतील. ते नियम तात्पुरते आहेत व वाढल्या अनुभवाप्रमाणें त्यांत दुरुस्ती व वाढ होतील. सर्व गांवांवर एकाच ठरीव ठशाचे नियम लाद-ण्याचा दरबारचा इरादा नाहीं. गांवांतील लोकांच्या इच्छा, सुधारणेची पायरी व इतर परिस्थिति यांचा विचार करून निरनिराळ्या ग्रामपंचायतीसाठी निरनिराळे नियम करण्याचा अधिकार दरबारनें राखून ठेवला आहे."

परिशिष्टें

परिशिष्ट

भावनगर संस्थानांतील खेडुतांवरील कर्जाचा बोजा

क्रमिक नं.	महालाचें नांव	खातेदारांची संख्या	जमीन महसूल	सावकारांच्या चोपड्यांतदाखल केलेला कर्जाचा एकंदर आंकडा	साऱ्याच्या दरएक रुपयामागें कजांचें प्रमाण	बिघ्यामागें कर्जाचें प्रमाण	कर्ज खातेदारांची संख्या
१	२	३	४	५	६	७	८
			रु. आ. पै	रु.	रु. आ. पै	रु. आ. पै	
	भावनगर संस्थान	२७,८९८	२६,५६,५५४-५-७	८६,३८,८७४	३-४-०	४-९-८	१५,४०५
१	दस्कोई	२,८१७	१,४५,४७४-४-४	५,०५,९२०	३-७-८	३-११-८	२,०१०
२	सिहोर	१,८३१	१,२५,५३९-२-३	५,१५,३०६	४-१-८	४-११-८	१,०७४
३	उमराळा	२,५६९	२,९६,५०४-१२-०	७,९९,२४४	२-११-२	४-३-०	१,३४४
४	गढडा	१,१०९	१,६४,०९०-०-०	५,९३,४४३	३-९-१०	५-५-६	५६३
५	बोटाद	२,२०३	२,५५,६४०-४-०	९,२३,१२५	३-९-९	५-०-२	१,३३३
६	लिलिया	२,४३८	३,३८,६९५-४-७	९,९८,३८४	२-१५-२	४-५-०	१,२२५
७	कुंडला	५,०३०	६,२६,४२३-१५-२	२०,०९,०१४	३-३-४	५- -८	२,२६८
८	व्हिक्टर	१,७७४	१,७१,७७१-८-२	२,४८,३३८	१-७-२	२-२-०	१,०३०
९	महुवा	५,१२४	३,६९,९१८-१-३	११,४३,२६४	३-१-५	४-१४-१	२,९३९
१०	तलाजा	३,००३	१,६२,४९७-१-१०	९,०२,८३६	५-८-११	४-१३-११	१,६१९

पहिलें

व सरकारी साऱ्याचा बोजा यांबद्दलचें तुलनात्मक पत्रक

विरहित खेडुत.		कर्जात असलेले खेडुत.					
शेंकडा प्रमाण	जमीन महसूल	खातेदारांची संख्या	शेंकडा प्रमाण	जमीन महसूल	सावकारांच्या हिशोबाप्रमाणें कर्जाचा एकंदर आंकडा	कमिटीनें मुकर केलेला कर्जाचा आंकडा	तडजोडींत दिलेली रकम
९	१०	११	१२	१३	१४	१५	१६
	रु. आ. पै			रु. आ. पै	रु.	रु.	रु.
५५.२	१२,७६,८५८-५-२	११,४९३	४४.८	१३,७९,६९६-०-५	८६,३८,८७४	४५,११,१८३	२०,५९,४७३
७१.४	९२,३०६-०-७	८०७	२८.६	५३,१६८-३-९	५०५,९२०	३,१३,३०३	१,०४,००६
५८.६	६३,७४५-१५-७	७५७	४१.४	६१,७९३-२-८	५१५,३०६	२,५३,०३०	१,१५,८४७
५२.३	१३७,५८३-८-७	१,२२५	४७.७	१५८,९२१-३-५	७९९,२४४	४,४२,२७३	२,००,४३६
५०.८	८२,९७६-३-०	५४६	४९.२	८१,११३-१३-०	५९३,४४३	३,००,२५९	१,४८,३३१
६०.५	१४९,३०७-८-०	८७०	३९.५	१०६,३३२-१२-०	९२३,१२५	५,२०,८३६	२,१३,३०७
५०.२	१६०,०७२-५-७	१,२१३	४९.८	१७८,६२२-१५-०	९९८,३८४	४,६८,०८८	२,६३,७७७
४५.१	२६०,०५०-१५-११	२,७६२	५४.९	३६६,३७२-१५-३	२०,०९,०१४	१०,२२,३७७	४,९७,४२३
५८.१	८७,७९६-७-१०	७४४	४१.९	८३,९७५-०-४	२४८,३३८	१,४०,०६५	६२,१५७
५७.४	१७२,९८९-३-९	२,१८५	४२.६	१९६,९२८-१३-६	११,४३,२६४	५,७७,०५६	२,७९,१०४
५३.९	७०,०३०-०-४	१,३८४	४६.१	९२,४६७-१-६	९,०२,८३६	४,७३,८९६	१,७५,०८५

परिशिष्ट दुसरें

खेडुतांच्या ऋणबद्धतेचें वर्गीकरण

क्रमिक नंबर	महालाचें नांव	ऋणबद्ध खातेदारांची संख्या	ऋणबद्ध खातेदारांनीं द्यावयाचा सारा	सावकारांच्या चोपड्यांत दाखवलेला कर्जाचा एकंदर आंकडा	कमिटीनें मुक्कर केलेला कर्जाचा एकंदर आंकडा	तडजोडीसाठीं दिलेली एकंदर रक्कम	ऋणबद्ध खातेदारामागें कर्जाची सरासरी	ऋणबद्ध खातेदाराकडून मिळावयाच्या साऱ्याच्या दर रुपयामागें कर्जाचें प्रमाण
१	२	३	४	५	६	७	८	९
			रु. आ. पै	रु.	रु.	रु.	रु. आ. पै	रु. आ. पै
	भावनगर सं.	१२,४९३	११,७९,६९६ ० ५	८६,३८,८७४	४५,११,१८३	२०,५९,४७३	६९१ ७ ११	६ ४ २
१	दस्क्रोई	८०७	५३,१६८ ३ ९	५,०५,९२०	३,१३,३·३	१,०४,०·६	६२६ १४ ७	९ ८ २
२	सिहोर	७५७	६१,७९३ २ ८	५,१५,३०६	२,५३,०३०	१,१५,८४७	६८० ११ ६	८ ५ ४
३	उमराळा	१,२२५	१,५८,९२१ ३ ५	७,९९,२४४	४,४२,२७३	२,००,४३६	६५२ ७ ·	५ ० ५
४	गढडा	५४६	८१,११३ १३ ०	५,९३,४४३	३,००,२५९	१,४८,३३१	१०८६ १४ ३	७ ५ ०
५	बोटाद	८७०	१,०६,३३२ १२ ०	९,२३,१२५	५,२०,८३६	२,१३,३०७	१०६२ ३ ४	८ १० १०
६	लिलिया	१,२१३	१,७८,६२२ १५ ०	९,९८,३८४	४,६८,०८८	२,६३,७७७	८२३ १ १	५ ९ ५
७	कुंडला	२,७६२	३,६६,३७२ १५ ३	२०,०९,०१४	१०,२२,३७७	४,९७,४२३	७२७ ६ ०	५ ७ ८
८	व्हिक्टर	७४४	८३,९७५ ० ४	२,४८,३३८	१,४०,०६५	६२,१५७	३३३ १२ ७	२ १५ ३
९	महुवा	२,१८५	१,९६,९२८ १३ ६	११,४३,२६४	५,७७,०५६	२,७९,१०४	५२३ ३ ८	५ १२ १०
१०	तलाजा	१,३८४	९२,४६७ १ ६	९,०२,८३६	४,७३,८९६	१,७५,०८५	६५२ ५ ५	९ १२ २

परिशिष्ट

क्रमिक नं.	महालाचें नांव	एकवर्षाच्या साऱ्यापेक्षां जास्त कर्ज नसलेल्या खातेदारासंबंधी आंकडे			एक वर्षाच्या साऱ्यापेक्षां अधिक पण दोन वर्षांच्या साऱ्यापेक्षां कमी कर्ज असलेल्या खातेदारांसंबंधी आंकडे			दोन पांच अस
		संख्या	जमीन महसूल	कर्जाची एकंदर रक्कम	संख्या	जमीन महसूल	कर्जाची एकंदर रक्कम	संख्या
१	२	३	४	५	६	७	८	९
			रु. आ. पै			रु. आ. पै		रु.
	भावनगर सं.	२४९७	३,१२,६९८ ० ७	१,३०,१३३	१४८३	१,७३,१११ १० ५	२,५५,१००	३,०३८
१	दस्क्रोई	११९	७,९३६ १२ ०	३,६५३	७८	४,६७७ १४ २	७,३२२	१९५
२	सिहोर	९८	८,८४९ ७ ४	४,१०३	६६	६,२१३ १४ ०	८,९४४	१७१
३	उमराळा	२७४	३८,४२५ ० ३	१७,०५८	१६९	२३,०८८ ६ ३	३५,०५९	३४८
४	गढडा	८६	१३,९३१ १३ ४	६,५२४	५८	८,८८४ १० ८	१३,८५६	१२०
५	बोटाद	१११	१८,६३५ ६ ०	५,३८०	६०	७,८०३ १२ ०	११,८२५	१६३
६	लिलिया	२४१	३९,८७४ ८ ६	१७,६६६	१७१	२८,०२८ १ ४	३७,०५७	२०१
७	कुंडला	५८६	८७,४१२ ५ ०	३७,२७०	३६८	४८,९१८ १४ ४	७१,९१९	७१७
८	व्हिक्टर	२७७	३६,०८२ ० ०	१३,८८५	११८	१३,९१० २ ०	२०,६३५	१९०
९	महुवा	४६६	४५,१४९ ० ३	१८,६५५	२७८	२३,५५३ २ ६	३६,११८	५६३
१०	तलाजा	२३९	१६,४०१ ११ ११	५,९३०	११७	८,०३२ ७ २	१२,३६५	२७०

दुसरें

वर्षांच्या साऱ्यापेक्षां अधिक पण वर्षांच्या साऱ्यापेक्षां कमी कर्ज लेल्या खातेदारांसंबंधीं आंकडे			पांच वर्षांच्या साऱ्यापेक्षां अधिक पण दहा वर्षांच्या साऱ्यापेक्षां कमी कर्ज असलेल्या खातेदारांसंबंधीं आंकडे				दहा वर्षांच्या साऱ्यापेक्षां अधिक कर्ज असलेल्या खातेदारांसंबंधी आंकडे			
जमीन महसूल		कर्जाची एकंदर रक्कम	संख्या	जमीन महसूल		कर्जाची एकंदर रक्कम	संख्या	जमीन महसूल		कर्जाची एकंदर रक्कम
१०		११	१२	१३		१४	१५	१६		१७
रु.	आ. पै	रु.		रु.	आ. पै	रु.		रु.	आ. पै	रु.
३,४५,३१६	१ ९	११,५६,८७६	२,५५९	२,७५,७७१	१२ ४	१९,६४,५४२	२९१६	२७२,७९८	७ ४	५१३२२२३
१२,०७६	९ ४	४१,३१२	१७२	११,९७०	११ २	८४,७८५	२४३	१६,५०६	५ १	३,६८,८४८
१४,०६०	४ ८	४७,४७२	१७३	१४,३७५	१५ ४	१०५,३२३	२४९	१८,२९३	३ ४	३,४९,४६४
४४,८६३	१४ ८	१,४६,००८	२४१	२९,८३७	४ १	२१५,९१७	१९३	२२,७०६	१० २	३,८५,२०२
१८,६३१	८ ०	६०,३३३	१३५	१९,६८५	१३ ०	१४४,८३०	१४७	१९,९८०	० ०	३,६७,९००
२१,००८	८ ०	७२,७८४	२२३	२७,०१७	१२ ०	२००,१३७	३१३	३१,७८७	६ ०	६,३२,९९९
४८,१३४	३ २	१,६१,४०१	२४८	३४,७६१	८ ०	२४९,१९५	२५२	२७,८२४	१० १	५,३३,०६५
९५,७२२	१३ ९	३,१९,१९१	५६१	७१,७३३	१४ ५	५०१,०३३	५३०	६२,५८४	१५ ९	१०,७९,६०१
१९,३८१	८ ४	६४,५५१	९६	८,७५८	५ ०	५९,२८२	६३	५,८४३	१ ०	८९,९८५
५३,०३३	८ ७	१,७७,५७५	४१३	३७,२८८	९ ६	२६१,७४१	४६५	३७,९०४	८ ८	६,४९,१७५
१८,४०३	३ ३	६६,२४९	२९७	२०,२६१	१५ १०	१४२,२९९	४६१	२९,३६७	११ ४	६,७५,९८४

दरबारनें कर्जाची तडजोड केल्यामुळें ऋणमुक्त झालेले खेडुत.

क्रमिक नं.	महालाचें नांव	एक वर्षाच्या साऱ्यापेक्षां ज्यास्त रक्कम ज्यांच्या कर्जफेडीसाठी दिलेली नाहीं त्यांच्यासंबंधीं आंकडे					एक वर्षाच्या साऱ्यापेक्षां अधिक पण दोन वर्षांच्या साऱ्यापेक्षां कमी रक्कम ज्यांच्या कर्जफेडीसाठीं दिली त्यांच्यासंबंधीं आंकडे					दोन वर्षांच्या साऱ्यापेक्षां अधिक पण तीन वर्षांच्या साऱ्यापेक्षां कमी रक्कम ज्यांच्या कर्जफेडीसाठीं दिली त्यांच्यासंबंधीं आंकडे				
१	२	३	४			५	६	७			८	९	१०			११
		संख्या	सरकार सारा रु.	आ.	पै	दिलेली रक्कम रु.	संख्या	सरकार सारा रु.	आ.	पै	दिलेली रक्कम रु.	संख्या	सरकार सारा रु.	आ.	पै.	दिलेली रक्कम रु.
	भावनगर संस्थान	४,७८५	५७७,२६३	२	५	२,३३,३५९	२,६३९	३,०४,५७८	०	९	४,६८,०९२	५,०६९	४,९७,८५४	१३	३	१३,५८,०२२
१	दस्क्रोई	२२२	१३,५७२	११	७	६,२९०	१३८	९,२४४	१२	९	१४,८१९	४४७	३०,३५०	११	५	८२,८९७
२	सिहोर	१९८	१८,१३४	१०	८	८,२७३	१५८	१२,४८८	९	४	१८,७०२	४०१	३१,१८९	९४	८	८८,८७२
३	उमराळा	५३९	७३,६०९	३	६	३०,२३२	३७१	४७,८९३	९	६	७३,९३५	३१५	३७,४१८	६	५	९६,२६९
४	गढडा	१५९	२५,०५३	०	०	१०,६३४	१९९	१८,२५९	८	०	२९,८१६	२६८	३७,८०१	५	०	१,०७,८८१
५	बोटाद	१६३	२५,८०१	१४	०	८,०६२	१३९	१८,३३७	०	०	२९,००३	५६८	६२,१९३	१४	०	१,७६,२४२
६	लिलिया	५०३	७८,४१५	७	८	३३,७१८	२१९	३७,३८७	१	४	५७,६२५	४९१	६२,८२०	६	०	१,७२,४३४
७	कुंडला	११९४	१,६८,९१२	०	१०	७०,४६४	६३१	८३,९४०	१५	६	१,२७,५८४	९३७	१,१३,५१९	१४	११	२,९९,३७५
८	व्हिक्टर	४९३	५९,९८९	१३	४	१९,३८९	१६७	१६,१४७	११	०	२३,९७०	८४	७,६३७	८	०	१८,७९८
९	महुवा	९३९	८७,३७१	११	८	३५,०२२	४५४	४४,०९१	२	३	६५,०४९	७९२	६५,४८४	१५	७	१,७९,०३३
१०	तलाजा	३७५	२६,४०१	९	२	११,२७५	२४३	१६,६२७	१०	१	२७,५८९	७६६	४९,४३७	१३	३	१,३६,२२१

परिशिष्ट तिसरें

भावनगर संस्थानांतील खेडुत संरक्षणाचा कायदा

उद्देश — निरक्षर व ऋणबद्ध शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा गैरलाभ घेण्यावाबद सावकाराला प्रतिबंध करणें अवश्य असल्यामुळें पुढील निबंध मंजूर करण्यांत येत आहे.:—

प्रकरण पहिलें

प्रास्ताविक

छोटें नांव सुरुवात व्याप्ति — १. हा कायदा 'भावनगर संस्थान खेडुत संरक्षणाचा कायदा' या नांवानें ओळखला जावा आणि ज्या दिवशीं हा कायदा दरबार गॅझेटमध्यें प्रसिद्ध होईल त्या दिवसापासून हा कायदा सर्वंध संस्थानभर अंमलांत येईल.

टीपः—ज्या दिवशीं हा कायदा अमलांत येईल त्या दिवशीं संस्थानांतील दिवाणी कोर्टांत जे दावे चालू असतील त्यांना सुद्धां या कायद्याचें १० वें कलम लागू करण्यांत येईल.

विसंगत कायदे रद्द — २. हल्लीं अमलांत असलेल्या अन्य कायद्यांमध्यें या कायद्यांतील कलमांशीं विसंगत अथवा विरोधी अशीं कलमें असल्यास तीं या कायद्यांतील कलमांना लागू करतां येणार नाहींत.

अर्थ — ३. विषय अथवा संदर्भ यांचेमुळें निराळा अर्थ होत नसल्यास यापुढें या कलमांत दिलेल्या शब्दांचा अर्थ येथें दिल्याप्रमाणें करावाः—

(अ) **शेतकरी अथवा खेडुतः**—जो इसम भावनगर संस्थानच्या हद्दींत रहात असून, खातेदार अगर दरबारी खातेजमिनीचा भागीदार म्हणून अंगमेहनतीनें अथवा नोकरांकरवीं शेती करून तिजवर सर्वस्वी अगर प्रामुख्यानें आपल्या उदरनिर्वाहासाठीं अवलंबून असतो तो 'शेतकरी अथवा खेडुत' होय. दरबारी खातेजमिनीच्या जोडीस जरी अशा इसमानें मुळगिरास अथवा बारखली जमिनींत शेती केली तरी तो याच संज्ञेस पात्र रहातो. अशा इसमाबरोबर एकत्र कुटुंबांत रहाणारे त्याचे पोट भागीदार सुद्धां याच संज्ञेस पात्र आहेत.

टीपः—दरबारची आगाऊ परवानगी घेऊन आपली दरबारी खातेजमीन दुसऱ्याला पट्टयानें देणारा इसम 'शेतकरी अथवा खेडुत' ही संज्ञा धारण करावयास लायक रहातो.

(ब) **पैसा** :—'पैसा' या शब्दांत शेतींत येणारें पीक, आउतें आणि गुरें यांचा अंतर्भाव होतो.

उभीं पिकें (क) **उभीं पिकें**:--'उभीं पिकें' या शब्दांत जमिनीशीं संबंध असलेलीं सर्व प्रकारचीं पिकें, आणि झाडाझुडपांचीं पानें, फुलें, फळें व झाडाझुडपांतील रस यांचा अंतर्भाव होतो.

प्रकरण दुसरें

या कायद्यान्वयें करावयाचे दावे व दावे नोंदविण्याचीं स्थळें.

या कायद्याचा अंमल ४. या कायद्याचीं कलमें पुढें दिलेल्या दाव्यांना लागू आहेत:--

(१) पांचव्या कलमान्वयें ऋणबद्ध खेडुतानें हिशोबासाठीं मांडलेले दावे,

(२) खेडुताला कर्जाऊ दिलेला, आगाऊ दिलेला अथवा खेडुताच्या वतीनें दिलेला पैसा, अथवा खेडुताला विकलेल्या मालाची किंमत, अथवा खेडुत व सावकार यांच्यामध्यें चालू असलेल्या देण्याघेण्याच्या हिशोवावरून निघणारा पैसा, अगर पैसा देण्याच्या (अन्य प्रकारच्या) लेखी अगर तोंडी करारान्वयें द्यावयाचा पैसा वसूल करण्याकरतां धनको वादीनें मांडलेले दावे.

कुळांनीं हिशोबाची मागणी करावी ५. कलम चार मध्यें नमूद केलेल्या कोणत्याही प्रकारचें देणें ज्या कुळाच्या माथीं असेल त्याला आपल्या देण्याघेण्याचा हिशोब मागण्यासाठीं, कुळानें सावकाराला दिलेल्या रकमा ठरवून घेण्यासाठीं आणि सावकाराला द्यावयाची रक्कम किती हें ठरवून घेण्यासाठीं दावा मांडण्याचा हक्क आहे.

दावा करण्याचें स्थळ ६. कोर्टाचे आर्थिक अधिकार ठरवणाऱ्या कायद्यांना बाध न आणतां, ज्या दाव्यांना हा कायदा लागू आहे असे दावे शेतकरी--मग तो दाव्यांतील वादी असो वा प्रतिवादी असो--ज्या कोर्टाच्या हद्दींत रहातो त्या कोर्टापुढें दाखल झाले पाहिजेत.

टीप:-- निरनिराळ्या कोर्टाच्या हद्दींत रहाणारे अनेक शेतकरी एकाच दाव्यांत वादी अथवा प्रतिवादी असतील तर या अनेक कोर्टांपैकीं कोणच्याहि कोर्टांत त्या कोर्टाच्या परवानगीनें दावा दाखल करतां येईल.

प्रकरण तिसरें

या कायद्यान्वयें दाव्याचें काम कसें चालावें

अखेर निकालासाठीं समन्स ७ या कायद्यान्वयें दाखल झालेल्या दाव्याचा निकाल कोर्टाच्या एकाच बैठकींत होण्याजोगा आहे असें कोर्टास वाटल्यास समन्स काढावयाचें तें दाव्याच्या अखेर निकालासाठीं ह्मणूनच काढलें पाहिजे.

लेखी करार असलासाठीं तरी तोंडी पुरावा घेतां येईल. ८ या कायद्यान्वयें चालणाऱ्या दाव्यांच्या कामीं, पुराव्याच्या अगर अन्य कायद्यांतील कलमें कांहींहि असलीं तरी, सावकार व खेडुत यांच्यामधील व्यवहाराचें सत्य स्वरूप शोधून काढण्याकरतां त्या व्यवहारासंबंधीं लेख झालेला असला तरी देखील तोंडी कराराचा अगर तोंडी विधानाचा पुरावा घेण्याचा कोर्टाना अधिकार आहे.

पक्षकारांच्या जबान्या घेऊन व्यवहाराचा पूर्वेतिहास शोधून काढणें

९ ज्या दाव्याला हा कायदा लागू होतो अशा दाव्यांत, सावकाराच्या मागण्याला खेडुत हरकत घेवो वा न घेवो, कोर्टानें वादी व प्रतिवादी यांना साक्षीदार ह्मणून बोलावून त्यांच्या जबान्या घेतल्याच पाहिजेत. त्याचप्रमाणें लबाडी, भूलचूक, अयोग्य दबाण अथवा तत्सम कोणत्याहि प्रकाराचा शेऱ्यकऱ्यावर प्रयोग करण्यांत आला आहे कीं काय हें शोधून काढण्याकरतां आणि पुढें दिलेल्या पद्धतीनें उभय पक्षांमधील देण्याघेण्याचा हिशोब घेण्याकरतां ज्या व्यवहारांतून दावा निष्पन्न झाला त्या व्यवहाराच्या अगदीं सुरुवातीपासून सर्व इतिहास व त्या व्यवहाराचा न्यायान्याय यांचा तपास करणें हें कोर्टाचें कर्तव्य आहे.

टीपः—जर कोर्टाच्या मतें कांहीं उघड कारणांकरतां वादी प्रतिवादींच्या जबान्या घेणें जरूरीचें नसेल तर कोर्टावर जबान्या घेण्याची सक्ति करणें हा या कलमाचा उद्देश नाहीं. मात्र असें कोर्टाचें मत ज्या दाव्यांत होईल त्या दाव्यांत तसें मत होण्याचीं कारणें लेखी नोंदून ठेवलीं पाहिजेत.

हिशोब तपासण्याची पद्धत

१० कलम नऊप्रमाणें पक्षकारांमधील व्यवहाराचा पूर्वेतिहास व न्यायान्याय यांची चौकशी करतांना चक्रवाढ व्याज देण्यासंबंधीं उभयपक्षीं झालेल्या करारांकडे आणि हिशोबाचें पत्रक वा तडजोड, अथवा पूर्वीचा देण्याघेण्याचा व्यवहार संपवून नवें खातें सुरू करणें यासंबंधीं उभयपक्षीं झालेल्या कराराकडे लक्ष्य न देतां कोर्टानें पुढें दिलेल्या नियमांप्रमाणेंच हिशोब तपासला पाहिजेः—

(१) व्यवहाराच्या सुरुवातीपासून तों तहत दाव्याच्या तारखेपर्यंत सर्व हिशोब तपासून मुकर केला पाहिजे;

(२) मुद्दल व व्याज यांचे हिशोब निरनिराळे तपासले पाहिजेत;

(३) मुदलाच्या हिशोबांत वेळोवेळीं खेडुताला अथवा खेडुताकरतां सावकारानें ज्या रकमा दिल्या असतील त्या व सावकारानें ज्या वस्तु अगर माल खेडुताला अगर खेडुताच्या वतीनें अन्य कुणाला खरोखर विकत दिला असेल त्याची किंमत खेडुताच्या नांवावर खर्ची टाकाव्या;

टीपः—(अ) वटाव अगर वटावासारखी दुसरी कोणचीहि रक्कम जर मुदलांत मिळवली असेल अगर विकलेल्या मालाच्या किंमतींत मिळवली असेल तर ती मुदलाच्या हिशोबांत दाखल होऊं न देण्याबद्दल खास खबरदारी घेतली पाहिजे.

(ब) जर धान्य अगर अन्य मालाची किंमत जमेच्या अगर खर्चाच्या बाजूस दाखवलेली असेल तर त्या व्यवहाराच्या वेळीं प्रसिद्ध

झालेल्या दरबारी गॅझेटमध्यें दिलेल्या दराप्रमाणें धान्याची किंमत आकारण्यांत यावी आणि इतर मालाची किंमत देवघेवीच्या वेळच्या बाजारभावाप्रमाणें आकारण्यांत यावी.

(४) हिशोवाप्रमाणें निघणारें व्याज निराळें दाखवलें पाहिजे आणि व्याज मुदलांत मिळवलें जाऊं नये म्हणून खास खबरदारी घेतली पाहिजे.

(५) करारांत ठरल्याप्रमाणें सरळ व्याज मात्र दिलें पाहिजे पण व्याजाचा दर शेंकडा बारा टक्यांपेक्षां अधिक आकारावयाचा नाहीं.

(६) व्याज दरमहा खर्ची टाकावें. कोणच्याहि महिन्याच्या अखेरीस मुदलांतली जी रक्कम बाकी असेल तेवढ्या रकमेवरच दुसऱ्या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून व्याज आकारतां येईल.

(७) ऋणकोनें किंवा ऋणकोच्या वतीनें धनकोस दिलेला पैसा अगर माल, अथवा वटाव, कोथळी सोडणावळ अगर दुसऱ्या कोणच्याहि नांवें रोख अगर मालाच्या रूपानें जें जें कांहीं वेळोवेळी धनकोस दिलेलें असेल तें सर्व एकेठिकाणीं करून प्रथम व्याजाच्या खातीं जमा करावें. व्याज पूर्णपणें फिटून जर बाकी राहिली तर तिचा विनियोग मुदलाच्या फेडीकडे करण्यांत यावा.

(८) दावा दाखल करावयाचे दिवसापर्यंतचे व्याज व मुद्दल या दोहोंचेहि हिशोब पुरे करावे, आणि दोनहि खात्यांत जर ऋणकोनें धनकोला द्यावयाच्या रकमा निघाल्या तर त्या दोहोंची बेरीज करून तेवढी रक्कम ऋणकोनें धनकोला द्यावयाची असा निर्णय द्यावा.

दामदुप्पट : पण व्याजांतील बाकी मुदलांतील बाकीपेक्षां अधिक निघेल तर मुदलांतील बाकीच्या दुप्पट रक्कमच ऋणकोनें धनकोला द्यावयाची असें ठरवून कोर्टानें तेवढ्याच रकमेचा हुकुमनामा करावा.

आधींचे हुकुमनामे

११. हा कायदा अंमलांत यावयाच्या पूर्वी ऋणकोविरुद्ध झालेल्या हुकुमनाम्यांच्या अंमलबजावणीसाठीं कोर्टापुढें अर्ज येतील, अथवा अशा हुकुमनाम्यांचा ज्यांत अंतर्भाव आहे अशा कर्जाबद्दल कोर्टापुढें दावे येतील, त्यावेळीं हुकुमनामे ज्या देण्याघेण्याच्या व्यवहाराबाबत केले असतील त्या व्यवहारांचा कोर्टानें कलम दहाप्रमाणें हिशोब तपासावा. या वर्गांतला कोणचाहि हिशोव तपासतांना जर कोर्टाला असें आढळून आलें कीं ज्या व्यवहारावरून हुकुमनामा झाला तो व्यवहार ऋणको-धनकोमध्यें झालेल्या अन्य व्यवहारांचा एक भाग आहे, तर, जणुं काय शेतकऱ्यानें

कलम पांचप्रमाणें हिशोबासाठींच दावा दाखल केला आहे असें गृहीत धरून कोर्टानें सर्वच्या सर्व व्यवहार तपासावे आणि शेतकऱ्यानें काय देणें आहे त्याचा निर्णय करावा. मात्र, ज्या हुकुमनाम्यापायीं कोर्टाला सर्व व्यवहाराच्या तपासणीचा हुकुम करावा लागला असेल त्या हुकुमनाम्याखालीं जी रक्कम वसूल व्हावयाची राहिली असेल तिच्यापेक्षां अधिक रक्कम (कलम बारामध्यें नमूद केलेल्या परिस्थितीव्यतिरिक्त) वसूल करण्याचा हक्क या कलमान्वयें केलेल्या निर्णयामुळें धनकोला प्राप्त होणार नाहीं.

हप्ते देण्याविषयीं

१२. (१) कलम पांचखालीं हिशोबासाठीं केलेल्या दाव्यांसंबंधीं आणि कलम अकरा प्रमाणें कोर्टाकडून तपासल्या जाणाऱ्या हिशोबांसंबंधीं–ऋणकोनें धनकोला द्यावयाची रक्कम किती आहे हें मुक्कर करण्याशिवाय, ती रक्कम हप्त्यांनीं देण्याबद्दल आणि त्या रकमेवर व्याज द्यावें किंवा नाहीं याबद्दल हुकुम करण्याचा अधिकार कोर्टास आहे मात्र दावा दाखल करावयाच्या तारखेपर्यंत आकारण्यांत आलेलें व्याज मुदलाइतकें होत असेल तर फेडीच्या हप्त्याबरोबर व्याज देण्याचा हुकुम कोर्टानें करतां कामा नये.

(२) वरील पोटकलम एकप्रमाणें हप्त्यांनीं रक्कम भरण्याचा हुकुम कोर्टानें केला असल्यास ऋणको शेतकऱ्यानें ठराविक तारखेपूर्वी हप्त्याची रक्कम कोर्टांत भरावी. त्यानें तसें न केल्यास कर्जाच्या वसुलीसाठी केलेल्या दाव्यांत मिळविलेल्या हुकुमनाम्याची बजावणी ज्या प्रकारें सावकार करतो त्याचप्रमाणें आपल्या जवळच्या हुकुमनाम्याची बजावणी करण्याचा हक्क सावकारास प्राप्त होईल.

हुकुमनाम्यानंतर व्याज

१३. दावा दाखल झाल्यापासून त्याच्या निकालापर्यंत आणि दाव्याच्या निकालापासून रकमेच्या पूर्ण भरपाईपर्यंत व्याज देण्याचा हुकुम जर कोर्टानें केला तर दरसाल दरशेंकडा सहापेक्षां व्याजाचा दर अधिक असतां कामा नये.

हप्ते ठरविण्याचा अधिकार

१४. या कायद्याखालीं केलेल्या हुकुमनाम्यान्वयें द्यावयाची रक्कम, किंवा कलम अकराप्रमाणें योग्य तपास करून मुक्कर केलेली देण्याची रक्कम हप्त्यांनीं देण्याबाबद आणि हप्त्यांबरोबर व्याज द्यावयाचें किंवा नाहीं याबाबद केव्हांहि योग्य तो हुकुम करण्याचा अधिकार कोर्टास आहे.

सरळ व्याज

१५. या कायद्याखालीं फक्त सरळ व्याज देण्याचा हुकुम करतां येईल.

प्रकरण चवथें

किरकोळ

पूर्वीच्या देण्याचा अंतर्भाव

१६. सावकारानें खेडुताविरुद्ध देण्याघेण्याचा दावा केला म्हणजे तत्पूर्वीच्या सर्व बाकीचा त्या दाव्यांत अंतर्भाव होतो.

कोर्ट फी. १७. ऋणको शेतकऱ्याला कोर्ट फी दिल्याशिवाय दावा आणण्याचा हक्क आहे. धनकोनें दावा आणल्यास त्याला प्रथमतः कायद्याप्रमाणें कोर्ट फी द्यावी लागेल. पण हुकुमनामा जेवढ्या रकमेचा होईल तेवढ्या रकमेवरील कोर्ट फीची रक्कम त्याला परत मिळेल.

रकमा दिल्याचा पुरावा १८. हुकुमनाम्याखाली जर शेतकऱ्यानें कांहीं रकमा दिल्या असतील आणि त्या कायद्याप्रमाणें कोर्टमार्फत नोंदलेल्या नसतील तर त्या रकमा दिल्याचा पुरावा दाखल करण्याचा शेतकऱ्यास हक्क आहे. हा कायदा अंमलांत आल्यानंतर त्यानें दिलेल्या रकमांबद्दलहि पुरावा दाखल करण्याचा त्याला हक्क आहे.

अगोदरच्या हिशोबाच्या चोपड्या १९. अगोदरच्या व्यवहारांबद्दलच्या हिशोबाच्या चोपड्या सावकार जाणूनबुजून कोर्टापुढें सादर करीत नाहीं असें कोर्टास आढळून आलें तर तेवढ्यापुरता दावा कोर्टानें काढून टाकला पाहिजे. सावकार जाणूनबुजून हिशोबाच्या वह्या सादर करीत नाहीं अशी शंका कोर्टास आल्यास, जो पहिला हिशोब सादर केलेला असेल त्यांत बाकी म्हणून दाखवलेल्या रकमेच्या निम्मे रक्कम मुद्दल म्हणून कोर्टानें मानावी. पण ऋणकोला योग्य तऱ्हेनें धनकोनें वागवलें आहे आणि धनकोनें दाखवलेले हिशोब विश्वसनीय आहेत अशी कोर्टाची खात्री झाली तर पूर्वीच्या हिशोबाच्या चोपड्या सावकारानें पुढें आणल्या नसल्या तरी सुद्धां दाव्यांत मागणी केलेली सर्व रक्कम देवविण्याचा अखत्यार कोर्टास आहे.

नियम करण्याचा अधिकार २०. या कायद्याचे उद्देश पूर्णपणें साधण्याकरतां या कायद्यांत केलेल्या व्यवस्थेस अनुसरून हिशोब तपासण्यासंबंधी आणि इतर बाबींसंबंधी जरूर ते नियम करण्याचा अधिकार दरबारला राहील.

परिशिष्ट चवथें.

—:o:—

खेडुत–ऋणविमोचनाची योजना.

कौन्सिलचा ठराव नं. २१९

या संस्थानच्या दरबारी खेडुतांच्या कर्जबाजारीपणाची चौकशी करण्याकरतां एक कमिटी नेमली होती. कमिटीनें केलेल्या चौकशीवरून असें आढळून आलें कीं सावकारधनको व खेडुतऋणको यांच्यामधील व्यवहाराच्या अटी ऋणको खेडुताच्या अज्ञानाचा व गरजूपणाचा गैरलाभ घेऊन ठरवल्या जात असत. तसेंच सावकारांच्या चोपडयांत अनियमित आणि संशयास्पद अशा देण्याघेण्याच्या नोंदी सांपडल्या आहेत. ही स्थिति सुधारण्याकरतां, ऋणको–धनको यांचेमधील संबंध ज्यास्त शुद्ध व चांगल्या पायावर उभारण्याकरितां, आणि सावकारांनीं कर्जाऊ दिलेले पैसे योग्य व्याजासह त्यांना परत मिळण्याची व्यवस्था व्हावी याकरतां, शेतकरी–संरक्षक बिलाचा मसुदा तयार करणें दरबारला इष्ट वाटलें. त्या बिलांतील कलमांची लोकांना माहिती व्हावी आणि लोकांना वाटल्यास त्यांचीं मतें प्रदर्शित करण्यास संधि मिळावी म्हणून ता. ४ आक्टोबर १९२९ च्या दरबार गॅझेटमध्यें (आउटवर्ड नं. ११७९ ह्मणून) तो मसुदा प्रसिद्ध करण्यांत आला. लोकमत जर प्रदर्शित झालें तर त्याचा विचार करून नंतर योग्य व जरूर ती व्यवस्था दरबार करील. पण या दरम्यानच्या मुदतींत खेडुतांच्या अगोदरच्या कर्जाचा निकाल लावण्याची दरबारची इच्छा आहे. जर सावकारानें शेतकऱ्याला दिलेलें अव्वल मुद्दल नेमस्त व न्याय्य अशा व्याजासह घेऊन शेतकऱ्यांना कर्जातून पूर्णपणें मुक्त करावयास सावकार कबूल होतील आणि अशां तऱ्हेनें शेतकरी ऋणमुक्त होतील तर तें उद्देश्य साधण्याकरतां दरबार अगदी हलक्या दराच्या व्याजानें शेतकऱ्यांना जरूर तेवढी रक्कम देण्यास तयार आहे. या कारणास्तव पुढील हुकुम करणें कौन्सिलला योग्य वाटत आहेः––

(१) जर या संस्थानांतील कोणत्याहि महालांतील पन्नास टक्यांहून अधिक सावकार व खेडुत ऋणविमोचनाचा फायदा घेण्यास आपण तयार आहों असें अर्जानें कळवतील तर दरबार त्या अर्जाचा अनुकूल दृष्टीनें विचार करील.

(२) सावकार व शेतकरी यांचेकडून या वर्णनाचा अर्ज आल्यास दरबार ऋणविमोचन कमिटी नेमील. तिची घटना पुढें दिल्याप्रमाणें होईलः—

(अ) अशा दरएक कमिटीचे दोन दरबारी सभासद असतील, पैकीं एक मुलकी खात्यांतला अंमलदार असेल व दुसरा न्यायखात्यांतला असेल;

(ब) त्या विशिष्ट महालांतील ज्या सावकारांच्या कर्जाचा निकाल व्हावयाचा असेल त्या सावकारांनीं दोन सन्मान्य पंच निवडावे; त्या दोघांना सावकारांचे प्रतिनिधी म्हणून कमिटीवर नेमण्यांत येईल.

(क) उपरिनिर्दिष्ट दरबारी अंमलदार आणि सावकारांचे पंच यांनीं मिळून ज्या गांवच्या कंर्जाचा निकाल करावयाचा असेल त्या गांवांतील एक किंवा दोन सन्मान्य गृहस्थ कमिटीमध्यें सामील करून घ्यावे.

(३) ज्यावेळीं एकाद्या गांवांतील कर्जाच्या निकालाचा प्रश्न कमिटी हातीं घेईल त्यावेळीं त्या गांवांतील सर्व सावकारांनीं व सर्व ऋणकोंनीं अशी कबुली दिली पाहिजे कीं कमिटीनें दिलेले निकाल मान्य करावयास आम्ही बांधलेले आहोंत; जे अशी कबुली देणार नाहींत त्यांना या योजनेचा फायदा मिळणार नाहीं.

(४) कमिटीचें काम सुरु होण्याच्या तारखेपर्यंत दरएक सावकाराच्या सर्व ऋणकोंकडून-हुकुमनाम्यांत समाविष्ट झालेल्या, कर्जखतांत दाखल झालेल्या किंवा अन्य प्रकारच्या-येण्याच्या सर्व रकमा, त्याचप्रमाणें, दरएक खेडुतानें आपल्या सर्व सावकारांना ज्या रकमा द्यावयाच्या असतील त्या सर्व रकमा ऋणविमोचनयोजनेमध्यें समाविष्ट होईपर्यंत कमिटीचें पुढलें काम सुरू होणार नाहीं.

(५) खेडुत-संरक्षक कायद्याचा जो मसुदा प्रसिद्ध झाला आहे त्यांतील उद्देश व कारणें यांचा योग्य विचार करून त्या विलांतील दहाव्या कलमाप्रमाणें उपरिनिर्दिष्ट कमिटी देण्याघेण्याचे हिशोब तपासून खरें देणें किती आहे हें मुकर करील.

(६) कोणत्याही एका खेडुताच्या सर्व कर्जाच्या फेडीसाठीं जी रक्कम देणें योग्य ठरेल ती रक्कम जर त्या खेडुताकडुन दरबारला मिळणाऱ्या साऱ्याच्या तिपटीपेक्षां अधिक असेल तर त्या साऱ्याच्या तिपटीइतकी रक्कम सर्व सावकारांना प्रमाणशीर वांटून देण्यांत येईल, आणि उरलेल्या रकमेच्या देण्यांतून खेडुताला मुक्त करण्यांत येईल.

(७) ऋणबद्ध खेडुतांच्या वतीनें सावकारांना द्यावयासाठीं जी रक्कम कलम सहाप्रमाणें ठरवण्यांत येईल ती जर सावकारांच्या वह्यांत नोंदलेल्या दर्शनी देण्याशीं दरबारनें ठरवलेल्या आणेवारीच्या प्रमाणांत असेल तर दरबार तेवढी रक्कम देण्याची हमी घेईल. ही मर्यादा ध्यानांत ठेवून सावकार व शेतकरी ऋणविमोचनाची योजना अमलांत आणण्याच्या कामीं सहकार्य करतील अशी दरबारला आशा आहे.

(८) दरएक ऋणको खेडुतांचें नांव, त्याच्या सावकारांचीं नांवें व कलम सहा आणि सात यांस अनसरून कर्जाच्या तडजोडींत देण्यासाठीं ठरवलेली रक्कम इतका सर्व तपशील देऊन कमिटी पत्रक तयार करील आणि तें पत्रक दरबारच्या मंजुरीसाठीं पाठवील.

(९) पत्रकाला दरबारची मंजुरी मिळाल्यानंतर जरूर ती रक्कम खेडुतांच्या वतीनें सावकारांना देण्यासाठीं दरबार पुढें करील. त्या रकमेवर दरबार खेडुतांकडून दरसाल दरशेंकडा चार टक्के व्याज घेईल. ही रक्कम सावकारांकडून पुऱ्या पावत्या घेऊन कमिटी सावकारांना योग्य प्रमाणांत वांटील.

(१०) या ठरावान्वयें कर्जाचा निकाल करून टाकल्यानंतर त्या निकालाच्या तारखेपर्यंतच्या सर्व कर्जाची पूर्ण फेड झाली असें समजण्यांत येईल आणि तत्पूर्वीच्या कोणच्याहि कर्जाच्या वसुलीसाठीं संस्थानच्या दिवाणी कोर्टांत दावा चालणार नाहीं.

(११) खेडुताच्या ऋणविमोचनासाठीं दरबारनें कलम नऊप्रमाणें दिलेली रक्कम सव्याज वसूल करण्यासाठीं खेडुतांचें पीक दरबारी खळावाडींत आणलें जाईल. भागबटाई पद्धतीप्रमाणें जो दरबारचा हिस्सा असेल तो प्रथम बाजूस काढण्यांत येईल. तो विकून जो पैसा येईल त्यांतून ठरलेल्या नामाप्रमाणें त्या वर्षाचा दस्त आणि मुदत भरलेली तगाई वजा करण्यांत येईल. बाकी राहिलेल्या रकमेंतून उपरिनिर्दिष्ट कलम नऊप्रमाणें दिलेल्या रकमेचें व्याज कापण्यांत येईल व आणखी शिल्लक राहिल्यास त्या रकमेच्या फेडींत ती जमा केली जाईल. सबंध रक्कम फिटेपर्यंत सालोसाल हा प्रकार चालू राहील. खेडुताचा भाग खेडुताच्या स्वाधीन केला जाईल आणि त्यांतून खेडुताला आपला उदरनिर्वाह सहज करतां येईल. जर एकाद्या खेडुताला सपाटून पीक मिळालें आणि दरबारची सर्व रक्कम एकदम देऊन टाकावी असें वाटलें तर तसें करण्याची त्याला मुभा आहे.

(१२) ऋणविमोचनाच्या योजनेसाठीं नेमलेल्या कमिटीच्या कामांत कांहीं नवीन बाब उपस्थित झाली आणि या ठरावावरून तिचा निकाल लागत नसला तर कमिटीनें ती बाब दरबारच्या हुकमासाठीं दरबारकडे रूजु करावी.

तमाम लोकांस जाहीर होण्यासाठीं हा ठराव दरबार गॅझटमध्यें प्रसिद्ध करावा.
आश्विन शु. २ संवत् १९८५ शुक्रवार

ता. ४ आक्टोबर १९२९

कौन्सिल ऑफ ॲडमिनिस्ट्रेशनच्या हुकमान्वयें
हरगोविंद मणिशंकर
सेक्रेटरी

परिशिष्ट पांचवें.

:०:

ग्रामपंचायतीच्या स्थापनेसंबंधीं

कौन्सिलचा ठराव नं. २२६

ग्रामरक्षणादि सार्वजनिक हिताच्या कामीं ग्रामस्थांचें लक्ष्य लावण्याकरतां, ग्रामस्थांच्या सर्वसाधारण हिताचे प्रश्न आपापसांत सहकार्य करून बाहेरच्या मदतीची अपेक्षा न करतां सोडवण्याचे कामीं ग्रामस्थांना मदत करण्याकरतां, आणि आपला कारभार पहाण्यास त्यांना समर्थ करण्याकरतां, ग्रामपंचायतीची स्थापना करावी असा दरबारचा उद्देश आहे. या उद्देशाप्रीत्यर्थ यापुढें दिलेले तात्पुरते नियम प्रसिद्ध करण्यांत येत आहेतः—

(१) आपल्या गांवांत ग्रामपंचायतीची स्थापना करण्यांत यावी अशी मागणी कोणच्याहि गांवच्या लोकांकडून करण्यांत आली तर तशी स्थापना करण्यासाठीं दरबार जरूर ती योजना करील.

(२) अशा रीतीनें स्थापन झालेल्या ग्रामपंचायतीचे पांचाहून कमी सभासद असणार नाहीत. सर्व गांवकऱ्यांनीं मिळून निवडलेल्या गांवच्या खेडुत व इतर वर्गाच्या प्रमुख ग्रामस्थांपैकीं इसम ग्रामपंचायतीचे सभासद ह्मणून नेमले जातील.

(३) उपरिनिर्दिष्ट सभासदांशिवाय दरबारी मुलकी पटेल व मुखी हे पंचायतीचे एक्स ऑफिशियो सभासद रहातील. गांवच्या लोकांची तशी इच्छा असल्यास आणि त्या इच्छेला योग्य कारणें असल्यास पटेल अगर मुखी याचे जागीं एक माणसाऐवजीं दुसऱ्याची योजना करतां येईल.

(४) वरील पद्धतीप्रमाणें नेमलेले सभासद तीन वर्षेपर्यंत आपापल्या स्थानीं रहातील. तीन वर्षांच्या मुदतीनंतर नव्या नेमणुका करण्यांत येतील. गांवकऱ्यांनीं निवडलेल्या प्रमुख ग्रामस्थांमधून नव्या पंचायतीची दर तीन वर्षांनीं नेमणूक करण्यांत येईल.

(५) या तीन वर्षांच्या मुदतींत जर एकादी जागा खालीं झाली तर गांवचे लोक ज्याचें नांव सुचवतील अशा ग्रामस्थाची त्या जागीं नेमणूक करण्यांत येईल. अशा तऱ्हेनें नेमणूक होईपर्यंत पंचायतीचे अवशिष्ट सभासद पंचायतीचें सर्व काम चालवूं शकतील.

(६) पंचायतीच्या कामीं मदत करूं शकेल अशा कोणाहि इसमास तलाटी म्हणून नेमण्याचा पंचायतीस अधिकार आहे, पण त्याचा पगार दरबारकडून मिळेल. गांवच्या साऱ्याच्या रकमेच्या आधारें तलाठ्याचा पगार ठरवण्यांत येईल. पंचायतीची तशी इच्छा असल्यास तलाठ्याचें काम करावयास लायक असलेल्या मुलकी खात्यांतील एकाद्या इसमास तलाटी म्हणून नेमण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

(७) गांवचे मुलकी व पोलिस चौकीदार नेमण्याचा अधिकार पंचायतीस आहे, मात्र त्यांच्या नेमणुकांना त्या त्या खात्याच्या मुख्याधिकाऱ्यांची मंजुरी पाहिजे. त्यांच्या पगारा-इतकी रक्कम दरबारकडून पंचायतींना मिळेल. पगार हल्लींच्या स्केलप्रमाणें अथवा वेळोवेळीं ठरवलेल्या स्केलप्रमाणें दिला जाईल. या नोकरांना नोकरींत ठेवणें अगर काढून टाकणें पंचायतीच्या अधिकारांतलें आहे, मात्र त्यांच्या नेमणुकांना उपरिनि-र्दिष्ट मुख्याधिकाऱ्यांची मंजुरी पाहिजे.

(८) ज्या पसायत वगैरे लोकांना नोकरीसाठीं जमिनी दिलेल्या आहेत आणि त्यामुळें जे कोणत्या ना कोणत्या प्रकारची नोकरी करावयास बांधलेले आहेत त्यांनीं पंचायतीच्या हुकमतीखालीं व सांगण्याप्रमाणें त्या प्रकारची नोकरी केली पाहिजे. अशा वर्गांतला कोणीहि इसम नोकरी करण्यांत कुचराई करील अथवा एकाद्या वाईट वर्तनाच्या माणसाशीं संगनमत करील आणि त्याच्याविरुद्ध पंचायतीकडून तशी तक्रार येईल तर त्याची जमीन दरबार खालसा करील. ज्या गांवांत अशा प्रकारचा नोकर देण्याची पद्धत असेल तेथें ती अव्याहत चालू रहावी याकरितां खालसा केलेली जमीन दरबार दुसऱ्या कोणा तरी लायक इसमास देईल.

(९) गांवचीं तळीं, विहिरी, रस्ते आणि तत्सम सार्वजनिक उपयोगाचीं कामें पंचायतीच्या देखरेखीखालीं रहातील. हीं सर्व कामें चांगल्या स्थितींत रहावीं याकरतां गांवांतील लोक जी पट्टी या कामांकरतां वसूल करतील त्यांत भर घालण्याकरितां हल्लींप्रमाणें आब्यादीची देणगी दरबार चालू ठेवील.

(१०) पंचायतीच्या सभांत झालेल्या कामाची एका खास वुकांत नोंद केली पाहिजे. आणि त्या वुकांत हजर असलेल्या सर्व सभासदांनीं सह्या केल्या पाहिजेत. पंचायतीच्या सर्व सभासदांच्या निम्मे सभासद हजर असल्याशिवाय पंचायतीचें काम सुरू होऊं शकणार नाहीं.

(११) वतनी, भायात, मुलगिरास, सुधारावराड आणि राजहक या जमिनींखेरीज इतर सर्व बाबींची व्यवस्था करण्याचा अधिकार पंचायतीची इच्छा असल्यास पंचायतीकडे राहील.

(१२) सर्व दरबारी खातेजमिनी, आणि पूर्ण अथवा अर्धा सारा देणाऱ्या व सध्यां खेडुतांच्या ताब्यांत असलेल्या वतनी जमिनी, यांची व्यवस्था पंचायतीकडे राहील; आणि हल्लीं अमलांत असलेल्या नियमानुसार पंचायतींनी थाणदारांप्रमाणें त्यांची व्यवस्था ठेवली पाहिजे. हल्लीं ठरलेल्या अथवा भविष्यकालीं फेरपहाणीनंतर ठरेल त्या साऱ्याच्या रक्कमेचे मुक्रर केलेले हप्ते मुक्रर केलेल्या वेळीं दरबारला देण्याची जबाबदारी पंचायती-वर आहे. ज्यास्त जमीन लागवडीला आणली, अथवा, शेतीची जमीन खराब्यामध्यें ढकलली, अथवा, सुधारावराड किंवा राजहक जमिनी दरबारकडे आल्यानंतर त्या दरबारी जमिनी म्हणून कर देण्याच्या अटीवर खेडुतांना दिल्या–तर दरबारला याव-याच्या साऱ्याच्या रकमेंत वधघट होईल.

(१३) जर दरबारी खातेजमीन खातेदारविरहित झाली तर तिचा लिलांव करण्याचा पंचायतीस अधिकार राहील अशा तऱ्हेनें लिलांव करून जी सुरवडीची रकम मिळेल ती पंचायतीकडे जमा होईल. पण लिलांवाच्या अगोदरच्या वीस वर्षांच्या अवधींत मिळालेल्या सुखडीच्या वार्षिक सरासरीइतकी रक्कम सालीना पंचायतीनें दरबारकडे भरली पाहिजे. पडतर जमीन लागवडीस आली असतां तिजवरील सुखडी अशाच तत्त्वावर ठरवली पाहिजे. मात्र पडतर जमीन लागवडीला द्यावयाच्या पूर्वी दरबारची आगाऊ मंजुरी मिळवली पाहिजे.

(१४) भायात, मुलगिरास, सुधारावराड, राजहक वगैरे कर पूर्वीप्रमाणेंच सरळ दरबार वसूल करील.

(१५) हल्लीं जी प्रतबंदी पद्धति चालू आहे तिजप्रमाणेंच जमीनमहसूल दरबारला दिला पाहिजे. पण आपल्या अंतर्गत सोईसाठीं या पद्धतींत कांहीं फरक करावा असें पंचायतीस वाटल्यास दरबारची आगाऊ मंजुरी मिळवून तसा फरक करतां येईल.

(१६) एकाद्या चांगल्या अगर वाईट वर्षी कोणच्याहि महालांतील इतर खेड्यांत साऱ्याची आणेवारी ठरवण्यांत आली असेल त्यावेळीं आपल्या खेड्याच्या वतीनें ठरलेल्या नामाप्रमाणें सारा भरण्याचा पंचायतीस हक्क आहे.

(१७) पंचायत स्थापण्यापूर्वी गांवांतून जो वसूल थकला असेल त्याची रक्कम दाखवणारें पत्रक तयार करून पंचायतीच्या स्थापनेच्या वेळीं स्वाधीन करण्यांत येईल. ठरलेल्या वार्षिक साऱ्याच्या वर चांगल्या पिकाच्या वर्षी जी रक्कम वसूल करण्याचा दरबार हुकुम करील त्या रकमेंतून ही मागील बाकी आणि सालोसाल कांहींहि कारणानें तुंबणारी बाकी यांची पंचायतीनें वसुली केली पाहिजे. अशा प्रकारें वसूल केलेली रक्कम पंचायतीनें दरबारकडे भरली पाहिजे.

(१८) प्रचलित नियमांप्रमाणें पंचायतीच्या ताब्यांत दिलेल्या गांवाला जरूर असल्यास तगाई देण्यांत येईल.

(१९) दरबारच्या कामासाठीं खेड्यांतील जमीन दरबारला संपादन करणें जरूर असेल तर, हल्लीं अमलांत असलेल्या नियमांप्रमाणें दरबार ती संपादन करूं शकेल.

(२०) शेतीच्या जमिनींत असणारीं घरें व झोपडीं यांसंबंधें जी व्यवस्था हल्लीं चालू आहे तीच पंचायतींनीं पुढें चालविली पाहिजे. दरबारची आगाऊ मंजुरी घेऊन खुषीनें घरांची अदलाबदल करतां येईल. अशीं घरें, जमिनी अथवा घरांच्या रिकाम्या जागा यांचा लिलांव केल्यास त्याची खबर पंचायतीनें वहिवाटदारास दिली पाहिजे आणि त्या खबरीप्रमाणें वहिवाटदारानें जरूर ते लेख पंचायतीकडे पाठवले पाहिजेत.

(२१) मुलकी कायद्याप्रमाणें दरबारी खेडुतांकडून साऱ्याच्या बाकीबद्दल जामीन मागणें, उभीं पिकें कापून नेण्यास मनाई करणें, मालमत्ता जप्त करून करवसुली करणें,

खातेजमीन सरकारजमा करणें वगैरे अधिकार पंचायतीस आहेत. या अधिकाराची बजावणी करण्याचे कामीं जरूर लागणारी मदत मुलकी खात्यानें पंचायतीस दिली पाहिजे.

(२२) जमीनमहसूल व दरबारी खातेजमिनीवरची सुरवडी यांखेरीज बाकीच्या सर्व किरकोळ करांच्या रूपानें मिळणाऱ्या रकमेची व्यवस्था पंचायतीकडे राहील; मात्र पंचायत स्थापन होण्याच्या पूर्वी वीस वर्षांच्या अवधींत या करांच्या स्वरूपांत जी रक्कम मिळाली असेल तिच्या वार्षिक सरासरीइतकी रक्कम पंचायतीनें दरबारला सालीना दिली पाहिजे. ही सर्व व्यवस्था रेव्हेन्यु कोड व वेळोवेळीं करण्यांत येणारे नियम व सर्क्युलरें यांस अनुसरून पंचायतीनें ठेवली पाहिजे.. वार्षिक सरासरीची ठरवलेली रक्कम चांगल्या अथवा वाईट वर्षी दिलीच पाहिजे. पंचायत स्थापन करण्यापूर्वीच्या कालांत या वर्गांतली जी वसुली थकली असेल तिची एक यादी तयार करून पंचायतीच्या स्वाधीन करण्यांत येईल. त्या यादीप्रमाणें थकलेली बाकी वसूल करून पंचायतीनें दरबारला दिली पाहिजे.

(२३) जमीनमहसूल सर्वांच्या अगोदर वसूल करण्याचा दरबारचा हल्लींचा अधिकार अव्याहत चालू राहील. खेडुतांच्या व इतरांच्या विरुद्ध झालेले हुकुमनामे बजावण्यासंबंधांत हल्लीं असलेल्या नियमांप्रमाणें पंचायतींनीं काम केलें पाहिजे.

(२४) गांवच्या व्यवस्थेकरतां पंचायतीनें एक बेठाखातावही ठेवली पाहिजे. वर्षाच्या अखेरीस त्याची नक्कल करून पंचायतीनें अस्सल वही थाणदाराच्या आफिसांत सादर केली पाहिजे. हल्लीं चालू असलेल्या पद्धतीप्रमाणें बेठाखात्याच्या वहींत सर्व सदरें व पोटसदरें नमूद करून त्याखालीं योग्य नोंदी केल्या पाहिजेत. पंचायतीनें विनंति केल्यास पंचायतीच्या खर्चानें जरूर त्या चोपड्या व रजिस्टरें—बेठाखातावही, रोजमेळ, खतावणी, पहाणीपत्रक, पावतीपुस्तक वगैरे—महाल आफिसनें दिल्या पाहिजेत. हल्लीं ज्या कागदांना तिकिटें लावावीं लागतात त्यांना यापुढेंहि तिकिटें लावलीं पाहिजेत.

(२५) पटेल व मुखी यांचा पगार आणि मुलगिरासिया व तत्सम वतनदारांचे हक्क पंचायतीमार्फत त्यांना देण्याची व्यवस्था दरबारनें केली पाहिजे.

(२६) गांवची शांति व सार्वजनिक सुरक्षितता राखण्याकरतां एकाद्या इसमास गांवांतून घालवून लावणें पंचायतीस इष्ट वाटलें तर दरबारची आगाऊ मंजुरी मिळवून तसें करण्याचा पंचायतीस अधिकार आहे.

(२७) जर एकाद्या गांवच्या पंचायतीनें ठेवलेली गांवची व्यवस्था दरबारला समाधानकारक वाटली तर दरबारच्या इच्छेनुरूप अमुक रकमेपर्यंतचे दिवाणी दावे आणि गुरांच्या अतिक्रमणाचा कायदा व इंडियन पीनल कोड यांखालीं चोरी व अपाकिया यांसंबंधींचे लहान खटले, यांचा निकाल करण्याचा अधिकार पंचायतीस देण्यासाठीं जरूर ती व्यवस्था दरबार करील.

(२८) मालकीचा व विक्रीचा हक्क ज्या खेड्यांत खेडुतांना देण्यांत येईल त्या खेड्यांत मालकी हक्क देण्याच्यावेळीं भरावयाची चौथाई व विक्रीचा हक्क मिळविण्याच्या वेळीं भरावयाची भुईपट्टी: परस्पर वसूल करण्याचा दरबारचा अधिकार हल्लींप्रमाणें अबाधित चालू राहील.

(२९) संस्थानाबाहेरच्या कोणत्याहि बंदरांत उतरून घेऊन जो परदेशी माल खुर्कीच्या मार्गानें संस्थानांतील कोणत्याहि खेड्याच्या हद्दींत येईल त्यावर ब्रिटिश टॅरिफ कायद्याप्रमाणें जेवढी जकात बसली असेल तेवढ्या जकातीची रक्कम दरबार हल्लींप्रमाणेंच परस्पर वसूल करील.

(३०) अफू, मीठ, अबकारी, हत्यारें व दारुगोळा या सर्वांचा कारभार हल्लींप्रमाणें दरबारकडेच राहील.

(३१) कोंडवाड्याची फी, जन्म, मृत्यु, पिकें यांसंबंधें पत्रकें तयार करून पाठवण्याची जबाबदारी पूर्वीप्रमाणेंच गांवचा पाटील व मुखी यांचेवर राहील.

(३२) दंड व अन्य शिक्षेच्या स्वरूपांत येणारा पैसा सरकारचा असल्यामुळें पंचायतीनें या कारणें वसूल केलेला पैसा दरबारकडे भरला पाहिजे.

(३३) जर एकाद्या पंचायतीला पंचायतीचा कारभार सोडून देण्याची इच्छा होईल तर वर्षअखेर तशी व्यवस्था करण्यांत येईल.

(३४) जी पंचायत प्रचलित नियम व कायदे यांप्रमाणें काम करणार नाहीं अगर जी पंचायत कारभार चालवूं शकणार नाहीं ती पंचायत रद्द करण्याचा दरबारला अधिकार आहे.

(३५) वर दिलेल्या गोष्टींबाहेर आणखी सोय व सूट कोणत्याहि गांवच्या लोकांस पाहिजे असेल आणि पंचायतीची मागणी करतांना त्यांबद्दलहि मागणी केलेली असेल तर त्याबद्दल योग्य विचार करून जरूर ती व्यवस्था दरबार करील. सारांश, दर एक गांव आपला अंतस्थ कारभार पहाण्यास समर्थ व्हावा अशी दरबारची तीव्र इच्छा आहे.

तमाम लोकांस जाहीर व्हावयासाठीं हा ठराव स्टेट गॅझटमध्यें प्रसिद्ध करण्यांत येत आहे.
ता. ४ आक्टोबर १९२९

कौन्सिल ऑफ ॲडमिनिस्ट्रेशनच्या हुकमान्वयें
हरगोविंद मणिशंकर
चिटणीस

———:०:———

परिशिष्ट सहावें

सरकारी भाषणांतले उतारे वगैरे

(१)

लोक प्रतिनिधिसभेच्या मोती बागेंत भरलेल्या सातव्या अधिवेशनाच्या सुरुवातीस ता. २२ डिसेंबर १९२५ रोजीं सर प्रभाशंकर पट्टणी के. सी. आय्. ई. यांनीं केलेल्या भाषणांतील उतारा:—

"अनुभवी अंमलदारांची एक कमिटी शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाची चौकशी करण्याकरतां नेमलेली आहे. चौकशी पूर्ण झाल्यावर कौन्सिल त्या प्रश्नाचा विचार करील.व अखेर निकाल करतांना शेतकरी व सावकार यांच्या अनुभवाचा उपयोग होईल असें कौन्सिलला वाटल्यास कौन्सिल योग्य ती व्यवस्था करील.

ही चौकशी करतांना शेतकऱ्यांकडून आणि त्यांच्याशीं व्यवहार करणाऱ्या सावकारांकडून बिनचूक माहिती गोळा केली जात आहे. हल्लीं भावनगर संस्थानांत राजा व प्रजा यांचे दरम्यान जो सलोखा नांदत आहे त्याचें रहस्य असें आहे कीं प्रजेच्या हितासंबंधीं अधिकारी जागरूक राहून लक्ष पुरवीत असतात आणि प्रजेचा राज्यांतील मुख्याधिकाऱ्यांवर पूर्ण विश्वास आहे."

(२)

ता. २२ जुलै १९२९ रोजीं दिवाणबहादूर त्रिभोवनदास कालिदास त्रिवेदी, स्टेट कौन्सिलचे सभासद, यांनीं लिहिलेल्या मिनिटमधील उतारा:—

"कौन्सिलचे अध्यक्षसाहेब असें मानतात कीं हल्लीची दुःस्थिति केवळ नवा कायदा करून दूर होणार नाहीं आणि तें त्यांचें मत बहुतांशीं खरें आहे. हा सर्व प्रश्न मोठा गुंतागुंतीचा आहे. ऋणकोधनको यांचा संबंध नेहमींच नाजुक असतो आणि तोच या प्रश्नांत गोंवलेला आहे. सावकाराची मदत खेडुतांना वेळोवेळीं लागते. ग्रामव्यवस्थेंत सावकार अवश्य व अपरिहार्य असतो. त्याची जागा दरबार घेऊं शकत नाहीं. अशा बिकट परिस्थितींत उत्तम मार्ग म्हणजे स्पष्ट आणि प्राप्त परिस्थितींत योग्य दिसणाऱ्या उपायांची योजना करून दोनहि पक्षांना अशा तऱ्हेनें पूर्वास्थितीवर आणून सोडावयाचें कीं त्यांचा एकमेकांवर विश्वास बसेल, ते एकमेकांची योग्य ती सेवा करतील आणि सावकार पिळण्याची इच्छा धरणार नाहीं व शेतकरी नाडला जाणार नाहीं. शिवाय कमिटीला चौकशींत दिसून आलेल्या वाममार्गांकडे दुर्लक्ष्य करून चालणार नाहीं. कारण, जर त्या मार्गांना पुनः मोकळीक ठेवली तर खेडुताची स्थिति पुनश्च बिघडेल, खेडुतवर्गाची नासधूस होईल आणि अखेरीस सावकारांनाहि अतोनात तोटा सोसावा लागेल.

सावकारांना, निदान त्यांपैकीं जे दूरदृष्टीचे होते त्यांना ही विचारसरणी पटली आणि खेडुतवर्गाची अनिर्बंद्ध पिळणूक थांबवण्याकरतां कायद्यानें कांहींतरी नियमन केलें पाहिजे असें तेहि कबूल करूं लागले. फक्त कायदा करून आपण थांबावें असें माझें मुळींच म्हणणें नाहीं. सर्व परिस्थितीचा विचार करून कांही तरी केलें पाहिजे याबद्दल मात्र सावकार, खेडुत व इतर सर्व यांचें एकमत आहे.

या प्रश्नासंबंधीं कौन्सिलच्या अध्यक्षांनीं सभासदांशीं पुष्कळ विचारविनिमय केला. त्या विचारविनिमयांमुळें पुढील निर्णय करण्यांत आलेः—

शक्य असेल तेथें खेडुतांचें अगोदरच्या कर्जातून विमोचन केलें पाहिजे. आणि याकरितां सावकारांचें सहकार्य मिळवलें पाहिजे.

भविष्यकाळीं खेडुतांवर देण्याघेण्यासंबंधीं दावे करण्यांत आल्यास कायद्यांत अशी सुधारणा केली पाहिजे कीं तेणेंकरून दाव्याचा उगम ज्या व्यवहारांत झाला त्या व्यवहाराचा सबंध इतिहास तपासून, व्याज व वटाव यांचे स्वरूपांत किती रक्कम वाढवलेली आहे व हिशोबांत काय युक्त्या लढवल्या आहेत हें शोधून काढण्याचा व उभयपक्षीं न्याय्य असा निवाडा देण्याचा अधिकार कोर्टांना प्राप्त होईल.

या दोहोंपैकीं पहिली गोष्ट शक्य असली तरी सावकारांची कबुली असेल तरच प्रत्यक्ष अमलांत आणण्याजोगी आहे. अशा सार्वत्रिक ऋणविमोचनप्रसंगीं सावकारांच्या चोपड्यांत जेवढें दाखवलें असेल तेवढें सर्व कर्ज देवविणें अशक्य आहे. खरोखरच जेवढी रक्कम कर्जाऊ दिली असेल तिजवर शेंकडा बारा टक्केप्रमाणें सरळ व्याज आकारावें, आणि वेळोवेळीं ज्या रकमा दिलेल्या असतील त्या व्याजापोटीं जमा कराव्या; आणि असा हिशोब करून निघणारी बाकी, त्या बाकीपेक्षां ज्यास्त नाहीं इतक्या व्याजासह, सावकारास देवविणें रास्त होईल. सुरुवातीपासून सर्व व्यवहाराचा इतिहास तपासून पहाण्यासाठीं दोन दरबारी अंमलदार, महालाचे दोन पंच व गांवाचे दोन पंच यांची मिळून एक कमिटी बनवण्यांत यावी. या कमिटीनें कोणच्या प्रकारें काम करावें हें एक्झिबिट १ मध्यें दिलेलें आहे. सावकाराच्या चोपड्यांत दाखवलेल्या हिशोबाप्रमाणें जें दर्शनी देणें निघतें त्याचेबद्दल रुपयास चार आणे घेऊन सर्व देण्याची तडजोड करावयास सावकार कबूल होतील तरच ऋणविमोचन यशस्वी रीतीनें पार पाडतां येईल. आणि पूर्वीच्या कर्जातून खेडुत मोकळे झाले तर सावकार व खेडुत यांचे पूर्वीचे संबंध पुनः स्थापित होतील. खेडुतांचें देणें वारण्याकरतां लागणारी रक्कम दरबारनें पुढें करावी आणि ही रक्कम खेडुतांकडुन दरसाल दरशेंकडा चार टक्के व्याजासह वसूल करण्यांत यावी. ही रक्कम कशी वसूल करावी यावद्दलची योजना एक्झिबिट १ मध्यें दिलेली आहे. व्याजाचा दर सालीना चार टक्के असल्यामुळें ही रक्कम फेडणें खेडुतांना जड पडणार नाहीं."

* * * *

(३)

लोकप्रतिनिधिसभेच्या दहाव्या अधिवेशनाच्या सुरुवातीस ता. १४ नोवेंबर १९२९ रोजीं मोतीबागेंत सर प्रभाशंकर पट्टणी यांनीं केलेल्या भाषणांतील उतारा:—

" महाराज सरकार अजून पूर्ण वयांत आले नसले तरी त्यांच्या राज्यारोहणापूर्वी खेडुतांचा कर्जाचा भार हलका व्हावा अशी इच्छा करीत आहेत. याकारणें चालू साली साऱ्याच्या बाकीपैकीं एकोणीस ते वीस लाख रुपयांची सूट देण्याचें दरबारनें ठरवलें आहे. त्याबरोबरच शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांचें जें देणें आहे त्याची चौकशी चालू आहे व व्यापाऱ्यांच्या अन्याय्य मागण्यांतून शेतकऱ्याची सुटका करावयाची पण सावकारांचें योग्य तें देणें द्यावयाचें अशी दुहेरी व्यवस्था करण्यांत येत आहे. ही योजना पूर्णपणें स्वीकारण्यांतच आपलें हित आहे हें व्यापारी व खेडुत या दोनहि वर्गांना पटेल अशी आशा आहे. चौकशींत असें दिसून आलें आहे कीं संस्थानांतील शेतकऱ्यांपैकीं पन्नास टक्के शेतकरी प्रामाणिक असून त्यांचेकडे साऱ्यापैकीं कांहीं बाकी नाही व त्यांनीं अविचारानें कर्जहि काढलेलें नाहीं. खरोखरचं याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. इतरांचे संबंधीं बोलावयाचें म्हणजे, जे बाहेरच्या मदतीवर अवलंबून रहातात ते सचोटीला मुकतात आणि अखेरीस ते खेडुतपणालाहि आंचवण्याचा संभव असतो. दरबारची बाकी ज्यांचेकडे थकली आहे त्यांना सूट देतेवेळीं ज्यांचेकडे बाकी नाहीं त्यांना सचोटी व उद्योग यांचें चीज करण्यासाठीं कांहीं तरी बक्षीस ह्मणून द्यावें असें माझें मत आहे. ह्मणून कर्जांत नसलेल्या अशा ज्या खेडुतांना यंदां पीक नीट न आल्यामुळें साऱ्याच्या तहकुबीची सवलत दिलेली आहे त्यांना त्यांच्या सरळ व्यवहाराबद्दल बक्षीस ह्मणून तेवढ्या साऱ्याची माफी देण्याचे हुकुम काढण्यांत येत आहेत.

" दरबार शेतकऱ्यांना एकोणीस ते वीस लाख रुपयांची सूट देत असतांना, शेतकऱ्यांच्या खासगी कर्जबाजारीचा विचार केला नाहीं तर केवळ दरबारच्या औदार्यानें शेतकऱ्यांचीं हलींच्या विपन्नावस्थेंतून मुक्तता होणार नाही याची जाणीव दरबारला होत आहे. त्याकरितां सावकारांची जबर व्याज घेण्याची संवय व खोटे हिशोब तयार करण्याची पद्धत यांपासून खेडुतांचा बचाव करण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

" शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाची चौकशी करण्याकरतां नेमलेल्या कमिटीनें हा निर्णय केला आहे. या चौकशीपायीं, आपल्या कर्जाच्या फेडींत खाजगी वाटाघाटींत ठरणारी रास्त रक्कम घेऊन तडजोड करावयास व्यापाऱ्यांचें मन वळवण्याकरतां मी माझे सहकारी दिवाणबहादूर त्रिभोवनदासभाई यांचेसह गढडा मुक्कामीं गेलों. दरबार एकएका सावकाराचे हिशोब तपाशील, सावकारांना योग्य दरानें व्याज देववील आणि अव्वल देण्याच्या दुपटीपेक्षां चोपडींतील देणें ज्यास्त नसेल तर सावकाराला तें देऊन टाकण्यासाठीं जरूर तेवढी रक्कम दरबार खेडुताला कर्जाऊ देईल अशी आम्ही सावकारांपुढें सूचना मांडली. पण सावकारांच्या दुराग्रहामुळें आमचे प्रयत्न निष्फळ झाले. सावकारांच्या कर्जाच्या बाबतींत शेतकऱ्यांना सवलती देण्यासाठीं एक कायदा तयार करून बिलाच्या स्वरूपांत तो दरबार गॅझेटमध्यें प्रसिद्ध करण्यांत आला आहे. अंधस्वहितदृष्टि आडवी आली नाहीं तर या कायद्यांत ग्रथित केलेली योजना दोनहि पक्षांच्या हिताची आहे असें दिसून येईल. सावकार तयार असतील तर उपरिनिर्दिष्ट पद्धतीनें शेतकऱ्यांच्या देण्याचा निकाल करावयास दरबार अजूनहि तयार आहे. सावकार तयार झाले नाहींत तर या कायद्याचा अंमल जारी होईल व त्या कायद्याच्या कलमांस अनुसरून दोनहि पक्षांना न्याय देण्यांत येईल.

"अशा तऱ्हेनें दरबारच्या व सावकारांच्या देण्यांतून शेतकरी मुक्त झाले तरी, जर ते व्यवस्थितपणें खर्च करावयास शिकणार नाहींत आणि पुनः कर्ज न काढतां जरूर तो खर्च भागवण्याचें सामर्थ्य त्यांना प्राप्त करून देण्याची व्यवस्था होणार नाहीं तर पूर्वस्थितीची पुनरावृत्ति होईल अशी मला भीति वाटते. म्हणून गांवांत रहाणारी जनता शांतिमय जीवन कंठूं शकेल आणि आपला कारभार आपण करूं शकेल अशी योजना करणें दरबारचें कर्तव्य आहे आणि हें कर्तव्य पार पाडण्यांत सावकारांचें सहकार्य मी मागत आहें.

" स्वावलंबन व परस्पर-सहकार्य यांचें बीजारोपण या मार्गानेंच होऊं शकेल. याकरतां ग्रामपंचायतीच्या स्थापनेसंबंधींच्या कायद्याचा मसुदा प्रसिद्ध केला आहे. हा कायदा सर्वबाजूंनीं हितप्रद होईल अशी आशा आहे. खेडुत व व्यापारी एकत्र कार्य करतील. खेडेगांवांतील स्वराज्य या योजनेनें अगदीं जवळ आणलेलें आहे.

" ज्यास्तींत ज्यास्त ग्रामपंचायतींची स्थापना व्हावी अशी दरबारची इच्छा आहे आणि म्हणूनच नवे नियम दरबारनें केले आहेत. या नियमांखालीं ग्रामपंचायतीच्या स्थापनेची मागणी जो गांव करील त्या गांवांत पंचायत स्थापली जाईल. याच सालीं हणोल गांवीं पंचायतीची स्थापना झाली आहे. आपण घटना बनवून ती दरबारकडून मंजूर करून घेऊन तिच्या अन्वयें पंचायतीची मागणी करणाऱ्या गांवांत ग्रामपंचायती स्थापन करण्याचें वचन आज पांच वर्षांपासून मी देत आलों आहे. पण या सवलतीचा फायदा ग्रामस्थ लोक घेत नाहींत असें दिसून आल्यामुळें दरबारनें आपण होऊन पंचायतीसंबंधीं नियम केले आहेत.

" लोकांनी आपला कारभार पहावा अशी दरबारची इच्छा नाहीं अशी तक्रार व्यर्थ आहे. लोकांना पसंत असलेल्या अटींवर उभारलेली पंचायत स्थापण्यासंबंधीं दरबार लोकांना पूर्ण मुभा द्यावयास तयार आहे आणि या उदार देणगीचा लोक पूर्ण लाभ घेतील अशी आशा आहे. जनता पुरेपूर सहकार्य करील अशी आशा आहे.

" वहिवाटदार व थाणदार यांस माझी अशी विनंति आहे कीं त्यांनीं दरएक महालांत आणि दरएक ठाण्यांत निदान दोन पंचायती* स्थापावयास लोकांस प्रवृत्त करावें. ही माझी विनंति आहे, हुकूम नाहीं. जरूर तेथें त्यांनीं लोकांना मदत करावी आणि प्रथम स्थापलेल्या पंचायती इतक्या यशस्वी कराव्या कीं त्यांचेकडे पाहून दुसऱ्या गांवच्या लोकांनीं पंचायतीची मागणी करावी. पंचायतीच्या चळवळीला दिलेलें उत्तेजन आणि पंचायतीचें काम यशस्वी करून दाखवणें यांचा भविष्यकालीं अधिकाऱ्यांना बढती देतांना चांगल्या कामगिरीचा पुरावा म्हणून परामर्श घेण्यांत येईल.

" संस्थानच्या प्रजेपैकीं शेंकडा पाऊणशें शेतकरी आहेत; त्यांचें जीवन ज्यास्त सुखाचें व समाधानाचें व्हावें याकरितां या तीनहि योजनांचा एकदम अंमल करण्यांत येत आहे म्हणजे तिहींचाहि परिणाम एकसमयावच्छेदेंकरून होऊं शकेल. या योजनांचे इतर परिणाम म्हणजे सावकारांचे खेडुतांशीं ज्यास्त शुद्ध व ज्यास्त विश्वासाचे संबंध निर्माण होतील आणि ग्रामजीवन आल्हाददायक होईल.

" ही सुखमय परिस्थिति निर्माण करण्याचे कामीं व्यापाऱ्यांचें व खेडुतांचें सहकार्य मी मागतों. "

---

* आतांपर्यंत अठरा पंचायतींची स्थापना झाली आहे.

परिशिष्ट सातवें

——:o:——

पत्रव्यवहार

श्रीमान् विनायक नंदशंकर मेहता आय्. सी. एस्. संयुक्तप्रांत सरकारचे सेक्रेटरी, मुकाम लखनौ यांचें ता. २० जानेवारी १९३२ चें पत्रः—

लखनौ

जानेवारी २०, १९३२

मम प्रिय सर प्रभाशंकरभाई;

आपल्या शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा कमी करण्याकरितां मोठ्या प्रमाणावर स्टेट कौन्सिलचे प्रेसिडेंट या नात्यानें आपण योजना करीत आहां असें मला समजतें. मी श्री. भास्करराव यांस पत्र लिहून शक्य तर माझ्या खाजगी उपयोगाकरितां कमिटीच्या रिपोर्टाची एक प्रत मला पाठवून द्यावी अशी विनंती केली आहे. दरबारनें शेतकऱ्याच्या कर्जाची तडजोड करून फेड करण्याचें औदार्ययुक्त काम पुरें पाडल्यानंतर पुनः शेतकऱ्यावर कर्जाचा लोंढा येणार नाहीं अशी व्यवस्था करण्याकरतां दरबार कोणची योजना करणार आहे हें जाणण्याची मला अत्यंत उत्कंठा आहे. हा लोंढा अडवण्यासाठीं आपणास मोठी भित उभारली पाहिजे. एरवीं, केलेले सर्व श्रम फुकट जातील. आपण शेतकऱ्यांची पुनर्घटना करण्यासाठीं कांहीं करणार आहां काय? ग्रामसंघटना करून शेतकऱ्याला अविचार व उधळेपणापासून बचावणार आहां काय! कर्जांत वाहून जावयास असणाऱ्या सवलतींपासून त्याला दूर ठेवणार आहां काय? फाजील खर्चिकपणापासून बचावण्याकरितां त्याच्या सामाजिक चालीरीती बदलण्यासाठीं तुम्ही कांहीं करणार आहां काय? कालमानाप्रमाणें त्याला तुम्ही भांडवलाचें प्रमाणबद्ध माप मिळण्याची व्यवस्था करणार आहां काय कीं जेणेंकरून पैशाची गरज लागेल त्यावेळीं तो तृषार्त होणार नाहीं? आपणासारखा ज्ञानवृद्ध मंत्री काठेवाडांतील एका महत्त्वाच्या संस्थानांत काय करतो हें जाणण्याची मला फारच इच्छा आहे. आह्मी सुद्धां योजना तयार केल्या आहेत. पण हल्लींच्या लोकशाहीची अशी अडचणीची स्थिति असते कीं आपल्या नाकाच्या शेंडयापलीकडे कोणी पाहूं इच्छीत नाहीं आणि योग्यवेळीं करावयाचा खर्च करीत नाहीं. एकोणिसाव्या शतकांत प्रशिया देशांत स्टाईननें दूरदृष्टीनें जें मोठें व धाडसाचें कार्य केलें तसें करणें एकतंत्री सत्ता जेथें आहे अशा संस्थानांत शक्य आहे. जर तुह्मास फुरसत असेल तर शेतकऱ्याला ज्यास्त पूर्ण व ज्यास्त स्वतंत्र जीवन घालवावयास कसें मिळणार आहे याबद्दल आपण मला चार ओळी लिहाव्या, मी आपले उपकार मानीन. हें पत्र खाजगी आहे असें समजावें.

आपला मित्र

(सही) **विनायक एन्. मेहता**

सर प्रभाशंकर पट्टणी, के. सी. आय. ई.

प्रेसिडेंट, स्टेट कौन्सिल भावनगर, काठेवाड.

(२)

सर प्रभाशंकर पट्टणी के. सी. आय्. ई, भावनगर स्टेटकौन्सिलचे अध्यक्ष यांनीं वर दिलेल्या श्रीयुत विनायक एन्. मेहता यांच्या पत्राला लिहिलेलें उत्तरः—

भावनगर

फेब्रुआरी, १९३२

मम प्रिय श्रीयुत मेहता,

मला आपलें ता. २० जानेवारीचें पत्र मिळालें. जरूरीच्या कामांत गुंतल्यामुळें आपल्या पत्राचें उत्तर यापूर्वी मी पाठवूं शकलों नाहीं याबद्दल मला वाईट वाटतें.

श्री. भास्करराव‍ांनीं मला असें सांगितलें कीं आपलेकडे कमिटीच्या रिपोर्टाची एक प्रत व पुराव्याच्या पुस्तकाची एक प्रत रवाना करण्यांत आली आहे. आपणास तीं दोन पुस्तकें मिळालीं असतील असें मी गृहीत धरतों. ऋणबद्ध खेडुतांच्या विमोचनासाठीं मंजूर केलेली योजना रिपोर्टाच्या पुस्तकांत परिशिष्ट आठ म्हणून जोडलेली आहे.

आजतागायत आम्ही एकंदरींत रु. ४,८६,६५८ सरकारसारा भरणाऱ्या पांच टप्यांत अथवा पोटमहालांत शेतकऱ्यांना कर्जांतून मुक्त केलें आहे. या भागांतील खेडुतांचें दर्शनी कर्ज रु. १४,१९,३७८ होतें आणि त्याच्या तडजोडीसाठीं रु. ३,६७,९९१ एवढी रकम देण्यांत आली. आपणांस हें सहज समजूं शकेल कीं अव्वल कर्जाची रकम फार लहान असून, जे कर्जाचे मोठे आंकडे आपल्याला आढळून येतात ते व्याज, वटाव, पागडी व तत्सम दुसऱ्या बोजांच्या पायीं जी एकसारखी भर पडते त्यांमुळेंच होतात. सावकाराची कल्पकता लोभानें तीव्रतर बनते आणि सावकार वर दिलेल्या तऱ्हेचे बोजे निर्माण करीत असतो. शिवाय खेडुताच्या वतीनें व्यावयाची रक्कम खेडुताची लायकी व कुवत यांचे अनुरोधानें मर्यादित करणें जरूर असतें. रिपोर्टाच्या अखेरच्या प्रकरणांत म्हटल्याप्रमाणें एवढें मात्र नक्की सांगतां येतें कीं कर्जबाजारीच्या असाध्य रोगानें पछाडलेल्या खेडुत कुळांकडून सावकारांच्या प्रयत्नांनीं जेवढी रक्कम अनेक वर्षांत सावकाराला मिळाली नसती तेवढी रक्कम त्याला एकदम व रोकड मिळावयाची व्यवस्था या योजनेमुळें झाली आहे. पण हा उल्लेख फक्त जातां जातां केलेला आहे.

एकदां कर्जमुक्त झालेला खेडुत कर्जाच्या चिखलांत पुनः न रुतावा यासाठीं काय योजना केलेली आहे हा जो आपण सवाल केला तो खरोखरच रास्त सवाल आहे. आपण जें अतिशय कुतूहलजनक व विचारप्रवर्तक असें छोटेंसें पत्र लिहिलें आहे त्यांत आपण कांहीं प्रश्न केले आहेत. "आपण शेतकऱ्यांची पुनर्घटना करण्यासाठीं कांहीं करणार आहां काय? ग्रामसंघटना करून शेतकऱ्याला अविचार व उधळेपणापासून बचावणार आहां काय? कर्जांत वाहून जावयास असणाऱ्या सवलतींपासून त्याला दूर ठेवणार आहां काय?" हे जे आपण प्रश्न केले आहेत त्यांतच आपल्या मुख्य सवालांचें उत्तर सूचित केलेलें आहे.

पण भविष्यकाळीं काय होईल हे नक्की सांगतां येत नाहीं म्हणून आज गंभीर असलेला

आणि रोजच्या रोज अधिकाधिक गंभीर होणारा प्रश्न सोडवण्याकरतां कांहींच करावयाचें नाहीं अगर जें करावयाचें तें बेमुदत पुढें ढकलावयाचें हें योग्य होईल काय ? केव्हां तरी एकदां कामाला सुरुवात केली पाहिजे मग भविष्यकालीं कांहींहि होवो; आणि सुरुवात करावयाची तर शक्य तितक्या जलदीनें करणें चांगलें. भविष्यकाळीं येणाऱ्या बिकट अडचणींचाच जोंपर्यंत आपण विचार करीत रहातों तोंपर्यंत आपण स्वतांला कोणचीहि कृति करावयास असमर्थ बनवितों. 'वाटेंत सिंह आहे' असें ह्मणत राहून पुढें पाऊल न टाकण्याच्या आपल्या वृत्तीचें आपण समर्थन करतों. असें करतांना आपण एक गोष्ट विसरतों ती ही कीं आपण कांहींच न केल्यास जें आपलें नुकसान होईल तें पुष्कळच जास्त होईल. निदान मला तरी असें वाटतें कीं जर अवश्य असलेली योजना फार दूर ढकलण्यांत आली तर खेडेगांवांत भयंकर परिस्थिति निर्माण होईल. त्या परिस्थितीचीं पूर्वचिन्हें आजच दिसूं लागलीं आहेत. कर्ज परत द्यावयाचें जाहीरपणें नाकारावें, खेडुताला स्वतांला नादार म्हणून जाहीर करून घेणें सुलभ व्हावें याकरतां खेड्यांत काम करणारीं नादारीचीं कोर्टें स्थापावीं, असले बेछुट आणि साहसी उपाय सुचवण्यांत येऊं लागले आहेत. अशा मार्गाचा उपयोग केल्यामुळें बिकट गांठ कापून टाकल्यासारखें वाटेल. पण घाईनें व अविचारानें योजलेल्या व भूतकालांतील कर्जाच्या नैतिक व कायदेशीर जबाबदारी झुगारून देणाऱ्या उपायांचा खेडुतसमाजावर नैतिक परिणाम काय होईल याचा विचार कोणी केलेला दिसत नाहीं.

माणसाच्या कल्पकतेंतून निर्माण झालेली कोणतीहि व्यवस्था मूर्ख माणसाचा पूर्णपणें बचाव करूं शकत नाहीं आणि लबाड माणसाच्या लाडीला संपूर्ण आळा घालूं शकत नाहीं. कर्ज काढावयास कांहीं खेडुत उत्सुक असणार आणि अशा खेडुतांना कर्ज देऊन व्याजबट्ट्याच्या जाळ्यांत त्यांना अडकवण्यास टपलेले सावकारहि असणार. भविष्य काळीं सावकाराला खेडुताचा बळी घेतां येऊं नये ह्मणून **शेतकरी संरक्षक कायदा** करण्यांत आला आहे. ऋणविमोचनाच्या योजनेबरोबरच हा कायदा केलेला आहे आणि रिपोर्टाच्या पुस्तकांत परिशिष्ट सहा ह्मणून तो कायदा छापलेला सांपडेल. सर्वच सावकार कांहीं वाईट नसतात आणि सर्व सावकारांचें निर्मूलन करणें शक्य नाहीं, अथवा त्यांची जागा दुसऱ्या कोणत्याहि संस्थेला देणेंहि शक्य नाहीं. एक काल असा होता कीं ज्यावेळीं ग्रामव्यवस्थमध्यें सावकारांनीं उपयुक्त भाग घेतलेला होता. एकदां खेडुत ऋणमुक्त होऊन गेले ह्मणजे थोडेफार सावकार त्यांच्याबरोबर आपले सलोख्याचे संबंध जोडतील, व्याजाचे दर नेमस्त ठेवतील आणि या दोन वर्गांमधील पूर्वीचा सहानुभूतीचा दुवा पुनश्च सांधला जाईल अशी आशा करणें अस्थानीं होईल काय ?

भविष्यकाळीं अनिष्ट परिस्थिति निर्माण होऊं नये यासाठीं आपल्या पत्रांत सुचवलेल्या सर्वांगीण व स्वावलंबी ग्रामसंघटनेची वाढ करणें हेंच अवश्य आहे. रिपोर्टाच्या नवव्या परिशिष्टांत जी ग्रामपंचायतीची योजना दिलेली आहे तिचेद्वारा अशा संघटनेचीं मुळें रोवण्याचा प्रयत्न या संस्थानांत होणार आहे. ऋणबद्धता हें एक लक्षण दूर करून भागणार नाहीं हें मी जाणतों. ग्रामजीवन पुनः प्रस्थापित व्हावयास पाहिजे असेल तर संघटना झाली पाहिजे. संघटना फक्त आर्थिक बल उत्पन्न करील इतकेंच नव्हे तर अविचारानें आणि फाजिल

खर्चिकपणामुळें कर्ज काढण्याविरुद्ध लोकमतहि जागृत करील. या पंचायतीपासून कोणते कोणते सुपरिणाम अपेक्षित आहेत तें रिपोर्टाच्या शेवटच्या भागांत दिलेलें आहे.

स्वभावतःच पंचायतीची संपूर्ण वाढ सावकाश होणार. दरम्यानच्या कालांत आह्माला तगाई सढळ हातानें देणें आणि सहकारी पतपेढ्यांची वाढ करणें या व अशा तात्पुरत्या उपायांचा उपयोग करणें प्राप्त आहे. या दोन साधनांनीं शेतकऱ्यास जरूर लागणारें भांडवल उपलब्ध होईल आणि त्याला सावकारावर अवलंबून रहावें लागणार नाहीं.

सहकारी चळवळीच्या यशाच्या व प्रगतीच्या मार्गातील मोठी धोंड ह्मणजे पूर्वीच्या कर्जाचा बोजा हें आतां कबूल करण्यांत येतें. आणि या बोजाकडे दुर्लक्ष्य करून सहकारी चळवळ जोरांत आणण्याचा जेथें जेथें प्रयत्न करण्यांत आला तेथें तेथें तो अपेशी ठरला. सावकारांच्या पाशांत असलेला खेडुत सहकारी सोसायटीचा सभासद झाला तर तो सावकाराचें देणें फेडण्यासाठीं सोसायटीकडून कर्ज काढतो आणि सोसायटीचें देणें फेडण्यासाठीं सावकाराकडून कर्ज काढतो. अशा प्रकारें तो आजचें मरण उद्यांवर ढकलतो पण दररोज त्याची आर्थिक स्थिति ज्यास्त ज्यास्त खराबच होत जाते. खेडुताची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठीं कोणचीहि योजना करावयाची असल्यास तिची पहिली पायरी ह्मणजे अगोदरच्या कर्जाच्या बोजांतून शेतकऱ्याला सोडवणें ही होय, याबद्दल मला बिलकुल शंका नाहीं; कारण जोंपर्यंत हा पूर्वीच्या कर्जाचा सवामणाचा लंगर त्याच्या गळ्यांत आहे तोंपर्यंत खेडुताला यत्किंचित् प्रगति करणें शक्य नाहीं.

सर्वराष्ट्रांना ग्रासून बसलेला आर्थिक रोग बरा व्हावयास पाहिजे असेल तर महायुद्धामुळें उत्पन्न झालेला कर्जाचा आणि नुकसान-भरपाईचा बोजा दूर झाला पाहिजे हें आतां सर्वांना कबूल झालें आहे. लहान प्रमाणांत कां होईना तोच नियम ऋणबद्ध आणि जवळ जवळ नादार झालेला जो हिंदी शेतकरीवर्ग त्यालाहि लागू आहे.

भावनगर संस्थानांतील सर्व शेतकऱ्यांना एकदम कर्जमुक्त करण्याचा हा प्रयत्न असाधारण व अपूर्व आहे आणि म्हणून त्यांत धोकाहि आहे हें मी कबूल करतों. पण सर्व गोष्टींचा विचार करतां माझी अशी भावना झाली आहे कीं धोक्याकडे दुर्लक्ष करून हा प्रयत्न करण्यालायक आहे आणि म्हणूनच पूर्ण यशाच्या आशेनें हीं प्रयत्न आम्ही सुरू केला आहे.

आपला मित्र

(सही) पी. डी. पट्टणी

ता. क.

आणखी लिहावयाचें म्हणजे ज्या पांच टप्यांतील खेडुत ऋणमुक्त झाले आहेत त्यांमधील करवसुली सहज आणि वाढत्या प्रमाणांत होत आहे हा ऋणविमोचनामुळें घडलेला परिणाम होय. कर्जाच्या बोजांतून मोकळे झाल्यामुळें ह्या शेतकऱ्यांनीं चालू सालचा सबंध महसूल देऊन शिवाय मागील बाकीपैकीं सुद्धां कांहीं भाग द्यावयाची तयारी दर्शविली. उलटपक्षीं पाऊस व शेतीच्या बाबतींत या पांच टप्यांसारखीच ज्या दुसऱ्या टप्यांची परिस्थिति आहे त्या टप्यांत करवसुली रुपयांत चार सहा आणे तरी कमी होणार आहे, याचें कारण मागील कर्जाचा

बोजा त्या शेतकऱ्यांना आपल्या खांद्यावर वहावा लागत आहे, आणि या कारणापायीं महसुलाचा मोठा भाग तहकूब करून पुढील वर्षावर टाकावा लागणार आहे.

ज्या कर्जाची या पांच टप्यांत तडजोड करण्यांत आली आहे त्या कर्जाची रक्कम १४ ते १५ लक्ष रुपयांची आहे. या रकमेवर केवळ व्याजाच्या रूपानें शेतकऱ्याला दरसाल तीन ते चार लक्ष रुपये द्यावे लागले असते. शेंकडा पंचवीस टक्के व्याजाचा दर धरून व्याजाची रक्कम एवढी होते. पंचवीस टक्के हा अगदीं मामुली दर झाला आहे. पण पुष्कळ कुळांच्या कर्जाची रक्कम सावकार अनंत युक्त्या लढवून एक वर्षांत दुपटीनें अथवा तिपटीनें वाढवतो असे दाखले आहेत. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे एक वर्षाच्या व्याजाइतकी रक्कम देऊन या शेतकऱ्यांच्या सर्व कर्जाची तडजोड करण्यांत आली आहे.

,, (सही) **पी. डी. पी.**

श्री विनायक एन्. मेहता, आय्. सी. एस्., लखनौ.

(३)

जम्मू व काश्मीरचे रेव्हेन्युमिनिस्टर श्री. व्ही. एन्. मेहता, आय्. सी. एस्, यांनीं ऋणविमोचनाच्या योजनेची प्रगति कोठवर झाली अशी चौकशी करणारें पत्र सर प्रभाशंकर यांस लिहिलें त्याला सर प्रभाशंकर यांनीं लिहिलेलें उत्तर.

भावनगर
ता. २७ फेब्रुआरी १९३३

ममप्रिय श्री. विनायक मेहता,

आपलें ता. २ फेब्रुआरीचें पत्र मिळालें. मी दिल्लीस गेलों होतों तेथून फक्त पांच दिवसांपूर्वीच मी परत आलों त्यामुळें यापूर्वीच पत्र पाठवावयास झालें नाहीं. मला दिलगिरी वाटते.

भावनगर संस्थानांतील या योजनेची आठवण अजून आपणास आहे याबद्दल मला आनंद होत आहे. संवत् १९८८ सालच्या रेव्हेन्युखात्याच्या रिपोर्टाचा उतारा या पत्रासोबत पाठविला आहे त्यावरून सन १९३२ च्या आक्टोबर अखेरपर्यंत या योजनेचा विस्तार कोठवर झाला आहे हें थोडक्यांत समजेल. तदनंतरच्या कालांत आणखी तीन टप्पे अगर पोटमहाल हातांत घेतले आहेत. वाढलेलें काम करण्यासाठीं आतां एकंदर सहा कमिट्या नेमण्यांत आल्या आहेत. हल्ली चालू आहे याच प्रमाणांत काम अव्याहत झालें तर आणखी एक वर्षाच्या आंत उरलेल्या सर्व भागांतलें काम पुरें होईल अशी आशा आहे.

या योजनेचे इष्ट परिणाम काय होतील हें अजमावण्याची वेळ अजून आली नाहीं. पण मागील पत्रांत मी लिहिलें त्याप्रमाणें या योजनेमुळें जमीनमहसुलाच्या वसुलींत खास सुधारणा झालेली आहे. शेतकऱ्याची कर्जातून मुक्तता आणि महाराजांच्या राज्यारोहणप्रसंगीं शेतकऱ्याला विक्री करण्याचा हक्क मिळाल्यामुळें वाटणारी मालकीची जाणीव या दोहोंचा मिळून असा परिणाम झाला आहे कीं ज्या भागांत पीक सोळा आणे आलें नाहीं त्या भागांत सुद्धां

पुरेपूर सारा वसूल झाला आणि तहकूब केलेल्या साऱ्यापैकीं कांहीं वसूल मिळाला. दुसरा इष्ट परिणाम म्हणजे शेतकऱ्याच्या वृत्तींत झालेली सुधारणा. जोंपर्यंत कर्जाचा भार शेतकऱ्याच्या डोक्यावर होता तोंपर्यंत आपलें पीक कर्जापायीं सावकार जप्त करील अशी कुळाच्या मनांत सारखी भीति असावयाची, तिजमुळें शेतकरी उदासीन व बेफिकीर असे. तो कर्जाचा बोजा दूर झाल्यामुळें आतां त्याला सुरक्षितता वाटते व मोकळेपणानें वावरतां येतें, आणि तो शेतीच्या कामांत आपलें सर्व लक्ष्य घालून अविश्रांत मेहेनत करतो.

एकदां ऋणमुक्त झालेला खेडुत पुनः बेगुमानपणें कर्ज काढतो कीं काय इकडे आम्ही शक्यतोंवर लक्ष्य ठेवीत असतों. कांहीं तुरळक उदाहरणें सोडून दिलीं तर नवीन कर्ज काढण्याची वृत्ति दिसून येत नाहीं. कांहीं वर्षांनीं खेडुतांचें अमुक प्रमाण पुनः कर्जांत पडेल हें खरें पण मागील अनुभवाच्या खडतरपणामुळें त्यांची मोठी संख्या पूर्वीच्या उधळेपणाच्या व्यवहारांत पडणार नाहीं असें म्हणणें फाजील आशावादीपणाचें होणार नाहीं. भविष्य अनिश्चितच असणार आणि त्याबद्दल आज कांहीं भाकीत करणें उतावीळपणाचें होईल.

हाडीमासीं खिळलेल्या ऋणबद्धतेंतून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठीं आपण कांहीं तरी करूं इच्छितां हें पाहून मला आनंद वाटतो. परंतु इच्छित वस्तु साध्य करण्याकरतां सक्तीचा उपाय योग्य आहे असें मात्र मला वाटत नाहीं. काश्मीरमधील परिस्थिति काठेवाड व गुजराथ यांचेपेक्षां निराळी असूं शकेल. पण स्थानिक भेद ध्यांत घेऊनहि कर्जबाजारी शेतकऱ्याचा प्रश्न हिंदुस्थानभर सारखाच आहे असें मला वाटतें. माझ्या अनुभवावरून सांगावयाचें ह्मणजे ऋणको व धनको यांचें सहकार्य व तडजोड यांनींच हा प्रश्न कायमचा सुटूं शकेल. सक्तीनें तितकें यश मिळणार नाहीं, इतकेंच नव्हे तर सक्तीमुळें बेदिली व तेढ उत्पन्न होईल आणि अखेरीस या दोन वर्गांमध्यें तंटा उत्पन्न होईल.

आपला मित्र
(सही) **पी. डी. पट्टणी**

श्री. व्ही. एन्. मेहता, आय्. सी. एस.,
काश्मीर.

(४)

श्री. गोपाळ कृष्ण देवधर एम्. ए., सी. आय्. ई. यांची त्रावणकोर सहकारी चौकशी कमिटीचे अध्यक्ष म्हणून नेमणूक झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या ऋणविमोचनासंबंधीं सर प्रभाशंकर यांचे विचार काय आहेत अशी श्री. देवधर यांनीं पृच्छा केली. त्यांना सर प्रभाशंकर यानीं पाठविलेलें उत्तर.

भावनगर
२९ सप्टंबर १९३३

ममप्रिय श्रीयुत देवधर,

आपलीं अनुक्रमें ता. १५ व ता. १९ चीं दोनहि पत्रें मिळालीं. यांपैकीं दुसऱ्या पत्रासोबत पाठवलेली प्रश्नपत्रिकाहि मिळाली,

माझ्याकडून ज्या प्रश्नांचीं आपणांस उत्तरें पाहिजेत त्यांचे खालीं आपण मोठ्या कृपाळुपणानें तांबड्या पेन्सिलीच्या रेघा मारल्या आहेत. पण प्रश्न नं. १५५ चा जबाब द्यावयास त्रावणकोर सिव्हिल प्रोसीजर कोडचें ज्ञान पाहिजे व प्रश्न नं. १५६ चा जबाब द्यावयास त्रिवेंद्रम सेंट्रल कोआपरेटिव्ह बँकेकडे सोंपवलेलीं कामें व असलेलें आर्थिक सामर्थ्य यांचें ज्ञान पाहिजे. तसेंच प्रश्न १५४ चा जबाब द्यावयास त्रावणकोरमधील स्थानिक परिस्थितीचें ज्ञान पाहिजे. मी फक्त प्रश्न नं. १५३ चा जबाब देऊं शकेन. या प्रश्नाचा जबाब देतांना सुद्धां ऋणविमोचनाच्या योजनेसंबंधीं जें मत मी प्रदर्शित करीन त्याची ग्राह्यता त्रावणकोरमधील परिस्थितीसंबंधीं मला कांहीं अनुभव नसल्यामुळें कमीच होणार. 'खेडेगांवांतील ऋणबद्धता' असा शब्दप्रयोग आपण करतां त्यावेळीं शेतकऱ्याच्या कर्जाचा प्रश्न आपल्या मनांत मुख्यत्वेंकरून घोळतो असेंच मी समजतों. जरी भावनगरपासून त्रावणकोर पुष्कळ दूर आहे तरी किरकोळ स्थानिक फेरफार वजा करतां शेतकऱ्याच्या कर्जाच्या प्रश्नाचें स्थूल स्वरूप सबंध देशभर सारखेंच आहे असें मी मानतों. आपला देश कृषिप्रधान असल्यामुळें जी परिस्थिति दृश्यमान होते तिच्यांतूनच हा प्रश्न उपस्थित होतो. सेंट्रल बँकिंग इन्क्वायरी कमिटीचे निर्णय आपण जाणतच आहांत, त्या निर्णयांमुळें माझ्या मताला बळकटी येते.

कोणचाहि उद्योगधंदा आर्थिक बाजू सुव्यवस्थित असल्याशिवाय भरभराटीस येणार नाहीं. शेतकी हा हिंदुस्थानांतील सर्वांत मोठा धंदा आहे. म्हणून त्याला लागणाऱ्या भांडवलाची व्यवस्था करण्याकडे ग्रामोद्धाराची यत्किंचित् कळकळ बाळगणाऱ्या दर एकानें प्रथम लक्ष्य पुरवलें पाहिजे. बँकिंग इन्क्वायरी कमिटीनें जाहीर केलें आहे कीं शेतकऱ्याला शेंकडा दहापासून तीनशेंपर्यंत व्याज देऊन कर्ज काढावें लागतें. अशा व्याजाच्या जुन्या कर्जांचा ज्यांत परामर्श घेतलेला नाहीं अशी योजना शेतीला लागणारें भांडवल पुरवण्याचे कामीं यशस्वी होणार नाहीं. जुन्या कर्जाचा सवा मणाचा लंगर जोंपर्यंत त्याच्या गळ्यांत आहे तोंपर्यंत शेतकऱ्याचें मन शेतीकडे लागणार नाहीं. आपले शेतकरी गतानुगतिक व दैववादी नसते तर ते देतात इतकें सुद्धां लक्ष्य शेतीकडे देते नसते. पण त्यांचें लक्ष्य त्यांच्या धंद्यांत नसतें आणि ते केवळ दिवस काढीत असतात. ऋणविमोचन लवकरांत लवकर झालें पाहिजे ही वादविवादापलीकडील गोष्ट आहे असें मी समजतों. शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा पुष्कळ व भारी आहे हें हरएक इसम कबूल करतो. असें असून ऋणविमोचनाचें काम हातीं घेण्यास तो डरतो याचें कारण हा प्रश्न फार मोठा आहे आणि या कामीं फार मोठ्या रकमेची जरूर आहे.

मी मानसपृथक्करण शास्त्रांतला तज्ञ नाहीं. पण आपला सर्वसाधारण अनुभव असा आहे कीं ज्या वेळीं आपणाला एकादी गोष्ट करण्याचें सामर्थ्य नसतें अगर इच्छा नसते त्यावेळीं आपण तसें कबूल करीत नाहीं, उलट ती गोष्ट महत्त्वाची नाहीं अथवा ती गोष्ट करावयाची वेळ अजून आली नाहीं असें कांहीं तरी आपण म्हणत असतों. खेडुतांच्या ऋणविमोचनाच्या कामीं कृतीचा अभाव ज्यावेळीं आपण पहातों त्यावेळीं असलाच प्रकार असतो असें मला वारंवार वाटतें. ऋणविमोचन झालें पाहिजे असें अंतःप्रवृत्तीला वाटतें पण करावयाच्या कार्याच्या बिकटपणामुळें जागरूक मन बिचकून जातें आणि आपल्या कृतिशून्यतेच्या धोरणाच्या

समर्थनार्थ कार्याचें महत्त्वच आपण कमी ठरवतों, अथवा एकदां कर्जमुक्त झाला तरी शेतकरी पुनः कर्जात पडेल आणि पूर्वीच्याच अवस्थेची पुनरावृत्ति होईल असें दुर्दैवी चित्र आपण उभें करतों.

या प्रश्नाच्या गड्ड्याला हात न घालतां बाहेर घोटाळत रहाण्याचा परिणाम असा होतो कीं सरळ मार्ग सुटतो, जुन्या कर्जाचा चालत आलेला बोजा नजरेआड होतो, आणि सहज व स्वस्त दरानें कर्ज कसें मिळेल यावद्दलच्या योजनांत लोक गुंतून जातात. मागल्या कर्जाचा विचार बाजूस सारून स्वस्त दरानें कर्ज देण्यासाठीं सहकारी पेढ्यांची योजना अमलांत आणण्याचे प्रयत्न केले असतां ते व्हावे तितके यशस्वी होऊं शकत नाहींत. कांहीं ठिकाणीं ते जवळ जवळ फुकट जातात असेंहि म्हणतां येईल. पूर्वीच्या कर्जांतून शेतकरी मुक्त झाले तरच शेतीला लागणारें भांडवल शेतकऱ्यांस पुरवण्याचा नवा मार्ग फलप्रद होईल.

ऋणविमोचन खरोखरच आवश्यक व युक्त आहे काय या प्रश्नाचें उत्तर उलट प्रश्नानेंच देतां येईल. तो प्रश्न असा कीं जर कोणातरी तिऱ्हाइतानें ऋणविमोचन केलें नाहीं तर शेतकऱ्याला जो अत्यल्प फायदा रहातो त्यांतून तो अमुक मुदतींत तुंबलेल्या कर्जाची फेड करूं शकेल काय आणि जर तो फेड करूं शकणार नाहीं तर जी रक्कम वसूल होणें शक्य नाहीं ती रक्कम सावकारानें वसूल करण्याचा आग्रह धरण्यांत अर्थ काय? कांहीं कांहीं भागांत परिस्थिति इतकी बिकट झाली आहे कीं, 'शेतकऱ्यांचा सर्वनाशापासून बचाव व्हावयास पाहिजे असेल तर सर्व कर्ज झुगारून देण्याची त्याला परवानगी दिली पाहिजे' अशी सूचना कांहीं ठिकाणाहून करण्यांत येत आहे. बंगाल नॅशनल चेंबर ऑफ कामर्सचे प्रेसिडेंट व बँकिंग इन्क्वायरी कमिटीचे एक सभासद श्री. नलिनीरंजन सरकार यांनीं गेल्यावर्षी केलेल्या एका भाषणांतून वरील शब्द उद्धृत केलेले आहेत. पण हा उपाय इतका त्याज्य आहे कीं त्याची चर्चाहि करण्याची अवश्यकता नाही. हा उपाय जसा सावकाराला तसाच शेतकऱ्यालाहि घातुक आहे. पण शेतकरी आपल्या शक्तीवाहेर कांहींहि देऊं शकणार नाहीं हें लक्ष्यांत बाळगलें पाहिजे. शेतकरी कांहीं देऊं शकत नाहीं आणि सावकाराला कांहीं मिळूं शकत नाहीं ही कुचंबणेची स्थिति जोंपर्यंत चालू आहे तोंपर्यंत कोणच्याहि पक्षाचें हित तर होणार नाहींच, उलट झाला तर दोनहि पक्षांचा तोटाच होण्याचा संभव आहे. आणि भविष्यकाळीं मोठ्या प्रमाणांत होणारा त्रास चुकवावयाचा असेल तर ही स्थिति शक्य तितक्या लवकर बदलली पाहिजे. कर्जाच्या अमर्याद बोजाखालीं चिरडलेला शेतकरीवर्ग उसळला तर तो निराशेच्या भरांत बेदरकारीनें अराजकता निर्माण करील आणि तशी अराजकता निर्माण व्हावयास नको असेल तर हा बोजा उतरविण्याची कांहीं तरी योजना केली पाहिजे असें जें श्री. नलिनीरंजन सरकार आपल्या उपरिनिर्दिष्ट भाषणाचा समारोप करतांना म्हणाले त्यांत अतिशयोक्ति बिलकुल नाहीं.

ऋणविमोचन झालें पाहिजे असें एकदां ठरलें म्हणजे तें घडवून आणण्याची सुरुवात कशी करावयाची हा प्रश्न उभा रहातो. सावकार जेवढें येणें म्हणून दाखवतो तेवढें सर्व सावकाराला देण्याचा प्रश्नच मुळीं उद्भवत नाहीं. बहुतेक खात्यांत मूळ मुद्दल थोडें आणि व्याज दलाली पागडी वगैरेमुळें रक्कम फुगलेली असाच प्रकार असतो, शिवाय, कर्जाच्या

तडजोडीसाठीं जी रक्कम द्यावयाची तिचा आणि जवळ जवळ नादार झालेल्या खातेदाराच्या सामर्थ्याचा व पतीचा मेळ ठेवला पाहिजे. भावनगर संस्थानांतील योजनेप्रमाणें जेवढा सारा शेतकरी भरतो त्याच्या तिपटीपेक्षां अधिक रक्कम त्याच्या कर्जफेडींत द्यावयाची नाहीं असा निर्बंध घातलेला आहे.

एकदां ऋणविमोचन करावयाचें ठरलें तर माझ्या मतें सध्यांची वेळ तें काम हातीं घ्यावयास अत्यंत अनुकूल आहे. हल्लीं एकंदरींत मालाच्या किंमती पडलेल्या असल्यामुळें, विशेषेंकरून धान्य व कापूस यांच्या किंमती फारच पडल्यामुळें शेतकऱ्याचा फायदा संपुष्टांत आला आहे. शेतकऱ्याला फायदा झाला तर तो सावकाराचें देणें देणार. हल्लींच्या परिस्थितींत सावकाराला वसुली करतां येण्याचा संभव फारच थोडा असल्यामुळें तडजोडीच्या योजनेचा स्वीकार करावयास सावकार कबूल होण्याचा संभव अधिक, कारण तेणेंकरून सावकाराला ताबडतोब रोख रक्कम मिळावयाची आहे. हल्लीं जमिनीची व जमिनींतून उत्पन्न होणाऱ्या मालाचीं किंमत उतरली असल्यामुळें शेतकऱ्याची खरी आर्थिक शक्ति किती आहे आणि शेतकऱ्याच्या पतीनें किती रक्कम दिली असतां ती तो फेडूं शकेल याचा अचूक अंदाज करावयास हल्लींचा काल फार अनुकूल आहे. वाढलेल्या किंमतीच्या दिवसांत केलेली अजमावणी नंतर निरुपयोगी व दिशाभूल करणारी ठरण्याचा संभव असतो. त्यावेळीं मालाच्या किंमतीबरोबर जमिनीच्या किंमतीहि वाढतात, शेतकऱ्याचा फायदा वाढलेला असतो आणि त्यामुळें शेतकरी किती रकमेची फेड करूं शकेल यासंबंधींचा अजमासहि वाढण्याचा संभव असतो. ऋणविमोचनासाठीं लागणारें भांडवल संस्थानकडून मिळणारें नसलें, तर हा काल असा आहे कीं बँकांजवळ मुबलक पैसा पडून राहिल्यामुळें आणि व्याजाचे दर उतरल्यामुळें सुसंघटित अशी लँडमॉर्गेज बँक अथवा तत्सम संस्था जरूर तें भांडवल सहज उभें करूं शकेल.

एकदां सर्व शेतकऱ्यांच्या कर्जफेडीची व्यवस्था झाली म्हणजे भविष्यकाळीं काय होईल हें सांगणें फार कठीण आहे. भावनगरमधील आमचा अनुभव इतका अल्पकालचा आहे कीं त्यावरून सर्वसाधारण नियम बांधणें शक्य नाहीं. पण एक गोष्ट मात्र नक्की सांगतां येते कीं जुन्या कर्जांतून शेतकरी मुक्त झाला म्हणजे स्वाभाविकपणें त्याची पत वाढेल आणि तदनंतर त्याला खरोखर जरूर लागणारा पैसा स्वस्त दराच्या व्याजानें मिळवतां येईल. तुमची प्रश्नपत्रिका बारकाईनें पहातां असें अनुमान काढता येतें कीं त्रावणकोर संस्थानांत सहकारी पतपेढ्यांची व्यवस्थित स्थापना झालेली आहे आणि जर खेडुतांचें एकदां पूर्वीच्या कर्जांतून विमोचन झालें तर सहकारी पतपेढ्या ज्यास्तच मजबूत होतील व आपल्या खेडुत भागीदारांची योग्य ती सेवा करावयास समर्थ बनूं शकतील.

अगोदरच्या कर्जांतून खेडुतांची सरसहा मुक्तता झाली याचे मागाहून काय परिणाम होतात इकडे आम्ही भावनगरसंस्थानांत फार बारकाईनें लक्ष देत आहोंत. तीन अगर त्याहूनहि अधिक वर्षांपूर्वी मुक्त झालेल्या महालांत पुनश्च कर्ज काढण्याची प्रवृत्ति लक्ष्यांत येण्याजोग्या प्रमाणांत अजून दिसत नाहीं. आज मुक्त झालेले कांहीं खेडुत थोड्या वर्षांनंतर पुनः कर्जबाजारी होतील असें आम्ही कबूल करूं. पण खेडुतांची मोठी संख्या मागील अनुभव विसरणार नाहीं आणि आपल्या पूर्वकालीन बेसुमार खर्च करण्याच्या सवयीचें

अवलंबन पुनश्च करणार नाहीं अशी माझी अटकळ आहे. उधळेपणा आणि उठल्यासुटल्या कर्ज काढण्याची प्रवृत्ति यांना आळा घालणारी खरी शक्ति म्हणजे खेडेगांवांतलें सुसंघटित लोकमत होय. आपल्या शक्तीबाहेर कर्ज काढण्यापासून शेतकऱ्याला हें लोकमतच परावृत्त करूं शकेल. भविष्यकालीं काय होईल हें सांगणें कठीण आहे; पण तेवढ्यामुळें आज जें अवश्य दिसतें तें करावयाचें टाळणें अगर कालावधीवर टाकणें हें उचित होणार नाहीं. भावनगरमध्यें जो मला थोडासा अनुभव आला त्यावरून सांगावयाचें म्हणजे शेतकरी ऋणमुक्त झाल्यास संस्थानला हमखास व भरपूर फायदा होतो. ऋणविमोचनामुळें कर्जमुक्त व संतुष्ट शेतकरीवर्ग निर्माण झाला इतकेंच नव्हे, तर हल्लीं मालाचे भाव उतरल्यामुळें सारा वसूल करावयास जड जावें अशा दिवसांत आम्हाला सहज आणि वाढत्या प्रमाणांत सारा वसूल करतां येत आहे. कांहीं ठिकाणीं तर मला असें आढळून आलें कीं दरबारनें शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठीं सावकाराला रकमा देण्यापूर्वीच त्या रकमांच्या फेडीखातीं मोठमोठ्या रकमा शेतकऱ्यांनीं आगाऊ भरल्या. त्यांना कर्जमुक्त करण्याचा हा प्रयत्न शेतकऱ्यांना किती पसंत पडला हें यावरून सहज दिसून येतें.

प्रश्न नं. १५४ चा जबाब द्यावयाची माझी लायकी आहे असें मला वाटत नाहीं असें मीं वर लिहिलें आहे. तरी एक धोक्याची सूचना मला द्यावीशी वाटते ती ही कीं जर ऋणविमोचनासाठीं शेतकऱ्यांच्या कर्जाचें अंदाजपत्रक तयार करावयाचें असेल तर तें केवळ अनमानधक्क्यानें करतां कामा नये. दरएकाच्या कर्जाचे आंकडे जमा करणें हें श्रमाचें आणि कंटाळवाणें काम आहे हें खरें पण विश्वसनीय माहिती पाहिजे असेल तर ते श्रम करणें योग्य व जरूर आहे. आपणास माहीतच असेल कीं भावनगरची ऋणविमोचनाची योजना अगोदर खेडुतकर्जचौकशीकमिटीनें केलेल्या तपासानंतर तयार करण्यांत आली. या कमिटीनें दरएक खेडुताच्या कर्जाचे आंकडे बारकाईनें तपासले होते. तरीहि जेव्हां ऋणविमोचनाची योजना अमलांत आणली त्यावेळी हे आंकडे पंचवीस ते पन्नास टक्क्यांनीं चुकीचे होते असें आढळून आलें. पहिली चौकशी व ऋणविमोचनयोजनेचा अम्मल यांचेमध्यें तीन चार वर्षांचा अवधि गेला हें खरें. या मुदतींत झालेल्या कर्जवाढीचा विचार केला तरी सुद्धां ही चूक फाजील वाटते. आह्मांला अशी बळकट शंका आहे कीं पहिल्या चौकशीच्या वेळीं कांहीं खेडुत अजीबात गप्प बसले आणि पुष्कळ खेडुत इभ्रतीखातर ह्मणा, किंवा अज्ञेय अशा अन्य कारणानें ह्मणा, आपल्या कर्जाचा आंकडा कमी करून सांगावयास प्रवृत्त झाले. ह्मणून मी अशी आशा करतों कीं स्थानिक परिस्थितीशीं परिचित अतएव अंदाजानें कर्जाचा बिनचुक आकडा सांगावयास लायक असणाऱ्या इसमांनीं कर्जासंबंधीं अनमानधक्क्यानें तयार केलेले आंकडे आपण स्वीकारणार नाहीं.

आपली प्रकृति पूर्ववत् सुदृढ होवो आणि आपल्या मनीषेप्रमाणें येत्या नोवेंबरच्या सुरुवातीस या महत्त्वाच्या सार्वजनिक कामाचे तुटलेले धागे पुनः आपण आपल्या हातीं घ्यावे अशी आशा करतों.

आपला मित्र

(सही) पी. डी. पट्टणी

ता. क.:—वर नमूद केलेल्या माझ्या विचारांच्या पुष्टीकरतां ता. २७ सप्टेंबरच्या 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या अंकांत पृ. १४ वर 'शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा' या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेल्या पत्रांतील पुढील उतारा मी येथें देतोः—

"शिक्षणाच्या जोडीचा ग्रामजीवनांतला अत्यंत विकट प्रश्न म्हणजे हिंदुस्थानच्या शेतीला करकचून आंवळणारे कर्जबाजारीचे बंध तोडून टाकणें हा होय. हिंदी शेतकरी कर्जांत जन्माला येतो, कर्जांत रहातो व कर्जांतच मृत्यु पावतो, ह्मणून ग्रामोद्धाराची कोणचीहि योजना अमलांत आणावयाची पूर्व तयारी शेतकऱ्यांच्या ऋणविमोचनानें केली पाहिजे. खेड्यांच्या पुनर्घटनेला यापुढें आणखी विलंब झाला अथवा अर्धवट पुनर्घटना झाली तर शहरांत बेकारी माजल्यामुळें अन्नासाठीं होणाऱ्या दंग्यांपेक्षां फारच भयंकर प्रकारची अंदाधुंदी आणि वेशिस्ती माजेल."

(सही) पी. डी. पी.

श्री. गोपाळ कृष्ण देवधर यांस

(५)

भावनगर ऋणविमोचनाची योजना कशी अमलांत येते हें स्वतां पहाण्यासाठीं श्री. गोपाळ कृष्ण देवधर भावनगरला गेले होते. त्यावेळीं त्यांनीं जें कांहीं पाहिलें त्यावरून त्यांच्या मनावर काय परिणाम झाला त्यांचें वर्णन करणारें श्री. देवधर यांचें पत्र.

त्रावणकोर कॉआपरेटिव्ह इन्क्वायरी कमिटी

अध्यक्षः

गोपाळ कृष्ण देवधर एम्. ए., सी. आय्. ई.,

सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचे अध्यक्ष.

पत्ताः—भाटिया मॅटर्निटी हॉस्पिटल, बझारगेट स्ट्रीट, फोर्ट.

मुंबई ता. १४ एप्रिल १९३४

सर प्रभाशंकर डी. पट्टणी के. सी. आय. ई.
भावनगर संस्थानच्या कौन्सिल ऑफ
ॲडमिनिस्ट्रेशनचे अध्यक्ष यांस
भावनगर

ममप्रिय सर प्रभाशंकरजी,

भावनगरला भेट देण्याची माझी फारा दिवसांची इच्छा मला पुरी करतां आली हें माझें सुदैव आहे. भावनगरचें जें आधुनिक स्वरूप आहे तें सर्व आपणच आणून दिलेलें आहे. आपली स्फूर्ति व संघटनशक्ति यांस आपण लढाऊ वृत्ति, चिकाटी, आणि माणुसकी व उच्च ध्येयें यांबद्दलचा अंतिम विश्वास या गुणांचीहि जोड दिल्यामुळेंच आजचें भावनगचें स्वरूप दृष्टोपत्तीस येत आहे.

१ आपलें संस्थान हे प्रगतिपर हिंदुस्थानांतील अतिशय संमृद्ध अशा संस्थानांपैकीं एक आहे आणि त्यामुळें भावनगरला दिलेली भेट मला एक नवी नजर देणारी झाली. त्या भेटींत

माझ्या मनावर जे परिणाम झाले आणि जे घेऊन मी परत आलों ते अत्यंत आल्हाददायक असून चिरस्थायी होतील असे आहेत.

३ भावनगर दरबारनें शेतकऱ्यांच्या ऋणविमोचनाची जी योजना धैर्यानें आणि यशस्वी रीतीनें अमलांत आणली तिचे मनोवेधक आणि कुतूहलजनक तपशील पचनीं पाडण्याचा मी प्रयत्न करीत आहें. तलाजा व तिंबी या दोन गांवांत दोन निरनिराळ्या दिवशीं जाऊन मी निरीक्षण केलें आणि त्यामुळें आपल्या, आपल्या सहकाऱ्यांच्या आणि आपल्या एकनिष्ठ अंमलदारांच्या धुरीणत्वाखालीं आपल्या संस्थानांत गेल्या तीन वर्षांत जें महत्कार्य पूर्णत्वास आलें आहे त्याचें प्रत्यक्ष व वास्तव स्वरूप मला दिसून आलें, तें कार्य इतकें गुंतागुंतीचें आहे कीं त्याच्याबद्दल माझे कांहीं निश्चित विचार बनवावयाचे झाले तर थोडासा वेळ लागेल असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. एकदम एवढें मात्र मला म्हणतां येतें कीं हें कार्य विचारप्रवर्तक असून कृतिप्रवर्तक आहे, तसेंच हा प्रयोग धैर्यानें हातीं घेऊन व्यवहारितेनें आणि यशानें पार पाडलेला आहे. अगदीं आजतागायतचे आंकडे व माहिती पुरवणारा रिपोर्टाचा अखेरचा मसुदा मी जवळ जवळ वाचून पुरा केला आहे. श्री. नटवरलाल यांनीं तयार केलेल्या मसुद्यांत यांचा समावेश नाहीं. वाचन अगदीं पुरें झालें म्हणजे त्यांना मी जें पत्र लिहीन, त्याची नक्कल मी आपणांकडे पाठवीन.

× × × ×

६ आपण येत्या जूनमध्यें पुण्यांत भेटाल अशी मी आशा करतों. त्यावेळीं सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या स्थापनेच्या वार्षिक उत्सवासाठीं सोसायटीचे सर्व सभासद जमा होतील त्यांचे बरोबर आपण या योजनेबद्दल आणखी विचारविनिमय कराल अशी आशा आहे.

आपल्याबद्दल सप्रेमादर बाळगणारा

आपला मित्र

(सही) गो. कृ. देवधर

एम. ए., सी. आय. ई.

अध्यक्ष.

(६)

त्रावणकोर कोऑपरेटिव्ह सोसायट्यांच्या रजिस्ट्रारचे पर्सनल असिस्टंट श्री. जी. आर. पिल्ले बी. ए., बी. एल., यांनीं ता. १३ आक्टोबर १९३३ रोजी पाठविलेल्या पत्रास सर प्रभाशंकर पट्टणी यांनीं पाठवलेलें उत्तर.

ता. ४ नोवेंबर १९३३

मप्रिय श्री. पिल्ले,

गेल्या महिन्याच्या २३ तारखेच्या आपल्या पत्राबद्दल मी आपला फार आभारी आहें. भावनगर संस्थान आपल्या शेतकऱ्यांसाठीं जें अल्पस्वल्प करीत आहे त्याचा गौरव करणारे

शब्द आपल्या पत्रांत आहेत त्यावद्दलहि आपले आभार मानतों. तीन वर्षांपूर्वी सुरू केलेल्या शेतकऱ्यांच्या सार्वत्रिक ऋणविमोचनाच्या कार्याची वरीच प्रगति झाली आहे हें समजून आपणास आनंद होईल. अजून जे थोडेसे टप्पे (ह्मणजे पोटजिल्हे) योजनेच्या बाहेर आहेत त्यांतही १९३४ च्या मार्च अखेर योजनेचा अमंल झालेला दिसून येईल.

सहकारी चळवळ फारशी यशस्वी झाली नाहीं हें मला पूर्णपणें कबूल आहे. केवळ तात्त्विक दृष्टीनें विचार करून सहकारी संस्थांपासून ज्या फायद्याची आपण अपेक्षा करीत होतों ते फायदे आपणास मिळाले नाहींत त्याला अनेक कारणें आहेत. त्यांपैकीं एक कारण आपणच सुचवलें आहे तें हें कीं त्या संस्थेच्या प्रमुख तत्त्वांना कार्यकर्ते चिकटून राहिले नाहींत व जाइंटस्टॉक कंपनीप्रमाणें या संस्थेकडेहि पाहूं लागले. माझ्या समजुतीप्रमाणें मुख्य कारण असें आहे कीं खेडुतांच्या पूर्वीच्या कर्जाचा विचार न करतां सहकारी संस्थांचा प्रसार जोरानें करण्यांत आला. सावकाराच्या कर्जांत असलेला खेडुत सहकारी पतपेढीचा सभासद झाला तर असें घडतें कीं सावकाराचें कर्ज देण्यासाठी तो सहकारी पेढीपासून पैसे घेतो आणि पेढीचें कर्ज फेडण्यासाठीं सावकाराजवळून पैसे काढतो. अशा प्रकारें आजचें मरण तो उद्यांवर ढकलतो पण दररोज त्याची आर्थिक स्थिति ज्यास्त ज्यास्त खराबच होत जाते. खेडुताची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठीं कोणचीहि योजना अमलांत आणावयाची असल्यास तिची पहिली पायरी ह्मणजे अगोदरच्या योजांतून शेतकऱ्याला सोडवणें ही होय याबद्दल मला बिलकुल शंका नाहीं; कारण जोंपर्यंत पूर्वीच्या कर्जाचा हा सवा मणाचा लंगर त्याच्या गळ्यांत आहे तोंपर्यंत खेडुताला यत्किंचित् सुद्धां प्रगति करणें शक्य नाहीं.

ब्रिटिश हिंदुस्थानांतील अनुभवानें आम्हाला धोक्याची सूचना मिळाली आणि आम्ही सहकारी चळवळीचा प्रसार फारच काळजीपूर्वक करीत आहों. शेतकऱ्यांना अवश्य असणारें–थोड्या मुदतींत परत करावयाचें आणि स्वस्त व्याजाचें–कर्ज देणें हेंच आह्मी सहकारी संस्थांचें क्षेत्र ठरवलें आहे. कर्ज मिळण्याच्या फारशा सवलती खेडुतांना मिळूं देणें इष्ट नसतें, कारण आपलें उत्पन्न किती व आपण केवळ्या रकमेची फेड करूं शकूं याचा आगाऊ विचार न करतां खेडुत कर्ज काढण्यासाठीं त्या सवलतीचा दुरुपयोग केल्याशिवाय रहाणार नाहीं.

लँडमॉर्गेज बँक स्थापण्याच्या कल्पनेला अजून या संस्थानांत वाव मिळालेला नाहीं. असल्या पाश्चिमात्य योजना आपल्या देशांत उपयुक्त ठरतील किंवा नाही याबद्दल मला शंका वाटते.

अन्य देशीं एकादी नमुनेदार योजना यशस्वी झाली असल्यास तिचें प्रत्यक्ष ज्ञान असणें हितावें असतें. अशा प्रत्यक्ष ज्ञानापासून तोटाहि असतो कारण त्या परदेशच्या योजनेबद्दलच्या माहितीनें बुद्धि इतकी भरून गेलेली असते कीं नवीन व स्वतंत्र विचार करण्याची शक्तिच तिच्यांत रहात नाहीं आणि खास भिन्न अशा स्थानिक परिस्थितीचा विचार न करतां परदेशच्या नमुन्याची आंधळेपणानें नक्कल करण्याची प्रवृत्ति होते.

शेतकऱ्यांना एकजात कर्जमुक्त करण्याचा हा जो प्रयत्न भावनगर संस्थान करीत आहे तो धाडसाचा आहे. पण मी वर म्हटलें आहे तेंच पुनः म्हणावयाचें म्हणजे अगोदरच्या

कर्जाचा परामर्श घेतल्याशिवाय तयार केलेली खेडेगांवांच्या उद्धाराची कोणचीहि योजना सफल होणार नाहीं. शेवटीं मला असें सांगावयाचें आहे कीं जर खेडुताची आर्थिक स्थिति वेळींच सुधारली नाहीं तर आधींच विकट व भयप्रद झालेली परिस्थिति अधिकाधिक बिघडेल. कितीहि अप्रामाणिकपणें व हिंसावृत्तीनें चालवलेली राजकीय चळवळ घडवूं शकणार नाहीं अशी उलथा-पालथ या आर्थिक दुर्दशेमुळें देशभर घडून येईल. आर्थिक समाधान ज्या प्रदेशांत असतें तेथें राज्यकारभार सुरळीत चालतो. आणि आर्थिक समाधान निर्माण व्हावयास पाहिजे असेल तर देशाचा प्राण जो शेतकरीवर्ग त्याची तुंवलेल्या कर्जाच्या बोजांतून प्रथमतः मुक्तता झाली पाहिजे.

आपला मित्र,

पी. डी. पट्टणी.

(७)

बॉंबे कोऑपरेटिव्ह क्वार्टर्लीचे संपादक श्री. वैकुंठ लल्लुभाई मेहता, एम् ए., यांच्या ता. १० मे १९३२ च्या पत्रांतील उतारा.

* * * *

कर्जाची तडजोड व फेड करण्याची योजना हातीं घेऊन आपण एक वेधक प्रयोग सुरू केला आहे. हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि भागांत एवढ्या मोठ्या प्रमाणांत हा प्रयोग सुरू केलेला आहे किंवा आपण केली इतक्या बारकाईनें व व्यावहारिक दृष्टीनें कर्जबाजारीच्या संबंध प्रश्नाची सांगोपांग चौकशी केलेली आहे असें मला वाटत नाहीं. आपणांस भावनगरमध्यें जितकी अनुकूल परिस्थिति मिळाली तितकी जरी इतर ठिकाणीं नसली तरी सुद्धां आपणांस जें यश प्राप्त होईल त्याचा कांहीं तरी परिणाम अन्य ठिकाणच्या योजनेवर झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

परिशिष्ट आठवें

(सन १९२६ माहे जानेवारीच्या एशियाटिक रिव्ह्यूच्या अंकांत प्रसिद्ध झालेला लेख)

हिंदुस्थानांतील एका देशी राज्यांतील शेतकऱ्यांची कर्जबाजारी

——:x•x:——

भावनगर संस्थानांतील प्रयोग

[लेखक:—लेफ्टेनंट कर्नल ए. एच्. ई. मॉस, सी. आय. ई.]

१ भावनगरमधला प्रश्न

हिंदुस्थानच्या रहिवाश्यांची फार मोठी संख्या शेतकऱ्यांची आहे: स्वाभाविकपणें शेतकऱ्याचें हित हें हिंदुस्थानांत सर्वांत जास्त महत्त्वाचें आहे हें सांगण्याची जरूर नाहीं. हिंदुस्थानांतील शेतकरी कर्जांत जन्मास येतो, कर्जांत जगतो आणि कर्जांतच मरतो हें विधान प्रथम कोणी केलें हें मला माहित नाहीं. पण हें विधान अगदीं रूढ झालेलें आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे कीं हें विधान देशी राज्यांतच नव्हे तर ब्रिटिश हिंदुस्थानांत सुद्धां पूर्णपणें लागू पडतें.

देशी राज्यव्यवस्था एकतंत्री असते व देशी राज्यकारभार प्रतिगामी स्वरूपाचा असून हल्लींच्या प्रागतिक युगाला न शोभणारा असतो अशी त्याच्यावर टीका करण्यांत येते. देशी राज्यांत लोकशाहीची लाट उसळून त्या लाटेंत संस्थानिक गडप होतील तेव्हांच लोकांची स्थिति सुधारेल असें सांगण्यांत येतें. उलट बाजूनें हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीचे शत्रु असें प्रतिपादन करतात कीं शेतकरी वर्गाबद्दल ज्यांना बिलकुल कळकळ नाहीं आणि शेतकरी वर्गाच्या हिताहिताकडे जे मुळींच लक्ष्य पुरवणार नाहींत अशा थोड्याशा उच्चवर्णीय राजकारणपटु लोकांच्या हातांत सत्ता जाऊं देणें हें अत्यंत धोक्याचें आहे.

अशा प्रकारें वस्तुस्थिती व मुद्दे यांचें प्रतिपादन होत असतांना एका देशी संस्थानांतील शेतकऱ्यांच्या हाडींमासीं खिळलेली ऋणबद्धता नष्ट करण्यासाठीं त्या संस्थानच्या ब्राह्मण कारभाऱ्यानें कसे अपूर्व प्रयत्न केले याचें वर्णन केल्यास यावेळीं त्याचा जरूर उपयोग होईल.

भावनगर संस्थानचें क्षेत्रफळ तीन हजार चौरस मैल असून लोकसंख्या पांच लाख आहे. पश्चिम हिंदुस्थानांतील काठेवाडांत भावनगर हें अतिशय सुधारलेलें संस्थान आहे. भावनगरचे हल्लींचे राजे हिज हायनेस महाराजा कृष्णकुमारसिंहजी १९११ सालीं संपूर्ण अधिकारसंपन्न झाले तत्पूर्वी बारा वर्षें राजे अज्ञान असल्यामुळें चार सभासदांच्या कौन्सिलकडे कारभाराचा अधिकार होता. कौन्सि-

लचे अध्यक्ष सर प्रभाशंकर पट्टणी हे होते. राउंडटेबल कॉन्फरन्समध्यें हे एकसारखे दिसत असत. हे जातीनें ब्राह्मण आहेत. हिंदुस्थानच्या पोलिटिकल खात्यांतला एक ब्रिटिश अंमलदार उपाध्यक्ष होता. प्रस्तुत लेखक शेवटच्या चार वर्षांच्या कालांत उपाध्यक्ष होता.

कांहीं वर्षांपूर्वी संस्थानांतील शेतकऱ्यांच्या कर्जाबद्दल चौकशी करण्यासाठीं कमिटी नेमणें कौन्सिलला जरूर वाटलें. या कमिटीनें कसून आणि सांगोपांग चौकशी केली, दरएक खातेदाराच्या स्थितीचा त्याच्या गांवीं जाऊन तपशीलवार तपास केला आणि १९२९ सालीं कौन्सिलला रिपोर्ट सादर केला. खातेदारांशिवाय पांचदोंपेक्षां अधिक सावकारांना जातीनिशीं व हिशोबाच्या चोपड्या घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीला कमिटीनें बोलावलें आणि सावकारांची व त्यांच्या चोपड्यांची तपासणी केली.

चौकशींत कर्जाबद्दल जे आंकडे जमा केले त्याच्या अचुकपणाची खात्री देणें हें स्वाभाविकपणें अशक्य होतें. कमिटीला असें आढळून आलें कीं कांहीं खेडुतांनीं आपल्या कर्जाचे आंकडे कमी करून सांगितले तर कांहीं खेडुतांनीं फुगवून सांगितले. आंकडे कमी सांगण्यांत कांहीं खेडुतांना सावकारांची फूस होती व कांहीं खेडुतांनीं आपली पत व इभ्रत कमी होईल या भीतीनें आपल्या कर्जाचे आंकडे कमी सांगितले. कर्जाचे आंकडे फुगवून सांगण्याचें कारण संस्थान फेडीच्या कामीं पैसे देणार असें दिसूं लागलें हें होय. पण खरे आंकडे सांगण्याची प्रवृत्ति निर्माण करण्याची कमिटीनें शिकस्त केली. दरएक खेडुताची एकएकट्याला बोलावून चौकशी केली आणि त्या चौकशींत मिळालेली माहिती जरूर येथें गुप्त ठेवण्यांत आली. सावकारांना असें आश्वासन देण्यांत आलें कीं कमिटीपुढें त्यांनीं दिलेली कोणचीहि माहिती कोर्टांत पुरावा म्हणून दाखल करतां येणार नाहीं. अशा प्रकारें चुकीचें प्रमाण कमींतकमी करण्याचा उद्देश सफल झाला असें म्हणावयास हरकत नाहीं.

इतक्या सांगोपांग चौकशीअंतीं असें दिसून आलें कीं दरबारच्या खातेदारांपैकीं शेंकडा ४५ सावकारांच्या कर्जांत होते. उरलेले शेंकडा ५५ खातेदार सुस्थितींत होते असें नव्हे. त्यांपैकीं बऱ्याच खातेदारांची वरती कर्जाच्या शिवेवर होती आणि कांहीं खातेदारांना कोणी कर्ज देतच नव्हता म्हणून ते कर्जांत नव्हते. गरीबीमुळें त्यांची पत नव्हती आणि ते कसेबसे दिवस कंठीत असत.

या आंकड्यांवरून कोणचाहि निष्कर्ष काढावयापूर्वी भावनगर संस्थानांत प्रचलित असलेल्या जमीनमहसुलाच्या पद्धतीचा या ठिकाणीं उल्लेख केला पाहिजे. सर्व साधारणपणें पहावयाचें म्हणजे सर्व जमीन दरबारच्या मालकीची. दरबार म्हणजेच संस्थान अथवा राजा. खातेदार दरबारकडून पटथानें जमीन घेतो. जोंपर्यंत सरकारी देणें देण्यांत कुचराई होत नाहीं तोंपर्यंत जमिनीचा तांबा व भोगवटा बापापासून मुलाकडे वंशपरंपरा जावा अशी या पटथांत व्यवस्था असते. व्यवहाराच्या दृष्टीनें पाहिला तर पट्टा कायम स्वरूपाचाच असतो. इतर संस्थानशीं तुलना करतां भावनगर संस्थानांतील पट्टा खातेदाराला पुष्कळच अनुकूल असतो, मात्र सन १९३१ पर्यंत खातेदार दुसऱ्याला देऊं शकेल असा कोणचाहि हक्क उपभोगीत नसे. सन १९३१ सालीं हल्लीचे महाराज अधिकारसंपन्न झाले त्यावेळीं विक्रीचा व गहाणाचा हक्क खातेदारांना देण्यांत आला, त्याला बंधन एवढेंच कीं खऱ्याखुऱ्या शेतकऱ्याशिवाय कोणाला जमीन विकावयाची अगर गहाण द्यावयाची नाहीं.

सरकारी साऱ्यासंबंधीं थोड्या वर्षांपूर्वीपर्यंत भागबटाई पद्धति चालू होती. या पद्धतीचा अर्थ असा कीं रोकड सारा घ्यावयाच्या ऐवजीं दरबार पिकाचाच हिस्सा घेऊं शकत असे. दरबारचा

वांटा वसूल करण्यासाठीं सरकारी अधिकाऱ्यांना पिकाचें मोजमाप करावें लागे आणि खेडुत त्या पिकाची वासलात कशी लावतो इकडेहि देखरेख ठेवावी लागे. त्याच पिकावर आणखी कांहीं करांचा बोजा असल्यामुळें त्याच्यांत भानगडी निर्माण होत असत. हल्लीं पिकाच्या वांटघाऐवजीं ठराविक रोकड रक्कम खातेदार देतो. ही रोकड रक्कम दहा वर्षेपर्यंत बदलत नाहीं. ही रक्कम जमिनीच्या कसाप्रमाणें अथवा कालव्याचें पाणी जमिनीस मिळतें किंवा नाहीं याचा विचार करून ठरवण्यांत येते. विघोटी हें या पद्धतीचें नांव आहे आणि हा शब्द 'विघा' या शब्दावरून झाला आहे. दर विघ्यामागें अमुक रक्कम अशा हिशोबानें आकार करण्यांत येतो.

भागबटाई व विघोटी या दोनहि पद्धतींत गुणदोष आहेत, पण दोहोंची तुलना करतां विघोटी ज्यास्त साधी व ज्यास्त चांगली ठरते हलक्या अंमलदारांना शेतकऱ्याला सतावण्याची संधि कमी मिळते आणि दरबारला काय द्यावयाचें तें शेतकरी आधींपासून नक्की जाणूं शकतो. सुबत्तेच्या वर्षीं जें ज्यास्त पीक येईल तें त्याचें होतें. जर कोणचेंहि पीक बऱ्याचशा कमी प्रमाणांत आलें—मग तें अनावृष्टीमुळें असो, अथवा कीड लागणें वा तत्सम दुसऱ्या कारणामुळें असो—तर वार्षिक साऱ्याच्या कांहीं भागाची वसुली दरबार तहकूब करतें. कांहीं काल गेल्यानंतर तहकूब केलेल्या साऱ्यापैकीं कांहीं भागाची दरबार सूटहि देतें.

तहकूब केलेला सारा नंतरच्या वर्षांत वसूल करावयाचा असतो. पण जर पुनः पावसानें दगा दिला तर तहकूब केलेला सारा वसूल करतां येत नाहीं, उलट आणखी साऱ्याची तहकुबीच द्यावी लागते. जर लागोपाठ कांहीं वर्षें पीक बुडत गेलें तर तहकूब केलेल्या साऱ्याची रक्कम, निदान भावनगरसारख्या कनवाळू प्रवृत्तीच्या राज्यांत, बरीच फुगून रहाते.

आतां आपण पुनः कमिटीच्या रिपोर्टाकडे वळूं. जे पंचेचाळीस टक्के खेडुत कर्जात होते त्यांचेपैकीं किती जण केव्हांतरी कर्जमुक्त होण्याच्या स्थितींत होते? सामान्य वर्षीं येणाऱ्या पिकांतून खेडुताला जो फायदा होतो त्याचा नीट विचार करतां असें सांगतां येतें कीं ज्या खेडुताचें सावकारीकर्ज सरकारी दस्ताच्या दुपटीपेक्षां अधिक नाहीं तो कर्जातून मुक्त होऊं शकेल. कर्जबाजारी खेडुतांपैकीं दोन तृतीयांश या वर्णनांत बसण्याजोगे नव्हते असें आढळून आलें. निराळ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे दरबारला सारा भरणाऱ्या शेतकऱ्यांपैकीं शेंकडा तीस शेतकरी कधींहि न फेडतां येण्याइतक्या कर्जाच्या डोहांत बुडून गेलेले होते. कांहीं शेतकऱ्यांचें कर्ज तर सरकारी साऱ्याच्या पंधरापटीइतकें सुद्धां भरलें.

जनतारूपी देहाचा जो पाठीचा कणा अशा शेतकरीवर्गाच्या गळ्याला लागणाऱ्या या गंभीर परिस्थितीकडे कोणत्याहि मंत्रिमंडळास दुर्लक्ष्य करतां येणार नाहीं, आणि मोठी चिंता वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. भावनगरमधील स्थिति शेजारच्या इतर संस्थानांपेक्षां वाईट होती असें नव्हे. रयतेपैकीं मोठी संख्या कायमची कर्जात रुतलेली असणें हा प्रकार ब्रिटिश हिंदुस्थानांत अथवा देशी संस्थानांत नवीन नव्हता. पण भावनगरमध्यें ही दुरवस्था जशी वेशीवर टांगली गेली व सावकारांच्या शिरावर ती दुरवस्था निर्माण करण्याची जबाबदारी किती आहे हें ज्या प्रमाणांत सिद्ध झालें तसें तें इतर ठिकाणीं अगर अन्यकाळीं झालें नव्हतें.

ही दुर्दशा घालवण्याकरतां जर उपाय योजणें शक्य असेल तर जे उपाय योजावयाचे त्यांचा प्रकार व उपयुक्तता दुर्दशेच्या कारणांच्या कमीअधिक महत्त्वावर अवलंबून रहाणार. आजपर्यंत या दुर्दशेचीं जीं कारणें नजरेस आलीं त्यांपैकीं पुढें दिलेल्या कारणांचा अंतर्भाव होतो:—

(अ) जमीनमहसुलाचा फाजील बोजा, अथवा बोजा फाजील नसतांना वसुली करण्यांत होत असणारा कडकपणा. भावनगर संस्थानांत या कारणाचें अस्तित्व नव्हतें असा कमिटीनें निकाल दिला व तो निकाल अगदीं योग्य होता.

(ब) व्यक्तीच्या ऐपतीच्या मानानें भरमसाट खर्च निरनिराळ्या शुभाशुभ प्रसंगीं करावयास भाग पाडणाऱ्या धर्माच्या व जातीच्या चाली रीती. गोळा केलेल्या पुराव्यावरून कमिटीनें असा निर्णय केला कीं हें कारण दुर्लक्ष्य करण्याजोगें नसलें तरी या कारणाला फाजील महत्त्व देण्यांत आलें होतें.

(क) तिसरें आणि अत्यंत वारंवार कर्ज काढावयास लावणारें कारण ह्मणजे हवेचा चंचलपणा. सबंध जगांतला शेतकरी हवापाण्यावरच अवलंबून असतो, हिंदुस्थानांत तर तो इतर देशांपेक्षांहि अधिक असतो. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस जें भयंकर अवर्षण पडलें त्याच्या दुष्परिणामांतून गुजरात व काठेवाड हे प्रदेश अजूनहि पूर्णपणें बाहेर पडलेले नांहींत. त्या वर्षापासून खेडेगांवांतील जनता जणुं नवा संवत्सरच मोजीत असतात.

(ड) **सावकार.** कमिटीनें दिलेला सर्वांत महत्त्वाचा निर्णय यासंबंधींच आहे. कमिटीनें असा स्पष्ट निर्णय दिला आहे कीं मुळांत कर्ज काढण्याचीं कारणें कांहींहि असलीं–आणि तीं कांहीं कांहीं वेळां अगदींच क्षुल्लक असतात—तरी **लोभानें तीव्रतर झालेल्या सावकाराच्या कल्पक डोक्यांतून निघालेल्या कुळाला पिळण्याच्या अनंत युक्त्यांमुळेंच शेतकऱ्यांच्या नांवावर चढलेल्या प्रचंड बाक्या निर्माण झाल्या.**

शायलॉक संघाच्या कारवाया जगभर सारख्याच तत्त्वानुसार चाललेल्या आहेत. पण हिंदुस्थानांत त्यांना जितकें विस्तृत क्षेत्र मिळतें तितकें इतर देशांतील परिस्थितीमुळें त्यांना मिळत नाहीं. पहिली गोष्ट ह्मणजे अजून शेतकऱ्यांची फार मोठी संख्या निरक्षर आहे. साक्षरतेचें प्रमाण रोज सावकाशपणें वाढत आहे. पण साक्षरता झपाट्यानें वाढण्याच्या मार्गांतलें मोठें विघ्न ह्मणजे शेतकऱ्याला आपल्या शेतांतील कामासाठीं आपल्या लहान मुलांची सुद्धां मदत हवी असते आणि त्यामुळें तो त्यांना फारसे दिवस शाळेंत ठेवावयास कबूल नसतो. या निरक्षरतेचा सावकार ज्यास्तींत ज्यास्त फायदा घेतो.

दुसरी गोष्ट ही कीं हिंदुस्थानांतील खेड्यांत सावकार आणि धान्य वगैरे वस्तूंच्या देवघेवी करणारा इसम एकच असतो. यामुळें लबाडीच्या व्यवहाराला मिळणारा वाव पुष्कळच वाढतो. शिवाय वर्णव्यवस्थेमुळें व्यापार व सावकारी हा धंदा पिढीजाद होऊन बसला आहे. संधि व मिळालेल्या संधीचा उपयोग करण्याची पिढीजाद अक्कल आणि चांगल्या वाइटाचा विधिनिषेध नसणें या त्रयीच्या ऐक्यामुळें कुळाला नागवून गबर होण्याची कला हिंदुस्थानांतील सावकारांनी पूर्णत्वास नेली आहे. सावकारांच्या व्यवहाराचे कांहीं नमुने या ठिकाणीं दिले आहेत त्यांवरून त्यांचे मार्ग कोणचे व कसले असतात हें समजण्याजोगें आहे.

सावकारांच्या व्यवहाराचे कांहीं नमुने

(अ) सवाया–ही पद्धत जवळ जवळ सार्वत्रिक आहे. कर्जाऊ दिलेल्या रकमेचा सवापट — करून लेवडी रक्कम सहा महिन्यांत परत करण्याचे कर्जखत करून घेण्यांत येतें.

याचा परिणाम असा कीं शेंकडा पन्नास टक्के व्याज सावकाराला मिळतें. मार्ग सोपा व सावकारास फायदेशीर.

(ब) ज्या जिल्ह्यांत कापूस पिकतो त्या जिल्ह्यांत कर्जाची फेड कपाशीनें करण्याचे करार होतात, आणि तयार अथवा वायद्याच्या भावांत शेंकडा पन्नास अगर शंभर टक्यांची घट करून रकमेच्या फेडींत किती कापूस द्यावयाचा हें ठरवतात. हे करार वायद्याच्या स्वरूपाचे असून त्यांत सट्ट्याचें अंग असतें, पण कांहींहि झालें तरी त्यांत सावकाराचाच फायदा होतो. कापसाची किंमत इतकी कमी आकारलेली असते कीं भाव खरोखरच पडले तरी त्याचें नुकसान होऊं शकत नाहीं. पण भाव वाढल्यास जो फायदा खेडुताला मिळावयाचा तो मात्र खेडुतानें आगाऊच सावकाराच्या हवालीं केलेला असतो.

(क) कांहीं कांहीं वेळां या दोनहि मार्गांचा जोडीनें उपयोग करण्यांत येतो. 'अ' मध्यें पागडीच्या जोडीला कर्जखतांत अशी अट घालण्यांत येते कीं ठराविक मुदतींत कर्जाच्या रकमेची कुळाकडून फेड झाली नाहीं तर कापूस अथवा धान्य अथवा शेतांत उत्पन्न होणारा विशिष्ट जिन्नस यांचें अमुक माप त्यानें सावकाराच्या पदरांत टाकलें पाहिजे. एक उदाहरण घेतलें ह्मणजे हा प्रकार ज्यास्त स्पष्ट होईलः—मूळ कर्ज रुपये शंभर. कर्जखतांत सवाशेंचा आंकडा आणि मुदत सहा महिन्यांची या मुदतींत सवाशेंचो रक्कम खेडुत फेडूं शकला नाहीं तर दोन रुपये मणाच्या दरानें ६२½ मण कापूस सावकाराला देण्याची अट खेडुताला कबूल करावी लागते. (एक मण ह्मणजे चाळीस रत्तल.) जर ठरवल्यावेळीं कापसाचें पुरेपूर माप खेडुतानें दिलें नाहीं तर जेवढें माप कमी भरेल तेवढ्या कापसाची त्यावेळच्या बाजारभावाप्रमाणें किंमत करून तेवढ्या रकमेचें नवें कर्जखत खेडुताकडून सावकार करून घेतो. पीक नीट आलें नाहीं ह्मणजे पुरेपुर माप खेडुत देऊं शकत नाहीं आणि बाजारभावहि मणीं दोन रुपयांपेक्षां पुष्कळ अधिक असतो. कांहीं कांहीं वर्षी मणाचा भाव आठ रुपयेपर्यंत होता. समजा कीं एकाद्या वर्षी बाजारभाव सहांचा होताः परिणाम रु. ३७५ चें नवें कर्जखत खेडुताला करून द्यावें लागलें ह्मणजेच सावकाराची रक्कम सहा महिन्यांत चौपटीनें वाढली. कांहीं कांहीं कर्जखतांत या रकमेवरहि शेंकडा पंचवीस टक्यांची वाढ करून रक्कम नोंदलेली आढळून आली.

(ड) वर दाखवल्याप्रमाणें सावकार आणि गांवांतला व्यापारी एकच मनुष्य असल्यामुळें सावकारीचा दुरुपयोग करावयास फारच वाव मिळतो. कांहीं जिल्ह्यांत असें दिसलें कीं गरीब खेडुत दोन महिन्यांना लागणारें धान्यधुन्य आपल्याजवळ ठेवून बाकीचें सर्व सावकाराच्या स्वाधीन करी; या मालाबद्दल शेतकऱ्याच्या नांवावर रकमा जमा होत असत पण प्रचलित बाजारभावापेक्षां २५ अगर ५० टक्के कमी भावानें त्या मालाची किंमत आकारण्यांत येत असे; उलटपक्षीं रोज घरांत लागणाऱ्या ज्या जिनसा खेडुत सावकाराकडून आणीत असे त्याची किंमत बाजार भावावर २५ अगर ५०

टक्के चढवून आकारण्यांत येत असे आणि तेवढी रक्कम खेडुताचे नांवें खर्ची टाकण्यांत येत असे.

या व असल्या मार्गांच्या बाहेर कुळांच्या कर्जाचा आंकडा फुगण्याचें कारण सावकारांची हिशोब ठेवण्याची पद्धत होय. कुळें निरक्षर असल्यामुळें हिशोव लबाडींनें भरलेले, अनियमित व जाणूनबुजून गूढ केलेले असत. हिशोब वर्षांतून दोनदां अगर तीनदां करण्यांत येत, दर हिशोबाचे वेळीं पागडी ह्मणून सावकाराच्या इच्छेस येईल ती रक्कम मिळवण्यांत येई; आणि अशा तऱ्हेनें जें देणें निघे तेवढ्या रकमेचा नवा कागद करून घेण्यांत येई. पागडीची रक्कम नवीन कर्ज ह्मणून दाखवण्यांत येई आणि मागील देण्याघेण्याबद्दल केलेले कागद नव्या कर्जासंबंधींचे कागद ह्मणून तयार करण्यांत येत असत. एक सावकार व एक ऋणको यांच्यामधले व्यवहार निरनिराळ्या चोपड्यांत नोंदले जात असत आणि व्यवहार ज्यास्त गुंतागुंतीचे करणें अगर लबाडीला ज्यास्त क्षेत्र निर्माण करणें याशिवाय अशा पद्धतीचें दुसरें कोणचेंहि कारण दृष्टोत्पत्तीस येत नसे. कांहीं व्यवहारांच्या संबंधीं कोर्टांत दावा करण्याची पाळी आल्यास कोर्टांत तपासण्यासाठीं द्यावयाकरतां निराळ्या स्वतंत्र चोपड्या ठेवण्यांत येत असत. एकंदरींत हिशोब ठेवण्यांत स्वाभाविकपणेंच इतक्या भानगडी केलेल्या असत कीं बहुतेक खात्यांत कुळाच्या नांवावर असलेल्या कर्जांत अव्वल खऱ्या कर्जाचा आंकडा किती हें ठरवणें अशक्य होई.

सावकारांच्या या कारवायांचा अनिष्ट परिणाम फक्त खेडुताच्या कर्जबाजारीवरच होऊन रहात नसे. एकाच खेडयांत रहाणाऱ्या सावकारखेडुतांचे व्यवहार अशा प्रकारचे असत कीं पिकाची वासलात लावण्याच्या कामीं सावकार कुळावर हुकमत चालवूं शकत असे आणि याचा परिणाम असा होई कीं दरबारचें देणें सावकाराच्या अगोदर दिलें पाहिजे असा कायदा असूनहि—विशेषेंकरून भागबटाईची पद्धत रद्द केल्यामुळें सरकारच्या हक्कसंरक्षणाचीं साधनें कमी झाल्यानंतर—दरबारला मिळावयाच्या रकमा वसूल होण्याच्या मार्गांत अडचणी येत असत. जमीनमहसुलाच्या तुंबलेल्या बाकींपैकीं मोठ्या भागाची जबाबदारी देखील सावकाराच्या डोक्यावर टाकणें योग्य होय.

अशा परिस्थितींत सावकाराच्या देण्यांत बुडालेल्या शेतकऱ्याचा प्रश्न सोडवणें हें दरबारच्या व खेडुतांच्या हिताचें झालें हें स्पष्ट होईल. यापूर्वीसुद्धां सहकारी पतपेढ्या स्थापण्यांत आल्या होत्या पण त्यांनीं इष्ट गोष्ट साध्य झाली नाहीं. सहकारी पतपेढ्यांचा उपयोग कसा करावा हें खेडुतांना शिकवलें पाहिजे आणि हें शिक्षणाचें कार्य वेळाचें असतें. आजपर्यंतच्या अनुभवावरून असें स्पष्ट झालें आहे कीं जोंपर्यंत खेडुत सावकाराच्या कर्जांत निमग्न आहे तोंपर्यंत सहकारी पतपेढ्या नीट चालूं शकत नाहींत. कारण सावकाराचें देणें देण्यासाठीं कर्ज काढण्यापुरताच खेडुतवर्ग त्यांचा उपयोग करतो आणि नंतर पेढीचें कर्ज फेडण्यासाठीं सावकाराकडून पैसे काढतो. सावकाराच्या कर्जांत कायम असणाऱ्या खेडुतांच्या कर्जबाजारीचा शेवट करणें ही प्राथमिक जरूरीची गोष्ट आहे हें दिवसेंदिवस अधिकाधिक स्पष्ट झालें. इष्ट साधावयाचें कसें ?

२. भावनगरनें हा प्रश्न कसा सोडवला

राजाचें स्वागत करतांना शेतकरी त्याला बापू (म्हणजे बाप) या नांवानें संबोधितात. कृष्णकुमारसिंगजी राजांना हा शब्द लावणें निरर्थक नाहीं, कारण त्यांच्या अधिकारग्रहणाचा दिवस जेव्हां

जवळ येऊं लागला तेव्हां त्यांनीं अशी इच्छा प्रकट केली कीं राज्यकारभाराच्या सोईचे प्रश्न विचारांत घेऊन शक्य झाल्यास सर्व तहकूब झालेल्या साऱ्याची कुळांना सूट देण्यांत यावी. या इच्छेस अनुसरून सन १९२९ सालीं वीस लाख रुपयांची जी बाकी तुंबली होती तेवढ्या सर्व रकमेची सूट देण्यांत आली. शेतकऱ्याच्या डोक्यावरचा बोजा हलका करण्याच्या मार्गांतलें पहिलें पाऊल अशा रीतीनें टाकलें गेलें.

यानंतर कौन्सिलनें ज्यास्त मोठा व ज्यास्त विकट असा जो सावकारांच्या देण्याचा प्रश्न त्याकडे लक्ष्य वळवलें. प्रथमतः असें दृष्टीस पडलें कीं कायद्याचीं कोर्टें अनिच्छेनें आणि न जाणतां सावकाराच्या बाजूनेंच काम करीत असत. उदाहरणार्थ कायद्याच्या कोर्टांत कर्जखताच्या आधारें एकाद्या रकमेचा दावा दाखल झाला ह्मणजे न्यायाधिशाला कितीहि शंका वाटली तरी लेखी दस्तऐवजाच्या पलीकडे त्याला जातां येत नाहीं आणि पूर्वीच्या व्यवहाराबद्दल तपास करतां येत नाहीं. लेखाच्या आधारें केलेली मागणी कोर्टाला द्यावी लागते. मागितलेल्या रकमेंत कोर्ट ज्या देवविणार नाहीं अशा अवास्तव व्याजाच्या अगर केवळ खोट्या ह्मणजे निराधार रकमा आहेत याचा कोर्टें विचार करूं शकत नाहींत. ही वस्तुस्थिति कायद्यानेंच बदलणें शक्य असल्यामुळें जरूर तो कायदा घडविण्याची अवश्यकता दिसूं लागली. मुंबई सरकारनें डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलीफ ॲक्ट या नांवाचा एक कायदा पास केला होता त्याला अनुसरून ' शेतकरी संरक्षक कायदा ' पास करण्यांत आला. या कायद्यानें कोर्टांना पुढील खास अधिकार दिले:—

(अ) ऋणको खेडुतानें देण्याघेण्याच्या हिशोबाबद्दल दावा दाखल केल्यास त्यानें खरोखर सावकाराचें किती देणें आहे याबद्दल निर्णय करणें;

(ब) ज्या खताच्या अगर कराराच्या आधारें सावकारानें दावा दाखल केला असेल त्याच्या पूर्वीचे सर्व व्यवहार तपासून कर्ज काढण्याचें खरें कारण व मूळ कर्जाची खरी रकम यांबद्दल निर्णय करणें;

(क) अशा रीतीनें निर्णीत केलेलें मुद्दल व दरसाल दरशेंकडा बारा टक्के सरळ व्याज इतकें देण्याचा हुकुमनामा करणें—मात्र मूळ मुदलाच्या दुपटीपेक्षां अधिक रकमेचा हुकुमनामा केव्हांहि करावयाचा नाही !

येथपर्यंत ठीक झालें, पण अशा कायद्यापासून कांहीं फायदा झाला तरी या प्रश्नाच्या मुळाशीं कायदा हात घालूं शकत नाहीं. या कायद्यानें एकएका खेडुताचा प्रश्न स्वतंत्रपणें हातीं घेतां येईल. कसेंतरी करून सावकार कोर्टांत येण्याचें टाळूं शकला तर कायदा त्याला स्पर्श करूं शकणार नाहीं. सावकाराच्या कर्जाचा प्रमुख भाग दूर करावयास कायदा स्वतंत्रपणें समर्थ नाहीं. एकदां खेडुताच्या डोक्यावरचा भार दूर झाला आणि खेडुत मोकळेपणानें नवीन व्यवहार करूं शकला तर या संरक्षक कायद्यापासून कांहीं तरी फायदा मिळण्याची त्याला आशा.

सावकारांच्या कर्जाचा हा बोजा दूर करणें, अखिल खेडुतवर्गाला सावकारांच्या कर्जातून सोडवणें शक्य होतें काय ? सर प्रभाशंकर पट्टणी यांचा दृढ विश्वास असा होता कीं हें शक्य असून इतर ठिकाणी ज्या मार्गाचा व्यर्थ शोध करण्यांत आला तो मार्ग भावनगर संस्थान दाखवूं शकेल.

आतां आपण भावनगरच्या प्रयोगाची गुरुकिल्ली कोणती तें पाहूं. खेडुताच्या डोक्यावर कर्जाचा भार किती आहे हें विचारांत घेणें जरूर असलें तरी त्याहूनहि अधिक महत्त्वाचा प्रश्न ह्मणजे त्याचा धनको कोण, सावकार कीं दरबार—या फरकाच्या आधारेंच प्रयोगाची कल्पना उभी केलेली होती. धनको दरबार असल्यावर आपल्या डोक्यावर भार किती आहे हें खेडुताला नक्की समजूं शकतें, शिवाय खेडुताच्या अडचणींचा दरबार सहानुभूतिपूर्वक विचार करील आणि खेडुताच्या सामर्थ्याबाहेर त्याच्या जवळून दरबार जबरदस्तीनें वसूल करणार नाहीं अशी त्याला खात्री असते. सावकाराशीं संबंध आला ह्मणजे त्याची अवस्था अजीबात निराळी असते. आपल्या डोक्यावर सावकाराचें देणें किती हें त्याला नक्की माहीत नसतें. कर्जाचा आंकडा वाटेल तसा वाढूं शकतो. सावकाराचा उद्देश शेतकऱ्याला कायमचा आपल्या मगरमिठींत ठेवावयाचा असतो. जमिनींतून जास्त उत्पन्न निघाल्यास फायदा झाला तर तो सावकाराचा यामुळें जमिनींतून ज्यास्तींत ज्यास्त प्राप्ति करण्यासाठीं झटावें असें खेडुताला वाटतच नाहीं.

खेडुतांच्या सामवायिक ऋणविमोचनाची प्रत्यक्ष बजावणी करावयाची तर आधीं दोन गोष्टी साध्य केल्या पाहिजेत. (१) सर्व खेडुतांनीं मिळून सावकारांचें जें दर्शनी देणें असेल त्याचा आंकडा योग्य मर्यादेच्या आंत येईल इतका कमी करणें, आणि (२) या सर्व कर्जाचा बोजा दरबारनें आपल्या शिरावर घेणें. याशिवाय या कामीं जो सावकारांनीं घ्यावयाचा भाग तो घेण्यास अखिल सावकारवर्गाला प्रवृत्त करणें अवश्य होतें आणि हें काम कांहीं सोपें नव्हतें.

संस्थानला द्यावा लागणारा पैसा भावनगरमध्यें मिळण्याजोगा होता. अन्य ठिकाणचें कांहीं सांगतां येत नाहीं. भावनगर संस्थानची आर्थिक व्यवस्था नेहमीं चांगली असे आणि महाराज अज्ञान असल्याच्या कालांत दरबारजवळ बराच निधि जमून राहिला होता. हा प्रयोग विशाळ होता व सहाच्या वर्गांतला होता. तरीपण सुरवातीला या प्रयोगाच्या व्यवहार्यतेबद्दल साशंक असलेल्या कौन्सिलला सर प्रभाशंकर पट्टणींनी आपल्या मताचें केलें. अखेरीस ऋणविमोचनाची योजना मंजूर झाली.

या योजनेचे मुख्य मुद्दे थोडक्यांत पुढें दिले आहेतः

(अ) कोणत्याही महालांतील सावकार व खेडुत यांचेकडून जोडीनें अर्ज आल्यास दरबारनें प्रातिनिधिक स्वरूपाची कमिटी नेमावी. या कमिटीनें योजनेंत आणि शेतकरीसंरक्षककायद्यांत नमूद केलेल्या तत्त्वानुसार सर्व सावकारांचे व खेडुतांचे हिशोब तपासावे आणि दरएकाच्या देण्यासंबंधीं लवादनामा करावा. असे सर्व लवादनामे एका पत्रकांत दाखल करून दरबारच्या हुकमासाठीं पाठवावे.

(ब) या सर्व पत्रकांचा विचार करून तीं योग्य वाटल्यास पत्रकांत दाखवलेली रक्कम दरबारनें सावकारांमध्यें प्रमाणशीर वांटण्याकरतां द्यावी. मात्र सावकारांनीं मिळणाऱ्या रकमेबद्दल सर्व कर्जाच्या पूर्ण फेडीच्या पावत्या दिल्या पाहिजेत.

(क) दरएक खेडुताचें कर्ज फेडण्यासाठीं दरबारनें दिलेली रक्कम दरसाल दरशेंकडा चार टक्के व्याजासह जुन्या भागबटाई पद्धतीप्रमाणें वसूल करावी. भागबटाई पद्धतीमुळें खेडुताच्या शक्तीबाहेर त्याला काहींहि द्यावें लागणार नाहीं.

या योजनेबद्दल सावकार उत्साह दाखवतील अशी आशा करणें व्यर्थच होतें. पण या योजनेच्या तर्फेनें एक महत्वाची गोष्ट होती. ती ही कीं जवळ जवळ नादार झाल्यामुळें ज्या कुळांकडून अनेक वर्षांत अव्वलकर्ज वसूल होऊं शकलें नसतें त्यांच्या कर्जाच्या फेडींत रोख रक्कम मिळावयाची होती. माणूस कितीहि लोभी असला तरी हातांत असलेला पक्षी आणि त्यांतूनहि तो गुबगुबीत असल्यास त्याला आवडावयाचाच. वसूल होण्याजोग्या व वसूल न होण्याजोग्या कर्जाच्या फेडींत मिळणाऱ्या रोकड रकमेच्या लालचीचा प्रभाव थोडया कालांत दिसू लागला आणि कामाला सुरुवात झाली. कमिटीचें काम कष्टाचें होतें आणि सुरुवातीला कामाची प्रगति फारच सावकाश होत होती. जसा अनुभव मिळत गेला तशी कामाची गति वाढूं लागली. या योजनेखालीं कमिटीनें निकाल दिल्यानंतर फारच अल्पावधींत रोकड रकमा सावकारांना मिळालेल्या दिसूं लागल्या त्याबरोबर साशंक अथवा आग्रही साधकार आपल्या हरकती सोडूं लागले आणि प्रगति झपाट्यानें होऊं लागली. काम करण्यासाठीं नेमलेल्या कमिट्यांची संख्या वाढवावी लागली आणि सन १९३० माहे एप्रिलमध्यें सुरू केलेलें काम सन १९३४ च्या मार्च महिन्यांत पुरें झालें.

अंतिम परिणाम असा झाला कीं सावकारांचें ८६ लक्ष रुपयांचें दर्शनी कर्ज फेडण्यासाठीं दरबारने वीस लक्ष रुपये दिले. निराळ्या शब्दांत सांगावयाचें ह्मणजे सावकार अजीबात लुप्त झाला, सर्व खेडुतांचा धनको एकच (म्हणजे दरबार) झाला आणि पूर्वीच्या कर्जाचा भार एकचतुर्थांशावर आला. हें कार्य अपूर्व होय आणि त्याची अपूर्वता वर्णनीय होय.

आतां, जें साधण्यांत आलें त्याचा अर्थ काय व परिणाम काय याचा विचार करावयाचा राहिला. खेडुताच्या आर्थिक स्थितींत जो फरक झाला त्याचे व्यवहाराच्या दृष्टीनें परिणाम कोणचे ? पहिला परिणाम म्हणजे, व्याजाचा दर पंचवीस टक्के धरला तरी केवळ व्याजाच्या खातीं शेतकऱ्यांचा दरसाल एकवीस लक्ष रुपयांचा फायदा झाला. मुद्दलाकडे पहातां पूर्वीचे कर्जाचे आंकडे इतके मोठे होते कीं खेडुत त्यांची फेड करूं शकेल असा संभव फारच क्वचित्; जें वर्ष जाईल तें कर्जाचा आंकडा वाढवीत रहाणार आणि फेडीचा संभव आणखी दुरावणार. याचा स्वाभाविक परिणाम म्हणजे निराशेंतून उद्भवणारें औदासीन्य व कार्यक्षमतेचा अभाव. उलटपक्षी दरबारचें कर्ज पूर्वीच्या कर्जाच्या पाव हिश्शापेक्षांहि कमी व तें फिटण्याचा संभव भरपूर. व्याज अगदीं माफक आणि व्याज देऊन टाकलें तर कर्जाचा बोजा वाढणें शक्य नाहीं. आशा व उत्साह निर्माण झाल्यामुळें कार्यक्षमता वाढते आणि उद्योग वाढला तर कर्जफेडीचा दिवसहि नजीक येणार. ज्या जिल्ह्यांत या योजनेचा अंमल प्रथम झाला तेथें तिचे इष्ट परिणाम दिसूं लागले आहेत. शेतकरी मन लावून आपलें शेतीचें काम करूं लागला आणि जमीन महसूल झटपट व सहज वसूल होऊं लागला. झालेला फरक सत्यसृष्टींतला आहे.

या झालेल्या फरकाचा चिरस्थायी परिणाम काय या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण आहे. सावकाराची हाव व धूर्तता, खेडुताचा भोळसटपणा व निष्काळजीपणा या गोष्टी आहेत तशाच आहेत, यांत कांहीं फरक झालेला नाहीं. पुनः पीक बुडेल त्यावेळीं जुन्या दुर्दैवी प्रकारांची पुनरावृत्ति होणार नाहीं असें मानावयास कांहीं आधार आहे काय ?

आधार आहे असें माझें मत आहे. दुसऱ्या एका अशाच महत्त्वाच्या प्रयोगावर सर प्रभाशंकर आशेचा किल्ला बांधीत आहेत, तो प्रयोग म्हणजे पूर्वी ग्रामपंचायतीकडून ग्रामव्यवस्था ठेवण्यांत येत

असे त्या पंचायतींचीं विशिष्ट प्रमाणांत पुनश्च प्रतिष्ठा करणें. खेडुताची आर्थिक हलाखीची स्थिति आणि शेतकींत होणारा अत्यल्प फायदा यांमुळेंच कर्ज काढण्याची शेतकऱ्यावर पाळी येते म्हणून हाच खरा रोग असून कर्जबाजारीपणा हें केवळ त्या रोगाचें दृष्टोत्पत्तीस येणारें एक लक्षण आहे असा सिद्धांत मानण्यांत येतो. आपला कारभार पहाबयाचा अधिकार एकएका गांवाला दिला म्हणजे गांवांत स्वावलंबन व सहकार्य यांचें बीजारोपण होईल; स्वावलंबन व सहकार्य यांचा गांवांतील आर्थिक परिस्थितीवर अनुकूल परिणाम होईल आणि एकंदर गांवची भरभराट होईल अशी आशा बाळगिली जाते. जो प्रयोग अजून प्राथमिक अवस्थेच्या पुढें गेलेला नाहीं—आणि तो सुद्धां अगदी थोड्याशा गांवांत—त्याचें अधिक विस्तृत वर्णन अथवा विवेचन देण्याइतकें स्थल या लेखांत मिळण्याजोगें नाहीं. या प्रयोगांतून पुष्कळ चांगले परिणाम उद्भवतील अशी खात्री वाटते. पण त्याचेबद्दल फाजील आशा मनांत बाळगणें शहाणपणाचें होणार नाहीं.

या आशा बाजूस ठेवल्या तरी सुद्धां, सध्याच अस्तित्वांत असलेल्या कांहीं गोष्टी अशा आहेत कीं त्यांवरून भविष्य अनुकूलच वर्तवावें लागेल. ज्या कर्जबाजारीपणाचा आपण येथवर विचार केला तो कर्जबाजारीपणा म्हणजे आर्थिक व्याधीचें केवळ एक लक्षण आहे हे खरें असूं शकेल. पण शेतीच्या धंद्याला लागणारें भांडवल कर्जाच्या मार्गानें काढणें हें अवश्य आहे. सावकार आपल्या स्थानाचा दुरुपयोग करूं लागल्यामुळें कर्ज भलत्याच प्रमाणांत वाढतें आणि कर्ज वाढलें म्हणजे अनेक दुष्परिणाम घडतात हें आपण पाहिलें आहे. बरें, हे दुष्परिणाम कर्ज काढलें म्हणजे घडून आलेच पाहिजेत अशा वर्गातले नाहींत. म्हणजे रोगाचें लक्षण आगंतुक कारणानें बळावतें आणि त्यामुळें रोग असाध्य होतो. असें होत असल्यामुळें मूळचें जें केवळ रोगाचें लक्षण होतें तोच एक स्वतंत्र रोग होऊन बसतो. हें आगंतुक कारण नाहींसें करण्याची जर व्यवस्था झाली तर खरोखरच फायदा झाला असें म्हणतां येतें.

सावकाराचें कर्ज हाडीमासी खिळणारी ऋणबद्धता निर्माण करतें यांत अपूर्व असें कांहींच नाहीं. पण या संबंधांत भावनगर संस्थानांतली स्थिति अलीकडे कांहीं वर्षें फारच बिघडली होती असें दिसतें. याचीं दोन कारणें सांगतां येण्याजोगीं आहेत. पहिलें कारण असें कीं किंमती खूब वाढलेल्या असतांना सावकारांनीं त्यांचा भरपूर फायदा घेतला होता आणि तदनंतर किंमती एकदम खालीं आल्या. दुसरें कारण सवायाची पद्धत; या पद्धतीमुळें सुरुवातीलाच प्रत्यक्ष दिलेल्या रकमेंत सावकार पंचवीस टक्क्यांची वाढ करीत असत. ही पद्धत नवीन सुरू झाली आणि इच्यामुळें कर्जाची फारच झपाट्यानें वाढ झाली.

आतां परिस्थिति बदलली आहे आणि खेडुतसंरक्षक कायद्यामुळें ज्यास्त सरळ व कमी लोभी मार्गाचा अवलंब करावयाची इच्छा सावकाराच्या मनांत उत्पन्न झाली आहे. शिवाय हल्लींच सावकारांचे वाममार्ग चवाट्यावर आले याचा कांहीं दिवसतरी सावकारवर्गावर इष्ट परिणाम होऊन राहील. पुनः सावकारांकडून कर्ज घेण्याची वेळ खेडुतावर येणार नाहीं अशी आशा करणें व्यर्थ आहे. पण निदान दोन दृष्टींनीं पूर्वापेक्षां खेडुताचें सामर्थ्य वाढलें आहे हें निर्विवाद. एकतर खेडुत आतां पूर्वीच्या भानगडींतून मोकळा झाल्यामुळें स्वतंत्रपणें व्यवहार करूं शकेल, दुसरें असें कीं सावकाराच्या अधाशीपणापासून खेडुताचें रक्षण करूं शकेल असें सामर्थ्य—पूर्वी कायद्यांत नव्हतें तें—आतां कायद्याच्या अंगीं आहे.

सावकाराच्या तोफा अशा रीतीनें निकामी झाल्यामुळें, सहकारी पतपेढ्यांकडे शेतकऱ्यांनीं जरूर त्या भांडवलासाठीं जावें ही पद्धत बळावेल, शेतीच्या कामाला अवश्य लागणारें भांडवल स्वस्त व्याजाच्या

दरानें शेतकऱ्यास द्यावयाची दरबारची नेहमींच तयारी असते. सावकाराच्या तडाक्यांतून मोकळा झालेला खेडुत या सवलतींचा नियमितपणें फायदा यापुढें घेऊं शकेल. शिवाय शेतकरी लोकांत शिक्षणाचा प्रसार फारच झपाट्यानें होत आहे. खेडुताचा निरक्षरपणा सावकाराचा आजपर्यंतचा बलिष्ट दोस्त होऊन बसला होता.

या गोष्टींचें महत्त्व योग्यतेपेक्षां अधिक मानलें जाण्याचा संभव आहे. पण शेतकऱ्याच्या कर्जबाजारीचें प्रमाण वाढविणाऱ्या मुख्य कारणांची दुष्ट शक्ति ऋणविमोचनाची योजना व खेडुतसंरक्षक कायदा यांच्या जोडगोळीनें पुरी नष्ट झाली नसली तरी बरीच नरम झाली आहे असें मानावयास वरील गोष्टींचा आधार पुरेसा आहे. निदान भावनगर संस्थानांत शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीची जी सुधारणा घडवून आणलेली आहे ती बहुतांशीं चिरस्थायी होईल अशी आशा करावयास जागा आहे.

अखेरीस हें सांगितलें पाहिजे कीं ब्रिटिश हिंदुस्थानांतील अनेक प्रांतांत कायद्यांनीं सावकारीच्या दुष्ट संस्थेवर उपाय करण्याचा प्रयत्न चालला आहे. जसजसा अनुभव वाढेल तसतसा अधिकाधिक सुपरिणाम असल्या योजनांपासून निर्माण होईल. जें जें करण्यांत येत आहे त्याचें महत्त्व कमी न करतां असा प्रश्न विचारावासा वाटतो कीं खेडुताला मागले बंध तोडून नवी सुरुवात करण्याची संधि दिल्याशिवाय या कायद्यांचे इष्ट परिणाम पुरेपूर कसे घडूं शकतील? तशी नवी सुरुवात करावयाची म्हणजे सावकाराच्या कर्जाचा पूर्ण फडशा झाला पाहिजे. ही जाणीव पुष्कळ ठिकाणीं झाली आहे आणि सावकारांचें आजतागायतचें देणें देऊंच नये अशा तत्त्वाचा प्रचार करण्यांत येत आहे. पण हा मार्ग आर्थिकदृष्ट्या शहाणपणाचा नाहीं.

इष्ट संधि खेडुताला कशी देतां येईल तें दाखविण्याचा मान भावनगर संस्थानचा आहे. भावनगरनें जें केलें तें सर्वच ठिकाणी व्यवहार्य आहे असें नाहीं; भावनगरनें ज्या पद्धतीचा अंगिकार केला त्या पद्धतींत सुधारणाहि करतां येईल. पण एक गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे ती ही कीं या कामीं उदाहरण घालून देण्याचा मान एका देशी राज्यानें पटकावला आणि तें देशी राज्य सुद्धां फारशा मोठ्या संस्थानांतलें नव्हे. दुसरी लक्ष्यांत ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे ऋणविमोचनाच्या योजनेची सबंध कल्पना आणि तिची अंमलबजावणी यांचें सर्व श्रेय कोणा इंग्रज अंमलदाराकडे नसून एका हिंदी गृहस्थाकडे आहे आणि तो हिंदी गृहस्थ ब्राह्मण जातीचा आहे.

आतां, एका लोकोत्तर पुरुषाचें थोडेसें गुणवर्णन मला करूं द्या. सर प्रभाशंकर पट्टणी हिंदुस्थानांतील एक वयोवृद्ध, अनुभवी व दूरदर्शी मंत्री आहेत. हल्लींच्या आणीबाणीच्या कालांत त्यांनीं हिंदुस्थानच्या कार्यक्षेत्रांत घेतलेला भाग लहानसहान नाहीं. आपल्या आशापूर्ण कारकीर्दीची ज्यांनीं नुक्तीच सुरुवात केली आहे ते भावनगरचे तरुण महाराज या सुज्ञ सचिवापासून, या कर्तबगार कारभाऱ्यापासून, या एकनिष्ठ सेवकापासून भावनगरच्या राजाला व प्रजेला किती फायदा झाला हें मोठ्या हौसेनें सांगतील. यांचा आत्मा उदार व दयार्द्र असून देह धर्मगुरुचा आहे असें वाटेल. जगाच्या कल्याणकर्त्यांत यांची गणना आहे. त्यांची प्रकृति सुदृढ नाहीं, शरीरयष्टि कृश आहे, सत्तर वर्षांचें वय झालें आहे, तरीहि त्यांनीं कामांत कुचराई केली नाहीं, ते कामांत कुचराई करणार नाहींत. त्यांच्याबरोबर ज्यानें काम केलें आहे व त्यांना जो चांगल्या रीतीनें ओळखतो त्याच्या दृष्टीनें त्यांचा सर्वांत संस्मरणीय गुण म्हणजे त्यांचा दुर्दमनीय अंतरात्मा होय.

परिशिष्ट आठवें

या लेखाच्या सुरुवातीला कांहीं विचारांचा मी उल्लेख केला आहे. ते विचार पुष्कळ ठिकाणीं पसरलेले असल्यामुळें महत्त्वाच्या ज्या दोन गोष्टी मी नुक्त्याच नमूद केल्या आहेत त्यांचा सूक्ष्म विचार दोन वर्गांच्या लोकांनीं करावा अशी माझी विनंति आहे. पहिला वर्ग, आगामी संयुक्त राज्य-घटनेंत (ऑल इंडिया फेडरेशन) देशी राज्यें कोणचा भाग घेतील याबद्दल साशंक असलेल्यांचा; दुसरा वर्ग, भविष्यकालीं सर्व सत्ता प्रामुख्यानें ब्राह्मणांच्या हातांत जाणार असें गृहीत धरून हिंदुस्थानांतील कोट्यवधि मूक शेतकऱ्यांचें भविष्य काय होणार याबद्दल साशंक असलेल्यांचा. :

परिशिष्ट नववें

वृत्तपत्रें व नियतकालिकें यांचे अभिप्राय

(१)

(सन १९३४ जानेवारीच्या एशियाटिक रिव्ह्यूच्या अंकांत पृ. ८७-१९० वर 'देशी संस्थानांतील प्रगति' या मथळ्याखालीं प्रसिद्ध झालेला मि. जॉन डी ला व्हॅले यांचा लेख.)

भावनगर--शेतकरीऋणविमोचन

अवर्षण व भाव कमी होणें यांचे पायीं हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांवर मधून मधून आपत्ति येते. सावकारापायीं त्यांचेवर येणारी आपत्ति सदाची आहे. भावनगरपुरतें बोलावयाचें झणजे 'होती' असें झटलें पाहिजे कारण अ'तां तेथील परिस्थिति पार पालटून गेली आहे. ही परिस्थिति पालटण्याचा मार्ग नाविन्यपूर्ण, व्यापक स्वरूपाचा व दूरदर्शी असा आहे. सर प्रभाशंकर पट्टणी यांचा ज्या मार्गाशी संबंध आहे तो असाच असावयाचा. हिंदी शेतकऱ्याला कर्जातून बाहेर काढण्याच्या प्रश्नाबद्दल इंडियन सेंट्रल बँकिंग कमिटीनें असें झटलें आहे कीं हा प्रश्न देशाच्या आर्थिक सुस्थितीच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा असून बहुसंख्य लोकांमध्यें असंतोषाचा प्रसार होण्यास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीनेंहि तितक्याच महत्त्वाचा आहे. या कर्जबाजारीकडे दुर्लक्ष्य करणें आणि कोणचाहि उपाय न योजणें हें सर्वांत वाईट धोरण आहे असें शेतकी कमिशननें आपलें मत दिलें आहे. सेंट्रल बँकिंग कमिटीनें दाखविलेल्या मार्गानुसार मध्य-प्रांत, पंजाब व बिहार-ओरिसा या प्रांतांत कांहीं प्रयत्नहि झाले आहेत. परंतु काठेवाडमधील भावनगर संस्थानांत जितका विचार करून हा प्रश्न हातीं घेतला आणि जितकी पूर्ण उपाययोजना केली तितका विचार अगर तशी उपाययोजना अखिल हिंदुस्थानांत अन्यत्र केलेली नाहीं.

सन १९२५ सालीं शेतकऱ्यांच्या कर्जाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं एक कमिटी भावनगर संस्थानांत नेमली गेली तेव्हांपासून या प्रश्नाकडे पद्धतशीर लक्ष्य देण्यांत आलें आहे. या कमिटीनें आपलें काम अत्यंत प्रामाणिकपणें केलें. त्यांनीं सांगोपांग चौकशी करून १९३१ च्या एप्रिल महिन्यांत अतिशय उपयुक्त रिपोर्ट सादर केला. त्यांत केलेल्या शिफारशींना पुरावा व वस्तुस्थिति यांचा आधार होता. त्याच्या आधारें जे उपाय योजले त्यांच्या योजनेच्या बुडाशीं प्रमुख विचार असा होता कीं कर्जाचा बोजा हें रोगाचें फक्त लक्षण आहे, रोगाचीं खरीं कारणें याचेपेक्षां अधिक खोल आहेत. रोगाचें निवारण हा एक संकीर्ण प्रश्न होता, तो तुकड्यातुकड्यांनीं सोडवणें शक्यच नव्हतें, व्यापक योजना करणें जरूर होतें. पूर्णपणें कर्जमुक्त होऊन शेतकरी नवा कोरा संसार करावयास लायक झाल्याशिवाय त्याच्या स्थितींत सुधारणा घडवणें शक्य नव्हतें. पण ऋणमुक्त झाल्याबरोबर जर तो पुनः ऋणपंकांतच पडावयाचा असेल तर त्याला ऋणमुक्त करण्यांत अर्थ नव्हता. आणि ग्रामजीवन बळकटपणें प्रस्थापित झालें नाहीं तर शेतकरी पुनः ऋणपंकांत पडणार हें जवळ जवळ निश्चित वाटत होतें.

शेवटची गोष्ट अशी कीं वाईट सावकारांची जात ही नेस्तनाबूद करण्यालायक दुष्ट संस्था असली तरी शेतकऱ्याला उत्पादक कार्यासाठीं लागणारा पैसा योग्य व्याजानें कोणातरी धनिकाकडून आणावा लागणें ही एक आर्थिक अवश्यकता होती. या प्रश्नाच्या या अंगावर जें लिहिलें जात होतें व बोललें जात होतें त्यांत एक मनोरंजक विचार दृग्गोचर होत होता आणि हा विचार दिवाणबहादूर त्रिवेदी यांनी

मनोवेधक भाषेंत उच्चारिला आहे. त्यांनीं असें म्हटलें आहे कीं ऋणविमोचनाचा मुख्य उद्देश म्हणजे हल्लींची दुष्ट परिस्थिति नष्ट करून सावकार व शेतकरी यांचे सनातन शुद्ध संबंध पुनः जोडून देणें हा होय. पुष्कळ शतकांपूर्वी भावनगरमध्यें सावकार शुद्ध होते, म्हणजे ते शेंकडा बारा टक्यापेक्षां अधिक व्याज घेत नसत आणि पागडी दलाली इत्यादि लादून मूळ मुद्दल अगदीं थोड्या कालांत दुप्पट अगर तिप्पट वाढवीत नसत.

भावनगर संस्थानच्या स्टेटकौन्सिलनें ज्या योजना केल्या त्यांत पहिली योजना खेडुतसंरक्षक कायद्याची होय. महाराष्ट्रांत अशा तऱ्हेचा एक कायदा अंमलांत होता त्यांत स्थानिक परिस्थितीप्रमाणें जरूर ते फेरफार करून तो भावनगर संस्थानांत लागू केला. पण या कायद्याचा उपयोग प्रतिबंधक स्वरूपाचा होता. कर्जाचा फार्जील बोजा मात्र यामुळें कमी करतां येण्याजोगा होता. दुसरी योजना म्हणजे ऋणविमोचनाची होय. या योजनेनें सर्व कर्जाचा एका सटक्यासरशीं फडशा करून खेडुताला नवा कोरा व्यवहार सुरू करावयास मोकळा केला. या योजनेच्या मुळाशीं एक विचार होता आणि तो पूर्णपणें समर्थनीय होता. तो असा कीं शेतकरी जवळजवळ नादार होता व जर त्याला कायद्यानें नादार म्हणून जाहीर केला तर सावकाराला त्याच्या मालमत्तेंतून कर्जाच्या रुपयांतली पै सुद्धां मिळाली नसती. ऋणबद्ध खेडुतांना जर कांहीं रास्त रक्कम दरबारनें दिली आणि तेवढी रक्कम खेडुतांनीं सावकारांच्या सर्व कर्जाच्या पूर्ण फेडीखातर दिली, तर स्वहितरक्षणार्थ सावकार ती स्वीकारावयास तयार होतील आणि स्वतांचें कल्याण करतील व शेतकऱ्याला आर्थिक दृष्ट्या मार्गावर आणण्याचे कामीं दरबारला मदत करतील असें मानण्यांत येत होतें.

सावकाराच्या कर्जाची तडजोड सावकारास मूळ मुद्दल आणि शेंकडा बारा टक्के सरळ व्याज इतकें देऊन करावयाची असा नियम साधारणतः ठरवलेला होता. दरबारनें दिलेल्या भांडवलावर शेतकऱ्यानें शेंकडा चार टक्के व्याज द्यावें व तें व्याज जमीन महसुलाबरोबरच वसूल करावें असें ठरलें. हा बोजा अगदींच क्षुल्लक होता. सुरुवातीला सावकारांनीं नाखुषी दर्शवली पण नंतर योजना ग्राह्य ठरली. सन १९३३ च्या मार्च महिन्यापर्यंत संस्थानचा अर्धा जमीनमहसूल देणारे खेडुत ऋणमुक्त झाले. त्याच वर्षाच्या आगष्ट महिन्यांत तीन चतुर्थांशाहूतका जमीनमहसूल देणारे खेडुत ऋणमुक्त झाले. आणखी थोड्या महिन्यांत उरलेले ऋणबद्ध खेडुत मुक्त होतील. भावनगर दरबारच्या कारभाराची कोणालाहि प्रशंसा करावयास लावील एवढें हें महत्त्वाचें कार्य आहे.

या कार्यासाठीं लहान लहान रकमांच्या कर्जाची संपूर्ण पूर्वपीठिका हुडकून काढावी लागली. सर्व कर्जाची बेरीज साठ लक्ष रुपये असून त्याच्या फेडीखातर भावनगर दरबारनें पंधरा लक्ष रुपये दिले. याचेखेरीज संस्थाननें एकोणीस ते वीस लक्ष रुपये साऱ्याची बाकी तुंबून राहिली होती तिची सूट दिली. या तडजोडीमुळें संस्थानांतील कर्जबाजारी असलेल्या तीन चतुर्थांश शेतकऱ्यांची कर्जातून मुक्तता झाली. शिवाय, सावकाराच्या व्याजाचा दर शेंकडा पंचवीस अथवा त्याहूनहि अधिक असे या दृष्टीनें पाहतां केवळ व्याजापायीं शेतकरी जी रक्कम देत असत त्यांत साडेचार लक्ष रुपयांची सालीना बचत झाली. जमीनमहसुलाच्या संबंधांतहि सर प्रभाशंकर पट्टणींची भूतदया दिसून आली. त्यांच्या नजरेस असें आलें होतें कीं शेंकडा पन्नासपेक्षां अधिक शेतकरी प्रामाणिक होते आणि त्यांनीं विनाकारण कर्ज मुळींच काढलें नव्हतें. ज्यांच्या डोक्यावर कर्जाचा बोजा नव्हता आणि ज्यांच्याकडे साऱ्याची बाकी सुद्धां तुंबली नव्हती अशा या लायक शेतकऱ्यांच्या फायद्यासाठीं पीकपाणी नीट न आल्यामुळे त्यांना

जेवढ्या साऱ्याची तहकुबी दिली होती तेवढ्याची अजीबात सूट त्यांना बक्षीस म्हणून देण्यांत आली कांहीं न्यायाचे प्रकार असे असतात कीं लोकशाही त्या प्रकारचा न्याय देऊं शकत नाहीं. ज्या राज्यव्यवस्थेंत लायकीप्रमाणें निरनिराळ्या व्यक्तीना निरनिराळ्या तऱ्हेनें वागवणें शक्य असतें अशा राज्यव्यवस्थेचे सद्गुण दाखवण्याकरतां हिंदुस्थानांत देशी राज्यांचें अस्तित्व अजून आहे हें चांगलें आहे.

शेतकरी ऋणमुक्त झाला, भविष्यकालीं होऊं शकणाऱ्या सावकाराच्या जुलमापासून त्याचें रक्षण झालें; पण गांव म्हणजे एक उच्च दर्जाची संघटना बनवावयाचें काम अजून झालें नव्हतें याकरतां ग्रामपंचायतीचा कायदा करण्यांत आला. या कायद्याचा उद्देश म्हणजे स्थानिक स्वायत्ततेच्या पायावर सबंध ग्रामजीवनाची पुनःप्रतिष्ठा होय. ज्या गांवाकडून तशी मागणी येईल त्या गांवाला जमीनमहसूल वसूल करण्याची पद्धति व नियमावलि ठरवण्याचा अधिकार देण्याची व्यवस्था या कायद्याखालीं करण्यांत आली. सारा न देणाऱ्या खेडुतांची जमीन जप्त करून लिलांवानें विकण्याचा, अशा कारणें जमिनीची विक्री झाली असतां होणारा फायदा पंचायतीच्या उपयोगासाठीं जमा करून ठेवण्याचा, आणि अशा रीतीनें बरींच रक्कम जमा झाल्यास खेडुतांना जरूर लागेल तेव्हां शेतीच्या कामासाठीं त्यांतून कर्जाऊ रकमा देण्याचा–हे अधिकारहि पंचायतींना देण्यांत आले. पंचायतीच्या कायद्यांत आणखीहि कलमें आहेत, त्यांचा विचार करतां हा कायदा शिक्षणाचा प्रसार करणारा आणि प्रजेच्या स्थितींत सुधारणा करणारा आहे असें कबूल करावें लागेल.

सावकार व खेडुत यांचे चांगले संबंध जुळवण्यापेक्षांहि शेजारींशेजारीं रहाणाऱ्या खेडुतांचे एकमेकांशीं स्नेहाचे संबंध जोडणें कठीण आहे. यामुळें स्थानिक स्वराज्य स्थापण्याच्या योजनेची प्रगति अत्यंत मंद होत आहे. तरी पण ज्या सर्व सुधारणा झाल्या आहेत त्यांचा समवायानें भावनगरच्या जनतेवर सुपरिणामच होणार. शिवाय इतर संस्थानांना व, ज्या ब्रिटिश प्रांतांत अशीच दुरवस्था असून इतक्या मोठ्या प्रमाणांत उपाययोजना होऊं शकली नाहीं, त्या प्रांतांना भावनगरचा प्रयोग म्हणजे एक अभ्यास करण्यालायक धडा होऊन बसला आहे.

---

(२)

(भावनगर सेन्सस रिपोर्ट संबंधीं मि. जॉन डी ला व्हॅले यांचा जुलै १९३३ च्या एशिॲटिक रिव्ह्यूच्या अंकांत पृ. ५४० वर लेख प्रसिद्ध झाला आहे त्यांतील उतारा.)

भावनगर—अलीकडील प्रगति

सन १८८१ सालीं एकंदर लोकसंख्येंत शहरांतील लोकसंख्या शेंकडा २६.८ इतकी होती, आतां ती ३०.५ झाली आहे. तरीसुद्धां शेतकऱ्याचा जीवनाचा लढा कमी त्रासदायक झालेला नाहीं आणि त्याच्यावरचा कर्जाचा बोजा ज्यास्तच जड झाला आहे. कर्जाच्या प्रश्नाची चौकशी करण्याकरतां एक कमिटी नेमण्यांत आली होती तिनें सुंदरसा रिपोर्ट सादर केला आहे. त्या रिपोर्टांत दिसून येणारें चित्र चिंताजनक आहे. शेतकऱ्यांपैकीं फक्त निम्मे शेतकरी कर्जांत नव्हते आणि शेंकडा तीस शेतकरी कर्जांत आकंठ बुडालेले होते, त्यांचेमुळें तर फारच घोर चिंता उत्पन्न होत होती. साधारणपणें रिपोर्टांतल्या शिफारशी रिपोर्टांतच रहातात, पण भावनगरमध्यें तसें झालें नाहीं. शेतकऱ्याची सावकाराच्या

कचाट्यांतून सुटका झाली पाहिजे आणि सावकारालाहि येण्य मोबदला दिला पाहिजे या तत्त्वावर भावनगरमध्यें हा प्रश्न सोडवला गेला. खेडुत व सावकार यांनीं मिळून विनंति केल्यास डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट्स रिलीफ ॲक्टास अनुसरून केलेल्या नियमान्वयें खेडुतांच्या डोक्यावरील कर्ज किती आहे याचा निर्णय करण्याची व्यवस्था झाली. दर्शनी देणें योग्य प्रमाणांत उतरविलें आणि सर्व सावकारांना दरबारनें आणेवारीनें तडजोडींत रकमा दिल्या. ज्यावेळीं सेन्सस रिपोर्ट छापखान्यांत छापावयास पाठवला त्यावेळीं तीन जिल्ह्यांतले खेडुत कर्जमुक्त झालेले होते, आणि त्यांच्या डोक्यावर पडणारा दरवारी देण्याचा भारहि फार मर्यादित केलेला होता. इतर जिल्ह्यांत यासंबंधीं काम चालू आहे. भावनगर दरबारच्या या विधायक व धाडशी धोरणाचा शेतकऱ्यांच्या स्थितीवर सुपरिणाम झाल्याशिवाय केव्हांहि रहाणार नाहीं.

---

(३)

(सन १९३२ फेब्रुआरी ता. २ च्या टाइम्स ऑफ इंडियाच्या अंकांतील लेख.)

कर्जबाजारीस आळा

भावनगर संस्थानच्या राज्यकारभाराचा रिपोर्ट नेहमींच बोधप्रद असतो, कारण अलीकडे बरींच वर्षें तें काठेवाडांतील एक नमुनेदार संस्थान झालें आहे. अगदीं अलीकडे जो रिपोर्ट प्रसिद्ध झाला त्यांत एका योजनेचें वर्णन करण्याकडे बरेंच लक्ष्य दिलेलें आहे. सावकारांनीं शेतकऱ्यांना दिलेलें अव्वल खरें कर्ज आणि रास्त व्याज सावकारांना देऊन शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्याची ही योजना होय. शेतकरीसंरक्षक कायद्याला ही योजना पूरक ह्मणून केलेली आहे आणि सबंध देशाचें लक्ष्य या योजनेनें ओढून घेतलेंच पाहिजे अशा तऱ्हेनें तिला कसोटी लावण्यांत आली आहे. संस्थानांतील कांहीं भागांतल्या शेतकऱ्यांनीं व सावकारांनीं आपल्या देण्याघेण्याची तडजोड करावी ह्मणून दरबारकडे अर्ज केले आणि त्या अर्जांचा निकाल करण्यासाठीं अंमलदार व सावकारांचे प्रतिनिधि यांची कमिटी बसविण्यांत आली, सावकारांच्या चोपड्यांप्रमाणें कर्जाची रक्कम रु. ३,५९,७०२ भरली. घालून दिलेल्या नियमांप्रमाणें देण्याची खरीखुरी रक्कम रु. १,८४, ५०७ ठरली, अखेरीस ही रक्कम रु. १,०२,७४७ वर आणण्यांत आली. रिपोर्टांत ह्मटल्याप्रमाणें सगळ्या शेतकऱ्यांना पूर्णपणें ऋणमुक्त करून त्यांना अगदीं कोरे व्यवहार करण्याची संधि देण्याचा हा अपूर्व प्रयत्न आहे. याकरतां भांडवल बरेंच लागे ल आणि या प्रयत्नांत कांहीं बूड येणें अपरिहार्य आहे. पण या प्रयत्नाच्या बुडाशीं जे उच्च आणि उपकारी हेतु आहेत त्यांच्यापुढें तुलना करतां ही बूड विशेष नाहीं आणि तेवढी सोसण्याची तयारी ठेवलीच पाहिजे

ही योजना इतर भागांत पसरविण्याच्या कामीं कमिटी गुंतली आहे. सबंध संस्थानांत या योजनेचे परिणाम काय झाले हे आपणांस येत्या वर्षीच्या रिपोर्टांत दिसेल. शेतकऱ्यांना कर्जबाजारीच्या तडाक्यांतून सोडवण्यासाठीं कांहीं तरी करण्यांत जे जे गुंतलेले आहेत त्यांना तो रिपोर्ट फारच उपयुक्त ठरेल. भावनगर संस्थानांतली दुसरी संस्मरणीय सुधारणा ह्मणजे ग्रामपंचायतीची स्थापना. महाराज वयांत यावयाच्या पूर्वीच्या दहा वर्षांत फक्त तीन गांवांत पंचायतींची स्थापना झाली. खेडेगांवच्या एकंदर आर्थिक जीवनाचा प्रश्न हातीं घेतल्याशिवाय फक्त शेतकऱ्याच्या कर्जाचा प्रश्न सोडवणें शक्य नाहीं

ह्मणून दरबारनें सत्तावीस लक्ष रुपयांचा ग्रामसुधारणाफंड उभा केला आहे, त्यामुळें स्वतांचा कारभार पहाणाऱ्या गांवांची संख्या झपाट्यानें वाढली पाहिजे. स्वयंनिर्णय व स्वायत्तता एके ठिकाणीं आणून सुशिक्षण देणारी योजना ह्मणजेच ग्रामपंचायत; हीं दोन तत्त्वें खेडगांवच्या जीवनांत आणून सोडण्याची कामगिरी भावनगर संस्थाननें केल्यास संस्थानला त्याबद्दल जरूर अभिमान वाटला पाहिजे.

---

(४)

खेडेगांवांत स्वराज्य

(भावनगर संस्थानच्या १९२९-३० च्या ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्टाचें परीक्षण करणारा लेख "युनायटेड इंडिया अँड इंडियन स्टेट्स्"च्या १३ फेब्रुआरी १९३२ च्या अंकांत प्रसिद्ध झाला त्यांतील उतारा.)

जमीनमहसुलाच्या बाकीचा प्रश्न भावनगर संस्थानांत पुष्कळ दिवस बिकट होऊन बसला होता. त्या बाकीपैकीं बरीच रक्कम वसूल होणें शक्य नाहीं हें पाहून त्या रकमेची अजीबात सूट देऊन भावनगर दरबारनें हा प्रश्न निकालांत काढला हें समजून आम्हाला आनंद झाला. हा निकाल या पूर्वीच व्हावयाचा पण भावनगरचे राजे अज्ञान असल्यामुळें त्याला इतका विलंब लागला. शेतकरी संस्थानच्या भरभराटीचा आत्मा आहे आणि शेतकऱ्याला अवश्य असलेला हा निकाल यावेळीं झाल्यामुळें शेतकऱ्याला त्याचें महत्त्व फारच वाटणार आहे. तुंबलेल्या बाकीपैकीं ज्या रकमेची सूट दिलेली नाहीं तेवढ्या रकमेची महाराजांनीं संस्थानच्या खेडुतांना देणगी दिली आहे. या रकमेचा विनियोग ग्रामसुधारणा फंड उभारण्याकडे व्हावयाचा आहे. या फंडाचा कारभार ग्रामपंचायतीकडे राहील व त्याचा उपयोग गांवकऱ्यांच्या सुखसोयीसाठींच होईल. यावर्षी शेतकऱ्यांच्या हितासाठीं केलेली दुसरी गोष्ट ह्मणजे शेतकरीसंरक्षक कायदा होय. या कायद्यासाठीं सावकाराला मूळ मुद्दल व रास्त व्याज देऊन शेतकऱ्याच्या कर्जाचा निकाल करण्याचा अधिकार कोर्टांना दिलेला आहे. लिलिया महालांतल्या सावकारांच्या चोपड्या पहातां शेतकऱ्यांच्या डोक्यावर असलेल्या दर्शनी कर्जाचा आंकडा रु. ३,५९,७०२ भरला; कमिटीनें नव्या नियमांप्रमाणे छाननी करून कर्जाचा रास्त आंकडा रु. १,८४,५०७ ठरवला. शेतकऱ्यांच्यावर जेवढ्या रकमेचा खराखुरा बोजा कमिटी ठरवील तेवढी रकम दरबारनें सावकारांना द्यावयाची याप्रमाणें लिलिया महालांतील शेतकऱ्यांच्या कर्जाच्या तडजोडीसाठी दरबारनें रु. १,०२,७४७ ची रक्कम दिली. सगळ्या शेतकऱ्यांना सरसहा ऋणमुक्त करून त्यांना अगदीं कोरे व्यवहार करण्याची संधि देण्याचा हा प्रयत्न अपूर्व आहे असें जें रिपोर्टांत म्हटलेलें आहे तें खरें आहे ग्रामपंचायतींचा कायदा करून जाहीर केलेला आहे. या कायद्याप्रमाणें अमुक अटी पुऱ्या करणाऱ्या गांवांत पंचायतींची मागणी करतां येते, आणि पंचायतींची स्थापना ज्या गांवांत होईल त्या गांवांत बाहेरचें नियंत्रण कमींत कमी होऊन गांवचा कारभार ज्यास्तींत ज्यास्त प्रमाणांत गांवकरी लोकांच्या हातांत जाईल. स्थानिक स्वायत्तादर्शक पुष्कळसे अधिकार पंचायतीला या कायद्यांतील कलमांखालीं देण्याजोगे आहेत आणि या कायद्याचे परिणाम काय होतात इकडे संस्थानाबाहेरच्या लोकांचे डोळे लागून राहिले आहेत. शेतकरीवर्गाची स्थिति सुधारण्याची दरबारची इच्छा हाच रिपोर्टाचा मुख्यध्वनि आहे.

---

(५)

(ता. १४ एप्रिल १९३२ च्या टाइम्स ऑफ इंडियांत प्रसिद्ध झालेला लेख.)

शेतकऱ्यांचें ऋणविमोचनः भावनगरची योजना

ऋणविमोचनाच्या योजनेची प्रगती

ता. २ फेब्रुआरी १९३२ च्या टाइम्स ऑफ इंडियाच्या अंकांत 'कर्जबाजारीस आळा' या शीर्षकाखालीं एक लहान अग्रलेख प्रसिद्ध झाला त्यांत भावनगर संस्थानच्या १९२९-३० च्या ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्टाचें परीक्षण केलेलें होतें. लेखाचें 'कर्जबाजारीस आळा' हें शीर्षक अत्यंत युक्त आहे कारण त्या लेखांत आपण भावनगर संस्थानांत जी सामुदायिक ऋणविमोचनाची योजना अमलांत येत आहे तिच्याकडे जोरानें लक्ष्य खेंचलें आहे. आंकड्यांचा उल्लेख करतांना आपण लिहिलें कीं रु. ३,५९,७०८ च्या कर्जाची तडजोड रु. १,०२,७४७ देऊन करण्यांत आली. हें आंकडे लिलिया महालांतील पांचतळावडा टप्यांतल्या बारा गांवांबद्दलचे आहेत. तो रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतर त्या योजनेची पुष्कळच ज्यास्त प्रगति झाली आहे. आतां लिलिया महालांतील सर्व म्हणजे ३६ गांवांत आणि उमराळा महालांतील सर्व म्हणजे ५३ गांवांत त्या योजनेचा अंमल होऊन कर्जबाजारी नष्ट झाली आहे. हळ्ळी गढडा महालांतील २५ गावांतलें काम पुरें होण्याच्या बेतांत आलें आहे.

फेडलेलें कर्ज

लिलिया व उमराळा महालांत नोंदलेल्या खातेदारांची संख्या ५११३१ असून ते रु. ६,४३,५४२ सालीना सारा देतात. इतक्या सर्व खेडुतांच्या सर्व कर्जाची तडजोड करून टाकलेली आहे. सावकारांच्या चोपड्यांत त्यांच्या नांवावर निघणारें दर्शनी कर्ज रु. १७,९८,७८४ होतें. याचे फेडीखातर दरबारनें खेडुतांच्या वतीनें रु. ४,६२,६४४ सावकारांना देऊन कर्जाचा निकाल करून टाकला.

सावकारांच्या चोपडयांत दिसणारे कर्जाचे आंकडे व्याज, पागडी वगैरेच्यामुळें वाढलेले असतात, अव्वल कर्जाचे आंकडे फारसे नसतात. याशिवाय दर्शनी कर्ज कमी करण्याचें आणखी एक कारण म्हणजे शेतकऱ्याची शक्ति व पत फारच मर्यादित असते हें होय. दर्शनी कर्ज इतकें कमी केलें तरी सुद्धां कर्जबाजारीनें सदा ग्रस्त अशा खेडुत वर्गाकडून अनेक वर्षांत जेवढी रक्कम सावकारांना स्वतंत्रपणें वसूल करतां आली नसती इतकी रोकड रक्कम एका हप्त्यानें सावकारांना या योजनेमुळें मिळाली असें जें अन्य ठिकाणीं म्हटलेलें आहे तें पूर्णपणें खरें आहे.

शेतकऱ्यांचा फायदा

या योजनेपासून शेतकऱ्यांचा झालेला फायदा वरवर दिसून येतो. या दोन महालांतील दिवाणी कोर्टांत खेडुताच्या विरुद्ध देण्याघेण्याची फिर्याद अगर दरखास्त एकहि चालू नाहीं. खेडुतांची स्थिती सुधारल्यामुळें सरकारसारा सहज व वाढत्याप्रमाणांत वसूल होत आहे. लिलिया महालाचेंच उदाहरण घेतलें तर, शेतकरी कर्जाच्या बोजाखालीं दबलेले असते तर जो वसुल होऊं शकला असता त्यापेक्षां निदान चार ते सहा आणे ज्यास्त वसूल यंदा होईल; केवळ स्वहिताच्या दृष्टीनें पाहिलें तरी ऋणमुक्त शेतकरी वर्ग संस्थानला फार फायदा देणारा आहे. शेतकरीवर्गाला ऋणमुक्त करावयास कांहीं कारण पाहिजेच असेल तर सारा वसुलींतली सुधारणा हें एकच कारण पुरेसें आहे.

व्याजांत बचत

या योजनेमुळें शेतकऱ्याला आणखी होणारा फायदा म्हणजे त्याला द्याव्या लागणाऱ्या व्याजाच्या रकमेंत साडेचार लक्ष रुपयांची बचत झाली हा होय, ही रक्कम व्याजाचा दर शेंकडा पंचवीस धरून निघते. पण संस्थानांत यापेक्षांहि जबर व्याज घेणारे सावकार आहेत. व्याजाचा दर शेंकडा पंचवीसच आहे असें गृहीत धरलें तर दरसाल जेवढी रक्कम केवळ व्याजाखातर सावकराला द्यावी लागत होती तेवढया रकमेंत शेतकऱ्यांच्या एकंदर कर्जाची तडजोड या योजनेमुळें झाली.

हिशोब तपासून तडजोडीसाठीं द्यावयाची रक्कम किती हें ठरवण्यासाठीं सुरुवातीस एकच कमिटीची नेमणूक झाली होती. कालांतरानें इतर महालांतील सावकार व शेतकरी यांचेकडून योजना लागू करण्याबद्दल अर्ज येऊं लागले, यामुळें आणखी तीन कमिट्यांची नेमणूक झाली आणि यापुढेंहि आणखी अर्ज आल्यास कमिट्यांची संख्या वाढवावी लागेल.

---

(६)

(ता. १४ मे १९३२ च्या 'युनायटेड इंडिया अँड इंडियनस्टेटस' च्या अंकांत आलेला अग्रलेख.)

शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा
भावनगर संस्थानांतील प्रयोग

आमच्या ता. १३ फेब्रुआरी १९३२ च्या अंकांत भावनगर संस्थानच्या ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्टाबद्दल लिहितांना संस्थानांतील शेतकऱ्यांना सावकारांच्या कर्जांतून मुक्त करण्याचा जो प्रयोग चालू आहे तिकडे आम्ही जनतेचें लक्ष खेंचलें. भावनगर संस्थानांतील शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा शेतीच्या धंद्याच्या भरभराटीच्या आड येणारा धोंडा असून, या गोष्टीकडे आम्ही या पत्रांत वारंवार लक्ष्य ओढीत होतों भावनगरच्या अधिकाऱ्यांचें इकडे बरेच दिवस लक्ष्य वेधून राहिलें होतें असें आह्मास वाटतें. कांहीं कांहीं गांवांत व्याजाचे दर इतके भयंकर होते कीं एक वर्षांत कर्जाऊ दिलेल्या रकमेच्या चार किंवा सहापट रकमेचे हुकुमनामे कोर्टाकडून सावकारांना मिळाल्याचे दाखले सांपडले. पुष्कळशा गांवीं लोकांची आर्थिक स्थिति फारच खालावली आणि त्यामुळें लोकांच्या रहाणीचें मान तर खालावलेंच पण शेतकऱ्याला दरवारी सारा भरण्याचें सामर्थ्य न राहिल्यामुळें जमीन महसुलाची सुद्धां पुष्कळशी बाकी तुंबून राहिली व अशा रीतीनें दरबारचेंहि नुकसान होऊं लागलें. कांहीं खेडुतांच्याकडून यासंबंधीं एक अर्ज दरबारकडे आला, त्यासंबंधीं एक रिपोर्ट रेव्हेन्यू कमिशनरनें सादर केला. तो रिपोर्ट विचारांत घेऊन दरबारनें एक चौकशी कमिटी नेमली. दिवाणबहादूर त्रिभोवनदास कालिदास त्रिवेदी यांची अध्यक्षस्थानीं नेमणूक झाली आणि सर न्यायाधीश मि. भास्करराव मेहता व रेव्हेन्यू कमिशनर मि. बी. एन्. गोहेल हे त्या कमिटीचे सभासद होते. अध्यक्षांनीं केलेल्या प्राथमिक पहाणींत भयप्रद वस्तुस्थिति दृष्टोत्पत्तीस आली. कर्जबाजारीमुळें शेतकऱ्यांचे हाल होत होते आणि त्यांचेवर जुलुम होत होता या गोष्टी निःसंशय सिद्ध झाल्या. बहुतेक खेड्यांत शेतकऱ्यांचे जवळ शेतीला लागणारी सामुग्री नव्हती, आणि कांहीं शेतकरी असे होते कीं त्यांचे स्वतांचे बैल नसल्यामुळे त्यांच्या जमिनींच्या नांगरणीसाठी देखील त्यांच्या कपाळां परावल-

बन आलें होतें. मजुरीचे दर वाढल्यामुळें शेतीचा खर्चहि वाढत होता. रिपोर्टांत नमूद केल्याप्रमाणें कांहीं कांहीं गांवांत उभड (ह्मणजे शेतांतील मजूर) शेताच्या मालकापेक्षां सुस्थितींत असून, कांहीं थोड्याशा मजुरांनीं तर शेतकऱ्यांला कर्जाऊ पैसे दिले होते. प्राथमिक पहाणींत जें चिंताजनक दृश्य दिसलें त्यामुळे सबंध संस्थानची व्यापक चौकशी केली पाहिजे हें स्पष्ट झालें. तशी चौकशी करण्याचा हुकूम झाला. अतिशय परिश्रमपूर्वक चौकशी झाली आणि संस्थानांतील शेतकऱ्यांच्या कर्जाच्या प्रश्नावर अधिकारी निर्णयासह व्यापक व सांगोपांग रिपोर्ट कमिटीनें सादर केला. लगेच कार्यहि सुरू झालें. कमिटीच्या चौकशीमुळें खेडुतांची जी अवस्था दृष्टोत्पत्तीस आली ती गंभीर आहे हें कौन्सिलला पटलें. कौन्सिलचे प्रेसिडेंट सर प्रभाशंकर पट्टणी यांची खात्री झाली कीं जर भविष्यकाळीं मोठ्या प्रमाणांत शेतकऱ्यांचा दंगा व्हावयास नको असेल तर कर्जाच्या बोजाखालीं दबलेल्या व नादारीच्या निकट आलेल्या शेतकऱ्याला आर्थिक आरोग्य प्राप्त करण्यासाठीं ताबडतोब उपाय योजना झाली पाहिजे. जबर व्याजाचें कर्ज आणि भविष्यकालांत सुडाच्या भावनेनें प्रेरित झालेल्या सावकाराकडून होऊं शकणारें नुकसान या दोहोंपासून खेडुताला बचावण्यासाठीं ' खेडुत-संरक्षक-कायदा ' पास करण्यांत आला. उभय पक्षीं झालेल्या देण्याघेण्याचा व्यवहार सुरूवातीपासून तपासण्याचा, हिशोबाच्या चोपड्या तपासण्याचा, आणि सर्व गोष्टी लक्ष्यांत घेऊन ठरवलेली हुकुमनाम्यांची रक्कम हप्तेबंदीनें देवविण्याचा अधिकार या कायद्यान्वयें कोर्टास देण्यांत आला. हिशोब तपासण्यासाठीं आणि आपण सावकाराचें काय देणें लागतों हें कार्टाकडून ठरवून घेण्यासाठीं दावा करण्याचा हक्क खेडुतांना मिळाला. हा कायदा शेतकऱ्याला हितप्रद आहे आणि भावनगर संस्थानांत व्याजबट्ट्याचे प्रकार असाधारण असल्यामुळें या कायद्यांतील असाधारण नियम रास्त होते. सावकारांनीं हिशोब ठेवण्याच्या कामीं ज्या लबाडीच्या व गुंतागुंतीच्या पद्धतींचा अवलंब केला होता त्यांना कसा आळा घालतां येईल यासंबंधें अनेक विधायक सूचना दिवाणबहादूर त्रिभोवनदास कालिदास त्रिवेदी यांनीं आपल्या व्यापक व माहितीनें भरलेल्या मिनीटमध्यें केल्या आहेत. ही मिनिट रिपोर्टाच्या बरोबरच परिशिष्ट सातवें म्हणून प्रसिद्ध केलेली आहे शेतकरी-संरक्षक कायदा शेतकऱ्याला कांहीं तरी फायदा व्हावा याकरतां केलेला आहे. डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट्स् रिलीफ ॲक्टच्या अनुरोधानें भावनगर संस्थाननें हा कायदा केला आणि अगोदरच्या कायद्यापेक्षां भावनगरच्या कायद्यांत ' शेतकरी ' या शब्दाची व्याख्या ज्यास्त स्पष्ट केलेली आहे. पण हा कायदा नुकसान प्रतिबंधक मदत करूं शकेल असा होता आणि केवळ प्रतिबंधक मदतीनें प्राप्त परिस्थितींत भागण्याजोगें नव्हतें. म्हणून या कायद्याच्या जोडीला कौन्सिलनें ऋणविमोचनाची योजना मंजूर केली. या योजनेचा परिणाम म्हणजे शेतकरी आपल्या कर्जाचा बोजा झुगारून देऊन नवे करकरीत व्यवहार करावयास समर्थ व्हावा हा होय. सावकार जर अव्वल मुद्दल आणि नेमस्त व न्याय्य व्याज एवढें घेऊन सर्व कर्जाची फेड झाली अशी कबुली द्यावयास तयार असेल तर सावकारास द्यावी लागणारी रक्कम कर्जांत असलेल्या दर एक खेडुताच्या वतीनें दरबार द्यावयास तयार होईल हें या योजनेंतील तत्त्व होय. कोणच्याहि महालांतील खेडुत व सावकार यांपैकीं निम्म्यापेक्षां अधिकांनीं ही योजना लागू करण्याची विनंति करावी, आणि अशी विनंति केल्यानंतर दरबारनें कर्जाचा निकाल करण्यासाठीं दोन अधिकाऱ्यांची कमिटी नेमावी. त्या महालांतील सावकारांनीं निवडलले दोन इसम कमिटीचे सभासद नेमले जावे आणि दरबारी अधिकाऱ्यांनीं ज्या गांवांतील कर्जाबद्दल चौकशी चालावयाची त्या गांवांतील एक किंवा दोन प्रतिष्ठित गृहस्थ निवडून त्यांना कमिटींत सामील करून घ्यावें. कमिटीनें दिलेला निकाल आपण पूर्णपणें माना-

वेयास बांधलेले आहों अशी कबुली सावकार व खेडुत या दोघांनींहि दिली पाहिजे. कर्जाची खरी रक्कम कमिटी ठरवील आणि तेवढी रक्कम दरबार सावकाराला देईल. ऋणमुक्त झालेल्या खेडुतानें आपला पिकाचा वांटा घेऊन बाकीचें पीक सरकारी खळावाडीवर आणलें पाहिजे. भागबटाई पद्धती-प्रमाणें जें सरकारला द्यावयाचें तें, तगाईच्या फेडींत द्यावयाचें तें, आणि ऋणविमोचनासाठीं दरबारनें दिलेल्या पैशाच्या फेडीपोटीं द्यावयाचें तें–इतकें सर्व देणें खळावाडीवर आणलेल्या पिकांतून वसूल केलें जाईल. आजतागायत ही योजना लिलिया व उमराळा या दोन महालांना लागू झाली आहे. पहिल्या महालांत ३६ व दुसऱ्यांत ५३ गांव आहेत. या दोन महालांत रु. ६,४३,५४२ सालीना सारा भरणारे ५११३१ नोंदलेले खातेदार आहेत आणि त्या सर्वांनीं या योजनेचा लाभ घेतला आहे. सावकारांच्या चोपड्यांप्रमाणें या शेतकऱ्यांच्या नांवावर एकंदर कर्ज रु. १७,९८,७८४ होतें, यांत मूळ मुद्दलाच्या जोडीस व्याज, पागडी, दलाली वगैरे गोष्टी होत्या. कर्जाच्या तडजोडीसाठीं भावनगर दरबारनें खेडुतांच्या वतीनें रु. ४,६२,६४४ दिले. या योजनेमुळें सावकारावर कांहीं बोजा पडतो असेंहि नाहीं कारण कर्जबाजारीनें सदा पिडलेल्या खेडुतवर्गाकडून अनेक वर्षांत जेवढी रक्कम स्वतंत्रपणें सावकारांना वसूल करतां आली नसती इतकी–आणि तीहि रोकड–रक्कम एका हप्त्यानें सावकारांच्या पदरांत पडली.

या दोनहि महालांतील खेडुतांचा या योजनेमुळें फायदा झाला. दिवाणी कोर्टांत खेडुतांविरुद्ध देण्याघेण्याचा दावा अगर दरखास्त एकहि चालू नाहीं. संस्थानलाहि फायदा आहे कारण ऋणविमोचनामुळें सरकारसारा झटपट वसूल होऊं लागला आहे. लिलिया महालाकडे पाहिलें तर, कर्जाच्या बोजाखालीं शेतकरी दबलेलें असते तर जो वसूल होऊं शकला असता त्यापेक्षां निदान चार ते सहा आणे ज्यास्त वसूल यंदां होईल असें समजतें. शेतकरीवर्गाला ऋणमुक्त करावयास कांहीं कारण पाहिजेच असेल तर सारावसुलींतील सुधारणा हें एकच कारण पुरेसें आहे. व्याजाचा दर शेंकडा २५ टक्के धरला तर केवळ व्याजाच्या खातीं शेतकरीवर्ग सालीना साडेचार लक्ष रुपयांची बचत करील. ही योजना लोकप्रिय झाली आहे आणि अन्य महालांतून या योजनेच्या बजावणीची मागणी करण्यांत आली आहे. हिशोबतपासणीसाठी एक प्रथम कमिटी नेमली होती. दुसऱ्या महालांतून मागणी आल्यामुळें आणखी तीन कमिट्या नेमल्या आहेत आणि सर्व महालांतली मागणी आल्यावर आणखी कमिट्या नेमाव्या लागतील. लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशीं शेतकऱ्यांच्या कर्जाचा अंत करण्याचा भावनगर दरबारनें जो बहादुरीचा प्रयत्न केला आहे त्याची ही हकीकत वाचणाराला ज्ञानप्राप्ति होईल व कौतुक वाटेल, कारण कर्जबाजारी शेतकऱ्याचा प्रश्न फक्त भावनगरपुरताच आहे असें नाहीं. हा प्रश्न हिंदुस्थानभर किंबहुना जगभर आहे, आणि जे कांहीं निवारक उपाय योजण्यांत आले ते अगदींच अल्प प्रमाणांत यशस्वी झाले आहेत. भावनगरमधील हा प्रयत्न फार मोठ्या प्रमाणावर आहे कारण याचें ध्येय सबंध शेतकरीवर्गाला कर्जातून पूर्णपणें मुक्त करून नवे करकरीत व्यवहार करावयास समर्थ करणें हें होय. या प्रयत्नांत साहस आहे पण त्याच्या पोटीं जे उच्च हेतु आहेत तिकडे पहातां हें साहस करण्याजोगें आहे. याच्याच जोडीला खेडेगांवच्या आर्थिक जीवनाची पुनर्घटना करण्याचेंहि ध्येय आहे. खेडेगांवचें संघटनात्मक जीवन स्थापण्यासाठीं गांवांत पंचायतींची स्थापना व्हावयाची आहे, मात्र त्या गांवांनीं आपली इच्छा प्रदर्शित केली पाहिजे. पंचायतींची स्थापना म्हणजे ग्रामस्थ लोकांच्या हातांत गांवाचा कारभार देणें आणि बाहेरचें नियंत्रण कमीतकमी करणें. गांवचे तलाठी, मुखी, पटेल, चौकीदार इ० ची नेमणूक करण्याचा अधिकार

पंचायतींना मिळेल. कालांतरानें योग्य भूमि तयार झाली आणि गांवच्या लोकांनीं मागणी केली तर जमीन-महसूल कसा वसूल करावा हें ठरवण्याचा अधिकारहि विशिष्ट गांवांना देण्यांत येईल. सरकारदस्त देण्यांत टंगळमंगळ करणारांचें खातें जप्त करून त्याचा लिलांव करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला मिळेल लिलांवांत आलेल्या किंमतींतून सरकारचें देणें भागवून शिल्लक राहिल्यास गांवच्या सार्वजनिक गरजा भागविण्यासाठीं त्या शिलकीच्या आधारें कायम निधी बनवतां येईल. खेडुतांच्या शेतीच्या गरजांना लागणारें भांडवल पंचायती देऊं शकतील व म्युनिसिपालिटींचे अधिकार उपभोगूं शकतील. ग्रामपंचायतींच्या स्थापनेसंबंधीचा कौन्सिलचा ठराव नं. २२६ पंचायतींना बरेच अधिकार देणारा आहे. खेडयांच्या पुनर्घटनेसाठीं जी बहादुरीची कामगिरी भावनगर संस्थाननें केली आहे तिजबद्दल तें संस्थान अभिनंदनार्ह आहे असें आमचें मत आहे. संस्थानांतील योजनेला कितपत यशप्राप्ति होते इकडे संस्थानच्या हितचिंतकांची, त्याचप्रमाणें अखिल हिंदुस्थानांतील शेतीच्या पुनरुज्जीवनाची काळजी वहाणाऱ्या सर्वांची सहानुभूतिपूर्ण नजर लागून राहिली आहे.

---

(७)

(ता. २३ जून १९३२ च्या टाईम्स ऑफ इंडियाच्या अंकांत प्रसिद्ध झालेला छोटा अग्रलेख.)

"शेतकऱ्यांचें ऋणविमोचन"

आपल्या शेतकऱ्यांच्या कर्जाचा भार कमी करण्यासाठीं भावनगर संस्थानाइतका प्रयत्न कोणीहि केलेला नाहीं. हल्लीचे महाराज अज्ञान असतांनाच त्यांनीं अशी इच्छा प्रदर्शित केली कीं शेतकऱ्यांच्या कर्जाचा बोजा कमी करण्यांत यावा आणि तो सुद्धां त्यांच्या राज्यारोहणाच्या अगोदर. जमीनमहसूलाची वीस लाख रुपये बाकी तुंबून राहिली होती त्या रकमेची दरबारनें सन १९२९ सालीं माफी दिली त्याचें कारण हेंच. त्याच वेळीं शेतकऱ्यांच्या डोक्यावर जें सावकारांचें कर्ज होतें त्याचीहि चौकशी करण्याचा हुकुम झाला आणि अशी योजना करण्यांत आली कीं सावकाराच्या बेकायदेशीर व जबर बोजांतून शेतकऱ्याला सोडवावयाचा पण त्याचवेळीं सावकाराला योग्य तेवढी रक्कम द्यावयाची. चौकशी अत्यंत कसून करण्यांत आली आणि त्या चौकशींत असें सिद्ध झालें कीं व्याजाचा दर शेंकडा अठरा ते पंचवीस असून शेतकऱ्याच्या अज्ञानाचा व निराश्रिततेचा फायदा खोटे हिशोब करून सावकार घेत असत. कमिटीनें केलेल्या चौकशीमुळें खेडुतांची जी गंभीर आर्थिक अवस्था नजरेस आली तिजमुळें शेतकऱ्यांचे दंगेधोपे होऊं नयेत म्हणून कर्जाच्या रोगानें पिडलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक आरोग्य मिळवून देण्याकरतां ताबडतोब उपाययोजना करावयास कौन्सिलचे प्रेसिडेंट सर प्रभाशंकर पट्टणी प्रवृत्त झाले. पूर्वीच्या व्याजबट्ट्याच्या व्यवहारांपासून आणि भविष्यकाळीं होणाऱ्या व्याजबट्ट्याच्या जुलमापासून शेतकऱ्यांना वचावण्यासाठीं संस्थाननें शेतकरी-संरक्षक कायदा पास केला; हा कायदा कसा काम देतो इकडे सर्व हिंदुस्थाननें लक्ष्य दिलें पाहिजे.

स्थानिक परिस्थितीप्रमाणें डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट्स् रिलीफ ॲक्टांत फरक करून हा कायदा घडविला आहे. दरबारच्या आणि सावकारांच्या कर्जातून शेतकऱ्यांना मुक्त केल्यानंतर जर शेतकऱ्यांना योग्यवेळीं शेतीच्या कामाला जरूर लागणारा पैसा उभा करतां आला नाहीं तर पूर्वस्थितीची पुनरावृत्ति होईल हें सर प्रभाशंकरजींच्या लक्ष्यांत चटकन आलें म्हणूनें ग्रामपंचायतींची स्थापना करावयाचें

ठरलें. ग्रामपंचायत म्हणजे जवळजवळ स्थानिक स्वराज्यच होय. संस्थाननें फक्त मागल्या कर्जाचा फडशा करण्याचा प्रयत्न केला आहे असें नव्हे तर भविष्यकाली कर्जबाजारी निर्माण होऊं नये म्हणून ही योजना केली आहे. गेल्या ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्टाच्या परीक्षणांत आह्मी म्हटलें कीं ३,५९,७०२ रुपयांच्या कर्जाची तडजोड रु. १,०२,७४७ रुपयांवर करण्यांत आली. हे आंकडे फक्त वारा गांवांतील शेतकऱ्यांपुरते होते. छत्तीस गांवच्या दुसऱ्या एका महालांतील शेतकऱ्यांचें दर्शनी कर्ज रु. ९,९५,४६३ होतें त्याची तडजोड रु. २,६१,४२७ देऊन करण्यांत आली. या योजनेमुळें भावनगरच्या कायमच्या ऋणमग्न शेतकऱ्यांना दरवर्षी द्याव्या लागणाऱ्या व्याजांत जवळजवळ अडीच लाख रुपयांची बचत झाली. दुसऱ्या मोठाल्या महालांचे आंकडे जमवण्यांत आतां कमिटी गुंतली आहे आणि त्यांच्या श्रमाचा परिणाम काय होतो इकडे सर्वांनीं सहानुभूतिपूर्वक लक्ष द्यावें.

---

(८)

(सप्टेंबर १९३२ मध्यें सतरावी बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह कॉन्फरन्स झाली त्यावेळी सर चुनीलाल व्ही. मेहता यांनीं अध्यक्षीय भाषण केलें त्यांतील उतारा:—)

इंडियन सेंट्रल बँकिंग कमिटीच्या मतें ऋणविमोचनाचा प्रश्न देशाच्या आर्थिक भरभराटीच्या दृष्टीनें आणि लोकसंख्येच्या मोठ्या समूहांत असंतोषाची वाढ होऊं नये या दृष्टीनें अत्यंत महत्वाचा आहे. कर्जबाजारीकडे दुर्लक्ष्य करून तत्संबंधीं कांहींहि न करणें हें सर्वांत वाईट धोरण आहे हें शेतकी कमिशननें दाखवून दिलें आहे. या कार्यासाठीं विधायक प्रयत्न कोणत्या दिशेनें करतां येतील याबद्दल सेंट्रल बँकिंग इन्क्वायरी कमिटीनें सूचना केल्या आहेत. मध्यप्रांत, पंजाब, बिहारओरिसा या प्रांतांत आणि अगदीं अलीकडे आपल्या शेजारी काठेवाडमधील भावनगर संस्थानांत या दिशेनें महत्त्वाचे प्रयत्नहि झाले आहेत.

---

(९)

(ता. १२ नोवेंबर १९३२ च्या 'युनायटेड इंडिया अँड इंडियन स्टेट्स्' च्या अंकांत प्रसिद्ध झालेला अग्रलेख.)

भावनगरमधील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा

भावनगर संस्थाननें कर्जबाजारीच्या राक्षसाचा नायनाट करण्यासाठीं जे प्रशंसनीय प्रयत्न केले त्याचेबद्दल कांही दिवसांमागें आम्हीं लिहिलें. या राक्षसाची भावनगरला फारच पीडा झालेली होती आणि त्यानें एकाहि शेतकऱ्याला सुस्थितींत राहूं दिलें नव्हतें. दरबारला आपला सारा नियमितपणें वसूल करतां येत नसे. आम्ही वेळोवेळीं भावनगरच्या ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्टाबद्दल लिहितांना तुंबून राहिलेला जमीनमहसूल भावनगरचें वैशिष्ट्य होऊन बसला आहे असें म्हटलें आहे. शेतीचेंहि नुकसान होत होतें कारण शेतकरी झाला तरी माणूसच असतो. ज्याच्या गळ्याभोवतीं सावकाराचें कर्ज आणि दरबारचें देणें या दोहोंचा सवामणाचा लंगर आहे अशा शेतकऱ्याकडून उत्साह अथवा उद्योग याची

आपण कितीशी अपेक्षा करूं शकणार? संस्थानचे मुख्य चालक वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध सर प्रभाशंकर पट्टणी हे आहेत. त्यांच्या सल्यानुसार कौन्सिलनें शेतकऱ्यांना वेळोवेळीं सारामाफी देऊन व अन्य तऱ्हेनेंहि सवलती देऊन आपल्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्या प्रयत्नांना यश येऊं शकलें नाहीं. संस्थाननें जो त्याग केला तो शेतकऱ्यांच्या फायद्याकरतां, पण त्याचा फायदा शेतकऱ्यांना मुळींच मिळत नव्हता. सर्व फायदा सावकाराच्या घशांत जात होता आणि सावकार मात्र रुपयाचे दहा रुपये करून शेतकऱ्यांच्या गळ्यांतला कर्जाचा धोंडा ज्यास्तच भारी करीत होता. यामुळें एकंदर शेतकऱ्यांच्या कर्जाच्या प्रश्नाची मुलकी खात्यामार्फत चौकशी करण्यासाठीं अनुभवी अंमलदारांची एक कमिटी नेमण्यांत आली. या कमिटीनें सुचवलेल्या योजनेनुसार भावनगर सरकारनें काय केलें त्याबद्दल यापूर्वी आम्हीं एकदां लिहिलें आहे.

आजतागायत पांच टप्पे अगर पोटमहाल यांतील खेडुतांना दरबारनें ऋणमुक्त केलें आहे या पांच टप्प्यांचा सालीना महसूल रु. ४,८६,६५८ आहे. त्या भागांतील शेतकऱ्यांचे नांवावर या वर्षीच्या फेब्रुआरी महिन्यांत असलेलें कर्ज रु. १४,१९,३७८ होतें आणि त्याची तडजोड रु. ३,६७,९९१ सावकारांना देऊन करण्यांत आली. या विधानाचा अर्थ नीटपणें समजण्यासाठीं आपण हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं दर्शनी कर्जामध्यें मूळचें खरें कर्ज फारच थोडें असून, त्यांत व्याज, पागडी आणि लोभानें तीक्ष्ण झालेल्या सावकाराच्या कल्पनाशक्तींतून निर्माण झालेले अन्यप्रकार यांची मिळवणी झाल्यामुळेंच मूळचें कर्ज चौपटीनें वाढलें. तेव्हां या तडजोडींत जप्तीचा अथवा रामाचें घेऊन गोंद्याला देण्याचा प्रकार नाहीं हें समजेल. या योजनेनें शेतकऱ्याचा तर फायदा झालाच पण सावकाराचाहि फायदा झाला. कारण कर्जबाजारीनें सदा पिडलेल्या शेतकऱ्यांकडून अनेक वर्षांत जेवढी रक्कम सावकारांना स्वतंत्रपणें वसूल करतां आली नसती इतकी रोकड रक्कम एका हप्त्यानें त्यांना मिळाली. या तडजोडीमुळें सावकाराचें नुकसान झालें म्हणून त्याचेबद्दल कोणाला अनुकंपा वाटल्यास त्यानें हें लक्षांत ठेवावें कीं संस्थानांत व्याजाचा साधारण दर पंचवीस टक्के असून याचे दुप्पट व तिप्पट व्याज घेतल्याचे सुद्धां दाखले आहेत. या परिस्थितीमुळें कांहीं तरी बहादुरीची योजना करणें जरूर होतें. जी व्यवस्था संस्थाननें केली ती राज्यकारभाराच्या दृष्टीनें तसेंच न्याय व सदसद्विवेकबुद्धि यांचे दृष्टीनें योग्यच होती असें दाखवतां येईल. मि. व्ही. एन्. मेहता, आय. सी. एस., संयुक्तप्रांताच्या सरकारचे पूर्वीचे सेक्रेटरी आणि काश्मीरच्या कौन्सिलचे आतांचे सभासद, यांनीं या योजनेसंबंधीं माहिती विचारण्यासाठीं एक पत्र सर प्रभाशंकर पट्टणी यांना लिहिलें, त्याच्या उत्तरांत सर प्रभाशंकर लिहितात :—

> " सर्व राष्ट्रांना ग्रासून बसलेला आर्थिक रोग बरा व्हावयास पाहिजे असेल तर महायुद्धामुळें उत्पन्न झालेला कर्जाचा आणि नुकसानभरपाईचा बोजा दूर झाला पाहिजे हें आतां सर्वांना कबूल झालें आहे; लहान प्रमाणांत कां होईना तीच नियम ऋणबद्ध आणि जवळ जवळ नादार झालेला जो हिंदी शेतकरीवर्ग त्यालाहि लागू आहे. "

जो अखिल हिंदुस्तानचा प्रश्न आहे असा प्रश्न सोडवण्याची सुरुवात भावनगरमध्यें केलेली आहे. ऋणबद्ध खेडुताच्या ऋणविमोचनासाठीं प्रत्यक्ष केलेल्या या प्रयत्नाकडे जनतेनें लक्ष्य पुरवावें अशी जाहीर सूचना बंगाल चेंबर ऑफ कामर्सचे अध्यक्ष श्री. नलिनीरंजन सरकार यांनीं कलकत्ता

युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूटमध्यें अलीकडे दिलेल्या व्याख्यानांत केली. हिंदुस्थानांतील शेतीची पुनः भरभराट व्हावी अशी ज्यांना इच्छा आहे अशा सर्व सरकारी व बिनसरकारी लोकांनीं भावनगरमधील या प्रयत्नाचें गंभीरपणें मनन केलें पाहिजे. एक भारतीय प्रश्न सोडवण्याचा भावनगरमध्यें जो प्रयत्न झाला आहे त्याचेकडे विचारी माणसांचें लक्ष्य जात आहे हें वरील पत्रावरून दिसतें, व याबद्दल आह्मास आनंद वाटतो. मि. मेहता आपल्या पत्रांत विचारतातः—

"तुह्मी एकदां शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त कराल, पण पुनः त्यांच्यावर कर्जाचा लोंढा येणार नाहीं कशावरून?"

हा लोंढा न यावा ह्मणून एक मोठी भिंत बांधणें जरूर आहे नाहींतर पुराणांतील सायसिफसच्या प्रयत्नांप्रमाणें हे प्रयत्नहि फुकट जातील असें श्री. मेहता ह्मणतात. या टीकेला सर प्रभाशंकर यांनीं पाठविलेलें उत्तर, ऋणविमोचनाची योजना व ग्रामपंचायतीची योजना, या संबंधाच्या दुसऱ्या कागदपत्रांसह, एका लहानशा पुस्तकांत प्रसिद्ध झालेलें आहे. कर्जाच्या व्याधीपासून मुक्त नसलेल्या आर्यावर्तांतील इतर भागांत या योजनांकडे लक्ष्य पुरवण्यांत येईल तर बरें होईल.

ग्रामपंचायतीची योजना ह्मणजे ऋणविमोचनाचीच पूर्तता होय. शेतकरी स्वतंत्र, संस्कृत, स्वावलंबी व्यक्ति बनेपर्यंत कर्जबाजारीला स्वैरसंचार करूं द्यावा यांत शहाणपणा नाहीं. हा एक भोंवरा आहे. शेतकरी ज्या परिस्थितींत रहातो, फिरतो, ज्या परिस्थितींत आपलें जीवन कंठतो त्या परिस्थितींत सुधारणा करण्याची सुरुवात कोठें तरी झाली पाहिजे. अगदीं नजीक येऊन ठेपलेल्या अडचणींतून शेतकऱ्याची मुक्तता आपण केली तर आपण हा प्रश्न फक्त अर्धवट सोडवल्यासारखा होतो. व्याधि खोल गेलेली असल्यामुळें ती पुनः जोरावणार नाहीं असें मुळींच ह्मणतां येणार नाहीं. ही अडचण कशी दूर करावी? की, रोग असाध्य आहे? जर रोग असाध्यच असेल, तर भावनगरमध्यें ज्या साधनांचा उपयोग करून हा प्रश्न सोडवण्यांत आला त्या साधनांचें समर्थन साध्याच्या आधारें होऊं शकेल किंवा नाहीं कोण जाणे! भावनगरच्या ऋणविमोचनाच्या योजनेचें रहस्य समजावयास पाहिजे असेल तर मोठ्या योजनेचा एक भाग या दृष्टीनें तिजकडे पाहिलें पाहिजे. तिची यशस्विता ग्रामपंचायतीची योजना व खेडुतांच्या उद्धारार्थ संस्थाननें हातीं घेतलेल्या अन्य योजना यांचे यशस्वितेवर अवलंबून आहे. अर्थात् या योजना कालांतरानेंच पूर्ण होणार. श्री. मेहता यांस पाठवलेल्या उत्तरांत सर प्रभाशंकर म्हणतात कीं ग्रामपंचायतीची पुरी प्रगति व्हावयास स्वाभाविकपणेंच पुष्कळ काल लागणार. दरम्यान सढळपणें तगाई देणें, सहकारी पेढ्यांचा विस्तार करणें यांसारखे तात्पुरत्या उपयुक्ततेचे उपाय योजणें प्राप्त आहे. भावनगरमधील प्रयोग अत्यंत आशाजनक आहे. ऋणमुक्त झालेल्या टप्यांत जमीन महसूल अधिक प्रमाणांत व सहज होत आहे हा ताबडतोब दिसून येणारा एक परिणाम आहे. अशा रीतीनें जी अनुकूल भूमि तयार झाली आहे तिचा फायदा घेऊन ग्रामपंचायतींची स्थापना या भागांत करण्याचे प्रयत्न ताबडतोब होतील अशी आम्ही आशा करतों. ग्रामपंचायतीच्या कायद्याखालीं अमुक अटी पुऱ्या करणाऱ्या गांवाला पंचायत मागण्याचा हक्क आहे. ज्या गांवांत पंचायत स्थापन होईल त्या गांवांतील स्थानिक कारभार गांवकऱ्यांच्या हातांतच बहुतांशीं राहील व बाहेरचें नियंत्रण कमीत कमी होईल. अशा प्रकारें सुरू केलेल्या ग्रामोद्धाराची योजना बळकट करण्याकरतां संस्थानांत सहकारी संस्थांची संघटना सुरू झाली आहे. सहकारी चळवळीची प्रगति सावकाराच्या दुष्ट स्पर्धेमुळें अटकली ह्मणें सर्वमान्य आहे. सुदैवेंकरून आतां भावनगरमध्यें त्या स्पर्धेचा संभव नाहीं.

शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीवरील मोहिमेचें तिसरें अंग म्हणजे शिक्षणाचा प्रसार करून जनता जागृत करणें हें होय. हें अंग कांहीं कमी महत्त्वाचें आहे असें नाहीं। हिंदुस्थानांतील सामान्य शेतकरी बहुतेक गोष्टींत नशिबावर हवाला ठेवणारा असतो, पण त्याला व्यवहारज्ञान असतें, त्याच्या अंगीं शांत चिकाटी असते; काटकसर व उद्योग यांत तर तो कोणालाहि हार जाणार नाहीं. त्याला जर थोडेंसें शिक्षण मिळालें तर जगांतल्या कोणत्याहि शेतकऱ्यापुढें हार जाणार नाहीं असा तो नमुनेदार शेतकरी बनेल. भावनगरचा प्रयोग यशस्वी होवो असें आम्ही इच्छितों आणि भावनगरचा कित्ता गिरविणारीं दुसरीं संस्थानें निघतील अशी आशा करतों.

---

(१०)

(सन १९३०-३१ सालच्या भावनगर संस्थानच्या ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्टाचें परीक्षण 'युनायटेड इंडिया अँड इंडियनस्टेट्स् 'च्या ता. २६ नोवेंबर १९३२ च्या अंकांत अग्रलेख म्हणून प्रसिद्ध झालें त्यांतील उतारा.)

भावनगर १९३०-३१ सालीं

थोड्याच दिवसांपूर्वी भावनगर संस्थानांतील ऋणविमोचनाच्या योजनेविषयीं आम्ही सविस्तर विवेचन केलें. ही योजना व्यापक असून या देशांत अपूर्व आहे. सबंध देशाचें लक्ष्य तिजकडे जाईल कारण कर्जबाजारी फक्त भावनगरांत आहे असें नसून तिचा फैलाव हिंदुस्थानभर झालेला आहे. सावकार सुद्धां त्या योजनेच्या अंमलबजावणीसाठीं अर्ज करीत आहेत यावरून योजना एकतर्फी नाहीं व सावकाराच्या सुद्धां फायद्याचीच आहे हें दिसतें. दुसरी नमूद करण्यालायक प्रागतिक योजना म्हणजे खेड्यांच्या पुनर्घटनेसाठीं बनविलेला ग्रामपंचायतीचा कायदा. शेतकऱ्यांना ऋणमुक्त करून झालेला फायदा अल्पकालीन ठरावयास नको असेल तर गांवकऱ्यांच्या हातांत गांवचा कारभार सोपवून आणि रयतेच्या आर्थिक हिताच्या जोपासनेची जबाबदारी त्यांचेवर टाकून ऋणविमोचनामुळें झालेली सुधारणा पक्की करून टाकली पाहिजे.

---

(११)

(टाइम्स ऑफ इंडियाच्या १९३६ च्या Year Book सांवत्सरिकांतील उतारा.)

भावनगर

हल्लींच्या महाराजांना एका सधन संस्थानाची गादी मिळाली आहे आणि सर प्रभाशंकर पट्टणी यांच्या देखरेखीखालीं त्यांच्या संस्थानच्या राज्यव्यवस्थेचें नांव अखिल हिंदुस्थानांत दुमदुमत आहे. पण हिंदुस्थानांत सर्वत्र विकट परिस्थिती उत्पन्न झाली आहे अशा कालांत या महाराजांचेंहि काम कांहीं सोपें नाहीं. त्यांच्या शिरावर जी जबाबदारी पडली आहे तिची त्यांना जाणीव आहे. त्यांना मिळालेलें शिक्षण आणि त्यांची स्वाभाविक हुषारी यांमुळें आपल्या जबाबदारीतून अशा तऱ्हेनें बाहेर पडण्याची त्यांच्या अंगीं लायकी आहे कीं तेणेंकरून त्यांच्या प्रजेची भरभराट होऊन प्रजेमध्यें संतोष पसरेल व पूर्वपरंपरागत राजनिष्ठा वृद्धिंगत होईल. खेडुतवर्ग संस्थानच्या सुस्थितीच्या पाठीचा कणा आहे असें ते मानतात. राज्यारोहणानंतरची त्यांची पहिली कृति म्हणजे जमीन विकण्याचा व दुसऱ्यास देण्याचा हक्क

त्यांनीं शेतकऱ्यांना बहाल केला ही होय; मात्र ज्याला जमीन द्यावयाची तो शेतकरीच असला पाहिजे. सावकारांना मूळ मुद्दल व रास्त व्याज देऊन शेतकऱ्यांना कर्जाच्या गुलामगिरींतून मुक्त करण्याच्या योजनेकडे ते विशेष लक्ष्य पुरवीत आहेत. शेतकरी – संरक्षक कायद्याची पूर्तता करण्यासाठीं ही योजना घडविलेली आहे आणि सबंध देशाचें लक्ष्य या योजनेनें ओढून घेतलेंच पाहिजे अशा निश्चयानें तिला कसोटी लावण्यांत आली आहे. संस्थानांतील कांहीं भागांतल्या शेतकऱ्यांनीं व सावकारांनीं आपल्या देण्याघेण्याची तडजोड करण्यांत यावी अशी आपली इच्छा दर्शविली आणि त्या कामासाठीं अंमलदार व सावकारांचे प्रतिनिधि यांची कमिटी नेमण्यांत आली. सावकारांच्या चोपडयांप्रमाणें कर्जाची रक्कम रु. ३,५९,७०२ भरली; नवीन कायद्यांत घालून दिलेल्या नियमांप्रमाणें देण्याची खरीखुरी रक्कम रु. १,८४,५०७ ठरली; अखेरीस ही रक्कम रु. १,०२,७४७ वर आणण्यांत आली. सर्व शेतकऱ्यांना ऋणमुक्त करून त्यांना अगदीं नवे व्यवहार करावयास समर्थ करण्याचा हा प्रयत्न अपूर्व आहे. याकरतां भांडवल बरेंच लागेल आणि या प्रयत्नांत कांहीं बूड येणेंहि अपरिहार्य आहे. पण या प्रयत्नाच्या बुडाशीं जे उच्च आणि उपकारी हेतु आहेत त्यांच्याशीं तुलना करतां ही बूड विशेष नाहीं आणि तेवढी सोसण्याची तयारी ठेवली पाहिजे.

खेडयांत ग्रामपंचायतीची स्थापना करून दुसरी एक लक्ष्यांत घेण्यालायक सुधारणा भावनगर संस्थानांत सुरू केलेली आहे.

परिशिष्ट दहावें

—:×:—

भावनगर संस्थाननें केलेली विलक्षण कामगिरी

(श्रीमान् ना. गो. चापेकर, सरन्यायाधीश संस्थान औंध, यांचे 'पुरुषार्थ' मासिकांत प्रसिद्ध झालेले लेख.)

१ भावनगर संस्थानची प्रजा आज निष्कर्जी झाली आहे.

२ भावनगर संस्थानांत दारूची अजीवात बंदी आहे. दारूचें उत्पन्न नाहीं असें हेंच एक संस्थान हिंदुस्थानला भूषणभूत झालें आहे.

३ जमिनीवरील कर कायमचा काढून टाकावा व शेतकऱ्यांस जमिनी कराशिवाय द्याव्या, ही अपूर्व महत्वाकांक्षा भावनगर दरबारनें आज मनांत धरली आहे.

४ भावनगर संस्थानांत दुष्काळभयनिवारण करण्यासाठीं विशेष योजना चाललेली आहे.

५ भावनगर संस्थानांत नमुनेदार शेत-सुधारणेचे प्रयोग चालू आहेत.

६ भावनगर संस्थानला खादी-विक्रीनें अडीच लाख रुपये मिळतात. इतर संस्थानांत हा व्यवसाय कां होऊं नये ?

७ भावनगरांत शिक्षणाची प्रगतिहि फार झालेली आहे.

निष्कर्जी प्रजा

भावनगरच्या ऋणविमोचनामुळे सर्व जगाचें नसलें तरी सर्व हिंदुस्थानाचें लक्ष ह्या उदयोन्मुखी संस्थानाकडे लागून राहिलें आहे. आज पांच लाख वस्तीच्या ह्या संस्थानांत एकहि खेडुत-शेतकरी-ज्याला कर्ज आहे असा राहिला नाहीं. **प्रत्येक शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्जाचा असह्य भार एकदम नाहीसा झाल्यामुळे आजपर्यंत कधी न अनुभविलेल्या आनंदांत तो डुलत आहे. त्याच्या भोवतालचें सर्व वातावरण त्यास रम्य भासूं लागलें आहे.** तीच जमीन, तेच डोंगर, तोच गांव, तेच लोक, पण ह्या सर्वांकडे त्याची पहाण्याची पूर्वीची दृष्टी साफ बदलली आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे शेतकऱ्याचें सर्वच जीवित आतां सुखमय झालें आहे.

ह्या सगळ्याचें श्रेय भावनगर संस्थानचे तरुण पण विनयसंपन्न **अधिपति महाराज श्री कृष्णकुमार सिंगजी रावळ** त्यांच्या मंत्रिमंडळाचे अध्यक्ष **सर प्रभाशंकर पट्टणी** यांना आहे हें सांगावयास नको. **आपल्या गरीब प्रजेला निष्कर्जी करण्याचा असा धाडसी पण शहाणपणाचा प्रजाहिताच्या कळकळीनें तळतळून केलेला प्रयत्न आजवर जगांत क्वचित्च कोणी केला असेल.**

प्राथमिक चौकशी

स. १९२२ च्या आरंभी लिलिआ महालांतील कांहीं खेडुतांनीं आपली आर्थिकदृष्ट्या हलाकीची स्थिती व त्यामुळे भावी जीवनक्रमाविषयीं निराशेची वृत्ति वरिष्ठ मुलकी अंमलदारांच्या कानांवर घातली. त्यांनीं आपल्या अर्जांत ह्या परिस्थितीचें कारण सावकारी पद्धत व व्याजाचा जबरदस्त दर असें लिहिलें होतें. ह्या अर्जाने भावनगर दरबारचें लक्ष शेतकऱ्यांच्या दारिद्र्याकडे वेधलें.

देशांतील शेतकरीवर्ग दारिद्र्यानें गांजलेला असल्यास त्यावरून त्या देशांतील राज्यपद्धतिच सदोष आहे असें कोणीहि मानील, ह्या जाणिवेने भावनगर दरबारने लिलिया खेडुतांच्या गाऱ्हाण्याकडे कानाडोळा केला नाहीं. वरिष्ठ मुलकी अधिकाऱ्याने अर्जांतील तक्रारींची ताबडतोब चौकशी केली. ह्या प्राथमिक जुजबी चौकशींत लोकांची तक्रार सकारण आहे, असें आढळून आलें; एवढेंच नव्हे तर दरिद्री शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्याचे उपाय योजण्याच्या कामीं दिरंगाई करून चालणार नाही अशीहि खात्री झाली. लगेच शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाची चौकशी करून उपाय सुचविण्याकरता दरबारनें जून महिन्यांत एक समिती नेमली. ह्या समितीचे अध्यक्ष **दि. ब. त्रिभुवनदास त्रिवेदी** हे होते.

दि. बहादूर त्रिवेदी ह्यांनीं प्रथम लिलिया महालाशिवाय दुसऱ्या निरनिराळ्या महालांतील २२ खेडयांत हिंडून चाचणी पाहिली. तेव्हा त्यांस असें दिसून आलें कीं, **लिलिया महालांच्या लोकांच्या अर्जांत रतिभरहि अतिशयोक्ति नाही, तसेंच कर्जाच्यापायींच शेतकरी डबघाईस आला आहे.** हा अनुभव येताच सर्व संस्थानभर हिंडून चौकशी करण्याचें समितीने ठरविलें. शेतकऱ्यांच्या घरीं जाऊन त्याला निर्भयतेचीं आश्वासनें देऊन त्याचा विश्वास संपादन करून त्याचे कागदपत्र तपासून तसेंच सावकारांस बोलावून, त्यांना अनेक प्रश्न विचारून, त्यांचे जमाखर्च पाहून, फौजदारी खटले होणार नाहीत अशी हमी देऊन समितीने दर शेतकऱ्याचें कर्ज निश्चित केलें.

आपली अब्रू जाईल ह्या भीतिने कोणी कमी कर्ज सांगत, तर पैसे परस्पर सरकारकडून मिळणार ह्या लोभाने सावकाराच्या सांगीवरून कोणी आपली कर्जाची रक्कम फुगवून सांगत, असा अनुभव ह्या समितीलाहि आलाच. समितीने एकंदर ५५२ सावकारांचे व्यवहार तपासले, त्यावरून व्याजाचा जबर दर व कुटिल सावकारीचे नमुने ह्याचा अंदाज समितीला करतां आला. त्याचप्रमाणें ठिकठिकाणच्या निरनिराळ्या स्थितींतील शेतकऱ्यांच्या कुटुंबांचा खर्च किती, खर्चवेच जाऊन शेतीचें उत्पन्न राहतें किती, वगैरे अवश्य ती माहितीहि समितीने गोळा केली.

चौकशीचा परिणाम

चौकशीअंतीं समितीला असें आढळून आलें की, एकंदर खातेदारांमध्यें **निष्कर्जी खातेदारांचें प्रमाण शेंकडा ५५ असून कर्जबाजारी खातेदारांचें प्रमाण शेंकडा ४५ आहे.** भावनगर संस्थानांत २७८९८ खातेदार असून त्यांपैकीं १२४९३ खातेदारांना सावकारांच्या कागदपत्रांप्रमाणे ८६,३८,८७४ रु. कर्ज होतें. ह्या कर्जापैकीं ४५,११,१:३ रुपयांचें कर्ज रास्त म्हणून समितीने ठरविलें; आणि अखेरीस मांडीवाळ करून २०,५९,४७३ रुपये सावकारांस रोखीने देऊन त्यांच्या सर्व कर्जाचा पुरा निकाल केला.

२७८९८ खातेदारांना सरकार देणें (चावडी) २६,५६,५५४ रु. असून कर्जबाजारी १२४९३ खातेदारांना सरकारला दरसाल १३७९६९६ रु. सारा म्हणून द्यावे लागतात. ह्याचा अर्थ असा कीं, सरकारच्या १ रुपयाच्या मागे सावकाराचे ६।७ रु. होते. शेतकरी सावकाराच्या हातांत इतका गेल्यावर कोणत्याहि सरकारला आपल्या १ रुपयाची धास्ती वाटणें स्वाभाविक आहे. ह्याप्रमाणें १२४९३ खातेदारांना भावनगर संस्थानाने निष्कर्जी करून सोडलें.

बाकीचे १२४०५ खातेदार राहिले, ते सारेच विनकर्जी होते असें नव्हे. त्यांपैकीं किल्येकांना कर्ज होतें परंतु शेतीशिवाय इतर व्यापारधंदा करीत असल्यामुळें त्यांची कर्जफेड करण्याचें सरकारने नाकारलें. अर्थात् निव्वळ शेतीवर उपजीविका करणाऱ्यांनाच दरबारने ऋणमुक्त केलें. शेती करून शिवाय इतर उद्योगधंदा करणारांना अशा रीतीने उपेक्षिणें न्याय्य म्हणतां येणार नाहीं. कर्ज कोणत्या कारणाकरतां झालें हें पहाणें इष्ट होतें. मात्र हें काम अधिक भानगडीचें झालें असतें यांत शंका नाहीं.

दरबारचें स्पृहणीय धोरण

सावकाराचे हिशेब पाहून तडजोड होतांच ठरलेली रक्कम सावकारास देऊन टाकण्याचें शहाणपणाचें धोरण दरबारनें स्वीकारल्यामुळे प्रथम विरोध करीत असलेले सावकार आपखुषीनें पुढें येऊन ह्या ऋणविमोचनाच्या योजनेंत सामील होण्यास तयार झाले. दरबारची ही योजना बहुतेक सावकार व ऋणको ह्यांच्या संमतीनेच सिद्धीस गेली असें म्हणण्यास हरकत नाहीं. हें कर्जफेडीचें काम १९३० च्या एप्रिलांत सुरू झालें व १९३४ च्या मार्च महिन्यांत संपलें. प्रथमतः काम थोडें दिरंगाईने चाललें होतें. सर प्रभाशंकर पट्टणींना हें कसें खपणार ? ते तेव्हां इंग्लंडमध्यें होते. त्यांच्याकडून काम लवकर पुरें करण्याबद्दल निकडीचीं पत्रें येऊं लागलीं. ह्याचा परिणाम असा झाला कीं, ३७ तालुक्यांपैकीं २० तालुक्यांचें काम शेवटल्या १२।१४ महिन्यांत आटोपलें. मुख्य समितीला उपसमित्या नेमाव्या लागल्या अशा एकंदर सहा समित्या काम करीत होत्या. मुख्य समितींत मुलकी अंमलदाराबरोबर न्यायखात्यांतील अंमलदारहि होता.

सावकारांचे पाश

जगामध्यें मनुष्यस्वभाव सर्वत्र व सर्वकालीं थोड्याबहुत फरकाने सारखाच असल्यामुळे कुळाना नाडणारी सावकारांची रीतहि सारखीच आढळल्यास त्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

(१) ज्येष्ठ किंवा आषाढ महिन्यांत कर्ज देऊन हंगामी म्हणजे भाद्रपद आश्विनांत त्याची सवाईने फेड करून घेणें.

(२) मनोती आकारून ती मुद्दलांत सामील करून घेणें.

(३) कर्जाऊ पैशावद्दल गल्ला किंवा कापूस हलक्या भावाने घेण्याचा करार करणें व तो न मिळाल्यास त्यावेळच्या तेजीच्या बाजारभावाने झालेल्या रकमेचा फेररोखा करून घेणें.

(४) खरवटी अगर बियाणें दिढी दुपटीने वसूल करणें.

(५) दरम्यान आलेल्या वसुलावर व्याजाची सूट न देतां उलट चक्रवाढीने व्याजांचा आकार करणें.

(६) कर्जाऊ दिलेल्या हलक्या अथवा स्वस्त दराच्या धान्याबद्दल अधिक भावाचें व चांगल्या प्रतीचें धान्य घेणें.

(७) एका व्यवहाराचा हुकूमनामा मिळवून त्याच्या अंमलबजावणीची धास्ती दाखवून इतर कर्ज वसूल करून घेणें.

(८) कर्जफेडींत ऋणकोला जन्मभर गुलामगिरींत राबवणें.

हे व अशासारखे प्रकार ह्या चौकशींत उघडकीस आले. हे सर्व प्रकार साळसूदपणाचे समजले जातात व राजरोसपणें चालतात. ह्याशिवाय जाणून बुजून केलेल्या लबाडीचे प्रकार निराळे. पण ते जुजबी ह्यांत शंका नाही.

व्याजाचा दर

भावनगर संस्थानांतील शेतकऱ्यांना १८ ते ७५ रु. पर्यंतच्या दरानें व्याज भरावें लागे. सरासरीनें व्याजाचा दर पाहिला तर तो दरसाल दरशेकडा २५ रुपयांच्या खाली जाणार नाही.

तडजोड

फेडीची रक्कम नक्की करतांना सावकाराला त्याचे मुद्दल व त्यावर बारा टक्के प्रमाणें व्याज इतकी रक्कम मिळावी हा जरी उद्देश असला तरी शेतकऱ्याची फेडीची मात्रता हीच फेडीची अंतिम मर्यादा अखेरीस ठरली गेली.कोणत्याही शेतकऱ्यास व्यक्तिशः त्याच्या तीन सालांच्या धाऱ्यापेक्षा अधिक रक्कम द्यावी लागणार नाही अशा रीतीने शेवटची तडजोड करण्यांत आली.

प्रत्यक्ष आंकडे पाहिले तर खातेदाराच्या दीडपट धाऱ्यांइतकीच त्याच्या कर्जफेडीची रक्कम भरते. एकंदर १२४९३ खातेदारांचा शेतसारा १३७९६९६ रु. आहे. तेव्हा एका खातेदाराला सुमारे ११० रु. धारा बसतो. ह्या खातेदारांची कर्जफेड २०,५९,४७३ रु. देऊन केली असल्यामुळे प्रत्येक खातेदाराला १६५ रु. द्यावे लागले असें होतें. सारा ११० रु. व फेड १६५ रुपये.

सरकारच्या ह्या खटपटीमुळें शेतकऱ्याच्या डोक्यावरचें अजस्र ओझें खाली झालें. एकंदर कागदोपत्री कर्ज ८६,३८,८७४ रुपये. एवढ्याचें सरसकट २५ टक्के दराने नुसतें व्याजच २१ लक्ष रुपये होतें! **एका वर्षाचें व्याज देऊन कायमची ऋणमुक्तता झाली!** ह्यांतच सरकारच्या प्रयत्नांचें यश आहे.

सरकारने कर्जफेडीला दिलेली रक्कम शेतकऱ्याकडून तूर्त तरी वसूल करण्याचें ठरविलें आहे. **चार टक्के व्याजाने ही रक्कम सरकार वसूल करून घेणार. भावनगर संस्थानांत जमिनीची विक्री कायद्याने बंद आहे.** आतां ऋणमुक्त केलेल्या शेतकऱ्यांचें पीकही सरकार जमींत असल्यासारखे आहे. कारण शेतकऱ्यांचें पीक सरकारी खळ्यावर सध्या आणण्यांत येतें तेथें भागबटाईच्या पद्धतीप्रमाणें पिकाच्या वाटण्या करतात ह्या भागांतून सरकार सारा, तगाईची रक्कम असल्यास ती, आणि उरेल तें व्याज मुदलांत सरकार घेतें. असें कर्जफेड होईपर्यंत सालोसाल चालावयाचें.

ऋणविमोचनाचें फल म्हणजे, १. सरकारी सारा बिन आयासानें वसूल होतो. २. कोर्टांत पैशाची एकहि फिर्याद नाहीं. कर्जफेड करतांना कर्जफेडीच्या दिवसापर्यंतचें सर्व कर्ज फिटलें गेलें असें कायदा करून ठरविण्यांत आलें आहे.

अशा स्वरूपाची ही भावनगरऋणविमोचनाची कथा आहे. भावनगराला हें कसें करतां आलें एतद्विषयक विवेचन आतां करूं

सावकार कां वळले ?

सध्याचे दिवस मंदीचे. कोणाच्या हातांत पैसा नाहीं. ऋणकोकडून वसूल येण्याची आशा नाहीं. १२४९३ खातेदारांना ८६,३८,८६४ रु. कर्ज म्हणजे प्रत्येक खातेदार शेतकऱ्याला ६९१-७-११ रु. इतकें कर्ज होतें. अनेक वर्षांचें साचत साचत आलेलें हें कर्ज शेतकरी वारील, अशी अपेक्षा करणेंच वेडेपणाचें झालें असतें. शिवाय जमिनीची विक्री करतां येत नसल्यामुळे सावकाराला उत्पन्नाचीच काय ती हमी. परंतु असें किती उत्पन्न असणार कीं त्यांतून शेतकरी व्याज मुद्दल सहज फेडूं शकेल ? ह्या खेरीज दर पांच वर्षांनी दुष्काळाची फेरी आहेच. अशा परिस्थितींत सावकार एकदम हातीं येत असलेले पैसे–ती पुरी फेड नव्हती तरी–घ्यावयास तयार झाले आणि ह्या सुसंधीचा फायदा भावनगर दरबारने करून घेतला. हें सर्व योग्यच झालें. ठरलेले पैसे भावनगरला एकदम एका रकमेने देतां आलें हीहि गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

जर्मन विक्रीला पात्र असती, व्यापाराची तेजी असती म्हणजे शेतकऱ्याच्या मालाला भाव असते, पैसे एकदम मिळण्याचा संभव नसता, तर सावकारांनी रुपयाचे चार आणे खचित घेतले नसते. असो.

भावनगर संस्थानचें उत्पन्न

आता भावनगर संस्थानचें उत्पन्न किती आहे तें आपण पाहूं, म्हणजे दक्षिणेंतील लहान संस्थानांना कोणता मार्ग स्वीकारावा लागेल ह्याचा विचार करतां येईल.

स. १९३२-३३ च्या मागील पांच सालांच्या सरासरीने पाहतां भावनगर संस्थानचें उत्पन्न १,५०,०८,८५७ रु. असून खर्च १,२०,२०,०९९ रु. आहे. तथापि संवत १९८९ (इ.स. १९३३) च्या संस्थानच्या कारभारासंबंधीच्या अहवालांत संस्थानचें एकंदर उत्पन्न २,०३,१९,७७५ रु. दाखविलें असून खर्च २,२०,०८,६८८ रु. दाखविला आहे. उत्पन्नाच्या मुख्य बाबी येणेप्रमाणे.

(आकडे ठोकळ आहेत)			(आकडे ठोकळ आहेत)		
जमीनमहसूल	... २८	लक्ष	रेलवे	... ३४	हजार
खुष्कीजकात	... ८९	,,	अबकारी	... ८४	,,
व्याजपट्टा	... २६	,,	कर	... ७५	,,
किरकोळ	... ३	,,	मिठागर	... १६	,,
कोर्ट फी स्टँप	... १	,,	जंगल	... २७	,,
बंदर	... ५६	हजार	छापखाना	... ३३	,,
ट्राम्वे	... ३०	,,	शिक्षण	... ७२	,,

कायदा व न्याय ... ४५ हजार वगैरे

उत्पन्नाची वाढ

ह्यांत एक गोष्ट मनांत भरण्यासारखी आहे ती ही कीं, ह्या संस्थानचें उत्पन्न अमावास्येच्या भरतीप्रमाणें सारखें वाढत आहे. अल्प काळांत दीड कोटीवरून दोन कोटीवर उत्पन्न आलें; एवढेंच नव्हे तर ह्याच्या पुढें तें किती मजल मारील ह्याचा अंदाजही करतां येणें शक्य नाहीं. कारण जकात, रेलवे, मिठागरें ह्या उत्पन्नाच्या बाबी सालोसाल फुगत आहेत. ह्याच्या पुढे जमीनमहसूल ही बाब अगदीं क्षुल्लक वाटते. भावनगर संस्थानने जवळ जवळ १२ कोट रुपये निरनिराळ्या रीतीने गुंतवलेले आहेत. एवढ्या रकमेचें व्याजच अवाढव्य होईल! मालमत्ता असली की जोखीम असतेच. त्याचाहि विचार केला तरी निव्वळ म्हणजे बिनजोखमी भांडवल साडेतीन कोटीवर आहे. दुसऱ्या संस्थानिकांनाच भावनगरने दीड कोटी रुपये कर्जाऊ दिले आहेत. ह्यांत—

विकानेर ४० लाख. ध्रांगध्रा ३६ लाख. अलवार १५ लाख.

अशा कांहीं रकमा आहेत. ५२ लाख रुपये नुसते चालू खात्यांत आहेत. तीन कोट रुपये सरकारी रोख्यांत गुंतलेले असून २३ लाख किमतीचे अनेक कंपन्यांचे भाग (शेअर्स) संस्थानच्या मालकीचे आहेत

खर्चाच्या बाबी

उत्पन्नाच्या मानाने खर्चहि मोठा असणार हें उघड आहे. खर्चावरून राज्याच्या मोठेपणाचा कयास करतां येतो. म्हणून खर्चाच्या कांहीं बाबींचा येथें उल्लेख करणें अवश्य आहे.

(१) प्रथमतः राजकुटुंबाच्या खर्चाचा ज्यांत अंतर्भाव होतो असा दरबार खर्च ४,५७,९८० रु. १९३३ सालीं पडला आहे. त्याच्या अगोदरच्या सालीं हाच खर्च ४,५१,०१३ रु. होता. (२) न्यायखातें १। लक्ष. (३) शिक्षण ६ लक्ष. (४) पोलीस ३ लक्ष. (५) फौज ३॥ लक्ष. (६) बंदर ५ लक्ष. (७) राज्यकारभार (Administration) ५ लक्ष. (८) पेनशन ३ लक्ष....वगैरे.

येणेप्रमाणे दुसऱ्या खर्चाच्या बाबी आहेत. बंदर व आगगाडीचा मार्ग ह्यांच्याबद्दल विस्तृत माहिती देणें बरें होईल.

आगगाडी

काठेवाडांत भावनगर संस्थानानेंच आगगाडीचा रस्ता प्रथम तयार केला. सर तख्तसिंगमहाराज ह्यांच्या कारकीर्दीत स १८७७-७८ साली प्रथम ह्या संस्थानांत आगगाडी चालू लागली. हलीं ३०७ मैल आगगाडीचा मार्ग तयार असून त्याच्यावरून गाड्या चालत आहेत. ह्या खात्याची व्यवस्था व कारभार दरबारने नेमलेल्या अधिकाऱ्यांमार्फतच चालू आहे आगगाड्यांचें ऐन उत्पन्न १९३३ सालीं ३४ लक्ष रुपयांचें झालें. खर्चवेंच जाऊन निव्वळ नफा १५,८३,०५४ रु. इतका राहिला. आगगाड्यांसाठीं आजपर्यंत २,२१,८९,१८९ रु. खर्च करण्यांत आले अर्थात् शेंकडा ७.६८ रु. व्याज पांडवलावर संस्थानला मिळालें रेल्वेचा रिझर्व्हफंड १,१४,३७,१७४ रु. आहे.

ट्राम

भावनगरपासून तळजपर्यंत ३४ मैल लांबीचा ट्रामरस्ता १२,३५,३८८ रु. खर्च करून तयार

केला आहे. ह्या ट्रामपासून १९३२-३३ सालांत संस्थानला ४९,९३५ रु. निव्वळ नफा राहिला. भांडवलावर ४ टक्क्यांपेक्षां अधिक व्याज सुटलें.

बंदरें

भावनगर संस्थानांत बंदरें एकंदर सहा आहेत. त्या शिवाय लहान बंदरें निराळीं. सन १८६०-६३ व ६६ ह्या सालीं झालेल्या करारापमाणें भावनगरच्या बंदरांना ब्रिटिश बंदरांचे हक्क प्राप्त झाले आहेत. १९३२-३३ सालांत १५२ आगबोटी व ५१४५ जहाजें भावनगर बंदराला लागलीं. १५२ आगबोटींपैकीं १८ बोटी साखरेने, १६ कोळशाने, २९ तांदूळ व इमारती लांकूड ह्यांनी भरलेल्या अशा आल्या. ३ बोटींनी जपानी सीमेंट, ११ बोटीनीं आफ्रिकन कापूस आणि ५७ बोटींनी इतर माल आणला. लोखंडाची वाहतूक १८ बोटींनी केली. संस्थानच्या बंदरांतून अहवालाच्या सालीं २,७९,५०,५०३ रुपये किंमतीचा माल बाहेर गेला आणि ४,१५,२९,६२८ रुपये किंमतीचा माल बाहेरून बंदरांत आला. बंदर सुधारणा फंड ७३,८९,७४६ रु. आहे. स. १९१३-१४ पासून १९३२ ३३ सालांपर्यंत मालाची चढउतर जरी दुप्पट झाली असली तरी हें वाढतें प्रमाण आयात मालासंबंधानेच आहे. निर्गतींत फारसा फरक झाला नाहीं. १९१३-१४ सालीं २,४६,६५,७७३ रु. ची निर्गत व १,४२,०४,८८९ रु. ची आयात होती. १९३२-३३ च्या आयात निर्गतीचे आंकडे वर दिलेच आहेत. ह्यावरून परराष्ट्राचा माल भावनगरला येऊन तेथून हिंदुस्थानांतील इतर भागांत जातो हें उघड आहे.

भावनगर संस्थानाच्या संपन्नतेची कल्पना येण्यास इतकी माहिती तूर्त पुरी आहे.

बंदर, व्यापार व समृद्धि

भावनगर संस्थान काठेवाडांत आहे. आपण इकडे काठेवाड व गुजराथ एकच समजतों; पण काठेवाड हा गुजराथेहून भिन्न प्रांत आहे. गुजराथच्या दक्षिणेस काठेवाड असून तें द्वीपकल्प आहे, म्हणजे त्याच्या तीनहि बाजूला समुद्र आहे. अरबी समुद्राने वेढलेल्या ह्या द्वीपकल्पाच्या एका अंगास खंबायतचें व दुसऱ्या अंगास कच्छचें आखात आहे. ह्यामुळे काठेवाडांत बंदराची सोय उत्तम आहे. **बंदरें म्हटलीं म्हणजे व्यापार आलाच; आणि व्यापार म्हणजे समृद्धि.** भावनगर, नवानगर, जुनागड, राजकोट, ध्रांगध्रा, पालिठाण, पोरबंदर, गोंडळ, मोरवी वगैरे १८७ लहान मोठीं संस्थानें एका काठेवाड एजन्सीमध्यें आहेत. ह्या संस्थानिकांशिवाय काठेवाडांत ब्रिटिश, गायकवाड व पोर्तुगीज ह्यांचाहि अंमल आहे.

काठी जात

काठेवाड हें नांव '**काठी**' जातीच्या लोकांवरून पडलें आहे. ही जात काठेवाडांत अद्यापि आहे. वाड म्हणजे प्रदेश काठी लोकांचा प्रांत तो काठेवाड. काठेवाडांतच झालवाड व गोहिलवाड असे दोन भाग आहेत. हीं नांवेंहि झाल व गोहिल नांवाच्या रजपूत जातींवरून पडलीं आहेत. भावनगर संस्थान हें गोहिलवाड विभागांतच आहे. भावनगरचे राजे गोहेल जातीचे रजपूत आहेत. वाडा, वाडी, वाडकुले, वाडगें, वाडकर इत्यादि शब्दांत वाड हा शब्द आपणांस आढळतो. महाराष्ट्रियांना

काठेवाडाबद्दल आत्मीयत्व वाटणें स्वाभाविक आहे. काठेवाड हे नांव ह्या प्रांताला मराठ्यांनीच ठेविलें आहे. पूर्वीचें नांव 'सौराष्ट्र' होतें.

भावनगरचें क्षेत्र २९६१ चौरस मैल आहे. स. १९३१ च्या शीरगणती प्रमाणें भावनगरची लोकसंख्या ५,००,२७४ असून त्यांत २,५७,१५६ पुरुष आणि ५,४३,११८ बायका आहेत. एकंदर लोकसंख्येंत शेंकडा ८६ हिंदु, ८ मुसलमान आणि बाकी जैन, ख्रिस्ति, पारशी वगैरे आहेत.

भावनगर गुजराथइतकें उष्ण नाहीं नाहीं. दक्षिण किनाऱ्यावरील हवा तर उत्तमच आहे.

भावनगर संस्थानला ब्रिटिश सरकारास खंडणीदाखल दरसाल रु. १,२८,०६०, पेशकषीबद्दल गायकवाड संस्थानला रु. ३५८१–८–० आणि झोडतलबी ह्मणून जुनागड संस्थानला रु. २२,८५८ द्यावे लागतात. झोडतलबी हा मुसल्मानी अंमलांतील कराचा अवशेष आहे. जुनागड संस्थानला १३४ संस्थानांकडून एकंदर ९२४२१ रु. ह्या कराबाबत सालिना मिळत असतात, असें आहे तरी जुनागडला पेशकषीदाखल गायकवाड सरकारास दरसाल ३७२९० रु. द्यावे लागतात. ही खंडणी मराठ्यांच्या साम्राज्याची आठवण करून देणारी आहे. काठेवाड व गुजराथ हे प्रांत पेशवे आणि गायकवाड ह्यांनी वाटून घेतले ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे. वसईचा तह होईपर्यंत काठेवाड पेशव्यांच्या अंमलाखालीं होतें.

भावनगरचे महाराज अगदी तरुण आहेत. स्वभावाने सरळ, साधेच सुशील असे दिसले. छानछोकी तसाच कावेबाजपणा हे अवगुण त्यांना घेरतील असें वाटत नाहीं, ते जात्याच निष्कपटी असावेत. प्रजेच्या कल्याणाविषयी ते विचार करतात असें त्यांच्या बोलण्यावरून दिसलें. ह्यांना **वीरभद्रसिंहजी** नांवाचा पुत्र असून तोच युवराज आहे. महाराज साहेब कौन्सिलच्या मदतीने राज्यकारभार चालवतात. **सर प्रभाशंकर पट्टणी** हे कौन्सिलचें अध्यक्ष आहेत. हे बुद्धिमान, मुत्सद्दी, चतुर आणि महत्त्वाकांक्षी गृहस्थ भावनगरला लाभले, हें त्या संस्थानचे भाग्य होय. भावनगरच्या उर्जितावस्थेंत बरेंचसें श्रेय सर प्रभाशंकर ह्यांनाच द्यावें लागेल. सत्तरी उलटून गेली असतांहि मानसिक किंवा शारीरीक विकलतेचें कोणतेंच लक्षण त्यांच्या ठिकाणीं दिसून येत नाहीं. ऋणविमोचनाची कल्पना त्यांची; तांतडीने सिद्धीस नेण्याची खटपटहि त्यांचीच. सर्व संस्थानांनी सर प्रभाशंकर ह्यांचें अनुकरण केल्यास ब्रिटीश सरकारलाहि हा प्रश्न विचारांत घेणें भाग पडेल.

अपूर्व महत्त्वाकांक्षा

भावनगर संस्थानांतील जमिनीवरील सारा कायमचा काढून टाकण्याचे विचार त्यांच्या मनांमध्यें घोळत आहेत! ही त्यांची इच्छा सफल झाली तर जगाच्या इतिहासांत अदभुत गोष्ट घडवून आणल्याचें पुण्य त्यांस लाभणारें आहे. जमिनीवरील करावरच ज्यांचीं राज्यें चालली आहेत, त्यांना हा कर काढून टाकणें शक्य नाहीं, एवढेंच नव्हे, तर त्यांच्याकडून शेतकऱ्यांचें कल्याण होण्याचाहि संभव नाहीं... कारण दोघांचें हितसंबंधच परस्परविरोधी आहेत.

भावनगर संस्थानांत लागवड जमीन १२,४४,२७१ एकर असून पीक न देणारी माळ जमीन ४,१८,५७८ एकर आहे. लागवडी जमिनीपैकीं सुमारे ४२ हजार जमीन ओसाड जात असल्यामुळे

संस्थानचें दरसाल अजमासें ५०।५१ हजार रुपयांचें नुकसान होत असतें, एकंदर सरकार सारा २७ लक्ष ७६ हजार आहे, हें मागें सांगितलेंच आहे. ह्यावरून एकरी सुमारें सवादोन रुपये धारा बसतो.

ज्वारी, बाजरी व कापूस हीं मुख्य पिकें असून गहूं, गळिताचीं धान्यें व ऊस ह्यांची उपज कमी प्रमाणांत असते. पाऊस सुमारें २५ इंच पडतो, दरपांच वर्षांनी दुष्काळाचें संकट ओढवत असल्याने दुष्काळाची बाधा होऊं नये म्हणून पाट, तलाव, विहिरी बांधण्याची व एक मोठा द्रव्यनिधि करून ठेवण्याची योजना महाराजसरकार ह्यांच्या मनांत घोळत आहे.

सहकारी संस्था

स. १९३२-३३ सालीं संस्थानांत शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था ५४ होत्या ह्या संस्थांचे सभासद १४३४ असून त्यांचें खेळतें भांडवल २,१७,२७७ रु. होते. ह्या सर्व संस्था सुस्थितींत आहेत असें दिसतें. कारण त्यांची गंगाजळिच ४० हजार रुपयांवर आहे. ह्या शिवाय धर्मार्थ काढलेली रक्कम ३॥ हजारांवर आहे. सभासदांच्या ठेवी ८१ हजार रुपयांच्या आहेत. ४७ हजार रुपये दरबारने कर्जाऊ दिले आहेत. अहवालाच्या सालीं ८ हजार रुपये निव्वळ नफा राहिला.

दारुबंदी

दारूची बंदी असल्यामुळे गांजा व अफू ह्यांच्या व्यतिरिक्त दुसरें अबकारीचें उत्पन्न संस्थानाला नाहीं. दारूबंदीमुळे कोलन वॉटर लोक दारूच्याऐवजी पिऊं लागले. परंतु ही गोष्ट निदर्शनास येतांच दरबारने कोलन वाटरच्या विक्रीवरहि निर्बंध घातले. आता औषधाकरतां खरोखर जरूर आहे अशी खात्री करून घेऊन आरोग्यखात्याकडून कोलन वाटरची विक्री केली जाते. ह्या बाबतींत **आमच्याकडील ब्राह्मणी संस्थानांनी भावनगरपासून धडा घेण्यासारखा आहे.**

मीठ

समुद्रकिनाऱ्याच्या सोईमुळें संस्थानांत मीठ उत्पन्न करतां येतें.अहवालाच्या सालीं १,५५,५६२बंगाली मण मिठाची संस्थानाने विक्री केली पैकी खुद्द संस्थानांत ८७,०४७ मण मीठ खपलें. बाकीचें मीठ काठेवाडांतील इतर संस्थानांत विकलें गेलें. संस्थानची लोकसंख्या ५ लक्ष आहे. तेव्हा माणसीं सुमारे ७ शेर मीठ भावनगरचे लोक खपवतात असें दिसतें.

ह्या मिठाच्या विक्रीपासून संस्थानाला १५५८८ रु. प्राप्ति झाली. मिठाचें उत्पन्न दरसाल वाढत आहे.

संरक्षण

भावनगर संस्थानाच्या उत्पन्नाच्या मानाने फौजफाटा मनांत भरण्यासारखा नाही. बंदराच्या संरक्षणार्थ पुढेमागें एखादें आरमारी जहाज ठेवण्याचा प्रसंग काठेवाडी समुद्रकिनाऱ्यावरील संस्थानांवर येण्याचा संभव आहे. संस्थानचा लष्करी खर्च साडेतीन लक्ष रुपयांचा आहे. २०० घोडे व ५०० माणसें ह्यांचा हा खर्च कोठें आणि कोतवाली खात्यांतील १८२७ माणसांवर होणारा अडीच लाखांचा खर्च कोठें ? सर्व जगांतील लष्करी खर्च गेला तर किती तरी लोकांच्या पोटापाण्याची सोय करतां येईल.

न्याय

अहवालाच्या सालीं २३ खुनाचे खटले न्यायाधीशांसमोर आले. ह्यावरून फौजेपेक्षा कोतवालीची अवश्यकता अधिक आहे हें सिद्ध होतें. जमीन विकतां येत नसल्यामुळे न्यायखात्यांचें काम बरेंच हलकें झालेलें दिसतें. कारण ४४१ अपिलांपैकीं स्थावर मिळकतींचीं अपीलें फक्त ४४ आहेत. पैशाच्या देवघेवीबाबत केलेल्या अपिलांची संख्या ३२६ आहे. ऋणविमोचन आणि जमीनविक्रीला बंदी ह्यामुळे भावनगरच्या न्यायाधीशांना आपली नोकरी जाते कीं काय म्हणून भीति वाटत असेल! अर्थात उत्पन्नापेक्षा खर्चच ह्या खात्यावर अधिक आहे. कायदा व न्याय (तुरुंगसुद्धा) ह्या सदराखाली १२४,६३९ रुपयांचा खर्च दाखविला असून उत्पन्न मात्र ४४,५२६ रु. चें दाखविलें आहे.

मुलांचें शेतकीमंडळ

शेतकी खात्याकडून जे सुधारणेचे प्रयोग यशस्वी होतात ते खालपर्यंत पोचविण्याची एक अनुकरणीय योजना भावनगर संस्थानानें केली आहे. **प्रत्येक खेड्यांत १४ ते १८ वर्षांपर्यंतच्या मुलांचें एक मंडळ स्थापन करण्यांत येतें.** ह्या मंडळांतील प्रत्येक मुलगा गांवावरची त्याच्या बेताची जमीन त्याला वाटेल ती घेतो. बियाणें व खत ह्यांचा पुरवठा त्याला शेतकीखात्याकडून केल जातो. ह्या आपल्या लहानशा जमिनीच्या तुकड्यावर तो मुलगा मोठ्या दक्षतेने काम करतो. पीक तयार झाल्यावर आसपासचे शेतकरी बोलावून त्यांना नवीन पद्धतीने व काळजीपूर्वक शेतावर काम केलें असतां कसा फायदा होतो तें प्रत्यक्ष दाखविण्यांत येतें. **ज्या मुलाचें पीक सर्वांत चांगलें आलें असेल, त्याला शेतकीखात्याकडून बक्षीस मिळतें. शेतकीसुधारणेचा हा खरा उपाय. बाकी नुसता देखावा!**

उत्तम गाईबैलांची पैदास करण्याकडेहि दरबारचें लक्ष आहे. संस्थानभर नमुनेदार वळू ठेऊन त्यांचाच उपयोग उपज करण्याच्या कामीं व्हावा म्हणून बाकीचे बैल खच्ची करण्याचें ठरविलें आहे. तदनुसार १९३२-३३ सालीं दोन हजार बैलांची खच्ची बर्डीझोपद्धतीने करण्यांत आली.

कारखाने

संस्थानांत उद्योगधंदे फारसे नसले तरी २ कापडाच्या गिरण्या, १ आगकाडयांच्या पेटयांचा कारखाना, ८ साबू बनविण्याचे व ४९ सरकी काढण्याचे कारखाने आहेत. दोन कारखान्यांत टूंक करतात. रासायनिक औषधें बनविण्याचेहि तीन कारखाने आहेत. छापखाने १७ आहेत, औषधी कारखान्यांत टिंक्चर्स, लिनिमेंट्स वगैरे अनेक प्रकारचीं इंग्रजी औषधें तयार करतात. त्यांचा खप काठेवाडांतील इतर संस्थानांतहि होतो. ह्या कारखान्यांची उत्तरोत्तर भरभराट होईल अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

कापडाच्या एका गिरणींत १२८८ मजूर काम करीत आहेत. दुसरी एक गिरणी नुकतीच उभारण्यांत आली आहे. जुन्या गिरणींत अहवालाच्या सालांत १६,२६,३८९ रु. किमतीचें कापड व १०,०९,३५६ रु. किमतीचें सूत निघालें. तिसरी एक सूत काढण्याची गिरणी आहे. तिच्यांत २५० माणसें काम करीत आहेत. ह्या शिवाय खादीच्या कारखानदारांनी २,२९,६०५ रुपयांची खादी बनविली.

सोडावाटरचे १० व बर्फाचे ३ कारखाने ह्यांना विसरून चालावयाचें नाहीं. एकंदरींत उद्योग-धंद्यांचा व्यापहि संस्थानाचा लक्षणीय आहे असें म्हणतां येणार नाहीं.

आरोग्य रक्षण

संस्थानांत एकंदर ४ रुग्णालयें व २३ दवाखाने आहेत. त्यापैकीं खुद्द भावनगर शहरांत १६ दवाखाने आहेत. ह्याखेरीज तळाज येथें शेट प्रभुदास जीवनदास ह्यांनी ९००० रुपये दिल्यामुळे १ आयुर्वेदाचा दवाखाना उघडला आहे. महाराजसाहेब गादीवर आले त्यावेळीं त्यांनी एक लाख रुपये धर्मार्थ काढले असून त्यांतून खेडेगांवांत राहून धंदा करणाऱ्या आयुर्वेदी वैद्यांना उत्तेजनार्थ मदत करण्यांत येते. हल्लीं १६ वैद्य ह्या सवलतीचा फायदा घेत आहेत. सुदर्शन हें देशी औषध तापावर फुकट देण्यांत येतें. दरबारनें १५००० रु. ह्यासाठीं दिले आहेत. रुग्णालयें व दवाखाने ह्यांवर १९३२ –३३ सालीं १,५८,८१२ रु. खर्च झाले आहेत. एकंदर रोगांत हिंवतापाचें प्रमाण मोठें. दरबारने एका फिरत्या डॉक्टराची स्वतंत्र नेमणूक केल्यामुळें खेड्यांतील गरीब लोकांना मोठा उपयोग होत आहे. महारोग्यासाठींहि एक स्वतंत्र रुग्णालय आहे.

शिक्षण

एवढ्या मोठ्या संस्थानाला शोभेल अशी शिक्षणाची सोयहि संस्थानने केली आहे. संस्थानांत १ आर्टकॉलेज व ६ हायस्कुलें आहेत. एकंदर शिक्षण देणाऱ्या संस्था ४६२ आहेत. त्यांत ३७५८१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मुलींचें हायस्कूल स्वतंत्र आहे. तात्या पंतोजी शाळा, खासगी शाळा, तशाच मिशनरी लोकांनी चालविलेल्या शाळा ह्या सर्व मिळून १४१ आहेत. प्राथमिक शिक्षण सक्तीचें नाहीं, तरी शाळेंत जाण्याच्या वयाच्या मुलांपैकीं शेंकडा ८० मुलें शाळेंत जातात. सामळदास कॉलेजांत ५०० वर विद्यार्थी आहेत. शाळेंत शिकत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांची संख्या ४५०३ आहे. १९३२–३३ सालीं ६, ४०,९४३ रुपये विद्यादानावर खर्च झालेला आहे. कॉलेजाच्या खालोखाल महत्त्वाची शिक्षणसंस्था म्हणजे **दक्षिणा मूर्ति** होय. दक्षिणा मूर्तिसंस्था म्हणजे केवळ वसतिगृह नाहीं. शिक्षण विषयक प्रयोग ह्या संस्थेंत केले जातात. **बालमंदिरांत** मॉंटेसरी तऱ्हेवर लहान मुलांना शिकविलें जातें **विनय मंदिर** नांवाचें हायस्कूलहि ही संस्था चालवते. **अध्यापन मंदिरांत** शिक्षक तयार करण्यांत येतात. ह्या संस्थेला सरकारची सालीना तीन हजारांची मदत मिळते.

खानेसुमारी

भावनगर संस्थानची १९३१ सालची खानेसुमारी संस्थानच्या अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदारीवर केली होती. तिचा रिपोर्ट त्यांनी स्वतंत्र रीत्या प्रसिद्ध केला आहे तो फारच अभ्यसनीय झाला आहे. ह्या रिपोर्टांतील कांहीं महत्त्वाच्या बाबींचा येथें विचार करावयाचें योजिलें आहे. प्रथमतः स्त्रीपुरुषजातिविषयक गोष्टी विचाराकरतां घेऊं.

स्त्रीपुरुष जातीसंबंधाने पहिला सिद्धांत असा आहे की ह्या दोन जाति सर्वत्र समसमान नसतात; कित्येक देशांत स्त्रिया अधिक तर कित्येकांत पुरुषजात अधिक असते.

निरनिराळ्या देशांतील व प्रांतांतील पुरुषांच्या मानानें बायकांची संख्या खालीं दिली आहे.

देश	खाने सु० वर्ष	१००० पुरुषांशीं स्त्रियांची संख्या	देश	खाने सु० वर्ष	१००० पुरुषांशीं स्त्रियांची संख्या
जर्मनी	१९२१	१०९९	भावनगर	१९३१	९०५
इंग्लंड	,,	१०९६	बडोदा	,,	९४२
स्कॉटलंड	,,	१०८०	हिंदुस्थान	,,	९४०
डेन्मार्क	,,	१०५३			
ऑस्ट्रेलिया	,,	९६७	बंगाल	,,	९२४
अमेरिका	,,	९६१	संयुक्तप्रांत	,,	९०२
कानडा	,,	९४०	मुंबई	,,	९०१
कोचीन	१९३१	१०४३	आसाम	,,	९००
मद्रास	,,	१०२५	अजमीर	,,	८९२
बिहार ओरिसा	,,	१००५	ग्वाल्हेर	,,	८८७
मध्यप्रांत व वऱ्हाड	,,	९९८	काश्मीर	,,	८८१
त्रावणकोर	,,	९८७	कुर्ग	,,	८०३
हैद्राबाद	,,	९५९	दिल्ली	,,	७२२
ब्रह्मदेश	,,	९५८	बलुचिस्थान	,,	७१७
म्हैसूर	,,	९५५	अंदमान निकोबर	,,	४९५

वरील कोष्टकावरून असें दिसतें की, पश्चिम युरोप व हिंदुस्थानांतील कोचीन, मद्रास व बिहार हे प्रांत खेरीज करून बाकी बहुतेक ठिकाणीं स्त्रिया पुरुषांहून कमी आहेत. स्त्रियांची संख्या कमी असण्याचीं अनेक कारणें आहेत. तथापि स्त्रिया कमी असतात हा सामान्य नियम खरा. बदलापुरांत स्त्री-पुरुष जात जवळ जवळ समसमान आहे. परंतु पुरुषांहून बायकांची संख्या एकानें कमी आहेच

स्त्रिया कमी असण्याचें पहिलें कारण म्हणजे स्त्रिया पुरुषांपेक्षा कमी जन्मतात. उदाहरणार्थ–

देश	१०० स्त्री जन्मांशीं पुरुष जन्मांचें प्रमाण	देश	१०० स्त्री जन्मांशीं पुरुष जन्मांचें प्रमाण
इंग्लंड	१०४	रशिया	१०५
फ्रान्स	१०५	इटली	१०६
जर्मनी	१०५	आयर्लंड	१०६
बेल्जियम्	१०५	नॉर्वे	१०६
हॉलंड	१०५	स्पेन	१०६
स्वडिन	१०५	ग्रीस	११२
डेन्मार्क	१०५		

ग्रीस सोडल्यास पुष्कळ देशांत स्त्रीपुरुष-जन्माचें प्रमाण सारखेंच आहे हें दिसून येईल. आतां आपल्या देशांतलि कांहीं प्रांतांचे आंकडे पाहूं—

बिहार ओरिसा	१०४	आसाम	१०७
कुर्ग	१०४	संयुक्तप्रांत	१०८
मद्रास	१०४	पंजाब	१०९
मध्यप्रांत व वऱ्हाड	१०४	वायव्यसरहद्द	१२३

शेवटला आंकडा ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. वायव्य सरहद्दप्रांतांत बायका फार कमी. येथील लोक तुर्की इराणी वंशाचे आहेत.

मुलगा किंवा मुलगी जन्मण्याच्या कारणाची चर्चा अद्यापि चालूच आहे; तथापि कांहीं वंशांत अगर जातींत निश्चयाने मुलगे अधिक जन्मतात, कांहींत मुली अधिक जन्मास येतात ह्यांत शंका नाही. **औरस संततींत मुलांचें प्रमाण अधिक असून अनौरस संततींत मुलींचें प्रमाण अधिक असतें असें म्हणतात. तसेंच शहरांत मुली अधिक उपजतात; खेड्यांत मुलगे अधिक जन्मास येतात.** प्रथम जन्मास येणारें मूल मुलगा असतो असाहि एक समज आहे. हे सर्व तर्क कितपत शास्त्रशुद्ध आहेत ह्याचा संशय आहे. आपल्या इकडे गांवोगांवच्या जन्म-मृत्यूंचा स्वतंत्र अभ्यास होईल तेव्हांच कांहीं निश्चित अनुमानें काढतां येतील.

पुरुष जन्मास अधिक येतात तसे मरतातहि अधिक. १९२१ ते ३० पर्यंतच्या दशकांत भावनगर संस्थानांत ४०८१६ पुरुष मेले, तर स्त्रीमृत्यु ३४१३९ होते. हजार पुरुष मेले तर बायका ८३६ मरतात. हेंच प्रमाण कमी जास्त सर्वत्र असतें. **जन्मण्यांत आणि मरण्यांत पुरुषच अधिक कामगिरी करतात.** मुलीपेक्षा मुलांची जोपासना चांगली होते असें म्हणतात. पण अनुभव असा येतो की, मुलांकडे अधिक लक्ष मिळूनहि पांच वर्षेपर्यंत मुलीपेक्षा मुलगे अधिक मरतात. **मुलां-विषयीं अधिक दक्षता कां घेण्यांत येते ह्याचें हें खरें कारण आहे. हिंदूंना मुली नको असतात हा मूर्खपणाचा आरोप आहे.** लहान वयांत पांचाच्या पुढें मात्र हें प्रमाण रहात नाहीं. पुढें स्त्रिया अधिक मरतात. ६० वर्षांच्या वयापर्यंत हें असें चालतें साठीनंतर पुनः पुरुष अधिक मरतात, बायका कमी मरतात. म्हणजे आरंभीं आणि अंतीं पुरुष जात कमकुवत असते. वैद्यशास्त्राला संशोधन करण्यास येथें चांगलें क्षेत्र आहे स्त्रियांना कोणत्या वयांत जपणें अवश्य आहे, हेंही पुरुषांना ह्या आंकड्यांवरून समजेल.

भावनगरच्या जन्ममृत्यूच्या आंकड्यांवरून खेड्यांत जन्मास आलेल्या मुलांत पुरुष जात अधिक असते ह्या सिद्धांताला पुरावा मिळण्यासारखा आहे. ह्याहि बाबतींत इकडील खेड्यांतील जन्माचे आंकडे अभ्यासण्यासारखे आहेत. पण अशा गोष्टीकडे अद्यापि कोणाचें लक्षच जात नाहीं. ह्या खाने-सुमारीच्या अहवालांत ३७ हिंदु जातींतील स्त्री-पुरुषांचें प्रमाण सर्व वयांची सरासरी काढून त्या सरा-सरीच्या वयाला काय पडतें तें आंकडेवारी दाखविलें आहे; त्यावरून असें दिसतें कीं, १००० पुरुषांमागें हजाराहून अधिक स्त्रिया ज्या जातींत आहेत, अशा फक्त ११ जाती निघाल्या, बाकीच्या २६ जातींत पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या कमी निघाली. भवसार, औदिच्य ब्राह्मण, श्रीमाळी, दर्जी, धेड, हजाम,

काठी, खवस, मोची, कपोल वाणी व दशा वाणी ह्या त्या अकरा जाती होत. सर्वांत अधिक स्त्रिया खवस जातींत सांपडतात. मुसलमानांच्या ९ जातींपैकी फक्त पिंजारी जातींतच स्त्रियांची संख्या पुरुषांहून अधिक असते. बाकीच्या सर्व जातींत स्त्रिया कमी.

भावनगर संस्थानांतील ७२२ प्रथम जातींची चौकशी करण्यांत आली, त्यावरून असें आढळलें कीं, ह्यांमध्यें २७४ स्त्री जात असून ४४८ पुरुष जात होती. म्हणजे १००० प्रथम जात पुरुष– ६१२ प्रथम जात स्त्रिया असें प्रमाण बसतें. पुरुष जातच जन्मास अधिक येते तर प्रथम जातींतहि पुरुषाधिक्य असणें स्वाभाविक आहे.

स्त्रियांची प्रसवक्षमता हाहि एक अभ्यसनीय विषय आहे. प्रत्येक स्त्रीला सरासरी ६–७ मुलें होतात. हा नियम धरून चालण्यास हरकत नाही. ही खानेसुमारी करणारांनी ७४२ कुटुंबें ह्या दृष्टीनें तपासलीं. ह्या कुटुंबांत ४९१० मुलें जन्मास आलीं असें आढळलें; अर्थात् कुटुंबामागे (नवराबायकोचें) ६·६ मुलें हें प्रमाण पडलें. जन्मलेल्या ४९१० पैकी, ३२३४ शिल्लक राहिलीं होतीं. बाकीचीं मेलीं. एक हजार जन्मलेल्यांत ६५९ जगतात असें होतें. हिंदूंत वाघरी व मुसलमानांत बोहरी ह्या जातींत संततीचें प्रमाण आठावर गेले आहे. काठी, कुंभार, सुतार व पारशी ह्या जातींत सर्वांत कमी म्हणजे ६ च्या आंत आहे. सारांश मुलांची सरासरी ५ व ९ ह्यांच्या दरम्यान असते. **संतति मुळीच न होणारे स्त्रीपुरुष फारच थोडे असतात.** लग्न होऊन १५ वर्षांचा काल लोटला असतांहि ज्यांना मूल झालें नाहीं अशीं ३११३ कुटुंबांत ४७ कुटुंबें निघालीं. ह्यांत लग्नाच्या वेळीं बायकोचें वय १५ ते २४ ज्या कुटुंबांत असल्याचें आढळलें, अशा २९ कुटुंबांतील स्त्रीपुरुषांचे समागम वंध्य असल्याचें नमूद आहे.

जन्ममृत्यूचे आकडे हा संशोधकांना मोठा अभ्यासाचा विषय आहे. सर्व अधिकाऱ्यांनी जन्ममृत्यूचीं पत्रकें बिनचूक ठेवण्याची आवश्यकता किती आहे हें ह्यावरून समजेल; परंतु त्याचें महत्त्व ओळखण्याइतके चतुर अधिकारी आमच्यांत अद्यापि निपजावयाचे आहेत.


00095297

Digitized with financial assistance from the
Government of Maharashtra
on 02 July, 2018